# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

### दिनांक १६-०५-१९९५ ते २८-१२-१९९५

### रजिष्टर क्र. ०१

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दि. १६-०५-९५ रोजी १.०० वाजता भरलेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त. मंगळवार, दिनांक १६-०५-९५ रोजी सकाळी ११ वाजता मा. आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली समिती सभागृहात स्थायी समिती सभेस सुरुवात झाली या सभेस खालील स. सभासदास कार्यालयीन कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.**

१) श्री. अब्दुल रशिद खान (मामू)
२) श्री. सुभाष कच्छवाह
३) श्री. डॉ. कराड भागवत
४) श्री. गौतम खरात
५) श्री. प्रदिप जैस्वाल
६) श्रीमती रजनी जोशी
७) श्री. प्रकाश निकाळजे
८) श्री. बैनाडे कवरसिंग
९) श्री. म. मुस्ताक अहेमद
१०) कु. माया लाडवाणी
११) श्री. मेहेर विजयकुमार
१२) श्रीमती पद्मा शिंदे
१३) श्री. प्रभाकर विधाते
१४) श्री. महादेव सुर्यवंशी
१५) श्री. सुदाम सोनवणे
१६) श्री. हमीदउद्दिन ताबा

**विषय क्र. १/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) ब व सभाकामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ६५ अन्वये स्थायी सयमितीच्या १६ (सोळा) सदस्यामधून मा. सभापती स्थायी समिती यांची निवड करणे.

**संवाद :**

मा. आयुक्त यांनी सर्व प्रथम सर्व स. सभासदांचे स्वागत केले व स्थायी सिमती, सभापती पदाकरिता चार नामनिर्देशानपत्र प्राप्त झालेले आहेत. प्राप्त पत्रानुसार उमेदवारांची नांवे वाचून दाखविण्यात आले ते खालील प्रमाणे आहेत.

१) डॉ. कराड भागवत
२) श्री. जैस्वाल प्रदिप शिवानारायण
३) कु. माया लिंबाजी लाडवाणी.
४) श्री. हमीदउद्दिन ताबा

स्थायी समिती सभापती पदाकरिता नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उेदवारांना उमेदवारांनी अर्ज परत घेण्यात ११.३० वाजेपर्यंत वेळ देण्यात आला. उमेदवारी अर्ज परत घेण्यापर्यंत चार उमेदवारांपैकी दोन उमेदवार आपले उमेदवारी अर्ज परत घेतली त्यांची नांव खालीलप्रमाणे आहेत.

१) कु. माया लिंबाजी लाडवाणी
२) श्री. हमीदउद्दिन ताबा
उर्वरित दोन उमेदवार (१) डॉ. कराड भागवत किसनराव (२) श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण सभापती पदाकरिता रिंगणात असल्यामुळे निवडणूका गुप्त मतदान पध्दतीने क्रमप्राप्त असल्यामुळे मतपत्रिका तयार करण्या अंदाजे १०/१५ मिनिटांचा वेळ लागेल असे गृहित धरून ११.४८ वाजता मतदानास सुरुवात करण्यात येईल असे मा. आयुक्त यांनी सुचित केले.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** नगरसचिव श्री. गोविंद मगरे यांचे वडील श्री. विठ्ठल मगरे यांचे नुकतेच देहावसन इझालेले आहे. तेंव्हा सभगृहातर्फे विठ्ठल मगरे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. वरील सुचनेप्रमाणे विठ्ठल मगरे यांना ००.०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. सर्व स. सभासदांना मतदान प्रक्रियेची पध्दत समजाऊन सांगण्यात आली. ११.४५ नंतर मतदान प्रक्रिया सुरुवात करण्यात आली. प्रथम मतदानास वापरण्यात येणारी मतपेटी दाखविण्यात आली. दाखविल्यानंतर सर्व स. सभासदांच्या समक्ष नगर सचिव यांच्या स्वाक्षरीने मतपेटी सिल करण्यात आली व क्रमाक्रमाने मतदान करण्यात आले व उमेदवार अथवा त्यांच्या प्रतिनिधींना मतमोजणीस समक्ष मतमोजणीसाठी हजर राहण्याची परवानगी देण्यात आली.

मतदान झाल्यानंतर सर्व स. सभासदांसमक्ष सिलबंद मतपेटी उघडण्यात येऊन मतमोजणी प्रक्रियेस सुरुवात करण्यात झाली.

मतमोजणी अंती डॉ. कराड भागवत किसरनराव यांना ०६ आणि श्री. प्रदिप जैस्वाल यांना १० मते पडली, निडणूक निकाल पत्रानुसार श्री. प्रदिप जैस्वाल यांची स्थायी समिती, सभापती पदाकरिता निवड झाल्याचे मा. आयुक्त यांनी घोषित केले.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** आज सकाळी ५.०० वाजता स्वातंत्र सेनानी श्री. भाऊसाहेब मोरे व साहित्यीक श्री. दिनानाथ पाठक यांचे निधन झाले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

वरील सुचनेप्रमाणे स्वातंत्र्य सेनानी श्री. भाऊसाहेब मोरे व साहित्यकी श्री. दिनानाथ पाठक यांच्या निधनानिमित्त ००.०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

यानंतर स. सभासद श्री. महादेव सुर्यवंशी, विजयकुमार मेहेर, अब्दुल रशिद खान (मामू), डॉ. भागवत कराड, इ. सभासदांची श्री. प्रदिप जैस्वाल यांच्या निवडीबाबत समायोजित भाषणे देण्यात आली.

यानंतर सभेचे कामकाज आयुक्त यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव, | सभापती, स्थायी समिती, |
| औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद | औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक २९-०५-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. सोमावार, दिनांक २९-०५-९५ रोजी दुपारी ३.०० मा. सभापती श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस खालील स. सभासदांसह कार्यालयीन अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अ. रशिद खान (मामू) | सदस्य |
| २) | श्री. सुभाष कच्छवाह | -//- |
| ३) | श्री. डॉ. कराड भागवत | -//- |
| ४) | श्री. गौतम खरात | -//- |
| ५) | श्रीमती रजनी रमेश जोशी | -//- |
| ६) | श्री. प्रकाश निकाळजे | -//- |
| ७) | श्री. बैनाडे कवरसिंग | -//- |
| ८) | श्री. म. मुस्ताक अहेमद | -//- |
| ९) | श्रीमती माया लाडवाणी | -//- |
| १०) | श्री. विजयकुमार मेहेर | -//- |
| ११) | श्री. प्रभाकर विधाते | -//- |
| १२) | श्रीमती पद्मा शिंदे | -//- |
| १३) | श्री. महादेव सुर्यवंशी | -//- |
| १४) | श्री. सुदाम सोनवणे | -//- |
| १५) | श्री. हमीदउद्दिन ताबा | -//- |

**विषय क्र. २/१ :**

दिनांक १६-०५-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतृित्त कायम करणे.

**ठराव :**

दि. १६-०५-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या इतिवृत्तास सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. ३/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शास्त्रीनगर, स्नेह वर्धिनी कॉलनी आणि विनायक नगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९३-९४ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. ३,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकूण चार (४) निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक ०८-०४-९५ रोजी मा. मुख्य लेखा परिक्षक समक्ष उघडण्यात आली असता सदर कामाकरिता खालील ठेकेदार प्रमाणे दर दिलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. गुरुनानक इंडस्ट्रीज | १८.००% कमी दराने |
| २) | मे. पाटील कन्स्ट्रक्शन | ४.१०% कमी दराने |
| ३) | श्री. पी. एम. चोरडिया | १५.८७% कमी दराने |
| ४ | श्री. डी. एस. जग्गी | १८.००% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकामध्ये श्री. डी. एस. जग्गी व मे. गुरुनानक इंडस्ट्रीज या दोघांचेही दर सारखेच म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.०० कमी असे प्राप्त झालेले आहेत.

दोघाचेही दर सारखेच प्राप्त झाल्याने त्यांना पुन्हा पत्र देऊन आपण दिलेल्या दरापेक्षा आणखी किती दर. आणखी किती दर कमी करू शकता याबाबत लेखी विचारणा केली असता, मे. गुरुनानक इंडस्ट्रीज हे सदरील काम १८.५०% कमी दराने व श्री. डी. एस. जग्गी हे १८.७०% कमी दरोन करण्यास तयार आहेत व तसेच त्यांनी लेखी कळविले आहे. म्हणजेच श्री. डी. एस. जग्गी यांनी दिलेले दर सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.७०% कमी आहेत.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री. डी. एस. जग्गी यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.७०% कमी या दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. कराड भागवत, श्री. विजयकुमार मेहेर :** प्रस्तावात दर्शविलेल्या रस्त्यांच्या लांबी रुंदी बाबत खुलासा व्हावा.

**अति. शहर अभियंता :** सदरच्या प्रस्तावामध्ये दोन रस्त्यांचा समावेश आहे. त्या रस्त्यांची लांबी-रुंदी अनुक्रमे पुढील प्रमाणे.
४७० मीटर लांब व ५ मीटर रुंद आणि ८३५ मीटर लांब व ४ मीटर रुंद असे एकूण १३०५ मीटर लांबीच्या डांबरीकरणाचा समावेश आहे.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** आजच्या विषयपत्रकेवरील विषय निविदाधारकाचे कमी दराचे दरपत्रक आहे. तेंव्हा या कामांसाठी पुन्हा निविदा मागविण्यात याव्या.

**अति. शहर अभियंता :** प्रस्तावित कामांसाठी पुन्हा दरपत्रिका मागविल्या तरी १८% पेक्षा कमी दराची निविदा राहणार नाही.

**मा. सभापती :** प्रस्तावित कामासाठी सारखेच दर असलेल्या दोन निविदाधारकांपैकी डी. एस. जग्गी यांनी प्रस्तावित काम १८.७०% कमी दराने करून देण्यास लेखी संमती दिली आहे. कामाच्या निविदे बाबत संबंधित अधिकाऱ्यांनी समिती सभासदांना आवश्यक ती माहिती त्वरित उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी. निविदा दराबाबत काही दोष आढळल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द काय कारवाई करावयाची याचा सभागृहात विचार केला जाईल. मनपा अधिकाऱ्यांनी महापालिकेचा निधी आपला स्वत:चाच निधी आहे से समजून नागरिकांना चांगल्या प्रतिचे काम करून देण्याची व्यवस्था करावी म्हणजे सभागृहास अधिकाऱ्याविरुध्द कार्यवाही करण्याची वेळ येणार नाही.

**श्री. हमीउद्दिन ताबा :** प्रस्तावित काम केंव्हा सुरू होणार आहे. लोकनियुक्त प्रतिनिधी निवडून येण्यापूर्वी महापालिका प्रशासनाचे करोडो रुपयांच्याकामांच्या निविदा काढल्या आहेत. त्यात अनेक डांबर कामाचा समावेश आहे. लवकरच पावसाळ्यास सुरुवात होइ्रल ही बाब लक्षात घेता पावसाह्यास सुरुवात होईल ही बाब लक्षात घेता पावसाळ्यामध्ये केलेल्या डांबर कामामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होईल. याचा विचार करण्यात यावा.

**अति. शहर अभियंता :** प्रस्तावित काम पावसाळा संपल्यानंतर सुरू करण्यात येईल.

**मा. सभापती :** पावसाळा सुरू होणार असल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी चालू असलेली डांबर कामे शक्यतो लवकर पूर्ण करून घ्यावा व जी कामे पावसाळा सुरू होण्यापूर्वी होऊ शकणार नाही अशी डांबर कामे पावसाळा सुरू झाल्यानंतर सुरू करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शास्त्रीनगर, स्नेह वर्धिनी कॉलनी आणि विनायक नगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता रक्कम रु. ३,५०,०००/- च्या अंदाजपपकास आणि उक्त कामांसाठी गुत्तेदार श्री. डी. एस. जग्गी यांनी दिलेल्या लेखी संमतीनुसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १८.७०% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, टेलिफोन भवन ते समर्थनगर मार्गे क्रांतीचौक पोलिस स्टेशन या वस्त्यांचे डांबरीकरण करण्यांच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९३-९४ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ४,१२,०१४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदर कामाकरिता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त दोन निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निवदापत्रके दि. १०-०५-९५ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पी. एस. चोरडिया | १५.८७% कमी दराने |
| २) | श्री. ए. सी. कोठारी | ११.२५% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापैकी श्री. पी. एस. चोरडिया यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.८७% कमी आहेत.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,१२,०१४/- चे अंदाजपत्रक तसेच सदरील काम श्री. पी. एस. चोरडिया यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.८७% कमी दराने करून घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रस्तावित कामाचे ब्लॉक टॉपिंगचे काम केव्हा झाले याचा खुलासा व्हावा.

**अति शहर अभियंता :** प्रस्तावित कामाचे ब्लॉक टॉपिंगचे काम बऱ्याच वर्षापूर्वी पूर्ण झाले आहे. त्यानंतर सदर रस्त्यांवर ड्रेनेज लाईनचे काम झाल्यामुळे रस्ता खराब झाला आहे.

**श्री. स. मुश्ताक :** गुत्तेदार श्री. पी. एस. चोरडिया यांच्या कामांचा दर्जा खबरा आहे. तेंव्हा चोरडिया यांच्या निविदा बाबत विचार व्हावा.

**मा. सभापती :** स. सभासदांनी गुत्तेदार चोरडिया यांचे काम खराब असल्याबाबत प्रत्यक्ष नजरेस आणू द्यावे, म्हणजे अशा कामांची क्वॉलिटी कंट्रोलतर्फे तपासणी करता येईल.

**श्री. प्रभाकर विधाते :** चार दिवसापूर्वीच विद्युत कॉलनी भागाता रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम झाले. त्या रस्त्यांवर आज हरळ उगवली आहे. याबाबत खुलासा व्हावा.

**डॉ. कराड भागवत :** रस्त्याचे काम करिता असतांना क्वालिटी कंट्रोलचा अधिकारी रस्त्यांच्या निगरानीसाठी त्या ठिकाणी हजर असल्यास रस्त्यांचे काम खराब होणार नाही तेंव्हा अशी व्यवस्था करता येईल काय?

**मा. सभापती :** मनपा प्रशासनातील अतिरिक्त शहर अभियंता ड्रेनेज विभाग, पाणी पुरवठा विभाग, यांच्या काम करण्याच्या पध्दतीमध्ये ताळमेळ नाही, केंव्हा यापुढे अतिरिक्त शहर अभियंता विभागातर्फे रस्त्याचे काम होती घेण्यापूर्वी संबंधित विभागांना याबाबतची कल्पना देऊन नंतरच काम हाती घेण्यात यावे.

**श्री. हमीउद्दिन ताबा :** शहरामध्ये बऱ्याच ठिकाणी तार आणि दूरसंचार खात्यांतर्फे अनेक रस्त्यावर खोदकाम चालू आहे. त्यामुळे मनपाचे तयार केलेले रस्ते अल्पावधीत खराब होत आहे व मनपाची आर्थिक नुकसान होत आहे.

**मा. सभापती :** आताच खुलासा केल्याप्रमाणे रस्त्यांचे काम सुरू करण्यापूर्वी तार व दूरसंचार विभागांत त्याबाबतची सूचना देण्यात यावी आणि तार व दूरसंचार विभागाच्या खोदकामामुळे शहरातील खराब झालेल्या रस्त्यांबाबत अंदाजे किती खर्च येईल याबाबतची माहिती संबंधित विभागाने पुढील सभेत द्यावी.

**श्री. विजयकुमार मेहेर :** तार व दूरसंचार खात्याप्रमाणेच रस्त्यांवर असलेले पोल काढणे किंवा नविन पोल लावणे यासाठी शहरातील अनेक ठिकाणी रस्ते खराब होत आहे. तेंव्हा मराविमही वरीलप्रमाणे पत्र देण्यात यावे आणि डांबरी करणाचे कामपूर्वी सदरील रस्त्यांवरचे पोल हटविण्यात यावे. पत्र देऊनही मराविमने पोल न काढल्यास मनपा तर्फे रस्त्यावरील पोल काढण्यांत यावे, याबाबत झालेला खर्च संबंधित विभांगाकडून वसूल करण्यात यावा.

**डॉ. कराड भागवत :** मनपातर्फे एखाद्या रोडचे कामपूर्ण झाले की दुसऱ्याच दिवशी नळ कनेक्शनसाठी नळधारक रोड खोदतो त्यामुळे रस्ता खराब होतो. तेंव्हा ज्या रोडचे काम हाती घ्यावयाचे असेल त्याबाबत तीन (३) महिने अगोदर नोटीस देण्यात यावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** महापालिका रस्त्यांच्या कामासाठी करोडो रुपयाचा खर्च विनाकारण करत आहे. महापालिकेतील ड्रेनेज पाणी पुरवठा व रस्ते बांधणे विभाग यांचा ऐकमेकांना ताळमेळ नाही. त्यामुळे रस्ते तयार करूनही लवकर खराब होतात. पर्यायाने लोकवर्गणीचा पैसा विनाकारण खर्च होतो. तेंवहा यापुढे रस्ता बांधणी विभागाने ज्या रस्त्यांचे काम होती घ्यावयाचे आहे. त्याबाबत ड्रेनेज व पाणी पुरवठा विभागास प्रथम सूचना हाती व त्यानंतरच रोडचे काम हाती घ्यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टेलिफोन भवन ते समर्थनगर मार्गे क्रांतीचौक पोलिस स्टेशन या रस्त्यांचे डांबरीकरणाच्या कामासाठी रक्कम रु. ४,१२,०१४/- च्या अंदाजपत्रकास आणि उक्त कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.८७% कमी दराच्या श्री. पी. एम. चोरडिया यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हॉटेल अमरप्रीत ते चेतनानगर या ८० फुट विका रस्त्यांचे खडीकरण करण्याच्या कामांकरिता सन १९९३-९४ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये १६,०८,३६४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविली असता, निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण एकवीस कोरी निविदापत्रके विकल्या गेली निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन रोजी उघडण्यात आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. एस. एच. असोसिएट | १४.९०% कमी दराने |
| २) | श्री. पी. एम. चोरडिया | १३.७७% कमी दराने |
| ३) | श्री. एस. पी. कोठारी | ९.८६% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. एस. एच. असोसिष्ट यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९०% आहेत.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १६,०८,३८४/- चे अंदाजपत्रकीय तसेच सदरील काम मे. एस. एच. असोसिष्ट यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९०% कमी या दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रस्तावित रस्त्याच्या भूसंपादनाच्या कार्यवाही बाबत खुलासा व्हावा.

**अति. शहर अभियंता :** प्रस्तावित रस्त्यांतील चौबे हॉस्पिटल समोरील काही भाग वगळता काही बाकी संपूर्ण रस्त्यांच्या भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

**श्री. गौतम खरात :** प्रस्तावित रस्त्यांच्या भूसंपादनाबाबत किती रक्कम अदा करण्यात आली या भूसंपादनाच्या खर्चासाठी महापालिकेकडे निधी उपलब्ध होता का? भूसंपादनासाठी खर्च करण्यात आलेला निधी कोणत्या लेखा शिर्षातून देण्यात आला. त्याचा खुलासा व्हावा.

**मुख्य लेखा परिक्षक :** प्रस्तावित रस्त्यांतील भूसंपादनातील काही जागेच्या मालकी हक्काबाबत वाद असल्यामुळे भूसंपादनाची रक्कम न्यायालयात जमा केली आहे.

**श्री. गौतम खरात :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे कोणत्या न्यायालयात भूसंपादनाबाबतची रक्कम जमा केली याचा खुलासा व्हावा.

**विधी सल्लागार :** प्रस्तावित रस्त्यांच्या भूसंपादनाबाबत भूसंपादन अधिकाऱ्यांकडे चालू असलेल्या भूसंपादनाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने जागेच्या मालकी हक्काबाबत असल्यामुळे भूसंपादन कार्यालयाकडील आदेशानुसार भूसंपादनाबाबतची रक्कम औरंगाबाद उच्च न्यायालयात जमा करण्यात आली होती.

**श्री. अ. रशिद (मामू) :** शहरात सध्या चालू असलेल्या डांबरीकरणाच्या कामापैकी सहा सात महिण्यांच्या कालावधी पूर्ण होऊनही काम पूर्ण झाले नाही, असे किती कामे आहेत, याचा खुलासा व्हावा.

**श्री. गौतम खरात :** महापालिकेतर्फे सध्या शहरात २३.७० कोटीची कामे चालू आहेत. एकाच वेळी एवढ्या रक्कमेच्या कामाच्या निविदा मागविण्यांची घाई का करण्यांत आली. तसेच या कामासाठी दिलेल्या महिण्यांचा कालावधीत कामे पर्णू झ ाली तर संबंधितांची देयक अदाई करण्यांसाठी महापालिकेतर्फे निधी उपलब्ध आहे काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** उक्त ऊचनेबाबत मा. उप आयुक्त-१ यांनी पुढील सभेत माहिती द्यावी.

**श्री. अ. रशिदखान (मामू) :** मनपाचे काम मिळूनही सहा सात महिण्यांच्या कालावधीत डांबरीकरणाचे काम केले नाही. असे किती गुत्तेदार आहे याचा खुलासा व्हावा.

**अति. शहर अभियंता, उप अभियंता (बांधकाम-१) :** स. सभासदांनी सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे काम मिळूनही सहा-सात महिण्यांत काम पूर्ण केले नाही अशा गुत्तेदारांबाबत वैयक्तीक नांव सुचविल्यास खुलासा करता येईल.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** हिराखान फॅक्टरी येथील कामासाठी संबंधिताने चार वर्षापूर्वी मनपाकडे निधी जमा केला आहे. परंतु अद्याप डांबरी रोड तयार झालेला नाही, याबाबत संबंधिताने मनपास कायदेशीर नोटीस दिली आहे. या भागातील काम ज्या गुत्तेदारास मिळाले आहे त्याच गुत्तेदाराने सार्वजनिक बांधकाम खात्याकडे डांबर रोडची कामे केलेली आहे. अशा परिस्थितीतही पैसे भरूनही त्या भागातील रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम का झाले नाही याचा खुलासा व्हावा.

**अति. शहर अभियंता :** हिराखान यांच्या भागातील खडी रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. या भागात घराचे बांधकाम करणाऱ्या नागरिकांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकलेले आहे. तसेच हिराखान सोसायटी यांनी मनपाकडे विकास निधी भरलेला नसून या भागाचा संबंधित सोसायटीने स्वत:च केलेला आहे. फक्त डांबरीकरण बाबतचा निधी मनपाकडे जमा केला आहे. यात विद्युत पोलचा समावेश आहे. किंवा नाही याबाबत खात्री करून खुलासा केला जाईल.

**मा. उप आयुक्त-१ :** सार्वजनिक रस्त्यांवर बांधकाम साहित्य टाकणाऱ्या नागरिकांना प्रशासनातर्फे नियमाप्रमाणे नोटीसा देण्यांत आलेल्या आहेत. काही नागरिकांकडून या बाबत रक्कम ही वसूल करण्यात आली आहे. तथापी काही ठिकाणच्या रस्त्यांवर असलेल्या बांधकाम साहित्य नागरिकांना नोटीसा द्यावयाच्या राहिल्या असल्यास झोन कार्यालयातर्फे अशा नागरिकांना नोटीसा देण्यांत येतील.

**श्री. अ. रशिद :** रस्त्याचे काम करतांना रस्त्यांच्या दोन्ही बाजूचे पंखे खोदल्यानंतर निघालेली माहिती संबंधित गुत्तेदार रस्त्यांवर तशीच टाकून देतात. कालांतराने तीच माती पुन्हा रस्त्यावर येते तेंव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**उप अभियंता बांधकाम -१ :** डांबर रस्ता तयार करतांना काम व्यवस्थीत व्हावे या दृष्टीने रस्तयांवरील मातडी साफ करून बाजूला लावण्यांच्या कामाचा समावेश अंदाजपत्रकात केलेला असतो. अशा प्रकारे डांबरी रस्ता तयार करतांना बाजूला लावण्यात आलेली रस्त्यांवरील माती मनपातर्फे उचलण्यात येते.

**श्री. विजयकुमार मेहेर :** डांबर रस्ता तयार करतांना रस्ता साफ करून रस्त्यांच्या कडेला लावलेली संबंधित गुत्तेदाराने उचलण्यांच्या कामाचा समावेश मुळ कामच्या अंदाजपपकात नसणे ही बाब चूकीची आहे. तेंव्हा डांबरी रस्ता तयार करतांना साफ केलेली बाजूची माती उचलण्यांच्या कामाचा मूळ अंदाजपत्रकात समावेश करून ती माती संबंधित गुत्तेदारानेच उचलली पाहिजे अशी व्यवस्था करण्यात यावी.

**श्री. अ. रशिदखान (मामू) :** डांबर रस्त्यांचे काम घेतलेले गुत्तेदार डांबर उपलब्ध नाही, म्हणून काम करता येत नाही असे म्हणतात. परंतु ज्या गुत्तेदाराने महापालिका हद्दित डांबरी रस्त्यांचे काम हाती घेतले आहे तेच गुत्तेदार

सार्वजनिक बांधकाम विभागाकडे डांबरी रस्तयाचे काम पूर्ण करून देत आहे.

**मा. सभापती :** स. सदस्यांने डांबर रस्त्यांच्या कामाबाबत सभागृहात केलेल्या खुलाश्याप्रमाणे डांबर रस्त्यांच्या कामाबाबत झालेल्या दिरंगाईबाबत विचार करण्याऐवजी डांबर रस्त्यांच्या कामाबाबत संबंधित अधिकाऱ्यांने विशेष काळजी घ्यावी. डांबर रस्त्यांचे काम येत्या ७ तारखेपर्यंत पूर्ण करून घ्यावीत व जी कामे बाकी राहतील ती डांबर रस्त्यांची कामे पावसाळा झाल्यानंतर हाती घेण्यातयावी. तसेच हिराखान फॅक्टरी येथील डांबरी रस्त्यांचे काम येत्या १५ दिवसांच्या आत अंदाजपत्रकीय दराने पूर्ण करून घेण्याबाबत संबंधित विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी. आणि त्याबाबतचा प्रस्ताव सभागृहाच्या मंजुरीस्तव सादर करावा.

**डॉ. कराड भागवत :** शहरात चालू असलेल्या डांबर रस्त्यांची कामाची प्रत चांगली रहावी यासाठी क्वालिटी कंट्रोलचा कर्मचारी / अधिकारी कामाच्या देखरेखीसाठी ठेवता येतो काय यांबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** एखाद्या कामाविषयी सभासदांनी शंका असेल तर त्या बाबत सभासदांचे संबंधित विभागांस पत्र द्यावे. त्या पत्राची योग्य ती दखल घेतली जाईल महापालिकेत सध्या रोड कारकूनाची संख्या अत्यंत कमी आहे. उप अभियंता किंवा क. अभियंता हे त्यांच्याकडे असलेल्या कामाच्या प्रमाणात एकाच कामावर जास्त वेळ देऊ शकत नाही. परंतु रोड कारकून हा एकाच कामावर चांगल्या प्रकारे लक्ष देऊन चांगले काम करून घेऊ शकतो. या दृष्टीने रोड कारकूनाची पदे भरण्याबाबत मा. आयुक्त यांच्याकडे योग्य ते पत्र देण्यात येईल, तथापी प्रशासनाने याबाबतची दखल घ्यावी अशी विनंती आहे.

**श्री. सुदाम सोनवणे :** स. सदस्य श्री. विधाते यांनी खुलासा केल्याप्रमाणे डांबर रोडवर गवत उगवले आहे. तेंव्हा डांबर रोड तयार करतांना डांबर, खडी व इतर साहित्य यांचे प्रमाणे काय आहे याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** शहरात अनेक प्रकारच्या डांबर रोडचे काम चालू आहे. डांबर रोडच्या कामाचे वेगवेगळे प्रकार आहे, त्या प्रमाणांत डांबर रोडच्या कामासाठी डांबर वापरले जाते तेंव्हा स. सदस्यांनी विशिष्ट रोडबाबत माहिती विचारली तर संबंधित अधिकारी त्याविषयी खुलासा करू शकतील.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागातील जनतेच्या पाणी पुरवठ्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. औरंगाबाद महानगरपालिकेत ही १८ खेड्याचा समावेश झालेला आहे. महाराष्ट्र शासनाच्या वरील योजनेनुसार महापालिकेत समावेश असलेल्या १८ खेड्यांच्या ग्रामीण भागाच्या पाणी पुरवठ्याकरिता उक्त योजनेप्रमाणे महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी काही योजना तयार करून शासनाकडून फंड मिळविण्याच्या प्रयत्न केला आहे काय याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या घोषणेनुसार महापालिकेत समाविष्ट असलेल्या १८ खेड्यांच्या ग्रामीण भागास पाणी पुरवठा योजनेसाठी महाराष्ट्र शासनाकडून फंड मिळविण्यासाठी मा. उप आयुक्त, मा. मुख्य लेखा परिक्षक यांचेशी चर्चा करून योजना तयार करण्यात येईल.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** उन्हाळा संपत आलेला आहे, तेंव्हा ग्रामीण भागासाठी आता योजना तयार करणे ही बाब योग्य होणार नाही एक पाणी पुरवठा लाईन काढण्यासाठी अनेक वेळा संबंधित विभागांकडे मागणी केली. पण उपयोग आलेला नाही. या भागातील दोन बोर निष्कामी गेले आहे. व ज्या बारेला पाणी आहे. त्यावर पंप नाही तेंव्हा त्या ठिकाणी पंप बसवण्याची त्वरित व्यवस्था करण्यात यावी.

**मा. सभापती :** सर्व सभासदांना आपले विचार मांडण्यासाठी सभागृहात संधी दिली जाईल, प्रत्येक आठ (८) दिवसांनी स्थायी समितीची मिटींग होते, तेंव्हा एखाद्या प्रश्नाबाबत सभासदांनी ३ दिवसापूर्वी लेखी पत्र दिले तर त्याबाबत खुलासा करता येईल. विद्युत अभियंता यांनी पुष्पनगरी स्मशान भूमी येथील बंद असलेली दिवे त्वरित सुरू करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल अमरप्रीत ते चेतनानगर या ८० फुट विका रस्त्याचे खडीकरण करण्याच्या कामांकरिता रक्कम रु. १६,०८,३६४/- च्या अंदाजपत्रकास आणि उक्त कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १४.९०% कमी दराने मे. एस. एच असोशिष्ट यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाच संपल्याचे मा. सभापतींनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव, | सभापती, स्थायी समिती, |
| औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद | औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक ०९-०६-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. शुक्रवार दि.०९-०६-९५ रोजी दुपारी ३.०० मा. सभापती श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्ष तेखाली स्थायी समिती सभेसे सुरुवात झाली. या सभेस खालील सभासदांसह कार्यालयीन अधिकारी उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) श्री. अ. रशिदखान (मामू) | सदस्य |
| २) श्री. डॉ. कराड भागवत | -//- |
| ३) श्री. गौतम खरात | -//- |
| ४) सौ. रजनी रमेश जोशी | -//- |
| ५) श्री. प्रकाश निकाळजे | -//- |
| ६) श्री. म. मुस्ताक अहेमद | -//- |
| ७) कु. माया लाडवाणी | -//- |
| ८) श्री. प्रभाकर विधाते | -//- |
| ९) सौ. पदमा शिंदे | -//- |
| १०) श्री. महादेव सुर्यवंशी | -//- |
| ११) श्री. सुदाम सोनवणे | -//- |
| १२) श्री. बैनाडे कवरसिंग | -//- |
| १३) श्री. हमीदउद्दिन ताबा | -//- |

**संवाद :**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** मनपा उप अभियंता श्री. जी. बी. सोनी यांच्या वडीलांचे नुकतेच निधन झाले आहे. तेंव्हा सभागृहातर्फे त्यांना श्रध्दाजंली वाहण्यात यावी.

स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे बद्रीनारायण सोनी यांना सभागृहातर्फे ००.०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र. ६/१ :**

दिनांक २९-०५-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** दि. ०१-०६-९५ च्या पत्राद्वारे प्रसिध्द झालेल्या सफाई कामगारांच्या जेष्ठतेबाबत माहिती देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. या पत्रात अन्य दोन प्रश्नांचाही समावेश आहे. परंतु अद्याप एकही प्रश्नांचे उत्तर देण्यात आलेली नाही. पावसाळा सुरू होत आहे. प्रत्येक वर्षी पावसाळ्यात नारेगांव, ब्रीजवाडी या भागात गॅस्ट्रोसारख्या साथीच्या रोगांचा प्रादूर्भाव होतो. याच रोगांमुळे काही व्यक्त मृतही होतात. साथीच्या रोगांचे निर्मूलन व साफसफाई यावरही खर्च होतो. प्रसिध्द झालेल्या जेष्ठते यादीनुसार ५० कामगार घेण्याची विभागीय अधिकाऱ्यांना परवानगी देण्यांत आली आहे. तथापी यादीप्रमाणे मंजूर मिळालेले नाही. या बाबींचा विचार वर नमूद

केल्याप्रमाणे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. व साफसफाईचे काम होत नाही.

**मा. सभापती :** प्रशासनातर्फे प्रसिध्द झालेल्या सफाई कामगारांच्या जेष्ठता यादीतील काही मजूर त्यांच्या मागण्यासाठी न्यायालयात गेले आहे. न्यायालयाने सफाई कामगारांची यादी मागितली आहे. या यादीत सन १९७८ पासून काम करणाऱ्या मंजुरांचा समावेश आहे. तथापी ज्या कामागारांनी मनपामध्ये काम केले असेल आणि त्यांचा नांवाचा समावेश जेष्ठता यादीत नसेल अशा कामगारांबाबत सफाई कामगारांची पुन्हा यादी तयार करून न्यायालयात दाखल करणे बाबत कामगार अधिकारी व विधी सल्लागार यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**श्री. महादेव सुर्यवंशी, श्री. प्रभाकर विधाते :** मनपाने प्रसिध्द केलेल्या सफाई कामगारांच्या जेष्ठते यादीनुसार झोन २ मध्ये काम करणाऱ्या कामागारांपैकी एका कामगारांचे वय १८ वर्षाचे आहे. तेंव्हा या कामगारांचे नाव जेष्ठता यादीत होते का? प्रसिध्द झालेल्या कामागारांच्या जेष्ठता यादीमध्ये ज्या कामागारांनी प्रत्यक्ष काम केले आहे. अशा कामगारांच्या नावाचा समावेश जेष्ठता यादीत नाही. मात्र ज्या कामगारांनी सफाई काम केले नाही. अशा कामगारांची नोंद जेष्ठता यादीत समाविष्ट आहे.

**श्री. हमीदउद्दिन ताबा, श्री. स. रशिद खान (मामू) :** प्रशासनातर्फे सफाई कामगारांच्या तयार केलेल्या जेष्ठता यादीत सर्व विभागांत काम करणाऱ्या कामगारांचा एकत्र समावेश आहे. वस्तुतः ही कामगार यादी विविध प्रकारच्या विभागावर असणे आवश्यक आहे. एकत्र यादीनुसार एखाद्या स्त्री कामगारांचा कामासाठी नंतर असतो अशा वेळी यांत्रिकी विभागाकडून कामगारांची मागणी होते. तेंव्हा यादीनुसार नंबर असलेली स्त्री कामगार मेकॅनिक विभागाचे काम करू शकत नाही. म्हणून ज्या कामगारांचे काम केले आहे त्या विभागाप्रमाणे जेष्ठता यादी तयार करण्यात यावी.

**विधी सल्लागार :** प्रसिध्द झालेल्या कामगारांच्या जेष्ठता यादीबाबत कामगारांनी न्यायालयात दाद मागितली आहे. प्रशासकीय काळात काही कामगारांना कामावरून कमी केले आहे. न्यायालयात दाखल झालेल्या यादीत जुने कामगार कामावर नसून नविन कामगारांचा यादीत समावेश आहे. असा खुलासा न्यायालयात केल्यामुळे न्यायालयीन सर्व कामगारांचे म्हणणे ऐकून नविन यादी करण्याचे आदेश दिले आहे. ही यादी तयार करतांना सर्वोच्च न्यायालयातील एका निर्णयाप्रमाणे सर्व कामगारांची एकच यादी तयार करण्याचे आदेश दिले आहे. तथापी महापालिकेतील कामाचे वेगवेगळे स्वरुप लक्षात घेऊन, (उदा. डॉग स्क्वॉड, मेकॅनिकल विभागातील कामगार इ.) विभागावार यादी तयार करण्यांची परवानगी देण्यात यावी असे पत्र न्यायालयात दाखल करण्यात येणार आहे.

**श्री. अ. रशिदखान (मामू), श्री. हमीदउद्दिन ताबा :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे मनपा कामगार यांनी १८ वर्षे वयाच्या मुलाचा समावेश आहे. याबाबत आवश्यक ती दुरुस्ती कोण करणार याचा खुलासा व्हावा. सिध्दार्थ उद्यानात काम करणाऱ्या एका स्त्री कामागारांस कामावरून कमी करण्यात आले आहे. या कामगारांने मनपाविरुध्द न्यायालयात प्रकरण दाखल करू नये असे सूचना संबंधित कामगारांस देण्यात आली. यावेळी सदर कामगारांस पुन्हा कामावर

घेतले जाईल असे आश्वासन देण्यात आले होते. परंतु अद्याप कामावर घेण्यात आले नाही.

**मा. सभापती :** स. सभासदांनी सभागृहात केलेल्या खुलाश्याप्रमाणे मनपा सफाई कामगारांच्या यादीत त्या कामगारांची गत काळात काम करूनही त्यांच्या नांवाचा समावेश यादीत नसेल अशा कामगारांच्याबाबतीत प्रशासनाने तपासणी करून ज्या कामगारांची नियमाप्रमाणे जेष्ठता यादीत नावे समाविष्ट करता येत असतील तर ती समाविष्ट करावी.

**श्री. गौतम खरात :** मनपातर्फे प्रसिध्द झालेल्या ३००८ कामगारांच्या यादी नुसार त्यांनी केलेल्या कामाचे कादपत्रे कार्यालयात दाखल करण्यास सुचित केले असता फक्त ७०/८० कामगारांनी आपली कागदपत्रे दाखल केली आहे. कागदपत्र दाखल केलेल्या कामगारांपैकी काही कामगार ४५/५० वर्षाचे आहे. अशा कामगारांनाही योग्य ते काम देण्यात यावे आणि प्रसिध्द झालेला कामगारांची यादी पुन्हा प्रसिध्द करून संबंधित कामगारांना त्यांच्याकडील कागदपत्र दाखल करण्यासाठी नियमाप्रमाणे अवधी देण्यात यावा. आणि अवधी दिल्यानंतरही जे कामगार त्यांच्याकडील कागदपत्र कार्यालयात दाखल करणार नाही अशा कामगारांचे नाव यादीतून वगळून टाकण्यात यावे व दुरुस्ती यादी पुन्हा प्रसिध्द करावी.

**श्री. प्रकाश निकाळजे :** मनपातील काही कामगार त्याऐवजी पर्यायी कामगार लाऊन सफाईचे काम करून घेतात. अशा कामगारांची पाहणी करून त्यांच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी यासाठी प्रत्येक कामगरांस विहित ओखळपत्र देण्यात यावे.

**मा. सभापती :** कामगारांच्या यादीबाबत स. सभासदांनी केलेल्या सूचना आणि त्यावर सभागृहात झालेली चर्चा याचा विचार करता मा. उप आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली एक समिती कायम करण्यात यावी आणि मा. न्यायालयाच्या परवानगीने यादी पुन्हा प्रसिध्द करावी व त्याबाबतचा अहवाल एक महिण्यांत दाखल करावा.

**श्री. अ. रशिदखान (मामू) :** एखाद्या कामगारांस काम करतांना दुखापत झाल्यास त्यास पुन्हा काम देणार का? पुन्हा काम देण्यात येईल का? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** स. सभासदांनी सुचित केल्याप्रमाणे अशा प्रकारचे एखाद्ये प्रकरण निदर्शनास आणून द्यावे म्हणजे त्यावर विचार करण्यात येईल.

**कु. माया लाडवाणी :** महापालिकेची वाहने त्यांची दुरुस्ती व देखभाल व इंधन खर्च याबाबत माहिती मागविली असता, संबधित विभागाने एकत्रित माहिती दिली आहे. यात डिझेल गाड्या मनपाच्या वर्कशॉपमध्ये दुरुस्त केल्या जातात व पेट्रोल गाड्या बाहेरून दुरुस्त केल्या जातात. डिझेल गाड्यांचा मेकॅनिक आहे तेंव्हा पेट्रोल गाड्याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** एखाद्या विषयावर चर्चा करण्यात जास्त वेळ जाऊ नये अशी सूचना यापूर्वीच सर्व स. सभासदांना दिली आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** दि. ०१-०६-९५ च्या पत्रकाद्वारे औरंगाबाद शहराच्या शहर, ग्रामीण विभाग आणि अनाधिकृत वस्ती यांना शुध्द, स्वच्छ व पुरेसे पाणी देण्याबाबत काय व्यवस्था केली आहे. याबाबत माहिती मागविली आहे. तेंव्हा पाण्यासारख्या ज्वलंत प्रश्नावर सभागृहात चर्चा व्हावी.

**मा. सभापती :** अनअधिकृत वसाहतींना नागरी सुविधा या खालील सहानुभूती म्हणून पाणी पुरवझा करावा हा प्रश्न वेगळा तथापी अनधिकृत वस्तीचे विकास खर्च भरलेला नसल्याने अशा वसाहतींना कोणत्या लेखा शिर्षातून पाणी पुरवठा करावा, हा प्रश्न महत्वाचा आहे. तेंव्हा स. सभासदांनी विशिष्ट वसाहतीच्या नावाचा खुलासा केल्यास त्याबाबत विचार करता येईल.

**श्री. सुदाम सोनवणे :** सिडको हडको भागात एक तास पाणी दिले जाते. तथापी मथुरानगर, शिवशक्तीनगर इ. भागात पाणी येत नाही. तेंव्हा सिडकोच्या ज्या भागात पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही अशा भागात हातपंप बसवून पाणी द्यावे. याशिवाय सिडको हडकोच्या काही भागात कामगार वसाहत आहे. या वसाहतीतील कामगारांकडून थकीत पाणी पट्टीची वसुली एकाच वेळी करण्याचे काम संबंधित विभागाने घेतले आहे. अशा प्रसंगी या वसाहतीतील कामगारांनी नळपट्टी न भरल्यास नळ कनेक्शन तोडण्यात येईल. तेंव्हा कामगार वसाहतीतल नागरिकांना पाणी पट्टीची रक्कम भरण्यासाठी हप्ते पाडून देण्यात यावे व संबंधिताचे नळ बंद करण्याची कार्यवाही करू नये.

**श्री. कवरसिंग बैनाडे :** सिडको हडकोच्या एन-८ भागात रात्री ३.०० वाजता पाणी येते.

**मा. सभापती :** स. सभासदांच्या सुचनेबाबत जलगृह अभियंता-२ यांनी पहाणी करून आवश्यक ती व्यवस्था करावी. हातपंपाना निश्चितपणे पाणी लागेल असे नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. २९-०५-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ७/२ :**

शिवाजी कॉलनी, मुकूंदवाडी येथे ३०० मिमी व २५० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्यांच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ५,७०,७०३/- सदर अंदाजपत्रकास ठराव क्र. ३०८ दि. २८-०४-९५ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. त्या अनुषंगाने स्थानिक वृत्तमान पत्रात निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण १७ निविदा विकण्यात आल्या आणि अंतिम तारखेला दि. १०-०५-९५ ला एकूण ५ निविदा प्राप्त झाल्या.

त्यापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री. डी. सी. पंजाबी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.३% कमी दराची आहे. तरी श्री. डी. सी. पंजाबी यांची निविदा स्विकारणे योग्य.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवाजी कॉलनी, मुकूंदवाडी येथे २५० व ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २१.३% कमी दराच्या श्री. डी. सी. पंजाबी यांच्या निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८/३ :**

सन १९९५-९६ या आर्थिक वर्षाकरिता महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली, २ री व ७ वीच्या विद्यार्थ्यां क्रमिक पाठ्यपुस्ताकांचे संच उपलब्ध करून देणेसाठी

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून खालील योजनेद्वारे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| १) सर्वसाधारण घटक योजना - | १,००,००० लाख |
| २) विशेष घटक योजना तरतूद - | १,००,००० लाख |
| (रु. दोन लाख) | २,००,००० |

वरील योजने अंतर्गत उपलब्ध तरतूदीतून पाठपुस्तके महाराष्ट्र राज्य पाठपुस्तक मंडळाकडून रु. २.००,०००/- (रु. दोन लाख) किंमतीचे खरेदीसाठी प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील एक सर्वसाधारण घटक योजना आणि दोन विशेष घटक योजना तरतूद या अनुदानातून महापालिकेच्या प्राथमिक शाळेतील इ. १ ली २ री व ७ वी च्या विद्यार्थ्यांकरिता रु. २,००,०००/- खर्चापर्यंतचे क्रमिक पाठ्यपुस्ताकांचे संच महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ यांच्याकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९/४ :**

पशुधन विकास अधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरातील विविध ठिकाणी असलेले चमड्याचे गौदाम शहराबाहेर पडेगांव पशुधन गृह पसिरात स्थलांतर करणेकरिता महानगरपालिकेतर्फे १० x १५ चौरस मिटर आकाराचे भूखंड उपलब्ध करून देण्यांत आलेले असून त्याची किंमती नगर रचना विभाग महानगरपालिकेतर्फे प्रत्येक रक्कम रु. ११,७००/- (अक्षरी अकरा हजार सातशे रुपये फक्त) निश्चित केलेली आहे. सदर बाबतीत संबंधितांकडून निविदन प्राप्त झाले असून सदर भूखंडाची किंमती कमी करणेबाबत विनंती केली आहे.

तेंव्हा सदर भूखंडाची निश्चित केलेली किंमती प्रत्येकी रु. ११७००/- यात अंदाजे ४०% कमी करून रु. ७०००/- किंमती हरल्यास योग्य राहील प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**हमीदउद्दिन ताबा, श्री. अ. रशिदखान (मामू) :** जनगणेनुसार औरंगाबाद शहरातील लोकसंख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. पडेगांव येथील कत्तलखान्याबाबत तेथील नागरिकांनी मा. आयुक्त यांना घेरावही घातला होता. याबाबींचा विचार करता चामडेचे गोदामे अशा ठिकाणी बसविण्यात यावी, पुन्हा त्या ठिकाणाहून हलविण्याची गरज भासणार नाही.

**मा. सभापती :** मा. आयुक्त यांना घातलेला घेराव या भागातील दुर्गंधीयुक्त वासाबाबत होता. पडेगांव कत्तलखाना येथे जनावरांच्या हाडाची भट्टी लावण्यात येते. त्याचा वास येतो. या भट्ट्याकरिता संबंधित नागरिकांनी महापालिकेने परवानगी दिलेली नाही. मा. पोलिस आयुक्त यांनी अशा नागरिकांवर नियमाप्रमाणे कार्यवाही केली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शवल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील विविध ठिकाणी असलेले चमड्यांची गोदामे पडेगांव पशुधन गृह पसिरात स्थलांतरीत करण्याकरिता १० x १५ चौरस मिटर आकाराचे भूखंड नगर रचना विभागातर्फे निश्चित केलेल्या प्रत्येकी रु. ११,७००/- या किंमती ऐवजी संबंधिताकडून प्राप्त झालेल्या निवेदनानुसार अंदाजे ४०% किंमत कमी करून म्हणजेच रु. ७०००/- च्या किंमतीती संबंधितास महापालिकेतर्फे उपलब्ध करून देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यातयेते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०/५ :**

औरंगाबाद रेल्वे स्टेशनजवळील औरंगाबाद ते पैठण रस्त्यांवरील रेल्वे लेव्हल, क्रॉसिंग क्र. ५२ कि.मी. क्र. ११२/१०-११ साठी भुयारी रस्ता करण्यांबाबत सिल्कमिल कॉलनी, हमालवाडा, स्टॅण्डर्ड कॉलनी इत्यादी मोहल्यातील नागरिकांची आग्रही मागणी आहे. तसेच औरंगाबाद ते पैठण रस्त्यावरील रहदारी वाढलेली असल्यामुळे सदरील रेल्वे लेव्हल क्रॉसिंगवर क्रॉसिंगच्या वेळी ट्रॅफिक खोळंबला जातो. करिता सदरील रेल्वे लेव्हल क्रॉसिंगला भुयारी रस्ता बनविण्याबाबत रेल्वे विभागशी पत्र व्यवहार करण्यांत आलेला आहे. जनरल मॅनेजर वर्क्स, रेल्वे निलामय, सिकंदराबाद यांचे पत्र क्र. डब्ल्यु-३५२/आय/२व्ही.ओ.एल/दि. २१/५/९४ अन्वये त्यांनी सदरील कामाचे अंदाजपत्रके व नकाशे तयार करण्यांसाठी लागणारा खर्च रक्कम रु. १,०४,०००/- अगाऊ जमा करणेबाबत कळविले आहे. तसेच प्रस्तावित भूयारी रस्त्यांच्या पुलासाठी (रोड अंडर ब्रिज) येणारा संपूर्ण खर्च मनपाने रेल्वे विभागाला द्यावयाचा आहे.

करिता रक्कम रु. १,०४,०००/- अंदाजपत्रके व नकाशे बनविण्याचा खर्च रेल्वे विभागांच्या डिव्हिजनल कॅशियर (वेतन) हैद्राबाद डिव्हिजन साऊथ सेंट्रल रेल्वे, सिकंदराबाद यांच्या नावाने डिमांड ड्राफ्ट पाठविण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमील कॉलनी, हमालवाडा, स्टॅण्डर्ड कॉलनी इत्यादी मोहल्यातील नागरिकांच्या आग्रही मागणीनुसार आणि औरंगाबाद ते पैठण रस्त्यावरील रहदारी वाढलेली असल्यामुळे क्रॉसिंगवर क्रॉसिंगच्या वेळी होणारा ट्रॅफिकचा खोळंबा लक्षात घेता औरंगाबाद ते पैठण रस्त्यांवरील रेल्वे लेव्हल क्रॉसिंग क्र. ५२ किमी क्रमांक ११२/१०-११ या ठिकाणी रेल्वे क्रॉसिंगला भुयारी रस्ता बनविण्याबाबत सदरील कामाची अंदाजपत्रके व नकाशा तयारकरण्यांसाइी येणरा खर्च रुपये रु. १,०४,०००/- चा डिमांड ड्राफ्ट डिव्हिजनल कॅशियर (वेतन) हैद्राबाद डिव्हिजन साऊथ सेंट्रल रेल्वे, सिकंदराबाद यांच्या नावाने दि. २१-०७-९४ च्या पत्रकान्वये पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, फायर स्टेशन येथे अग्निशमन दल अधिकारी, मनपा यांना निवास्थान बांधणेच्या कामासाठी ठराव क्र. ३३२ दि. २८-०४-९५ अन्वये रक्कम रु. ४,०३,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/मुलेप/१००/९५ दिनांक २८-०४-९५ अन्वये बी-१ नमुन्यत निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (८) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण

(२) निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि. १२-०५-९५ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. वाशिबा कन्स्ट्रक्शन | ८% जास्त दराने |
| २) | श्री. सय्यद जमीर | १०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा आठ टक्के (८%) जास्त दराची मे. वाशिबा कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे मक्तेदारास कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उअ/इ/४८०/९५ दि. १५-०५-९५ अन्वये मा. आयुक्त यांचे दालनात दराचे वाटाघाटी करिता बोलाविले असता, मक्तेदाराने दि. १७-०५-९५ अन्वये पत्राचे सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा सात टक्के जास्त दरानेच काम करून देण्याबाबत कळविले. पुन्हा दराबाबत वाटाघाटीसाठी मा. आयुक्तांचे दालनात बालोविले असता, सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करण्यास मा. आयुक्तांनी सुचविले. परंतु मक्तेदाराने सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करण्यास असमर्थता दर्शविली व अंदाजपत्रकीय दरापेक्षा पाच टक्के जास्त दराने करण्यास दि. २९-०५-९५ अन्वये लेखी संमती दर्शविली व गुत्तेदारांच्या ५% जास्त दरास स्थायी समितीपुढे प्रस्ताव ठेवण्याचे आदेश मा. आयुक्तांनी दिले.

सदर कामासाठी मे. वाशिबा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा आठ टक्के जास्त ऐवजी पाच टक्के जास्त दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फायर स्टेशन येथे अग्निशमन दल अधिकारी, यांच्याकरिता निवास्थान बांधण्याचे काम दि. २९-०५-९५ च्या लेखी संमतीनुसार मे. बाशिबा कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ५% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२/७ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिक करणसयाच्या संदर्भात व प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे या दृष्टीने कार्यरत प्राथमिक शाळेत सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात बालवाडी वर्ग सुरू करण्याबाबत मा. आयुक्त यांनी दि. २२-०४-९५ रोजी मंजुरी दिली आहे.

तरी सन १९९५-९६ ला शैक्षणिक वर्षात मानधन तत्त्वावर १९ बालवाड्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. कराड भागवत :** प्रस्तावात दर्शविलेल्या बालवाड्या कोणत्या कोणत्या भागात उघडण्यात येणार आहे.

**उप आयुक्त-२ :** १९ बालवाड्या उघडण्यात येणारअसून, यापैकी १४ मराठी व ५ उर्दूच्या बालवाड्या आहेत (बालवाड्या उघडणाऱ्या ठिकाणाची नावे वाचून दाखविण्यात आली.)

**श्री. गौतम खरात :** बालवाडीच्या प्रवेशासाठी पालकांकडून अनेक शाळा डोनेशन देतात. जे नागरिक डोनेशनची रक्कम भरू शकत नाही. अशा नागरिकांची मुले

शाळेपासून वंचित राहतात व वाम मार्गाला लागतात. औरंगाबाद शहरातील अनेक वसाहतीमध्ये डोनेशनची रक्कम भरू शकणार नाहीत, असे अनेक नागरिक आहे किंवा या नागरिकांच्या मुलांना योग्य ते शिक्षण मिहावे यासाठी बालवाड्यांच्या संख्येत वाढ करता येणार नाहीत का?

**मा. सभापती :** स. सभासदांनी याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मांडावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयप्रमाणे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या संदर्भात व प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे. या दृष्ठीने सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात कार्यरत प्राथमिक शाळेत मानधन तत्वावर १९ बालवाड्याचे वर्ग सुरू करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सादिया सिनेमाचे मागे पैठण गेट येथे मनपा जागेवर दुकान केंद्र बांधणेच्या कामासाठी ठराव क्र. २०० दि. ३१-०३-९५ अन्वये रक्कम रु. १,०७,२२,५७०/- चे अदांजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/मुलेप/८६/९५ दि. १८-०३-९५ अन्वये बी-१ नमुन्यात वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (५) पांच निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दिनांक २४-०४-९५ ला उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी | ४.४५% जास्त दराने |
| २) | मे. गॉडविन कन्स्ट्रक्शन कंपनी | ८% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.४५% जास्त दराचे मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा आहे. दर जास्त वाटत असल्यामुळे कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उआ/(इ)/४१०/९५ दिनांक २८-०४-९५ अन्वये मक्तेदरास मा. प्रशासकांचे दालनात वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. दराचे वाटाघाटी अन्वये सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.४५% जास्त ऐवजी १% जास्त दराने करण्यास गुत्तेदाराने संमती दर्शविली होती. परंतु तद्नंतर गुत्तेदाराने वाटाघाटीमध्ये अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% जास्त दराने काम करण्याची दर्शविलेली संमती परत घेऊन त्यांचे दिनांक १०-०५-९५ चे पत्राअन्वये ४.४५% दराने काम करण्याबाबत सम्मती दर्शविलेली आहे आता पावसाळा सुरू होत असल्यामुळे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% जास्त दराने काम परवडत नसल्यामुळे सदरील काम ते अंदाजपपकीय दरापेक्षा ४.४५% जास्त दराने कतरील. प्रस्ताव विचारार्थ तथा पुढील योग्य त्या आदेशास्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम खरात, श्री. महमंद मुस्ताक :** महापालिकेने दुकाने बांधतांना गोरगरीब नाकरीकांनाही व्यवसायासाठी दुकाने भाड्याने घेता आली पाहिजे अशा आकाराची दुकाने बांधावीत.

**मा. सभापती :** दुकाने भाड्याने देतांना ३० वर्षाचा करार असेल तर १५ वर्षाचे भाडे आगाऊ घेण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सादिया सिनेमाच्या मागे पैठण गेट येथे मनपाच्या जागेवर दुकान केंद्र बांधणेच्या कामासाठी दि. १०-०५-९५ च्या पत्रकानुसार उक्त काम मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.४५% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४/९ :**

मा. आयुक्तांच्या मंजुरीनुसार प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या कामाचा व्याप दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात वाढत आहे. प्रशासनात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापर अल्यावश्यक बाब झाली आहे. मनपाच्या विविध विभागाकडून माहिती मिळविण्यांत होणारा विलंब टाळण्यासाठी व कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी करण्याच्या व कार्यक्षमता वाढविण्यांच्या उद्देशाने संगणक खरेदी करणे गरजेचे आहे. याबाबत औरंगाबाद जिल्हाधिकारी, कार्यालयातील एन.आय.सी.च्या प्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली. प्रतिनिधींनी मनपाच्या आर्थिक नियोजनाचा व व्यवहाराचा व पुरविलेल्या भौतिक सुविधांचा अभ्यास केला व कामाचे नियोजन करण्यांच्या दृष्टीने महानगरपालिकेत किमान तीन संगण्काची आवश्यकता असल्याची शिफारस केली आहे. महानगरपालिकेस बऱ्याच अतिविशिष्ट व्यक्ती भेटी देतात. अशा वेळी सर्व विभागाची तात्काळ सांख्यिकीय माहिती संकलित करणे आवश्यक असते. केलेल्या कामाचे मुल्यमापन करणे शक्य होऊ शकते. या गरजेची पूर्तता संगणकामार्फत तात्काळ पूर्ण होऊ शकते.

**<u>संगणकाची उपयोगीता : माहिती संकलन व विश्लेषन:</u>**

औरंगाबाद महानगरपालिकेत साधारणतः ६१ विभाग कार्यरत आहेत या सर्व विभागातून जी कामे केली जातात त्याचे स्वरुप खालील प्रमाणे आहेत. पाणीपट्टी वसुलीसाठी देयके तयार करणे, त्या विभागातील रस्तयाची संख्या लांबी, रुंदी, खुल्या / भूमीगत गटारींची संख्या व त्यांची लांबी, सार्वजनिक शौचालय बैठकीची संख्या, विद्युत खांब, समाज मंदिरे शाळा, महानगरपालिकेच्या खुल्या जागा, मनपाची उद्याने, शॉपिंग सेंटर व त्याचे भाडे वसुली, त्या त्या विभागातील वृक्ष संख्या पाणी पुरवठ्याच्या टाक्या वस्तीनिहाय पुरविण्यात बोअरवेलची संख्या, विभग निहाय मालमत्ताधारकांची यादी व त्यांना आकारलेले कर अशा कराची वसुलीबाबतची आकडेवारी, स्त्री पुरुष, मजुराची संख्या, कचरा कुंड्याची संख्या, फर्निचर अशा विविध बाबींची नोंद करणे तसेच मनपाच्या मुख्यालयातील अभिलेख कक्षातील हजारो संचिकांची नोंद अस्थापना-१ व २ वरील कर्मचारी कामगारांची सेवापटे त्यांच्या रजा वेतनावरील खर्च, पगार पत्रकांच्या नोंदी, भविष्य निर्वाह निधी, कर्ज वितरण व वसुली कंत्राटदरांना अदा करण्यांत येणारी देयके, अभियंत्या कडून शहराच्या विविध विभागात झालेल्या शेकडो विकास कामांच्या तपशिलावर नोंदी नगर रचना विभागाच्या बांधकाम परवान्यांचा अभिलेख जकात कर वसुली आकडेवारी कर आकारणी विभागातील मालमत्ता धारकांची यादी व आकारलेल्या करांची नोंद (सदर नोंदी दर चार वर्षांनी बदलत असतात.)

प्रकल्प विभागाच्या झोपडपट्ट्यामधील सामाजिक आर्थिक सर्वेक्षणाचे विश्लेषण अहवाल लेखन, जन्म मृत्यूच्या नोंदी मनपाच्या विविध विभागाच्या संचिकाच्या नोंदी बाबतची कामे त्वरित करता येतील.

**प्रथम टप्पा :-**

प्रस्ताव मान्य झाल्यास संगणक खरेदीची निविदा वृत्तपत्रातून प्रकाशित करून वैधानिक कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

**अपेक्षित खर्च व तरतूद :-**

**एन.आय.सी. च्या शिफारशीनुसार खालील बाबींवर खर्च अपेक्षित आहे.**

| अ.क्र. | साहित्य | संख्या | खर्च रु. |
|---|---|---|---|
| १ | पी.सी. ३८६ संगणक | ३ | १,५०,०००/- |
| २ | डॉट मॅट्रीक्स प्रिंटर (२४ पीन) | १ | ३०,०००/- |
| ३ | डॉट मॅट्रीक्स प्रिंटर (९ पीन) | १ | २०,०००/- |
| ४ | जी.आय.एस.टी. कार्ड मॅन्युअलसह | ४ | ५०,०००/- |
| ५ | सॉफ्टवेअर वरील खर्च | | ६०,०००/- |
| ६ | किरकोळ खर्च | | ८२,०००/- |
| ७ | कस्ट्रमाईज सॉफ्टवेअर | | १,१०,०००/- |
| ८ | कर्मचारी प्रशिक्षण | | ५०,०००/- |
| | | | **५,५२,०००/-** |

महापालिकेचे संगणीकरणाच्या कामासाठी रु. ५ लक्ष तरतूद या वर्षी केलेली आहे. उर्वरित खर्च सुधारित अंदाजपत्रकीय तरतूदीतून करता येईल. त्यातून हा खर्च मागविण्यात येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिकेच्या विविध विभागाकडून माहिती मिळविण्यात होणारा विलंब आणि कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी करून कार्यक्षमता वाढविणे इत्यादी बाबींचा विचार करता संगणकाची उपयोगीता या शिर्षकात दर्शविल्याप्रमाणे सर्व विभागातील तात्काळ सांख्िककीय माहिती संकलित करणे सोईचे व्हावे. यादृष्टीने औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयातील एन. आय. सीच्या शिफारशीनुसार खाली दर्शविल्याप्रमाणे संगणक खरेदीसाठी रक्कम रु. ५,५२,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | साहित्य | संख्या | खर्च रु. |
|---|---|---|---|
| १ | पी.सी. ३८६ संगणक | ३ | १,५०,०००/- |
| २ | डॉट मॅट्रीक्स प्रिंटर (२४ पीन) | १ | ३०,०००/- |
| ३ | डॉट मॅट्रीक्स प्रिंटर (९ पीन) | १ | २०,०००/- |
| ४ | जी.आय.एस.टी. कार्ड मॅन्युअलसह | ४ | ५०,०००/- |
| ५ | सॉफ्टवेअर वरील खर्च | | ६०,०००/- |
| ६ | किरकोळ खर्च | | ८२,०००/- |
| ७ | कस्ट्रमाईज सॉफ्टवेअर | | १,१०,०००/- |
| ८ | कर्मचारी प्रशिक्षण | | ५०,०००/- |
| | | | **५,५२,०००/-** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. नारेगांव ट्रेंचिंग ग्राऊंड येथील कचरा टाकण्याकरिता खड्डे खोदणे व खडी रस्ता तयार करणे करिता अंदाजपत्रक रक्कम

रु. १४,५८,९५०/- चे तयार करून मा. प्रशासक यांनी दि. ०९-०३-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील कामासाठी खड्डे खोदने करिता रु. ९,९५,९५०/- व खडी रस्ते तयार करण्याकरिता ४,६३,०००/- असे एकूण १४,५८,९५०/- प्रस्ताव आहे.

सदरील अंदाजपत्रक कचरा टाकण्याकरिता ५० मी X ६ मी X १.५ मी. साईजचा खड्डा असून ५० खड्डे व त्यामधील निधाणारी माती उचलणे करिता व सदरील खड्ड्याचे दोन ओळी मध्ये कचरा टाकण्याकरिता खडी रस्ते तयार करण्याचा प्रस्ताव आहे.

मा. प्रशासक यांच्या मंजुरीनंतर सदरील कमाचा निविदा सूचना क्र. मनपा/शाअ/९१/९५ दि. २७-०३-९५ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम दि. ०३-०४-९५ पर्यंत एकूण (२२) बारा कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेस १२-०५-९५ रोजी दोन (२) निविदा प्राप्त झाल्या व दिनांक १९-०४-९५ रोजी मा. लेखा परिक्षक व उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडल्या असता खालील तुलनात्मकदृष्ट्या गुत्तेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. खाजा मोइनोद्दिन | १.१०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २) | श्री. संजय खर्डीकर | २% जास्त अंदाजपत्रकीय दरापेक्षा |

वरील निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची निविदा श्री. खाजा मोईनोद्दिन यांची असून मा. आयुक्त यांनी कामाचे स्वरुप खड्डे खोदणे व खडी रस्ता तयार करणे करिता महानगरपालिकेचे आर्थिकदृष्ट्या व हिताचे दृष्टीने दि. ०८-०५-९५ रोजी वाटाघाटी अन्वये मा. आयुक्त यांचे समक्ष ३.५०% कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने काम करण्यांस संबंधित ठेकेदारांनी तयारी दर्शविली आहे. व तसेच लेखी संमती दिली आहे.

सदरील काम मो. नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथील विकास कामाकरिता शासकीय अनुदान निधीमध्ये रु. ४०,००,०००/- राखून ठेवले आहे. त्या निधीमधून सदरील कामाचा प्रस्ताव आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथील कचरा टाकण्याकरिता खड्डे खोदणे व खडी रस्ता तयार करणेचे काम दि. ०८-०५-९५ च्या लेखी संम्मतीनुसार अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३.५०% कमी दराने श्री. खाजा मोईनोद्दिन यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. १६ :**

मा. महापौर यांचे निवास्थानी ओनिडा कंपनीचा कलर टि.व्ही. (केवाय सिरीज) ज्याची किंमत रुपये २३,१००/- आहे . खरेदी करून देणे आहे. तरी कृपया सदरील खर्चास मान्यता व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. महापौर यांचे निवासस्थानाकरिता रक्कम रु. २३,१००/- चा ओनिडा कंपनीचा कलर टि.व्ही (के.वाय सिरीज) खरेदी करण्यातस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७ :**

मा. महापौर ह्यांचे निवास्थानी पुरविण्यात येणारे फर्निचर साहित्य मनपाने मनपा निधीतून पुरविणे बाबत. विषयाधीन प्रकरणी सादर करण्यात येते की, विषयात नमूद

केलेल्या बाबी संबंधी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९र आणि लेखा संहिता नियमात कोठेही तरतूद केलेली नाही किंवा याबाबत महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासून मनपाने नियम तयार करून त्यास मान्यता दिल्याने आढळून येत नाही.

महाराष्ट्र पब्लिक वर्क्स मॅक्युअल मधील परिच्छेद क्रमांक ३६६ आणि परिशिष्ट क्र. २९ अन्वये राज्याचे मा. ना. मुख्यमंत्री, मा. ना. सर्व कॅबिनेट मंत्री मा. ना. सर्व उपमंत्र्यांना शासनाने दिलेल्या निवास्थानासाठी पुरवावयाच्या फर्निचर आणि इतर साहित्याचे मापदंड प्रमाण आणि त्यावर येणा४या आर्थिक खर्चाची मर्यादा आणि नियम विहित केले आहेत. (उपरोक्त नियमाची आणि परिशिष्ठाची प्रत अवलोकानासाठी संलग्न केली आहे.) मनपाच्या मा. महापौर ह्यांचे निवास्थानी शासन स्थरावरील मा. ना. उप मंत्री महोदयांना त्यांचे निवास्थानी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या मापदंडानुसार, प्रमाणानुसार आणि विहित केलेल्या आर्थिक खर्चाचे मर्यादेपर्यंत फर्निचर इ. साहित्य पुरविण्याबाबत सभागृहाने मान्यता देण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र पब्लिक वर्क्स मॅक्युअल मधील परिच्छेत क्र. ३६६ आणि परिछेद क्र. ३६६ आणि परिशिष्ट क्र. २९ अन्वये मा. महापौर ह्यांचे निवास्थानी शासनाचे विहित केलेल्या मापदंडानुसार प्रमाणानुसार आणि रक्कम रुपये, १,००,०००/- पर्यंत च्या खर्चाचे मर्यादापर्यंतचे फर्निचर साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८ :**

मा. महापौर, मा. उप महापौर, मा. सभापती, स्थायी समिती आणि इतर पदाधिकाऱ्यांच्या अधिकाऱ्यांच्या वाहनासाठी पेट्रोल / डिझेल वापर आणि देखभाल दुरुस्ती खर्चाची मर्यादा विहित करणे बाबत.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. जेईपी/१०८९/सीआर/३५८३/२६. दिनांक ०४-०७-९० अन्वये जिल्हा परिषदाचे पदाधिकारी आणि अधिकारी ह्यांचे वाहना करिता पेट्रोल / डिझेल वापरांसंधी वार्षिक मर्यादा ४००० लीटर विहित केली आहे. त्यात पुन्हा काटकसरीची उपाय योजना म्हणून वित्त विभाग शासन निर्णय क्र. बीजीटी/१२९१/प्र.क्र.१२२/अर्थसंकल्प १९ दिनांक १२-०३-१९९२ अन्वये २५% कपात करून ती वार्षिक मर्यादा ३००० लिटर पर्यंत केलेली आहे. म्हणजेच मासिक इंधन वापर मर्यादा २५० लिटर केली आहे.

त्याप्रमाणे वाहनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी होणाऱ्या खर्चाची वार्षिक मर्यादा खालील प्रमाणे ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. जेईपी-१०९३/सीआर-९३१/२६ दिनांक ०४-०१-१९९४ अन्वये विहित केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | पेट्रोल वाहन | १८,००० प्रति वर्ष |
| २) | डिझेल वाहन | २०,००० प्रति वर्ष |

वरील खर्चासाठी जिल्हा परिषदांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नसून तो खर्च जिल्हा परिषदांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नसून तो खर्च जिल्हा परिषदांना त्यांच्या स्वत:च्या उत्पन्नातून करावा लागतो.

जिल्हा परिषदेचे कार्यक्षेत्र संपूर्ण जिल्हा असून जि.प. अध्यखांना शासनाने मा. ना. राज्य मंत्र्यांचा दर्जा दिला आहे. तथापी मनपाचे कार्यक्षेत्र शहरी भागापुरते मर्यादित असल्याने आणि मनपास देखील सर्व वाहनावरील देखभाल व दुरुस्ती खर्च स्वत:च्या

उत्पन्नातून करावा लागतो. या बाबी विचारात घेवून मनपा पादाधिकारी आणि अधिकारी ह्यांच्या वाहनाकरिता इंधन व देखभाल दुरुस्तीसाठी होणाऱ्या खर्चासाठी खालीलप्रमाणे मर्यादा विहित करण्यात यावी.

| अ.क्र. | पदाधिकार / अधिकारी | इंधन खर्च मासिक मर्यादा | देखभाल, दुरुस्ती वार्षिक खर्च मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | सर्व पदाधिकारी | २५० लिटर | रु. १८,०००/- |

वर उल्लेख केलेल्या शासन निर्णयाच्या प्रतिसह प्रस्ताव सर्व सामान्य सभेच्या विचारार्थ आणि मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील पदाधिकारी आणि अधिकारी यांचे वाहनाकरिता वापरण्यात येणारे पेट्रोल / डिझेल आणि देखभाल दुरुस्ती च्या खर्चाची मर्यादा खालील प्रमाणे ठरविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| **पदाधिकार / अधिकारी** | **इंधन** | **देखभाल, दुरुस्ती वार्षिक खर्च मर्यादा** |
|---|---|---|
| मा. महापौर | ३०० लिटर पेट्रोल दरमहा | रु. १८,०००/- |
| मा. आयुक्त | | |
| मा. उप महापौर | | |
| मा. सभापती स्थायी समिती | | |
| | | |
| उप आयुक्त-१ | २०० लिटर पेट्रोल दरमहा | |
| उप आयुक्त-२ | | |
| | | |
| शहर अभियंता | १७५ लिटर पेट्रोल दरमहा | |
| अतिरिक्त शहर अभियंता | | |
| कार्यकारी अभियंता (पा.पु.ज.नि.) | | |
| | | |
| या व्यतिरिक्त इतर पदाधिकारी व अधिकारी | १५० लि. डिझेल दरमहा | |

**विषय क्र. १९ :**

स. सदस्य श्री. प्रभाकर विधाते यांनी प्रस्ताव मांडला की, औरंगाबाद शहरात सुशिक्षित बेकार, गरिक व होतकरू तरुणांना व्यवसाय सुरू करण्याकरिता मनपातर्फे टपरी टाकण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी ऐनवेळच्या प्रस्ताव सादर करीत आहोत. प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, शहरातील सुशिक्षित अथवा गरिब होतकरू नागरिकांचा टपरी बाबतचा प्रश्न हाताळण्यासाठी खालील प्रमाणे एक समिती गठण करण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. महमद मस्ताक अहमद | सभापती |
| २ | श्री. प्रकाश निकाळजे | सदस्य |
| ३ | श्री. प्रभाकर विधाते | सदस्य |
| ४ | श्री. सुदाम सोनवणे | सदस्य |
| ५ | श्री. महादेव सुर्यवंशी | सदस्य |
| ६ | श्री. डर्झ. कराड भागवत | सदस्य |
| ७ | श्री. सिकंदर अली | नगर रचना अधिकारी |
| ८ | श्री. जरारे एस. आर. | मालमत्ता अधिकारी (सचिव) |

या समितीने १०० फुट रस्त्यावर टपरीसाठी शिफारस करू नये. ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**श्री. हमीद उद्दिन ताबा, श्री. अब्दुल रशिद खान (मामू) श्री. महमद मश्ताक :** शहराच्या स्थानिक वृत्तपत्रात मनपाच्या चेलीपुरा काचीवाडा शाळेवर अनाधिकृत कब्जा या शिर्षकाखाली प्रसिध्द झालेल्या बातम्याबाबत खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती :** उप आयुक्त-२ यांनी याबाबत पुढील सभेत माहिती द्यावी.

**विषय क्र. २० :**

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३ दिनांक १८-०८-९५ अन्वये स्थायी समिती मधून नियोजन समितीवर तीन (३) सभासदांचा समावेश करण्यासाठी स्थायी समितीचा संपूर्ण अधिकार प्रदान करून त्यांनी तीन सदस्यांची निवड करून शासनास पाठविणे बाबत सर्वानुमते मंजुरी दिली आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९९६ चे कलम २८(२) नुसार खालील तीन (३) सदस्यांची नियोजन समितीवर नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. प्रदिप कुमार जैस्वाल | सभापती |
| २ | श्री. कंवरसिंग बैनाडे | सदस्य |
| ३ | श्री. अब्दुल रशिदखान (मामू) | सदस्य |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव,
औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती, स्थायी समिती,
औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक १६-०६-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. शुक्रवार दि.१६-०६-९५ रोजी दुपारी ३.०० मा. सभापती, श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेसे सुरुवात झाली. या सभेस खालील सभासदांसह कार्यालयीन अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अ. रशिदखान (मामू) | सदस्य |
| २) | श्री. सुभाष कच्छवाह | -//- |
| ३) | श्री. डॉ. कराड भागवत | -//- |
| ४) | श्री. गौतम खरात | -//- |
| ५) | सौ. रजनी रमेश जोशी | -//- |
| ६) | श्री. प्रकाश निकाळजे | -//- |
| ७) | श्री. महंमद मुस्ताक अहेमद | -//- |
| ८) | कु. माया लाडवाणी | -//- |
| ९) | श्री. प्रभाकर विधाते | -//- |
| १०) | सौ. पद्मा शिंदे | -//- |
| ११) | श्री. महादेव सुर्यवंशी | -//- |
| १२) | श्री. सुदाम सोनवणे | -//- |
| १३) | श्री. हमीदउद्दिन ताबा | -//- |
| १४) | श्री. बैनाडे कवरसिंग | -//- |
| १५) | श्री. विजयकुमार मेहेर | |

**विषय क्र. २१/१ :**

दिनांक ०९-०६-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** दिनांक. ०९-०६-९५ च्या सभेचे ठराव क्र. ११ चे काम मे. वाशिबा कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ५% कमी दराने करून घेण्यास मंजुरी देण्यात येते., अशी नोंद झाली आहे. वस्तुतः विषय क्र. ११ मध्ये उक्त काम संबंधित संस्थेकडून ५% जास्त दराने करून घेण्याची मागणी केली आहे. कृपया दुरुस्ती करण्यांत यावी.

**मा. सभापती :** ठराव क्र. ११ दि. ०९-०५-९५ मध्ये फायर स्टेशन येथे अग्निशमन दल अधिकारी यांचेकरिता निवासस्थान बांधणेचे मे. वाशिबा कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत अंदाजपत्रक दरापेक्षा ५% कमी ऐवजी ५% जास्त दराने अशी दुरुस्ती करण्यांस मंजुरी देण्यात येते.

**श्री. हमीद उद्दिन ताबा :** दि. ०९-०६-९५ च्या सभेत चेलीपुरा काचीवाडा शाळेवर अनाधिकृत कब्जा या विषयी प्रसिध्द झालेल्या वृत्ताबाबतचा खुलासा सभागृहात करण्यांत यावा.

**शिक्षणाधिकारी :** काचीवाडा चेलीपुरा या शाळेकरिता सन १९७४ पासून निर्वासित लोकांची मालमत्ता शालेय इमारत म्हणून भाड्याने घेण्यात आली होती. त्यानंतर सन १९९२ मध्ये मनपाने बांधलेल्या नविन इमारतीमध्ये सदर शाळा स्थलांतरीत करण्यात आली. शाळा स्थलांतरीत झाल्यापासून या इमारतीला कुलूप होते. वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार नियमाप्रमाणे मालमत्ता अधिकारी यांचे मार्फत पोलिसांकडून गुन्हा दाखल केला आहे.

**मा. सभापती :** सभागृह खुलासा केल्याप्रमाणे जुन्या इमारतीचे कुलूप तोडल्याबाबत पोलिस केस करण्यांत आली आहे. परंतु सदर इमारतीचे कुलूप केल्या, कोणत्या दिवशी तोडले त्यातून महानगरपालिकेचे काही साहित्य चोरीस गेले आहे काय? याचा खुलासा होत नाही, तेंव्हा शिक्षणाधिकारी यांनी मा. उप आयुक्त, मा. आयुक्त यांचे मार्गदर्शना खाली योग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**शिक्षणाधिकरी :** महापालिकेच्या सर्व शालेय इमारती मालमत्ता अधिकारी यांच्या ताब्यात आहेत. त्यानुसार मालमत्ता अधिकारी यांचे मार्फत पोलिस केलस करण्याबाबतची सूचना मिळाली त्यानुसार रितसर पोलिस केस कार्यवाही करण्यात आली आहे. चेलीपुरा काचीवाडा शाळेच्या मुख्याध्यापकाकडे फर्निचर इतर साहित्य नविन इमारतीत आणून घेतल्याचे मुख्याध्यापक यांनी सांगितले आहे. तथापी अनावश्यक किंवा मोडके फर्निचर इमारतीत होत काय? याबाबत मुख्याध्यापक यांना पत्र दिले आहे. परंतु याबाबतच्या खुलासा अद्याप प्राप्त झाला नाही.

**मा. सभापती :** चेलीपुरा-काचीवाडा शाळेच्या चृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार या शालेय इमारतीमधून सहानगरपालिकेचे साहित्य अथवा इतर बाबींची काही चोरी झाले आहे काय याची संपूर्ण माहिती शिक्षणाधिकारी यांनी द्यावी व त्या विषयी आवश्यक ती चौकशी करून चोरीबाबतची फिर्याद दाखल करावी. सदर प्रकरणी मा. उप आयुक्त-२ यांनी विशेष लक्ष द्यावे.

**श्री. प्रभाकर विधाते :** दि. ०९-०६-०५ च्या सभेस ठराव क्र. १२ अन्वये येत्या शैक्षणिक वर्षापासून नविन बालवाड्या सुरू करण्यांस मंजुरी दिली आहे. या बालवाडीतील शिक्षीकांना रुपये ३००/- ऐवजी रु. १०००/- मानधन देण्यांत यावे.

**शिक्षणाधिकारी :** जिल्हा परिषद बालवाडी शिक्षकांना दरमहा रुपये ३००/- दिले जाते. त्याच धरतीवर मनपा शाळेतील बालवाडी शिक्षिकांना रु. ३००/- मानधन दिले जाते. तथापी सभागृहाने मंजुरी दिल्यास त्याचप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :** मनपा बालवाडी शिक्षिकांच्या रु. ३००/- च्या मानधनात वाढ करणेबाबत शिक्षणाधिकारी यांनी नियमाप्रमाणे सर्वसाधारण सभेत ऐनवेळी प्रस्ताव मांडला.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे जि.प. बालवाडी शिक्षिकांना ३००/- रु. मानधन देण्यात येते. त्याच प्रमाणे मनपा बालवाडी शिक्षकांनाही ३००/- रु. मानधन देण्यात येते. मग मनपा बालवाडी शिखकांच्या मानधनात वाढ करण्याची गरज काय?

**मा. सभापती :** महानगरपालिकेच्या ज्युब्लीपार्क किंवा बेगमपुरा बालवाडीत काम करणारी एखादी शिक्षिका सिडको भागात रहात असेल तर अशा बालवाडी शिक्षिकांना देण्यात येणारे मानधन रु. ३००/- कमी पडते तेंव्हा किमान

३००/- रु. ऐवजी ५००/- रु. द.म. मानधन याबाबतचा प्रस्ताव संबंधित विभागांनी पाठवावा.

**श्री. हमीदउद्दिन :** शिक्षण विभागात रिक्त असलेल्या पदावर शिखकांची भरती करण्यांच्या मुलाखती रद्द करण्यांत आल्याची माहिती मिळाली आहे. महानगरपालिका कार्यालयातील कर्मचाऱ्यांची भरती करतांना भरती समितीवर दोन सभासदांची नेमणूक करण्यांत यावी, म्हणजे कर्मचाऱ्यांची भरती करणे सोईचे होईल.

**मा. सभापती :** महानगरपालिका भरती कमिटीचे अध्यक्ष मा. आयुक्त आहे आज मनपा बालवाडीमध्ये प्रवेश घेण्याबाबत चांगला प्रतिसाद मिळत आहे. शहरातील दोन रोडची कामे झाले नाही तरी चालतील. महानगरपालिका शाळेचा शैक्षणिक दर्जा वाढवावा, यादृष्टीने अर्थसंकल्पात शिक्षण विभागांकरिता भरीव तरतूद करण्यात यावी आणि या अधारे शहरातील मुलांना महानगरपालिका शाळेतून चांगल्या प्रकारचे शिक्षण कसे देता येईल, याचा विचार करावा.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे किती बालवाड्या अथवा अंगवाड्या चालू आहे.

**शिक्षण अधिकारी :** महापालिकेतर्फे फक्त बालवाड्या चालविण्यांत येतात.

**श्री. प्रभाकर विधाते :** शहरातील सर्वसामान्य नागरिकांनी त्यांचे मुलांना महानगरपालिका बालवाडी शाळेत प्रवेश द्यावा, यादृष्टीने शिक्षण अधिकारी यांनी मनपा शाळेचा दर्जा वाढवावा. तसेच जे पालक आपल्या मुलांना मनपा शाळेतून काढून इतर खाजगी संस्थेमध्ये प्रवेश देण्यासाठी शाळा सोडल्याचा दाखल मागत असतील अशा पालकांना शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र देण्याचे बंद करावे.

**मा. सभापती :** सभागृहात आताच खुलासा केल्याप्रमाणे सभासदांनी एखाद्य. नागरिकांची बदली झाली असेल, अशा नागरिकांच्या व्यतिरिक्त इतर नागरिकांच्या पाल्यांना शाळा सोडण्यांचे प्रमाणपत्र देण्याबाबतचा आग्रह महापालिका प्रशासनाकडे करू नये.

**श्री. गौतम खरात :** मल्टीपरपज येथील शालेय इमारती महानगरपालिकेची ही शाळा कार्यरत होती. सदर महानगरपालिकेची ही शाहा कार्यरत होती. सदर महानगरपालिकेची शाळा सध्या कंटोनमेंट बोर्ड येथे भरत असल्याची माहिती मिळाली आहे. मल्टीपरपजच्या महानगरपालिका शाळेत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्याचे पालक गरीब नागरिक आहे. सदर शाळा कंटोनमेंट बोर्डात गेल्यामुळे हे नागरिक मुलांच्या शिक्षणाकरिता बसचा खर्चही करू शकत नाही. किंवा आपल्या मुलांना शाळेतही नेऊन सोडू शकत नाही. किंवा मल्टीपरपज हायस्कूल येथे महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांबाबत अन्य काही व्यवस्था करता येईल, याचा विचार व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** मल्टीपरपजच्या इमारतीत चालत असलेली महापालिका शाळा छावणी येथे स्थलांतरीत झालेली नाही. महापालिकेच्या ज्युब्लीपार्कच्या शाळेचा विस्तार करण्यात आलेला आहे. या इमारतीत मल्टीपरपजच्या शाळेची व्यवस्था करण्यात आली आहे. दोन दिवसांत या ठिकाणी शाळा सुरू होईल.

मल्टीपरपरज शाळेची जागा रिकामी करून देण्याबाबत संबंधित विभागाकडून मागणी करण्यात आली होती.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** मल्टीपरपज येथे चालू असलेली मनपा शाळा या ठिकाणाहून स्थलांतरीत झाल्यामुळे शालेय कागदपत्राचे बस्ते बाधून तयार आहे. परंतु हे बस्त वाहुन नेण्यासाठी अद्याप वाहन मिळालेले नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांना या शाळेतून शाळा सोडल्याचे प्रमाणपत्रे द्यावयाचे आहे. अशा विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे द्यावयाचे आहे. अशा विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देता येत नाहीत तेंव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** शालेय साहित्य वाहून नेण्यासाळी विभागीय अधिकारी झोन क्र. १ यांच्याकडे वाहनाची मागणी केली आहे. त्याबाबत आवश्यक ते पत्रही दिले आहे. अद्याप वाहन मिळाले नाही.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** प्रशासनांतर्गत सध्या साध्या कामांसाठी दिरंगाई का होत आहे. या दिरंगाईमुळे मुलांचे नुकसान होत आहे.

**मा. सभापती :** उप अभियंता यांत्रिकी यांनी शालेय साहित्य वाहुन नेण्यासाठी वरील वाहनांची व्यवस्था व आजच शालेय साहित्य, ज्युबलीपार्क येथे पोहोचते होईल, अशी व्यवस्था करावी.

**श्री. गौतम खरात :** मल्टीपरपज येथे चालू असलेल्या मनपा शाळेत किती विद्यार्थी होते, ही शाळा ज्युबलीपार्क येथे स्थलांतरीत करण्यांत आली आहे. असा खुलासा दिना आहे. तेंव्हा या ठिकाणी पुरेसी जागा आहे का? या ठिकाणी पुरेसी जागा नसेल तर काय व्यवस्था केली आहे.

**शिक्षणाधिकारी :** मल्टीपरपज येथे चालू असलेल्या शाळेतील इ. ५,६,७ वी करिता ६ खोल्या लागतात, जुबलीपार्क येथे चालू असलेली पूर्वीची शाळा आणि नव्याने स्थलांतरीत झालेली मल्टीपरपज शाळा या दोन्ही शाळा सकाळ व दुपार अशा दोन शिफ्टमध्ये चालवता येतील. या शाळेचा विस्तार केल्यामुळे दोन शिफ्टमध्ये चालता शक्य आहे.

**डॉ. भागवत कराड :** महापालिका शाळेचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यांच्या दृष्टीने महापालिका शाळेत शिक्षण घेत असलेले विद्यार्थी शिक्षक मुख्याध्यापक आणि शाळा यांच्यकरिता बक्षिसात्मक स्पर्धा ठेऊन महापालिका शाळेचा शिक्षण दर्जा वाढविता येईल का? याबाबत विचार करणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** महानगरपालिका शाळेचा शैक्षणिक दर्जा वाढवावा, या दृष्टीने यापूर्वीच मा. उप आयुक्त व शिक्षणाधिकारी यांना प्रोग्राम तयार करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. औरंगाबाद शहरात महानगरपालिकेच्या काही शाळा जळव जवळ अंतरावर आहे. उदा ज्युबलीपार्क, घाटी, बेगमपुरा अशा प्रकारे जवळ जवळ असलेल्या शाळांऐवजी चार पाच वॉर्ड मिळून चांगल्या प्रमारे भव्य इमारत असलेली एकच शाळा उभारू या भागातील विद्यार्थ्यांना सर्व सोईनीयुक्त शिक्षण देता येईल, अशी व्यवस्था करावी.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे पाच वॉर्डाकरिता एक भव्य शालेय इमारत याप्रमाणे पाच वॉर्डचा विस्तार लक्षात घेता तीन वॉर्डकरिता एक भव्य शालेय इमारत उभारणे योग्य होईल.

**मा. सभापती :** डॉ. मेहेर यांच्या सुचनेप्रमाणे तीन वॉर्डाकरिता एक भव्य इमारत या प्रमाणे शिक्षणाधिकारी यांनी प्रोग्राम तयार करावा.

**श्री. सुदाम सोनवणे :** सिडको एन-९ येथे ७ वी पर्यंत शाळा आहे या शाळेत प्रवेश घेतांना विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षापासून शाळेत ८ वी चे वर्ग सुरू करण्यांत येणा आहे, असे आश्वासन देण्यात आले होते. तथापी ८ वी चे वर्ग अद्याप सुरू झ ालेली नाही. या शाळेतील विद्यार्थी शाळा सोडण्याचे पमाणपत्र घेऊन जात आहे, तेंव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** महापालिका शाळेत ८ वी वर्ग सुरू करण्यांस मान्यता देण्यात यावी, अशा आशयाचे पत्र शासनास (शिक्षण मंत्री) पालक मंत्र्यामार्फत पाठविण्यात आले आहे. लवकरच शासनाकडून ८ वी च्या वर्गास मान्यता मिळविण्यात येईल.

**श्री. प्रकाश निकाळजे :** मनपा कर्मचारी, अधिकारी, शिक्षक यांची मुले महापालिका शाळेत शिक्षण न घेता इतर शाळेत शिक्षण घेतात, हे योग्य नाही. महापालिका शाळेत फक्त स्लम भागातील गरीब विद्यार्थी शिक्षण घेत आहे. तेंव्हा महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांना त्यांच्या मुलांना महापालिकेच्या शाळेतच शिक्षण देण्यांची सक्ती करण्यांत यावी. अशा प्रकारची सक्ती केली नाही. तर महापालिका शाळेतून शिक्षण घेण्याऱ्या गरीब नागरिकांच्या मुलांना योग्य न्याय मिळणार नाही व मनपा शाळेचा दर्जा वाढणार नाही.

**मा. सभापती :** सभासदांनी सुचविल्याप्रमाणे महानगरपालिका कर्मचारी, अधिकारी, शिक्षण यांना अशा प्रकारे सक्ती करता येणार नाही. तथापी मनपा अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांनी त्यांच्या मुलांना महापालिका शाळेतून शिक्षण घेण्याबांबत कर्मचाऱ्यांचे मन वळविता येईल.

**डॉ. भागवत कराड :** शहरातील खाजगी शाळेतून प्रवेश घेतांना डोनेशची मागणी करण्यात येते. तरीसुध्दा खाजगी शाळेत प्रवेश घ्ज्ञेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. या उलट महापालिका शाळेतून डोनेशनची मागणी होत नसली तरी विद्यार्थ्याची संख्या कमी आहे. याचा अर्थ मनपा शाळेतून योग्य शिक्षण दिले जात नाही. तेंव्हा महानगरपालिका शाळेचा दर्जा वाढविण्यांच्या दृष्टीने प्रभाग शाळा आणि नागरिक यांचे सोईकरिता शालेय समितीची स्थापना करण्यात यावी. या शालेय समितीमध्ये मनपा अधिकारी, नगरसेवक यांचा समावेश असावा. अशा समितीने दर पंधरा दिवसांनी शालेय समितीची मिटींग घेऊन महापालिका शाळेचा दर्जा वाढविणेच्या दृष्टीने सुधारणा कराव्यात.

**श्री. महमंद मुश्ताक अहमद :** महापालिका शिक्षण विभागात किती शिक्षण विस्तार अधिकारी व सुपरवायझर आहे याचा खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** स. सभासद श्री. डॉ. कराड भागवत यांच्या मताशी मी सहमत आहे. शिक्षण विभागात सध्या शिक्षण विस्तार अधिकारी किंवा सुपरवायझर असे पद नाही. महापालिका शाळेकरिता शिक्षण विस्तार अधिकारी हे पद मान्य नाही, सुपरवायझर हे पद मान्य आहे. महापालिका शाळेतील शिक्षण विभागांकरिता तीन सुपरवायझर पदाची शासनाकडे मागणी करण्यात आली आहे. यात दोन जागा मराठीकरिता व एक जागा उर्दूकरिता आहे. महापालिकेत शिक्षणाधिकारी या पदाचा पदभार स्विकारल्या नंतर त्याच वेळी महापालिका शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्याचा दृष्टीने शालेय समिती स्थापन करण्यांबाबत पत्र दिलेले आहे. महापालिका शाळेचा दर्जा व इतर बाबींवर आवश्यक विचार झाला पाहिजे. काही काही शाळांनी तसा प्रयत्न केला आहे.

**डॉ. भागवत कराड :** मनपा शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना दररोज काय शिक्षण देतात, याबाबत शिक्षकांना डायरी (टोचण नोंदवही) ठेवण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे महापालिका शाळेस ७ वी नंतर ८ वी चे वर्ग उघडण्याची शासनाकडे मागणी केली आहे. या मागणीनुसार ८ वी वर्ग उघडण्याकरिता आवश्यक तो शिक्षक वर्ग महानगरपालिकेकडे उपलब्ध आहे का ८ वी वर्ग मागणी करतांना ८ वी ची सवलत महानगरपालिकेच्या सर्व शाळांना राहिल का? याबाबत खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** महानगरपालिकेच्या सर्व शाळांसाठी शासनाकडे ८ वी च्या वर्गाची मागणी केलेली नाही. महापालिका शाळेतून ७ वी चे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीचा (स्कॉलरशिप) चा वर्ग घेतला होता. या चाचणीतून पहिले आलेल्या ६० मराठी व ६० ऊर्दू विद्यार्थ्याकरिता ८ वी चे वर्ग उघडल्याची मान्यता मागितली आहे. सिडको एन-९ येथे (वर्ग ८ वी चे) उघडण्याचे विचाराधीन आहे. यासाठी आवश्यक शिक्षक वर्ग महानगरपालिकेकडे आहे. ८ वी च्या वर्गासाठी शासनाकडून अनुदानही मिळू शकते.

**श्री. महमंद मुश्ताक अहेमद :** महानगरपालिका शाळेचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यांच्या दृष्टीने शिक्षण विभागाकरिता दोन उप शिक्षण अधिकाऱ्यांची पदे निर्माण करणे आवश्यक आहे.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** शिक्षण विभागातील श्री. जयवळ हे कोणत्या पदावर काम करतात.

**शिक्षणाधिकारी :** श्री. जयवळ हे शिक्षण विस्तार अधिकारी आहे. महापालिका शाळेत शिक्षण विस्तार अधिकारी हे पद मान्य नाही. री. जयवळ यांनी अर्ज देऊन मुख्याध्यापकाचे काम देण्याची मागणी केली होती, ती मागणी मान्य झालेली आहे. महापालिका शाळेकरिता सुपरवायझरचे पद निर्माण करण्यासाठी मान्यता द्यावी, म्हणून शासनास पत्र दिलेले आहे. सभागृहाने ठराव घेतला तर सुपरवायझरचे पद भरता येईल व महानगरपालिका शाळेचा दर्जाही वाढेल.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** महापालिका शिक्षण विभागांकरिता शालेय फर्निचर शालेय, इमारती, इत्यादीबाबत शासनाकडून अनुदान घेण्यात आले काय? याचा खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** शिक्षण अधिकारी या पदाचा पदभार सिवकारल्या पासून महापालिका शालेय साहित्य फर्निचार, इमारत भाडे इत्यादीबाबत जे अनुदान होते, ते पूर्ण अनुदान मिळालेले आहे.

**मा. सभापती :** शिक्षण अधिकारी यांनी, शिक्षणाधिकारी या पदाचा पदभार स्विकारण्यापूर्वीच्या काळातील शालेय फर्निचार शालेय इमारत इ. बाबतचे काही अनुदान मिळणे बाबत माहिती द्यावी.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू), श्री. महमंद मुश्ताक अहमद :** दि. ०९-०६-९५ च्या सभेतील ठराव क्र. १९ अन्वये नियुक्त करण्यांत आलेल्या टपरी समितीमध्ये स. नगरसेविका कु. माया लाडवाणी आणि स. नगरसेवक श्री. गौतम खरात यांच्या नांवाची वाढ करण्यात येते, अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

**ठराव :**

दि. ०९-०६-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती इतिवृत्तात खालीलप्रमाणे दुरुस्ती व वाढ करण्यांच्या मंजुरीसह इतिवृत्तास स्विकृती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

(१) ठराव क्र. ११ मध्ये "अंदाजपपका" च्या दरापेक्षा ५% कमी दराने या ऐवजी "अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५% जास्त दराने" अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

(२) ठराव क्र. १९ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या टपरी उप समितीवर स. नगरसेविका कु. माया लाडवाणी आणि स. नगरसेवक श्री. गौतम खरात यांची नियुक्त करून वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२ :**

गेल्या ३ वर्षापूर्वी हर्सूल गावात २ लाख क्षमतेचे जलकुंभ बांधण्यात आले असून सध्या त्याद्वारे पाणी पुरवठा केला जाता.

सदरील जलकुंभाच्या लगत १९७० मध्ये पब्लीक हेल्थ विभागाने १.९ लाख लिटरचे जलकुंभ बांधले होते.

सदर जलकुंभाला बांधून अंदाजे २५ वर्ष झाले असून, सदर जलकुंभ फार गळत असून त्याचे सिलेंडरीकल वॉल (भिंत) सुध्दा लेवलमध्ये नाही. त्या मुहे जलकुंभ धोकादायक झाले आहे व त्याद्वारे पाणी पुरवठा बंद करण्यात आले. जर या जलकुंभाची दुरुस्ती करावयाची असेल तर त्यावर अंदाजे रु. १ लाख ते १.५० लाख पर्यंत खर्च येईल व सदर दुरुस्तीसुध्दा जास्त दिवस राहणार नाही. सदरील जलकुंभाच्या जागेवर जास्त क्षमतेचा नविन जलकुंभ बांधल्यास पुढच्या काळात पाणीकमी पडणार नाही.

या संबंधाने ३ लाख लिटर क्षमतेचे अंदाजपत्रक रु. ६,५५,५००/- कतयार करण्यात आले आहे सदरील प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९७० मध्ये पब्लीक हेल्थ विभागाने हर्सूल येथे बांधलेल्या जलकुंभाची दुरुस्ती करणे शक्य नसल्यामुळे पुढील काळात पाणी कमी पडू नये, यादृष्टीने पब्लीक हेल्थ विभागाने बांधलेल्या जलकुंभाच्या जागेवर ३ लाख लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधण्याच्या कामाकरिता र. रु. ६,५५,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मी. ब्रिजवाडी, येथील मनपा प्रा. शाळेला संरक्षित भिंत बाधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागांचे सन १९९२-९३ जिल्हा दर सूचीनुसार रक्कम रुपये २,४२,६४२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. शाळेच्या इमारतीच्या संरक्षणासाठी व मोकळ्या जमिनीवर अतिक्रमण होणार नाही, त्यासाठी सदरील भिंत बांधणे बाबत सदर शाळेच्या मुख्याध्यापकांनी मागणी केलेली आहे.

सबब सदर कामासाठी रक्कम रु. २,४२,६४२ चे अंदाजपपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. सदरचा खर्च विकास इमारती, शाळा दवाखाने या लेखा शिर्षामधनू सन १९९५-९६ मध्ये करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ब्रीजवाडी येथील शालेय इमारतीच्या संरक्षणासाठी व मोकळ्या जागेवर अतिक्रमण होऊ नये, याकरिता ब्रीजवाडी शालेय इमारतीस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी र. रु. २,४२,६४२/- च्या सर्वानुमते मंजुरी देण्यात येतेञ

सदर कामाचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखा शिर्षातून करण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हर्सूल गांव स्लम येथे अंतर्गत खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९२-९३ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ४,००,०००/- अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनाक १४-०२-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून, प्रस्तावित कामासाठी निविदापत्रके जाहिरपणे कार्यालयाची निविदा सूचना नोटीस क्र. जा.क्र./मनपा/६५/९५ दि. २८-०२-९५ अन्वये मागविण्यात आले असता, निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण एक निविदापत्रके प्राप्त झाले.

प्राप्त निविदापत्रके दिनांक २१-०३-९५ रोजी मा. मुख्य लेखा परिक्षक ह्यांच्या समक्ष उघडण्यात आली असता, त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | स. गयासोद्दिन नवाब | ०.१० अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |

वरील प्राप्त निविदा श्री. स. गयासोद्दिन नवाब यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम खरात :** प्रस्तावित कामासाठी एकाच मक्तेदराकडून निविदा प्राप्त झाली आहे. याचा अर्थ सदर कामाकरिता रिंग झाली आहे. असावी असे वाटते. यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत नाही काय? कृपया खुलासा करावा.

**शहर अभियंता :** प्रस्तावित कामासाठी एकूण १३ निविदा विकल्या गेल्या आहे., त्यापैकी एक निविदा प्राप्त झाली, याचा अर्थ रिंग झाली असे म्हणता येणार नाही.

**श्री. महमंद मुश्ताक अहमद, श्री. हमीदउद्दिन ताबा :** प्रस्तावित कामासाठी एकच निविदा प्राप्त झालेली असल्यामुळे, ती मंजूर करता येईल काय? याचा खुलासा करावा किंवा पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावी.

**शहर अभियंता :** प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक १९९२-९३ च्या दरसूचीनुसार तयार करण्यांत आले आणि या कामांवर चालू डी. एस. आर. च्या दराने निविदा प्राप्त झाली आहे तेंव्हा या निविदेवर विचार व्हावा.

**ठराव :**

प्रस्तावित दर्शविल्याप्रमाणे हर्सूल गांव स्लम अंतर्गत खडी रस्ते तयार करण्यांच्या कामासाठी र.रु. ४,००,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदरील कामाकरिता श्री. सय्यद

गयासोद्दिन नवाब यांचे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.१०% कमी दराच्या निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जाधववाडी येथे नविन खांडकी रस्ते तयार करणेकरिता अंदाजपत्रक रक्कम रु. १,४९,९८०/- चे तयारकरून मा. प्रशासक यांनी दि. ०९-०१-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील कामासाठी निविदा सूचना क्र. मनपा/शअ/५८/९५ दि. २०-०२-९५ पर्यंत एकूण चोवीस (२४) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्यांच्या अंतिम तारीख ०८-०३-९५ पर्यंत फक्त नऊ (९) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या व त्याच दिवशी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडल्या असता खालील तुलनात्मकदृष्ट्या गुत्तेदारांनी दिलेले दर खलील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिलरत्न साळवे | ३५.५% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २ | श्री. कुरेश कन्स्ट्रक्शन | ३३% | -//- |
| ३ | श्री. देवराव वाहुळ | ३१% | -//- |
| ४ | श्री. सुर्यवंशी आर. ए. | २५.७५% | -//- |
| ५ | श्री. अब्दुल शालेख | २३.०१% | -//- |
| ६ | श्री. एस. बी. इंगळे | २२.९५% | -//- |
| ७ | श्री. स. फजल्ल हक्क | २१.५०% | -//- |
| ८ | श्री. स. शरिफ | १८% | -//- |
| ९ | श्री. एस. एम. मंडोरे | ९.९% | -//- |

वरील निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.५% कमी दराची निविदा श्री. शिलरत्न साळवे ठेकेदार यांची आहे. सदरील काम १८ खेडी विकास योजनामधून करण्यांचा प्रस्ताव आहे.

विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. प्रकाश निकाळजे :** प्रस्तावित कामांसाठी ३५.५% कमी दराची निविदा आहे. इतक्या कमी दराने कामाचा दर्जा राखला जाईल काय याचा खुलासा व्हावा.

**शहर अभियंता :** प्रस्तावित कामासाठी प्राप्त झालेल्या ३५.५% कमी दराने कामाचा दर्जा योग्य प्रमाणांत राखला जाणार नाही.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** शहरात खडी रस्ते व खांडकी पेव्हींग बरीच कामे चालू आहे, यापैकी अनेक कामांसाठी गुत्तेदाराने कमी दराने निविदा भरल्यामुळे ही कामे बंद पडली आहेत. तेंव्हा प्रस्तावित कामाची निविदा मंजूर करतांना याचाही विचार व्हावा.

**मा. सभापती :** प्रस्तावित कामासाठी पुन्हा निविदा मागविण्यांत याव्या.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तावित कामांकरिता पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावीत.

**विषय क्र. २६ :**

अतिरिक्त शहर अभियंता महानरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहोत की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शहरातील बऱ्याच चौकांचे सौंदर्यीकरणाचे काम हाती

घेतले असून, त्यातीलच एक भाग म्हणून उस्मानपुरा चौकाचे सौंदर्यीकरण पूर्ण होत आहे. परंतु तेथील रस्ता दुभाजकामध्ये श्री. सुरजितसिंग खुंगर यांचे एस.टी.डी.पी.सी.ओ. असून सदरील एस.टी.सी.ओ. पाडण्यांस न्यायालयाचा मनाई हुकूम आहे. परंतु सदरील एस.टी.पी.सी. ओ. हे. रस्ता दुभाजकामधून हलविणे अत्यंत आवश्यक असल्याने त्यांना पूर्वी दिलेल्या जागे इतकीच जागा (८ फुट x १० फुट) कै. विनायकराव पाटील यांचे पुतळ्या जवळील उद्यानात हॉटेल हवेली शेजारी दहा वर्षाचे भाडेपट्ट्याने देणे तसेच महापालिका ठरवील त्या दराने त्यांचेकडून भाडे वसूल करण्यांचे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. हमीद उद्दिन ताबा, श्री. प्रकाश निकाळजे :** प्रस्तावित एस.टी.डी.पी.सी.ओ. ही महापालिकेच्या जागेवर उभारण्यात आली आहे. तरी संबंधित एस.टी.डी.पी.सी.ओ. च्या मालकांनी न्यायालयात धाव घेतली आहे. या एस.टी.डी.पी.सी.ओ. करिता महानगरपालिकेने किती वर्षासाठी जागा दिली हाती. एस.टी.डी.पी.सी.ओ. मालकाने न्यायालयाचा मनाई हुकूम आहे म्हणून काय झाले, महानगरपालिकेतर्फे शहरात अनेक जागा भाड्याने दिल्या जातात. या प्रत्येकांनी मनाई हुकूम आणला तर काय करणार?

**डॉ. विजय कुमार मेहेर :** उस्मानपुरा चौकातील जागा एस.टी.डी.पी.सी.ओ. करिता देणे योग्य होत का? उस्मापुरा येथील चौकातील जागा एस.टी.डी.पी.सी.ओ. का देण्यांत आली याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** उस्मानपुरा येथील चौकात उभारण्यात आलेल्या एस.टी.डी.पी.सी.ओ. धारकांने न्यायालयाकडून मनाई हुकूम आणलेला आहे, या एस. टी. डी. पी. सी. ओ. मुळे सदर भागात अपघात होतात. काही दिवसांपूर्वी राज्य मंत्र्यांच्या गाडीलाही या चौकात अपघात होणार होता. म्हणून पर्यायी जागेचा प्रस्ताव दिला आहे. उस्मानपुरा चौकात एस. टी. डी. पी. सी. ओ. ला जागा दिल्यानंतर चौकांच्या सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने संबंधित एस. टी. डी. पी. सी. ओ. धारकांने जागा विकसित केली आहे.

**डॉ. भागवत कराड, श्री. महादेव सुर्यवंशी :** उस्मानपुरा चौकातील एस. टी. डी. पी. सी. ओ. ला १० वर्षाकरिता पर्यायी जागा भाडेपट्ट्याने देण्यांचा प्रस्ताव आहे त्यऐवजी या एस. टी. डी. पी. सी. ओ. ला ५ पांच वर्षाकरिता भाडेपट्ट्याने जागा देण्यांत यावी.

**श्री. प्रकाश निकाळजे :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे पाच (५) वर्षाकरिता देण्यात येणाऱ्या भाडे पट्ट्याकरिता संबंधिताकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे.

**श्री. अब्दुल रशिद मामू :** उस्मानपुरा चौकातील एस. टी. डी. पी. सी. ओ. पर्यायी जागा देत असतांना या एस. टी. डी. पी. सी. ओ. समारे उभ्या असलेल्या वाहनांमुळे रहदारीस अडथळा आला किंवा अपघात झाल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी एस. टी. डी. पी. सी. ओ. धारकांवर राहिल अशी अट करारनाम्यात नमूद करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा चौकाच्या सौंदर्यीकरणाचे काम पूर्ण होत असून, या चौकाचे दुभाजकामधील श्री. सुरजितसिंग खूंगर यांचे एस. टी. डी. पी. सी. ओ. हलविणे आवश्यक असल्याने कै. विनायकराव पाटील यांचे पुतळ्याजवळील उद्यानात हवेल हॉटेल शेजारी (८ फुट x १० फुट) आकाराची जागा पाच वर्षाच्या भाडेपट्याने तसेच

महानगरपालिका ठरविल त्या दराने भाडे वसूल करण्यांच्या अटीवर देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७ :**

उप आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वित्तीय वर्ष १९९५-९६ साठी महानगरपालिकेच्या हद्दिमध्ये एकूण ८५०० (अंदाजे) मालमत्ता आहेत व या मालमत्तेची मालमत्ता कर देयके व नोटीसेस संगणकाद्वारे तयार करणे आहे. व त्यास अंदाजे रुपये २,२५,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तसेच संगणकाद्वारे पाणी पुरवठा विभागाची देयके तयार करणे आहे. याकरिता अंदाजे रु. १,३७,२८०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. असा एकूण रु. ३,३२,२८०/- खर्च अपेक्षित आहे.

प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. भागवत कराड :** प्रस्तावित केल्याप्रमाणे संगणकाद्वारे देण्यांत येणाऱ्या मालमत्ता व पाणी पट्टीचे बिलाकरिता होणारा खर्च लक्षात घेता याचा रक्कमेत २/३ संगणक खरेदी करता येतील का? याचा विचार व्हावा.

**मा. उप-आयुक्त-२ :** स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे संगणक खरेदी बाबतचा प्रस्ताव दिलेला आहे. यासाठी आवश्यक असणारा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तयार केला जाईल. त्यानंतर सन १९९६-९७ पासून कार्यवाही केली जाईल.

**मा. सभापती :** शहरातील मालमत्ताबाबत नोटीसेस तयार करणे, मालमत्ता कराची देयके अदा करणे, व पाणीपट्टी देयके अदा करणे साठी सुशिक्षित बेकांरातील प्रशिक्षित युवकांकडून संगणक ऑपरेटर या पदासाठी अर्ज मागविण्यात यावे. या उमेदवारांची दैनिक वेतनानवर नेमणूक करण्यात यावी. देयके नोटीसा तयार करण्यांसाठी त्वरित दोन संगणक खरेदी करण्यात यावे. संगणक खरेदी आणि प्रशिक्षित संगणक ऑपरेटर दैनिक वेतनावर नेमण्यासाठी हे सभागृह आजच आपणांस मंजुरी देत आहे.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये मालमत्ता कर आणि पाणीपट्टी यांची वेगवेगळे देयके देण्याची पध्दत आहे. मालमत्ता कर आणि पाणीपट्टी यांचे एकत्रित बिल मालमत्ता धारकास देणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये मालमत्ता कर व पाणीपट्टी यांचे बिल एकत्र देण्याची पध्दत आहे. त्याबाबत बिलाचे आवश्यक नमुने दाखविण्यात आले आहे. त्याबाबत बिलाचे आवश्यक नमुने दाखविण्यात आले आहे. तरी अद्याप त्याबाबत अंमलबजावणी झाली नाही. एखादी मालमत्ता मुळ मालकाने दुसऱ्यांस, दुसऱ्याने तिसऱ्यास, आणि तिसऱ्याने चौथ्या व्यक्तींस विकल्यास मालमत्तेवरील पाणीपट्टीच्या देयकावर मात्र मुळ मालकाचे नांव बदलले जात नाही. या नावाचे पाणीपट्टीच्या देयकावर मात्र मुळे मालकांचे नाव बदलले जात नाही. या नावाचे पाणीपट्टी बाबतचे देयक सामील न झाल्यामुळे थकबाकी तशीच राहते.

**डॉ. वियजकुमार मेहेर :** सिडको भागात फक्त पणी पट्टीची वसूली केली जाते. तेंव्हा स. सभासदांनी सुविलेल्या पध्दतीनुसार मालमत्ता कर आणि पाणीपट्टीचे एकत्र बिल देण्याची पध्दत सिडको भागाकरिता लागू करता येणार नाही.

**मा. सभापती :** पुणे/ठाणे/ मुंबई इत्यादी महानगरपालिकेतून मालमत्ता कर व पाणीपट्टी याबाबतची बिले देण्याची काय पध्दत आहे. याची माहिती घेण्यात यावी व

त्याचप्रमाणे आणि त्या महानगरपालिकेत एकत्रित बिल देण्याची पध्दत असेल तर त्याप्रमाणे शहरातही एकत्रबील देण्याची पध्दत सुरू करावी.

**श्री. रशिदखान मामू :** प्रस्तावित देयकाबाबत शहरात असलेल्या एकूण मालमत्तांची संख्या प्रस्तावित नोंदविण्यात आली आहे. तेंवहा शहरातील एकूण मालमत्ताप्रमाणे शहरात एकूण किती नळ कनेक्शन आहे याची माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती :** संबंधित विभागाने पुढील सभेत माहिती द्यावी.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संगणकाद्वारे मालमत्ता कर, देयके, नोटीसेस व पाणीपट्टीची देयके तयारकरून घेण्याकरिता येणारा खर्च विचारात घेता त्याएवेजी दोन संगणक यंत्र खरेदी करणे आणि दैनिक वेतनांवर चार प्रशिक्षित संगणक ऑपरेटर नेमून मालमत्ता कर, देयके, नोटीसेस आणि पाणीपट्टीची देयके तयार करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. २८ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३(४) अन्वये आयुक्त, महानगरपालिका यांना, महानगरपालिकेच्या सर्व सभांना उदा. सर्वसाधारण सभा, स्थायी समिती विशेष समिती इ. हजर राहून त्यामधील चर्चेत भाग घेण्यांचा अधिकार आहे. तथापी उपरोक्त अधिनियमाचे कलम ४३(५) अन्वये मा. आयुक्त यांचे गैरहजेरीत उप. आयुक्त किंवा सहाय्यक आयुक्त यांना उपरोक्त सभांना हजर राहून त्यामधील चर्चेत भाग घेण्याचा अधिकार प्रदान करणेस्तव स्थायी समितीच्या पूर्व मंजुरीसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३(४) अन्वये मा. आयुक्त, यांचे गैरहजेरीत उप आयुक्त यांना सर्वसाधारण सभा, स्थायी समिती, विशेष समिती इत्यादींना हजर राहुन त्यामधील चर्चेत भाग घेण्याचा अधिकारप्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९ :**

शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वानखेडनगर प्रभागात प्राथमिक शाळा नसल्याकारणाने त्या भागात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण प्रकल्प अंतर्गत १९९५-९६ च्या शैक्षणिक वर्षात प्राथमिक शाळा सुरू करण्याच्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण प्रकल्प अंतर्गत १९९५-९६ च्या शैक्षणिक वर्षात वानखेडेनगर प्रभागात प्राथमिक शाळा सुरू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

या सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापतींनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव, | सभापती, स्थायी समिती, |
| औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद | औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक ०३-०७-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. सोमवार दि.०३-०७-९५ रोजी दुपारी ३.०० मा. सभापती, श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेसे सुरुवात झाली. या सभेस खालील सभासदांसह कार्यालयीन अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अ. रशिदखान (मामू) | सदस्य |
| २) | श्री. सुभाष कच्छवाह | -//- |
| ३) | श्री. डॉ. कराड भागवत | -//- |
| ४) | श्री. गौतम खरात | -//- |
| ५) | सौ. रजनी रमेश जोशी | -//- |
| ६) | श्री. प्रकाश निकाळजे | -//- |
| ७) | श्री. बैनाडे कवरसिंग | -//- |
| ८) | श्री. महंमद मुश्ताक अहमद | -//- |
| ९) | कु. माया लाडवाणी | -//- |
| १०) | श्री. विजयकुमार मेहेर | -//- |
| ११) | श्री. प्रभाकर विधाते | -//- |
| १२) | श्री. महादेव सुर्यवंशी | -//- |
| १३) | सौ. पद्मा शिंदे | -//- |
| १४) | श्री. सुदाम सोनवणे | -//- |
| १५) | श्री. हमीदउद्दिन ताबा | -//- |

**विषय क्र. ३०/१ :**

दिनांक १६-०६-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** दि. १६-०६-९५ च्या सभेत मनपा शिक्षण विभागांतील चर्चेअंतर्गत "एखाद्या" नागरिकांची बदली झाली असेल अशा नागरिकांव्यतिरिक्त इतर नागरिकांच्या पाल्यांना शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र देण्यांबाबतचा आग्रह महापालिका प्रशासनाकडे करू नये" अशा प्रकारची महत्वपूर्ण चर्चा झाली असतांनाही नारेगांव येथे महापालिकेची ७ वी पर्यंतची शाळा आहे. या शाळेत प्राथमिक विभागांकरिता एकच वर्ग (खोली) आहे. या विभागांत किणाऱ्या एका वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या १११ आहे, या १११ विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी एकच शिक्षक नेमलेला आहे. वर्गातील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पुरेसी जागा नाही. १ ली ते ४ थी पर्यंत एकूण ४१८ विद्यार्थी चार (४) वर्ग खोल्य चार शिक्षक आहेत. विद्यार्थी संख्येच्या मानाने शिक्षक व वर्ग (खोल्यंची) संख्या अपुरी आहे. या बाबींचा विचार करता, विद्यार्थी संख्येनुसार आणखी खर खोल्या "वर्ग" व चार शिक्षक यांची व्यवस्था होणे आवश्यक आहे. चार वर्ग "खोल्या" बांधण्यासाठी लागणारा वेळ विचारात

घेता विद्यार्थींची बसण्याची सोय ताबडतोब व्हावी. म्हणून तात्पुरते पत्र्याचे शेड व चार शिक्षक देण्यात यावे.

**शिक्षणाधिकारी :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे नारेगांव शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढली ही गोष्ट खरी आहे. वाढीव विद्यार्थ्याच्या संख्या लक्षात घेता, नविन वर्ग "खोल्या" बांधून देण्याबाबत प्रस्ताव संबंधित विभागाकडे दिला आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** नारेगांव शाळेकरिता आतापर्यंत जे शिक्षक वर्ग बदली करून पाठविण्यात आले ते सर्व शिक्षक नजीकच्या काळात सेवानिवृत्त होतील, असेच पाठविण्यात आले. या वरून जे शिक्षक नजीकच्या काळात सेवानिवृत्त होणार आहे. अशाच शिक्षकांची नारेगांव शाळेत बदली केली जाते. त्यामुळे विद्यार्थ्याच्या शिक्षणावर परिणाम होतो. तेंव्हा असे नजीकच्या काळात सेवानिवृत्त होणारे शिक्षक नारेगांव शाळेवर पाठवून काय उपयोग होतो. याचा विचार व्हावा व चांगले शिक्षक देण्यात यावे. तसेच मिळालेल्या माहितीनुसार महापालिकेकडे जवळ जवळ ३००० पत्रे उपलब्ध असल्याची माहिती मिळाली आहे. यातून नारेगांव शाळेतील विद्यार्थी करिता पत्र्याचे शेड उभारून देण्यात यावेत.

**मा. सभापती :** नारेगांव शाळेच्या विद्यार्थ्याकरिता तात्पुरते शेड उभारून देता येतील काय, याबाबत शहर अभियंता यांनी दिनांक ०४-०७-९५ रोजी पहाणी करावी व शाळेसाठी तात्पुरते शेड उभारून देण्यांची व्यवस्था करावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** बेगमपुरा येथील शाळेच्या एका वर्गात संख्या लक्षात घेता, या शाळेसाठी वर्ग "खोल्या" व शिक्षक वाढवून देण्यांत यावेत.

**मा. सभापती :** प्रशासनातर्फे शिक्षकांच्या पदे भरणेबाबतचा प्रस्तावास अद्याप शासनाची मंजुरी मिळालेली नाही.

**श्री. प्रकाश निकाळजे :** पीरबाजार, उस्मानपुरा, शहाबाजार, ज्युब्लीपार्क या ठिकाणी असलेल्या महानगरपालिकेच्या शालेय इमारतीत शालेय इमारत एकच असली तरी शिफ्टवाईज वेगवेगळ्या नांवाच्या तीन शाळा चालतात. या तीन शाळेसाठी स्वतंत्र्य मुख्याध्यापक देण्यांऐवजी एकाच इमारतीत भरत असलेल्या वेगवेगळ्या तीन शाळा एकत्र करून त्यांच्यासाठी एकच मुख्याध्यापक देण्यांत यावाव शाळेचे नांवही बदलण्यात यावे.

**शिक्षणाधिकारी :** एक इमारत दोन किंवा तीन शाळा ही पध्दत पूर्वी पासून आहे. एकनाथनगर येथे नवीन शाळेची इमारत तयार होत आहे. स. सभासदांचे सुचविल्याप्रमाणे एकाच इमारतीत भरत असलेल्या तीन वेगवेगळ्या शाळा एकत्र करता येतील व या शाळेकरिता एकच मुख्याध्यापक देता येईल. तथापी एका इमारतीत भरत असलेल्या तीन वेगवेगळ्या शाळा एकत्र करून त्यांच्याकरिता एकच मुख्याध्यापक दिल्यास शिल्लक राहिलेल्या प्रत्येक दोन मुख्याध्यापकांची महानगरपालिकेत शिक्षकांची संख्या वाढेल. मात्र शासनाचा शाळा वाढवा, शिक्षण वाढवा असा उपदेश आहे.

**मा. सभापती :** सभासदांच्या सुचनेप्रमाणे शिक्षणाधिकारी यांनी पहाणी करावी.

**श्री. सुदाम सोनवणे :** सिडको भागातील महानगरपालिकेच्या शाळेच्या पहाणी करतांना असे आढळून आले की, मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या प्रशिक्षित उर्दू माध्यमांच्या शाळेवर उर्दू शिक्षक म्हणून नेमणूक केलेली आहे. याबाबत संबंधित शिक्षिकेने बदलीबाबत रितसर अर्जही केले आहे. तेंव्हा याबाबत माहिती द्यावी, याचा खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** स. सभासदांचे सुचविल्याप्रमाणे मराठी माध्यमांच्या शिक्षिकेची उर्दू माध्यमांच्या वर्गावर शिक्षिका म्हणून नेमणूक दोन वर्षापूर्वी झालेली आहे. या प्रकारणी रितसर अर्ज आल्यानंतर शिक्षिकेच्या बदलीचा विचार केला जाईल.

**मा. सभापती :** शिक्षणाधिकारी यांनी वरील प्रमाणे आणखी काही प्रकरणे असतील तर अशा प्रकरणांची तपासणी करून योग्य ठिकाणी संबंधित शिक्षकांच्या बदल्या कराव्यात.

**श्री. कवरसिंग बैनाडे :** एन १२ व एन-९ या शाळांना भेट दिली असता, विद्यार्थ्या बसण्यासाठी देण्यात येणाऱ्या आसनपट्ट्या नाहीत, तसेच शालेय इमारतीत तार कुंपन संरक्षित भिंत नसल्यामुळे मोकाट जनावरे शालेय इमारतीत तारकुंपन संरक्षित भिंत नसल्यामुळे मोकाट जनावरे शालेय प्रांगणात चरतांना दिसून आली. बऱ्याच शाळेत मुलांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. याच शाळेत गेल्या २२ वर्षापासून काम करणार श्री. बहादुरसिंग यांना गेल्या तीन वर्षापासून पगार दिला जात नाही. तेंव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** महानगरपालिका शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची मुलभूत साईवाचून अडचण होता कामा नये, याबाबत "उदा. पाणी पुरवठा विभाग, विद्युत विभाग, भांडार विभाग इ." संबंधित विभागाने महानगरपालिकेच्या शाळेची पहाणी करून विद्यार्थ्यांना त्वरित मुलभूत सोई उपलब्ध करून देण्यांची व्यवस्था करावी.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** ज्युबलीपार्क येथील महानगरपालिका शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यापैकी बरेच विद्यार्थी खाजगी कामे करून शिक्षण घेत आहेत. अशा विद्यार्थ्यांना शाळेची वेळ सोईची व्हावी म्हणून ज्युबली पार्क शाळेच्या वेळेत बदल करण्यात यावा. त्याबाबत रितसर पत्रही दिले आहे. तसेच १६-०६-९५ च्या सभेतील चर्चेनुसार शिक्षण विभागाकरिता मिळणाऱ्या शासकीय अनुदानाबाबतचा खुलासा व्हावा. फर्निचर बाबत किती अनुदान मिळाले याबाबत खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** फर्निचरसाठी स्वंतत्र अनुदान मिळत नाही. महानगरपालिका शिक्षणाबाबत जो खर्च करते, त्यावर शासनाकडून अनुदान मिळते. झालेल्या खर्चाबाबत शासनाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. प्राप्त अनुदानाची अद्याप पडताळणी झालेली नाही. आतापर्यंत एक कोटी अनुदान मिळालेले आहे.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार जमा खर्चाबाबत अहवाल मुख्य लेखा परिक्षक यांनी स्थायी समितीसमोर मांडावा असा नियम आहे. अद्याप अशा प्रकारचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

**मा. मुख्य लेखापरिक्षक :** आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीने अशा प्रकारचा अहवाल महिन्यातून एकदा दाखल करण्याची कृपया परवानगी द्यावी.

**मा. सभापती :** मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी जमा खर्चाबाबतचा अहवाल प्रत्येक महिण्याला स्थायी समिती समोर मांडावा.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** दि. १६-०६-९५ च्या सभेत तीन वॉर्डाकरिता एकच भव्य शालेय इमारत याप्रमाणे प्रोग्राम तयार करण्यात येणार आहे. महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या १८ खेड्यापासूनचे अंतर लक्षांत घेता ही योजना शहरापुरतीच मर्यादित ठेवावी.

**मा. सभापती :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे तीन वॉर्डकरिता एकच भव्य शालेय इमारत ही योजना औरंगाबाद शहरापुरतीच मर्यादित ठेवण्यात यावी.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** दि. १६-०६-९५ च्या सभेतील चर्चेनुसार मालमत्ता कर व पाणीपट्टी यांची एकत्रित बील देण्याबाबत काय कार्यवाही झाली.

**मा.उप आयुक्त-१ :** सभागृहातील चर्चेनुसार मालमत्ता कर व पाणीपट्टी यांची देयके देण्याची काय पध्दत आहे, याबाबत ठाणे, पुणे, नाशिक महानगरपालिकांना पत्रे देण्यात आली आहेत. अद्याप खुलासा प्राप्त झाला नाही.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** दि. १६-०६-९५ च्या सभेत ठराव क्र. २७ अन्वये दोन (२) संगणक खरेदी करण्यास मंजुरी देण्यांत आली आहे. तथापी दिनांक ०९-०६-९५ च्या सभेत प्रकल्प विभागांतर्फे मांडण्यात आलेल्या प्रस्तावानुसार महापालिकेच्या ६१ विविध विभागांच्या कामाकरिता तीन संगणक खरेउदी करण्यांकरिता रक्कम रुपये ५,५२,०००/- खर्चास मान्यता देण्यांत आलेली आहे. दि. १६-०६-९५ च्या प्रस्तावाद्वारे पाणी पट्टीची देयके तयार करून घेण्याच्या खर्चास मान्यता देण्यांचा प्रस्ताव सभागृहापुढे होता. या दोन्ही बाबींचा विचार करून दोन संगणक खरेदी बाबतचा ठराव क्र. २७ रद्य करण्यात यावा.

**मा. सभापती :** दि. १६-०६-९५ च्या सभेत पाणीपट्टी देयके संगणकाद्वारे छपाईसाठी येणारा ३,६२,०००/- हजाराचा खर्च लक्षात घेऊन या खर्चाच्या रकमेत दोन सं णक खरेदी करण्यांचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. संगणकाद्वारे पाणीपट्टीची बिले छपाई करून घेण्याबाबतचा व्यर्थ खर्च यापुढे थांबेल.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** दि. १६-०६-९५ च्या सभेत शहरातील एकूण मालमत्ता व नळ कनेक्शन किती याबाबतची माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता :** औरंगाबाद शहर व सिडको मिळून एकुण ५५,८०४ नळ कनेक्शन आहेत. यापैकी शहर भागात ३०९९३ आणि सिडको भागात २४,८१८ नळ कनेक्शन आहेत.

**श्री. हमीद उद्दिन ताबा :** औरंगाबाद शहरात लाखांच्यावर मालमत्ता असते. सभागृहात नळ कनेक्शनच्या संख्येबाबत केलेला खुलासा लक्षात घेता उर्वरित नागरिक सार्वजनिक नळावरून पाणी भरतात काय याचा खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त-२ :** औरंगाबाद शहरात ८५ हजाराच्या वर मालमत्ता आहेत. यात दिवसेंदिवस होणाऱ्या बांधकामामुळे वाढ होऊ शकते.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** सभागृहात खुलसा केल्या्रपमाणे ८५ हजार मालमत्तेपैकी शहरी भागातील मालमत्ता किती व सिडको भागातील मालमत्ता किती याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** मा. उप आयुक्त -२ यांनी पुढील सभेत शहर भागातील व स्लम भागातील मालमत्ता किती याबाबत माहिती द्यावी.

**सौ. पदमा शिंदे :** सिडको भागातीील बऱ्याच नळांना २४ तास पाणी असते व काही नळांना कमी प्रमाणात पाणी येते. महापालिकेतर्फे पुरविण्यांत आलेले सार्वजनिक नळ नागरिकांनी घरात घतले आहे. माझ्या माहितीप्रमाणे असे ५६ अनाधिकृत नळ आहे.

**श्री. विजयकुमार मेहेर :** सिडको भागातीील नागरिकांनी नळ कनेक्शनची मागणी केली असता, अशा नागरिकांना मालमत्ता कर भरण्यांचा आग्रह धरला जातो. सिडको भागातील मालमत्ता कराबाबत अद्याप निर्णय झालेला नाही, तेंव्हा नळ कनेक्शन देतांना टाकण्यात येणारी मालमत्ता कराची अट रद्द करण्यांत यावी.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी ५६ अनधिकृत नळांबाबत पाहणी करावी व चौकशी करून अहवाल द्यावा.

**श्री. कवंरसिंग बैनाडे :** सिडको भागातील विविध सेक्टरंना वेगवेगळ्या वेळी पाणी पुरवठा केला जातो, तेंव्हा पाण्याची वेळ बदलून देण्यांत यावी.

**मा. सभापती :** पाणी पुरवठा व्यवस्थेसाठी आणखी तीन चार टाक्याचे काम पूर्ण होत आले आहे. या टाक्याचे काम संपूर्णतः पूर्ण झाल्यावर शहरात एकाच वेळी सर्व ठिकाणी पाणी पुरवठा करता येईल काय? अशी व्यवस्था केली जाईल.

**कार्यकारी अभियंता :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे टाक्याचे बांधकाम चालू असतांना फत्तेपुरा भागात बांधण्यास आलेल्या पाण्याच्या टाकीकरिता २७ मीटर पाईप लाईन टाकण्यांचे काम बाकी आहे. या कामाकरिता या भागातील एका नागरिकांने न्यायालयाकडून मनाई हुकूम आणला आहे. त्यामुळे पाणी पुरवठ्याच्या कामात थोडा विलंब लागण्यांची शक्यता आहे.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** महापालिका प्रशासनाने अनधिकृत नळ शोधून काढण्याकरिता मोहिम हाती घेतली होती, या मोहिमे अंतर्गत झालेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात यावी.

**कार्यकारी अभियंता :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे पुढील सभेत माहिती देण्यांत येईल.

**सौ. रजनी जोशी :** सिडकोतील सेक्टरच्या सहा घरांनी एकाच वेळी नळ कनेक्शन घेतले तर पाणी देण्यात येते. अशी माहिती नळ धारकांना देण्यात येते. या सहा घरापैकी चार घरांकडून नळ कनेक्शन बाबत फी वसूल करण्यात आली आहे. जर सहा घरांनी एकाच वेळी नळ कनेक्शन घेतले तरच पाणी मिळते. असा नियम असतांना चार मालमत्ताधारकांकडून नळ कनेक्शन बाबत सहा महिण्या अगोदर पैसे का वसूल करण्यात आले याचा खुलासा व्हावा.

**जलगृह अभियंता-२ :** स. सभासदाच्या सुचनेप्रमाणे पहाणी करून कार्यवाही करता येईल.

**डॉ. भागवत कराड, श्री. विजयकुमार मेहेर :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलमान्वये निविदा उघडतांना स्थायी समितीचे दोन सदस्यांच्या समक्ष कामांच्या निविदा उघडण्यांत याव्या, असा नियम आहे. याबाबत दिनांक १६-०६-९५ च्या सभेत चर्चाही झाली होती, या चर्चेनुसार सभासंदाची निवड करावी.

**मा. सभापती :** सभागृहाच्या माहितीसाठी खुलासा करण्यांत येतो की, महापालिकेच्या कामासाठी असलेल्या निविदा मा. मुख्य लेख परिक्षक यांच्यासमोर उघडल्या जातात. तेव्हा निविदा उघडतांना स्थायी समितीच्या दोन सदस्यासमोर निविदा उघडण्यांची आवश्यकात वाटत नाही. उघडलेल्या निविदावर ज्या मक्तेदारांस काम मिळाले आहे, त्या मक्तेदारातर्फे करून घेण्यात येणाऱ्या कारनाम्यावर सहकार्य म्हणून स्थायी सिमतीच्या दोन स. सभासदांच्या पूर्वीप्रमाणे संबंधित विभागानी सह्या घेत जाव्या.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. १६-०६-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३१ :**

औरंगाबाद शहरातील सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीकोणातून खाली दिलेल्या विवरणानुसार कार्यालयास एकूण २०० नग कचरा कुंड्या खरेदी करणे आहे. यापूर्वी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या व

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर असलेल्या निविदा धारकास आदेश क्र. मनपा/भांडार/६०७/९४ दि. ३०-११-९४ नुसार १५० नग कचरा कुंड्या पुरवझा करणेस आदेशित करण्यांत आले होते. व त्यानुसार त्यांनी पुरवठा केलेल्या आहेत.

करिता २०० नग कचरा कुंड्या खरेदीस वरीलप्रमाणे मागविण्यात आलेल्या दरात रु. ७५०/- प्रति नग प्रमाणे एकूण रु. १,५०,०००/- खर्च येईल कचरा कुंडीचे विवरण -९०० एमएम ०.०८३ मिटर लांबीच्या आर. सी. सी. कचरा कुडी, दोन्ही बाजुने उघडी.

करिता रु. १,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** प्रस्तुत प्रस्तावात कोणत्या एजन्सीकडून कचरा कुंड्या घेण्यात येणार आहे, याचा उल्लेख नाही. या कामासाठी दरपत्रके का मागविण्यात येत नाही. जुन्याच दराने कचरा कुंड्या खरेदी करण्यांची आवश्यकता काय, याचा खुलासा व्हावा.

**मा. मुख्य लेखा परिक्षक :** प्रस्तुत प्रस्तावाच्या संचिकेची पहाणी केली असता, यापूर्वी योग सिमेंट या कंपनीकडून कचरा कुंड्या घेण्यात आल्या आहेत.

**श्री. हमीदउद्दिन ताबा, श्री. प्रकाश निकाळजे :** कचरा कुंड्या खरेदीसाठी दरपत्रके मागविण्यांत यावी. तसेच मुंबई, पुणे महानगरपालिका धर्तीवर सिमेंट कुंड्याऐवजी बांधवी कचरा कुंड्या तयार करून देण्यांत याव्यात. मुंबई, पुणे, महानगरपालिकेला अशीच पध्दत आहे.

**मा. सभापती :** प्रशासनातर्फे कचरा कुंड्या खरेदी करण्यांच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणेबाबतचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. तथापी औरंगाबाद शहरात ज्या ठिकाणी जोची अडचण नसेल अशा ठिकाणी मुंबई, पुणे महापालिकेच्या धर्तीवर बांधीव कचरा कुंड्या उभारण्यांची संबंधित विभागाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीकोणातून २०० नग कचराकुंड्या खरेदी करण्यांस प्रति नग रुपये ७५०/- या प्रमाणे एकूण र. रु. १,५०,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३२/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या बांधकामासाठी वेगवेगळ्या व्यासाचे पिळदार लोखंडाची अत्यंत गरज आहे. त्या आधारे सर्व विभागाची मागणी लक्षात घेता एकूण १६० मे. टन लोखंडाची खरेदी करावे लागेल.

त्याकरिता सन १९९२-९३ च्या दर सुचिप्रमाणे अंदाजपत्रक रुपये २७,००,०००=०० (सत्तावीस लाख रुपये) चे तयार करण्यांत आले व त्यास मा. आयुत्त साहेबांनी दि. ३१-०५-९५ रोजी मान्यता दिलेली आहे. आवश्यक असलेले वेगवेगळ्या व्यासाची लोखंड खालीलप्रमाणे खरेदी करणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ६ एम एम | ७ मे. टन |
| २. | ८ एम एम | २४ मे. टन |
| ३. | १० एम एम | २२ मे. टन |
| ४. | १२ एम एम | ३६ मे. टन |
| ५. | १६ एम एम | ३६ मे. टन |

| | | |
|---|---|---|
| ६. | २० एम एम | २२ मे. टन |
| ७. | २५ एम एम | १३ मे. टन |

तरी वरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. भागवत कराड :** स्थानिक बाजारात लोखंडाबाबतचे दर दररोज बदलतात तेंव्हा स्थानिक विक्रेत्याकडून कार्यालयांस लागणारे लोखंड खरेदी करण्याऐवजी औरंगाबाद, जालना या ठिकाणच्या ज्या मील आहे, अशा मीलकडून टेंडर मागविण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या बांधकामासाठी आवश्यक असलेल्या वेगवेगळ्या व्यासाचे "खालील दर्शविल्याप्रमाणे-१६० मे. टन पिळदार लोखंड खरेदी करण्यांस रक्कम रुपये २७,००,०००=०० (सत्तावीस लाख) च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते."

| | | |
|---|---|---|
| १. | ६ एम एम | ७ मे. टन |
| २. | ८ एम एम | २४ मे. टन |
| ३. | १० एम एम | २२ मे. टन |
| ४. | १२ एम एम | ३६ मे. टन |
| ५. | १६ एम एम | ३६ मे. टन |
| ६. | २० एम एम | २२ मे. टन |
| ७. | २५ एम एम | १३ मे. टन |

तरी वरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र. ३३/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मो. मुकूंदवाडी (पूर्व) येथे नविन खांडकी पेव्हींग करणे करिता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,७४,१००/- चे तयार करून मा. प्रशासक यांनी दि. ०५-०४-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

मा. प्रशासक यांच्या मंजुरीनुसार सदरील कामाची निविदा सुचना क्र. मनपा/मुलेप/२/९५ दि. २०-०५-९५ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. २५-०५-९५ पर्यंत एकूण २६ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्यांच्या अंतिम तारखेस ३१-०५-९५ रोजी फक्त ७ निविदा प्राप्त झाल्या व दि. ३१-०५-९५ रोजी मा. मुख्य लेखा परिक्षक व उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता, तुलनात्मकदृष्ट्या गुत्तेदरांची दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आर. बी. चव्हाण | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% कमी |
| २) | श्री. एस. बी. इंगळे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.९५% कमी |
| ३) | श्री. डी. सी. पंजाबी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.३६% कमी |

| | | |
|---|---|---|
| ४) | श्री. सलीम पटेल | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९% कमी |
| ५) | श्री. जयश्री कन्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.६९% कमी |
| ६) | श्री. आर. एल बारवाल | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी |
| ७) | श्री. प्रकाश तिपुळे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी |

वरील निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराची निविदा श्री. आर. बी. चव्हाण यांची असून सदरील काम १८ खेडी विकास योजना अंतर्गत करण्यांचा प्रस्ताव आहे. विचारार्थ सादर.

**संवाद :**

**डॉ. भागवत कराड :** प्रस्तावित कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांचे दर लक्षांत घेता. एखद्या कामांचे अंदाजपत्रक तयार करतांना "उदा. क्रांतीचौक ते पैठणगेट रोडचे काम" विशेष काळजी घ्यावी. प्रस्तावित कामांसाठी २५% कमी दराची निविदा आली आहे, म्हणजेच काम योग्य होणार नाही, किंवा प्रशासनाने तयार केलेले अंदाजपत्रक चुकीचे आहे. असे वाटते.

**शहर अभियंता :** कामाचे अंदाजपत्रक तयार कतांना डी.एस.आर. दराच्या दरसूचीप्रमाणे अंदाजपत्रक तयार केले जाते. तथापी ज्या भागांत काम असेल (उदा. स्लम भागांतील लहान गल्ल्या अथवा मेन रोड) या धारकाप्रमाणे कमी जास्त दराची निविदा प्राप्त होते. वस्तुत: महानगरपालिकेच्या कामाबाबत प्रसिध्दीही चांगली दिली जाते.

**श्री. हमीद उद्दिन ताबा :** प्रस्तुत कामांसाठी पुन्हा निविदा मागविण्यात याव्या.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** महापालिकेतर्फे शहरात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर कामे चालू आहे. मागील सभेत सुचविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे खहरात चालू असलेल्या विविध कामांचा दर्जा राखण्यासाठी क्वालिटी कन्ट्रोल कार्यालयातील एखादा अधिकारी अथवा कर्मचारी नेमता येईल काय, त्यासाठी किती खर्च लागल याचा खुलासा व्हावा.

**शहर अभियंता :** महापालिकेतर्फे शहरात चालू असलेल्या कामांच्या दर्जा अथवा बांधकाम साहित्याबाबत शंका असल्यास त्याची प्रयोगशाळेतून चाचणी करून घेतली जाते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावित कामांसाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३४/५ :**

नगर सचिव यांनी प्रस्ताव सादर केला की, मा. उप महापौर यांच्या रमानगर येथील निवास्थानी महानगरपालिकेतर्फे दूरध्वनी व्यवस्था करण्यात आलेली आहे. मा. उप महापौर यांनी कार्यालयीन कामाकरिता बाहेरगांवी तसेच मा. मंत्र्यांशी संपर्क साधावा लागतो. परंतु महानगरपालिकेतर्फे देण्यात आलेल्या सदरील दूरध्वनी क्रमांक ३३४९११ वर एस.टी.डी. सुविधा देण्यात आलेल्या सदरील दूरध्वनी क्रमांक ३३४९११ वर एस.टी.डी. सुविधा पुरविण्यांत आलेली नसल्यामुळे बाहेरगांवी संपर्क साधता येत नाही. त्यामुळे कार्यालयीन कामास विलंब होतो. त्याकरिता मा. उप महापौर यांनी त्यांच्या रमानगर येथील निवास्थानी असलेल्या महानगरपालिकेच्या दूरध्वनी क्रमांक ३३४९११ वर एस.टी.डी. सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**डॉ. भागवत कराड :** महापालिकेचे मा. महापौर, मा. उप महापौर व मा. स्थायी समिती सभापती हे मान्यवर पदाधिकारी आहेत. या पदाधिकाऱ्यांकरिता एस.टी.डी. सवलत असणे आवश्यक आहे. उक्त पदाधिकाऱ्यांना, आवश्यक कामानिमित्त संपर्क साधाण्यांसाठी एस.टी.डी. सवलत असणे आवश्यक आहे.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. उप महापौर यांच्या निवास्थानी असलेल्या दूरध्वनीवर एस.टी.डी. सवलत देण्यांस हरकत नाही. तथापी खर्चाचे बंधन पाडण्यात यावे. किंवा त्यावर नियंत्रण ठेवावे.

**मा. मुख्य लेखा परिक्षक :** सभागृहात सुचविल्याप्रमाणे निवास्थानी असलेल्या दूरध्वनीकरिता एस. टी. डी. सवलत देतांना निर्बंध घालण्याची सुचना योग्य आहे. निवासी फोनवर निर्बंध आवश्यक वाटतात. जिल्हा परिषद अध्यक्षांसाठी शासनाने दोन हजाराचे निर्बंध घालेले आहेत.

**मा. सभापती :** मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी पुढील सभेत सविस्तर माहिती द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मा. उप. महापौरांनी कार्यालयीन कामाकरिता बाहेरगांवी तसेच मा. मंत्र्यांशी संपर्क साधावा लागत असल्यामुळे, रमानगर येथील मा. उप महापौर यांच्या निवास्थानी असलेल्या दूरध्वनी क्र. ३३४९११ करिता एस.टी.डी. सवलत उपलब्ध करून देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५/६ :**

नगर सचिव यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सूल स्मशान भूमीच्या खुल्या जागेवर रेस्टींग शेड, तार कंम्पाऊंड करणेबाबत कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९२-९३ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु. २,१०,६२०/ चे तयार करण्यांत आले. त्या मा. आयुक्त (पूर्वीचे प्रशासक) साहेब यांनी मंजुरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने सदर कामाचे बी"-१ नमुन्यात निविदा मागविण्याकरिता पत्र जा.क्र.मनपा/मुलेप/६१/९५ दि. २७-०३-९५ द्वारे शहरातील दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यांत आले. विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण ९ (नऊ) विकल्या गेल्याव स्विकारण्यांच्या तारखेपर्यंत दर भरून सील बंद पाकीटात एक निविदा प्राप्त झाली. सदरील निविदा दिनांक १९-०४-९५ रोजी मुख्य लेखा परिक्षक यांच्या दालनांत उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले. त्यात दिलेले दराचे खालील प्रमाणे.

| अ.क्र. | एजन्सी | दिलेले दर |
|---|---|---|
| १) | सय्यद अथर अली | अंदाजपत्रकीय दराचे दर |

सदर कामाचे आलेले दर मा. आयुक्त यांच्याकडे मंजुरीस्ताव सादर करण्यांत आले होते. त्यावर मा. आयुकत यांनी सदर कामाचे टेंडर रिकॉल का? करण्यांत येऊ नये अशी तजविज केली. यावर श्री. सय्यद अथर अली यांना मा. आयुक्त यांना अर्जाद्वारे विनंती केली की, सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने करण्यांचे लेखी दिले. त्यावर मा. आयुक्त यांनी चर्चा करावे अशी तजवि केली.

या अनुषंगाने पुन्हा मा. आयुक्त यांच्याकडे संचिका सादर करण्यांत आले. त्यास मा. आयुक्त यांनी ३% कमी दराने काम करून घेण्यांस मंजुरी दिली आहे.

सदर खर्च स्मशानभूमी या तरतूदीमधून करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. प्रभाकर विधाते, श्री. प्रकाश निकाळजे, डॉ. भागवत कराड :** तार फेन्सींग केल्यास वायर व लोखंडी पोल चोरीला जातात, महानगरपालिका प्रशासनातर्फे रमानगर भागात असेच तार फेन्सींगचे काम करण्यांत आले होते. आज त्या ठिकाणची तार फेन्सींगचे वायर व लोखंडी खंबे तोडून नेली आहे. तेंव्हा दोन लोखंडाऐवजी चार लाख रुपये झाले तरी चालतील. हर्सूल स्मशान भूमीच्या जागेवर तार फेन्सींगऐवजी संरक्षित भिंत बांधण्यांच्या कामास मंजुरी देण्यात यावी.

**मा. सभापती :** प्रस्तुत कामांमध्ये तार फेन्सींगच्या कामाचा खर्च किती व संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी किती खर्च येईल याचा शहर अभियंता यांनी अवाल द्यावा.

**शहर अभियंता :** हर्सूल स्मशान भूमीच्या जागेत तार कुंपन करण्याच्या कामासाठी रुपये ३७,०००/- चा खर्च गृहित धरण्यांत आलेला आहे. सरंक्षित भिंत बांधण्यास या कामासाठी अंदाजे रुपये ४/५ पट जास्त इतका खर्च येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सूल स्मशान भूमीच्या खुल्या जागेवर रेस्टींग शेड, तार कंम्पाऊंड करण्यांच्या कामासाठी मंजुरी देण्यात येते. गुत्तेदार श्री. सय्द अथर अली यांच्या विनंती अर्जानुसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो. बनेवाडी गांवात डाबंरी रस्ते तयार करणे करिता एकूण रक्कम रु. १,४५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून मा. आयुक्त साहेबांनी दि. २५-०५-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेचे सन १९९५-९६ चे अर्थसंकल्पात झोपडपट्टी सुधारण कार्यक्रमांतर्गत डांबरी रस्ते या शिर्षातर्गत एक कोटीची तरतूद केलेली आहे. करिता प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बनेवाडी गांवात डाबंरी रस्ते तयार करण्यांच्या कामाकरिता रक्कम रु. १,४५,००० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. सदर काम १९९५-९६ च्या झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमांतर्गत डांबरी रस्ते या शिर्षकातून करण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७/८ :**

शिक्षणाधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या कक्षेतील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश देण्याबाबत नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशन मुंबई यांच्याकडून गणवेषात कापड खरेदी करण्यांबाबत ठराव क्र.

३५६ दि. २८-०४-९५ अन्वये ठरले व त्यानुसार पुरवठा आदेशही देण्यात आला. परंतु एन.टी.सी कडे शर्टींगचे ९१ से. मी. वेथचे कापड शिल्लक नसल्याने ११२ से. मी. वेथचे कापड शिल्लक आहे. ११२ से. मी. वोच्यिा कापडाचा दर २८ रु. असा होता. कापडाचे भाव वेगळे असले तरी कापडाची प्रत सारखी असून त्याच किंमतीत कापड मिळणार आहे.

११२ से. मी. पन्हा (वेथ) असलेले रु. ३५/- प्रति मिटर किंमतीचे कापड खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** प्रस्तुतच्या प्रस्तावात अंदाजपत्रकीय रकमेत किती कापड घेण्यात येणार आहे. याचा उल्लेख नाही.

**शिक्षणाधिकारी :** ९१ से. मी. रुंदीच्या पन्हयाप्रमाणे १२००० मीटर कापड खरेदीचा प्रस्ताव होता. तथापी ९१ से. मी. रुंदीच्या पन्ह्याचे कापड शिल्लक नसल्यामुळे ११२ से. मी. पन्ह्याचे ९००० से. मी. कापड घ्यावे लागेल. यामुळे अंदाजपत्रकी रक्कमेत फरक होत नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या कक्षेतील प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना गणवेष वाट्यासाठी लागणारे कापड ११२ से. मी. वेथच्या कापडाकरिता प्रति मीटर रुपये ३५/- या दराने ९००० मीटर गणवेषाचे कापड नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशन मुंबई यांच्याकडून खरेदी करण्यांसाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३८/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो. नारेगांव येथील नविन खांडकी पेव्हींग करणेव अस्तित्वात असलेली खांडकी पेव्हींग दुरुस्त करण्यांकरिता अंदाजपत्रक र. रु. ४,७०,१८०/- चे तयार करण्यांत आले असून, मा. प्रशासक यांनी दि. ०७-०४-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून, सदरील कामासाठी निविदा सूचना क्र. मनपा/मुलेप/२/९५ दि. २०-०५-९५ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता, निविदांची अंतिम दि. २५-०५-९५ पर्यंत एकूण सव्वीस निविदा विकल्या गेल्या व स्विकाण्याच्या अंतिम तारीख दि. २९-०५-९५ रोजी फक्त दोन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या व त्या दिवशी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडल्या असता तुलनात्मकदृष्ट्या गुत्तेदाराने दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. रुबी कन्स्ट्रक्शन | ०.२% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २) | मे. पारस कन्स्ट्रक्शन | २% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |

वरील निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या व अंदाजपत्रक दरापेक्षा ०.२% कमी दराची निविदा मे. रुबी कन्स्ट्रक्शन यांची असून सदरील काम १८ खेडी विकास योजना मधून करण्यांचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यप्रमाणे मो. नारेगांव येथील येथील अस्तित्वात असलेली खांडकी पेव्हींग दुरुस्ती करणे व नविन खांडकी पेव्हींग करण्यांच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.२% कमी दराच्या मे. रुबी कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९/१० :**

एन-५ गुलमोहर कॉलनी व एन -६ मथुरानगर येथे नविन जलवाहिनी टाकण्यांच्या कामासाठी रु. १२,७३,२३८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. सदरील अंदाजपत्रकीय रकमेस ठराव क्र. ३४६/- दिनांक २८-०४-९५ अन्वये मंजुरी मिळालेली होती. त्या अनुषंगाने स्थानिक वर्तमान पत्रात निविदा मागविण्यात आल्या. त्यामध्ये निविदा विक्रीच्या शेवटच्या तारखेपर्यंत २५-०५-९५ पर्यंत एकुण १७ निविदा विकण्यात आल्या आणि सिलबंद निविदा स्विकारण्यांच्या अंतिम तारखेला एकूण २ निविदा श्री. आर. एल. बारवाल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची होती.

परंतु सदरील दर जास्त असल्यामुळे संबंधित गुत्तेदार श्री. आर. एल. बारवाल यांना पत्र देऊन वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते, त्यानुसार दि. २३-०६-९५ ला दराची वाटाघाटी घेऊन सदरील काम अंदाजपत्रकीय दरराने करावयास तयार असल्याचे गुत्तेदार यांनी मान्य केले, त्या अनुषंगाने आर. एल. बारवाल यांचची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजूर करण्यांत आलेली आहे. तरी प्रसताव पुढील कार्यवाहीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. विजयकुमार मेहेर :** प्रस्तुत कामासाठी प्राप्त झालेली निविदाधारकांशी झालेल्या वाटघाटीनुसार निविदा दर कमी केलेले आहे. म्हणजेच कमी दराची निविदा मंजूर करणे योग्य होणार नाही. विद्यानगर भागात ड्रेनेज कामाची पहाणी केली असता, भारतीय मानद ब्युरो "आयएसआय" मार्कचे फुटलेले पाईप कामांसाठी वापरण्यांत येत असल्याची दिसून आलेली आहे. त्याबाबतचे फोटोग्राफही घेतले आहे. तेंव्हा या बाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** सभागृहाने मंजूर केलेल्या कामावर स. सभासदांनी सुविल्याप्रमाणे निकृष्ट दर्जाचे बांधकाम साहित्य वापरण्यात येत असेल तर अथवा कामाची प्रतवारी निकृष्ट दर्जाची आहे असे आढळून आल्यास संबंधित कामातील उप अभियंता, व कनिष्ठ अभियंता यांना जबाबदार धरण्यात येईल.

**मा. महादेव सुर्यवंशी :** पाणी पुरवठ्याच्या ए. सी. लाईवर कोणतीही सहजगत्या नळ कनेक्शन घेऊ शकतो. ए. सी. पाईपाऐवजी सी.आय. पाईप वापरले तर सहजगत्या नळ कनेक्श घेता येत नाही. तेंव्हा पस्तुतच्या कामांसाठी ए.सी.पाईप वापरणे ऐवजी सी.आय. पाईप टाकणे योग्य होईल. पर्यायाने अनधिकृत नळ कनेक्शनला आळा बसेल.

**श्री. गौतम खरात :** सिडको भागात टाकण्यांत येणाऱ्या जलवाहिन्याच्या कामासाठी येणारा खर्च कोणातर्फे केला जातो. याबाबत सिडकोकडून अदाई केली जाते का?

**मा. सभापती :** सिडको भागात टाकण्यात आलेल्या जलवाहिन्यांच्या कामासाठी महापालिकेत सिडकोकडून खर्च दिला जातो.

**कार्यकारी अभियंता :** मुख्य जलवाहिनी टाकावयाची असेल तर सी.आय. पाईप लाइरन टाकण्यांची सूचना केली आहे, पाणी पुरवठ्याच्या कामी महानगरपालिकेची ८ कोटी रक्कमेचा तोटा सहन करावा लागतो. तेंव्हा सभासदांनी ए.सी.पाईप लाईनऐवजी सी.आय. पाईप लाईन टाकणे, यावर चर्चा न करता महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यांचा विचार व्हावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-५ गुलमोहर कॉलनी व एन -६ मथुरानगर येथे नविन जलवाहिनी टाकण्यांच्या कामाकरिता गुत्तेदार श्री. आर. एल. बारवाल यांचेशी दि. २३-०६-

९५ रोजी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधितामार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०/११ :**

एन-७ एफ आयोध्यानगर एन-१३ सी. सेक्टर या भागात नविन जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रु. १९,६९,८३३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. सदरील अंदाजपत्रकास ठराव क्रमांक ३०९ दि. २८-०४-९५ अन्वये मंजुरी मिळालेली होती. त्या अनुषंगाने स्थानिक वृत्तमान पत्रात निविदा मागविण्यात आल्या, त्यामध्ये निविदा विक्रीच्या शेवटच्या तारखेपर्यंत २५-०५-९५ पर्यंत एकूण १४ निविदा विक्री झाल्या आणि सिलबंद निविदा स्विकारण्यांच्या अंतिम तारखेला एक निविदि प्राप्त झाली. सदरील निविदा अंदजपत्रकाच्या दरापेक्षा ५% जास्त दराने श्री. अब्दुल सलाम यांी होती. परंतु दर जास्त असल्यामुळे संबधित गुत्तेदार श्री. अब्दुल सलाम यांना पत्र देऊन वाटाघाटीसाठी बोलाविण्यांत आले होते. त्यानुसार दिनांक २३-०६-९५ रोजी वाटाघाटी होऊन सदरील काम गुत्तेदार यांनी अंदाजपत्रकीय दराने करावयास मान्य केले. त्या अनुषंगाने श्री. अब्दुल सलाम यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे.

तरी सदरील प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. भागवत कराड :** प्रस्तुत प्रस्तावित कामांसाठी विक्री झालेल्या १४ निविदापैकी एकच निविदा प्राप्त झाली आहे. या निविदा धारकांशी निविदा दराबाबत वाटाघाटी झाल्याचे दिसून येते. तेंव्हा प्रस्तुतच्या कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविले तर काय हरकत आहे. निविदाधारक निविदाबाबत साखळी करून निविदा भरतात व कामे वाटून घेतात नविन नागरिकांना संधी देण्यात यावी. प्रस्तुत कामासाठी लघु निविदेद्वारे पुन्हा दरपत्रके मागविणे योग्य होईल.

**श्री. प्रकाश निकाळजे, श्री. सुदाम सोनवणे, श्री. कवरसिंग बैनाडे :** सिडको भागातील नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न आहे तेंव्हा प्रस्तुत कामांच्या निविदेस मंजुरी देण्यात यावी.

**श्री. गौतम खरात :** साखळी पध्दतीच्या निविदा भरण्यांमध्ये अधिकाऱ्यांचे काही नातेवाईक आहे. त्यामुळे विशिष्ट व्यक्तींना टेंडर दिले जाते. यावर लक्ष देणे आवश्यक आहे. सूचना करूनही याबाबत लक्ष देण्यांत येत नसेल तर सभागृहात बसून काय उपयोग पुढील सभेत याबाबत खुलासा करता येईल. प्रस्तुतच्या कामाच्या निविदेत जाहिरपूर्वक साखळी झाली आहे, असे दिसून येते.

**मा. सभापती :** प्रस्तुत प्रस्तावित कामांकरिता पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावेत.

**ठराव :**

प्रस्तावित कामांसाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव, | सभापती, स्थायी समिती, |
| औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद | औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**सोमवार दिनांक १०-०७-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेसे सुरुवात झाली. या सभेस खालील स. सभासदांसह कार्यालयीन अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अ. रशिदखान (मामू) | सदस्य |
| २) | श्री. सुभाष कच्छवाह | -//- |
| ३) | श्री. डॉ. कराड भागवत | -//- |
| ४) | श्री. गौतम खरात | -//- |
| ५) | सौ. रजनी रमेश जोशी | -//- |
| ६) | श्री. प्रकाश निकाळजे | -//- |
| ७) | श्री. बैनाडे कवरसिंग | -//- |
| ८) | श्री. महंमद मुश्ताक अहमद | -//- |
| ९) | श्री. प्रभाकर विधाते | -//- |
| १०) | श्री. महादेव सुर्यवंशी | -//- |
| ११) | सौ. पद्मा शिंदे | -//- |
| १२) | श्री. सुदाम सोनवणे | -//- |
| १३) | श्री. हमीदउद्दिन ताबा | -//- |

**विषय क्र. ४१/१ :**

दिनांक ०३-०७-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** मागील सभेत जे काही घडले, त्या बाबींचा आम्ही निषेध करतो व सभात्याग करतो.

यावेळी स. सभासद श्री. हमीदउद्दिन ताबा आणि श्री. अब्दुल रशिद खान (मामू) या सभासदांसह सभात्या केला (वेळ अंदाजे ३=२० वाजता) ००.०२ मिनिटांनी सभात्याग केलेले स. सभासद श्री. हमीदउद्दिन ताबा व श्री. अब्दुल रशिदखान (मामू) यांनी सभागृहात प्रवेश केला.

**श्री. अब्दुल रशिदखॉन (मामू) :** दिनांक ०३-०७-९५ च्या सभेत उर्दू माध्यमांच्या शिक्षिकेची मराठी माध्यमांच्या शळेवर नेमणूक करून, काम घेतले जाते, तसेच सिडको भागातील शाळेत २२ वर्षा पासून पगार दिलेला नाही याबाबत चर्चा झाली आहे. या चर्चे बाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली याची माहिती देण्यात यावी.

**शिक्षणाधिकारी :** बडी गिरणी या शाळेस एक अतिरिक्त उर्दू शिक्षिका असल्याने या शिक्षिकेकडून मराठी माध्यामांच्या शाळेत काम घेण्यात येत होते. या उूर्द शिक्षिकेची आता मराठी शाळेवर गरज राहिलेली नाही. सिडको एन-७ येथे

श्री. बहादुरसिंग हे दैनिक वेतनावर चौकीदार म्हणून काम करीत होते. जून ९४ च्या आदेशानुसार त्यांना कामावरून कमी करण्यांत आले आहे. सबब त्यांच्या पगाराचा प्रश्न रहात नाही.

**श्री. प्रकाश निकाळजे :** उस्मानपुरा चौकातील एसटीडी, पीसीओला दिलेल्या पर्यायी जागेवर संबंधित मालक बांधकाम करीत आहे. तेंव्हा अशा प्रकार ची बांधकाम परवानी त्यांना देण्यांत आली आहे का? सभागृहाने एसटीडी, पीसीओ कति फक्त ५ (पांच) वर्षासाइी जागा दिली आहे. या मुदतीनंतर संबंधित मालक पुन्हा न्यायालयाकडून मनाई हुकूम मिळवू शकेल तेंव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**डॉ. कराड भागवत :** उस्मानपुरा चौकातील एस.टी.डी. पीसीओला करिता ज्या प्रमाणे रोड होते, त्याच प्रमाणे संबंधित मालकाने पर्यायी जागेवर रोड टाकावे.

**अति. शहर अभियंता :** उस्मानपुरा चौकातील एसटीडी, पीसीओ करिता पाच वर्षासाठी जागा दिली असली तरी व्यावसायिक दिलेली जागा पुन्हा सोडत नाही, ही सूचना मागील सभेतच देण्यांत आली होती. तेंव्हा पाच वर्षासाठी जागा दिली म्हणजे संबंधित व्यावसायिक त्या ठिकाणी बांधकाम करणारच.

**अब्दुल रशिदखान (मामू) :** दिनांक ०३-०७-९५ च्या सभेत मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी जमा खर्चाचा अहवाल सभागृहास दाखल करण्याबाबत चर्चा झाली होती, त्याबाबत संबंधित विभागाकडून काय कार्यवाही झाली, याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** म.न.पा. जमा खर्चाचा अहवाल दर महिन्याला सभागृहात दाखल करण्यांत येईल मंजुरी मागील सभेत देण्यात आली आहे. या मंजुरीनुसार सभागृहात अहवाल दाखल करण्यांपूर्वी जमा खर्चाच्या अहवालाबाबतची माहिती मा. आयुक्त, वृत्तपत्रांना कशी देतात ही बाब योग्य नाही.

**मा. मुख्य लेखा परिक्षक :** म.न.पा. जमा खर्चा बाबतचा अहवाल वेळोवेळी मा. आयुक्तांना दिला जातो. सभागृहाच्या मंजुरीनुसार पुढील महिन्यापासून जमा खर्चा बाबत अहवाल सभागृहापुढे ठेवला जाईल.

**अब्दुल रशिदखान (मामू) :** ठराव क्र. ३४/ दिनांक ०३-०७-९५ अन्वये पदाधिकाऱ्यांच्या निवास्थानी असलेल्या कार्यालयीन दूरध्वनी वरील खर्च बाबतचा निर्बंधा बाबत पुढील सभेत अहवाल द्यावा, अशी चर्चा झाली होती. त्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा. प्रशासनातर्फे पदाधिकाऱ्याच्या निवास्थानी यापूर्वी देण्यांत आलेल्या कार्यालयीन दूरध्वनी बाबत असलेले बील (मा. महापौर यांच्या निवास्थानी असलेल्या दूरध्वनी रुपये ९५०००/- व मा. स्थायी समिती सभापती यांच्या निवास्थानी असलेल्या दूरध्वनीचे रुपये १९०००/- बील लक्षात घेता पदाधिकाऱ्यांच्या निवास्थानी दिलेल्या कार्यालयीन दूरध्वनीच्या बीलावर निर्बंध असणे आवश्यक वाटते.

**मा. सभापती :** पदाधिकाऱ्यांच्या निवास्थानी प्रशासनातर्फे पुरविण्यात आलेल्या दूरध्वनी वरील खर्चाच्या निर्बंधा बाबत मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी पुढील सभेत अहवाल द्यावा व त्या निर्बंधानुसार मा. उप महापौर यांच्या निवास्थानी असलेल्या दूरध्वनी क्रमांक ३३४९११ करिता एसटीडी सवलत उपलब्ध करून देण्याबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा, अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** दिनांक ०३-०७-९५ च्या सभेत ठरल्याप्रमाणे अनधिकृत नळ कनेक्शन शोध मोहिमे बाबत खुलासा करण्यात यावा.

**कार्यकारी अभियंता :** औरंगाबाद महानगरपालिकेने माहे जुलै ते डिसें ९४ मध्ये अनिधिकृत नळ कनेक्शन शोध मोहिमे नुसार १०९४३ इतके अनधिकृत नळ कनेक्शन आढळून आले. आढळून आलेल्या अनधिकृत नळ कनेक्शन बाबत संबंधित मालकांना नळ कनेक्शन बाबत प्रशासनातर्फे नोटीस देण्यांत आली होती, त्यानुसार ९३४७ इतक्या घरमालकांनी नळ कनेक्शन अधिकृत असल्याचे निष्पन्न झाले आहे. उर्वरित १५९६ इतक्या नळ कनेक्श बाबत कार्यवाही चालू आहे.

**मा. सभापती :** चिश्तिया कॉलनी ही वसाहत नजिकच्या काळात वसलेली आह. मागील सभेतल चर्चेनुसार चिश्तिया कॉलनीत मुख्य लाईनवर ५६ अनधिकृत नळ कनेक्शन आहेत. तेंव्हा अनधिकृत नळ या भागात काम करणारे उप अभियंता, कनिष्ठ अभियंता व दुय्यक आवेक्षक कोण होते. याची माहिती देण्यात यावी.

**कार्यकारी अभियंता :** चिश्तिया कॉलनी भागात ४ इंची नविन पाईप लाइ्रन टाकण्यात आली आहे. मुख्य जलवाहिनीवर असणारे कनेक्शन ४ इंची लाईनवर टाकण्यात आले आहे. यापैकी १०/१२ नळ कनेक्शन अद्याप मुख्य जलवाहिनी वरच आहेत.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता यांनी चिश्तिया कॉलनीतील अनधिकृत नळ कनेक्शनच्या वेळी काम करणारे उप अभियंता, कनिष्ठ अभियंता आणि दुय्यक आवेक्षक कोण होते. याची माहिती पुढील सभेत व्हावी.

**श्री. सुदाम सोनवणे :** सिडको भागात टेलिफोन लाईन टाकण्योच काम चालू आहे, या कामामुळे पाणी पुरवठ्याची लाईन फुटली, फुटलेल्या पाणी पुरवठ्याच्या लाइ्रनमध्ये ड्रेनजचे पाणी मिसळले त्यामुळे सिडको हडको भागास सध्या ड्रेनेजयुक्त पाणी पुरविले जात आहे. तेंव्हा प्रशासना तर्फे टेलिफोन लाईनचे काम करणाऱ्या गुत्तेदारास अथवा संबंधित विभागास काही सूचना देण्यांत आल्या आहेत काय याचा खुलासा व्हावा. सोबत सिडको हडको भागास पुरवठा होत असलेल्या दुर्गंधीयुक्त पाण्याचा नमूना आणलेला आहे.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता यांनी उक्त प्रकरणी पहाणी करावी.

**ठराव :**

दि. ०३-०७-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीतील ठराव क्र. ३४ मध्ये "प्रशासना तर्फे पदाधिकाऱ्यांच्या निवास स्थानी पुरविण्यात आलेल्या दूरध्वनी वरील खर्चा बाबतच्या निर्बंधा संबंधी मा. मुख्य लेखा परिक्षक यांचे कडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या निर्बंधा नुसार मा. उप महापौर यांच्या निवासस्थानी असलेल्या दूरध्वनी क्रमांक ३३४९११ करिता एसटीडी सवलत उपलब्ध करून देण्या बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा" या दुरुस्तीसह दि. ०३-०७-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४२/२ :**

मुख्य लेखा परिक्षका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका औरंगाबाद अंतर्गत एकूण ३६ विभाग आहेत. या सर्व विभागाची लेखा परिक्षण अद्यावत व नियमित करणे आवश्यक आहे. परंतु लेखा परिक्षण विभागात सध्या कार्यरत असलेल्या

कर्मचारी वर्गाची संख्या लेखा परिक्षणाचे कामाचे तुलनेत अत्यंत कमी पडत आहे. कर्मचारी वर्गाची संख्या लेखा परिक्षणाचे कामाचे तुलनेत अत्यंत कमी पडत आहे.

महानगरपालिकेच्या सर्वच विभागांचे लेखा परिक्षण काम वेळीच अद्यावत करणो अत्यंत महत्वाचे व गरजेचे असल्यामुळे लेखा परिक्षण विभागात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (२) अन्वये स्थायी स्वरुपाची ( ) कनिष्ठ लिपिक संवर्गातील (वेतन श्रेणी रुपये ९५० ते १५००) "कनिष्ठ लेखा परिक्षक" या पदनामाभिद्याची एकूण (पंधरा) पदे निर्माण करणे आवश्यक आहे.

करिता लेखा परिक्षण विभागाता कनिष्ठ लिपिक संवर्गातील वेतन श्रेणी रुपये ९५० ते १५०० या वेतन श्रेणीतील वाणिज्य शाखेतील पदवीधर असलेल्या कनिष्ठ लेख परिक्षकांची पदे निर्माण करण्या बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम अन्वये लेखा परिक्षण विभागांकडून जमा खर्चाचा अहवाल सभागृहास मिळणे आवश्यक असल्याने तुर्त सहा महिन्याकरिता तात्पुरती हंगामी नेमणूक करण्यांत यावी.

**मा. उप आयुक्त :** प्रशासन तर्फे लेखा परिक्षण विभागांकरिता आवश्यक असलेले पदे निर्माण करण्यांचा प्रस्ताव सभागृहापुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आलेला आहे. या ठरावास सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यानंतर नियमाप्रमाणे शासनाची मंजुरी घ्यावी लागेल. ही मंजुरी घेत असतांना प्रत्येक धंदा वरील कामांचा कार्यभार आणि इतर बाबींची माहिती शासनास द्यावी लागेल. त्यानंतर नियमाप्रमाणे पदे भरण्यांत येतील.

**श्री. गौतम खरात :** प्रशासना तर्फे पद निर्माण करण्या बाबतचे अनेक प्रस्ताव शासनाकडे पाठविले आहे. (उदा सफाई कामागारांची भरती) पाठविण्यांत आलेल्या प्रस्तावांना शासनाची मंजुरी मिळावी. या साठी काय कार्यवाही केली व किती प्रमाणात पाठपुरावा केला याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** प्रशासनातर्फे शिक्षकांच्या पदा बाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे. या प्रस्तावा बाबत शासनाकडे पालक मंत्र्यामार्फत पाठपुरावा करण्यांत आला आहे. याबाबतची पोचही मा. उप आयुक्त यांच्याकडे दिली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) अन्वये पद निर्मितीस शासनाची मंजुरी आवश्यक असली तरी सध्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात बरीच वाढ झलेली आहे. तेंव्हा सर्वसाधारण सभेने पदनिर्मितीस मंजुरी दिल्यानंतर आवश्यक पदे भरण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल शासनास पाठविण्यात यावा, अशा सूचना मा. आयुक्त व मा. उप आयुक्त यांना दिल्या आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे जलगृह विभागास (२) विभागा कडील नियमाप्रमाणे कनिष्ठ अभियंताच्या नविन जागा भरण्यात याव्या.

**मा. सभापती :** कनिष्ठ अभियंताच्या जागा भरण्यासाइी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमाच्या आधार घेण्याची आवश्यकता नाही. त्या बाबत प्रशासन योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत ३६ विभागांचे लेखा परिक्षण अद्यावत व नियमित करणे. लेखा परिक्षणाचे काम वेळीच अद्ययावयाचे पूर्ण करणे व लेखा परिक्षणाच्या कामांत सुसुत्रता आणण्यासाठी लेखा परिक्षण विभाग स्वतंत्र असणे आवश्यक असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (२) अन्वये स्थायी स्वरुपाची कनिष्ठ लिपिक संवर्गातील वेतन श्रेणी रुपये ९५० ते १५००/- या संवर्गातील "कनिष्ठ लेखा परिक्षकांची" एकूण १५ पदे "वाणिज्य शाखेतील पदविधर" असलेली निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३/३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नगीना नगर गारखेडा येथे १०० मी. मी. व्यासाची ए.सी. व सी. आय. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन १९९२-९३ नुसार रक्कम रु. १,७२,०००/- एवढ्याचे तयार करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. या कार्यालया तर्फे निविदा सुचना दैनिक वर्तमान पत्रात लोकमत, औरंगाबाद टाईम्स मध्ये प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलंबद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण दोन सिलंबद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अय्युब खॉन | १८% कमी |
| २) | श्री. डी. सी. पंजाबी | ७.३% कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा श्री. अय्युबखॉन यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी असा दर दिलेला आहे.

तरी श्री. अय्युबखॉन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. प्रकाश निकाळजे :** प्रस्तावित प्रस्तुत कामांसाठी १८% कमी दराची निविदा आहे. १८% कमी दराने म्हणजेच कामाचा दर्जा योग्य राहणार नाही कमी दराची निविदा भरून परवडत नाही, म्हणून अनेक गुत्तेदार अर्धवट काम सोडून देतात. तेंव्हा निविदा मंजूर करताना या बाबींचा विचार व्हावा.

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** १८% कमी दराच्या निविदेप्रमाणे गुत्तेदार काम करू शकतात तेंव्हा निविदा मंजूर करण्यास हरकत नाही.

**मा. सभापती :** कोणत्याही कामांसाठी निविदा दर काही असले तरी संबंधित गुत्तेदाराने कामाचा योग्य दर्जा राखला पाहिजे. गुत्तेदार कामांचा दर्जा योगय प्रकारे ठेवत नाही असे आढळून आल्यास संबंधित सभासदांनी त्या बाबतची सूचना द्यावी, म्हणजे त्या कामाबाबत क्वालिटी कंट्रोल विभागाकडून पहाणी करून कार्यवाही केली जाईल.

**श्री. गौतम खरात :** माझ्या वॉर्डात स्लम विभागातर्फे गेल्या एक वर्षापासून काम चालू आहे. चालू असलेले काम बरोबर होत नाही, सर्वत्र दुर्गंधी सुटलेली आहे. या

बाबत संबंधित विभाग अधिकाऱ्यांना सुचनाही दिलेल्या आहेत. परंतु त्याचा काहीही उपयोग झालेला नाही.

**कार्यकारी अभियंता :** दुरुस्ती व देखभाल या सदरा खाली काम चालू आहे.

**मा. सभापती :** प्रशासनातर्फे एका झोन अंतर्गत व देखभालचे काम एकाच गुत्तेदारा मार्फत करून घेण्याची पध्दत आहे. यामुळे एकाच झोनमधील अनेक समस्या दुरुस्ती व देखभालचे काम करणारे गुत्तेदार एकाच वेळी सोडवू शकत नाही.

**मा. सभापती :** स नगरसेवक, श्री. गौतम खरात यांचे बरोबर शहर अभियंता यांनी पहाणी करावी व त्या कामांबाबत ताबडतोब कार्यवाही करावी.

**श्री. प्रकाश निकाळजे :** सुलभ शौच्यालयांसाठी महापालिकेकडे टँकर आहेत परंतु या टँकर साठी लागणारा आवश्यक पाईप कमी पडतो, तेंव्हा टँकर करिता आवश्यक तेवढा पाईप उपलब्ध करून द्यावा.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** आंबेडकर नगर भागात सार्वजनिक शौच्यालय पूर्ण करून दोन वर्ष झाले असले तरी पाणी पुरवठ्याची व्यवस्था नसल्यामुळे शौच्यालये नागरिकांसाठी खुले झालेले नाही. शौच्यालयाच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक संबंधित विभागातर्फे तयार करण्यांत आलेले ही बाब योग्य नाही.

**शहर अभियंता :** आंबेडकर नगर सार्वजनिक शौच्यालयाच्या बाजूला हौद आहे या हौदात टँकरद्वारे पाणी टाकण्यात येते. शौच्यालयाला आवश्यक पाणी पुरवठा व्हावा, या दृष्टीने जलवाहिनी टाकण्यात आली आहे. तथापी अद्याप नळ कनेक्शन देण्यांत आलेली नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगीना नगर गारखेडा येथे १०० मी. मी. व्यासाची ए.सी. व सी. आय. जलवाहिनी टाकाण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १८% कमी दराच्या श्री. अय्युबखान यांच्या निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. राहुलनगर बनेवाडी गांव डांबरी रस्ते तयार करणे करिता एकूण रक्कम रु. ६,७६,०००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग यांची दरूसची १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यात आले असून मा. आयुक्त साहेबांनी दिनांक ०७-०६-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेचे सन १९९५-९६ चे अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत डांबरी रस्ते या शिर्षा अंतर्गत एक कोटी दहा लाखाची तरतूद केलेली आहे. अंदाजपत्रक रुपये ६,७६,०००/- मान्यतेस्तव प्रस्ताव सादर. करिता प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. भागवत कराड :** चौक सौंदर्यीकरणाच्या कामांतर्गत क्रांतीचौक येथील चौकात स्लॅब टाकलेला आहे. या स्लॅबवर एक दिवस पाणी टाकण्यांत आले. चौकशी`ली असता, त्यानंतर एका पाणी टाकण्यात आले नाही असे समजले. तेंव्हा या कामाचे गुत्तेदार कोण आहेत, याचा खुलासा व्हावा. वस्तुतः स्लॅब टाकल्यानंतर २१ दिवसपर्यंत स्लॅबवर पाणी टाकणे आवश्यक असते.

**अति. शहर अभियंता :** क्रांतीचौक चौक सौंदर्यीकरणाचे काम कंपनी मार्फत चालू आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राहुलनगर बनेवाडी गांव येथील डांबरी रस्ते तयार करण्याच्या कामाकरिता रक्कम रु. ६,७६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरील कामाचा खर्च सन १९९५-९६ च्या अर्थ संकल्पातील झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत डांबरी रस्ते या शिर्षकातून करण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सध्या भंडार विभागातील सिमेंट संपलेले आहे, त्यासाठी सिमेंट उत्पादक कंपनी आणि त्यांचे अधिकृत विक्रेते यांच्याकडून दरपत्रक मागविले असता दिनांक ०१-०६-९५ ला एकूण ५ (पाच) दरपत्रके वसूल झाली, त्यांनी खालील प्रमाणे सिमेंट पुरवठा करण्यांचे दर दिले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | माणिकगड सिमेंट | रु. २६०८ प्रति टन |
| २) | व्ही. अे. ट्रेडींग कंपनी | रु. २६६५ प्रति टन |
| ३) | रुबी ट्रेडर्स | रु. २६७० प्रति टन |
| ४) | सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया | रु. २६९६ प्रति टन |
| ५) | अजंठा ट्रेडर्स | रु. १३७.८० प्रति गोणी |

अशा प्रकारचे वरील दर दिलेले आहे. सिमेंट शिल्लक नसल्यामुळे बरेचसे कामे सिमेंट अभावी बंद आहे. कामे बंद पडु नये म्हणून दिनांक ०१-०६-९५ रोजी प्राप्त झालेल्या सिमेंटच्या दरपत्रकातील अ.क्र. १ माणिकगड सिमेंट यांनी सिमेंटच्या दराच्या व जकात बाबत स्पष्ट काहीच उल्लेख केलेला नाही. तसेच त्यांच्या अटी अतिशय किचकट व जाचक आहे. या बाबतीत कार्यालयातर्फे त्यांना पत्रक घेऊन वरील बाबतीत सविस्तर खुलासा करावाव आपल्या अटी मागे घ्याव्यात असे पत्रक दिले असता त्यांचे काहीच उत्तर आलेले नाही.

करिता प्राप्त झालेल्या सिमेंटच्या दर पत्रकातील दुसऱ्या क्रमांकाचे पुरवठा धारक व्ही. अे. ट्रेडींग यांचे बरोबर मा. आयुक्त साहेबांनी चर्चा करून निविदेतील दर १३३.२५ ऐवजी १३२.२५ प्रति गोणी प्रमाणे ताबडतोब ३००० सिमेंट गोणी खेरी करण्याचे आदेश दिल्यानुसार व्ही. अे. ट्रेडींग कंपनी यांनी दि. २७-०६-९५ रोजी ३०६० सिमेंट गोणीचा पुरवठा केला, त्याची रक्कम ९३२.३२ प्रति गोणी प्रमाणे ४,०४,६८५.०० (चार लाख चार हजार सहाशे पंच्याएंशी) इतकी रक्कम मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** प्रस्तुत प्रस्तावातील सिमेंट पुरवठधारक मे. व्ही. अे. ट्रेडींग कंपनी यांनी दरपत्रकात प्रति टन रु. २६६५/- असा दर दिलेला असतांनाही संबंधिताशी वाटाघाटी करून प्रति गोणी रुपये एक दर कमी केलेला आहे. प्रस्तावात सुचविल्या प्रमाणे गोणीच्या संख्ये नुसार सिमेंट खरेदी केल्यास सिमेंट उपरवून घेतांना त्यांचे टना प्रमाणे वजन केले जाते काय. माझ्या माहिती प्रमाणे सिमेंट गोणीचे वजन आणि टनाप्रमाणे खरेदी करावयाच्या सिमेंट गोण्यायांचे वजनात निश्चित फरक येत असावा.

**मा. सभापती :** माणिकगड सिमेंट धारकाकडे सिमेंट उपलब्ध नव्हते, कार्यालयीन कामासाठी सिमेंटरची तातडीची गरज होती. ही बाब लक्षात घेऊन मा. आयुक्त यांनी मे. व्ही. अे. ट्रेडींग कंपनी यांचेशी चर्चा करून सिमेंट खरेदी केलइ आहे. स. सभासद श्री. महादेव सुर्यवंशी यांची सूचना चांगली आहे. तेंव्हा शहर अभियंता यांनी स. सभासद, श्री. महादेव सुर्यवंशी यांचे समक्ष मे. व्ही. अे. ट्रेडींग कंपनी यांचेकडून खरेदी करण्यात येणारे सिमेंट बाबत सिमेंट सहीत ट्रकचे वजन व व्यतिरिक्त ट्रकचे वरर यांचे मोजमाप घ्यावे व स. सभासदांनी सुचविल्या प्रमाणे सिमेंटचे वजन, गोण्याची संख्या याबाबत कमी जास्त फरक आळून आलयास सभागृहास सूचना द्याव्यात.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** मा. सभापती यांनी सुचविल्याप्रमाणे सिमेंट गोण्याची संख्या, वजन यात काही फरक आल्यास, संबंधिताचे देयक थांबविण्यात येईल काय?

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म.न.पा. भांडारात सिमेंट उपलब्ध नसल्यामुळे सिमेंट अभावी कामे बंद पडु नयेत म्हणून दुसऱ्या क्रमांकाचे सिमेंट पुरवठाधारक मे. व्ही. अे. ट्रेडींग कंपनी यांचे बरोबर झालेल्या वाटाघ्ज्ञाटी नुसारप्रति गोणी रुपये १३२.२५ पैसे प्रति गोणी या दराने खरेदी करण्यांत आलेल्या ३०६० सिमेंट गोण्या खरेदी करण्याकरिता रक्कम रुपये ४,०४,०६५=०० च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६/६ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिल्कमिल कॉलनी येथे दगडी गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये २,०४,५००/- चे तयार करण्यांत आले आहे. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमिल कॉलनी येथे दगडी गटार बांधण्याच्या कामाकरिता रक्कम रु. २०,,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७/७ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जहागिरदार कॉलनी येथे १५० व २५० मी. मी. व्यासाची आर. सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,३४,७६०/- चे तयार करण्यात आले आहे. तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जहागिरदार कॉलनी येथे १५० व २५० मी. मी. व्यासाची आर. सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये ३,३४,७६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८/८ :**

सहा. आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आरोग्य विभाग मध्ये आरोग्य केंद्रावर वैद्यकीय अधिकारी म्हणून ठराविक वेतन रु. २५००/- वर कार्यरत आहेत. आरोग्य विभागासाठी आवश्यक असलेल्या पदांना शासन मान्यता मिळावी म्हणून शासनास पत्र पाठविण्यात आलेले आहे. परंतु शासनाकडून अद्याप मान्यता देण्यात आलेली नाही. त्यामुळे

वैद्यकीय अधिकारी ठराविक वेतन रुपये २५००/- वर सेवेत कार्यरत आहेत. संबंधित वैद्यकीय अधिकारी यांनी ठरावित वेतनामध्ये वाढ करून रु. ३५००/- ठरावित वेतन देण्या बाबतची मागणी केलेली आहे. एन-८ येथील महानगरपालिकेचे रुग्णालयासाठी विकृती प्रयोगशाळा व नेत्र युनिट सुरू करण्याचे दृष्टीने आवश्यक असलेली पदे भरण्यासाठी व त्यांना करावयाचे वेतन या संबंधाने आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव क्रमांक २८९ दिनांक ३१-०१-१९९४ अन्वये मंजूर करून घेतला आहे. त्यानुसार वैद्यकीय अधिकारी यांना ठराविक वेतन देण्यांत येते. ठरावित वेतनावर नौकरी देतांना वेतना बाबत शासनाचे कोणतेही नियम नाहीत.

करिता वैद्यकीय अधिकारी यांनी मागणी केलेल्या ठरावित वेतन रुपये २५००/- वरून रुपये ३५००/- देण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** हर्षनगर येथील आरोग्य केंद्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची रुग्णा बरोबरची वागणूक चांगली नाही. याबाबत जवळ जवळ १०० नागरिकांची तक्रार केलेल्या आहेत. हर्षनगर आरोग्य केंद्रातून रुग्णांना आवश्यक त्या गोळ्या दिल्या जात नाही. प्रस्तुत प्रस्तावास शासनास ठराव पाठविण्यात आला आहे असे नमूद करण्यात आले आहे., मग पगार वाढी बाबतचा प्रस्ताव कशा करिता मांडण्यात आला आहे. हर्षनगर आरोग्य केंद्रातील कर्मचारी वर्ग बदलण्यात यावा.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** स्थायी समिती सारखी महत्वाची सभा चालू असतांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी सभेस उपस्थित नाहीत हे योग्य नाही हा सभापतीचा अपमान आहे.

**मा. सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सभेस हजर राहण्ण्याबाबत सूचना द्यावी.

**श्री. गौतम खरात :** महानगरपालिकेतर्फे शहरात अनेक दवाखाने उघडण्यात आले आहेत या दवाखान्यास श्वानदंश प्रतिबंधक इजेक्शनची सोय नाही. एखाद्या व्यक्तीस कुत्रे चावल्यास त्यास रुपये २५०/- फी भरून इंजेक्शन घ्यावे लागते. शहरातील सर्वसामान्य नागरिक अशा प्रकारची फी भरून शकत नाही. कुत्रे पकडणे हे महानगरपालिकेचे काम आहे. तेंव्हा शहरातील मोकाट कुत्रे पकडण्याची मोहिम हाती घेण्यात यावी.

**मा. सभापती :** श्वानंदश प्रतिबंधक इंजेक्शनची व्यवस्था म.न.पा आरोग्य केंद्रात करण्या बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या अधिकारातील आहे. अशा प्रकारचा स. सभासदा तर्फे मांडण्यात आल्यास आवश्यक ती मदत करण्यात येईल.

**श्री. सुदाम सोनवणे :** सिडको हडको भागात ज्या नळांना पाणी येत नाही, अशा नागरिकांना पाणीपट्टी बीले देण्यात आली आहे.

**सौ. पद्मा शिंदे :** पाणीपट्टीच्या मागणी प्रमाणे संबंधित नागरिकांनी पाणीपट्टीची देयके भरली नाही अशा नागरिकांचे नळ कनेक्शन बंद करण्याची मोहिम हाती घेण्यात आली आहे. याबाबत मागील सभेत चर्चाही झाली आहे. काही नागरिक पाणीपट्टीची देयके हप्त्यात भरण्यांस तयार आहेत, तेंव्हा ज्या नळांना पाणी आले नाही अशा नागरिकांना पाणीपट्टीची देयके माफ करण्यांत यावी, तसेच ज्या नागरिकांना आताच नळ कनेक्शन घेतले आहे अशा नागरिकांना नळ घेतलेल्या तारखेपासून पाणीपट्टीची देयके देण्यांत यावी.

**मा. सभापती :** पाणीपट्टीची देयके मिळालेल्या नागरिकांना देयके भरून देण्याबाबत संबंधित विभागाने हप्ते पाडून द्यावे. पाणी पट्टीची माफी बाबत स. नगर सेवकांनी सर्वसाधारण सभेत प्रश्न मांडावा.

**सौ. रजनी जोशी :** सिडको-हडको भागात रस्त्यांवर मरून पडलेले कुत्र कोणी उचलाव या बाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** कुत्रे उचलण्यांच काम सिडको विभागाने करावे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** नारेगांव टेड्रींग ग्राऊंड भागात पूर्ण शहराचे कुत्रे येतात यापैकी एका कुत्र्याने नारेगांव भागातील मुलीला चावा घेतला आहे., या मुलीची आई मदतीसाठी मनपा कार्यालयात आली होती, परंतु त्यांना मदत मिळालेली नाही. शहरातील पिसाळलेली कुत्री मारून टाकलीच पाहिजे तेंव्हा संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात याव्यात.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** शासनाचा कुत्रे मारू नका असा आदेश असला तरी माझ्या माहिती प्रमाणे शासनाने कुत्र्याने फॅमिली प्लॅनिंग करण्याबाबतचा प्रस्ताव ठेवला होता, तो यशस्वी झाला नाही. शहरातील कुत्रे पकडून एका खोलीत बंद करून ठेवण्यात यावी. पकडलेल्या कुत्र्याचे मालक मागणी करण्यास आल्यास, त्यांना ती परत करण्यात येईल.

**मा. सभापती :** शासनाने कुत्रे मारू नका असे आदेश दिलेले आहेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा आरोग्य केंद्रावर वैद्यकीय अधिकारी म्हणून रु. २५००/- या ठरावित वेतनावर कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनात रुपये ३५००/- ठराविक वेतन अशी वाढ करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *"ऐन वेळचे प्रस्ताव"*

**विषय क्र. ४९/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. लोटाकारंजा येथे वाचनालयाच्या इमारतीस एका रुमची वाढ करण्यसाचे कामासाठी सा. बां. खात्याचे सन ९४-९५ चे जिल्हा दरसूची अन्वये रक्कम रुपये १,०५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्तांनी दि. २८-०६-९५ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब अंदाजपत्रक रक्कम रुपये १,०५,०००/- मंजुरीसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. सदरचा खर्च इतर वाचनालय या लेखा शिर्षातून रक्कम रुपये ५.०० लाखातून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोटाकारंजा येथील वाचनालयाच्या इमारतीस एका रुमची वाढ करण्याकरिता रक्कम रुपये १,०५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. जयभिमनगर स्लम घाटी येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सार्वजनिक येथील बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९२-९३ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ४,२९,१०५/- चे अंदाजपत्रक तयार

करण्यांत आले आहे. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त मार्फत दिनांक १७-०६-९५ ला मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,२९,१०५/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी येथील जयभिमनगर स्लम भागात रस्त्यांचे पुन्हा डांबरीकरण करण्यांच्या कामाकरिता रक्कम रुपये ४,२९,१०५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. घाटी स्लम येथे नविन खांडकी बसविणे बाबत कामाकरिता ३,३६,२१७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरच्या अंदाज पत्रकास मा. आयुक्त साहेब यांनी दिनांक २६-०६-९५ ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,३६,२१७/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी स्लम भागात नविन खांडकी बसविण्यांच्या कामाकरिता रक्कम रुपये ३,३६,२१७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापतींनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव, | सभापती, स्थायी समिती, |
| औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद | औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**सोमवार दिनांक २८-०८-९५ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. सभापती श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेसे सुरुवात झाली. या सभेस खालील स. सभासदांसह कार्यालयीन अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अब्दुल. रशिदखान (मामू) | सदस्य |
| २) | श्री. सुभाष कच्छवाह | -//- |
| ३) | डॉ. श्री. कराड भागवत | -//- |
| ४) | श्री. गौतम भागाजी खरात | -//- |
| ५) | सौ. रजनीबाई रमेश जोशी | -//- |
| ६) | श्री. प्रकाश निकाळजे | -//- |
| ७) | श्री. बैनाडे कवरसिंग | -//- |
| ८) | श्री. महंमद मुश्ताक अहमद | -//- |
| ९) | कु. माया लाडवाणी | -//- |
| १०) | श्री. प्रभाकर विधाते | -//- |
| ११) | श्री. महादेव सुर्यवंशी | -//- |
| १२) | सौ. पद्मा शिंदे | -//- |
| १३) | श्री. सुदाम सोनवणे | -//- |
| १४) | श्री. हमीदउद्दिन ताबा | -//- |

**विषय क्र. ५२/१ :**

दिनांक १०-०७-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** औरंगाबाद शहरात सध्या कावीळ गॅस्ट्रो या सारख्या साथीच्या रोगांच्या प्रादूर्भाव मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येत आहे. शहराच्या अनेक भागात या रोगांचे रुग्ण सापडत आहेत. तेंव्हा प्रशासनाने याबाबत काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**सौ. पद्मा शिंदे :** डासांच्या निर्मुलनासाठी वापरण्यांत येणाऱ्या औषधांचा एक थेंब आणि चार बादली पाणी एकत्र करून कर्मचारी औषध फवारणी करता. अशा औषध फवारणीने डांसाचे निर्मुलन होत नाही.

**मा. सभापती :** शहरातील साथीचे रोग आणि डासाचे वाढते प्रमाण हे महत्वाचे प्रश्न आहे. स. सभासद श्री. महादेव सुर्यवंशी यांनी ब्रिजवाडी व नारेगांव येथील रुग्णाबाबत दिलेल्या माहितीप्रमाणे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी संबंधित रुग्णांच्या निवास्थानी जाऊन आवश्यक ती तपासणी करावी. तसेच शहरातील कावीळ व गॅस्ट्रोच्या रुग्णांची सविस्तर माहिती मिळावी या दृष्टीने वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिंकाना "डॉक्टर्सना" प्रशासना तर्फे नोटीस देऊन त्यांच्या रुग्णालयांत किंवा क्लिनीकमध्ये कावीळ किंवा गॅस्ट्रोचा रुग्ण आढळून आल्यास अशा रुग्णाविषयी सविस्तर माहिती

महानगरपालिका प्रशासनांस कळविण्याबात नोटीस देण्यात यावी. शहरातील साथीचे रोग व डासाचे निर्मूलन करण्यासाठी चांगल्या प्रतीच्या औषधाचा वापर करण्यांत यावा. औषध फवारणी, रुग्ण तपासणी यासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे एक पथक तयार करावे, या कामांतर्गत स्लम विभागची विशेष काळजी घेण्यात यावी.

**श्री. गौतम खरात :** शहरातील हॉटेल्स, उपहारगृहे येथील पाणी दूषित असते, याबाबत आरोग्य विभागातर्फे आतापर्यंत किती हॉटेल्सची पहाणी करण्यांत आली. याबाबत काय कार्यवाही झाली, याचा खुलासा व्हावा, मिळालेल्या माहितीनुसार तपासणी करण्यात आलेल्या हॉटेलपैक ९ हॉटेलची पाणी दूषित असल्याचे आढळून आले आहे.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** डास निर्मुलनासाठी वापरण्यांत येणाऱ्या व्हॅलन फॉग, फॉगींग मशिन किती आहेत. त्याबाबत माहिती देण्यांत यावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** शहरातील डासांचे नायनाट करण्यांसाठी प्रशासनाकडे सध्या तीन चार व्हॅन फॉग फॉगिंग मशीन उपलब्ध आहे. या शिवाय आणखी नविन मशिन खरेदी करण्यांत येणार आहे.

**मा. सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा केल्याप्रमाणे शहराचा वाढता विसार लक्षात घेता, डास निर्मुलनासाठी वापरण्यांत येणाऱ्या मशिन कमी पडतात, तेंव्हा शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता डासांचे निर्मुलन करणे सोईचे व्हावे या दृष्टीने किमान ८-१० मशिन आरोग्य विभागाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. तेंव्हा आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी बस निर्मुलनासाठी आवश्यक असलेल्या ७ ते १० मशिन खरेदी कराव्यात, या मशिन खरेदीसाठी सभगृहाचे आजच मंजुरी दिली, त्यादृष्टीने आरोग्य विभागाने कार्यवाही करावी.

**डॉ. भागवत कराड :** औषधी फवारणीची वेळ कोणती असली तरी चालते, फक्त औषध फवारणी करतांना ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणांवर डास बसतात किंवा ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर डासांचे प्रजनन होते, तेंव्हा अशा ठिकाणी औषध फवारणी करणे आवश्यक असते.

**श्री. हमीद उद्दिन ताबा, श्री. अब्दुल :** स. सभासदांचे सुचविल्याप्रमाणे शहरातील डासांचे निर्मुलनांसाठी दुपारी ४.०० वाजता औषध फवारणी आणि सायंकाळी सहा नंतर व्हॅन फॉग फॉगींग मशिनचा वापर केल्यास शहरातील डासांचे प्रमाण कमी होईल.

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** महानगरपालिकेच्या बांधकाम विभागांत रितसर अर्ज करूनही सहा सहा महिने बांधकाम परवानगी मिळत नाही. अशी बऱ्याच नागरिकांची तक्रार आहे. सहा सहा महिने बांधकाम परवानगी न मिळाल्यामुळे विना परवाना बांधकामास प्रोत्साहन मिळत आहे. या दृष्टीने नागरिकांना बांधकाम परवाना मिळणे सोईचे व्हावे, याकरिता एक उप समिती कायम करण्यात यावी, व नगर रचना विभागा विभागांची चौकशी करण्यात यावी.

**श्री. गौतम खरात :** स. सभासद श्री. मुश्ताक अहमद यांनी सभागृहात मांडलेल्या सुचनेबाबत मी पूर्णपणे सहमत आहे.

**मा. सभापती :** बांधकाम परवानगीसाठी संचिका दाखल केल्यानंतर रिकव्हरी किंवा त्रुटी काढून प्रकरण विलंबित ठेवणे. म्हणजे आपले काम झाले असे या विभागातील कर्मचाऱ्यांचे मत झाले आहे. अशा प्रकारे बांधकाम परवानगीची

प्रकरणे विलंबित राहिल्यामुळे शहरात होत असलेल्या विना परवानगी बांधकामास नगर रचना विभागच जास्त जबाबदार आहे. तेंव्हा स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे शहरातील नागरिकांना बांधकाम परवानगी मिळणे सोईचे व्हावे या दृष्टीने आणि या विभांतील कामकाजची चौकशी करण्यांकरिता खालील स. सभासद व अधिकाऱ्यांचा समावेश असलेली एक उप समिती नेमण्यांस मंजुरी देण्यात येते.

| | |
|---|---|
| श्री. प्रदिपकुमार जैस्वाल | सभापती, स्थायी समिती |
| श्री. महंमद मुश्ताक अहमद | सदस्य, स्थायी समिती |
| डॉ. भागवत कराड | सदस्य, स्थायी समिती |
| मुख्य लेखा परिक्षक | |
| विधी सल्लागार | |

उक्त उप समितीने आपल्या कामाचा २५ दिवसांच्या आत अहवाल सादर करावा.

**श्री. प्रभाकर विधाते :** शहरातील नागरिकांना बांधकाम परवानगी मिळणे सोईचे व्हावे. यादृष्टीने कायम करण्यांत आलेल्या उप समिती प्रमाणे मालमत्ता विभागांतील नागरिकांची कामे सोईचे व्हावे, म्हणून एक उप समिती कायम करण्यांत यावी.

**श्री. गौतम खरात :** महापालिकेच्या उत्पन्नात भर टाकणारा जकात विभाग हा महत्वाच विभाग आहे. आजच्या स्थानिक वृत्तपत्रांमध्ये या विभागाच्या कामाबाबत एक बातमी प्रसिध्द झाली आहे. यापूर्वीही जकात विभागाच्या कामाकाजाबाबत अनेक बातम्या स्थानिक वृत पत्रात प्रसिध्द झाल्या आहेत. प्रशासनांतर्फे जकात वसुलीसाठी देण्यांत आली आहे. परंतु या विभागांचे लेखा परिक्षण अद्याप झालेले नाही. तेंव्हा महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर नाही. तेंव्हा महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर टाकणाऱ्या अशा जकात विभागांच्या कामकाची चौकशी करण्यासाठी एक समिती कायम करण्यात यावी.

**मा. सभापती :** स. सभासदांनी सुविल्याप्रमाणे जकात विभागांच्या कामकाजाची तपासणी करण्यांसाठी दि. ३० ऑगस्ट, १९९५ रोजी स्थायी समितीच्या सर्व सभासदांतर्फे तपासणी करण्यांत येणार आहे. असा निर्णय यापूर्वीच घेण्यात आलेला आहे.

**डॉ. भागवत कराड :** माझ्या एका मित्राने जकात करा पोटी १७००० चा भरणा केला आहे. त्याबाबत संबंधितास रितसर पावतीही मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार इंदिरा बँकेत एक खात होतं. या खात्यावरील रक्कम सहा महिण्यांच्या आंत चेकद्वारे काढण्यांत आली आहे. याबाबत आम्ही चौकशीही करत आहोत. तसेच दैनिक लोकमत मध्ये याविषयीची बातमी प्रसिध्द झाली आहे.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** दि. २८-०८-९५ च्या महानगर या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जकात कराच्या बातमीबाबत खुलासा करण्यांत यावा. मिळालेल्या माहितीप्रमाणे या कंपनीस न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे फक्त एक वर्षासाठीच दीड टक्का दराने जकात कर वसूल करण्यांचे आदेश आहेत. त्यानंतरच्या कालावधीसाठी नाही.

**मा. सभापती :** स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे न्यायालयीन प्रकरण असल्यामुळे विधी सल्लागार यांना पत्र दिले आहे. याबाबत पुढील सभेत त्यांच्यातर्फे माहिती मिळेल.

मागील सभेत ठरल्याप्रमाणे मुख्य लेखा परिक्षक यांनी महानगरपालिका जमा खर्चाचा हिशोब दाखल केला आहे. त्याबाबत सभासदांनी चर्चा करावी.

**श्री. प्रकाश निकाळजे :** शहरात मनपा तसेच शासनाच्या अनेक जागा आहेत या जागांवर विना परवानगी बांधकाम होते. या विना परवानगी बांधकामाबाबत इमारत निरिक्षक जाणून बुजून कानाडोळा करतात व असा बांधकामाबाबत चिरीमिरी घेतात. अशा रितीने महानगरपालिका तसेच शासनाच्या जागेवर विना परवानगी बांधकामाबाबत प्रोत्साहन मिळत आहे. याशिवाय मालमत्ता विभागाकडे महानगरपालिकेच्या जागा, टेबल, खुर्च्या, आलमाऱ्या इत्यादी साहित्य किती आहेत, याबाबतची अद्यावत माहिती व चौकशी करण्यांसाठी एक उप समिती नेमण्यांत यावी. तसेच मालमत्ता अधिकारी यांना एक स्वतंत्र्य वाहन देण्यात यावे.

**मा. सभापती :** स. सभासदांने सुचविल्याप्रमाणे शहरातील महानगरपालिकेच्या जागा व इतर साहित्याबाबत, साहित्याची माहिती घेणे व चौकशी करणे या करिता खालील स. सभासद अधिकारी यांचा समावेश असलेल्या एक उप समिती कायम करण्यांस मंजुरी देण्यांत येते.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गौतम खरात | सदस्य स्थायी समिती |
| २) | श्री. प्रकाश निकाळजे | -//- |
| ३) | श्री. हमीदउद्दिन ताबा | -//- |
| ४) | श्री. सुभाष कच्छवाह | -//- |
| ५) | उप. आयुक्त -२ | |
| ६) | प्रशासकीय अधिकारी | |

सदर समितीने आपला अवाल २० दिवसांच्या आंत दाखल करावा.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** ठराव क्रमांक ४५/५ दिनांक १०/०७/९५ मध्ये खरेदी करावयाच्या "सिमेंटच्या, वजन गोण्याची संख्या या बाबत कमी जास्त फरक आढळून आल्यास सभागृहास सूचना द्याव्यात" अशी नोंद करण्यात आली आहे. याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्र्यातर्फे आयोजित केलेल्या सभेस माझ्या पूर्व परवानगीने शहर अभियंता तसेच कार्यकारी अभियंता हजर राहण्यासाठी गेले आहेत. त्यामुळे स. सभासदांच्या सुचनेबाबत पुढील सभेत खुलासा करण्यात येईल.

**श्री. गौतम खरात :** सभागृहात झालेल्या चर्चेबाबत इतिवृत्तामध्ये नोंदघेण्यात येते, त्यानंतर पुढील सभेत सभासदांनी प्रश्न विचारला तरच गतसभेच्या सुचनेबाबत उत्तर दिले जाते. वस्तुतः सभासदांतर्फे करण्यांत आलेल्या सुचनांच्या वेळी संबंधित अधिकार अथवा त्यांचे प्रतिनिधी सभागृहात उपस्थित असतात. तेंव्हा सभागृहातर्फे सभागृहात उपस्थित असतात. तेंव्हा सभासदातर्फे सभागृहात दिलेल्या सुचनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी अथवा प्रतिनिधींनी सूचनांची योग्य तो आभ्यास करून आगामी सभेत त्याबाबत खुलासाकरावा, म्हणजे चर्चेमध्ये सभागृहांचाव प्रशासनांचा वेळ जाणार नाही.

**मा. सभापती :** स सभासदांनी सुचविलेल्या सुचनेची सर्व संबंधित अधिकारी व प्रतिनिधी यांनी नोंद घ्यावी व आवश्यक तो खुलासा लेखी अथवा तोंडी करावा. तसेच ठराव क्र. ४८/८ दिनांक १०-०७-९५ मध्ये रुपये ३५००/- या ठरावित वेतनावर काम करणा४या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पूर्ण वेळ काम करावे. तसेच सदरील वैद्यकीय अधिकारी एम.बी.एस/बीएम.एस. उत्तीर्ण असावा, अशी वाढ करण्यांस मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक १०-०७-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेतील ठराव क्र. ४८/८ मध्ये रुपये ३५००/- या ठराविक वेतनावर काम करणाऱ्यां वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पूर्ण वेळ काम करावे. तसेच सदरील वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस./बी.एम.एस. उत्तीर्ण असावा, अशी वाढ करण्यांस दिनांक १०-०७-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५३/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. मिलिंद नगर स्लम भागातील व्हीटाईप गटार दुरुस्त करणे, रोड क्रॉसिंगवर आर.सी.सी. स्लॅब टाकणे व प्रिकास्ट गटार बांधणे करिता एकूण रक्कम रु. २,९९,१००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे दरसूची १९९३-९४ अन्वये तयार करण्यात आले असून मा. आयुक्त साहेबांनी दि. १५-०६-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेचे सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत खुली गटार या शिर्षा अंतगर्त रुपये ५०,००,०००/- (पन्नास लाखाची) तरतूद केली आहे. अंदाजपत्रक रुपये २,९९,१००/- प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मिलिंद नगर स्लम विभागातील व्हीटाईप गटार दुरुस्त करणे, रोड क्रॉसिंगवर आर.सी.सी. स्लॅब टाकणे व प्रिकास्ट गटार बांधणे इ. कामाकरिता रक्कम रुपये २,९९,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. कटकट गेट स्लम येथेि नविन खांडकी बसविणे व जुनी अव्यवस्थित खांडकीची दुरुस्ती करणे बाबत कामा करिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या १९९४-९५ च्या दर सुची सुनसा रक्कम रुपये २,१६,२३७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेब यांनी दिनांक २६-०६-९५ ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रुपये २,१६,२६७/- या मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** प्रशासनातर्फे मांडण्यात येणाऱ्या प्रस्तावास अंदाजपत्रकीय तरतुदीचा उल्लेख असतो. या अंदाजपत्रकीय तरतूदी बरोबर संबंधित विभागने अंदाजपत्रकीय तरतूदीतून आता पर्यंत या शिर्षकातून किती खर्च आला याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** स. सभासद श्री. महादेव सुर्यवंशी यांनी दिलेल्या सुचने बाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी यांनी योग्य ती दक्षता घ्यावी स सभागृहापुढे मांडण्यात येणा४या प्रस्तावात अर्थसंकल्पीय तरतूदी बरोबर या लेखा शिर्षातून आता पर्यंत झालेल्या खर्चाबाबत पुढील सभे पासून माहिती देण्याची दक्षता घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मी कटकटगेट स्लम येथे नविन खांडकी बसविणे व जुनी अत्यवस्थित खांडकीची दुरुस्ती करणेच्या कामाकरिता रक्कम रुपये २,१६,२६७/- च्या पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दादा कॉलनी येथे १५० व १०० मीमी व्यासाची ए.सी. व सी.आय. जलवाहिनी टाकवयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९२-९३ नुसार रक्कम रुपये २,९५,४००/- एवढ्याचे तयार करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाचा खर्च हा सन १९९५-९६ च्या भांडवली कामाच्या तरतूदी मधून करण्यांत येणार आहे. कार्यालयाची निविदा सूचना क्र. ६/९५ जी. की. दैनिक लोकमत, औरंगाबाद टाईम्स या वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यांतयेऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या, कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (११) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलंबद निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण दोन (२) सिलंबद निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा धारकांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सलीम पटेल | ४.५०% जास्त |
| २) | श्री. आर. एस. भाटीया | ४.९९% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या कमी दर हा श्री. सलीम पटेल यांचा आहे. परंतु त्यांनी दिलेला दर हा कार्यालयस जास्त वाटत असल्यामुळे दरा बाबत वाटाघाटी करण्यास बोलावण्यांत आले होते. त्यावेळी ठेकेदार, श्री. सलीम पटेल यांनी सदरचे काम हे अंदाजपत्रकीय दरानुसार करण्यास तयार असल्याचे मान्य करून लेखी संमती दिली आहे.

तरी वाटाघाटी अंतिच्या दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसार श्री. सलीम यांची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दादा कॉलनी येथे १५० व १०० मीमी व्यासाची ए.सी. व सी.आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरिता गुत्तेदार, श्री. सलीम पटेल यांचे बरोबर दरपत्रकाच्या दराबाबत झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो. नागसेननगर स्लम भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या मागील गल्ल्यामध्ये खांडकी रस्ते तयार करणे करिता एकूण रक्कम रुपये १,७३,५००/- चे ंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची

१९९५-९५ प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा. आयुक्त साहेब दि. १५-०६-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामा करिता महानगरपालिकेचे सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत नविन खांडकी रस्ते व शिर्षा अंतर्गत रुपये ३५,००,०००/- लाखाची तरतूद केली आहे. करिता प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागसेननगर स्लम भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या मागील गल्ल्यामध्ये खांडकी रस्ते तयार करण्याकरिता रक्कम रुपये १,७३,५००/- च्या अंदाजपत्रक सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो. ब्रिजवाडी येथे अस्तित्वात असलेल्या गटारीची विशेष दुरुस्ती करणे, रोड क्रॉसिंग पाईप बदलणे, दगडी गटार बांधणे या कामाकरिता एकूण र. रु. २,६०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मा. आयुक्त यांनी दि. ०५-०६-९५ रोजी मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेचे झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमाचे देखभाल दुरुस्ती या शिर्षाअंतर्गत १५,००,०००/- सन १९९५-९६ च्या अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे. करिता प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. ब्रिजवाडी येथे अस्तित्वात असलेल्या गटारीची विशेष दुरुस्ती करणे, रोड क्रॉसिंग पाईप बदलणे, दगडी गटार बांधणे या कामाकरिता रक्कम रुपये २,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. शताब्दी नगर स्लम येथे (अ-भाग) खडी रस्ते व (ब-भाग) डांबरी रस्ते करीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसूची नुसार रक्कम रु. (भाग-अ) खडी रस्ते करिता रु. ६७,६८२/- व (भाग-ब) डांबरी रस्ते करिता रु. ३,७७,५१०/- असे एकत्रित अदांजपत्रकीय रक्कम रु. ४,४५,१९२/- चे तयार सदरच्या अंदाजपत्रकास आयुक्त साहेबांनी दिनांक ०७-०७-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेले एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४,४५,१९२/- यास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. शताब्दी नगर स्लम येथे (अ-भागात) खडी रस्ते तयार करण्याकरिता रु. ६७,६८२/- व (ब-भागात) डांबरी रस्ते तयार करण्याकरीता रु. ३,७७,५१०/- असे एकूण रक्कम रु. ४,४५,१९२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. भिमनगर, भावसिंगपुरा स्लम येथे खडी रस्ते तयार करणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये १,४४,१३६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरच्या अंदाजपत्रकास आयुकत साहेबांकडून दि. ०७-०७-९५ ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रुपये १,४४,१३६/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीसताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भिमनगर, भावसिंगपुरा स्लम येथे खडी रस्ते तयार करण्यांच्या कामाकरिता रक्कम रुपये १,४४,१३६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगर बायजीपुरा स. न. २०,२५ येथे नविन खडी रस्ते तयार करणे व जुन्या रस्त्याची दुरुस्ती करणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९१-९२ च्या दरसूची नुसार रुपये ३,८२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असता, सदरच्या अंदाजपत्रकास प्रशासक साहेबांनी दि. ११-०४-९४ ला प्रशासकीय मान्यता दिली होती. सदरील कामाचा खर्च शासकीयस अनुदानातून करणे प्रस्तावित आहे. सदरील काम हाती घेण्यासाठी नियमानुसार निविदा मागविण्यांत येऊन तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराच्या श्री. व्यंकटेश कन्सट्रक्श यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची निविदेस मंजुरी देण्यात येऊन कामाचा आदेश देण्यात आला असता सदरील एजन्सीने सदर काम अर्धवट सोडून दिले. त्यामुळे यांच्या विरुध्द नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येऊन त्यांच्या कडून काम काढून घेण्यात आले व त्यांचा गुत्ता रद्द करण्यात आला.

शिल्लक राहिलेल्या या अंदाजपत्रकीय रक्कम रुपये२,८२,४३५/- कामासाठी जाहिरपणे निविदा सूचना जा.क्र. मनपा/मुलेप/६/९५ दि. ०५-०६-९५ नुसार फेर निविदा मागविल्या असता कोरे निविदा पत्रके विकण्यांच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (१५) निविदा विकल्या गेले व निविदा स्विकारण्यांच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) दोन निविदा प्राप्त झाल्या त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सलीम पटेल | ५% |
| २) | श्री. एस. पी. सरोदे | ८% |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त श्री. सलीम पटेल यांची आहे. नंतर मा. आयुक्त यांच्या आदेशानुसार एजन्सीस दराच्या वाटाघाटीसाठी बोलावण्यांत आले असता मा. आयुक्त यांच्या दालनात दरा बाबत चर्चा होऊन एजन्सीने सदर काम अंदाजपत्रकीय दराने करण्याबाबत संमती दर्शविली आहे. तरी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. सलिम पटेल यांची अंदाजपत्रकीय दराची निवदा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. इंदिरानगर बायजीपुरा स. न. २०,२५ येथे नविन खडी रस्ते तयार करणे व जुन्या रस्त्याचे काम मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन अर्धवट सोडून

दिल्यामुळे उर्वरित रुपये २,८२,४३५/- च्या कामासाठी मागविण्यात आलेल्या फेरनिविदा सुचनेनुसार प्राप्त झालेल्या पैकी मे. सलिम पटेल यांचेशी निविदा दरा बाबत झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त उर्वरित काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दराप्रमाणे करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१/१० :**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोगय विभाग शासन निर्णय क्र. एम.पी. डब्ल्यु. १०८२/५८८३(२) सेवा-६ दि. १२-०९-९५ अन्वये आरोग्य विभागातील विविध योजनांतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा एकिकृत सवंर्ग दि. ०१-०४-९५ पासून करण्यांत आला त्यात खालील ३ पदांचे एकीकृत संवर्ग "आरोग्य कर्मचारी" म्हणून घोषित करण्यात आला आणि या संवर्गातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दि. ०१-०४-९५ पासून रु. २५०-७-२८५-१०-३८५ विस्तार- १०-४३५ वेतन श्रेणी ऐवजी रु. २९०-१०-३९०-१५-४-६५-१५-५४० ही वेतन श्रेणी देण्यात आली.

| अ.क्र. | पदनांम | एकीकृत संवर्ग |
|---|---|---|
| १. | लसटोचक | आरोग्य कर्मचारी |
| २. | वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता | -//- |
| ३. | बहुउद्देशीय कर्मचारी | -//- |

वरील कर्मचाऱ्यांना चौथ्या वेतन आयोगानुसार दि. ०१-०१-८६ पासून रु. ९७५-२५-११५० द.से. -३०-१६६० ही सुधारित वेतन श्रेणी देण्यात आली आहे.

वरील एकाच संवर्गातील ३ पदापैकी अ.क्र. २ व ३ कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेने शासन निर्णयाप्रमाणे वेतन श्रेणी देऊन त्यांचे वेतन निश्चिती केली आहे. तथापी अ.क्र. १ वरील "लसटोचक" या पदास दि. ०१-०४-८५ व ०१-०१-८६ सुधारित वेतन श्रेणी देण्यात आलेल्या नाहीत.

करिता वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता व बहुउद्दिशिय कर्मचाऱ्यांप्रमाणेच लस टोचक पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दि. ०१-०४-९५ व दि. ०१-०१-८६ च्या वेतन श्रेण्या लागू करून त्यांचे दि. ०१-०१-८६ पासून वेतन निश्चिती करणे योग्य होईल यासाठी अंदाजे रु. ४६,१५५/- खर्च येईल थकबाकी रक्कमेपैकी ५०% रक्कम भविष्य निर्वाह निधी मध्ये जमा करणे योग्य होईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. एम.पी.डब्ल्यु. १०८२-५८८३ (१) सेवा-६ दि. २२-०९-९५ अन्वये आरोगय विभागातील विविध योजनांतर्गत काम करणा४या कर्मचाऱ्यांना एकीकृत संवर्ग दि. ०१-०४-८५ पासून करण्यात आल्यामुळे म.न.पा. प्रशासनास लसटोचक या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देय असलेल्या रुपये २५०-७-२८५-१०-३८५ विस्तार - १०-४३५ या वेतन श्रेणी ऐवजी दि. ०१-०४-८५ ते ०१-०१-८६ पर्यंत रु. २९०-१०-३९०-१५- ४६५-१५-५४० ही वेतन श्रेणी लागू करण्यास तसेच चौथ्या वेतन आयोगाप्रमाणे दि. ०१-०१-८६ पासून रु. ९७५-२५-११५० द. रो. ३०-१६६० ही आयोगाप्रमाणे दि. ०१-०१-८६ पासून रु. ९७५-२५-११५० द.रो. -३०-१६६० ही सुधारित वेतन श्रेणी लागू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. उक्त

श्रेणीनुसार लसटोचक या कर्मचाऱ्यांना थकीत असलेल्या देय रकमेपैकी ५०% रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या भ.वि.नि. मध्ये जमा करण्यांस मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका प्रा. शा. सिल्लेखाना येथील दुरुस्ती करणे व कुंपन भिंत बांधणे, जागा लेवलिंग करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९२-९३ चे जिल्हा दरसूची नुसार रक्कम रु. १,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्तांनी दि. ०४-०७-९५ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामाचे १,५०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. सदरचा खर्च सन १९९५-९६ मध्ये व्यापारी संकूल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून सुधारित अंदाजपत्रकामध्ये वाढवून दिलेल्या अर्थ तरतूदी मधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका प्रा. शा. सिल्लेखाना येथील दुरुस्ती करणे व कुंपन भिंत बांधणे, जागा लेवलिंग करणेच्या कामासाठी रक्कम रु. १,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही.

**विषय क्र. ६३/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, म.न.पा. प्रा. शा. ब्रिजवाडी या शाळेला दोन रुमची वाढ तसेच शौच्यालय व मुताऱ्या बांधणेच्या कामासाठी ठराव क्र. ३२९/दि. २८-०४-९५ अन्वये रक्कम रुपये ३,२९-५५१/- चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्रमांक मनपा/मुलेप/२९५ दिनांक २०-०५-९५ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (१०) निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि. ३१-०५-९५ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अब्दुल सत्तारखान | ७% |
| २) | मे. रुबी कन्स्ट्रक्शन | १८% |

तुलनात्मकदृष्ट सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त दराची श्री. अब्दुल सत्तारखान यांची निविदा आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे कार्यालयीन पत्र क्र. मनपा/३अ/इ/६८३/९५/ दि. १३-०६-९५ अन्वये गुत्तेदारास मा. आयुक्तांचे दालनात दि. १४-०६-९५ ला दराचे वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले असता वाटाघाटी अन्वये सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% ऐवजी २% जास्त दराने करण्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. परंतु गुत्तेदाराने दि. १४-०६-९५ ला लेखा पत्र देऊन विनंती केली की, मी सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त ऐवजी ६% जास्त दराने करण्यांस तयार आहे. कारणसदर कामाचे दर हे जुने म्हणजे ९२-९३ चे दर असून चालू वर्षाच्या दर सुची प्रमाणे तुलना केल्यास सदरचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% कमी होतात म्हणून सदरील

काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त ऐवजी ६% जास्त दराने करण्यास गुत्तेदारने संमती दर्शविली व त्यास मा. आयुक्तांनी दि. १८-०६-९५ अन्वये मंजुरी दिली.

सबब सदर कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त ऐवजी दराचे वाटाघाटी अन्वये ६% जास्त दाराची श्री. अब्दुल सत्तार खान यांची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव मंजुरीस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म.न.पा. प्रा. शा. ब्रिजवाडी या शाळेला दोन रुमची वाढ करणे तसेच शौच्यालय व मुताऱ्या बांधणे इत्यादी कामासाठी प्राप्त झालेल्या दरपत्रकांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारक श्री. अब्दुल सत्तारखान यांचे दिनांक १४-०६-९५ च्या लेखी संमती पत्रानुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून वाटघाटी नुसार ७% जास्त ऐवजी ६% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४/१३ :**

कार्यकारी अभियंता, (पाणी पुरवठा व जलनि:सारण) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स्टँडर्ड सिल्क मिल कॉलनी येथे बटार बांधणेचे कामासाठी निविदा सुचना क्र. मनपा/मुलेप/७/९५ दि. १९-०६-१९९५ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविण्यात आली असता, विक्री झालेल्या सतरा निविदा पत्रकापैकी दर भरलेल्या चार निविदा प्राप्त झाल्या आहेत प्राप्त निविदा पैकी गुत्तेदार "प्लॅनवेल कन्स्ट्रक्शन" यांचे निविदेचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदापत्रकाचे २०.९१% कमी दराची प्लॅनवेल कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्टँडर्ड सिल्क मिल कॉलनी येथे बटार बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदापत्रकाच्या दरापेक्षा २०.९१% कमी दराच्या मे. प्लॅनवेल कन्स्ट्रक्शन यांची निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५/१४ :**

कार्यकारी अभियंता, (पाणी पुरवठा व जलनि:सारण) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. मछलीखडक, रंगारगल्ली व पानदरीबा येथील ड्रेनेज लाईन बदलणेचे कामासाठी निविदा सूचना क्र.मनपा/मुलेप/७/९५ दिनांक १९-०६-१९९५ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविण्यांत आली असता. विक्री झालेल्या दोन निविदा पत्रकापैकी दर भरलेल्या दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदापत्रकापैकी दर गुत्तेदार, श्री. देविदास पुरुषोत्तम भाले यांचे निविदेचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. देविदास पुरुषोत्तम भाले यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मछली खडक, रंगारगल्ली व पानदरीबा येथील ड्रेनेज लाईन बदलण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या श्री. देविदास पुरुषोत्तम भाले यांच्या निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६६/१५ :**

कार्यकारी अभियंता, (पाणी पुरवठा व जलनि:सारण) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पैठणगेट सादिया टॉकिज जवळ, तेली मंगल कार्यालया पाठीमागे ड्रेनेज लाईन टाकणेचे कामासाठी निविदा सूचना क्र. मनपा/मुलेप/७/९५ दिनांक १९-०६-९५ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविण्यांत आली असता. विक्री झालेल्या सहा निविदा पत्रकापैकी गुत्तेदार, श्री. कादरी सय्यद कमरुद्दिन यांचे निविदेचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. कादरी सय्यद कमरुद्दिन यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट सादिया टॉकिज जवळ, तेली मंगल कार्यालया पाठीमागे ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. कादरी सय्यद कमरुद्दिन यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो. राहुलनगर स्लम भागात खांडकी रस्ते तयार करणे व दुरुस्त करणे या कामाकरिता एकूण रक्कम रु. २,११,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून मा. आयुक्त यांनी दि. ३०-०६-९५ रोजी मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेचे झोपडपट्टी सुधारना कार्यक्रमाचे नविन खांडकी रस्ते वया शिर्षा अंतर्गत ४५,००,०००/- सन १९९५-९६ च्या अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे. करिता प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राहुलनगर स्लम भागात खांडकी रस्ते तयार करणे व दुरुस्त करणे व दुरुस्ती करण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये. २,११,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो. रमानगर येथील डांबरीकरण करण्याचे कामाकरिता एकूण रु. ४,९०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मा. आयुक्त यांनी दि. २५/०५/९५ रोजी मान्यता दिली आहे. करिता प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेचे झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत १,००,००,०००/- सन १९९५-९६ च्या अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे. करिता प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रमानगर येथील डांबरीकरण करण्याचे कामाकरिता रक्कम रु. ४,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९/१८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिल्क मिल कॉलनी येथील जलकुंभास संरक्षित भिंत बांधावयाची आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची सन

१९९२-९३ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. १,२९,५००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी दैनिक वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तेरा (१३) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण पाच (५) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. यु. जी. वाईकर | ११% जास्त |
| २) | श्री. बदरबिन सलिम | ८.९% कमी |
| ३) | श्री. आर. डी. माने | १२.२४% कमी |
| ४) | मे. एस. एच. असोसिएटस | ९.५५% कमी |
| ५) | श्री. काजी नूर मोहियोद्दिन | ५% कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर श्री. आर. डी. माने यांचा होता परंतु त्यांनी दिनांक २२-०५-९५ रोजी पत्र देऊन असे कळविले की, ते अजारी असल्यामुळे सदरचे काम ते करू शकत नाही. त्यामुळे तुलनात्मकदृष्ट्या दुसऱ्या क्रमांकाच्या कमी दरामध्ये म्हणजेच १२.२४% कमी या दरात आपण काम करण्यात तयार आहात काय याची विचारणा केली असता त्यांनी या दरामध्ये काम करण्यास तयारी दर्शविलेली असून लेखी पत्र दिलेले आहे.

तरी मे. एच. असोसिएटस यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.२४% कमी दरामध्ये निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमिल्क कॉलनी येथील जलकुंभास संरक्षित भिंत बांधणे गुत्तेदार श्री. आर. डी. माने हे अजारी असल्यामुळे सदर काम करू शकत नसल्याचे संबंधिताचे दि. २२-०५-९५ रोजीच्या पत्रकान्वये कळविल्यमुळे उक्त काम दुसऱ्या क्रमांकाचे गुत्तेदार मे. एस. एच. असोशिएटस यांचे कडील लेखी संमती नुसार अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १२.२४% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०/१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बनेवाडी गावात खडी रस्ते तयार करणे करिता एकूण र. रु. २,५७,०००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग यांची दरसूची १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यात आले असून मा. आयुक्त साहेबांनी दिनांक ३०-०६-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेचे सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत (१८ खेडी विकास कार्यक्रम) या शिर्षा अंतर्गत रु. २,२०,०००/- तरतूद केली आहे. अंदाजपत्रक र. रु. २,५७,०००/- प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बनेवाडी गावात खडी रस्ते तयार करण्याच्या कामाकरिता रककम रुपये २,५७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१/२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो. रमानगर येथील नविन खांडकी रस्ते तयार करणेव अस्तित्वात असलेली खांडकी रस्ते दुरुस्त करणेकरिता रक्कम रु. ४,७६,०००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांच्या दरसूची १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यात आले असून मा. आयुक्त साहेबांनी दि. १४-०६-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महापालिकेचे सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत नविन खांडकी रस्ते या शिर्षा अंतर्गत रु. ३५,००,०००/- लाखांची तरतूद केली आहे. अंदाजपत्रक रु. ४,७६,०००/- प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. रमानगर येथे नविन खांडकी रस्ते तयार करणे व अस्तित्वात असलेली खांडकी रस्ते दुरुस्त करण्याच्या कामाकरिता रक्कम रु. ४,७६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२/२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो. बनेवाडी गावात खांडकी रस्ते तयार करणे व जुने खांडकी रस्ते दुरुस्त करणेकरिता एकूण १,६७,०००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यात आले असून मा. आयुक्त साहेबांनी दि. ०४-०७-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिका सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत नविन खांडकी रस्ते या शिर्षा अंतर्गत रु. ३५,००,०००/- लाखांची तरतूद केली आहे. अंदाजपत्रक रु. १,६७,०००/- प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बनेवाडी गावात खांडकी रस्ते तयार करणे व जुने खांडकी रस्ते दुरुस्त करणेच्या कामाकरिता रक्कम रुपये १,६७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३/२२ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, के. प्रा. शाळा किराडपुरा-१ येथे बालवाडीत मुलांची संख्या १२७ झाली आहे. तसेच अजुनही मुलांची दाखल्यासाठी गर्दी होत आहे. तरी सदरील शाळेत एका बालवाडी शिक्षिकेचे पद निर्माण करण्यास प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**संवाद :**

**श्री. हमीद उद्दिन ताबा :** के. प्रा. शाळा किराडपुरा येथे नियुक्त करण्यात असलेल्या शिक्षिके पैकी एक शिक्षिका कामावर, रुजू झाली नाही, तेंव्हा येथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची काय सोय करण्यात आली याचा खुलासा व्हावा.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** आजच्या सभेत पद निर्माण करण्यांचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. ब्रिजवाडी नारेगांव या भागात बालवाडी मध्ये ५०/६० विद्यार्थी प्रवेश घेण्यास तयार आहे. या व्यतिरिक्त एका बालवाडी वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या १११

आहे. या विभागातील विद्यार्थी संख्येनुसा बालवाडी शिक्षिकांची नेमणूक करण्याचा प्रस्ताव सभागृहापुढे मांडलेल्या प्रस्तावात बरोबर मांडणे आवश्यक होते. याबाबत आवश्यक ती मागणी संबंधित विभागाकडे गेली आहे. तसेच ब्रिजवाडी, नारेगांव या शाळेतील मुख्याध्यापकांची बदली करण्यात आली असून त्या जागेवर पर्यायी मुख्याध्यापकाची व्यवस्था करण्यांत आलेली नाही.

**शिक्षणाधिकारी** : स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे मुख्याध्यापकांचा आदेश काढण्यात आला आहे. तथापी आचार संहिता लागू असल्यामुळे या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही. तेंव्हा येत्या आठ (८) दिवसात या प्रकरणी कार्यवाही करण्यात येईल. नारेगांव, ब्रिजवाडी येथील शाळेकरिता बालवाडी शिक्षकांची नेमणूक करण्यात आली होती परंतु २/३ दिवस काम केल्यानंतर संबंधित शिक्षिका उक्त शाळेवर पुन्हा हजर झाल्या नाहीत.

**श्री.सुदाम सोनवणे :** नारेगांव, ब्रिजवाडी येथील बालवाडी करिता अपंग शिक्षिकेची नेमणूक करण्यात आली होती. सदर शिक्षिका अपंग असल्यामुळे नारेगांव, ब्रिजवाडी शाळेवर संबंधित शिक्षिकेस दूर होते म्हणून त्याबाबत संबंधित विभागास सुचना केली होती.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** शिक्षणाधिकारी यांनी बालवाडी शिक्षिकेचे पद निर्माण करण्याचा प्रस्ताव ठेवण्यापेक्षा मनपाच्या सर्व शाळांचा सर्वे करून पद निर्मिती बाबतचा ठराव ठेवावा.

**मा. सभापती :** विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची शिक्षणाधिकारी यांनी दक्षता घ्यावी, आणि नारेगांव, ब्रिजवाडी येथील शाळेकरिता पर्यायी बालवाडी शिक्षकांची व्यवस्था करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे के. प्रा. शाळा किराडपुरा नं. १ येथे बालवाडीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळे या शाळेकरिता बालवाडी शिक्षिकेची एक पद निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा भाजी मंडई औरंगपुरा येथील दुकानांची दुरुस्ती करण्याचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९२-९३ चे जिल्हा दरसूची नुसार रक्कम रु. २,८४,८३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले सून त्यास मा. आयुक्तांनी दि. ०६-०७-९५ ला मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामाचे २,८४८३०/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल या सदरातून वाढवून दिलेल्या अर्थ तरतूदीतून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म.न.पा. भाजी मंडई औरंगपुरा येथील दुकानांची दुरुस्ती करण्याच्या कामासाठी रक्कम रुपये २,८४,८३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ७५/२४ :**

आयुक्त महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्राहलयात वन्य जिवनावरील चित्रपटकरिता एक मिनी थियटर तयार करण्यात आले,

असून सदर थियटरमध्ये व्हिडियो प्रोजेक्टर उभारण्यांकरिता उत्पादकांकडून दर मागविण्यात आले असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | बी.पी.एल. लिमिटेड (स्थानिक विक्रेते) | २,८९,८९५/- |
| २) | इन्टेल (विनियोग प. क्र. स्थानिक विक्रेते) | २,५०,०००/- |
| ३) | सिन्कलेटर (अमृत इन्टरप्राईजेस स्थानिक विक्रेते) | २,४९,०००/- |

सदर प्रोजेक्टसाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद चे तज्ञाकडून पडताळणी करण्यांत आली असून सर्वात कमी दर असलेले कंपन्याचे प्रोजेक्टर खरेदी करण्याबद्दल संमती दर्शविली आहे.

तरी मिनि थियटरसाठी लागणारे व्हिडीया प्रोजेक्टर "सिन्कलेर" (अमृत इन्टरप्राईजेस) सर्वात कमी दर असल्यामुळे यांचेकडे खरदी करण्यांची शिफारस करण्यांत येते. सदर खर्च मिनी थिएटर या बजेट मधून करण्यांत येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्राहलयात वन्य जिवनावरील चित्रपटकरिता तयार करण्यात आलेल्या मिनी थियटरमध्ये आवश्यक व्हिडियो प्रोजेक्टर खरेदी करण्याकरिता मे. अमृत इन्टरप्राईजेस प्रोजेक्टर यांचे "सिन्कलेर" (व्हिडीयो प्रोजेक्टर करिता रुपये २,४९,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६/२५ :**

मा. आयुक्त महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्राहलयात एक वन्य जिवन चित्रपटगृह सुरू होत आहे. सदर चित्रपटगृहात प्रवेशाकरिता प्रवेशशुल्क आकारण्याकरिता खालीलप्रमाणे दराची शिफारस केली आहे.

| | |
|---|---|
| प्रौढांकरिता | रु. २=०० |
| लहान मुलांकरिता (१२ वर्षा खालील) | रु. १=०० |

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे प्राणी संग्राहलयातील चित्रपटगृहातील प्रवेशाकरिता खालील प्रमाणे प्रवेश शुल्क आकारण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | |
|---|---|
| प्रौढांकरिता | रु. २=०० |
| लहान मुलांकरिता (१२ वर्षा खालील) | रु. १=०० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७/२६ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण) महानगरपालिका यांनी मोहल्ला शेख खान कॉलनी ते डॉ. रझवी यांच्या घरापर्यंत ३०० मी.मी. व्यासाची आर. सी. सी. अर्धगोलाकार गटारीच्या कामाकरिता रक्कम रुपये २,३२,०००/- चे अंदाजपत्रक सादर केले आहे.

सदरील काम झोपडपट्टी आणि शहरातील इतर भागामध्ये खुल्या गटारी बांधणे या आर्थिक शिर्षकाखाली प्रस्तावित आहे. सदरील कामास मा. आयुक्त साहेबांनी दि. २५-०८-९५ ला मंजुरी दिलेली आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शेरखान कॉलनीतील डॉ. रझवी यांच्या घरापर्यंत ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. अर्धगोलाकार गटार बांधण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये २,३२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर दिला की, मो. शेरखान कॉलनी जुना बायजीपुरा खांडकी दुरुस्ताकरणे, नविन बसविणे व खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दर सूचीनुसार रक्कम रुपये २,५३,०००/- चे अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे. तरी कृपया अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता मिळावी. सदरील खर्च सन १९९५-९६ च्या अंदाजपत्रकातील रस्ते व दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षाखाली करण्यात येईल.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रशासनातर्फे खांडकी रस्ते बसविण्याचे अनेक प्रस्ताव आजच्या सभागृहापुढे चर्चेसाठी आहेत, प्रत्यक्षात खांडकीचे काम करतांना येणाऱ्या अडचणी वाहतुकीसाठी होणाऱ्या अडथळा या बाबींचा विचार करता प्रशासनातर्फे ज्या भागांत खांडकी बसविण्यांऐवजी रस्ते तयार करणे शक्य असेल अशा ठिकाणी रस्ते तयार करण्यांचे प्रस्ताव प्रशासनाने दाखल करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शेरखान कॉलनी जुनाबाजार भागात खांडकी रस्ते दुरुस्त करणे, नविन खांडकी बसविणे व खडी रस्ते तयार करण्यांच्या कामासाठी रक्कम रु. २,५३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९/२८ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. घाटी जयभिमनगर स्लम येथे नविन खांडकी बसविणे व जुनी खांडकी काढून परत बसविणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये १,९४,७६९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेब यांची दिनांक १४-०८-९५ ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रुपये १,९४,७६९/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी जयभिमनगर स्लम भागात नविन खांडकी बसविणेच्या कामाकरिता रक्कम रुपये १,९४,७६९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८०/२९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विशेष शासकीय अनुदान अंतर्गत सन १९८९-९० मध्ये जालना रोडच्या दक्षिणेस ते बनेवाडी भाग ३ असलेल्या नाल्यांच्या ट्रंकपर्यंत मुख्य जलनि:सारण वाहिणी टाकणाऱ्या प्रस्ताव रक्कम रु. २०.६४ लाखाचे तयार करण्यात आलेला होता.

सदरील काम श्री. एल. एम. पडघन यांनी दि. ३०-०३-९१ च्या स्थायी समितीच्या मंजुरीनुसार देण्यात आलेले होते.

ठेकेदाराने काम मुदतीत पूर्ण केले नाही म्हणून दि. २६-०३-९३ रोजी निविदा रद्द केली व पुढील उर्वरित काम नविन निविदा मागवून ठेकेदारांच्या जबाबदारीवर व त्यांच्या किंमतीचे (ॲट हिज रिस्क ॲड कास्ट) करून घेण्यात आले आहे.

श्री. एल. एम. पडघ्ज्ञन यांचे झालेल्या कामाचे देयक अद्याप त्यांना दिले गेले नाही. त्यांचे एकूण देयक रक्कम रु. ९,६०,६५४/- महानगरपालिकेस देणे बाकी आहे. झालेल्या कामाची नोंद एम.बी.क्र. ७९ पृष्ट क्र. १ ते २१ वर घेतली असून कार्यकारी अभियंता व उपअभियंता (त्या वेळचे) यांनी प्रमाणित केले आहे. मा. आयुक्त यांनी देयक स्थायी समितीतर्फे मंजूर घेऊन मग देयक द्यावे असे आदेशित आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोड दक्षिण बाजु बनेवाडी भाग-३ असलेल्या नाल्यांच्या ट्रंकपर्यंत मुख्य जलवाहिणी टाकण्याचे काम दि. ३०-०३-९१ च्या स्थायी समितीच्या मंजुरीनुसार गुत्तेदार श्री. एल. एम. पडघन यांनी देण्यात येऊनही संबंधिताने मुदतीच्या आत काम पूर्ण न केल्या मुळे उर्वरित काम ठेकेदारांच्या जबाबदारीवर त्यांच्या किंमतीने (ॲड हिज रिस्क ॲड कॉस्ट) करून घेण्यात आले असल्यामुळे गुत्तेदार श्री. एल. एम. पडघन यांचे झालेल्या कामाचे देयक रु. ९६०६५४ (एम.बी.नं. ७९ पान क्र. १ ते २१ वरील त्यावेळचे कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे) संबंधितास अदा करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१/३० :**

मा. आयुक्त यांच्याशी समक्ष चर्चा केल्यानुसार इयत्ता ४ थी मध्ये मराठी व उर्दू माध्यमाचे गुणाक्रमे विद्यार्थी निवडून त्यांना रु. ४०/- शिष्यवृत्ती देणे असल्याने सन १९९४-९५ मध्ये महानगरपालिकेच्या शाळेतील इयत्ता ४ थील मध्ये शिकणारी माध्यम निहाय विद्यार्थी खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| मराठी माध्यम | ३२५२ |
| उर्दू माध्यम | ९८१ |
| एकूण | **४२३३** |

माध्यम निहाय विद्यार्थ्याचे प्रमाण मराठी ७६% व उर्दू २४% आहे सन १९९४-९५ या वर्षी महानगरपालिकेने महानगरपालिका शाळेतील इयत्ता ४ थी विद्यार्थ्यासाठी खास शिष्यवृत्ती परिक्षा घेऊन त्यात गुणानुक्रमे पहिल्या १०० विद्यार्थ्यांना महानगरपालिका निधीतून दरमहा रु. ४०/- (इ. ५ वी, ६ वी व ७ वी पर्यंत) शिष्यवृत्ती काही अटींच्या अधिन राहून मराठी व उर्दू माध्यमांचे एकूण १०० यशस्वी परिक्षार्थी यांना सन १९९५-९६ या शिष्यवृत्ती द्यावयाची आहे. मराठी माध्यमातून प्रवेश घेणाऱ्या परिक्षार्थ्यांना ६८.३% गुण प्राप्त केले असून उर्दू माध्यमांच्या परिक्षार्थयांनी ७९.६% गुण प्राप्त केले आहे.

पटसंख्येच्या प्रमाणांनुसार शिष्यवृत्तीचे वाटप करणे झाल्यास मराठीचे ५६ व उर्दू माध्यमांचे २४ विद्यार्थी निवडावे लागतील. परंतु मराठी माध्यमांत ७६ गुणवंत विद्यार्थी (५०%

च्या वर गुण प्राप्त करणारे) नाहीत. त्यासाठी मराठी माध्यमातून ७६ पेक्षा कमी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळेल. उर्वरित जागा रिक्त ठेवून उर्दूच्या २४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती या वर्षाच्या जून पासून देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

तसेच प्राप्त गुणांची अट ७०% हुन ५०% वर आणणे योग्य होईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९४-९५ मध्ये महानगरपालिकेच्या शाळेतील इयत्ता ४ थी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यासाठी घेण्यात आलेल्या खास शिष्यवृत्ती परिक्षेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यापैकी गुणाक्रमे पहिल्या १०० विद्यार्थ्यांना माध्यमनिहाय (मराठीचे ७६ व २४ विद्यार्थी) रु. ४०/- दरमहा या प्रमाणे (इ. ५वी, ६वी व ७ वी पर्यंत) महानगरपालिका निधीतून काही खास अटीच्या अधिन राहून शिष्यवृत्ती देण्यांचे ठरले असले तरी सन १९९४-९५ मध्ये मराठी माध्यमातून ५०% च्या वर गुण प्राप्त करणारे ७६ गुणवंत विद्यार्थी नसल्यामुळे मराठी माध्यमातून उर्वरित जागा रिक्त ठेवून ५०% च्या वर गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि उर्दू माध्यमाच्या २४ विद्यार्थ्यांना यावर्षीच्या जून पासून शिष्यवृत्ती देण्यांतस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच चालू वर्षापासून शिष्यवृत्तीसाठी प्राप्त गुणांची अट ७०% ऐवजी ५०% निश्चित करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२/३१ :**

मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका शहर हद्दितील विविध प्रभागामध्ये पथदिव्यांसाठी ३०० गर्डर पोल रोवण्याचे कामाचे रुपये ४,५०,०००/- रक्कमेचे खर्च अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर खर्च सन १९९५-९६ वर्षा करण्यांत येईल या कामासाठी दरपत्रके मागविली असता. आलेल्या दराचे वाटाघाटी अंती (मा. आयुक्तांचे दालनांत) मे. परवेज इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांनी प्रतिपोल रुपये १,५००/- प्रमाणे काम करण्यांत आलेल्या रु. ४,५०,०००/- अंदाजपत्रकीय खर्चास व मे. परवेज इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचेकडून प्रति नग रु. १,५००/- प्रमाणे पोल रोवण्यांचे काम करून घेण्यांस रुपये ४,५०,०००/- प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या हद्दितील विविध प्रभागामध्ये पथदिव्यांसाठी ३०० गर्डर पोल रोवण्यांच्या कामाकरिता रक्कम रुपये ४,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास आणि निविदादराबाबत झालेल्या वाटाघाटी नुसार प्रति पोल रोवण्याचे काम मे. परवेज इलेक्ट्रीकल औरंगाबाद यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८३/३२ :**

महानगरपालिका सभाकक्ष विभागामार्फत वेळोवेळी स्थायी समिती, सर्वसाधरण सभा व विशेष सभांचे आयोजन करावे लागते. कायद्यानुसार सदर सभांचे विषयपत्रिका इतिवृत्तांत स. सभासदांना विहित मुदतीचे आत वितरीत करणे बंधनकारक तथा आवश्यक असते वत्या दृष्टीपे सभाकक्ष विभागांचे कर्मचाऱ्यांना प्रत्येक सभेची पूर्वतयारी वेळेच्या आंतच पूर्ण करावी लागते.

अन्य महानगरपालिकांमध्ये सभाकक्ष विभागांतील कर्मचाऱ्यांना ठराविक विशेष भत्ता अदाई करण्यांत येतो. औरंगाबाद महानगरपालिकेचे इतर काही विभागांमध्ये सुध्दा विहित

वेळेत काम पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना २०% अतिरिक्त भत्ता देण्यात येतो. त्याच धर्तीवर सभाकक्ष विभागामधील कार्यरत कर्मचारी तसेच ज्यांचेकडून स्थायी समिती तथा सर्वसाधारण सभांची पूर्वतयारी पूर्ण करून घेण्यात येते. अशा कर्मचाऱ्यांना मिान दरमहा २०% विशेष भत्ता अथवा अन्य महापालिकेप्रमाणे ठराविक भत्ता मंजूर करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सभाकक्ष विभागामार्फत वेळोवेळी स्थायी समिती, सर्वसाधरण सभा व विशेष सभेचे विषय पत्रिका इतिवृत्त, इत्यादी माहिती सभासदांच्या विहित मुदतीच्या आंत वितरण करणे बंधनकारक तथा आवश्यक असल्यामुळे, सभाकक्षातील कर्मचाऱ्यांना प्रत्येक सभेची पूर्व तयारी वेळेच्या आत पूर्ण करावी लागते या दृष्टीने सभाकक्षांत काम करणाऱ्यांना दरमहा २०% प्रमाणे माहे मे. १९९५ पासनू विशेष भत्ता अदा करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**श्री. प्रभाकर विधाते :** गणेश उत्सवाच्या वेळी यापूर्वी नगर सेवकांच्या सुचनेनुसार महानगरपालिकेतर्फे प्रभागांत आवश्यक त्या ठिकाणी हॅलोजन बल्प लावण्याची प्रथा या पूर्वी अस्तित्वात होती. त्यानुसार चालू वर्षाच्या गणेश उत्सवामध्ये हॅलोजन बल्प लावण्याबाबत विद्युत विभागांकडून मागणी केली आहे. त्याबाबत अद्याप कुठलीही कार्यवाही झालेली नाही.

**अति. शहर अभियंता उप अभियंता (विद्युत) :** गणेश उत्सवाच्या निमित्याने शहरात होणाऱ्या विविध विद्युत रोषणाईमुळे शहरातील विद्युत वितरणांच्या कामांवर विद्युत पुरवठ्यावर दाब वाढतो पर्यायाने म.रा.वि.म. तर्फे उभारण्यांत आलेल्या विविध ठिकाणच्या डी.पी.चे विद्युत कनेक्शनवर अपेक्षेपेक्षा जास्त प्रमाणात लोड येतो असे मत म.रा. वि. म. तर्फे व्यक्त करण्यांत आले आहे. ही बाब लक्षात घेता हॅलोजन बल्प लावणे योग्य होणार नाही.

**मा. सभापती :** गणेश उत्सवात विविध प्रकारची विद्युत रोषनाई होऊन विद्युत प्रवाह दाब वाढला असला तरी गणेश मंडळातर्फे उभारलेले देखावे पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांचे सांभाव्या चोरीपासून (मंगळसुत्र चोरणे, पॉकेट मारणे) इत्यादी प्रकारचे टाळण्यांसाठी म.रा.वि.म. ची सूचना असली तरी देखाव्याच्या वेळी आणि मिरवणूकीच्या वेळी नागरिकांना शहरात फिरणे सोईचे व्हावे, त्या दृष्टीने नगरसेवकांच्या मागणीनुसार आवश्यक त्या ठिकाणी हॅलोजन बल्प किंवा फोकस बसवण्यांची महानगरपालिका विद्युत विभागाने व्यवस्था करावी.

नजीकच्या काळात औरंगाबाद आणि जालना जिल्ह्याच्या मतदार संघातून महाराष्ट्र विधान परिषद सदस्य पदांची मिरवणूक नुकतीच पार पडली. या निवडणूकीच्या निमित्ताने आचार संहिते नुसार शासनाने शहराचे प्रथम नागरिक मा. महापौर, मा. उप महापौर, तसेच स्थायी समिती सभापती या पदाधिकाऱ्यांची शासनाच्या ताब्यात घेऊन ही वाहने अन्य कामासाइी वापरली आहे. असे संबंधित वाहनाचे लॉगबुक पाहिले असता, निदर्शनास आले आहे. तेंव्हा आचार संहितेप्रमाणे आचार संहितेच्या काळात कोणकोणती कामे करता येतात, पदाधिकाऱ्यांच्या गाड्या, कशा प्रकारे

वापरल्याख ही वाहणे वस्तुतः सुरक्षितेसाठी ठेवण्यात आली होती. तेंव्हा आचार संहितेच्या काळात पदाधिकाऱ्यांच्या वाहनांचा केलेला वापर आणि या काळात कोणकोणत्या प्रकारे काम करता येते. याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४८१ प्रमाणे विधी सल्लागार यांनी माहिती द्यावी. तसेच इतर निवडणूकांच्या निमित्ताने संभाव्या काळात महानगरपालिका पदाधिकारी व प्रशासक यांना येणाऱ्या संभाव्य अडचणी विचारांत घेऊन विधी सल्लागार यांनी आचार संहिते बाबत रिट पिटीशन दाखल करण्यांची व्यवस्था करावी.

यानंतर सभेचे कामाकाज संपल्याचे मा. सभापंतीनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव,
औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती, स्थायी समिती,
औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**शुक्रवार दिनांक ०१-०९-९५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. सभापती श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती सभागृह विशेष स्थायी समिती सभेसे सुरुवात झाली. या सभेस मा. आयुक्त व कार्यालयीन अधिकारी यांचेसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) श्री. अब्दुल रशिदखान (मामू)
२) श्री. महंमद मुश्ताक अहमद
३) श्री. सुदाम सोनवणे
४) श्री. महादेव सुर्यवंशी
५) श्री. विजयकुमार मेहेर
६) श्री. गौतम खरात
७) श्री. सुभाष कच्छवाह
८) कु. माया लिंबाजी लाडवाणी
९) सौ. पद्मा शिंदे
१०) श्री. प्रभाकर विधाते
११) श्री. कवरसिंग बैनाडे

सभेच्या सुरवातीस पंजाबचे मुख्यमंत्री श्री. बियातसिंग यांचे अपघाती निधनाबद्दल आणि रोजगार हमी योजना खात्याचे मंत्री श्री. हरिभाऊ बागडे यांच्या कन्येच्या निधना निमित्त सभागृहातर्फे ०.०२ मिनिटे स्तब्ध राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

**विषय क्र. ८४/१:**

दिनांक ३१-०८-९५ रोजी झालेल्या पासाच्या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले व घरांची पडझड बाबत आर्थिक मदत व पुनर्वसन करणे.

**संवाद :**

**मा. सभापती :** दि. ३१-०८-९५ रोजी औरंगाबाद शहरात मुसळधार वृष्टीझाली. या पावसामुळे शहरातील बऱ्याच घरांचे नुकसारन झाले. विशेष करून शहरातील नाल्यालगत असलेल्या घरांची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली. यात जवळपास ७०० ते ८०० घरांचे नुकसान झालेले आहे. त्यादृष्टीने घराची पडझड झालेल्या नागरिकांना महानगरपालिकेतर्फे कश प्रकारेव किती आर्थिक मदत आणि इतर दृष्टीने करता येईल. यावर प्रामुख्याने विचार व्हावा या निमित्ताने अनेक स. नगरसेवकांतर्फे पत्र प्राप्त झालेले आहेत.

**मा. आयुक्त :** पावसामुळे पडझड झालेल्या घरांची पहाणी करण्यांकरता शासनामार्फत २५ पथके गटीत करण्यांत आली आहेत. प्रत्येक पथकात महानगरपालिकेचा एकनिष्ठ अभियंता, एक पोलिस हवालदार, व एक नायक तहसिलदार यांचा समावेश राहील. दि. ०१-०९-९५ पर्यंत या पथकाचा पहाणी अहवाल सायंकाळपर्यंत प्राप्त होईल व त्यांच्या पहाणीत आढळून आलेल्या पंचनामा अहवाल यादीप्रमाणे मदत देण्याची कार्यवाही तात्काळ हाती घेण्यात येईल. या पथकास संबंधित प्रभागातील स. नगरसेवकांनी मदत करावी अशी

विनंती केली. शासन परिपत्रकानुसार अतिवृष्टीमुळे निराधार झालेल्या कुटूंबाना प्रत्येक व्यक्ती करता रक्कम रु. ४५०/- ची मदत देण्यांत येणार आहे. आर्थिक मदत देतांना घराची पडझड पूर्णत: होणे, भिंत पडणे, घर पूर्णत: पडणे यांचा विचार करण्यात येईल. बहुतांशी घरे ही नाल्यावर असल्याने तेथील घराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहेत. बऱ्याच ड्रेनेज लाईन बऱ्याच ठिकाणी चोक अप झालेल्या आहेत. बऱ्याच ठिकाणचे नाल्यांना एकाच बाजुने भिंत बांधलेली आहे. दुसऱ्या बाजुने बांधलेली नाही. तसेच नालयावर असलेल्या इमारती / बँका यांनी केलेल्या जास्तीच्या बांधकामाबाबत व यामुळे होणाऱ्या संभाव्य धोका टाकण्यांसाठी संबंधिताविरुध्द फौजदारी खटले दाखल करण्यांत येते आहे.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** प्रशानांतर्फे फौजदाराने खटले व नोटीसा देणे हे बऱ्याच दिवसांपासून केवळ कागदोपत्री चालू आहे. प्रत्यक्षात मात्र कार्यवाही होत नाही तेंव्हा लवकरात लवकर प्रत्यक्ष कार्यवाही कशी होईल, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. याशिवाय नाल्यामधील पाणी विना अडथळा वाहुन जाण्यास मदत व्हावी, यादृष्टीने नाल्यामधील कचरा तातडीने साफ करण्यांत यावा.

**मा. आयुक्त :** या प्रकारणी तातडीने कार्यवाही करण्यांत येईल. अतिवृष्टी संबंधाने शहर अभियंता अतिरिक्त शहर अभियंता व अतिरिक्त शहर अभियंता व कार्यकारी अभियंता (पा.पु. व. ज. नि.) यांना तत्काळ त्यांचे अधिपत्याखालील कामे करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. मुख्यालयांत एक नियंत्रण कक्ष स्थापन करण्यांत आलेला आहे. त्या अंतर्गत ३ जीप, ३ ट्रक व जेटींग मशिन तात्काळ मदतीसाठी तयार ठेवण्यांत आलेले आहेत. अग्निशमन दल तात्काळ कार्यवाहीसाठी तत्पर आहेत. वैद्यकीय सेवेबाबत सर्व ठिकाणी नोव्हॉन स्प्रे करण्यांबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. या दरम्यान शहरात पाण्यामुळे कोणतीही साथीची लागण होउ नये म्हणून हॅलोजन गोळ्याचेही वाटप करण्यांत येत आहे. तसेच रस्त्यांवर पडझडीत पडलेले मटेरियल उचलण्यांबाबत सूचना देण्यांत आलेल्या आहेत. वरील सर्व बाबींचा सर्व्हे करण्यांची कार्यवाही तात्काळ हाती घेण्यात आलेली आहे. अग्निशमन दलामार्फत घरात मोठ्या प्रमाणांवर शिरलेले पाणी बाहेर काढण्यांसाठी विनामुल्य सेवा देण्यांत येत आहे. ही विना मुल्य सेवा गरीबांसाठी असून उद्योगधंद्यावाल्याना लागू नाही ही सवलत फक्त पावसाळा संपेपर्यंतच आहे. काल पासून अग्निशमन दलाकडे मोठ्या प्रमाणांवर कॉल्स येत आहे. त्याप्रमाणे सर्व ४ गाड्या व कामासाठी लागलेल्या आहेत.

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** ज्या नाल्यावरती एका बाजुने वा दोन्ही बाजुने भिंत बांधलेली नाही त्या तात्काळ बांधण्याची कार्यवाही केल्यास भविष्यात होणारा धोका टळेल.

**मा. आयुक्त :** हे काम करण्यासाठी बराच खर्च लागेल. सद्यस्थितीत अतिवृष्टी संबंधाने कार्यवाही करण्यांत येत आहे.

**मा. सभापती :** अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी महानगरपालिकेतर्फे रुपये ५००/- देणे योग्य राहिल.

**श्री. सुदाम सोनवणे :** ही मुदत महानगरपालिका हद्दिपुरतीचे मर्यादित राहिल की कसे यात सिडको भागास मदत देण्यांसाठी आहे किंवा नाही.

**मा. आयुक्त :** या मदतीत सिडको भागाचा सुध्दा समावेश आहे.

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** यासाठी नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून काही मदत देता आली तर बरे होईल.

**मा. आयुक्त :** या अतिवृष्टीसाठी शासनाकडून प्रत्येक व्यक्तीमांगे रुपये ४५०/- व महानगरपालिकेकडून प्रत्येक कुटूंबास रु. ५००/- ची मदत देण्यात येत आहेच. त्याच बरोबर स. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येकी रु. ५०००/- देण्यांबाबत विनंती आहे या निधीतून ज्या शालेय विद्याथ्याचे शालेय नुकसान उदा. वह्या पुस्तके, पाट्या इ. प्रकारचे साहित्य वाहुन गेले वा नुकसान झाले अशा विद्यार्थ्यांना मदत दिल्यास अधिक योग्य होईल असे वाटते.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** यापूर्वीही अतिवृष्टी झाली होती. त्यावेळी बऱ्याच उशीरा मदत संबंधितांना देण्यांत आली. यावेळी तसे होऊ नये, जरा संबंधितांना वेळेवर मदत दिल्यास योग्य होईल व अंमलबजावणी तात्काळ व्हावी.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** आर्थिक मदत देते वेळी ज्यांच्या घरात पाणी साचते / शिरते व त्यामुळे नुकसारन झाले, अशांना मदत देणार आहे. किंवा कसे? किंवा ज्यांची केवळ भिंत पडली अगांना मदत देणार काय?

**मा. आयुक्त :** ज्यांच्या घरांची पडझड झाली आहे. अशांनाच महानगरपालिकेकडून वरील प्रमाणे मदत देण्यांत येणार आहे. केवळ घरात पाणी शिरले असेल, परंतु घराची पडझड झाली नसेल तर आर्थिक मदत देता येणार नाही.

**मा. सभापती :** आर्थिक मदत देणे, त्याची यादी तयार करणे वया कामाचे नियोजन करणे, संबंधात मा. आयुक्तांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे. त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या संदर्भाने तातडीने कार्यवाही करावी. तसेच या बैठकीत तातडीने कार्यवाही करावी. तसेच या बैठकीत तातडीने कार्यवाही करावी. तसेच या बैठकीत तातडीने निर्णय घेऊन महानगरपालिकेने एक चांगला उपक्रम होती घेतला आहे. व याची अंमलबजावणी तातडीने झाल्यास संबंधितांना मदत वेळेवर मिळेल.

**श्री. विजयकुमार मेहेर :** ग्रुप सर्व्हेची यादी प्रत्येक नगरसेवकांस देण्यांत यावी.

**मा. सभापती :** जी घरे पडायला आलेली आहेत, त्यांना महानगरपालिकेतर्फे वेगळ्या नोटीसा देण्यांत आलेल्या घर मालक जर घराची पडझडीचा भाग उतरवून घेत नसेल तर महानगरपालिकेतर्फे उतरविण्यांत येते.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** शहरारतून एक मदत फेरी काढून आर्थिक मदत, कपडे व अन्य साहित्यातून मदत झाली तर योग्य राहील.

**श्री. महमंद मुश्ताक अहमद :** अतिवृष्टीमुळे बऱ्याच गोष्टी वारंवार कराव्या लागतात. त्यात उदा. राड वाहुन जाणे, लाईट खांबे तारा तुटणे यासाठी एक कायमचे पथक स्थापन केल्यास योग्य होईल, असे वाटते, तसेच एक महानगरपालिका रिलिफ फंड तात्काळ तयार करण्यात यावा.

**ठराव :**

दिनांक ३१-०८-९५ रोजी औरंगाबाद शहरात मुसळधार वृष्टी झाल्यामुळे उत्पन्न झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नुकसान व घराची पडझड याबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आपत्तीमुळे झालेले नुकसान व घरांची पडझड या बाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आपत्तीग्रस्तांना खालील प्रमाणे आर्थिक प्रमाणे आर्थिक मदत व मदत कार्य देण्यांत यावे असे सार्वानुमते ठरले.

१) दि. ३२-०८-९५ रोजीच्या अतिवृष्टीमुळे उत्पन्न झालेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये सिडको हडकोसह संपूर्ण शहरात विचार करण्यांत यावा.

२) दि. ३१-०८-९५ च्या आपतग्रस्तांपैकी शालेय, विद्यार्थ्यांचे नुकसान भरून काढण्यांसाठी उदा. वह्या पुस्तके, पाट्या व इतर शैक्षणिक साहित्य अशा विद्यार्थ्यांना स्वेच्छानिधीतून प्रत्येकी रुपये ५०००/- याप्रमाणे एकत्रित स्वेच्छा निधी विद्यार्थ्यांना मदत म्हणून देण्यांत यावी.

३) अतिवृष्टी आपत्तीग्रस्तांना शासनाकडून मदत मिळत असली तरी महानगरपालिकेतर्फे आपतग्रस्तांच्या प्रत्येक कुटूंबाकरिता रुपये ५००/- या प्रमाणे आर्थिक मदत देण्यांत यावी.

४) शहरातील ज्या घरांची पडझड झालेली आहे. अशाच घरांना महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत देण्यांत येईल. या मदतीमध्ये केवळ घरांत पाणी शिरले असेल परंतु घरांची पडझड झालेली नसेल अशा कुटूंबाना मदत दिली जाणार नाही.

५) अग्निशमन दलामार्फत घरांत शिरलेले पाणी गरीबांचे घरातून विनामुल्य उपसा करण्यांत येईल. ही सवलत फक्त पावसाळा संपेपर्यंत ठेवण्यात आली आहे.

६) दि. ३१-०८-९५ च्या अतिवृष्टीमुळे आपतग्रस्त झालेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे त्या विषयीची यादी तयार करणे, कामाचे नियोजन करणे इत्यादी सर्व बाबींचे बाबतीत मा. आयुक्त यांना सभागृहातर्फे अधिकार प्रदान करण्यांत येऊन विनंती करण्यात येते की, उक्त प्रकरणी तातडीने कार्यवाही होईल अशी व्यवस्था करावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापतींनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव,
औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती, स्थायी समिती,
औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक ११-०९-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. सोमवार दिनांक ११-०९-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती सभेसे सुरुवात झाली. या सभेस स. सभासदांसह कार्यालयीन अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अब्दुल रशिदखान (मामू) | सदस्य |
| २) | श्री. डॉ. कराड भागवत | -//- |
| ३) | श्री. गौतम भागाजी खरात | |
| ३) | श्री. सुदाम सोनवणे | |
| ४) | सौ. रजनी रमेश जोशी | |
| ५) | श्री. प्रकाश निकाळजे | |
| ६) | श्री. महंमद मुश्ताक अहमद | |
| ७) | श्री. विजयकुमार मेहेर | |
| ८) | श्री. प्रभाकर विधाते | |
| ९) | श्री. महादेव सुर्यवंशी | |
| १०) | सौ. पद्मा शिंदे | |
| ११) | श्री. सुदाम सोनवणे | |
| १२) | श्री. हमीदउद्दिन ताबा | |

**संवाद :**

**डॉ. भागवत कराड, श्री. अब्दुल रशिद खान (मामू), गौतम खरात :** शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी सौ. मिनाताई ठाकरे, अखिल भारतीय जमाते इस्लामचे जनरल सेक्रेटरी श्री. अ. कय्युम यांच्या पत्नी श्रीमती रजिया बेगम अ. कय्युम आणि भारतीय रिपब्लीकन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री. बी. एच. गायकवाड यांचे चिरंजीव कुमार महेंद्र गायकवाड यांचे नजिकच्या काळात दुःखत निधन झाले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

स्वर्गीय सौ. मिनाताई ठाकरे, श्रीमती रजिया बेगम, कुमार महेंद्र गायकवाड यांचे दुःखद निधनानिमित्त सभगृहाने ००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र. ८५/१ :**

दिनांक २८-०८-९५ आणि ०१-०९-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** दिनांक २८-०८-९५ च्या सभेतील चर्चेनुसार आचार संहितेबाबत प्रशासनातर्फे काय कार्यवाही झाली, याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** विधी सल्लागार कार्यालयीन कामानिमित्त न्यायालया गेले आहेत. तेंव्हा याबाबत पुढील सभेत माहिती मिळेल.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** उप समित्या स्थापन करण्याबाबत स्थायी समितीला अधिकार आहेत का? किंवा सर्वसाधारण सभेच्या मंजुरीची आवश्यकता आहे. याबाबत कृपया खुलासा व्हावा.

**मा. सभापती, श्री. महंमद मुश्ताक अहमद :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४(२) अन्वये स्थायी समितीस तिच्या अधिकारात उप समिती नेमण्यांचा अधिकार आहे.

**अब्दुल रशिदखान (मामू) :** दि. २८-०८-९५ च्या सभेस ठराव क्र. ६५ आणि ६६ च्या प्रस्तावात कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेचा उल्लेख नाही. तेंव्हा या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम किती आहे याचा खुलासा व्हावा.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** दि. २८-०८-९५ च्या सभेस ठराव क्र. ५२ वरील चर्चेत महाराष्ट्रात डिस्टलरीच्या जकात कराबाबत पुढील सभेत खुलासा करण्यांत येईल, अशी चर्चा झाली आहे. त्या बाबत खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती :** कार्यालयीन कामानिमित्त विधी सल्लागार न्यायालयात गेलेले आहेत, पुढील सभेत माहिती देण्यांत येईल.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** दि. २८-०८-९५ च्या सभेत सभागृहापुढे मांडण्यात येणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या प्रस्तावात सदर काम ज्या लेखा शिर्षातून हाती घ्यावयाचे असेल त्या लेखा शिर्षात असलेली अर्थसंकल्पीय तरतूद आणि त्यातून आतापर्यंत झालेला खर्च प्रस्तावात संबंधित विभागाने नमूद करावा. अशी चर्चा झालेली असतांनाही सभागृहाच्या सुचनेची अंमलबजावणी न करता अंदाजपत्रकीय प्रस्ताव सभागृहापुढे आले आहे, तेंव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** सभागृहाच्या मागणीनुसार मा. मुख्य लेखा परिक्षक यांचे मार्फत अंदाजपत्रकातील तरतूद आणि त्या लेखा शिर्षातून झालेला खर्च याबाबतची जमा खर्चाची माहिती प्रत्येक महिण्यात सभागृहात सादर करण्यांत येते. तसेच लवकरच दुरुस्त अंदाजपत्रकही मांडले जाईल. वरील प्रमाणे सभागृहास दर महिण्यांला जमा खर्चाबाबतची माहिती मिळत असल्याने अंदाजपत्रकीय प्रस्तावात तरतूद व खर्च यांचा उल्लेख असणे आवश्यक वाटते नाही, तथापी स. सभासदांची सूचना योग्य आहे.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी कार्यालयीन कामा निमित्त पूर्व परवानगीने न्यायालयात गेले आहेत. तथापी त्यांचे प्रतिनिधी सभागृहात उपस्थित असून ते याबाबत माहिती देतील.

आरोग्य विभागांतर्फे शहरातील काविळ गॅस्ट्रो बाबत दाखल करण्यात आलेल्या माहितीची प्रत सभागृहात स. सभासदांच्या माहितीसाठी वाटप करण्यात आली.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** माहे ऑगस्टमध्ये ग्रॅस्ट्रो व कावीळ या रोगांची मोठ्या प्रमाणात लागण झाली आरोग्य विभागांतर्फे दाखल करण्यात आलेल्या माहिती मध्ये या महिण्यांतील रुग्णांची माहिती देण्यात आलेली नाही. शहरातील खाजगी आणि सरकारी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यां व्यावसायिक महानगरपालिका अधिनियमाची अंमलबजावणी करीत नाही. या शिवाय शहरातील प्रसुतीगृह व इतर रुग्णांलयांतर्फे नियमाप्रमाणे जन्म-मृत्यूची नोंद महानगरपालिकेकडे पाठवली जात नाही. त्यामुळे अनेक नागरिकांना जन्म

मृत्यू प्रमाणपत्र मिळवण्यांबाबत विनाकारण अडचण निर्माण होते. त्याबाबत आरोग्य विभागांने दक्षता घ्यावी.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** शहरातील उपहारगृहांच्या पाण्याचे नमुने घेण्यांचे काम कोणत्या विभागातर्फे करून घेणे आवश्यक आहे. मिळालेल्या माहितीनुसार उपहारगृहातील पाणी घेण्यांचे नमुन्याचे काम आरोग्य विभागाचे असून या कामासाठी त्यांच्याकडे निरिक्षक ही नियुक्त केलेला आहे. तरी पण शहरातील उपहारगृहातील पाण्याचे नमुने घेण्यांचे काम विभागीय कार्यालयामार्फत केले जाते. तेंव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांचे माहिती दिल्यानुसार ठराव क्र. ६५ आणि ६६ या कामातील अंदाजित रक्कम अनुक्रमे रुपये ८०,५००/- आणि रुपये ७७,१००/- अशी आहे.

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** दि. २८-०८-९५ च्या स्थायी समितीने ठराव क्र. ८२ अन्वये ३०० गर्डर पोल रोवण्यांच्या कामासाठी मंजुरी दिलेली आहे. याच दराने पथदिव्यासाठी लागणारे आणखी १२०० गर्डर पोल रोवण्याचे काम प्रति नग रु. १५००/- या दराने रोवण्यांस अन्य काही एजन्सी तयार असतील तर उक्त दराने तयार असलेल्या विविध एजन्सीकडून पथदिव्यांसाठी लागणार गर्डर पोल रोऊन घेध्याचे काम करून घेण्यात यावे.

**श्री. गौतम खरात :** शहराच्या सर्व वॉर्डात गर्डर पोल रोवण्यांचे काम एकाच एजन्सीला दिल्यास सर्व वॉर्डाचे काम वेळेवर होवू शकत नाही. म्हणून याच दराने अन्य काही एजन्सी काम करण्यांस तयार असल्यास अशा अन्य एजन्सीकडून काम करून घेण्यात यावे, अशी दुरुस्ती उक्त ठरावात करण्यांस मंजुरी देण्यात येते.

तसेच ठराव क्र. ८३ अन्वये सभाकक्षातील कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या विशेष भत्ता २०% ऐवजी शासकीय नियमाप्रमाणे १०% विशेष भत्ता अशी दुरुस्ती करण्यांस मंजुरी देण्यांत येते.

**श्री. सुदाम सोनवणे :** मागील सभेमध्ये सिडको - हडको भागातील जलवाहिन्या आणि पाणी पुरवठा याबाबत चर्चा झालेली आहे, या चर्चेच्या वेळी सिडको-हडको अंतर्गत ज्या जलवाहिन्या महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या आहेत अशा भागांना पाणी पुरवठा करण्यांत येतो, अशी माहिती सेक्टर १० व ११ या भागातील जलवाहिन्या महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या नाहीत. याबाबत सिडको विभागांकडून तसे पत्रही मला प्राप्त झालेले आहे. तेंव्हा सेक्टर १०,११ या भागातील जलवाहिन्या महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या नसतांनाही महानगरपालिकेतर्फे या भागांना पाणी पुरवठा कामा केला जाता याचा खुलासा व्हावा. महानगरपालिका सेक्टर १०,११ ला पाणी पुरवठा करीत असल्यामुळे पाणी पुरवठ्यांबाबत च्या तक्रारीची सिडको या भागाकडे लक्ष देण्यांत येत नाही.

**जलगृह अभियंता :** सिडको-हडको भागातील सेक्टर १०,११ या भागांना पाणी पुरवठा करण्यांबाबत सिडको कडून आवश्यक ती अनामत रक्कम घेतल्यानंतर पाणी पुरवठा करण्यांत येत आहे.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे सिडको-हडकोतील सेक्टर १०,११ महानगरपालिकेकडे हस्तांतर करून घेण्याबाबत सिडको विभागांशी आवश्यक ती कार्यवाही करावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** ठराव क्र. ७३ वरील चर्चेनुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची शिक्षणाधिकारी यांनी दक्षता घ्यावी आणि नारेगांव, ब्रिजवाडी येथील शाळेकरिता पर्यायी बालवाडी शिक्षिकेची व्यवस्था करावी. अशा प्रकारचे निर्णय देण्यात आलेली आहे. नारेंगाव, ब्रिजवाडी बालवाडीसाठी शिक्षिका मिळावी म्हणून सातत्याने गेल्या चरमिटींगपासून या प्रश्नांचा मी पाठपुरावा करीत आहे. महानगरपालिकेच्या इतर शाळेवर किती जादा व कमी शिक्षक आहे, याची माहितीही सभागृहाला देण्याऐवजी शिक्षणाधिकारी यांनीच दिलेली योग्य होईल. यानंतर सभागृहाने शिक्षणाधिकाऱ्यांविरुध्द काय कार्यवाही करावयाची याचा निर्णय घ्यावा.

**शिक्षणाधिकारी :** नारेगांव, ब्रिजवाडी येथील बालवाडी शाळेकरिता पर्यायी शिक्षिका देण्याबाबतची संचिका मंजुरीसाठी सादर करण्यांत आली होती, या संचिकेवर प्रभारी आयुक्तांकडून निर्णय घ्यावा अशी तजविज मा. आयुक्तांनी केलेली आहे. याशिवाय मुख्याध्यापक आणि बालवाडी शिक्षिका याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यांत आलेला आहे.

**मा. सभापती :** महानगरपालिका प्रशासनाने नियमाप्रमाणे शिक्षकांची नियुक्त केलेली आहे. या नियुक्तीनुसार शिक्षक कामांवर रुजू झालेले आहे. रुजू झालेले शिक्षक कोणत्या शाळेवर नियुक्त करावयाचे यांबाबीकरिता मा. आयुक्त यांच्या मंजुरीची काय आवश्यक्ता आहे हे कळत नाही. प्रशासनाने १९ शिक्षकांची नियुक्त केलेली आहे. त्या पैकी एन. टी. चे. शिक्षक वगळून इतर १७ शिक्षक कोणत्या शाळेवर काम करतात, याचा खुलासा शिक्षण अधिकाऱ्यांनी करावा.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** कर्मचाऱ्यांना देण्यांत येणारा १०% विशेष भत्ता हा मुळ पगाराच्या किंवा पूर्ण पगाराच्या १०% आहे याचा खुलासा व्हावा. व ही वाढ केंव्हापासून दिले जाईल.

**मा. सभापती, श्री. अब्दुल रशिदखान (मामू), श्री. गौतम खरात :** कर्मचाऱ्यांना देण्यांत येणारे भत्ते मुळ पगारावर दिले जातात. सभागृहाने मंजुरी दिलेला १०% विशेष भत्ता मुळ पगारावर दिला जाईल. तसेच ही वाढ मे १९९५ पासून देण्यांत येईल व नोंद ठरावात आहे.

**मा. उप आयुक्त-१ :** नियुक्त करण्यांत आलेल्या बालवाडी शिक्षकांमध्ये एक अपंग शिक्षिका विशेष प्राधान्य देऊन घेण्यात आली होती. या शिक्षिकेची नेमणूक ब्रिजवाडी शाळेत करण्यात आली होती. सदर शिक्षिका पुन्हा कामावर आल्या नाहीत. या अपंग शिक्षिकेस पत्र देऊन पुन्हा कामावर रुजू करून घेतले जाईल व नविन ६ शिक्षकांतून ब्रिजवाडी येथील बालवाडी करिता शिक्षिका देण्यांत येईल.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** मागील सभेत ब्रिजवाडी नारेगांव शाळेकरिता ज्या शिक्षकांची सेवा फक्त ६ महिने राहिली आहे, शिक्षक ब्रिजवाडी, नारेगांव शाळेकरिता दिले जातात, अशी चर्चा सभागृहात करताच सभेच्या दुसऱ्या दिवशी नारेगांव ब्रिजवाडी शाळेतून शिक्षकांची बदली केली जाते. हा काय प्रकार आहे हे समजत नाही.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू), श्री. प्रकाश निकाळजे :** सभागृहातील चर्चेबाबतचे इतिवृत्त आणि विषय पत्रिका प्रशासनांतर्गतच्या सर्व विभागांना नियमाप्रमाणे दिली जाते प्रत्येक सभेचे इतिवृत्त संबंधित विभागांस देऊनही इतिवृत्तावरील

चर्चेबाबतची आवश्यक माहिती यासह संबंधित अधिकारी सभागृहात येत नाही, त्यामुळे अनावश्यक चर्चा व वेळ वाया जातो. तेंव्हा यापुढे सर्व अधिकाऱ्यांनी सभागृहातील चर्चेबाबतच्या आवश्यक माहितीसह सभेस हजर रहावे, म्हणजे अनावश्यक चर्चा व वेळेचा अपव्यय होणार नाही.

**श्री. सुदाम सोनवणे :** शिक्षण अधिकारी लोकप्रतिनिधींचा योग्य तो मान ठेवत नाही. एका अपंग शिक्षिकेबाबत यांना शिक्षणाधिकारी यांना सूचना केली, तथापि त्याची अंमलबजावणी झाली नाही, परंतु नजीकच्या काळात सिल्लोड येथून नव्याने बदलून आलेल्या एक शिक्षक श्री. मारुती देशमाने यांची प्रथम बन्सीलालनगर या शाळेत आणि लगेच येथून बेगमपुरा या शाळेत बदली करण्यांत आली. तेंव्हा याबाबत शिक्षणाधिकारी यांनी खुलासा व्हावा.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** सभागृहाने शहरातील डास निर्मूलनासाठी आवश्यक असलेल्या व्हॅन फॉग फॉगिग मशिन खरेदी करण्यास दिलेल्या मंजुरीनुसार सदर मशिन खरेदी करण्यांकरिता आरोगय वैद्यकीय अधिकारी पुणे येथे गेले होते, तेंव्हा मशिन खरेदी करण्यांत आल्या काय? याचा खुलासा व्हावा. तसेच डास निर्मूलनासाठी वापरण्यांत येणाऱ्या व्हॅन फॉग फॉगिंग मशिनच्या कामाची वेळ सायंकाळी ५ ते ६ ठेवण्यांत यावी अशी चर्चा झाली होती. या चर्चेनुसार कार्यवाही होते काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी पुढील सभेत माहिती द्यावी.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** शहरात महानगरपालिकेतर्फे लावण्यांत आलेली पथदिवे दिवसाही चालू असल्याचे दिसून येत आहे. अशा प्रकारे अनावश्यक विद्युत खर्चामुळे महापालिकेला विद्युत बिलाचा भुर्दंड पडतो, तेंव्हा याबाबत संबंधित विभागाने खुलासा करावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** शहरातील लाईट फॉल्टच्या वेळी म.रा.वि.मं. तर्फे लाईन फॉल्टचे काम केल्यानंतर असे पथदिवे दिवसा चालू होतात, आशा पकारे दिवसा चालू झालेल्या पथदिव्यामुळे विद्युत बिलात भुर्दंड पडतो, तेंव्हा याबाबत संबंधित विभागाने खुलासा करावा.

**मा. सभापती :** स. सभासद श्री. महादेव सुर्यवंशी यांनी शिक्षण विभागातील मांडलेल्या विचारांशी मी सहमद आहे. शिक्षणाधिकारी यांनी नारेगांव, ब्रिजवाडी शाळेकरिता आवश्यक असलेल्या बालवाडी शिक्षिकेची नेमणूक उद्याच करावी. वरील निर्णयाप्रमाणे यापुढे ही काही कार्यवाही झाली नाही, तर स. सभासद त्यांचे वॉर्डाचे शैक्षणिक प्रश्नांबाबत सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मांडू शकतात.

**शिक्षणाधिकारी :** शिक्षण विभागाचे प्रशासकीय काम सोईचे व्हावे, या दृष्टिने शिक्षणाधिकारी या पदाकरिता काही अधिकारी प्रदान करेले तर काम करणे सोईचे होईल व कामातही सुधारणा होऊ शकेल.

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** सध्याच्या कार्यपध्दतीनुसार प्रत्येक संचिका किंवा धनादेश मा. आयुक्त व उप आयुक्त यांचेकडे मंजुरीस्तव पाठविले जातात. सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे काही अधिकारी अधिकाऱ्यांना दिले तर काम करणे सोईचे होईल.

**मा. सभापती :** प्रशासनातर्फे चांगले काम होत असतांनाही अधिकारी वर्ग मा. आयुक्त, मा. उप आयुक्त यांचेकडे संचिका सादर केली आहे. असे सांगून मोकळे होतात. हे योग्य नाही.

**श्री. गौतम खरात :** नुकत्याच झालेल्या शिक्षण दिनानिमित्त महानगरपालिकेच्या ९ शिक्षकांना आदर्श शिक्षक हा पुरस्कार मा. पालक मंत्री यांच्याहस्ते झाला. आदर्श शिक्षकांची निवड करण्यांसाठी जी निवड समिती नेमली होत, त्या निवड समितीने आदर्श शिक्षकांच्या यादीत श्री. एम. जी. साळवे या शिक्षकांची निवड केली होती. परंतु मिळालेल्या माहितीनुसार शिक्षक दिनाच्या आदल्या दिवशी रात्री आदर्श शिक्षक म्हणून निवड झालेले साळवे यांचे नांव यादीतून कमी करून आदर्श शिक्षक या यादीत सौ. निकम यांचे नाव समाविष्ट करण्यांत आले. यावरून प्रशासनांतर किती गोंधळ आहे हे दिसून येते. तेंव्हा आदर्श शिक्षक निवड समितीच्या अहवाल पुढील सभेत मागवावा.

**मा. सभापती :** शिक्षण दिनासाठी आदर्श शिक्षक निवडीबाबत प्रशासनांतर्फे जी निवड समिती गठीत करण्यात आली होती, त्या निवड समितीमध्ये प्रशासनांर्गतचे अधिकारी व अन्य कार्यालयाचे दोन अधिकारी याचा समावेश होता.

**श्री. प्रकाश निकाळजे :** आदर्श शिक्षक निवड समितीने साळवे यांचे नांव वगळून नविन नांवाचा समावेश आदर्श शिक्षकांच्या यादीत करणे आमचा विरोध नाही. तथापी श्री. साळवे यांची आदर्श शिक्षक म्हणून केलेली निवड रद्द का करण्यांत आली याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** स. सभासदांनी आदर्श शिक्षक निवड समितीस पत्र देऊन माहिती घ्यावी. आदर्श शिक्षक निवड समिती आणि स्थायी समिती यांचे वेगवेगळे आहेत आदर्श शिक्षक निवड समितीस पत्र देऊनही माहिती न मिळाल्यास स. सभासद सदर विषयावर सर्वसाधारण सभेत चर्चा करू शकता. तथापी स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे मा. उप आयुक्त १ व २ या प्रकरणांची चौकशी करतील.

**श्री. हमीद उद्दिन ताबा :** मी एक लोकप्रतिनिधी तसेच पत्रकार आहे, आदर्श शिक्षक निवड समितिच्या अहवालाबाबत शिक्षणाधिकारी यांनी माहिती विचारली असता, त्यांनी माहिती दिली नाही, मग स. सभासदांनी सभागृहात विचारलेली माहिती कशी बाहेर आली याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** स्थानिक वृत्तपत्रातून प्रशासनांची एक जाहिरात इंग्रजी मध्ये प्रसिध्द झालेली आहे. तेंव्हा नेमीप्रमाणे ही जाहिरात मराठीतून का देण्यात आली नाही. शासनाचे आदेश असतांना अशा प्रकारे इंग्रजी भाषेतून जाहिरात देणे योग्य नाही. आजच्या सभेत जनसंपर्क अधिकारी हजर दिसत नाही. या पूर्वीच्या सभेतही अनेक वेळा जनसंपर्क अधिकारी सभेस हजर नसल्याचे दिसून आले आहे, ही बाब योग्य नाही. वस्तुतः सभागृहात झालेल्या निर्णयाची आवश्यक माहिती संबंधित पत्रकारांना देऊन प्रसिध्दीस देण्यांचे काम जनसंपर्क अधिकारी यांनी करावयाचे असते. तेंव्हा यापुढे जनसंपर्क अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

**ठराव :**

दिनांक २८-०८-९५ च्या स्थायी समितीतील

(१) ठराव क्र. ८२ मधील मुळ प्रस्तावात प्रती पोल "रुपये १,५००/-" या दराने वाढ करण्यांस

तसेच उक्त ठरावानुसार मे. परवेज इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद यांचे मंजुरी दराप्रमाणे, म्हणजेच प्रती नग रक्कम रुपये १,५००/- या दराने पथदिव्यांसाठी लागणारे गर्डर पोल रोवण्यांस अन्य काही संस्था (एकापेक्षा जास्त) तयार असतील

तर अशा संस्थाकडून उक्त दराने पथदिव्यासाठी लागणारे आणखी १२०० पोल (गर्डर) रोऊन घेतल्यांस आणि त्यासाठीच्या रक्कम रुपये १८,००,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

(२) ठराव क्र. ८३ मधील सभाकक्ष विभागांतील कर्मचाऱ्यांना देण्यांत येणाऱ्या विशेष भत्यामध्ये "२०% ऐवजी १०%" या दरानि विशेष भत्ता देण्यांस मंजुरी देण्यात येते.

दिनांक २८-०८-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या इतिवृत्तात उक्त नमूद केल्याप्रमाणे अनुक्रमांक १ व २ मध्ये दर्शविलेली दुरुस्ती व वाढ यासह आणि दिनांक ०१-०९-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ८६/२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नागेश्वरवाडी येथे श्री. शिंदे यांच्या घरापासून हॉटेल मेवाड पर्यंतची ड्रेनेज लाईन अप्रुटींग करून २५० मी.मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे साठीच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रुपये १,७८,७००/- चे आहे सदरील तयार करण्यांत आलेल्या रुपये १,७८,७००/- अंदाजपत्रकास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागेश्वरवाडी येथे श्री. शिंदे यांच्या घरापासून हॉटेल मेवाड पर्यंतची ड्रेनेज लाईन अप्रुटींग करून २५० मी.मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु. १,७८,७००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८७/३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आजम कॉलनी, मकसूद कॉलनी, भिमसंदेश कॉलनी व करिम कॉलनी येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. व सी.आय. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन ९२-९३ नुसार रक्कम रुपये २,४५,७००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रु. २,४५,७००/- चे विचारार्थ व मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आजम कॉलनी, मकसूद कॉलनी भिमसंदेश कॉलनी व करिम कॉलनी येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. व सी.आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये २,४५,७००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सादत नगर येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन ९२-९३ नुसार रक्कम रुपये १,६२,६४५/- चे अंदाजपत्रक तयार

करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रु. १,६२,६४५/- चे विचारार्थ व मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सादत नगर येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १,६२,६४५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संजयनगर येथे १००,१५० व २५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन ९२-९३ नुसार रक्कम रुपये ३,७६,९००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रु. ३,७६,९००/- चे विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर येथे १००,१५० व २५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ३,७६,९००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०/६ :**

मा. कार्यकारी अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील जलवाहिनीची (विविध व्यासाच्या) दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी तसेच नविन कामासाठी लागणार विविध आकारचे "सी.आय.डी." जॉईन्टसची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे खरेदी करावयाचे आहे. करिता अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,०८,५००/- चे तयार करण्यांत आले असून सदर खर्च भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांत येत आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका पाणी पुरवठा विभागातील जलवाहिनीचे (विविध व्यासाच्या) दैनंदिन देखभाल व दुरुस्ती तसेच नविन कामासाठी लागणारे विविध आकारचे "सी.आय.डी." जॉईन्टसची खरेदी करणेसाठी तयार करण्यात असलेल्या रक्कम रु. १,०८,५००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१/७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोरेश्वर हौसिंग सोसायटी गारखेडा येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे.

त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन ९४-९५ नुसार रक्कम रुपये २,३८,०८२/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये २,३८,०८२/- चे विचारार्थ व मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोरेश्वर हौसिंग सोसायटी गारखेडा येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये २,३८,०८२/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२/८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कैलासनगर येथे ८०,१०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन ९२-९३ नुसार रक्कम रु. १,५७,२००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर खर्च हा भांडवली कामासाठीच्या तरतूदीमधून करण्यात येणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये १,५७,२००/- चे विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैलासनगर येथे ८०,१०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १,५७,२००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च हा भांडवली कामासाठीच्या तरतूदीमधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३/९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन १९९२-९३ नुसार रक्कम रुपये २,५६,६३५/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये २,५६,६३५/- चे विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये २,५६,६३५/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४/१० :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज. नि.) यांनी मोहल्ला बुक्कलगुडा येथे जुनी लाईन काढून नविन २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता एकूण रुपये ४,८२,४००/- चे अंदाजपत्रक सादर केले आहे. सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. १६-०८-९६ रोजी मंजुरी दिलेली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बुक्कलगुडा येथे जुनी लाईन काढून नविन २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ४,८२,४००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम देखभाल व दुरुस्ती ९५-९६ या शिर्षकातून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५/११ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज. नि.) यांनी मो. बेगमपुरा डिंबरगल्ली येथील विद्यापीठ संरक्षित भिंतीपासून नाल्यापर्यंत नविन ४५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता रक्कम रु. ४,९०,५००/- चे अंदाजपत्रक सादर केले आहे. सदरील काम झोपडपट्टी आणि शहरातील इतर भागामध्ये खुल्या गटारी बांधणे या शिर्षकातून प्रस्तावित आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरील कामास मा. आयुकतांनी दिनांक २४-०७-९५ रोजी मंजुर दिलेली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बेगमपुरा डिंबरगल्ली येथील विद्यापीठ संरक्षित भिंतीपासून नाल्यापर्यंत नविन ४५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ४,९०,५००/- चे अंदाजपत्रकास तसेच काम झोपडपट्टी आणि शहरातील भागामध्ये खुल्या गटारी बांधणे या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९६/१२ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनिःसारण) यांनी मो. काजीवाडा ते ज्युब्लीपार्क पर्यंतची १५० मी.मी. ची डब्ल्यु. जी. लाईन काढून नविन २५ मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकणेचे कामाकरिता रक्कम रु. १,३२,०००=०० चे अंदाजपत्रक सादर केले आहे. सदर काम देखभाल व दुरुस्ती (एम. ॲण्ड आर-९५-९६) या मधून प्रस्तावित आहे. सदर च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. १७-०७-९५ प्रशासकीय मान्यता दिली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. काजीवाडा ते ज्युब्लीपार्क पर्यंतची १५० मी.मी. ची डब्ल्यु. जी. लाईन काढून नविन २५ मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १,३२,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर काम देखभाल व दुरुस्ती (एम. ॲण्ड आर-९५-९६) मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९७/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रशासकीय इमारत टप्पा-२ चे बांधकाम प्रगतीपथावर असून या ईमारतीसाठी स्वंयचलित उद्वाहन व्यवस्था करण्याचे ठरले आहे. त्यास्तव प्रशासकीय ईमारतीत उद्ववाहन व्यवस्था करण्याचे काम ओटीस ईलेवेटर कंपनी (इंडिया लिमिटेड) यांचे तर्फे करावे असे ठरले आहे. ओटीस ईलेवेटर कंपनी

ही या क्षेत्रातील नांमाकित कंपनी (इंडया लिमिटेड) यांच्यातर्फे करून घेण्याचे प्रस्तावित केले आहे.

प्रशासकीय ईमारत टप्पा-२ साठी ओटीस इलेवेटर कंपनीच्या स्टँडर्ड इलेवेटर मॉडेल कोड क्रमांक-१ बी-८जी-५-१३.३ एम या मॉडेलची शिफारस करण्यात येते. सदरील अद्ववाहनांची किंमत रुपये ३,६०,०००/- (रु. तीन लाख साठ हजार फक्त) एवढी असून यात कोणत्याही कराचा समावेश नाही. सदरील कर उदा. केंद्रीय अबकारी कर, राज्य उत्पादन शुल्क, विक्रीकर, मनपा चुंगी कर इ. करासाठी रुपये ५८,०३१=०० एवढी अतिरिक्त किंमत आपणास द्यावी लागणार आहे. त्याचा तपशील असा आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | केंद्रीय अबकारी कर | रु. २९,७००=०० |
| २) | सा. बा. तपासणी फीस | रु. ००,७००=०० |
| ३) | विक्रीकर | रु. ११,६९१=०० |
| ४) | म.न.पा. चुंगीकर | रु. ०५,९४०=०० |
| ५) | भाववाढ फरक | आयईईएमए निर्देशांका नुसार |
| | **एकूण रुपये** | **५८,०३१=००** |

असे एकूण उद्वाहन व्यवस्थेसाठी रुपये ४,१८,०३१=०० (रु. चार लक्ष अठरा हजार एकतीस फक्त) एवढा खर्च येणार आहे. पुढील देखभाल व दुरुस्ती ओटीस इलेवेटर कंपनीचे सेवा केंद्र औरंगाबाद येथे असल्याने पुढील देखभाल व दुरुस्ती सोयीस्कर होईल.

सदरील कामासाठी तरतूद शिल्लक नसल्यामुळे (म.न.पा.) सुधारित अंदाजपत्रकास या कामासाठी तरतूद करावी लागणार आहे. तरी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४,१८,०३१=०० यास कृपया प्रशासकीय मान्यता मिळावी व सदरील काम ओटीस इलेवेटर कंपनी (इंडिया लि.) यांच्या तर्फे करारनाम्यावर करून घेण्यासाठी परवानगी मिळावी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. अ. रशिदखान (मामू) :** प्रशासकीय ईमारतीचे काम पूर्ण होण्यास वेळ आहे. तेंव्हा प्रस्तावित खर्चास आताच मंजुरी देणे योग्य होणारनाही. तेंव्हा या प्रस्तावावर पुढील सभेत विचार व्हावा असे वाटते.

**अति. शहर अभियंता :** प्रशासनातर्फे आदेश दिल्यानंतरही संबंधित कंपनी आठ (८) महिन्या नंतर स्वयंचलित उद्ववाहन यंत्र पुरवठा करते तेंव्हा सभागृहाने प्रस्तावास मंजुरी द्यावी.

**डॉ. भागवत कराड, श्री. विजयकुमार मेहेर, श्री. प्रकाश निकाळजे :** प्रशासकीय इमारतीसाठी आववश्क असलेले स्वयंचलित उद्ववाहन यंत्र पुरवठा करणाऱ्या अन्य दुसऱ्या कंपन्या आहेत, अशा कंपन्यांसाठी उक्त यंत्र पुरवठा करणे बाबत विचारणा करण्यात यावी आणि त्यानंतर जी कंपनी कमी वेळात यंत्र पुरवठा करील, अशा कंपनीस पुरवठा आदेश देण्यात यावा.

**मा. सभापती :** स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे प्रशासकीय इमारतीसाठी आवश्यक असलेले स्वयंचलित उद्ववाहन यंत्र अन्य कंपन्या किती कालावधीत पुरवठा करू शकतील, याबाबतची माहिती अतिरिक्त शहर अभियंता यांनी पुढील सभेत द्यावी.

**अति. शहर अभियंता :** प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे प्रशासकीय इमारतीसाठी आवश्यक असलेले स्वयंचलित उद्वाहन यंत्र (ओटीस इलेवेटर कंपनी) इंडिया नि. यांचे मार्फत खरेदी केल्यास या कंपनीचे अधिकृत विक्रेते व सर्व्हिसिंग सेंटर शहरात उपलब्ध असल्यामुळे आवश्यक ती सेवा त्वरित उपलब्ध होऊ शकते ही बाब विचारात घेता प्रस्ताव मंजूर करणे योग्य होईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय ईमारतीसाठी आवश्यक असलेले स्टँडर्ड इलेवेटर मॉडेल कोड क्रमांक-१ बी-८जी-५-१३.३ एम या या क्रमांकाचे स्टँडर्ड इलेवेटर मॉडेल मे. ओटीस इलेवेटर कंपनी इंडिया लि. यांचे मार्फत खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

उक्त नमूद केल्याप्रमाणे स्टँडर्ड इलेवेटर मॉडेल खरेदी करिता प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सर्व करा सहित रक्कम रुपये ४,१८,०३१=०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९८/१४ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी कृती कार्यक्रम तयार करून त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यातील एक भाग म्हणजे केंद्रीय प्राथमिक शाळांची स्थापना व या केंद्रीय शाळेसाठी रु. १४००-२६००-१२५ रुपये विशेष वेतनावर काम करणारे केंद्र प्रमुख भरणे महानगरपालिकेमध्ये सध्याही केंद्रीय प्रा. शाळा आहेत. त्याच्या अंतर्गत २ ते ३ प्रा. शाळा आहेत, या केंद्रीय शाळा शिवाय सदरील योजने प्रमाणे ८ ते १२ शाळांसाठी एक केंद्र शाळा आहे. या केंद्रीय शाळेसाठी एक नविन केंद्र प्रमुख असेल. जुन्या केंद्रीय शाळांचे मुख्याध्यापक कायम राहतील ते आपआपल्या शाळांचे काम पूर्वीप्रमाणेच पाहतील. समुह शाळांचे केंद्र प्रमुख हे त्या समुहातील ८ ते १२ शाळांसाठी मार्गदर्शक म्हणून शिक्षण सल्लागार समितीचा सदस्य म्हणून शासन परिपत्रकात दर्शविल्याप्रमाणे काम करीतील.

केंद्र प्रमुखासाठी शैक्षणिक अर्हता बी.ए. बी.कॉम/बी. एस. सी. पदवी सह बी. एड. ही पदवी आवश्यक आहे. या जागा जेष्ठता व गुणवत्ता या निकषानुसार सेवेत असलेल्या पदवीधर प्रा. शिक्षका म्हणून भरावयाच्या आहेत. अशा केंद्रीय शाळांना दरवर्षी रु.२०,०००/- अनुदान देय आहे. त्याचा विनियोग केंद्र शाळा शिक्षण सल्लागार समितीच्या मान्यतेने केंद्र प्रमुखाने करावयाचा आहे.

महानगरपालिकेच्या सध्या ८४ प्रा. शाळा असून त्यांचे ९ केंद्रीय प्राथमिक शाळा तयार केल्या आहेत. या ९ केंद्र शाळांना केंद्र प्रमुखांची रु. १४००-२६००-१२५ या वेतन श्रेणीत ९ पदे निर्मण करण्यासाइी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. भागवत कराड :** प्रस्तावित नविन पदे कोणत्या नियमाप्रमाणे भरणार याचा खुलासा व्हावा.

**उप आयुक्त-२ :** प्रस्तावात नमूद केलेली पदे ही नविन नाहीत. प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे कार्यरत असलेल्या शिक्षकांमधून जेष्ठता यादी आणि प्रस्तावित शैक्षणिक पात्रता यातून शिक्षकांना पदोन्नती देण्यांत येणार आहे.

**श्री. म. मुश्ताक अहमद, श्री. हमीदउद्दिन ताबा :** प्रस्तावित केंद्र प्रमुखांच्या पदांसाठी शासनाची मंजुरी आहे काय? अशा प्रकारची शासनाची मंजुरी असल्यास ती मंजुरी केंव्हा मिळाली आहे. याचा खुलासा व्हावा.

**डॉ. भागवत कराड :** प्रस्तावित केंद्र प्रमुखांच्या पदावर कार्य करणाऱ्या केंद्र प्रमुखांचे कार्य काय असेल याचा खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** ८ ते १२ शाळांसाठी एक या प्रमाणे एक केंद्र प्रमुखाचे पद आहे. प्राथमिक शाळेत काम करणाऱ्या शिक्षकातून ही पदे भरली जातील, मनपाच्या एकूण ८४ शाळा अहोत, प्रस्तावित पदे भरल्यामुळे या शाळांसाठी या पदांची मदत होईल.

**डॉ. भागवत कराड :** केंद्र प्रमुखांची पदे भरल्यानंतर शाळेत काम करणार मुख्याध्यापक किंवा केंद्र प्रमुख यापैकी वरिष्ठ अधिकारी कोण? याचा खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे खुलासा करण्यांत येतो की, केंद्र प्रमुख आणि मुख्याध्यापक ही दोन वेगवेगळे पदे आहेत, या दोन्ही पदांचे कार्य आणि अधिकार वेगवेगळे आहेत. शाळेचे मुख्याध्यापक पदांचे काम करतील.

**श्री. गौतम खरात :** सभागृहापुढे मांडलेल्या प्रस्तावानुसार केंद्र प्रमुख या पदासाठी स्वतंत्र वेतनश्रेणी देण्यात येत आहेत, तेंव्हा सदर प्रस्ताव हा धोरणात्मक निर्णयाचा आहे का? याचा खुलासा व्हावा.

**डॉ. भागवत कराड :** प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे ८४ शाळाकरिता नियुक्त करण्यात येणाऱ्या ९ केंद्र प्रमुखांचा त्यात फायदा होईल, ९ केंद्र प्रमुखांची पदे भरल्यानंतर शिक्षकांच्या ९ जागा रिक्त होतील या रिक्त पदांबाबत कार्य कार्यवाही केली जाईल, याचा प्रस्तावात उल्लेख ाही. सबब सभागृहाच्या पुढे मांडलेला प्रस्ताव व्यवस्थित नाही.

**मा. सभापती :** प्रस्तावित प्रस्ताव मांडतांना वाक्य रचनेची थोडी चूक झालेली आहे. हा प्रस्ताव नविन पदनिर्मितीचा नाही. नविन पद निर्माण करणे हा धोरणात्मक निर्णय आहे.

**शिक्षणाधिकारी :** शासनाच्या निर्णयानुसार अशा केंद्रीय शाळांना दरवर्षी रुपये २०,०००/- अनुदान मिळणार आहे. त्याबाबत शासनाने मंजुरीही दिली आहे. शासनाच्या या मंजुरीस सभागृहाच्या मंजुरीची आवश्यकता आहे.

**उप आयुक्त-१ :** प्रस्तावित प्रस्तावा नुसार केंद्र प्रमुखांची ९ पदे अपग्रेडेशन करीत आहोत, अशा प्रकारे कार्यरत शिक्षकांमधून केंद्र प्रमुखांची ९ पदे अपग्रेडेशन केले तर ज्या शिक्षकांची पदे अपग्रेड होतील त्या ९ शिक्षकांचे शैक्षणिक काम कोण करणार यावर विचार होणे आवश्यक आहे.

**डॉ. भागवत कराड :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे कार्यरत शिक्षकांमधून केंद्र प्रमुख या पदावर जे ९ शिक्षक अपग्रेड होणार आहेत त्या शिक्षकांनी प्रथम नियमित (शिकविण्याचे काम) कार्य करून त्यानंतरच्या दोन तासा मध्ये केंद्र प्रमुखांचे काम करावे, या अटीवर मंजुरी देण्यास हरकत नाही.

**सौ. रजनी रमेश जोशी, डॉ. विजयकुमार मेहेरे :** स. सभासदांच्या सुचनेस आम्ही सहमत आहोत.

**शिक्षणाधिकारी :** मनपाच्या शाळेत २५० शिक्षक रुपये १४०० ते २६०० या वेतन श्रेणीवर काम करीत आहे. या शिक्षकातून नियमानूसार पदवीधर शिक्षकांना केंद्र प्रमुखांचे काम द्यावयाचे आहे. अशा प्रकारे ज्या शिक्षकांना केंद्र प्रमुखांचे काम देण्यात येणार आहे, त्या शिक्षकांना स्वतःचे शैक्षणिक काम (शिकवण्यांचे काम) सांभाळून केंद्र प्रमुखांचे काम करावे लागेल.

**मा. सभापती :** अटीसह मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र. पीआई-१०९४/(७०४)/पा्रशि-१/दि. १८ जानेवारी, ९५ नुसार महाराष्ट्र शासनाच्या प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरणासाठी कृती कार्यक्रम या योजनेतील एक भाग म्हणून हाती घ्यावयाच्या योजने नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या ८४ प्राथमिक शाळांसाठी ९ केंद्र प्रमुखांच्या पदाचं काम रुपये १४००/- ते २६००/- या वेतर श्रेणीत काम करणाऱ्या शिक्षकांमधून केंद्र प्रमुख या जागांवर ज्या शिक्षकांची नियमाप्रमाणे नियुक्त होईल, त्या शिक्षकांची स्वत:चे शैक्षणिक काम (शिकविण्यांचे काम) सांभाळुन उर्वरित वेळात केंद्र प्रमुखांचे काम करावे या अटीवर केंद्र प्रमुखांच्या ९ जागा भरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. ज्या शिक्षकांना वरील प्रमाणे केंद्र प्रमुखांच्या जागेवर काम करावे लागेल त्या शिखकांना १४०० ते २६००-१२५ विशेष वेतन अशी शासन नियमाप्रमाणे अदाई करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९/१५ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कैलास नगर येथे मराठी माध्यमाची एक बालवाडी आहे, परंतु तेथील बालवाडीची विद्यार्थी संख्या ९० च्या पुढे गेल्याने तेथे दुसरी बालवाडी शिक्षिकेचे पद निर्माण करणे आहे.

विठ्ठलनगर येथे डीपीईपी ची प्रा. शाळा सुरू केली आहे. परंतु तेथील बालवाडी क्रांतीचौक पोलीस वसाहतीत बदलनू दिली आहे. तेंव्हा या शाळेत एक बालवाडी शिक्षिकेचे पद निर्माण करणे आहे.

जमन ज्योती ही वस्तुी हर्सूल गावापासून अंदाजे ३$^{१/२}$ किलो मिटर अंतरावर असून या वस्तीत एक बालवाडी सुरू करून एका बालवाडी शिक्षिकेचे पद निर्माण करणे आहे. वरील ठिकाणी बालवाडीसाठी एकूण बालवाडी शिक्षिकेची पदे निर्माण करण्यास प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** किराडपुरा नं. २ या शाळेत गेल्या चार (४) महिन्यांपासून बालवाडी शिक्षिका नाही, मात्र्रा किराडपुरा नं. १ या शाळेत विद्याथ्र्याची संख्या वाढली म्हणून पदनिर्मितीचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. तेंव्हा किराडपुरा नं. २ या शाळेकरिता बालवाडी शिक्षिकेची आवश्यकता नाही काय? या बाबत मागील सभेतही चर्चा झाली होती. तेंव्हा शिक्षकांच्या प्रतिक्षा यादीतील किराडपुरा नं. २ या शाळे करिता बालवाडी शिक्षिका घेण्यांत यावी.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैलासनगर, क्रांतीचौक पोलीस वसाहत आणि जमन ज्योती येथील शाळेकरिता प्रत्येक एक या प्रमाणे तीन बालवाडी शिक्षकांची पदे निर्माण करण्यांस मंजुरी देण्यांत येते.

याशिवाय सभगृहाने मंजुरी दिलेल्या जागेवर नियुक्त देऊनही एखादी शिक्षिका रुजू झाली नसेल तर अशा शिक्षिकेस पुन्हा नोटीस देऊन कामावर रूजू करून घ्यावे. अन्यथा प्रतिक्षा यादीतील शिक्षिकांची नियमाप्रमाणे या जागेवर नेमणूक करावी आणि पुढील सभेत बालवाडी शिक्षकांबाबत तक्रार येणार नाही. याची शिक्षणाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १००/१६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर बायजीपुरा स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९२-९३ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ९,१८,१०७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक १८-०२-१९९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण एक निविदा पत्रक प्राप्त झाले. प्राप्त निविदापत्रक दिनांक २०-०६-९५ रोजी मा. मुख्य लेखा परिक्षक यांच्या समक्ष उघडण्यात आली. असता त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. ए.सी. कोठारी १२.६५%

नंतर मा. आयुक्त यांच्या आदेशानुसार एजन्सीस दराच्या वाटाघाठीसाठी बोलावण्यात आले असता मा. आयुक्त यांच्या दालनात दराबाबत चर्चा होवून एजन्सीने सदर काम १२.५% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करण्याबाबत संमती दर्शविली आहे.

तरी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. ए.सी. कोठारी यांची ३% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर बायजीपुरा स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा दराबाबत गुत्तेदार, श्री. ए. सी. कोठारी यांचे समवेत झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधिता कडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०१/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या बांधकामा करिता सिमेंटची अत्यंत गरज आहे. त्यासाठी कार्यालयातर्फे निविदा क्र.मनपा/शअ/भांडार/२१५/ दि. २२-०५-९५ अन्वये १५०० मे. टन खरेदरीची निविदा प्रसिध्दी केली असता त्यात ५ निविदा विकल्या व ५ निविदा दि. ०१-०६-९५ ला स्विकारल्या गेल्या त्यातील दर व अटी पाहता अतिशय जाचक व किचकट अटी होत्या त्यावर विचार करून मा. आयुक्त साहेबांनी स्वतः, नागपुर व अकोला येथील सिमेंट डिलरशी संपर्क साधला असता माणिकगड सिमेंटच्या औरंगाबाद डिलेव्हरीचा दर रु. १२८=०० जकातसह राहिल अशी माहिती मिळाली. त्या आधारे वरिल निविदा फेर निविदा प्रसिध्दीस करावी असा दि. २९-०६-९५ रोजी मा. आयुक्त साहेबांनी आदेश दिला. त्या प्रमाणे फेर निविदा क्र.मनपा/शअ/भांडार/२८०/९५/दि. ०७-०७-९५ ला खालील वर्तमान ५ पत्रात प्रसिध्द करण्यात आली. नवा मराठा, लोकमत समाचार, मराठवाडा, लोकमत नागपुर, सकाळ ला ३ निविदा प्राप्त झाल्या त्यांचे दर व अटी खालीलप्रमाणे माणिकगड सिमेंटचे दर रु. २,५५०=०० प्रति टन

१) माणिक ग्रेड ४३ ग्रेड सिमेंट
२) महानगरपालिकेने मागणी केलेले संपूर्ण १५०० मे. टन सिमेंट पुरविण्याची खात्री दिलेली आहे.
३) दर
    १) मुळ दर रु. १३०३ प्रतीटन

२) अबकारी दर कर ३५० प्रती टन
३) विक्री कर रु. २२२ प्रति टन.
(अ) १८७५/-
४) वरील दर ३०-०७-९५ पर्यंत बंधन कारक राहतील
(ब) (५) सिमेंट फॅक्टरी ते औरंगाबाद रेल्वेस्टेशन पर्यंतची वाहतुक रु. ५०२=०० प्रती टन या प्रमाणे कंपनी तर्फे करून देण्यांत येईल.
(क) (६) रेल्वेस्टेशन पासून महानगरपालिका गोडाऊन पर्यंतची वाहतुक उतराई, स्टेशन क्लिअरींग यार्ड व जकातसाठी रु. १७३=०० प्रती मे. टन याप्रमाणे आमच्या अधिकृत एजंटला द्यावे लागतील.
७) पुरवठा वेळापत्रक

आपणा तर्फे पुरवठा करण्याचे आदेश मिळाल्यापासून २१ दिवसांच्या आत पुरवठा सुरू करण्यात येईल.

८) वर नमूद केल्याप्रमाणे पुरवठा करण्यांस विलंब झाल्यास त्याबद्दल दंडाची आकारणी करण्यांत येऊ नये.
९) पुरवठा केलेल सिमेंट काही कारणास्तव आपणातर्फे नाकारण्यात आले तर त्यासंबंधी आम्हास २४ तासांच्या आत कळवावे.
१०) मालाचा पुरवठा झाल्यानंतर बिलाची रक्कम अदा करण्यांत यावी.
११) सदरील दर हे ३०-०७-९५ पर्यंत, बंधनकारक राहतील.
१२) अबकारी कर, विक्री कर, जकात, रेल्वे कर इत्यादी करात वाढ झाल्यास ती आपणास सोसावी लागेल.
१३) त्पादिक मालातील कच्च्या मालाच्या दरात वाढ झाल्यास ती आपणास सोसावी लागेल.
१४) राजुर क्षेत्र जिल्हा चंद्रपुर येथून मालाचा पुरवठा करण्यात येईल

**<u>व्ही. अे. ट्रेडींग कंपनी</u>**

१) ओ.पी.सी.सी.आय. ४३ ग्रेड सिमेंट
२) सिमेंट पुरवण्याचे दर रु. १३५=०० प्रति गोणी (रु. २,७००=०० प्रती टन) मालाचा पुरवठा झाल्या पासून ७ दिवसांच्या आंत देयक अदाई करण्यात यावी या अटीवर आहे.
३) सिमेंट पुरवठा करण्यांचे दर १३२=०० प्रती गोणी (२,६४०=०० प्रति टन) १०० टक्के अग्रीम रक्कम कार्यादेश सोबत देण्यात यावा.
४) वरील दर हे १५ दिवसांत करिता बंधनकारक राहतील.
५) पुरवठा केलेल्या मालाचा चाचणी अहवाल कंपनीचा देण्यांत येईल.

**<u>अजंठा ट्रेडींग कंपनी</u>**

**<u>ओ.पी.सी. सिमेंट ४२ ग्रेड</u>**

१) पुरवठा दर रु. १३२=०० (प्रति गोणी प्रती टन) खालील अटीला बंधनकारक राहून १०० टक्के अग्रीम रक्कम कार्यादेशा सोबत देण्यांत यावी.

२) पुरवठा दर २,६८०=०० प्रति टन
खालील अटीस बंधनकारक राहील.
३) ३ दिवसांच्या आत ३०० गोणीचा पुरवठा करण्यात येईल.
४) सदरील मालाचा पुरवठा ३० दिवसांकरिता बंधनकारक राहतील.

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या व अटी पाहता माणिकगड सिमेंट कंपनी-चे दरपत्रक सर्वात कमी आहेत. त्यांचे दर प्रति टन २,५५०/- (दोन हजार पाचशे) पन्नास आहे. (प्रति गोणी १२७=५० आहे.) तरी कार्यालयातर्फे १,१७६=०० मे. टन माणिकगड सिमेंट खरेदी करून त्याची रक्कम रु. २५५०/- प्रति टन या दराने (२९,९८,८००=००) एकोणतीस लाख अठ्ठावन्न हजार आठशे होते. कार्योत्तर प्रस्तावास मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या बांधकामासाठी आवश्यक असलेले १५०० मे. टन सिमेंट प्रति टन रुपये २५५०=०० (सर्व करासह) या दराने निविदेतील अटी १ ते १४ सह मे. माणिकगड सिमेंट कंपनी यांचे मार्फत खरी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

प्रती टन रुपये २५५०/- या दराने कार्यालयाने मे. माणिकगड सिमेंट कंपनी यांचेकडून ९,१७६ मे. टन सिमेंट खरेदी केलेले असल्यामुळे खरेदी करण्यास आलेल्या सिमेंट करिता रक्कम रुपये २९,९८,८०० कार्योत्तर खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०२/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिके हद्दितील असलेल्या विविध चौकात तसेच गार्डन मधील एकूण १८ फवारे अतिस्त्वात आहे, ते व्यवस्थित चालू बंद करणे, देखरेख करणे यासाठी वार्षिक करारावर काम दिल्यास फवारे सुरक्षित, सुरळीत कार्यान्वित ठेवता येतील, त्यासाठी दरपत्रके मागवली असता, एकूण दोन दरपत्रके प्राप्त झाली, त्यापैकी दरपत्रके मागवली असता, एकूण दोन दरपत्रके प्राप्त झाली, त्यापैकी दराचे तुलनात्मकदृष्ट्या मे. लुना इलेक्ट्रीकल यांचे दर कमी म्हणजेच रु. २,०९,०००/- चे आहेत त्यांनी पत्र देऊन हेच दर रुपये १८०००/- कमी केले आहेत व रु. १,९१,००० मध्ये काम करण्याचे लेखी दिलेल. परंतु सदरचे दर जास्त वाटत असल्याने मा. आयुक्त यांनी दरात कपात करून हेच काम रु. १,७५,०००/- चे रक्कमेत मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांना सुचविल्या नुसार त्यांनी दिनांक २४-०८-९५ रोजी पत्र देऊन हेच काम रु. १,७५,०००/- चे रक्कमेत करण्यास मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांना सुचविल्यानुसार त्यांनी दिनांक २४-०८-९५ रोजी पत्र देऊन हेच काम रु. १,७५,०००/- चे रक्कमेत करण्यास मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांना सुचविल्यानुसार त्यांनी दिनांक २४-०८-९५ रोजी पत्र देऊन हेच काम रु. १,७५,०००/- रक्कमेत करण्यांस सहमती विचारली असता, लेखी पत्र दि. २४-०८-९५ दिले वरील रक्कमेत काम करण्यांस सहमती दर्शविली आहे. त्यानुसार कामाचा खर्च रु. १,७५,०००/- मंजुरी देण्यास तसेच मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांचेकडून वार्षिक करारावर करून घ्यावयाचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. भागवत कराड :** प्रस्तावित काम एखाद्या एजन्सीमार्फत करून घेण्याऐवजी महापालिकेतर्फे करून घेणे शक्य आहे काय, असल्यास या कामासाठी किती खर्च येतो याचा खुलासा व्हावा.

**अति. शहर अभियंता :** स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे शहरातील फवारे दुरुस्ती व देखभालीचे काम सध्या महापालिकेतर्फेच करण्यात येत आहे. तथापी हे काम एजन्सीमार्फत करून घेतल्यास त्यात नियमितपणा येणे, नादुरुस्त फवाऱ्याची त्वरित दुरुस्ती करणे, नियमितपणे फवारे चालू करणे अथवा करणे ही कामे व्यवस्थित होऊ शकतील.

**मा. सभापती :** महानगरपालिके तर्फे शहरात कार्यरत असलेल्या फवाऱ्यांपैकी बहुतांश म्हणजेच १९ फवारे गार्डन मधेच आहेत, अशा प्रकारे एकाच ठिकाणी असलेले फवारे आणि इतर फवारे यांची दुरुस्ती, देखभाल इत्यादी कामे महानगरपालिके तर्फेच करणे योग्य होईल, करिता सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १०३/१९ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जानेवारी, १९९६ तिल संक्रांती पूर्वी दरवर्षी प्रमाणे महानगरपालिकेतील सर्व चतुर्थ श्रेणी (कायम स्वरुपी) स्त्री कामागारांना साड्याचे/ब्लाऊज पिसेस/शर्ट सलवारचे वाटन करणे आहे. सदरील खर्चासाठी अंदापत्रकीय तरतूद रु. ५,००,०००/- ठेवण्यांत आलेली आहे. सदरील साहित्य खरेदीसाठी रक्कम रु. ३,५०,०००/- (रुपये तीन लाख पन्नास हजार) चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

यानंतर निविदा मागवून त्या अंतिम करणे आहे. मान्य निविदा धारकांस साहित्य पुरवठा करणेस किमान ४५ दिवसांचा कालावधी द्यावा लागत असल्याने सदरील बाब तात्काळ स्वरुपाची आहे. करिता अंदाजपत्रकास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. हमिदउद्दिन ताबा :** यापूर्वीच्या अनुभवाप्रमाणे सभागृहाने मंजूर केलेल्या नमुना साड्या कामागारांना वाटल्या जातात आणि याबाबत जवळ जवळ ६ महिने पर्यंत कामगारांच्या तक्रारी येत असतात. तेंव्हा या बाबींचा विचार करावा.

**मा. सभापती :** कामागार कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन मागील वर्षासारखा प्रकार होऊ नये आणि सभागृहाने मंजूर केलेल्या नमुना साड्यांच्या प्रतवारी मध्ये फरक येणार नाही याची दक्षता घेणे.

**श्री. गौतम खरात :** सभागृहात तर्फे ज्या साड्यांचा नमुना मंजूर करण्यांत येईल त्या साड्यांच्या चार-पाच नमुना प्रती संबंधितकडून घेऊन मंजूर करण्यात आलेली नमुना साडी वाटपाचे वेळी कामगारांच्या माहिती करिता प्रत्येक विभागीय कार्यालयात पहाणीसाठी उपलब्ध करून ठेवण्याची व्यवस्था करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९६ मागील मकर संक्रांती पूर्वी महानगरपालिकेतील कायम स्वरुपी चतुर्थ श्रेणी स्त्री कामगारांना साडी/ ब्लाऊज / पीस/ शर्ट/ सलवार इत्यादी गणेवश कापड वाटप करण्यासाठी रक्कम रुपये ३,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *"ऐनवेळचे विषय"*

**विषय क्र. १०४/२० :**

कार्यकारी अभियंता, (पाणी पुरवठा व जलनिःसारण) यांनी मो. जसवंत पूरा येथे ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामाकरिता रक्कम रु. १७२८७६=०० चे अंदाजपत्रक सादर केले आहे.

सदरील काम हे देखभाल व दुरुस्ती ९५-९६ ला शिर्षकामधून प्रस्तावित असून सदरील लेखा विर्षकास १९०=०० लाख आर्थिक तरतूद मंजूर असून ड्रेनेज विभाग-२ मध्ये सदरील कामास मंजुरी दिल्यास १,६१,३७७=०० रु. शिललक राहतात. सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. ०७-०९-९५ रोजी मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. जसवंतपुरा येथे ड्रेनेज लाईन टाकण्यांच्या कामाकरिता रक्कम रुपये १,७२,८७६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५/२१**

कार्यकारी अभियंता, (पाणी पुरवठा व जलनिस्सारण) यांनी मो. कैलासनगर येथील अस्तित्वात असलेली १५० मी. मी. व्यासाची एस. डब्ल्यु. जी. ड्रेनेज लाईन बदलून २५० मी. मी. व्सासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे या कामाकरिता रक्कम रु. १,२४,७००=०० चे अंदाजपत्रक सादर केले आहे.

सदरील काम एम ॲण्ड आर ९५-९६ मधून प्रस्तावित असून ह्या एकूण १९०=०० लाख आर्थिक तरतूद मंजूर असून सदरील कामास मंजुरी दिल्यास ५,६४,०४४=०० शिल्लक ड्रेनेज विभाग-२ ला राहतील सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. ०७-०९-९५ रोजी मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. कैलास नगर येथे अस्तित्वात असलेली १५० मी.मी. व्यासाची एस. डब्ल्यु. जी. ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी. व्यासाची आर. सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये १,२४,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०६/२२**

कार्यकारी अभियंता, (पाणी पुरवठा व जलनिःसारण) यांनी मोहल्ला रोषणगेट चंपा मस्जिद चौक येथे ड्रेनेज लाईन टाकणे या कामाकरिता रक्कम रु. २,२९,८५१=०० चे अदांजपत्रक तयार केले आहे.

सदरील काम एम ॲण्ड आर. ९५-९६ च्या शिर्षकातून प्रस्तावित आहे. सदरील शिर्षकात १९०=०० लाख आर्थिक तरतूद मंजूर असून ड्रेनेज-२ विभागास सदरील कामास मंजुरी दिल्यास रु. ३,३४,१९३=०० शिल्लक राहतील.

सदरील कामास मा. आयुक्त महोदयांनी दि. २२-०८-९५ रोजी मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. रोशन गेट चंपा मस्जिद चौक येथे ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता रक्कम रुपये २,२९,८५१/- च्या अदंाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १०७/२३**

कार्यकारी अभियंता, (पाणी पुरवठा व जलनिःसारण) यांनी मो. बारी कॉलनी येथील अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन बदलून त्या ठिकाणी २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे कामाकरिता रक्कम रु. २,९४,०००=०० चे अंदाजपत्रक सादर केले आहे.

सदरील काम "दुरुस्ती व देखभाल" ह्या सन ९५-९६ ह्या शिर्षकामधून प्रस्तावित आहे, सदरील कामास १९०=०० लाख आर्थिक तरतूद मंजूर असून सदरील कामास मंजुरी दिल्यास ड्रेनेज-२विभागास जास्तीचा तरतूद रु. ८४,७००=०० लागेल.

तरी सदरील प्रस्तावास मा. आयुक्तांनी दि. ०७-०९-९५ रोजी मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बारी कॉलनी येथे अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन बदलून २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये २,९४,०००/- च्या अंजदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०८/२४**

कार्यकारी अभियंता, (पाणी पुरवठा व जलनिःसारण) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला हमालवाडी रेल्वेस्टेशन भागात १५० व २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठीचे अंदाजपत्रक रु. ३,२१,२००=०० चे तयार केलेली आहे.

सदरील होणारा खर्च हा "दुरुस्ती व देखभाल" सन ९५-९६ मधून खर्ची करणेचे असल्याने वरील तयार करण्यात आलेल्या रु. ३,२१,२००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळाणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. हमालवाडी रेल्वेस्टेशन येथे १५०/२५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता रक्कम रुपये ३,२१,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १०९/२५**

कार्यकारी अभियंता, (पाणी पुरवठा व जलनिःसारण) यांनी मो. जयसिंगपुरा येथील ॲड. इंगळे व अरब खिडकी लगतच्या गल्लीतील सरफेस गटारीचे पुनः बांधकाम करणेच्या कामाकरिता रक्कम रुपये १,३८,१००=०० चे अंदाजपत्रक सादर केले आहे.

सदरील काम "झोपडपट्टी आणि शहरातील इतर भागामध्ये खुल्या गटारी बांधणे" ह्या शिर्षकामधून प्रस्तावित आहे, ह्या शिर्षकाखाली र. रु. ५०,००,०००=०० च्या प्रस्तावित कामास मंजुरी दिल्यास रु. ३,८९,४००=०० शिल्लक राहतील. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. जयसिंगपुरा येथील ॲड. इंगळे व अरब खिडकी लगतच्या गल्लीतील सरफेस गटारीचे पुन्हा बांधकाम करण्यारिता रक्कम रुपये १,३८,१००=०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११०/२६**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो. बारुदगरनाला, जोहरीवाडा, पांजरपोळ, कसुपारख  मोहल्ला नगारखानागल्ली, दिवादेवडी, फकीरवाडी भागात खांडकी दुरुस्ती करणे व शहाबादी फरशी बसविणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूची नुसार रक्कम रु. १,३५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामास खर्च रस्ते दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षकामधून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बारुदगरनाला, जोहरीवाडा, पांजरपोळ, कसुपारख मोहल्ला नगारखानागल्ली, दिवाणदेवडी, फकीरवाडी भागात खांडकी दुरुस्ती करणे व शहाबादी फरशी बसविणेच्या कामाकरिता रक्कम रुपये १,३५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १११/२७**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जगदंबा मंदिर, बेगमपुरा या ठिकाणी म.न.प्रा. शाळेसयाठी भाड्याने घेतलेल्या इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळा नुसार र. रु. ३,३८,४१८/- प्रती महाभाडे आकारणी करण्यात आलेली आहे. परंतु सदरील इमारतीची दुरुस्ती संबंधित संस्थेने (ट्रस्टी) करून देण्याच्या अटीवर प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बेगमपुरा येथील प्राथमिक शाळेकरिता जगदंबा मंदिर ट्रस्ट यांची इमारत सार्वजनिक बांधकाम खात्याचे भाडे परिगणन तक्त्याचा प्रतिमहा रुपये २८७०/- त्याप्रमाणे इमारतीची दुरुस्ती संबंधित संस्थेने करून देण्याच्या अटीवर जगदंबा मंदिर ट्रस्ट यांची इमारत महानगरपालिका शाळेसाठी भाड्याने घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११२/२८**

जकात अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मे. आनंद इंटरप्राईजेस औरंगाबाद यांनी दि. २८-०६-९५ च्या पत्रानुसार जकात चालू खाते उघडण्यासाठी विनंती केली आहे.

अर्जदाराचे आयात व निर्यात मालाचे मासिक उलाढाल रक्कम रुपये ३.५०/- लाख असून त्यांनी रक्कम रुपये ८७५०/- जकात कर भरलेलला असल्याचे आढळून आले आहे. जकात चालू खाते उघडण्याचे अधिकार औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम १९८४ चे कलम २५ अनुसार स्थायी समितीस आहे. स्थायी समितीने सदर प्रस्तावास मान्यता देण्याचे ठरविल्यास अर्जदाराकडून रक्कम रु. १५,०००/- विनाव्याजी अनामत ठेवता येईल अर्जदारास निर्यात मालासाठी जकात नियम १६ व स्थायी आदेश क्रमांक १४ चे बंधनचे अधिन राहील करिता स्थायी समिती समोर प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे. आनंद इंटरप्राईजेस निर्यात मालाची मासिक उलाढाल लक्षात घेता उक्त संस्थेकडून बिन व्याजी रुपये १५,०००/- अनामत रक्कम घेऊन जकात कराचे चालू खाते उघडण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३/२९**

जकात अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मे. आनंद एजन्सीज औरंगाबाद यांनी दिनांक २८-०६-९५ च्या पत्रानुसार जकात चालू खाते उघडण्यासाठी विनंती अर्ज केला आहे.

अर्जदाराने आयात व निर्यात मालाची मासिक उलाढाल रक्कम रुपये ३.५०/- लाख असून त्यांनी रक्कम रुपये ८७५०/- जकात कर भरलेला असल्याचे आढळून आले आहे. जकात चालू खाते उघडण्याचे अधिकार औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम १९८४ चे कलम २५ नुसार स्थायी समितीस आहे, स्थायी समितीने सदर प्रस्तावास मान्यता देण्याचे ठरविल्यास अज्रदाराकडून रक्कम रुपये १५०००/- विनाव्याजी अनामत ठेवताय येईल अर्जदारास निर्यात मालासाठी जकात नियम १६ व स्थायी आदेश क्र. १४ चे बंधनाचे अधिन राहील करिता स्थायी समिती समोर प्रस्ताव विचारास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आनंद एजन्सी औरंगाबाद यांचे आयात निर्यात मालाची मासिक उलाढाल लक्षा ात घेता, उक्त संस्थेकडून बिन व्याजी रुपये १५,०००/- अनामत रक्कम घेऊन जकात कराचे चालू खाते उधडण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४/३०**

मा. आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम (५)-२ (१) मध्ये रक्कम रुपये ३०००/- च्या वरील खर्चाची कामे ही स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन करणे बाबत तरतूद आहे परंतु सदरील कामे ही फुटकळ स्वरुपाची असल्यामुळे स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दीस देऊन केल्यास अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जाहिरातीचाच खर्च जास्त वाढतो. त्या अनुषंगाने लेखा संहिता नियम १९७१ च्या कलम १८५ मध्ये सार्वजनिक बांधकाम खाते महाराष्ट्र शासन यांचे लेखा नियम मार्गदर्शक म्हणून वापरण्यास तरतूद केलेली आहे. त्यानुसार रक्कम रुपये २५,०००/- पर्यंतची कामे ही स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द न करता कार्यालयातच सूचना फलकावर निविदा सूचना लावून करून घेण्यात येतात. करिता यापुढेही रुपये २५०००/- पर्यंतच्या खर्चाची कामे ही कार्यालयात सूचना फलकाव निविदा सूचना लावून करून घेणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २८१ अन्वये रुपये ३०००/- वरील खर्चाची कामे स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन करण्यांची तरतूद असली तरी स्थानिक वृततपत्रांच्या जाहिरातीचा खर्च जास्त वाढतो, म्हणून लेखा संहिता नियम १९७१ च्या कलम १८५ मध्ये सार्वजनिक बांधकाम खाते महाराष्ट्र शासन यांचे लेखा नियम मार्गदर्शक म्हणून वापरण्याची तरतूद असल्यामुळे या तरतूदीनुसार औरंगाबाद महानगरपालिकेची रु. २५०००/- (पंचविस हजार) पर्यंतची कामे स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द न करता कार्यालयाच्या सूचना फलकावर निविदा सूचना लाऊन करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५/३१**

उप आयुक्त-१ महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गट "ड" (वर्ग ३ व ४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नती च्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंडीतता घालविण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.-१/९५/बारा, मंत्रालय मुंबई दिनांक ८ जून १९९५ शासन निर्णयानुसार वर्ग ३ व ४ मधील पदधारकांना १२ वर्षाच्या नियमित सेवेत नंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देण्यांत येईल. ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती साखळीतील पदावर पदोन्नतीसाठी पद अस्तित्वात नाही अशा कर्मचाऱ्यांना सोबतच्या परिष्ठामध्ये दर्शविण्यात आल्यानुसार वरिष्ठ वेतन श्रेणी देण्यांत येईल व त्याची प्रमुख वैशिष्ट्ये व अंमलबजावणी कार्यपध्दती खालीलप्रमाणे.

१) ही योजना १ ऑक्टोंबर १९९४ पासून अंमलात येईल.
२) या योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीसाठी विहित कार्यपध्दती, जेष्ठता, पात्रता, अर्हता परिक्षा, विभागीय परीक्षा या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.
३) सरळ सेवेने प्रविष्ट झालेल्या अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत एकवेळ या योनजे अंतर्गत १२ वर्षानंतरच्या नियमित सेवेनंतर वरिष्ठ वेतनश्रेणी अनुदेय असेल.
४) ज्या कर्मचाऱ्यांना यापूर्वी दोन पेक्षा जास्त पदोन्नती मिळाल्या आहेत. अशा कर्मचाऱ्यांना या योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणार नाही.
५) गट "ड" मधील कर्मचाऱ्यांना या योजने अंतर्गत गट "क" मधील वेतनश्रेणी म्हणजे रु. ९५०-१४०० दिली तरी त्यांचे सेवानिवृत्ती चे वय ६० हेच असेल. मात्र गट "क" मधील अन्य वरिष्ठ पदांवर त्यांना पदोन्नती देण्यासाठी या योजने अंतर्गत विचार केला जाणार नाही.
६) या पदोन्नतीमुळे जबाबदारी आणि कर्तव्ये यात वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे वेतननिश्चितीत लाभ देण्यांत येईल. मात्र वेतन निश्चितीत मिळालेला हा लाभ तयाच वेतनश्रेणीत कार्यात्मक (Funtional) पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.
७) जर कर्मचाऱ्यांस विशेष वेतन मिळत असेल तर या योजना खालील पदोन्नतीनंतर कर्मचाऱ्यांस मुळ वेतनश्रेणीतील विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.
८) या योजना अंतर्गत पदोन्नती मिळाली तर कर्मचाऱ्यांचे नांव कनिष्ठ (मुळ) संवर्गाच्या ज्येष्ठता समचित राहील आणि सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार उपलब्ध रिक्तेत योग्य वेळी नियम पदोन्नतीसाठी (Fundianal Promation) त्याचा विचार करण्यांत

येईल. नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांस या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्याच प्रमाणे नियमित पदोन्नती नाकारलेल्या कर्मचाऱ्यांस देखील या पदोन्नतीचा लाभ मिळू शकणार नाही. या आधीच त्यांना पदोन्नती दिली असल्यास मुळच्या पदावनत करण्यांत येईल. अशा आशयाचे बंध पत्र कर्मचाऱ्यांना लिहून द्यावे लागले. मात्र देण्यांत आलेल्या आर्थिक लाभाची वसुली केली जाणार नाही.

तथापी नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एएमसी-१२९१/९३८/सीआर-३९/९२/नवि-२४ दिनांक १७ जून १९९३ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद धिकारी/कर्मचारी यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणेबाबतचा शासन निर्णय असून, सदर शासन निर्णयानुसार दि. १ जानेवारी १९८६ पासून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

करिता कर्मचाऱ्यांना १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर वरिष्ठ वेतनश्रेणी देणे संदर्भाने कनिष्ठ लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना शासन निर्णय जा.क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९४ बारा, दिनांक ८ जून १९९५ च्या सोबत असलेल्या परिशिष्ठात दर्शविलेल्या वेतनश्रेणी ऐवजी नगर विकास विभागाने दिनांक १७ जून १९९३ च्या शासन निर्णयानुसार मान्य केलेले वरिष्ठ लिपिक संवर्गाची सुधारित वेतनश्रेणी रु. १४००-४०-१८००-ईबी-५०-२३०० लागू करण्यांत याची या संदर्भाने प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

शासन निर्णय क्रमांक : एस.आर.व्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दिनांक ८ जून, १९९५ सोबतचे परिशिष्ट

| अ.क्र. | विद्यमान वेतनश्रेणी | पदोन्नतीची वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १) | ७५०-१२-८७०-द.री.१४-९४० | ७७५-१२-९५५ द.शे.-१०३०-२०-११५० |
| २) | ७७५-१२-९५५-द.रो.-१५-१०३०-२०-११५० | ९५०-२०-११५०-द.रो.२५-२५०० |
| ३) | ८२५-१५-९०० द.रो.-२०-१२०० | ९५०-२०-११५०-द.रो. २५-१५०० |
| ४) | ९५०-२०-११५०द.रो.-२५-१४०० | १२००-३०-१४४०-द.रो.-३०-१८०० |
| ५) | ९५०-२०-११५०द.रो.-२५-१५०० | १२००-३०-१५६०-द.रो.-४०-२०४० |
| ६) | ९७५-२५-१५०-द.रो.३०-१६६० | १३२०-३०-१५६० द.रो.-४०-२०४० |
| ७) | १२००-३०-१४४०-द.रो.-३०-१८०० | १३५०-३०-१४४०-४०-१८००-द.रो.-५०-२२०० |
| ८) | १२००-३०-१५६०-द.रो.-४०-२०४० | १४००-४०-१८००-द.रो.-५०-२३०० |
| ९) | १३२०-३०-१५६०-द.रो.-४०-२०४० | १४००-४०-१८००-द.रो.-५०-२३०० |
| १०) | १३५०-३०-१४४०-४०-१८००द.रो.-५०-२२०० | १६००-५०-२३००-द.रो.-६०-२६०० |
| ११) | १४००-४०-१८००-द.रो.-५०-२३०० | १६४०-६०-२६००-द.रो.-७५-२९०० |
| १२) | १६००-५०-२३००-द.रो.-६०-२६६० | २०००-६०-२३००-द.रो.-७५-३२००-१००-३५०० |
| १३) | १६४०-६०-२६००-द.रो.-७५-२९०० | २०००-६०-२३००-द.रो.-७५-३२००-१००-३५०० |
| १४) | २०००-६०-२३००-द.रो.-७५-३२०० | २०००-६०-२३००-द.रो.-७५-३२००-१००-३५०० |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.-१/९५/बारा, दिनांक ८ जून १९९५ अन्वये गट "क" व "ड" (पूर्वीचे वर्ग ३ व ४) मधील पदधारक कर्मचाऱ्यांना पदोन्नती साखळीतील पदावर पदोन्नतीसाठी पद अस्तित्वात नसल्यामुळे कालबध्द पदोन्नती योना लागू करण्यांचा निर्णय घेतला असल्यामुळे या निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिकेतील गट "क" व "ड" (पूर्वीचे वर्ग ३ व ४) या संवर्गातील कर्मचाऱ्यांना १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदांवरील वेतनश्रेणी दिनांक ८ जून १९९५ च्या शासन निर्णयातील प्रमुख वैशिष्ट व अंमलबजावणीची कार्यपध्दती यातील अ/ब/क/इ/ई/म/न/य आणि उक्त शासन निर्णयाच्या सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनुक्रमांक १ ते मधील अनुक्रमांक १ ते ४ व ६ ते १६ मधील विद्यमान वेतनश्रेणी व पदोन्नतीची वेतनश्रेणी तसेच शासन निर्णय क्रमांक एएमसी/१०९९/९३८/सीआर-३९/९२ नवि-२४ दि. १७ जून १९९३ नुसार मान्य केलेली वरिष्ठ लिपिक संवर्गाची सुधारित वेतनश्रेणी रु. १४००-४०-१०००-ईबी-५०-२३०० ही लागू करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११६/३२**

दिनांक ०४-०९-९५ च्या विशेष सर्वसाधरण सभेत ठरल्याप्रमाणे दि. १९ व २० सप्टेंबर १९९५ च्या दरम्यान औरंगाबाद येथे मंत्री मंडळाची बैठक आयोजली आहेत. यावेळी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे मा. मुख्यमंत्री, श्री. मनोहर जोशी यांना मानपत्र देऊन त्यांचा व त्यांच्या मंत्री मंडळातील सर्व स. स. मंत्री महोदयांचा तथा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. दिवाकर रावते यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात होणाऱ्या विधीमंडळाच्या बैठकीचे औचित्य साधून महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री, आणि मराठवाडा वैधानिक मंडळाचे अध्यक्ष यांना औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या (अनुक्रमे) मानपत्र आणि स्मृती चिन्ह या व इतर कार्यक्रमांसाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव, | सभापती, स्थायी समिती, |
| औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद | औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक २८-०९-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस समिती सभागृहात सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. अब्दुल रशिदखान (मामू)
२) श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
३) डॉ. भागवत कराड
४) श्री. गौतम भागाजी खरात
५) सौ. रजनी रमेश जोशी
६) श्री. प्रकाश निकाळजे
७) श्री. बैनाडे कवंरसिंग
८) श्री. महंमद मुश्ताक अहमद
९) कु. माया लिंबाजी लाडवाणी
१०) श्री. विजयकुमार मेहेर
११) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
१२) श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
१३) सौ. पद्मा बाबुराव शिंदे
१४) श्री. हमीदउद्दिन ताबा
१५) श्री. सुदाम सोनवणे

**संवाद :**

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** मा. सभापती यांचे गेल्या चार दिवसात शहराबाहेर वास्तव्य होते. मा. आयुक्त ही प्रशिक्षणा निमित्त बाहेरगांवी गेले आहे. या संधीचा फायदा घेऊन सभासदांनी व अधिकाऱ्यांनी महापालिका फंड लुटला अशा प्रकारची बातमी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे. तेंव्हा ज्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी अशा प्रकारची बातमी प्रसिध्दीसाठी दिली आहे, अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती :** लोकप्रतिनिधी नियुक्ती होण्यापूर्वी महापालिका प्रशासनाने महापालिकेचे अंदाजपत्रक तयार केले आहे. प्रशासनामध्ये काम करण्याची विशिष्ट पध्दत आहे. वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमी बाबत स्थायी सिमती किंवा सर्वसाधारण सभा जबाबदार नाही, प्रसिध्द झालेल्या बातमी प्रशासन जबाबदार आहे.

**श्री. हमीदउद्दिन ताबा, श्री. प्रभाकर विधाते :** वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली जकात विषयक बातमी कशी प्रसिध्द झाली या बाबत चौकशी करण्यांत यावी, प्रसिध्द झालेल्या बातमी मुळे सर्व सभासदांची बदनामी झाली आहे.

**मा. सभापती :** महापालिका प्रशासनांचे अधिकारी आणि लोकनियुक्त सभासद यांना प्रसिध्द होणाऱ्या स्थानिक वृत्तपत्रात या ना त्या कारणाने आपले नाव जनतेसमोर कशी येईल अशी इच्छा असते. तेंव्हा ज्या अधिकाऱ्याने किंवा लोकनियुक्त सभासदांने वृत्तपत्रात जकात विषयीची बातमी प्रसिध्दीस दिली आहे, अशा

अधिकाऱ्याने किंवा लोकनियुक्त सभासदाने स्थायी समिती समोर यावे, म्हणजे यावर सविस्तर चर्चा करता येईल. आज प्रशासनाला शहरातील कामाबाबतचे अंदाजे २.०५ ते ३.०० कोटीची बिले मक्तेदारांना अदा करावयाची आहेत. अशा वेळी एकाच वेळी अनेक कामे सुरू केल्यानंतर या कामाचे देयके अदा करण्यासाठी प्रशासनाकडे जमा होणाऱ्या नियमितपणे (कर व इतर विविध मार्ग) निधीचा प्रशासनाने विचार करावयास हवा होता ही स्थायी समितीची जबाबदारी नाही.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** स्थानिक वृत्तपत्रात महापालिका प्रशासना विरुध्द खोटी बातमी प्रसिध्दीस देणाऱ्या अधिकाऱ्यांचा निषेध करण्यात येतो.

**मा. सभापती :** औरंगाबाद शहरातील व्यापारी वर्ग पक्ष पंधरवाड्याच्या कालावधीत नविन माल खरेदी करीत नाही, यामुळे जकातीचे उत्पन्न कामी येण्याची शक्यता आहे, दि. २६-०९-९५ ची वसूली पाहता या दिवशी ९,९७,०००/- लाख वसुली झाली आहे. याचा विचार करावयास हवा. अशा प्रकारे ही बातमी सुध्दा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द होणे आवश्यक होते. याकडे दुर्लक्ष केले जाते.

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** महानगरपालिका प्रशासनाने लोकनियुक्त प्रतिबंधिचा कारभार सुरू होणार ही बाब लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणावर कामे सुरू केली आहेत. येणारे लोकप्रतिनिधी महापालिकेचा निधी लुटतील असे प्रशानाला वाटले. या बाबत महापालिकेचा निधी लुटतील असे प्रशासनाला वाटले. याबाबत महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता. या बाबींचाही या ठिकाणी विचार करणे आवश्यक आहे.

**श्री. अ. रशिदखॉन (मामू) :** नुकतीच पार पडलेली मंत्रीमंडळाची बैठक नजिकच्या काळात येणारा दिवाळी दसऱ्याचा सण असे अनेक प्रश्नसमोर ठवेले तर जकात कर मोठ्या प्रमाणात वसूल होणे आवश्यक वाटते. तथापी प्रत्यक्षात मात्र जकात कराची कमी वसुली झालेली आहे याचे कारण काय? जकात विभागातर्फे शहरातील मोठमोठ्या व्यापारी संस्थाना जकात चालू खाते सुरू करण्याची परवानगी दिल्यामुळे जकात वसुली कमी होती मिळालेल्या माहिती नुसार अंदाजे २५ ते ३० जकात कराचे चालू खाते सुरू करण्याची परवानगी दिल्यामुळे जकात वसुली कमी होते, मिळालेल्या माहिती नुसार अंदाजे २५ ते ३० जकात कराचे चालू खाते कार्यरत आहे. स्थानिक वृत्तपत्रात मेल्ट्रॉन कंपनीच्या जकात करा बाबतची बातमीप्रसिध्द झालेली आहे. नियमाप्रमाणे मा. आयुक्त यांना जकात कराचे चालू खाते उघडण्याची परवानगी देण्याचे अधिकार नाही. तेंव्हा असे सर्व जकात कराचे चालू खाते बंद करून स्थायी समितीच्या मंजुरीनंतर व्यापारी संस्थाना जकात कराचे चालू खाते उघडण्याची परवानगी देण्यांत यावी.

**मा. सभापती :** वृत्तपत्रात प्रसिध्द झलेल्या बातम्या वरून अधिकारी व सभासद यांच्यात वाद लावण्याचा हा प्रयत्न दिसतो. मा. मुख्य लेखा परिक्षक यांना पत्र देऊन जकात विभागात चालू असलेल्या जकात कराचे चालू खात्या बाबत अद्यायावत माहिती देण्याबाबत कळविण्यांत आले आहे.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** जकात विभांगातील काम करणारे कर्मचारी गेल्या अनेक वर्षापासून जकात विभागातच काम करतात, अशा कर्मचाऱ्यांची जकात विभागातून

बदली करण्यात यावी जकात विभागाकरिता साखळी पध्दतीने जकात कर्मचाऱ्यांची नियुक्त करणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** मा. उप आयुक्त -१ यांनी स. सभासदांच्या सुचनेवर योग्य ती अंमलबजावणी करावी.

**श्री. अ. रशिदखान (मामू) :** जकात विभागाच्या लेखा परिक्षणासाठी जो कर्मचारी वृंद नेमण्यात आलेले आहे, यापैकी बऱ्याच कम्रचाऱ्यांनी यूापर्वी जकात विभागात काम केलेले आहे. तेंव्हा जकात विभागाचे लेखा परिक्षणासाठी ज्या कर्मचाऱ्यांनी पूर्वी जकात विभागात काम केले आहे, अशा कर्मचाऱ्यांची जकात विभागाचे लेखा परिक्षणासाठी नेमणूक न करता ज्या कर्मचाऱ्यांनी आतापर्यंत जकात विभागात काम केले नाही, अशा कर्मचाऱ्यांची जकात विभागाचे लेखा परिक्षणासाठी नेमणूक करण्यात यावी, म्हणजे जकात विभागाचे लेखा परिक्षण काटेकोर पणे होईल.

**मा. मुख्य लेखापरिक्षक :** सद्या जकात विभागाचे लेखा परिक्षण करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये १/२ कर्मचारी यापूर्वी जकात विभागात काम केलेले आहे, तरी पण या कर्मचाऱ्यांनी जकात विभागात काम मध्ये केलेल्या लेखा परिक्षणाच्या एकूण कामापैकी ५०% लेखा परिक्षणाची मी. स्वतः तपासणी करीत असतो. सध्या लेखा परिक्षण विभागाककडे कर्मचारी वर्ग अपुरा आहे.

**मा. सभापती :** स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने कनिष्ठ लेखा परिक्षकांच्या जागा निर्माण करण्यास मंजुरी मिळेपर्यंत तरतूदीनुसार प्रशासनास सहा महिण्यांच्या अंतराने तात्पुरती नेमणूक करण्याचा अधिकार आहे. त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी किंवा खाजगी चार्टर्ड लेखा परिक्षण करून घेता येईल काय? याबाबत विचार करावा.

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** सहकार्य संस्था व अन्य सरकारी कार्यालयाच्या लेखा परिक्षण विभागातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची एक संस्था आहे, या संस्थेतील सेवानिवृत्त लेखा परिक्षक लेखा परिक्षणांचे काम करतात. अशा सेवानवृित्त लेखा परिक्षकांनाकडून महापालिका प्रशासनाने लेखा परिक्षण करून घ्यावे. खाजगी चार्टर्ड अकाऊटंट संस्थेचे लेखा परिक्षणाचे दर जास्त आहे. ही बाब लक्षात घेऊन सहकारी संस्थातून सेवानिवृत्त झालेल्या लेखा परिक्षकांतून महापालिका प्रशासनाच्या विविध विभागांचे लेखा परिक्षण करून घेण्यात यावे.

**मा. मुख्य लेखा परिक्षक :** सभागृहातील स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे महापालिका प्रशासनातील विविध विभागांचे लेखा परिक्षणा बाबत अभ्यास करून प्रस्ताव ठेवला जाईल.

**डॉ. भागवत कराड :** महापालिकेच्या विविध विभागांचे लेखा परिक्षणासाठी वृत्तपत्रात बातमी प्रसिध्दीस देऊन लेखा परिक्षणाचे दर मागविण्यात यावे.

**मा. सभापती :** महापालिकेच्या विविध विभागांचे लेखा परिक्षणासाठी वृततपत्रात जाहिरात देण्यामध्ये बराच वेळ जाईल, ही बाब लक्षात घेता सहकारी संस्थातील सेवानिवृत्त लेखा परिक्षकांना बोलावून महापालिकेचे लेखा परिक्षणासाठी अशा सेवानिवृत्त लेखा परिक्षणाचे काम करून घेण्यात यावे.

**श्री. अ. रशिदखान (मामू)** : जकात कराच्या चालू खात्याचे नुतनीकरण नियमाप्रमाणे प्रत्येक महिन्यात करून घेणे आवश्यक आहे. तथापी गेल्या पाच महिन्यांपासून प्रतिनिधींचा कारभार सुरू होऊनही जकात कराच्या चालू खात्यांचे

नुतनीकरण करण्याचा एकही प्रस्ताव सभागृहापुढे मांडण्यात आलेला नाही. तेंव्हा जकात विभागात चालू असलेले जकात कराचे चालू खाते त्वरित बंद करण्यात यावे आणि जकात कराचे चालू खाते असलेल्या संस्थेने जकात करापोटी किती रकमेचा भरणा केला याची चौकशी करण्यात यावी.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** स. सभासदांने सुचविल्याप्रमाणे जकात कराबाबत सर्व चालू खाते बंद करण्यात यावे, अशा प्रकारे चालू खाते बंद केल्यानंतर जकात कराच्या उत्पन्नात वाढ झालेली दिसून येते. जकात कराच्या चालू खाते असलेली संस्था आयात झालेल्या मालावर नऊ नंबरचा विहित फार्म देऊन जकात भरतात. आणि आयात केलेला माल शहराबाहेर पाठविला म्हणून विहित नमुन्याचा १६ नंबरचा फार्म भरून भरलेल्या जकातीचे पैसे परत घेतात.

**श्री. सुदाम सोनवणे :** महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढवावे, असा सर्व सभासदांच आग्रह आहे. प्रशासनातर्फे कॅन्टोनमेंट बोर्डाला जकात उत्पन्नातून रुपये २००००/- दिले जातात. परंतु कॅन्टोनमेंट बोर्ड येथे असलेल्या जकात नाक्याजवळ कॅन्टोनमेंट बोर्डाचे कर्मचारी उभे राहतात. आणि त्या ठिकाणी बाहेरून आलेली वाहने उभी करून देत नाही. यामुळे महानगरपालिकेचे जकातीचे उत्पन्न बडते, तेंव्हा छावणी कॅन्टोनमेंट बोर्ड येथे असलेला जकात नाका पुला जवळ बांधण्यात यावा, म्हणजे महापालिकेचे जकातीचे उत्पन्न बुडणार नाही आणि कॅन्टोनमेंट बोडालाही द्यावे लागणारे रुपये २००००/- वाचतील.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** स. सभासदाने सुचविल्याप्रमाणे यापूर्वी अशी सूचना दिली होती. जकात नाक्यासाठी जागा संपादन करून नाका व गोडाऊन उभारण्यात यावे, जेणे करून शहरातील वाहतूक कमी होण्यास मदत होऊन मध्यवर्ती जकात नाक्याचा कामाचा ताण कमी होईल.

**मा. सभापती :** एकूण जकात उत्पन्नाच्या काही भागाचा शेअर्स कॅन्टोंनमेंट बोर्डाला द्यावा असा नियम आहे. या नियमाप्रमाणे कॅन्टोनमेंट बोर्डाला २००००/- रुपयाचा शेअर्स दिला जातो., तसेच भारतीय सैनिक विभागातर्फे रस्त्यांच्या कडेला वाहने उभे करण्यासं मज्जाव केला जात आहे.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** मेल्ट्रॉन कंपनीचे जकात कराचे प्रकरणही महाराष्ट्र डिस्टीलरी या कंपनीचे जकात करा प्रमाणेच दिसतो. मेल्ट्रॉन कंपनीच्या काही माला वरती २% व व काही मालावर ४% जकात वसूल करून माल सोडून देण्यात आला.

**जकात अधिक्षक :** मध्यवर्ती बस स्थानकावर पकडण्यांत आलेल्या मेल्ट्रॉन कंपनीच्या माला बाबत संबंधिताकडून हमी पत्र घेऊन माल सोडण्यात आलेला आहे.

**मा. सभापती :** सभागृहास जकात कराचे चालू खाते तपासण्याचा अधिकार आहे. यानुसार सभागृहाची संमती असेल त्यावेळी जकात विभागाचे लेखा परिक्षण आणि विभागाचे चालू खाते याची तपासणी करता येईल. सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे जकात अधिक्षक यांनी मेल्ट्रॉन कंपनीने दिलेल्या हमी पत्राबाबत खात्री करून घ्यावी, मा. उपआयुक्त यांनी मेल्ट्रान कंपनीच्या बस स्थानकावर पकडलेल्या ३६ मालाची चौकशी करावी. तसेच स्थायी समिती तर्फे यापूर्वी नेमण्यांत आलेल्या विविध तीन उप समित्यांच्या स्थापने बाबतची माहिती मा. सचिव यांनी नियमाप्रमाणे सर्वसाधारण सभेस द्यावी.

**श्री. प्रकाश निकाळजे :** औरंगाबाद शहरात सोने, चांदीचे दागिने आणि त्याचा खरेदी विक्री करणारे अनेक ज्वेलर्स आहेत, या व्यहहारात लाखो कराडो रुपयांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहार होता. अशा मालावर नियमाप्रमाणे जकता कर वसूल करण्यात यावा.

**मा. सभापती :** सोने चांदी यावर दरवर्षी किती रुपयांचे उत्पन्न जकातीपासून होते, याबाबत जकात अधिक्षक यांनी खुलासा द्यावा.

**जकात अधिक्षक :** सोने चांदी यावर अंदाजे १५-१६ लाख रुपये जकात कर वसूल होतो.

**मा. सभापती :** जकात अधिक्षक, मा. उप आयुक्त-१ आणि मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी शहरातील ज्वलर्स असोसिएटशन यांच्याशी चर्चा करून अहवाल द्यावा.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** महाराष्ट्र डिस्टीलरीज कंपनीच्या जकात करा बाबतचा प्रश्न निकाली लावल्या बद्दल स. सभासद श्री. अब्दुल रशिदखॉन (मामू) आणि मा. सभापती यांचे अभिनंदन करण्यात येते, आणि महाराष्ट्र डिस्टीलरी कंपनीने सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यापूर्वी महापालिका प्रशासनातर्फे उक्त प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात यावे.

**श्री. गौतम खरात :**सभागृहातील चर्चेनुसार आणि स्थानिक वृत्तपत्रातील बातम्या नूसार महापालिका प्रशासनाची आर्थिक परिस्थिती खराब आहे असे कळते. प्रशासनातर्फे शहरात चालू असलेल्या विविध विकास कामाची अंदाजे २ कोटी रक्कमेची देयके कंत्राटदारांनी देणे बाकी आहे. कंत्राटदारांची देयके न मिळाल्यामुळे कंत्राटदारांची चालू असलेली कामे बंद केली आहे., त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी वाढत आहेत, दिवाळी दसऱ्या सारखे महत्वाचे सण लक्षात घेता कर्मचाऱ्यांचे मासिक पगार, बोनास व इतर भत्त यावरही बराच खर्च करावा लागणार आहे. तेंव्हा अशा प्रकारे विविध कामांसाठी लागणारा निधी येतया १५ दिवसात कसा उभा केला जाईल याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** लेखा विभागातील कडून मिळालेल्या माहिती नुसार महापालिका प्रशासनाच्या खात्यावर ९० लाख रुपये शिल्लक आहे. या शिवाय जकात कराच्या चालू खात्यातील ३० लाख रुपये, किसान विकास पत्रातील ६५ लाख रुपये असे एकूण १.८५ कोटी रुपये शिल्लक आहे प्राप्त माहितीनुसार सध्या १.७५ कोटी रुपये वाटप करावयाचे आहे.

**श्री. गौतम खरात :** जकात कर वसुली आणि वाढ याबाबत सभागृहात भरपूर चर्चा झाली आहे, परंतु मालमत्ता कर वसुली बाबत कोणत्याही प्रकारची चर्चा अद्यापपर्यंत झालेली नाही. तेंव्हा शतरातील नागरिकांकडे मालमत्ता कराची किती बाकी आहे याचा खुलासा व्हावा तसेच मिळालेल्या माहिती नुसार रॉक्सी सिनेमागृह यांच्याकडे मालमत्ता करापोटी ३ लाख रुपये बाकी असतांना ही सदर संस्थेस शॉपिंग सेंटर बांधण्यास परवानगी देतांना थकीत मालमत्ता कर वसुली बाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त-२ :** रॉक्सी सिनेमागृह यांच्याकडे मालमत्ता कराची रुपये ३ लाख थकबाकी आहे, सहा संचालक नगररचना यांना मालमत्ता कराबाबत ना हरकत प्रमाणपत्र न घेता शॉपिंग सेटर बांधण्यास कशी परवानगी देण्यात आली, याबाबतचे पत्र देण्यांत आले आहे. परंतु संबंधित विभागाकडून अद्याप खुलासा झालेला नाही.

**श्री. अ. रशिदखान (मामू) :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे मालमत्ता कराची वसुली मालमत्ता कराची वसुली फारच कमी प्रमाणात आहे. यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असून विकास कामांना गती मिळत नाही. यावर विचार होणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** मालमत्ता कर आणि पाणीपट्टी यांची देयके तयार करून देण्याबाबत स्थानिक कॉम्प्युटर एजन्सीशी करार केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. हा करार करतांना स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आली आहे काय? याचा खुलासा संबंधित अधिकाऱ्यांनी करावा. सभागृहापुढे मंजुरीस ठेवण्यात आलेल्या ठरावाच्या चर्चेच्या वेळी मालमत्ता कर व पाणीपट्टी देयके कॉम्प्युटरवर तयार करून घेण्यास येणाऱ्या ३.६२ लाखाचा खर्च वाचावा म्हणून सभागृहाने महापालिका कर्मचाऱ्यांना कॉम्प्युटरचे प्रशिक्षण देऊन कॉम्प्युटर खरेदीच्या प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे, अशा परिस्थितीत प्रशासनाने मालमत्ता कर व पाणीपट्टी देयके संगणकाद्वारे तयार करून घेण्याबाबत स्थानिक एजन्सीबरोबर करार कसा केला.

**प्रकल्प संचालक :** महापालिका प्रशासनाकडे संगणकाचे ज्ञान असलेले आठ कर्मचारी प्रशिक्षित आहे. यापैकी चार प्रशिक्षित कर्मचारी संगणकासाठी च्या कामासाठी नियुक्त करण्यांत आलेले आहे. यापैकी एक कर्मचारी करार केलेल्या संगणक एजन्सीकडे मालमत्ता कर व पाणीपट्टीची देयके करण्यांचे काम करतो. महापालिका प्रशासनाच्या एक ते सात झोन मधील मालमत्ता कर व पाणीपट्टी देयका बाबत फक्त ९० हजार खर्च अपेक्षित आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टी यांच्या वसुलीचे काम तातडीचे व्हावे म्हणून स्थानिक एजशीशी करार केलेला आहे.

**मा. सभापती :** महापालिका प्रशासनातर्फे हाती घेण्यात आलेल्या विविध कामांबाबतची माहिती संबंधित विभाग प्रमुखाने नियमाप्रमाणे सभागृहात देणे आवश्यक आहे. या नियमानुसार ज्या विभागातर्फे करून घेण्यात आलेल्या कामा बाबतची माहिती सभागृहात माहिती दिली गेली नाही, अशा कामाचे देयके संबंधित अधिकाऱ्यांच्या पगारातून देण्यात यावे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरण ५ कलम ३(२) अन्वये प्रत्येक कामासाठी निविदा मागवून काम करून घेतले पाहिजे व दक्षता बाळगावी, अशी सभागृहातर्फे विनंती करण्यात येते उक्त नियमासाठी सभागृहाने दि २८-०९-९५ रोजी मंजुरी दिल्यानुसार रुपये २५ हजाराच्या वरील जी कामे दिनांक २८-०९-९५ रोजी झाली आहे, अशी कामे सोडून ज्या कामाच्या बाबतीत दिनांक २८-०९-९५ नंतर नियमाप्रमाणे कार्यवाही केली नसेल अशा कामांची देयके अदा करण्यांत येऊ नये.

तसेच मा. उप आयुक्त-१ यंनी ज्या महापालिका कम्रचाऱ्यांनी प्रशासनाकडून घर बांधणीसाठी कर्ज घेतलेले आहे, परंतु कर्ज घेतलेले असे कर्मचारी म.न.पा. निवासस्थानात राहात आहे, अशा कर्मचाऱ्यांकडून महापालिकेची निवासस्थाने त्वरित रिकामी करून घेण्यात यावी. तसेच महापालिका प्रशासनाच्या आर्थिक उत्पन्नात भर टाकणाऱ्या जकात विभागासारख्या महत्वाच्या विभागात दूरध्वनी व्यवस्था नाही ही खेदाची बाब आहे. तेंव्हा मा. उप. आायुक्त-१ यांनी महापालिका प्रशासनातील किती महत्वाच्या विभागामध्ये दूरध्वनीची व्यवस्था नाही यात प्रशासनातर्फे ज्या

अधिकाऱ्यांच्या निवास्थानी दूरध्वनीची विशेष आवश्यकता नसतांनाही प्रशासनार्फे दूरध्वनी देण्यात आले असतील, अशा सर्व ठिकाणचे दूरध्वनी काढून ज्या विभागात दूरध्वनी देणे आवश्यक आहे आशा ठिकाणी दूरध्वनी देण्याची विनाविलंब व्यवस्था करावी.

तसेच प्राप्त माहितीनुसार झोन नं. २ मधील मालमत्ता कराची बरीच थकबाकी वसूल झालेली नाही, या विभागातील नागरीक मालमत्ता कर भरण्यासं तयार आहे, तेंव्हा मालमत्ता कराच्या वसुलीसाठी प्रत्येक विभागीय कार्यालयात त्या भागातील मालमत्ता करा बाबतची प्रकरणां बाबत बैठक घेऊन मालमत्ता करा बाबत सुनावणी करण्यांत यावी व सांमजस्याने किंवा समझोत्याने मालमत्ता कराची प्रकरणे निकाली काढण्यांत यावी. याशिवाय मालमत्ता कराच्या अनेक प्रकरणे न्याय प्रविष्ट आहेत. अशा प्रकरणांबाबत वाटाघाटीतून काही मार्ग निघतो का याची पहाणी करून वाटाघाटीने प्रकरणे निकाली काढण्यांत यावी.

**श्री. प्रकाश निकाळजे :** मिळालेल्या माहितीनुसार मालमत्ता कराच्या सुनावणीमध्ये नागरिकांना मालमत्ता कर कमी मिळत नाही, पण मालमत्ता कराबाबत या विभागातील कर्मचाऱ्यांना संबंधित नागरिकांने खाली भेट घेतली तर मालमत्ता कर कमी होतो, अशी अनेक उदाहरण माझ्यामडे उपलब्ध आहे, तेंव्हा मालमत्ता कराच्या सुनावणीत मालमत्ता कर कमी न करता, वैयक्तिक भेट घेतल्यास मालमत्ता कर कमी होतो हे कसे शक्य आहे. याचा खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त-२ :** मालमत्ता कराबाबत उजरदारी अर्ज आलेल्या १० प्रकरणांमध्ये संबंधित नागरिकांना सुनावणीसाठी बोलाविण्यात आले होते, यापैकी २ प्रकरणे निकाली काढण्यात आले, अन्य नागरिकांनी सुनावणीसाठी नविन तारीखे मागवून घेतलेली आहे.

**श्री. गौतम खरात :** एखाद्या कामाची निविदा मंजूर झाल्यानंतर या कामाविषयी झालेला करार रद्द करण्याचा अधिकार महापालिका अधिकाऱ्यांना आहे काय?

**मा. उप आयुक्त-१ :** नियमाप्रमाणे १ लाख पर्यंतच्या कामा बाबतच्या निविदा विषयी उपआयुक्त यांना आणि १ पेक्षा जास्त खर्च असलेल्या निविदांच्या कामाबाबत मा. आयुक्त यांना करार करण्याचे अधिकार आहे. त्याच प्रमाणे केलेला करार रद्द करण्याचे अधिकारही आहे.

**श्री. गौतम खरात :** गेल्या सहा महिन्यांपासून माझ्या वार्डातील सार्वजनिक शौच्यलयाचे काम बंद आहे, यामुळे येथील पाण्यात अळ्या निर्माण झाल्या आहेत, हा भागा झ ोपडपट्टी भाग असल्यामुळे याकडे अधिकारी दुर्लक्ष करतात का? याचा खुलासा व्हावा.

**शहर अभियंता :** शौच्यालयाचे बंद असलेल्या कामाबाबत ज्या मक्तेदारांची निविदा पहिल्यांदा मंजूर करण्यात आली होती. त्या मक्तेदाराने काम केले नाही म्हणून नियमाप्रमाणे त्यांच्या कामाचा करार रद्द करण्यात आला आहे. त्या नंतर दुसऱ्या क्रमांकाचे कमी दराचे मक्तेदार यांना रद्द केलेल्या कराराचे काम करण्यांस तयार आहात काय? अशी विचारणा केली असता दुसऱ्या क्रमांकाचे निविदा धारकही करार रद्द झालेले काम करण्यांस तयार नसल्याचे संबंधिताने कळविले आहे.

**विषय क्र. ११७/१ :**

दिनांक ११-०९-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** दि. ११-०९-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत विषय क्र.१०२/१८ हा तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले आहे. करिता प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

**मा. सभापती :** सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक ११-०९-९५ रोजी झालेल्या सभेत स्थगित ठेवण्यात आलेल्या ठराव क्र. १०२/१८ मध्ये महानगरपालिका हद्दित असलेल्या विविध चौक आणि गार्डन मधील १८ फवारे व्यवस्थित चालू बंद करणे त्यांची देखरेख करणे या कामासाठी वार्षिक करारावर मागविण्यात आलेल्या करपत्रकांपैकी कमी दराचे दरपत्रकधारक मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांचेकडून रु. १,७५,२०० च्या रक्कमेत वार्षिक करारारावर करून घेण्यास सर्वानुमते मजुंरी देण्यात येते. या दुरुस्तीसह दि. ११-०९-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११८/२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गणेश कॉलनी येथे २००,१५० व १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन ९४-९५ नुसार रक्कम रुपये ३,८२,९००/- एवढ्यांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामे तरतूद मधून म्हणजेच रु. १,५०,००,०००/- या मधून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,८२,९००- यास मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणेश कॉलनी येथे २००, १५० व १०० मी.मी. व्यासाची एसी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,८२,९००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११९/३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रमानगर येथे १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागची दरसूची सन ९२-९३ नुसार रक्कम रु. १,३२,१७५/- एवढ्याचे अंदाजत्रक तयारकरण्यांत आले आहे सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामे साठीच्या तरतूद रक्कम रु. १,५०,००,००० मधून करण्यात येणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये १,३२,१७५/- यास मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रमानगर येथे १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. १,३२,१७५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२०/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, इंदिरानगर, बायजीपुरा येथे २०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागची दरसूची सन ९४-९५ नुसार रक्कम रु. ३,९२,२००/- एवढ्याचे अंदाजत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामाची तरतूद रक्कम रुपये ९,५०,००,०००/- मधून करण्यात येणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,९२,२००/- यास मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर, बायजीपुरा येथे २०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. ३,९२,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२१/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, भानुदासनगर, येथे १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागची दरसूची सन ९४-९५ नुसार रक्कम रु. २,०७,१७०/- एवढ्याचे अंदाजत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामाच्या तरतूद रक्कम रुपये १,५०,०००/- मधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये २,०७,१७०/- यास मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भानुदासनगर, येथे १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. २,०७,१७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२२/६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आलमगीर कॉलनी येथे १५० व १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागची दरसूची सन ९४-९५ नुसार रक्कम रु. २,२४,२००/- एवढ्याचे अंदाजत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामाच्या तरतूद रक्कम रु. १,५०,००,०००/- मधून करण्यात येणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रु. २,२४,२००/- यास मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आलमगीर कॉलनी येथे १५० व १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. २,२४,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२३/७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, इंदिरानगर बायजीपुरा येथे २०० व १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर

अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन ९४-९५ नुसार रक्कम रु. २,९२,२००/- एवढ्याचे अंदाजत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामाची तरतूद रक्कम रु. १,५०,००,०००/- मधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु. २,९२,०००/- यास मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर बायजीपुरा येथे २०० व १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. २,१२,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२४/८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पुंडलिकनगर, हनुमान नगर, मातोश्रीनगर, हुसैन नगर येथे १२०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. एन पी-२ क्लासच्या पाण्याच्या, टाक्या बसवावयाच्या आहे. ह्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन ९४-९५ च्यानूसार रक्कम रुपये १,७०,४२५/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदर कामाचा खर्च हा पाणीपुरवठा भांडवली कामाच्या तरतूद रक्कम रुपये, रु. १,५०,००,०००/- मधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु. १,७०,४२५/- यास मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पुंडलिकनगर, हनुमान नगर, मातोश्रीनगर, हुसैन नगर येथे १२०० मी.मी. व्यासाच्या आर.सी.सी. एन पी-२ क्लासच्या पाण्याच्या, टाक्या बसविणे बाबातच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु. १,७०,४२५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२५/९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, न्यु शांती निकेतन कॉलनी येथे १५० व १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे त्यासासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन ९४-९५ नूसार रक्कम रुपये ३,८४,८८०/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणीपुरवठा भांडवली कामाची तरतूद रक्कम रुपये, रु. १,५०,०००/- मधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु. ३,८४,८८०/- यास मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, न्यु शांती निकेतन कॉलनी येथे १५० व १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ३,८४,८८०/- चे अंदाजत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२६/१० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वसंतनगर येथे १५० व १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन ९४-९५ नूसार रक्कम रुपये ३,९८,६८५/- एवढ्याचे अंदाजपत्रक

तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणीपुरवठा भांडवली कामाची तरतूद रक्कम रुपये, रु. १,५०,००,०००/- या मधून करण्यात येणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रु. ३,९८,६८५/- यास मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वसंतनगर येथे १५० व १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्यांच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ३,९८,६८५/- चे अंदाजत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२७/११ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शाहनगर व अबरार कॉलनी येथे १२०० मी.मी. व्यासाच्या आर.सी.सी. एन पी-२ क्लासच्या पाण्याच्या, टाक्या बसवावयाच्या आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन ९४-९५ नूसार रक्कम रुपये १,०३,३५३/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणीपुरवठा भांडवली कामाच्या तरतूद रक्कम रु. १,५०,००,०००/- मधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु. १,०३,३५३/- यास मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शाहनगर व अबरार कॉलनी येथे १२०० मी.मी. व्यासाच्या आर.सी.सी. एन पी-२ क्लासच्या पाण्याच्या, टाक्या बसविण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु. १,०३,३५३/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२८/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नारेगांव प्राथमिक शाळेवर तीन खोल्या सहित जिना बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९४-९५ चे जिल्हा दर सुचीनुसार रक्कम रुपये ४,६१,१७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते, परंतु मा. आयुक्तांनी दिनांक ०७-०९-९५ अन्वये रक्कम रु. ३,६०,०००/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षा मधून सुधारित अंदाजपत्रकामध्ये वाढवून दिलेल्या अर्थ तरतूदी मधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगांव प्राथमिक शाळेवर तीन खोल्या सहित जिना बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ३,६०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२९/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, किराडपुरा येथील शाळेसमोरील महानगरपालिकेच्या जागेभोवती कुंपन भिंत बांधणेच्या कामासाठी रक्कम रुपये २,१३,३१०=०० चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. सदरचे काम नियमाप्रमाणे निविदा मागवून तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. सय्यद जमीर

यांचे निविदा दरास मान्यता दि. २८-०३-९५ ला मिळालेली आहे व त्याप्रमाणे कामही सुरू केलेले आहे. परंतु सदर कामाची सदर वार्डातील स. नगरसेवक मा. आयुक्तांनी स्थळावर प्रत्यक्ष कामाची पहाणी करून सदर भिंतीवर तार कुंपन करण्या बाबत तोंडी आदेशित केले. त्या. अनुषंगाने सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये २,८८,३१०/- चे तयारकरण्यात आले असून अंदाजपत्रकास व सदरील काम पूर्वीच्याच गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास दि. १६-०६-९५ अन्वये मा. आयुक्तांनी चर्चा करून मंजुरी दिलेली आहे. सबब सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये २,८८,३१०/- व सदरील काम श्री. सय्यद जमीर मक्तेदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपुरा मनपा शाळेच्या जागेभोवती कुंपन भिंत बांधण्याच्या कामा व्यतिरिक्त बांधण्यात येणाऱ्या भिंतीवर कुंपन करण्याचे ठरल्यामुळे तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये २,८८,३१०/- च्या सुधारित अंदाजपत्रकास आणि तार कुंपन करण्याचे वाढीव काम श्री. सय्यद जमीर यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३०/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो. समतानगर येथे खांडकी रस्ते तयार करण्याचे कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रुपये २,४५,७१०/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची सन १९९३-९४ प्रमाणे तयार करण्यात आले असून मा. आयुक्त साहेबांनी दि. ०४-०८-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेचे सन १९९५-९६ चे अर्थसंकल्पात दुर्बल घटक या शिर्षाकरिता ३५ लाखाची तरतूद असून स्लम विभाग क्रमांक १ मध्ये एकूण ८,१५,३१०/- रक्कमेचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले आहे. करिता प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. समतानगर येथे खांडकी रस्ते तयार करण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेले रक्कम रुपये २,४५,७१०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३१/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो. मुकूंदवाडी (पूर्व) भागात डांबरी रस्ते तयार करणे करिता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३,३४०००/- तयारकरण्यात आले व मा. आयुक्त यांनी दि.१२-१०-९४ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील कामासाठी या वेळी निविदा सूचना क्र.मुलेप/६/९५ दि. १३-०६-९५ द्वारे स्थानिक वर्तमान पत्रात विस्तृत प्रसिध्दी देऊन प्रगट निविदा मागविल्या असता, कोऱ्या निविदा विकण्यांच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (१) एक कोरी निविदा विकल्या गेली व स्विकारण्या अंतिम तारखेला २०-०६-९५ रोजी फक्त एकच (१) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा उपस्थित ठेकेदारासमक्ष दिनांक २०-०६-९५ रोजी उघडल्या असता मा. आयुक्त यांनी अंदाजपत्रकीय दराने सदरील काम करण्याकरिता मान्यता दिली आहे.

श्री. ए. सी. कोठारी ठेकेदार यांनी दि.०२-०९-९५ रोजी लेखी अर्जाद्वारे कळविले आहे की, अंदाजपत्रकीय सदरील काम करण्यास तयार आहे.

करिता श्री. ए. सी. कोठारी यांची निविदा १३.२४% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दरा प्रमाणे मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मुकूंदवाडी (पूर्व) भागात डांबरी रस्ते तयार करणे करिता प्राप्त एकमेव निविदाधारक श्री. ए. सी. कोठारीचे १३.२४% अंदाजपत्रकीय दराचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३२/१६ :**

मा. आयुक्तांचे मान्यते नुसार प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रकल्प विभागामार्फत शहरी गरिबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजने अंतर्गत सध्या अकरा झोपडपट्‌ट्या मध्ये बालवाड्या कार्यरत आहेत. तथापी प्रियदर्शनी इंदिरानगर (मराठी) ब किराडपुरा (उर्दू) या वसाहती मोठ्या असल्याने वस्तीवासियांची मागणी व स. नगर सेवकांची मागणी लक्षात घेऊन या दोन्ही वस्त्यांमध्ये दोन बालवाड्या सुरू करणे आहे. कम्युनिटी सर्व्हिसेस या लेखा शिर्षाअंतर्गत या बालवाड्यासाठी २ बालवाडी शिक्षिका दर महा रुपये ३००/- व सेविकेसाठी रु. १५०/- दरमहा मानधनावर २ पदे निर्मितीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरी गरीबांासाठी नागरी मुलभूत सेवा योजने अंतर्गत कार्यरत असलेल्या झोपडपट्टी मधील ११ बालवाड्यांपैकी प्रियदर्शनी इंदिरानगर व किराडपुरा या वसाहती मोठ्या असल्याने येथील नागरिक व स. सभासद यांच्या मागणी नुसार उक्त दोन्ही वसाहती मध्ये रुपये ३००/- दरमहा मानधनावर २ बालवाडी शिक्षिका व रुपये १५०/- दरमहा मानधनावर २ सेवकांची पदे निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३३/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथे मिनी थियेटर बांधण्याच्या कामासाठी ठराव क्र. २१५ दि. ३१-०३-९५ अन्वये रक्कम रु. ४,२०,०००/- ला प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. तसेच सदर काम ठराव क्र. ३३१ दि. २८-०४-९५ अन्वये श्री. जी.आर. माने यांना अंदाजपत्रक दरापेक्षा २.५१% कमी दराने करण्यांस मान्यता मिळालेली आहे. परंतु सदरील इमारती मध्ये कॉल्स सिलींग करावयाची असल्याने मुळ अंदाजपत्रकात सदरील बाब नसल्यामुळे रक्कम रुपये ४०,०००/- ला दि. ०७-०९-९५ अन्वये मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,६०,०००/- ला व सदरचे काम मुळ एजन्सीकडून मंजुर दराप्रमाणे करून घेण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरील खर्च प्राणी संग्राहालय विकास करणे, सर्पालय, पक्षीघर मिनी थिएटर, हत्तीघर या लेखा शिर्षामधून सुधारित अंदाजपत्रकातून वाढवून मिळणाऱ्या अर्थ तरतूदी मधून करण्यात येईल.

**संवाद :**

**श्री. प्रकाश निकाळजे :** महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यानात माध्यानहाच्या वेळेस बरेच नागरिक दुपारच्या वेळेस आराम करतांना दिसतात, अशा नागरिकांना रुपये १/- किंवा २/- अशा प्रकारचा कर आकारल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल.

**मा. सभापती :** स. सभासदांनी सुचविलेली उत्पन्न वाढीची बाब ही धोरणात्मक निर्णय आहे. याचा विचार करता स. सदस्य यांनी याबाबत सर्वसाधरण सभेत प्रस्ताव मांडणे सोईचे होईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे मिनी थिएटर बांधण्याच्या मुळ कामामध्ये इमारती मध्ये फॉल सिलिंग करण्याच्या कामाचा समावेश नसल्यामुळे या कामासाठी येणाऱ्या रक्कम रुपये ४०,०००/- च्या वाढीव खर्चामुळे कामाचे तयार करण्यात असलेल्या रक्कम रुपये ४,६०,०००/- च्या सुधारित अंदाजपत्रकास आणि मुळे कामा व्यतिरिक्त बाद करण्यांत आलेले फॉल सिलींग चे काम गुत्तेदार, श्री. आर. जी. माने यांचेकडून मंजुर दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३४/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिध्दार्थ गार्डन जवळील नाल्यावर फुटपाथ ब्रिज बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९२-९३ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये २,५४,८४०/- चे बनविण्यांत आलेले असून मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९५-९६ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकामधून करण्यांत येईल.

वरील कामासाठी कार्यालयील निविदा सूचना जा.क्र. मनपा/मुलेप/१५०/९५ दि. २८-०४-९५ अन्वये निविदा मागविल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चौदा (१४) निविदा पत्रके विकल्या गेल्या व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण फक्त एक (१) निविदा दर भरून प्राप्त झाली ती दि. १२-०५-९५ ला उपस्थित कंत्राटदरासमक्ष उघडण्यात आली, त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) श्री. राजेंद्र च. शिंदे ०.०५% कमी दराने

वरील प्राप्त निविदा ही श्री. राजेंद्र च. शिंदे यांचीअसून त्यांच्या निविदेचे दर ०.५०% कमी दराने आहेत. तरी श्री. राजेंद्र च. शिंदे यांची ०.०५% दराची निविदा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**डॉ. विजयकुमार मेहेर, डॉ. भागवत कराड :** प्रस्तावित कामांसाठी प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे एकूण १३ निविदा पत्रके विकण्यांत आली आहे, मात्र प्रत्यक्षात दर भरलेली एकच निविदा पत्रक वसूल झाले आहे, तेंव्हा अन्य बारा (१२) निविदाधारकांनी दर भरून निविदा दाखल का केल्या नाहीत, याबाबत संबंधित ठेकेदारांना बोलावून प्रशासनाने विचारणा केली आहे का? अशा प्रकारे प्रसिध्द झालेल्या कामांसाठी कोऱ्या निविदा खरेदी करूनही खरेदी केलेल्या निविदा दर भरून दाखल न करण्याबद्दल संबंधित मक्तेदारांची नावे काळ्या यादीत समाविष्ट का करण्यांत आली नाही, तेंव्हा यापुढे जे मक्तेदार प्रसिध्द झालेल्या कामांसाठी तीन चार वेळा कोऱ्या निविदा खरेदी करूनही निविदा दाखल करीत नाही, अशा मक्तेदारांची नावे काळ्या यादीत समाविष्ट करण्यांत यावी.

**मा. मुख्य लेखा परिक्षक :** महानगरपालिका प्रशासन शहरातील हाती घ्यावयाच्या विकास कामांसाठी जाहिराती निविदा प्रसिध्द करते, यासाठी महापालिका प्रशासन

विहित नमुन्याच्या मक्तेदारांना विकत देते, स. सभासदांनी सुचविलेल्या प्रकार होऊ नये, म्हणून महापालिका प्रशासनातर्फे निविदांची किंमतही जादा ठेवण्यात येते. याबाबत नियमाप्रमाणे प्रशासन काहीही करू शकत नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ गार्डन जवळील नाल्यावर फुटपाथ बिज बांधण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या श्री. राजेंद्र शिंदे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३५/१९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, क्रांतीचौक येथे ४०० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागांची दरसूची सन १९९४-९५ नुसार रक्कम रुपये २,७३,०१५/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामासाठीच्या तरतूदीमधून म्हणजेच रक्कम रु. १,५०,००,०००/- मधून करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु. २,७३,०१५/- यास मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक येथे ४०० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकण्यांच्या कामाकरिता रक्कम रु. २,७३,०१५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३६/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मोहल्ला चेलीपुरा मुलूमची बाजार व मुर्गीनाला भागात रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूची नुसार रक्कम रु. ३,४२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती (रुपये ३१०.०० लाख) या लेखा शिर्षामधून करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला चेलीपुरा मुलूमची बाजार व मुर्गीनाला भागात रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता रक्कम रु. ३,४२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३७/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जाफरगेट आठवडीबाजार ते मोतीकारंजा या ५० फुट विकास रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९२-९३ च्या दरसूची नुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,७८,१७२/- चे बनविण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च भांडवली रस्ते (रुपये २,९०,००) लाख या लेखा शिर्षकामधून करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाफरगेट आठवडीबाजार ते मोतीकारंजा या ५० फुटी विकास रस्त्यांचे डांबरीकरण करण्यांच्या कामासाठी रक्कम रुपये ३,७८,१७२/- वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३८/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मनपाचे मुख्य कार्यालयातील नविन बांधण्यात आलेल्या इमारतीचे विद्युतीकरणांच्या कामासाठी व इतर सुविधासाठी रुपये ४,९९,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च १९९५-९६ चे अंदाजपत्रकातून करण्यांतस मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

तरी सदर कामासाठी खर्च होणाऱ्या रक्कम रुपये ४,९९,८००/- चे अंदाजपत्रकास १९९५-९६ वर्षात मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाचे मुख्य कार्यालयातील नविन बांधण्यात आलेल्या इमारतीचे विद्युतीकरणांच्या कामासाठी आणि इतर सुविधेसाठी रक्कम रुपये ४,९९,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३९/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव करित आहेत की, पीरबाजार उस्मानपुरा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविणेसाठी चबुतऱ्याचे सुशोभिकरणाचे कामासाठी यापूर्वी निविदा काढण्यात आली होती त्यानुसार सदरील कामास व अंदाजपत्रकीय रक्कम १,४५,०००/- रुपयास मान्यता मिळालेली होती. त्या नुसार सदरील काम चालू करण्यांत आले होते. त्यानंतर मा. आयुक्त यांचे आदेशानुसार सदरील मुळ कामात बदल करून सदरील बदल करून सदरील काम नविन डिझाईनचे कामाचे अंदाजपत्रक घेण्यात आले. सुधारित अंदाजपत्रकाची किंमत २,५९,३००/- रु. असून त्यानुसार मुळ अंदाजपत्रकास २,५९,३००/- ४५,०० = १,१४,३०० रु. ची वाढ होणार आहे. सुधारित अंदाजपत्रका १६ अतिरिक्त बाबी असून मुळे अंदाजपत्रकातील बाबी निविदेच्या दराने व अतिरिक्त बाबी अंदाजपत्रकिय दराने संबंधित कॉन्ट्रक्टर कडून करून घेण्यास व सुधारित अंदाजपत्रक मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पीरबाजार उस्मानपुरा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविणेसाठी चबुतऱ्याचे सुशोभिकरणाचे मुळ कामात बदल करून नविन डिसाईन करणेच्या ठरल्यानुसार मुळ अंदाजपत्रकास वाढीव कामामुळे रुपये १,१४,३००/- च्या खर्चाची वाढ होत असल्यामुळे उक्त कामासाठी रक्कम रुपये २,५९,३००/- च्या सुधारित अंदाजपत्रकास आणि मुळ अंदाजपत्रकीय बाबी निविदा दराने आणि अतिरिक्त बाबी अंदाजपत्रकीय दराने संबंधित गुत्तेदाराकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४०/२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मोहल्ला कबाडीपुरा, बुढीलाईन व पंचकुवा येथील भागात खांडकी बसविणे व दुरुस्त करणे या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९२-९३ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये १,४४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते दुरुस्ती व देखभाल (रुपये ३१० लाख) या लेखा शिर्षकांतर्गत करण्यांत येईल.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कबाडीपुरा, बुढीलाईन व पंचकुवा येथील भागात खांडकी बसविणे व दुरुस्त करण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये १,४४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४१/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मोहल्ला चेलीपुरा व मुर्गीनाला भागात नविन खांडकी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणे या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९५ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये १,१४,८००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती (रुपये ३१०.०० लाख) या लेखा शिर्षकामधून करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चेलीपुरा व मुर्गीनाला भागात नविन खांडकी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये १,१४,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४२/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नविन प्रशासकीय इमारत टप्पा दोन बांधकामासाठी एकूण रक्कम रु. ७१,१८,२००/- ची प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. सदर प्रशासकीय इमारतीच्या चालू बांधकामात ऐनवेळी काही बाबींचे अतिरिक्त काम करावयाचे ठरविले आहे व काही पूर्वीच्या मंजूर बाबींमध्ये आदेशानुसा बदल करण्यांत आलेले आहेत. सदर अतिरिक्त बाबी व बदल करण्यांत आलेल्या बाबींमुळे होणारी बचत व अतिरिक्त खर्चाचा प्रस्ताव पुढील तपशिलासह मंजुरीस्तव सादर.

वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रस्तावित मुद्दे व त्या बाबतचा तपशिल

**अ) अतिरिक्त बाबी :-**

१) **वॉटर प्रुफींग करावी :-**
मुळ अंदाजपत्रकात इमारतीचे छत सिमेंट पत्र्याचे होते. परंतु सधारित कामात अर्ध्या भागावर आर. सी. सी. स्लॅब छत टाकण्याचे असल्यामुळे त्यावर वॉटर पुफींग करणे आवश्यक आहे.

२) **अर्धवट भिंतीचे पार्टीशन :-** अंदाजपत्रकात सदरील बाब समाविष्ट नसल्यामुळे ४ १/२ रुंद वीट कामाचे पार्टीशन करणे आहे. या ठिकाणी पूर्वी लाकडी पार्टीशन करावयाचे होते. मात्र खर्च कमी करण्यासाठी हा बदल मा. आयुक्त साहेबांच्या तोंडी सुचनेनुसार करण्यात आला.

३) **प्लेन सिमेंट कॉंक्रीट करणे :-** मुळ अंदाजपत्रकात पार्कींग भागात प्लेटन कॉंक्रीट करण्याची बाब समाविष्ट नाही, त्यामुळे अतिरिक्त बाब करण्यांत आली.

४) **लिफ्ट क्लेम :- मजला उंचीमुळे द्यावयाचा खर्च : -** सार्वजनिक बांधकाम दरपत्रकाप्रमाणे तळमजल्या व्यतिरिक्त त्यावरील प्रत्येक मजल्यासाठी प्रत्येक बाबींवर २% रक्कमेची वाढ दरात करावी लागते अंदाजपत्रकात याचा समावेश नसल्यामुळे कंत्राटदारांनी केलेल्या मागणीमुळे (लिफ्ट क्लेम) रक्कम रु. ४९,५३१/- अतिरिक्त द्यावी लागेल.

५) **भाववाढ फरक :** महाराष्ट्र शासन निर्णय क्र. बी.डी.जी./१०९१/सीआर/१७२/बिल्डींग-२/दिनांक १०-०१-९२ च्या तरतूदीस अधिन राहून सदरील कामाचे मंत्राट दारास शासनाच्या नव्या निर्णयानुसार भाववाढ फरक देण्यांचे प्रस्तावित आहे, मुळ निविदेत भाववाढ फरक तरतूद आहे. मात्र आता नविन शासन निर्णयानुसार किंमतीतील फरक देणे आहे. तो एकूण फरक सुमारे ३,५०,०००/- आहे.

६) **स्टॉंग रुम बांधणे :** लेखा विभागासाठी स्टॉंग रुम बांधणे याबाबत लेखा अधिकारी यांनी स्ट्रॉंग रुम बांधणेस्तव पत्र लिहून विभागांस कळविले होते.

**ब) बदल करण्यांत आलेल्या नाही :-**

१) **मोझाईक टाईल्स :** अंदाजपत्रकातील पॉलिश शहाबादी फरशी ऐवजी मोझाईक टाईल्स बसविणे.
२) **मोझाईक टाईल्स डॅडो :** मोझाईक टाईल्स डॅडो/ स्कटींग काम करणे.
३) **चेकर मोझाईक टाईल्स :** जिन्याचे रस्त्यांसाठी प्लेन टप्पा टाईल्स ऐवजी चेकर मोझ ाइक टप्पा बसविणे.
४) **ऑईल बॉंड डिस्टेपंर : (कलर)** अंदाजपत्रकास मंजूर चूना ऐवजी
५) **पीळदार लोखंड :** अंदाजपत्रकास समाविष्ट प्लेन लोखंड ऐवजी पीळदार लोखंडाचा वापर करणे.

वरील तपशिला नुसार जे बदल झाले आहेत, त्यामुळे २३,६१,२७५/- एवढ्या रककमेची बचत होत आहे व त्याऐवजी अतिरिक्त बाबींचे काम करावे लागत असल्यामुळे रु.२४,९४,११६/- एवढा खर्च येत आहे.

सबब या बदलामुळे निव्वळ जास्तीचा फरक म्हणून खर्च रु. १,३२,४८१/- एवढा येणार आहे.

तरी कृपया (१) अतिरिक्त बाबीचे रु. २४,९४,११६/- चे अंदाजपत्रकास मंजुरी मिळावी.

(२) कंत्राटदाराने विनंती केल्यानुसार लिफ्ट क्लेमपोटी जी २% रक्कम प्रत्येक मजल्याच्या खर्चावर द्यावयाची आहे ती रु. ४९,५३१/- एवढी आहे. कृपया तिला मंजुरी मिळावी.

(३) भाववाढ फरकापोटी द्यावयाच्या एकूण रक्कम रु. ३,५०,०००/- ला कृपया मंजुरी मिहावी.

(४) स्टॉंग रुम बांधण्याची मंजुरी मिळावी.

तरी मुद्दा क्र. (१), (२), (३) व (४) च्या अनुषंगाने प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नविन प्रशासकीय इमारत टप्पा दोन (२) च्या चालू बांधकामामध्ये प्रस्तावात दर्शविलेल्या "अ" मधील अनुक्रमांक १ ते ६ आणि "ब" मधील अनुक्रमांक १ ते ५ प्रमाणे

(१) अतिरिक्त काम करणे रु २४,९४,११६/-

(२) लिक क्लेमपोटी प्रत्येक मजल्याच्या खर्चावर २% या प्रमाणे रुपये ४९,५३१/- एवढी रक्कम देणे.
(३) भाववाढ फरकापोटी रक्कम रुपये ३,५०,०००/- अदा करणे.
(४) स्टॉंग रुम बांधकाम करणे.

यावरील मुद्या क्र.१ ते ४ च्या अतिरिक्त बाबींस आणि "ब" मधील अ.क्र. १ ते ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे बदल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४३/२७ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त, मनपा औरंगाबाद यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करित आहे की, पहिल्या मजल्यावरील दुकाने भाड्याने देण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ४/३ दिनांक २४-०५-१९९२ अन्वये भाडे धोरण शिथिल करण्यांत आलेले असून त्यांचे दर प्रति चौ. मी. ५०/- व पोट माळ्यासाठी २५/- प्रति चौ. मी. या प्रमाणे भाडे दर निश्चित करण्यांत आलेले होते. तसेच वरील भाडे दरापेक्षा अधिक भाडे देऊ करण्यांस दुकाने भाड्याने दिली जातील, या ठरावान्वये ठरविलेले धोरणानुसार दुकान भाड्याने देण्यांसाठी निविदा मागवण्यिांत आल्या होत्या. परंतु निविदा प्राप्त झाल्या नाहीत. तथापी सर्वसाधारण सभा ठराव क्र. ११४/१४ दिनांक १८-०३-९३ अन्वये मागील दुकाने भाड्याने देण्यांबाबत मा. आयुक्त यांना गाळे किती दराने भाड्याने द्यावयाचे याचा निर्णय घेण्यांचा अधिकार देण्यात आला आहे. त्या अनुषंगाने प्रशासकीय काळात दुकानासाठी निविदा मागविण्यांत आले असता, मागील बाजुच्या दुकानासाठी प्रति चौ. मी. प्रतिमहा २५/- व पोटमाळ्यासाठी प्रति चौ. मी. प्रतिमहा १०/- याप्रमाणे दोन दुकानासाठी निविदा प्राप्त झाल्या होत्या व त्यानुसार दोन दुकाने भाड्याने देण्यांत आली आहेत. तरी आता श्री. एस. एल. वानु यांनी नाथ मार्केट पहिल्या मजल्यावरील मागील बाजुची दुकान क्र. ३ मिळण्याबाबत अर्ज दिल्या असून दुकानाचे भाडे प्रति चौ. मी. प्रतिमहा रु. २५/- व पोटमाळ्यासाठी प्रति चौ. मीञ प्रतिमहा रु. १०/- प्रमाणे भाडे देण्यांत येईल व नियमानुसार अनामत रक्कम भरणा करण्यांस तयार आहे तरी वरील दुकान भाड्याने देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नाथ मार्केट येथील पहिल्या मजल्यावरील मागील बाजुचे दुकान क्र. ३ प्रतिमहा चौ. मी. रु. २५/- आणि पोट माळ्यासाठी प्रति महा प्रति. चौ. मी. रु. १०/- आणि नियमाप्रमाणे अनामत रक्कम भरणा करणे, या अटीवर श्री. एस. एल वालू यांना उक्त दुकान भाड्याने देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव, | सभापती, स्थायी समिती, |
| औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद | औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक १८-१०-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहात सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अब्दुल रशिदखान (मामू) | सदस्य |
| २) | श्री. सुभाष कच्छवाह | --"-- |
| ३) | डॉ. कराड भागवत | |
| ४) | श्री. गौतम भागाजी खरात | |
| ५) | सौ. रजनी रमेश जोशी | |
| ६) | श्री. प्रकाश निकाळजे | |
| ७) | श्री. बैनाडे कंवरसिंग | |
| ८) | श्री. महंमद मुश्ताक अहमद | |
| ९) | कु. माया लिंबाजी लाडवाणी | |
| १०) | डॉ. विजयकुमार मेहेर | |
| ११) | श्री. प्रभाकर विधाते | |
| १२) | सौ. पद्मा शिंदे | |
| १३) | श्री. हमीदउद्दिन ताबा | |
| १४) | श्री. सुदाम सोनवणे | |

**संवाद :**

**मा. सभापती :** स. सभासद श्री. मोहसिन अहेमद यांनी दि. ११-१०-९५ पत्रकाद्वारे सी.टी.एस. नं. ९६७२/११ शीट नं. ४८ जियाउद्दिन ले आऊट बशिर कॉलनी रोषणगेट येथील मोकळ्या जागेबाबतचा प्रस्ताव ऐनवेळी विचारार्थ ठेवण्यांबाबत पत्रक दिले आहे. हा प्रस्ताव होऊ शकत नाही. तथापी विधी सल्लागार यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१(ज) अन्वये सदर प्रकरणांबाबत कायदेशीर सल्ला घेऊन या प्रकरणी खास विधीज्ञांची नेमणूक करून सदर प्रकरणांबाबत वरिष्ठ न्यायालयात अपिल करावे.

**श्री. विजयकुमार मेहेर :** महानगरपालिका प्रशासनांविरुध्द न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणांत प्रशासनातर्फे पैरवी करण्यासाठी विधीश न्याय प्रविष्ट प्रकरणांत महापालिकेची बाजू व्यवस्थित मांडत नाहीत. त्यामुळे न्याय प्रविष्ट प्रकरणे आणि विधीज्ञ यांच्यावर प्रशासनांचा बराच खर्च होतो. या बाबींचा विचार करता, सध्या अस्तित्वांत असलेले विधीज्ञांचे पॅनल बरखास्त करण्यांत यावे.

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** महापालिका प्रशासनाविरुध्द न्याय प्रविष्ट असलेल्या पॅलनवरील जे विधीज्ञ अशा प्रकरणांत महापालिकेची बाजू योग्यरित्या न्यायालयासमोर मांडत नाही, त्यामुळे अनेक प्रकरणांत महापालिका प्रशासनांविरुध्द न्यायालयाचा निकाल लागत आहे. याबाबत अनेक वेळा सूचना देण्यांत आलेल्या आहे, तेंव्हा महापालिका विधीज्ञांच्या कारभाराची चौकशी करण्यांत यावी.

**मा. सभापती :** महापालिका प्रशासनांच्या विरुध्द न्याय प्रविष्ट असलेल्या प्रकरणांबाबत सभागृहात झालेल्या चर्चेच विचार करता, आगामी सभेत महापालिका प्रशासनांविरुध्द न्यायालयात एकूण किती प्रकरणे न्यायप्रविष्ट आहे, यापैकी किती प्रकरणांमध्ये महापालिका प्रशासनांविरुध्द निकाल लागलेला आहे. यावर प्रशासनांचा किती खर्च झालेला आहे, याबाबतची सविस्तर माहिती विधी सल्लागार यांनी सभागृहात दाखल करावी. तसेच ज्या प्रकरणांममध्ये महापालिका प्रशासनांच्या बाजूने निकाल लागलेला आहे, त्या प्रकरणाबाबत आवश्यक ती कार्यवाही त्वरित करावी.

**श्री. प्रकाश निकाळजे :** मागील सभेमध्ये ज्या महापालिका कर्मचाऱ्यांनी प्रशासनांकडून घरबांधणी/ घर खरेदीकरिता कर्ज घेतले आहे, परंतु असे कर्मचारी कर्ज घेऊनही महापालिका प्रशासनांच्या निवास्थानात राहत आहे. अशा कर्मचाऱ्यांकडून महापालिकेचे निवास्थाने रिकामे करून घेण्यांबाबत चर्चा झ ाली होती. मिळालेल्या माहितीनुसार या चर्चेनुसार प्रशासनाने घर बांधणी / घर खरेदी याबाबत प्रशासनांकडून कर्ज घेतलेल्या कर्मचाऱ्यांना खरेदी केलेल्या घराबाबतचे कागदपत्र कार्यालयांत दाखल केले नाही, म्हणून २२% दराने व्या आकारणी करण्यांबाबतचे पत्र दिले आहे. वस्तुतः प्रशासनाने कर्मचाऱ्यांना कर्ज म्हणून मंजूर केलेली रक्कम पाहता, या रक्कमेमध्ये कर्मचारी घराचे बांधकाम पूर्ण करू शकत नाही. यासाठी कर्मचाऱ्यांना त्यांच्या घरांचे कागदपत्र तारण म्हणून द्यावे लागेल असेल. विशेष्ज्ञ महत्वाची बाब म्हणजे प्रशासनामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवा हीच कर्ज विषयक घर बांधणी / घर खरेदी या निमित्त कर्ज घेतले असेल परंतु घर बांधले नाही किंवा खरेदीही केलेले नाही, अशा कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. परंतु ज्या कर्मचाऱ्यांनी प्रशासनांतर्फे कमी अधिक प्रमाणात घर बांधणी / खरेदी बाबत कर्ज घेतलेले आहे व त्याचा योग्य उपयोग केलेला आहे. अशा कर्मचाऱ्यांना त्यांची सेवा हेच कर्जविषयक तारण समजून नियमाप्रमाणे शासकीय दराने व्याज आकारणी करावी.

**मा. सभापती :** याच संदर्भात कर्ज घेतलेल्या कर्मचाऱ्यांनी निविदन दिलेले आहे. तेंव्हा सभागृहातील चर्चेनुसार महापालिका प्रशासनाने ज्या कर्मचाऱ्यांनी ज्या कर्मचाऱ्यांनी कर्ज घेऊन त्यांचा योग्य उपयोग केलेला आहे. अशा कर्मचाऱ्यांना, कर्मचाऱ्यांची सेवा हेच तारण समजून नियमाप्रमाणे शासकीय दराने व्याज आकारून कर्जाची वसुली करावी. तसेच कर्मचाऱ्यांना घर बांधणी/ घर खरेदी इत्यादीबाबत जे उपविधी तयार केले आहे, त्या उपविधीच्या नियमानुसार अत्यंत अल्प प्रमाणांत कर्ज पुरवठा होतो. अल्प प्रमाणात पुरवठा झाल्यामुळे या रकमेतून कर्मचारी स्वतःचे घर उभारू शकत नाही तेंव्हा लेखाधिकारी यांनी उपविधीच्या नियमानुसार कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या कर्जामध्ये वाढ कशी करता येईल, याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मांडावा.

**श्री. कंवरसिंग बैनाडे :** महापालिका प्रशासनांतर्फे शहरात कार्यरत असलेल्या आरोग्य केंद्रांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार विहित औषधी रुग्णांना देण्यांकिरिता डी फार्म किंवा बी. फार्म प्रशिक्षित कर्मचारी नाहीत, महापालिकेच्या प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये अशा प्रकारे प्रशिक्षित कर्मचारी नसल्यामुळे औषध वाटपाचे काम दुसऱ्या

कर्मचाऱ्यांकडून करून घेतले जाते. सिडको भागातील आरोग्य केंद्रामध्ये श्री. म्हस्के व श्री. फड या रुग्णांना रुग्णालयांतील स्वीपरने औषधीचे वाटप केले. स्वीपरने चुकीच्या गोळ्या दिल्यामुळे वरील रुग्णांला या गोळ्यामुळे रिॲक्शन आली आहे. करिता महापालिकेतर्फे शहरात चालविणाऱ्या आरोग्य केंद्रामध्ये रुग्णांला देण्यात येणाऱ्या औषधीचे वाटप करण्यांसाठी डी. फार्म किंवा बी. फार्म कर्मचाऱ्यांची नियुक्ती नियमाप्रमाणे करण्यांत यावी. तसेच महापालिका आरोग्य केंद्रांमध्ये शस्त्रक्रिया करण्यासाठी प्रशिक्षित अशा सर्जनची नेमणू करण्यांत यावी. महापालिका प्रशासनांचा विचार करता महापालिका आरोग्य केंद्रामध्ये सर्व सोयींनी युक्त अशी आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी. त्यासाठी रुग्णांकडून इतर अरोग्य सेवा केंद्रामध्ये सर्व सोयींनी युक्त अशी आरोग्य सेवा केंद्राप्रमाणे आवश्यक ती फी वसूल करण्यांत यावी, किंवा महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र शहरातील आरोग्य सेवांना चालविण्यांसाठी भाड्याने देण्यांत यावे. शहरातील अनेक आरोग्य सेवा चालविण्याऱ्या संस्था अरोग्य केंद्र भाड्याने घेण्यांस तयार आहेत.

**सौ. पद्मा शिंदे :** सिडको भागातील अरोग्य केंद्रामध्ये गेल्या महिन्यांत ५५ महिलांनी प्रसुती सेवा उपलब्ध करून घेतली आहे. महापालिका आरोग्य केंद्रातून विशेषतः आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांतील नागरिक आरोग्य सेवा उपलब्ध करून घेतात. याचा विचार करता महापालिकेतर्फे चालविण्यांत येणारी आरोग्य केंद्र आरोग्य संस्थेच्या ताब्यात न देता, महापालिकेच्याच ताब्यात ठेवावी. तथापी आरोग्य सेवा उपलब्ध करून देतांना सिडको भागातील आरोग्य केंद्रात प्रसुती सेवा उपलब्ध करून घेणाऱ्या एका स्त्रीला वेळेवर सलाईन मिळाले नाही. तेंव्हा महापालिका आरोग्य केंद्रामध्ये तसेच इतर अन्य आवश्यक औषधीचा त्वरित पुरवठा करण्यांत यावा.

**मा. सभापती :** स. सभासदांने सभागृहात केलेल्या खुलाशाप्रमाणे ज्या रुग्णांस चुकीची औषधे दिल्यामुळे रिॲक्शन आली, या प्रकरणांबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सविस्तर अहवाल पुढील सभेत द्यावा. देतांना औषधी वाटप करणारे स्थायी कंपौंडर गैरहजर होते का? त्यांच्या कार्यवाहीबाबतचा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवावा.

**डॉ. भागवत कराड :** शहरातील आरोग्य सेवा संस्थेकडे विविध प्रकारच्या आरोग्य सेवासाठी त्या त्या क्षेत्रांचे वैद्यकीय तज्ञ आहे. (शस्त्रक्रिया तज्ञ बालरोग तज्ञ, स्त्री रोग तज्ञ हृदय तज्ञ इ.) हे वैद्यकीय तज्ञ त्यांची मानद सेवा उपलब्ध करून देण्यांस तयार होतील. अशा प्रकारे विविध आरोग्य सेवामधील वैद्यकीय तज्ञांकडून आरोग्य सेवा उपलब्ध करून त्यांचा उपयोग आरोग्य केंद्रांत केल्यास त्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक फायदा होईल. यासाठी सभागृहाने आवश्यक तो ठराव पास करावा.

**मा. सभापती :** स. सभासद श्री. भागवत कराड यांची सूचना योग्य आहे. स. सभासदांनी आरोग्य सेवा संघटनेशी चर्चा करून त्याबाबतचा आवश्यक तो ठराव सर्वसाधारण सभेसमोर मांडावा.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** प्रशासकीय अधिकारी यांच्या विभागांत काम करणारे इमारत निरिक्षक श्री. कारुनाट बी. एम. हे विना परवानगी बांधकामास प्रोत्साहन देतात. या प्रित्यर्थ संबंधित इमारत निरिक्षक नागरिकांकडून केलेली आहे. काहीही उपयोग झालेला नाही. सदर कर्मचारी अनेक वर्षापासून त्याच

विभागात काम करित आहे. संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द अनेक नगरसेवकांच्या तक्रारी आहे.

**प्रशासकीय अधिकारी :** श्री. काकनाटे इमारत निरिक्षक यांचेबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारची तक्रार आलेली नाही.

**श्री. प्रभाकर विधाते :** वॉर्ड क्र. ३ मध्ये सध्या टेलिफोन लाईन टाकण्यांचे काम चालू आहे. खोदलेल्या भागात लाईन टाकल्यानंतर संबंधित विभागांतर्गत माती ओढली जात नाही. एका ठिकाणी तर महापालिका प्रशासनातर्फे टाकलेल्या ड्रेनेज लाईनवर खोदलेली आहे. अद्याप खोदलेल्या लाईनचे काम पूर्ण केले नाही, त्यामुळे रस्त्यांवर माती पडून आहे. पडलेल्या मातीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तेंव्हा याबाबत त्वरित व्यवस्था व्हावी.

**मा. सभापती :** टेलिफोन विभागांतर्फे शहरातील विविध रस्त्यावर चालू असलेल्या कामाची माती पूर्णपणे अचलणे, टाकण्यात आलेली नाईन बुजविणे, याबाबी पाहण्यांचे काम संबंधित विभागचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांचे नाही काय? याचा खुलासा अतिरिक्त शहर अभियंता यांनी करावा, तसेच टेलिफोन विभागांतर्फे रस्त्याचे विविध भागात करण्यात येणाऱ्या टेलिफोनच्या कामाबाबत संबधित विभागांने महापालिका प्रशासनांची परवानगी घेतली का? अशी परवानगी देतांना शक्य तो फुटपाथजवळ किंवा रस्त्यांच्या कडेला टेलिफोन लाईन टाकण्यांची परवानगी प्रशासनांने द्यावी. त्यासाठी प्रशासनाने आवश्यक ते मार्कींग टेलिफोन विभागांस करून द्यावे. अशा प्रकारे टेलिफोन विभगांला मार्कींग करून देतांना पाणी पुरवठा किंवा जलनि:सारण च्या वाहिनीस त्रास होणार नाही याचीही काळजी घेण्यात यावी.

**अतिरिक्त शहर अभियंता :** ज्या भागात टेलिफोन लाईन टाकण्यांचे काम करण्यांत येते. त्या भागात संबंधित विभागांचे कनिष्ठ अभियंता / परवानगी न घेता टेलिफोन विभागांतर्फे ज्या भागात काम सुरू करण्यांत येते. अशी कामे प्रशासनातर्फे बंद करण्यात येतात.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** प्रशासनांतर्फे महसूली जमा आणि खर्च याबाबत दिलेल्या अहवाला वरून मालमता कराची वसुली अत्यंत कमी असल्याचे दिसून येत आहे. अशा प्रकारे मालमत्ता कराची वसुली कमी झाल्यास प्रशासनांतर्गत कामे कशी चालणार याचा खुलासा व्हावा.

**उप आयुक्त-**२ : शहरात एकूण ८५ हजार मालमत्ता आहे, यापैकी १५ हजार मालमत्ता कराबाबतची प्रकरणे वादग्रस्त आहे. मालमत्ता कराची वसुली वाढविण्यांच्या दृष्टीने प्रमाणिक प्रयत्न होत आहे. दिलेल्या डिमांड नोटीसप्रमाणे दिवाळीनंतर मालमत्ता करात वाढ होईल, मालमत्ता कर वसुलीबाबत आवश्यक कर्मचारी आणि जि प याची अडचण आहे. याबाबत मा. सभापती यांचे निदर्शना आणून दिले आहे. शहरातील मालमत्ता कर वसुलीच्या कामासाठी एकूण १८ कर निरिक्षक आहे, त्यापैकी ३ कर निरिक्षकांच्या बदल्या झालेल्या कर निरिक्षकांच्या जागेवर पर्यायी कर निरिक्षकांच्या नेमणूका केलेल्या नाहीत. उर्वरित कर निरिक्षकांपैकी काही कर निरिक्षक वसुलीचे काम करू शकत नाही.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** मालमत्ता कर वसुलीबाबत सभागृहाची दिशाभूल करण्यांची दृष्टीने सरळ / सरळ चुकीची माहिती दिली जात आहे. लोकप्रतिनिधी नियुक्त होण्यापूर्वी मालमत्ता कराची वसुली करीत आहे, तेच कर्मचारी त्या

त्या भागातील लोकप्रतिनिधीची मालमत्ता कर वसुलीसाठी मदत घेत होते. लोकप्रतिनिधी नियुक्त झाल्यानंतरही मालमत्ता कर वसुलीचे काम याच कर्मचाऱ्यांकडून मालमत्ता कराच्या वसुलीत वाढ होईल असे वाटले होते. तथापी वसुली कमी झाल्याचे दिसते. यावरून लोकप्रतिनिधीना बदनाम करण्यांचा हा प्रयत्न आहे असे दिसते.

**श्री. प्रकाश निकाळजे :** प्राप्त माहितीनुसार मालमत्ता कराबाबतची रुपये ५ कोटीची प्रकरणे प्रलंबित प्रकरणांत समझोत्याचे दृष्टीने प्रशासनांतर्फे कार्यवाही केली तर किमान ३/४ कोटी रुपये वसूल होतील असे वाटते. तेंव्हा मालमत्ता कराची किती प्रकरणे प्रलंबित आहे. यापैकी किती प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे. किती प्रकरणांमध्ये कार्यवाही चालू आहे. याबाबतचा सविस्तर अहवाल पुढील सभेत देण्यांत यावा.

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** उप आयुक्त-२ या पदावर काम करणाऱ्या अधिकारी हे प्रशासकीय आहे, कर आकारणी करणे हे तांत्रिक कर्मचाऱ्यांचे काम आहे. त्यामुळे मालमत्ता कराच्या वसुलीवर परिणाम होत आहे. तेंव्हा मालमत्ता कर आकारणी विभाग हा सहाय्यक संचालक नगर रचना यांचे अधिपत्याखाली देण्यांत यावा.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** स. सभासद श्री. मुश्ताक अहेमद यांनी केलेल्या सुचनेशी सहमत आहे.

**मा. सभापती :** मालमत्ता कर वसुलीबाबतचा विभाग उप आयुक्त-२ यांचेकडे असला तरी मालमत्ता कराची आकारणी करण्यांसाठी नेमण्यात आलेले कर मुल्य निर्धारण अधिकारी हे तांत्रिकच आहे. या पूर्वीच्या प्रशासनाने कर आकारणीचे काम अतांत्रिक कर्मचाऱ्यांकडे दिले होते. ही बाब लक्षात घेता, या कारणामुळे मालमत्ता कराच्या वसुलीवर परिणाम होत आहे. मालमत्ता कराबाबतची जी प्रकरणे न्यायालयात आहे. त्याबाबत महापालिका प्रशासनांचे विधी सल्लागार उप आयुक्त-२ कर मुल्य निर्धारण अधिकारी व अन्य अधिकाऱ्यांनी झोन मध्ये एकत्र बसून अशी प्रकरणे निकाली काढावी. अशा सूचना विभागीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत देण्यांत आल्या आहे. याशिवाय मालमत्ता कर वसुलीच्या कामात वसुली कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन ज्या उप अभियंत्यांना महापालिका वाहनाची विशेष जरुरी नसेल, अशा उप अभियंत्याकडील महापालिका वाहने काढून घेऊन ही वाहने मालमत्ता करांच्या वसुलीच्या कामांसाठी विभागीय अधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्रांत सुमारे १५ प्रभागाचा विभाग येतो. ही बाब लक्षात घेता, मालमत्ता कर वसुलीच्या कामांसाठी विभागीय अधिकाऱ्यांना वाहने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**श्री. अब्दुल रशिदखान मामू :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे प्रलंबित मालमत्ता कराची प्रकरणे हाताळण्यासांठी गटीत केलेल्या प्रशासकीय समितीमध्ये स्थायी समितीच्या १/२ सदस्य व मा. सभापती यांचा समावेश केल्यास प्रलंबित प्रकरणे, निकाली काढण्यांस मदत होईल, असे वाटते.

**डॉ. भागवत कराड :** मालमत्ता कर वसुलीबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मालमत्ता कर भरणा करणेसाठी नागरिकांना बॅकेसारखे पासबुक दिल्यास नागरिकांना मालमत्ता कराची भरणा करण्यांस सोईचे होईल अशा प्रकारे पासबुक दिल्याने जे नागरिक नियमितपणे मालमत्ता कराचा भरणा करणार अशा

नागरिकांना मालमत्ता कराचा भरणा करण्यांबाबत वारंवार मालमत्ता कराचे डिमांड आवश्यकता पडणार नाही, तसेच संबंधित नागरिकांचे यापूर्वी मालमत्ता कराचा भरणा केव्हा केला व कोणत्या वर्षापर्यांत केला याबाबतची माहिती संबंधित नागरिक व महापालिका प्रशासन यांना ताबडतोब मिळू शकेल.

**मा. सभापती :** स. सभासद श्री. भागवत कराड यांनी मांडलेला प्रस्ताव योग्य आहे, तथापी स. सभासदांनी सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मांडावा.

**मा. उप आयुक्त-२ :** मालमत्ता कर वसुलीची प्रलंबित प्रकरणे हातळण्यांसाठी समितीचे गठण करण्यांत आले आहे, या गटीत समितीने झाने नं.२ मधील मालमत्ता कराचे प्रकरणे हाताळण्यासाठी प्रलंबित मालमत्ता कराच्या नागरिकांची बैठकही घेतली आहे. काही नागरिक मालमत्ता कर भरण्यांबाबत व्यापारी दृष्टीकोण समोर ठेवतात, मालमत्ता कराचा भरणा न केल्यामुळे ही रक्कम संबंधितांना वापरावयास मिळते, म्हणून असे काही नागरिक मालमत्ता कराची आकारणी चुकीची अथवा बरोबर असली तरी न्यायालयाकडून मनाई हुकूम मिळवतात अशा प्रकरणांत काय निर्णय घ्यावा, याबाबतचा अहवाल लवकच देण्यांत येईल. तथापी मालमत्ता कराच्या वसुलीत वाढ व्हावी या दृष्टीने १ नोव्हेंबर नंतर संबंधित प्रभागाचे नगरसेवक यांना बरोबर घेऊन मालमत्ता कराच्या वसुलीत वाढ करण्यांचा प्रयत्न केला जाईल.

**श्री. अब्दुल रशिदखान मामू :** प्रशासनातर्फे महसूली जमा व खर्च यामध्ये जकात कराच्या वसूली बाबतचे आकडे लक्षांत घेता, यात विशेष फरक दिसत नाही. याचा अर्थ जकात कराच्या वसुलीबाबतचे आकडे विचार करून लिहिले जाते- असे दिसते तेंव्हा याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** जकात अधिक्षक यांनी जकात कराच्या वसुलीबाबत आगामी सभेत सविस्तर माहिती द्यावी.

**श्री. अब्दुलरशिद खान (मामू) :** मागील सभेत चर्चा झाल्याप्रमाणे मेल्ट्रान कंपनीने जकात कराची रक्कम भरली काय? भरली असल्यास किती याचा खुलासा व्हावा.

**जकात अधिक्षक :** मेल्ट्रॉल कंपनीचा ७६ लाखाचा माल विविध मार्गाने अलेला आहे. याबाबत आयात झालेल्या मालाची सविस्तर माहिती घेण्याच्या दृष्टीने संबंधित कंपनीकडे चौकशी करण्यांत येत आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** ज्यावेळी बांधकामासाठी लागणारे डबर, विटा रेतीसाठी प्रती ट्रक रुपये ७५/- असा भाव होता, त्यावेळी अशा मालावर रुपये ५/- या दराने जकात वसूल करण्यांत येत होती. आज बांधकाम साहित्यांचे भाव बऱ्याच मोठ्या प्रमाणांवर वाढले असून डबर किंवा रेतीसाठी अनुक्रमे रुपये ७००/८०० व रुपये ११००/१२०० या प्रमाणे रक्कम अदा करावी लागते. प्रत्येकक्षांत बांधकाम साहित्याचे भाव वाढले असले तरी या मालासाठी रुपये ५ प्रती ट्रक या दराने जकात वसूल केली जाते आहे. तेंव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**जकात अधिक्षक :** जकात कराच्या दरात वाढ करण्यांचा प्रस्ताव मांडण्यात येत आहे.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** दिनांक २८-०९-१९९५ च्या सभेतील चर्चेनुसार रॉक्सी सिनेमागृह यांच्याकडे मालमत्ता कराची थकबाकी असतांनाही संबंधित मालमत्ता धारकांस दुकाने बांधण्यासाठी परवानगी देण्यांच्या प्रकरणांत कोणकोणते

कर्मचारी सहभाग होते, तसेच सभागृहातील चर्चेनुसार या कर्मचाऱ्यांवर काय कार्यवाही करण्यांत आली, याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** मा. उप आयुक्त-१ कार्यालयीन कामानिमित्त मुंबईला गेलेले आहेत, तेंव्हा उप आयुक्त-१ यांनी संबंधित कर्मचाऱ्यांवर काय कार्यवाही केली याबाबतचा अहवाल आगामी सभेत द्यावा.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** दिनांक २८-०९-१९९५ च्या सभेतील चर्चेनुसार मालमत्ता कर / पाणीपट्टी यांची देयके देण्यांबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**श्री. भागवत कराड :** प्राप्त माहितीनुसार शहरातील नागरिकांना मालमत्ता कर व पाणीपट्टी याबाबत हाताने लिहिलेली डिमांड नोटीस देण्यांत येत आहे. वस्तुतः सभागृहाने मालमत्ता कर व पाणीपट्टी यांची देयके संगणकाद्वारे तयार करून देण्यांस मंजुरी देण्यांत आली आहे. अशा प्रकारे संगणकाद्वारे बीले देण्यांस मंजुरी देऊनही शहरातील नागरिकांना मालमत्ता कर व पाणीपट्टीची मागणी देयके हाताने लिहिलेली का देण्यांत येतात.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** शहरातील बऱ्याच नळांना तोट्या नाहीत. यावर्षी झालेल्या कमी पर्जन्याचा विचार करता, आगामील दोन महिण्यांच्या कालावधीत पाणी प्रश्नाबाबत फार मोठ्या प्रमाणांवर कठीण प्रसंग येणार आहे. याबाबींचा विचार करता, शहरातील नळांना तोट्या बसविणे आवश्यक आहे. तसेच वापरात येणाऱ्या पाण्याचाही अत्यंत जपून वापर करणे आवश्यक आहे. यासाठी शहरातील नळांना बसविण्यांत येणाऱ्या तोट्या वेल्डींग करून बसविण्यांत याव्यात अशाप्रकारे वेल्डींग करून बसविण्यांत आलेल्या तोटी नंतर ही ज्या नळांचे पाणी विनाकारण वाया जात असेल, अशा नागरिकांकडून याबाबत जादा दराने वसूली करण्यांत यावी. म्हणजे पाण्याचा अपव्यय टळेल आणि नळांच्या तोट्याही चोरीस जाण्यांची भिती राहणार नाही.

**मा. सभापती :** स. सभासदांच्या सुचनेचा विचार करता, भविष्यात होणाऱ्या पाणी टंचाईवर मात करणे, व पाण्याचा अपव्यय टाळणेच्या दृष्टीने स. सभासद यांच्या सुचनेनुसार संबंधित विभागांने वृत्तपत्र व इतर माध्यमातून जाहिर प्रगटन देऊन नागरिकांना आवाहन करावे.

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** दिनांक २८-०९-९५ च्या चर्चेनुसार महापालिकेच्या विविध विभागाचे लेखा परिक्षण करण्यांबाबत खाजगी चार्टर्ड अकौंटंस संस्था किंवा सहकारी संस्थातील सेवानिवृत्त लेखापरिक्षक यांची नेमणूक करण्यांबाबत मुख्य लेखा परिक्षक यांनी काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** सभागृहाच्या चर्चेनुसार मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी शहरातील खाजगी चार्टर्ड अकौंटस या संस्थेशी या संबंधाने चर्चा केली आहे. या चर्चेच्या वेळी खाजगी संस्थांनी लेखा परिक्षणांसाठी २% या दराने लेखा परिक्षण फी आकारण्यांत येईल, असे सांगितले या दराचा विचार करता, एका वर्षाच्या लेखा परिक्षणांसाठी महापालिका प्रशासनांस अंदाजे ३० लाख रुपये खर्च येणार आहे, ही बाब योग्य वाटत नाही.

**विषय क्र. १४४/१ :**

दिनांक २८-०९-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक २८-०९-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. १४५/२ :**

पशुधन विकास अधिकारी महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महापालिका हद्दितील वेगवेगळ्या ठिकाणचे चामड्याचे गोदाम शहराबाहेर पडेगांव कत्तलखाना परिसरात स्थलांतर करणेकरिता संबंधित व्यावसायिकांना १०x१५ चौ. मी. आकारचे गोदाम बांधून (बांधकाम अपेक्षित खर्च ९०,०००/- देणार असल्याने यापूर्वीच एकूण खर्चाच्या (र. रु. ९७,०००/-) १५ टक्के रक्कम भरावी गोदामाचा ताबा घेण्यापूर्वी १० टक्के रक्कम भरावी व गोदामाचा ताबा घेण्या १० टक्के रक्कम याप्रमाणे २५ टक्के रक्कम भरून उर्वरित ७५ टक्के रक्कम एकूण ४० समान हप्त्यात महापालिकेमध्ये भरण्यांत यावी.

परंतु सर्व संबंधितांनी लेखी स्वरुपात अर्ज देऊन विनंती केली आहे की, काही अडचणीमुळे ते २५ टक्के रक्कम भरू शकत नसल्याने बांधकाम सुरू करण्यांपूर्वी १० टक्के आणि गोदामाचा ताबा घेण्यापूर्वी ५ टक्के त्याप्रमाणे एकूण रक्कमेच्या १५ टक्के रक्कम भरून घेऊन उर्वरित ८५ टक्के रक्कम एकूण ४० समान हप्त्यात भरून द्यावी.

करिता संबंधितांनी गोदामाची रक्कम भरणे करिताची सवलत मिळणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. विजयकुमार मेहेर :** प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे द्यावयाची जागा ही उद्योगधंद्यासाठी वापरली जाणार आहे, तेंव्हा अशा व्यावसायीकांकडून नियमाप्रमाणे १८% दराने व्याज आकारण्यांत यावे.

**मा. सभापती :** प्रस्तावित विषयाचे संबंधित अधिकारी सभागृहात हजर नसल्यामुळे सदर प्रस्ताव पुढीलसभेत ठेवण्यात यावा, तसेच सभागृहापुढे प्रस्ताव ठेवून ही संबंधित अधिकारी आजच्या सभेत हजर का नाही, याबाबत नगर सचिव यांनी संबंधितांस पत्र देऊन खुलासा मागवावा.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्तावावर पुढील सभेत विचार करण्यांत सेईल.

**विषय क्र. १४६/३ :**

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता राजाबाजार ते नवाबपुरा या रस्त्यांचे मिळकत न. भू. क्र. ८८५० ही संपूर्ण (४०.५० चौ. मी.) बांधीत होत आहे. सदरील जागेचे मुल्यांकन रुपये, १,०४,९९५/- निश्चित केले आहे. सदर जागा नोंदणीकृत एस्तऐवजाने महापालिकेस हस्तांतरीत करण्यांसाठी येणारा खर्च रु. ८,५००/- पैकी संबंधिताने ५० टक्के भरण्यास संमती दिलेली आहे. उर्वरित ५० टक्के रक्कम महापालिकेस भरावी लागेल म्हणजेच भसंपादनाकरिता एकूण रुपये १,०९,२४५/- एवढा खर्च येतो.

सदर रक्कमेतून रुपये ८,५००/- नोंदणीकृत दस्तऐवजासाठी व रु. २०,४०७/- मालमत्ता कराचे थकबाकी पोटी वजा करून उर्वरित रुपये ८०,३३८/- संबंधित मिळकतधारक श्री. भिमसिंग शितलसिंग परदेशी यांना धनादेशाद्वारे देण्यांचे व रु. ८,५००/- नोंदणीकृत दस्तऐवज करून घेण्यासाठी अग्रीम म्हणून श्री. एस. पी. खन्ना शाखा अभियंता यांना देण्यासाठीच्या कार्यवाहीचे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार राजाबाजार ते नवाबपुरा या ५० फुट विकास रस्त्यात बाधित होणाऱ्या न. भू. क्र. ८८५० ही संपूर्ण मिळकत (४०.५० चौ. मी.) नोंदणीकृत दस्तऐवजाने महापालिकेस हस्तांतरीत करून घेण्यासाठी जागेच्या मुल्यांकनाकरिता रुपये १,०४,९९५/- व दस्त ऐवजासाठी लागणाऱ्या खर्चापैकी ५०% रक्कम संबंधित मिळकतधारकाने अदा करणेस दिलेल्या संमतीनुसार उर्वरित ५० टक्के रक्कम या प्रमाणे भूसंपादनाकरिता एकूण रक्कम रुपये ९०९,२४५/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच या रक्कमेतून नोंदणीकृत दस्तऐवजासाठी लागणारी रुपये ८,५००/- आणि मालमत्ता कराचे थकबाकी पोटी रुपये २०,४०७/- एवढी रक्कम वजा करून उर्वरित रक्कम रुपये ८०,३३८/- मिळकतधारक श्री. भिमसिंग गितलसिंग परदेशी यांना अदा करण्यांस व नोंदणीकृत दस्तऐवजासाठी रुपये ८,५००/- शाखा अभियंता श्री. एस. पी. खन्ना शाखा अभियंता यांनी अग्रीम म्हणून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४७/४ :**

सहाय्यक आयुक्त-१ महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता मलेरिया विभाग यांना त्यांच्या विभागांतर्गत प्रत्यक्ष स्थळी जाऊन ठरवून दिलेल्या भागाची पहाणी करावी लागते. करिता वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता (एस. एफ. डब्ल्यु) यांना प्रतिमहा रुपये १००/- वाहन भत्ता खालील अटीवर मंजूर करण्यांस हरकत नाही.

१) ज्या कर्मचाऱ्यांस कार्यालयीन कामाकरिता कार्यालयाची गाडी वापराकरिता देण्यांत आली आहे, अशा कर्मचाऱ्यांस वाहन भत्ता मिळणार नाही.

२) वाहन भत्ता मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांनी स्वतःचे वाहन वापरावे लागेल वाहनाची मालकी त्यांच्या नांवे असल्याबाबतचे कागदपत्रे कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

३) प्रत्येक महिन्याचे ५ तारखेपर्यंत त्यांनी महिण्यांत केलेल्या फिरतीचा तपशील व किती किलोमिटर फिरती केली, याबाबत रोजनिशी त्यांचे विभाग प्रमुखाकडून मान्य करून घेऊन त्याबाबतचे प्रमाणपत्र लेखा विभागात सादर केले. तरी त्यांना वाहन भत्ता देण्यांत येईल तसेच ३०० कि.मी. पेक्षा कमी ज्यांची फिरती असेल त्यांना भत्ता देय राहणार नाही.

४) प्रत्येक सहा महिन्यानंतर विभाग प्रमुख ह्यांनी प्रत्येक कर्मचाऱ्यांचे फिरतीच्या कामाच्या प्रकारचा पुर्नविलोकन करून वाहन भत्ता देणे आवश्यक आहे किंवा कसे ह्याचा आढावा घेऊन अहवाल सादर करावा. त्याशिवाय त्यांना वाहन भत्ता देय होणार नाही.

५) रजेच्या काळात वाहन भत्ता देय होणार नाही.

वरील अटीच्या अधिन राहून त्यांना रुपये १००/- प्रतिमहा वाहन भत्ता मंजूर करण्यांस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता मलेरिया विभाग यांना विभागांतर्गत प्रत्यक्ष स्थळी जाऊन ठरवून दिलेल्या भागाची पहाणी करावी लागत असल्यामुळे प्रस्तावात

नमूद केलेल्या अनुक्रमे १ ते ५ च्या अटीनुसार वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता (एस. एफ. डब्ल्यु) यांना प्रतिमहा रुपये १००/- या प्रमाणे वाहन भत्ता अदा करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४८/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जालना रोड ते सुतगिरणी रस्त्यांवरील कडा ऑफिस ते गजानन महाराज मंदिरापर्यंत रस्ता दुभाजकाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सन १९९४-९५ चे सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने र.रु. १,९५,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च शहराचे सौंदर्यीकरण सन १९९५-९६ मधून प्रस्तावित आहे. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोड ते सुतगिरणी रस्त्यांवरील कडा ऑफिस ते गजानन महाराज मंदिरापर्यंत रस्त्यांवर दुभाजकांचे काम करण्यांकरिता रक्कम रुपये १,९५,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४९/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सुतगिरणी ते सिडको ते हद्दिपर्यंतच्या ८० फुट डी. पी. रस्त्यावरील बाकी असलेल्या खडी रस्त्यांचे डांबरीकरण करण्यांच्या कामासाठी सन ९३-९४ चे सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रुपये १,४१,३२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा. आयुक्तांची मंजुरी मिळालेली आहे. सदर कामाचा खर्च भांडवली रस्ते १९९५-९६ मधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी दरपत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन कोरी निविदापत्रके विक्री झाली व स्विकृतीच्या अंतिम तारखेस एकूण दोन निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अे. सी. कोठारी | १५.२४ टक्के कमी दराने |
| २) | श्री. देवेंद्रसिंग जग्गी | १३.७० टक्के कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.२४ टक्के कमी दराची श्री. अे. सी. कोठारी यांची निविदा आहे. तरी सदर कामाकरिता तयार केलेल्या र. रु. १,४१,३२०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री. ए. सी. कोठारी यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.२४% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुतगिरणी ते सिडको ते हद्दिपर्यंतच्या ८० फुट डी. पी. रस्त्यावरील बाकी असलेल्या खडी रस्त्यांचे डांबरीकरण करण्यांच्या कामासाठी रक्कम रु. १,४१,३२०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १५.२४% कमी दराच्या श्री. ए. सी. कोटारी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५०/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. कैलास नगर मनपा प्रा. शाळेवर दोन खोल्या व व्हरंडा बांधकामासाठी सा. बां. खात्मा चे सन १९९२-९३ चे जिल्हा दरसूचीनुसार र. रु. ३,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. परंतु मा. आयुक्तांची सदर कामाचे अंदाजपत्रक र. रु. २,२५,०००/- शासनाचे नियमानुसार योग्य आहे असे आदेशित करून र. रु. २,२५,०००/- ला दि. ०७-०९-९५ ला मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामाचे र. रु. २,२५,००० चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

अर्थ तरतूद संपलेली आहे. सदरचा खर्च विकास इमारती शाळा, दवाखाने बांधणे, या लेखा शिर्षामधून सन ९५-९६ चे सुधारित अंदाजपत्रकामधून मिळणाऱ्या वाढीव तरतूदीमूधन करण्यांत येईल.

**संवाद :**

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** प्रस्तुत कामात अंदाजपत्रकाची मुळ रक्कम कमी करून कमी रक्कमेच्या अंदाजपत्रकास मंजुरी घेण्यात येत आहे. तेंव्हा या कामाचे अंदाजपत्रक कमी का करण्यांत आले याचा खुलासा व्हावा.

**शहर अभियंता :** प्रस्तावित कामावर मा. आयुक्त यांनी पहाणी केल्यानंतर, प्रस्तावित कामापैकी व्हरंडा व काही बांधकाम कमी करण्यांचे आदेश दिले आहेत, अशा प्रकारे मुळ बांधकाम कमी केल्यामुळे प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक कमी करण्यात आले आहे.

**मा. सभापती :** स. सभासद यांनी प्रस्तावाचा अभ्यास करून सभागृहात चांगला प्रश्न विचारला आहे, तथापी महापालिकेतर्फे करून घेण्यात येणाऱ्या कामाची प्रतवारी (क्वालिटी) चांगली राहिल, यांची संबंधित अधिकाऱ्यांची काळज घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. कैलास नगर मनपा प्रा. शाळेवर व्हरंडाचे काम वगळता खोल्याचे बांधण्यासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये. २,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५१/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. भावसिंगपुरा स्लम येथे मनपा शाळेजवळ नविन आर.सी.सी. बॉक्स टाईप कल्व्हर्ट बांधणेकरिता सा. बां. खात्याचे सन ९४-९५ च्या दरसूचीनुसार र. रु. २,५१,८२०/- चे अंदाजपत्रका तयार करण्यांत आलेले आहे. सदर कामाचे बजेट ९५-९६ नविन खडी रस्ते व कल्व्हेट रु. ४५ लाख खर्चाचे शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. १४-०९-९५ ला मान्यता दिली आहे. तरी सदरच्या कामाच्या र. रु. २,५१,८२०/- च्या अंदाजपत्रकास मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. भावसिंगपुरा स्लम येथे मनपा शाळेजवळ नविन आर.सी.सी. बॉक्स टाईप कल्व्हर्ट बांधण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये २,५१,८२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५२/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर गोधडीपुरा येथे स्लम येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या ९४-९५ च्या दरसूचीनुसार र. रु. १,५९,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च नवीन खडी रस्ते तयार करणेबाबत खर्चाचे रुपये ४५ लाख शिर्षकातून करण्यात येईल. अंदाजपत्रकास दि. २५-०९-९५ ला. मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. तरी वरील कामाकरिता रुपये १,५९,७००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर गोधडीपुरा स्लम येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता रक्कम रुपये १,५९,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५३/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर गटार बांधणे बाबतच्या कामाकरिता सा. बां. खात्याचे ९२-९३ च्या दरसूचीनुसार र. रुपये. ४,२२,८४०/- च्या अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील कामाचा खर्च झोपडपट्टी भागात खुल्या गटारी बांधणेबाबत खर्चाचे रु. ५० लाख शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. १५-०९-९५ ला मान्यता दिलेली आहे. करिता तयार करण्यात आलेले रुपये ४,२२,८४०/- च्या अंदाजपत्रकास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर येथे दगडी गटार बांधण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये ४,२२,८४०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५४/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेचे सिमेंट अभावी बरीचशी इमारतीचे कामे, विकसित असलेल्या उद्यनातील बांधकामे इ. महत्वाची कामे सिमेंट अभावी बंद होती.

वरील महत्वाच्या कामाचार विचार केला असता, मा. आयुक्तांनी दिनांक ०६-०७-९५ रोजी आदेशित दिला की, ताबडतोब व्ही. के. ट्रडींग कंपनीकडून २००० सिमेंट गोणी ४३ ग्रडेचे विषय क्र. ४५/५ दि. १०/०७/९५ स्थायी समितीने मंजूर केलेल्या दराप्रमाणे खरेदी करावे व त्या आधारे व्हे. अे. ट्रेडींग कंपीकडून सिमेंट पुरवठा करण्यांस्तव कार्यालयीन आदेश क्र. मनपा/शअ/भांडार/२८६/९५ दिनांक ०६-०७-९५ देण्यांत आला. संबंधित पुरवठा धारकांने दि. ०७-०७-९५ रोजी १३२० व दि. ०८-०७-९५ ला ६८० असा २००० सिमेंट गोणीचा पुरवठा केला आहे.

तरी वरीलप्रमाणे व्ही. अे. ट्रीडींग कंपीनीकडून २००० सिमेंट गोणी खरेदी केले त्याची र. रुपये १३२=०० प्रती गोणी या दराने रुपये २,६४,५००/- (दोन लाख चौसष्ट हजार पाचशे) इतकी होते. तरी प्रस्तावास कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेचे इमारत कामे, नालाट्रेचिंगची कामे, उद्यानातील बांधकामे इ. कामे सिमेंट अभावी बंद पडू नये, म्हणून दि. १९-०७-९५ च्या मंजुर दराने म्हणजे प्रती गोणी रुपये १३२.२५ पैसे या दराने मे. व्ही. ए. ट्रडींग कंपनी यांच्याकडून खरेदी करण्यांत आलेल्या २००० सिमेंट गोणीकरिता झालेल्या रक्कम रुपये २,६४,५००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५५/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. मुकूंदवाडी (पूर्व) येथे नविन खांडकी पेव्हींग करणेकरिता र. रुपये २,७४,९२०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. ०२-०३-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील कामासाठी दुसरे वेळी निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/२२/९५ दि. ३१-०८-९५ द्वारे स्थानिक वृत्तपत्रात विस्तृत प्रसिध्दी देऊन प्रगट निविदा मागविल्या असता, कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तेरा निविदा विक्री झाल्या पैकी सिव्कारण्याच्या अंतिम तारखेस १३-०९-९५ एकूण दोन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा उपस्थित ठेकेदारासमक्ष दि. १३-०९-९५ रोजी उघडल्या असता, ठेकदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आर. बी. चव्हाण | १६ टक्के कमी (अंदाजपत्रकीय दरापेक्षा ) |
| २ | मे. विपुल कन्स्ट्रक्शन | १० टक्के कमी (अंदाजपत्रकीय दरापेक्षा ) |

तसेच पूर्वी निविदा मागविण्यांत आली असता, याच गुत्तेदार श्री. आर. बी. चव्हाण यांची निविदा २५ टक्के कमी (अं. प. दरापेक्षा) दराची होती. परंतु स्थायी समितीने सदरील कामाचा दर्जा चांगला राहणार नाही. म्हणूननिविदा रद्द करून पुन्हा निविदा मागविण्यांचे आदेशित केले असता याच गुत्तेदाराची १६ टक्के कमी दराची निविदा आहे.

करिता श्री. आर. बी. चव्हाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६ टक्के कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मुकूंदवाडी (पूर्व) येथे नविन खांडकी पेव्हींग करण्यांच्या कामाकरिता दुसऱ्यांदा मागविण्यात आलेल्य निविदा पत्रकानुसार तुलात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १६% कमी दराच्या श्री. आर. बी. चव्हाण यांच्या निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५६/१३ :**

मा. कार्यकारी अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागांतील जलवाहिनीचे (विविध व्यासाच्या) दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी तसेच नविन कामासाठी लागणारे विविध आकारचे सी. आय. स्पेशलची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे खरेदी करावयाचे आहे. करिता अंदाजपत्रक र. रुपये १,१३,९२९/- चे तयार करण्यांत आले असून सदर खर्च भांडवली कामाच्या १.५० कोटी तरतूदीमधून करण्यांत येत आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागांतील जलवाहिनीचे दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी तसेच नविन कामासाठी लागणारे विविध

आकारमानाचे सी. आय. स्पेशल करण्यांसाठी रक्कम रुपये १,१३,९२९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५७/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी (पा.पु.व. ज.नि.) प्रस्ताव सादर केला आहे की, धुत मोटर्स ते युथ होस्टेल पर्यंत (अदालत रोड) दगडी गटार बांधकामासाठी परिसर अभियांत्रिकीची दरसूची ९२-९३ नुसार रक्कम रुपये ५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाचा खर्च हा शासकीय अनुदान ९३-९४ मध्ये वि.क्र. १ ते ७ ७ साठी करण्यांत आलेल्या र. रुपये ५० लाखाच्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक र. रुपये ५,००,०००/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे धुत मोटर्स ते युथ होस्टेल पर्यंतच्या (अदालत रोड लगत) दगडी गटार बांधण्याच्या कामासाठी रक्कम रुपये ५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५८/१५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, भावसिंगपुरा भागात ८०,१०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकवयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागांच्या सन ९३-९४ च्या दरसूचीनुसार र. रुपये १,२०,६७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामासाठीच्या तरतूदीतून करण्यांत येणार आहे. कार्यालयासाची निविदा सूचना क्र. १०/९५ जी.की, दैनिक लोकमत, अजिंठा, औरंगाबाद टाईम्स या वर्तमान पत्रांत प्रसिध्दीस देण्यांतयेऊन बी-१ निविदा मागविण्यांत आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात (७) कोऱ्या निविदा विक्री झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सलीम पटेल | अ.प. पेक्षा ६.९९ टक्के जास्त |
| २) | एस. ए. चौधरी | २० टक्के जास्त |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या कमी दर हा श्री. सलीम पटेल यांचा आहे. परंतु त्यांनी दिलेला दर जास्त वाटल्यामुळे मा. आयुक्तांच्या आदेशानुसार ठेकेदारासस सदरचे काम अं.प. पेक्षा ३ टक्के जास्त दराने करण्यांस तयार आहात काय याबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यास लेखी संमती दिली आहे व त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिली आहे.

तरी वाटाघाटी अंतिचा दर अं. प. पेक्षा ३ टक्के जास्त या दरोन श्री. सलीम पटेल यांची निविदा स्विकृतीच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा भागात ८०,१०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम गुत्तेदार श्री. सलीम पटेल यांचेकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५९/१६ :**

कार्यकारी अभियंता यांनी (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. पडेगांव व मिटमिटा येथे नविन ड्रेनेज लाईन टाकणे व सेप्टीक टँक बांधणेच्या कामाकरिता रुपये १५-८२ लाखाचे अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि.१८-१२-९२ रोजी मंजुरी दिलेली

आहे. नियमानुसार निविदा मागवून त्यानुसार आतापर्यंत सदरील कामावर र. रु. १३,१५ लाखाची आर्थिक खर्च झालेला आहे. पडेगांव व मिटमिटा येथील दोन्ही ठिकाणच्या ड्रेनेज स्कीम पूर्ण करण्यांसाठी यापुढे आणखी वाढीव खर्च र. रु. ४.५२ लाख एवढा अपेक्षित आहे. त्यामुळे या पूर्ण स्कीमवर एकूण र. रु. १७.७८ लाख खर्च होणार आहे. सदरील वाढीव कामास मा. आयुक्तांनी दि. ०२-०९-९५ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सदरील कामाची मुळ निविदा ही अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.५ टक्के कमी दराची असल्याने यापुढील वाढीव कामही संबंधित ठेकेदारांकडून १३.५ टक्के कमी दराने करून घेणे आहे.

तरी अपेक्षित खर्च र. रु. १७.७८ लाख व मुळ अंदाजपत्रकीय रक्कमेस मंजुरी रक्कम रु. (-)१५.८२ लाख (रु. १.९६ लाख) करिता सदरील वाढीव रक्कम रु. १.९६ लाखाच्या खर्चास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. पडेगांव व मिटमिटा येथे नविन ड्रेनेज लाईन टाकणे व सेप्टीक टँक बांधणेच्या कामाची मुळ योजना पूर्ण करण्यांच्या कामासाठी मुळ अंदाजपत्रक रक्कम रुपये १५.८२ लाख या व्यतिरिक्त सदर योजना पूर्ण करण्यांसाठी लागणाऱ्या रक्कम रुपये १.९६ लाखाच्या वाढीव खर्चास म्हणजे वरील ठिकाणची जलनि:सारण योजना पूर्ण करण्यांकरिता एकूण रक्कम रुपये १७.७८ लाखाच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. १६०/१७ :**

मा. महापौर, औरंगाबाद यांना सिमला येथे महापौर परिषदेचे निमंत्रण आलेले असून, दि. १ ते ३ नोव्हेंबर पर्यंत तीन दिवसांचे या परिषदेस मा. महापौर जाणार आहेत त्यांचे सोबत महिला म्हणून त्यांचे असिस्टंट लिपीक सौ. निर्मला लोहिया व स्वीय सहाय्यक श्री. प्रमोद खोब्रागडे जाणार आहेत. यासाठी औरंगाबाद ते दिल्ली ते औरंगाबाद असे विमान भाडे रुपये ३,४८०/-, एकेरी व दिल्ली ते सिमला रेल्वे भाडे अंदाजे रुपये ६००/- एकेरी असा प्रवास होणार आहे, यात तिघांचा ही, प्रवास भाडे खर्च रुपये १९,४८०/- होणार असून भोजन तथा निवास व किरकोळ खर्च रुपये १०,०००/- अग्रीम असे एकूण रुपये २९,४८०/- (रुपये एकोणत्तीस हजार चारशे ऐंशी फक्त) च्या खर्चास व महापौर परिषदेस उपस्थित राहण्यांस प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिमला येथे आयोजित दिनांक १ ते ३ नोव्हेंबर ९५ च्या तीन दिवसांच्या महापौर परिषदेस औरंगाबाद महानगरपालिकेचे मा. महापौर यांचे असिस्टंट लिपीक सौ. निर्मला लोहिया व स्वीय सहाय्यक श्री. प्रमोद खोब्रागडे या परिषदेस उपस्थित राहण्यांसाठी औरंगाबाद ते दिल्ली व परत दिल्ली ते औरंगाबाद असे विमान भाडे रुपये ३,४८०/- एकेरी व दिल्ली ते सिमला रेल्वे भाडे अंदाजे रुपये ६००/- एकेरी या प्रवासा करिता होणाऱ्या रक्कम रुपये १९,४८०/- प्रवास भाडे आणि भोजन तथा निवास व किरकोळ खर्चाकरिता रुपये १०,०००/- असे एकूण रुपये २९,४८०/- च्या खर्चास आणि महापौर परिषदेस उपस्थित राहण्यांसाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६१/१८ :**

दिनांक ०९-०६-१९९५ च्या स्थायी समितीने ठराव क्र. १९ गठीत केलेल्या टपरी उप समितीने ठरावातील सुचनेनुसार शहरातील सर्व भागातील टपऱ्यांची पहाणी करून शहराचे सौंदर्य, सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देणे आणि महानगरपालिकेच्या आर्थिक लाभ या बाबींचा सर्वकश विचार करून उप समितीचा अहवाल तयार केलेला आहे. हा अहवाल उप समितीचा सभापती या नात्याने मी सभागृहाच्या मंजुरीसाठी दाखल करीत आहे. त्यास कृपया मंजुरी द्यावी.

**संवाद :**

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** दिनांक ०९-०६-९५ च्या स्थायी समितीने शहरातील टपऱ्याचा प्रश्न हाताळण्यासाठी स्थायी समितीचे सदस्य म्हणून आम्हा सदस्यांवर जी जाबाबदारी टाकली होती. त्या जबाबदारीतून शहराचे सौंदर्य, सुशिक्षित बेराजगांराचा प्रश्न आणि महापालिकेचे आर्थिक बाबींचा सर्वांगीन विचार करून गटीत केलेल्या टपरी उप समितीने प्रशसकीय अधिकाऱ्यांसह टपरी समितीबाबतचा अहवाल तयार केला आहे. हा अहवाल टपरी समितीचा सभापती, या नात्याने मी सभागृहापुढे सादर करीत आहे. तयार केलेल्या अहवालामध्ये काही त्रुटी असतील तर त्याबाबत सभागृहाने सूचना देऊन वाढ करावी. तसेच गठीत टपरी उप समितीने सभागृहापुढे आपला अहवाल दाखल केलेला असल्यामुळे टपरी उप समितीचे कार्य संपुष्टात आले आहे. म्हणून दिनांक ०९-०६-९५ च्या ठरावान्वये गठीत करण्यांत आलेली टपरी उप समितीने सभागृहापुढे आपला अहवाल दाखल केलेला असल्यामुळे टपरी उप समितीचे कार्य संपुष्टात आले आहे. म्हणून दिनांक ०९-०६-९५ च्या ठरावान्वये गठीत करण्यांत आलेली टपरी उपसमिती विसर्जित करावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक ०९-०६-९५ च्या स्थायी समिती ठरावानुसार गठीत केलेल्या टपरी उप समितीने सभागृहासमोर दाखल केलेल्या अहवालास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

टपरी उप समितीचा अहवाल सभागृहात स. सदस्यांना वितरीत करण्यांत आला आहे.

या टपरी उप समितीच्या अहवालानुसार शहरातील विविध भागात टपरी बाबत मंजुरी देतांना प्रशासनाने संबंधित विभागांचे नगरसेवक यांना विश्वासात घेऊन टपऱ्या देण्यांची कार्यवाही करावी, असे सर्वानुमते ठरले. दाखल केलेला टपरी समितीचा अहवाल मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेत शिफारस करण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६२/१९ :**

मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या मान्यतेनुसार अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना गणवेष कापड व गणवेष साहित्य १९९५-९६ या वर्षासाठी पुरविणे आवश्यक आहे. त्याकरिता वार्षिक तरतूद महापालिका व एम.आय.डी.सी. वाळुज अनुदान रुपये ४,७५,०००/- ठेवण्यात आलेले आहेत.

अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांच्या गणवेष कापड व गणवेष साहित्य खरेदीसाठी एकूण अंदाजे खर्च रुपये ३,२०,०००/- येईल.

अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांच्या गणवेष कापड व गणवेष साहित्य खरेदीच्या खर्चाचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरी व वैधानिक कार्यवाहीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९५-९६ या वर्षासाठी महापालिका व एम.आय.डी.सी. वाळुज येथील (५८) अग्निशामक कर्मचाऱ्यांना पुरविण्यांत गणवेष कापड व गणवेष साहित्य खरेदीसाठी रक्कम रुपये ३,२०,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६३/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्राणी संग्रहालय येथील हत्ती घरासमोर मोट व मागील भिंत बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९४-९५ चे जिल्हा दर सूचीप्रमाणे रक्कम रु.२,९५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे व त्यास मा. आयुक्तांनी दि. ०७-०९-९५ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. सबब सदर कामासाठी रक्कम रुपये २,९५,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदर काम हे प्राणी संग्रहालय विकास करणे या सदराखाली प्रस्तावित आहे तसेच झु ॲथॉरिटी ऑफ इंडिया दिल्ली यांचेकडून प्राणी संग्रहालयातील पांढऱ्या वाघाच्या कामाकरिता महापालिकेस अनुदान रुपये (८५,०८,७३५) लक्ष प्राप्त झालेले आहे. प्राणी संग्रहालयातील इतर कामाच्या अंदाजपत्रकाच्या ५०% आणखी प्राप्त होण्याची आशा आहे.

त्या अनुदान प्राप्त करणे करिता पशुधन विकास अधिकारी प्रयत्नशील आहे. तरी रक्कम रुपये २,९५,०००/- चे अंदाजपत्रक विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्राणी संग्रहालय येथील हत्ती घरासमोर मोट व मागील भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रुपये २,९५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६४/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालय येथे सर्पालयाची इमारत बांधण्याच्या कामासाठी ठराव क्र. १६४/९५ दि. ०९-०३-९५ अन्वये रक्कम रुपये १६,९५,७८५/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. तसेच ठराव क्र. २१६ दि. ३१-०३-९५ अन्वये काम करणाऱ्या एजन्सीला रिशिष्टमधील बाब क्र. ३१ (काचेचा ॲटम) वगळून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५% जास्त दराने मंजुरी देण्यात आली. सदर इमारतीचे काम जवळ जवळ ६०% पूर्ण झालेले आहे. या कामामध्ये सापाच्या कॅबीनसाठी समोरून १२ मी.मी. जाडीची काच बसविण्यांसाठी डी. एस. आर. ला दर उपलब्ध नसल्यामुळे कार्यालयीन सूचना क्रमांक /मनपा/मुलेप/१८/९५ दि.०३-०८९५ अन्वये दरपत्रके मागविले असता. शेवटच्या तारखेपयर्ंत एकूण तीन कोटेशन दर भरून प्राप्त झा ाले ते दि. ११-०८-९५ ला मुख्य लेखा परिक्षक यांचे दालनांत उघडण्यात आले. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | ॲल्युमिनियम फिटींग | सागवाणी फ्रेम फिटींग |
|---|---|---|---|
| १) | मे. कर्मा अल्युमिनियम फॅब्रीकेटर्स | रु. १९५०/- चौ. मी. | रु. १७५०/- चौ.मी. |
| २) | मे. कॅपीटल ग्लास सेंटर | रु. १८००/- चौ. मी. | रु. १७००/- चौ.मी. |
| ३) | श्री. सलीम पटेल | रु. २४०/- चौ. फुट. | - |
| | | (२५८२/- चौ. मी.) | |

तुलात्मकदृष्ट्या सर्वात कमी व रक्कम रुपये १८००/- ॲल्यु मिनियम फिटींगसह व रक्कम रुपये १७००/- लाकडी फ्रेमसह प्रति चौ. मी. दराने मे. कॅपीटल ग्लास हाऊस यांचे कोटेशन दर आहे. यापैकी ॲल्युमिनियम फीटींग सह काचेचे दर रुपये १८००/- प्रती चौ. मी. यानुसार काम करण्यांचे ठरले आहे व त्यास मा. आयुक्तांनी २४-०९-९५ अन्वये मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामाचे सर्वात कमी दराचे मे. कॅपीटल ग्लास सेंटर यांचे कोटेशन दर रक्कम रुपये १८००/- चौ. मी. व सदर कामासाठी लागणारा खर्च रक्कम रुपये १,४४,९४०/- मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च प्राणी संग्रहालय विकास कामे या लेखा शिर्षामधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालय येथील सर्पालयाच्या इमारतीमध्ये सापाच्या कॅबीनसाठी समोरून बारा मी.मी. जाडीची काच बसविण्यांसाठी प्राप्त झालेल्या दरपत्रकानुसार सर्वात कमी दराचे दरपत्रक धारक मे. कॅपीटल ग्लास सेंटर यांचे ॲल्युमिनियम फिटींगसह काचेचे दर रुपये १८००/- प्रति चौ. मी. या दराने उक्त संस्थेकडून काम करून घेण्यांस आणि या कामासाठी लागणाऱ्या रक्कम रुपये १,४४,१४०/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६५/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपाच्या बांधकाम करिता विविध विभागातून लोखंडाची मागणी १६० मे. टनाची आलेली असून अंदाजपत्रक रु. २७,००,०००=०० चे तयार करण्यांत आले आहे. त्या अंदाजपत्रकात मा. आयुक्त साहेबांनी दि. ०१-०६-९५ व स्थायी समितीने दि. ०३-०७-९५ रोजी विषय क्र. २२/२ अन्वये मान्यता मिळाल्या नंतर अंदाजपत्रक सर्वसाधारण सभेकडे दि. २०-०७-९५ विषय क्र. १५/२ प्रमाणे अंदाजपत्रक मंजुरीस पाठविण्यांत आले परंतु दि. १९-०७-९५ ते २६-०७-९५ पर्यंत अचारसंहिता लागू असल्यामुळे सर्वसाधारण सभा होऊ शकली नाही या दरम्यान कामे बंद पडु नये व वेळवाया जाऊ नये म्हणून दि. २७-०७-९५ रोजी पहिली निविदा क्र. २९४/९५ दि. ११/०७/९५ दैनिक लोकमत, लोकमत टाईम्स व सिटीझन या वर्तमानपत्रात प्रसिध्दी केली असता निविदा विकण्याची तारीख १२-०७-९५ ते १९-०७-९५ ठेवण्यात आली असता या कालावधीत तीन (३) निविदा विकल्या गेल्या आणि दि. २५-०७-९५ निविदा विकण्यांच्या तारखेस तीन (३) निविदा प्राप्त झाल्या त्यात.

१) महाराष्ट्र लघु उद्योग विकास मंडळ
२) ट्रेडेन्ट स्टील ली. जळगांव
३) अमित स्टील रोलींग मिल

त्यांच्या निविदा प्राप्त झाल्या त्यांचे दर खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | व्याज | वजन | म. ल. उद्योग विकास मंडळ | | ट्रेन्डेंटे रिल्ली लि. | | अमित स्टील | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| १) | ६ एम.एम. | ७ मे. टन | १६५०० | ११५५०० | १६८०० | ११७६०० | १७०५० | ११९३५० |
| २) | ८ एम.एम. | २४ मे. टन | १६८०० | ४०३२०० | १६९०० | ४०५६०० | १७००० | ४०८००० |
| ३) | १० एम.एम. | २२ मे. टन | १६७०० | ३६७४०० | १६८०० | ३६९००० | १७००० | ३७४००० |
| ४) | १२ एम.एम. | ३६ मे. टन | १६५०० | ५९४००० | १६८०० | ६०४८०० | १६९०० | ६०८४०० |
| ५) | १६ एम.एम. | ३६ मे. टन | १६५०० | ५९४००० | १६९०० | ६०८४०० | १६९०० | ६०८४०० |
| ६) | २० एम.एम. | २२ मे. टन | १६७०० | ३६७४०० | १६९०० | ३७१८०० | १७००० | ३७४०० |
| ७) | २५ एम.एम. | १३ मे. टन | १६७०० | २१७१०० | १६९०० | २१९७०० | १७००० | २२१०० |
| | | | | ६५८६०० | | २६९७५०० | | २७१३१५० |

वरील सर्व पुरवठा धारकाने सर्व पुरवझा जकात रहित माल पुरवठा करण्यांत येईल असे लिहिले आहेत. वरील सर्व बाबतीत विचार केला असता महाराष्ट्र लघु उद्योग मंडळास कार्यालयीन पत्रक क्र.३२७ दि. ०२-०८-९७ अन्वये दराच्या वाटाघाटीसाठी मा. आयुक्त साहेबाच्या दालनात दि. ०३-०८-९५ ला बोलाविले असता प्रति टन २०० कमी करण्यास संमती पत्र दिले या बाबतीत महाराष्ट्र लघु विकास मंडळाने आणखी दर कमी करावे असे मा. आयुक्तांनी सुचविले परंतु पन्हा दर कमी करण्यात महाराष्ट्र लघु उद्योग मंडळ तयार नसल्यामुळे मा. आयुक्तांनी दि. २१-०८-९५ रोजी फेर निविदा काढावी असा आदेश दिला.

त्या आधारे फेर निविदा क्र.मनपा/भांडार/३७४/९५ दैनिक वर्तमान पत्र सकाळ पुणे, महाठवाडा, गोरजवार्ता, स्वरगंगा आणि मुकदस या वर्तमान पत्रात प्रसिध्दी केली असता दि. २१-०९-९५ पर्यंत निविदा विकण्यांच्या कालावधीत तीन (३) निविदा विकल्या व त्या दिनांक २८-०९-९५ रोजी तीन (३) निविदा प्राप्त झाल्या व त्या दि.३०-०९-९५ रोजी उघडण्यात आल्या त्याचे दर व अटी खालीलप्रमाणे आहे.

**१) ट्रेडेंन्ड स्टिल लि. जळगांव**
**अटी**

१) आमचे लोखंड पुरवठा करण्याचे घरात इतर कर व चढाई उतराई ववाहतुकचा समाविष्ट आहे व पुरवठा केलेल्या मालाचा जकातकर यात समाविष्ट नाही तो मनपास भरावे लागेल.
२) आमचे दर निविदा उघडल्या पासून ९० दिवसाकरिता बंधनकारक राहतील.
३) आय.एस.आय. प्रमाणित प्रमाणे लोखंडाचा पुरवठा करण्यात येईल.
४) निविदा उघडल्याच्या तारखेपासून आम्हास १५ दिवसाच्या आत लोखंड दरात रु. १०० प्रति टन सुट देण्यांत येईल.

**२) शारदा आस्पाट लि. नागपुर**
**अटी**

१) आमच्या निविदेचा दर निविदा उघडल्यापासून ९० दिवसापर्यंत बंधनकारक राहतील.
२) कार्यालयीन आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात लोखंडाचा पुरवठा करण्यांत येईल.

३) मालाचा पुरवठा झाल्यापासून ७ दिवसात १००% देयक अदा करावे.
४) पुरवठा लोखंडाचे आय.एस.आय. प्रमाणपत्र आमच्या तर्फे देण्यात येईल.
५) दि.१०-१०-९५ पूर्वी माल पुरवठाचा आदेश दिल्यास रु. १०० प्रति टन सुट देण्यांत येईल.
६) शासनाच्या दरात वाढ झाल्यास ती मनपास सोसावी लागेल.
७) पुरवठा केलेल्या मालाचा महापालिकेस सोसावा लागेल.

**३) महाराष्ट्र लघु उद्योग विकास मंडळ, औरंगाबाद**

**अटी**

१) आमचे दर चढाई, उतराई व वहानुकसह असून जकात कराव्यतिरिक्त इतर कर समाविष्ट आहे.
२) आमचे दर ९० दिवसाकरिता बंधनकारक राहतील.
३) परुवठा केलेल्या मालाचे देयक ३० दिवसात अदा केल्यास रु.१०० प्रति टन या दराने सुट देण्यात येईल.

| अ. क्र. | व्याज | वजन | टायडन्ट स्टल लि. | | शारदा अस्पाट लि. | | महाराष्ट्र लघ उद्योग विकस मंडळ रक्कम | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| १) | ६ एम.एम. | ७ मे. टन | १६३५० | १०७४५० | १५४४३ | १०८१०१ | १६१०० | ११२७०० |
| २) | ८ एम.एम. | २४ मे. टन | १५८०० | ३७२२०० | १५८४३ | ३८०२३२ | १६३०० | ३९१२०० |
| ३) | १० एम.एम. | २२ मे. टन | १५२७५ | ३६६०५० | १५३४३ | ३३७५४ | १५९०० | ३४९८०० |
| ४) | १२ एम.एम. | ३६ मे. टन | १५२०० | ५४७२०० | १५२४३ | ५४८७४८ | १५९०० | ५७२४०० |
| ५) | १६ एम.एम. | २२ मे. टन | १५२०० | ५४७२०० | १५२४३ | ५४८७४८ | १५९०० | ५७२४०० |
| ६) | २० एम.एम. | २२ मे. टन | १५२०० | ३३४४०० | १५२४३ | ३३५३४६ | १५९५० | ३५०९०० |
| ७) | २५ एम.एम. | १३ मे. टन | १५२५० | १९८५५० | १५३४३ | १९९४५९ | १५९७५ | २०७६७५ |
| | | १६०मे. टन | | २४४९७५० | | २४५८८० | | २५५७०७५ |

तुलनात्मदृष्ट्या सर्वात कमी असलेली दराची निविदा ट्रायडन्ट लिमिटेड जळगांव यांचे दर पत्रकास मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाच्या विविध बांधकामाकरिता आवश्यक असलेल्या १६० मे. टन लोखंड खरेदीच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या फेर निविदानुसार तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर असलेल्या मे. ड्रायडंट स्टिल ली. जळगांव यांचे खालील दर्शविलेल्या कमी दराच्या (दरपत्रकातील नमूद केलेल्या अटीसह) अनुक्रमांक १ ते ४ दर पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | व्याज | वजन | टायडन्ट स्टल लि. | |
|---|---|---|---|---|
| | | | दर | रक्कम |
| १) | ६ एम.एम. | ७ मे. टन | १६३५० | १०७४५० |
| २) | ८ एम.एम. | २४ मे. टन | १५८०० | ३७२२०० |
| ३) | १० एम.एम. | २२ मे. टन | १५२७५ | ३६६०५० |
| ४) | १२ एम.एम. | ३६ मे. टन | १५२०० | ५४७२०० |
| ५) | १६ एम.एम. | २२ मे. टन | १५२०० | ५४७२०० |
| ६) | २० एम.एम. | २२ मे. टन | १५२०० | ३३४४०० |
| ७) | २५ एम.एम. | १३ मे. टन | १५२५० | १९८५५० |
| | | १६०मे. टन | | २४४९७५० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६६/२३ :**

श्रीमती मेहरुन्नीसा बेगम, सह शिक्षिका के. प्रा. शाळा मोतीकारंजा यांच्या दि. ०९-०२-१९८१ ते ३०-११-१९८५ सेवाकाळातील खंड हे तांत्रिक खंड समजून त्यांना देय अनुज्ञेय रजा मंजूर करून नियमित करण्यांस मान्यता देण्यास हरकत नाही.

**संवाद :**

**डॉ. विजयकुमार मेहेर, डॉ. भागवत कराड :** प्रस्तावित शिक्षिकेच्या सेवा काळखंड का पडला याविषयीची प्रस्तावात नमूद केलेला खंड योग्य आहे की अयोग्य आहे या बाबतही प्रस्तावात खुलासा नाही याबाबत स्पष्ट खुलासा व्हावा.

**उप आयुक्त-२ :** मनपा प्रशासनाने शिक्षिकांची तात्पपुरती नेमणूक केली होती, यश शिक्षिकांना शैक्षणिक वर्षातील सुट्टीतील कालावधीत सेवेत खंड दिला जात होता. अशा प्रकारच्या ३० शिक्षकांच्या तात्पुरत्या नेमणूका प्रशासनाने केल्या होत्या यापैकी ४ शिक्षकांचा सेवाकाळ शासनाच्या निर्णयाच्या मनपा प्रशासनाने नियमित केलेला आहे.

**लेखाधिकारी-२ :** शासनाच्या धोरणानुसार राज्य निवडक मंडळाची नेमणूक करण्यांत आल्यानंतर राज्य निवडक मंडळातर्फे कर्मचाऱ्यांची भरती केली जात होती. मनपा प्रशासनाने शैक्षणिक सुट्टीचा कालावधी वजा करून ११ महिण्यांच्या कालावधीकरिता शिक्षकांस नेमणूकीचे आदेश देण्यांत येत असत. अशा शिक्षकांच्या बाबतीत त्यांची सेवा नियमित करण्याबाबत शासनाने जे आदेश निर्गमित केले आहे, त्या शासन आदेशाप्रमाणे शिक्षकांचा खंडित सेवाकाळ नियमित करण्यांबाबत प्रस्ताव सभागृहासमोर आलेला आहे. शासनांच्या आदेशानुसार सभागृहाने खंडित सेवाकाळ नियिमत करण्यांस मंजुरी दिल्यास संबंधित शिक्षकांस दरमहा अंदाजे रु. ७०० ते ८०० या प्रमाणे वेतनातील फरक द्यावा लागेल. व त्यानुसार मनपावर आर्थिक भार पडेल.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** प्रस्तावित शिक्षकास प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे खंडीत असलेला सेवाकाळ नियमित केल्यानंतर या काळातील वेतन देण्यांत येणार नसेल तर व तशा प्रकारची लेखी संमती संबंधित शिक्षकाने दिल्यानंतर संबंधित शिखकांचा खंडीत सेवाकाळ नियमित करून नियमित करून देण्यास मंजुरी देण्यास हरकत नसावी. याशिवाय सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे खंडीत सेवाकाळ असलेल्या शिक्षकांची अशी आणखी किती प्रकरणे आहेत, ती सर्व प्रकरणे एकाच वेळी प्रशासनातर्फे सादर का करण्यात आली नाही, याचा खुलासा व्हावा.

**लेखाधिकारी-२ :** लेखाधिकारी-२ यांनी सामान्य प्रशासन विभागांकडील शासन निर्णय क्र. डब्ल्यु.पीटी-२४८९/प्र.के./२६४/८९/१३-अ दिनांक २६ जुलै,१९९० सभागृहासमोर वाचून दाखविला.

**मा. सभापती :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णयानुसार प्रस्तावित सेवाकाळ नियमित करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच उप आयुक्त-२ यांनी स.स. यांच्या सुचनेनुसार अशी आणखी किती प्रकरणे आहेत, याचा अभ्यास करून ती सर्व प्रकरणे आगामी सभेत सभागृहासमोर ठेवण्यांची कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र. प्रा. शाळा मोतीकारंजा येथील सह शिक्षिका श्रीमती मेहरुन्नीसा बेगम यांच्या सेवाकाळातील दि. ०९-०२-१९८१ ते ३०-११-१९८५ पर्यंतच्या खंडीत सेवाकाळ सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णयानुसार तांत्रिक खंड समजून श्रीमती मेहरुन्नीसा बेगम यांना देय असलेली अनुज्ञेय रजा मंजूर करून नियमित करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६७/२४ :**

जकात अधिक्षक महानगरपालिका, औरंगाबाद यांनी जकात नियम १९८४ चे कलम २५,२७,२८ अन्वये प्रस्ताव सादर करीत आहे की, सोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे चालू खातेदार ज्यामध्ये व्यावसायिक व व्यवसाय करणाऱ्या कंपन्या आणि त्यांच्या नावांसमोर रकाना क्रमांक ४ मध्ये दर्शविलेली रक्कम यापूर्वी महानगरपालिका फंडात बिनव्याजी अनामत स्वरुपात ठेवण्याची मंजुरी दिली होती, परंतु कंपन्याची दिवसे दिवस वाढत असलेली उलाढाल लक्षात धेता ती रक्कम अपुरी वाटते. करिता २५ चालू खातेधारकांची सोबत जोडलेली यादीनुसार त्यांच्या नांवासमोर रकाना क्र. ६ मध्ये दर्शविलेली वाढीव बिनव्याजी अनामत रक्कम महानगरपालिका फंडात जमा करून घेण्यासाठी व त्याचे चालू खाते पूर्ववत चालू ठेवणे.

**जकात चालू खातेदाराकडून प्रस्तावित केलेल्या अनामत रक्कमे बाबतचा तक्ता :**

| अ. क्र. | चालू खातेदाराचे नांव | जकात करापोटी मोसिक भरणा रक्कम रुपये | सध्या घेतलेली अनामत रक्कम रुपये | प्रस्तावित एकूण अनामत रक्कम रुपये | वाढीव अनामत रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १) | वेलवर्थ एजन्सीज | १५,८३०=९३ | ४०,०००=०० | ५०,०००=०० | १०,०००=०० | |
| २) | मेडोसीना सेल्स फार्मा | ६९३=३९ | १५,०००=०० | २५,०००=०० | १०,०००=०० | |
| ३) | इप्युरिक फार्मा | १,७६२=३९ | १०,०००=०० | २०,०००=०० | १०,०००=०० | |
| ४) | सारडा इंटरप्राईजेस | २५,५२७=०० | २०,०००=०० | ३०,०००=०० | १०,०००=०० | |
| ५) | सिल्वर लाईट निर्लेप | ५३४०६=९३ | १५,०००=०० | १,१०,०००=०० | ९५,०००=०० | |
| ६) | दैनिक लोकमत (पृथ्वी प्रकाशन) | १,३८,१०९=०० | ४५,०००=०० | ३,००,०००=०० | २,५५,०००=०० | |
| ७) | ॲटोकार्स | ८०,२०६=२९ | ५०,०००=०० | १,६०,०००=०० | १,१०,०००=०० | |
| ८) | देवगिरी टेक्सटाईल मिल | ४१,५९७=०० | ४५,०००=०० | ८५,०००=०० | ४०,०००=०० | |
| ९) | बजाज ॲटो | ४२,२६९=०० | ५०,०००=०० | ८५,०००=०० | ३५,०००=०० | |
| १०) | एम.एस.एस.आय.डी.सी. | ३५,०४६=०० | - | ७०,०००=०० | ७०,०००=०० | |
| ११) | एलोरा स्टील | २,५२,६४३=०० | २,५०,०००=०० | ५,००,०००=०० | २,५०,०००=०० | |
| १२) | महाराष्ट्र डिस्टलरी | १०,३७,४९३=०० | ७,५०,०००=०० | - | - | |
| १३) | बी.डी.ऐ.लि. | ४,५३,२४५=०० | ३,००,०००=०० | ९,००,०००=०० | ६,००,०००=०० | |
| १४) | कार्यकारी अभियंता (एम.एस.इ.बी.) | २,६०,२९४=०० | १,५०,०००=०० | ७,५०,०००=०० | ६,००,०००=०० | |
| १५) | वर्क्स मॅनेजर एम.एस.आर.टी.सी. | - | ५०,०००=०० | १,००,०००=०० | ५०,०००=०० | |
| १६) | इंडियन ऑयल कार्पो (चिकलठाणा एअरपोर्ट) | ११,१७०=०० | १५,०००=०० | ३०,०००=०० | १५,०००=०० | |
| १७) | इंडियन ऑयल कार्पो | १,२६,८३३=०० | २,१४,५००=०० | - | - | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (रेल्वे स्टेशन) | | | | | |
| १८) | हिंदुस्थान पेट्रोलियम | ५४,३६७=०० | ५०,०००=०० | १,१०,०००=०० | ६०,०००=०० | |
| १९) | हिंदुस्थान पेट्रोलियम (गॅस) | ३१,३४७=०० | ४३,०००=०० | ७०,०००=०० | २०,०००=०० | |
| २०) | भारत पेट्रोलियम | १८,४२७=०० | ५,०००=०० | ४०,०००=०० | ३५,०००=०० | |
| २१) | आय.बी.पी.कं.लि. | ५८,९५८=०० | २०,०००=०० | १,२०,०००=०० | १,००,०००=०० | |
| २२) | टायटन वॉचेस | ६५,००५=०० | २५,०००=०० | १,३०,०००=०० | १,०५,०००=०० | |
| २३) | टायमेक्स वॉचेस | २३,३३४=०० | २५,०००=०० | ५०,०००=०० | २५,०००=०० | |
| २४) | मेल्ट्रान | २,८६,८६४=०० | ५०,०००=०० | ६,००,०००=०० | ५,५०,०००=०० | |
| २५) | डी.सी.एम.एस.टी.सी. | - | ८०,०००=०० | १,६०,०००=०० | ८०,०००=०० | |
| | | | २३,१७,५००=०० | ४४,९५,०००=०० | ३१,४२,०००=०० | |

**संवाद :**

**डॉ. भागवत कराड, श्री. अ. रशीदखान (मामू) श्री. हमीदउद्दिन ताबा, श्री. मह. मुश्ताक अहमद :** सध्या मोठ्या प्रमाणांत साजरा होणारा दिवाळीसारखा सण लक्षात घेता, शहरात विविध प्रकारचा माल तसेच फटाके याची मोठ्या प्रमाणात (करोडो रुपयाची) आवक होत आहे. ही आवक लक्षात घेता जकात कराची वसुली मात्र अत्यंत अल्प वाटत आहे. प्राप्त माहितीनुसार शहरात आयात होणाऱ्या फटाक्यांचा माल रात्रीच्या वेळी विना जकात शहरात दाखल होत आहे.

**जकात अधिक्षक :** फटाक्यासारख्या ज्वालग्राही माल आयात करण्यांसाठी जिल्हाधिकारी तसेच विविध विभागांकडून परवानगी घेतल्यानंतर माल आयात करण्यांची परवानगी दिली जाते. ही परवानगी लक्षात घेता विना जकात फटाक्याचा माल शहरात येऊ शकत नाही.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** जकात कराचे चालू खाते असल्यामुळे अनेक कंपन्या या गोष्टीचा फायदा घेऊन ३६ नं. चा फार्म नं. ९ भरून आयात केलेला जकात माल बाहेरगांवी गेला असे दाखवून जकात कराचा परतावा घेतात. यामुळे मनपाच्या जकात उत्पन्नावर परिणाम होत आहे. ही बाब लक्षात घेता, जकात कराचे चालू खाते बंद करणे योग्य वाटते अशा प्रकारे जकात कराचे चालू खाते बंद केल्यामुळे मनपाच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल, या बाबींचा विचार करता जकात कराचे चालू असलेले खाते बंद करण्यांत यावे.

**मा. सभापती :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे जकात कराचे चालू खाते बंद केल्यास संबंधिताने अनामत म्हणून दाखल केलेली किती रक्कम संबंधितांना परत करावी लागेल याचा खुलासा लेखाधिकारी यांनी करावा.

**लेखाधिकारी :** सभागृहाच्या सुचनेप्रमाणे जकात कराचे चालू खाते बंद केल्यास अंदाजे २५ ते ३० लाख रुपयांचा परतावा संबंधिताला करावा लागेल.

**सभापती :** सभागृहातील स. सभासदांच्या सूचना विचारात घेता, येत्या १ तारखेपासून जकात कराची प्रस्तावित खाते बंद करण्यांत आल्या बाबत संबंधितांना आवश्यक ती नोटीस देण्यांत यावी. अशा प्रकारे जकात कराचे चालू खाते बंद केल्यामुळे जकात कराच्या उत्पन्नात काय फरक पडतो, याचा आयात जकात अधिक्षक यांनी करावा व त्यानुसार अहवाल द्यावा. जकात कराचे चालू खाते बंद करण्यांबाबत दिलेल्या निर्णयास आजच्याच सभेत स्विकृती

देण्यांत येत आहे. त्यानुसार जकात अधिक्षक यांनी आवश्यक ती वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जकात कराच्या चालू खात्याबाबत अनामत रक्कमेत वाढ न करता अगामी १ तारखेपासून जकात कराबाबत विविध कंपन्याचे चालू असलेले जकात कराचे चालू खाते बंद करण्यांत यावे, असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

त्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती, स्थायी समिती,
औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक ०४-११-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. शनिवार दिनांक ०४-११-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती, श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सतिती सभागृहात सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) मा. श्री. अब्दुल रशिदखान (मामू)
२) मा. श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
३) मा. श्री. डॉ. भागवत कराड
४) मा. श्री. गौतम भागाजी खरात
५) मा. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
६) मा. श्री. बैनाडे कंवरसिंग
७) मा. कु. माया लिंबाजी लाडवाणी
८) मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम
९) मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
१०) मा. श्री. सुदाम सोनवणे
११) मा. श्री. हमीदउद्दिन ताबा

**संवाद :**

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** दिनांक १८-१०-९५ च्या सभेत सिमला येथील महापौरांच्या परिषदे करिता औरंगाबाद महानगरपालिकेचे महापौर आणि कर्मचारी यांना हजर राहात यावे म्हणून सुमारे ३०,०००/- च्या खर्चास सभागृहाने ऐनवेळी मंजुरी दिल्यामुळे ह्या प्रस्तावाविषयी विशेष माहिती घेता आली नाही. मंजूर झालेल्या ऐन वेळच्या ठरावा नुसार मा. महापौरा व्यतिरिक्त महापालिकेचे दोन कर्मचाऱ्यांना विमानाने जाण्याची परवानगी देण्यांत आली आहे. अशा प्रकारे वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे विमानाने प्रवास करण्यांची परवानगी देता येते काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** औरंगाबाद महानगरपालिकेच्या महापौर पदी महिला महापौर असल्यामुळे यांच्या सोबत आवश्यकते नुसार एक महिला कर्मचारी देण्यांत आली आहे.तसेच महापौर परिषदेमध्ये होणाऱ्या निर्णयाची नोंद घेण्यासाठी महापौरांचे स्विय सहाय्यक परिषदेला हजर रहाणे आवश्यक होते, या बाबींचा विचार करून सिमला परिषदेच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे. सभागृहाने सिमाला परिषदे बाबत मंजूर केलेल्या प्रस्तावास महिला कर्मचाऱ्यांऐवजी मा. उप महापौर यांना परिषदेला हजर राहता यावे, अशी सूचना मा. महापौर यांचे स्विय सहाय्यक यांना देण्यांत आली होती, तथापी मा. महापौर यांचे स्विय सहाय्यकांनी त्याप्रमाणे अंमलबजावणी केली नाही. यावर सिमला परिषदेवरून आल्यानंतर सभागृह आवश्यक तो विचार करील.

**श्री. हमीदउदिद्न ताबा :** दिनांक १८-१०-९५ च्या स्थायी समितीने जकात कराचे चालू खाते बंद करण्याबाबत निर्णय घेतल्यानंतर जकात कराचे चालू खाते असलेल्या

कंपनी पैकी एका कंपनीने सभागृहाच्या निर्णयाविरुध्द न्यायालयात दाद मागितली आहे. एका कंपनीने जकात करा बाबत न्यायालयात दाद मागितलेल्या कंपनीचे अनुकरण करण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेता, यानंतर ज्या कंपन्या न्यायालया दाद मागतील त्या विषयी महापालिका प्रशासनाने कोणती कारवाई करण्यांचा निर्णय घेतला आहे याचा खुलासा व्हावा.

**विधी सल्लागार :** स्थायी समितीने जकात कराचे चालू खाते बंद करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, या निर्णयाविरुध्द सिल्वर लाईट निर्लेप वेअर इंडस्ट्रिज या कंपनीने न्यायालयात दावा दाखल केल्यामुळे, या दाव्याचा निकाल लागे पर्यंत जकात कराचे चालू खाते बंद करता येणार नाही.

**मा. सभापती :** सभागृहाने जकात कराचे चालू खाते बंद करण्याचा निर्णय घेतला असला तरी भारत पेट्रोलियम हिंदुस्थान पेट्रोलियम या सारख्या शासकीय कंपन्या आणि शासकीय व निमशासकीय कार्यालया तर्फे चालू असलेले जकात कराचे खाते नियमा प्रमाणे बंद करता येणार नाही. या शिवाय सभागृहाने जकात कराचे चालू खाते बंद करण्याचा निर्णय घेतल्यानंतर काही कंपन्या तर्फे प्रत्यक्ष भेट घेऊन, नियमित व नियमाप्रमाणे चालू असलेली बंद खाते बंद करण्यांत येऊ नये, अशी कंपन्या तर्फे विनंती करण्यांत आली आहे. या विनंतीच्या वेळी या कंपन्यांना दिनांक ०४-११-९५ च्या सभेत यावर विचार करण्यांत येईल, असे सुचविण्यांत आलेले आहे.

**विधी सल्लागार :** जकात कराचे सर्व चालू खाते बंद करण्यांचा निर्णय सभागृहाने घेतलेल्या असला तरी सभागृहाने प्रत्येक कंपनीचे जकात कराचे चालू खाते तपासून ज्या कंपन्याच्या जकात कराच्या चालू खात्यामध्ये कोणत्याही प्रकारचे नियमांचे उल्लघंन होत असल्याचे (डिकॉल्टर) दिसून आल्यास अशा कंपन्याचे जकात कराचे चालू खाते बंद करण्याचा निर्णय घ्यावा असे मला वाटते.

**श्री. गौतम खरात :** सभागृहाने जकात कराचे चालू खाते बंद करण्यांचा निर्णय घेतल्यानंतर या विषयी झालेल्या चर्चेनुसार जकात कराचे चालू बंद केल्यामुळे जकात करात किती वाढ झाली याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** सभागृहाच्या निर्णयानुसार जकात कराचे चालू खाते दिनांक ०१-११-९५ पासून बंद करण्यांत आले आहे. जकात कराचे चालू खाते बंद करून दोनच दिवसांचा कालावधी झालेला आहे. जकात कराचे चालू खाते असलेल्या कंपनीचा माल दररोज आयात होतो असे नाही. या सर्व बाबींचा विचार केला असता, जकात कराचे चालू खाते बंद केल्यामुळे जकात कराच्या उत्पन्नात किती वाढ झाली हे आज सांगणे शक्य नाही.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** महापालिकेच्या ज्या कर्मचाऱ्यांनी घर बांधणीसाठी प्रशासनाकडून कर्ज उचलले आहे, परंतु अशा प्रकारे कर्ज घेऊनही जे कर्मचारी महापालिका निवासस्थानात राहतात, अशा कर्मचाऱ्यांकडून महानगरपालिकेची निवासस्थान रिकामी करून घेण्यात यावी. व कर्जा बाबत कार्यवाही करावी, असा सभागृहाने निर्णय घेतलेला आहे. या निर्णयाबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली, याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** सभागृहाच्या निर्णयानुसार प्रशासनाने संबंधित कर्मचाऱ्यांना नोटीसा दिलेल्या आहे. या नोटीसाच्या उत्तरी कर्मचाऱ्यांनी एक निवेदन दिलेले आहे, हे

निवेदन देत असतांना स. सभासद ही उपस्थित होते. प्रशासनातर्फे कर्मचाऱ्यांना घर खरेदी / घर बांधणी यासाठी कमी रक्कम दिलेली आहे. प्रशासनातर्फे दिलेल्या रक्कमेत आजच्या बाजार भावाप्रमाणे घर खरेदी करणे कर्मचाऱ्यांना शक्य झालेले नाही, या निवदेनाद्वारे कर्मचाऱ्यांनी मार्च पर्यंत मुदत मागितलेली आहे.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** दिनांक १८-१०-९५ च्या सभेत इमारत निरिक्षक, श्री. काकनाटे यांच्या विषयी वॉर्डातील अनेक नागरिकांच्या तक्रारी आहे. या चर्चेच्या वेळी श्री. काकनाटे यांच्या बाबतीती पुढील सभेत माहिती देण्यांत येईल असे सुचित करण्यांत आले होते. तेंव्हा श्री. काकनाटे इमारत निरिक्षक यांच्या विषयी असलेल्या तक्रकारी बाबत प्रशासनाने काय निर्णय घेतला याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** सभागृहाच्या निर्णयानुसार मा. उप आयुक्त-१ हे या प्रकारणी कार्यवाही करीत आहे. इमारत निरिक्षक श्री. काकनाटे यांची या विभागातून उप आयुक्त बदली करतील, प्राप्त माहितीनुसार इमारत निरिक्षक, श्री. काकनाटे सध्या रजेवर आहे. या बाबत प्रशासनातर्फे इमारत निरिक्षक, श्री. काकनाटे यांना कारणे दाखवा नोटीस देण्यांत आली आहे.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** शहराच्या विविध भागात महापालिकेचे काम करणाऱ्या गुत्ततेदारांना प्रशासनातर्फे कामा बाबत दंड लावण्यात येतो. लावण्यात येणारा दंड हा योग्य आहे का? या बाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** स. सभासदांने सुचविल्याप्रमाणे शहराच्या विविध भागात काम करणाऱ्या गुत्तेदारांना कामाबाबत प्रशासनातर्फे लावण्यात येणाऱ्या दंडाविषयी गुत्तेदारांतर्फे निवेदन देण्यात आलेले आहे. या निविदनात गुत्तेदारांनी प्रशासना तर्फे लोखंड/सिमेंट वेळेवर मिळत नसल्याचा खुलासा केला आहे. गुत्तेदारांना आकारण्यात येणाऱ्या दंडा बाबत प्रशासनाने खुलासा करावा.

**मुख्य लेखा परिक्षक :** बी-१ निविदेच्या नियम व शर्तीनुसार मुळ कामांच्या २% अनामत रक्कमे इतका गुत्तेदारास दंड लावता येतो. अशा प्रकारे दंड लाऊनही प्रकरणे तपासणीसाठी आली असता, अशा प्रकरणात पहाणी करून नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

**श्री. अ. रशिदखान (मामू) :**दि. १८-१०-९५ च्या सभेत रुग्णांना चुकीची औषधी दिल्यामुळे आलेल्या रिॲक्शन बाबत आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पुढील सभेत अहवाल द्यावा, अशी सुचना करण्यांत आली होती, त्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** रॉक्सी सिनेमा गृहाच्या बांधकाम प्रकरणी या सिनेमागृहाकडे मालमत्ता कराची थकबाकी असतानाही बांधकाम परवानगी कशी देण्यात आली याबाबतची माहिती पुढील सभेत देण्यांत यावी अशा सूचना सहाय्यक संचालक, नगर रचना यांना देण्यात आल्या होत्या. या सुचनेनुसार मालमत्ता कराची थकबाकी असतांनाही रॉक्सी सिनेमागृह यांना बांधकाम परवानगी कशी दिली या बाबतचा खुलासा सहाय्यक संचालक नगर रचना यांनी करावा.

**सहा. संचालक :** सभागृहाच्या खुलाशाप्रमाणे रॉक्सी सिनेमा गृहाच्या बांधकाम परवानगीची फाईल तपासली. बाधकाम परवानगीसाठी फाईल आल्यानंतर बांधकाम परवानगीसाठी, आवश्यक असलेल्या कागद पत्राच्या त्रुटी बाबत रॉक्सी

सिनेमा यांना पत्रही देण्यात आले आहे. या पत्रात मालमत्ता करा बाबतही खुलासा आहे. या पत्राच्या उत्तरी संबंधीताने रॉक्सी सिनेमा गृहाच्या मालमत्ता करा बाबतचे प्रकरणे न्यायालयात आहे, असा खुलासा केलेला आहे. यादृष्टीने न्यायालयात असलेल्या प्रकरणांबाबत संबंधित संचिका अहवालासाठी विधी सल्लागार यांचेकडे पाठविण्याची नोंद आहे. यानंतर सदर संचिकेस मालमत्ता करा बाबतचे बेबाकी प्रमाणपत्र जोडण्यांत आल्याचे दिसून आले आहे.

**मा. सभापती :** सामान्य नागरिकांना बांधकाम परवानगी प्रकरणांत मालमत्ता कर, पाणीपट्टी या बाबीचे बेबाकी प्रमाणपत्र आल्यानंतर बांधकाम परवानगी दिली जाते, असा नियम असतांनाही रॉक्सी सिनेमा प्रकरणात या नियमाची पूर्तता असतांनाही बांधकाम परवानगी कशी दिली हे कळत नाही.

**मा. उप आयुक्त :** बांधकाम परवानगीच्या उप विधीनुसार मालमत्ता कर, पाणीपट्टी या बाबतचे बेबाकी प्रमाणपत्र असावे अशी नियमात तरतूद आहे. रॉक्सी सिनेमागृह यांना मालमत्ता कराचे बेबाकी प्रमाणपत्र देण्यापूर्वीच बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. रॉक्सी सिनेमागृह यांचीही बांधकाम परवानगी संचिका हाताळणाऱ्या कनिष्ठ अभियंता यांनी सदर बांधकाम परवानगीची टिप्पणी सदर करताना दिशाभूल करणारी टिप्पणी सादर केली आहे. रॉक्सी सिनेमागृह या इमारतीचे मालमत्ता करा बाबतचे प्रकरण न्यायालयात असले तरी या प्रकरणी न्यायालयाचा काहीही आदेश नाही, ही सत्य परिस्थिती आहे. त्यानुसार दि.०२-११-९५ रोजी संबंधित कनिष्ठ अभियंता यांना (३) दिवसाच्या कालावधीत खुलासा करण्या बाबत नोटीस देण्यांत आलेली आहे. या नोटीसीनुसार कालावधीनुसार संबंधितांचा खुलासा प्राप्त होईल.

**श्री. गौतम खरात :** रॉक्सी सिनेमागृहाच्या बांधकाम परवानगी प्रमाणेच सादिया सिनेमा गृहाचे बांधकाम प्रकरणही आहे. याबाबतही खुलासा झालेला नाही तेंव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**सहा. संचालक (नगररचना) :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे सादिया सिनेमागृह येथील बांधकाम प्रकरणाची संचिका सध्या सभागृहात उपलब्ध नाही. या प्रकरणी पुढील सभेत माहिती देण्यात येईल.

**मा. सभापती :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे सादिया सिनेमागृह येथील बांधकाम प्रकरणी सहाय्यक संचालक, नगररचना यांनी पुढील सभेत माहिती द्यावी. आरोग्य अधिकारी सभागृहात उपस्थित झाले आहे. तेंव्हा संबंधित अधिकाऱ्यांनी स. सदस्य, श्री. म. रशिदखान (मामू) यांनी विचारल्याप्रमाणे खुलासा करावा.

**आरोग्य वैधाकीय अधिकारी :** महानगरपालिका प्रशासनाकडे एकूण ११ कंपाऊडंर आहेत हे ११ कंपाडुडर प्रशिक्षित आहेत. २ जागा रिक्त आहेत. सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे चुकीचे औषध दिल्यामुळे रिॲक्शन झाली आहे. रुग्णांची नावे दिली तर या प्रकरणी संबंधीत रुग्णंचे केस पेपर काढून त्या विषयीची माहिती सभागृहाला देता येईल.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** स्थायी समिती सभापती आणि मा. आयुक्त यांच्या शितयुध्द अशा प्रकारच्या बातम्या स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्द झालेल्या आहेत. वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या या बातमी बाबत कृपया खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** मा. आयुक्त आणि सभापती यांच्यात वाद झालेला नाही. मा. आयुक्तांनी वृत्तपत्रात खुलासा केला होता, वृत्तपत्रात केलेल्या स्पष्टीकरणावर सभापती या नात्याने मी खुलासा केलेला आहे.

**श्री. अ. रशिदखान (मामू) श्री. हमीदउद्दिन ताबा :** मा. सभापती आणि मा. आयुक्त किंवा प्रशासन यांच्यात जी काही विचाराची देवाण घेवाण किंवा पत्रव्यवहार होतो, याबाबत स्थायी समितीच्या सभासदांना विश्वासात घेऊन अथवा त्यांच्याशी चर्चा करून मा. सभापतींनी कार्यवाही केली तर स. सभासदांना महापालिके प्रशासनांतर्गत चालू असलेल्या कार्यवाही बाबत जनतेला खुलासा करणे सोईचे होईल.

**मा. सभापती :** स्थायी समितीचा सभापती या नात्याने मी पत्र दिलेले आहे, एखाद्या प्रकरणांत निर्णय घेण्यांची वेळ आली, तर त्याबाबतचा सदर प्रकरण सभागृहात ठेवणे आवश्यक आहे. नियमाप्रमाणे महसूली जमा खर्च व अन्य आवश्यक पत्र व्यवहार याबाबत प्रशासनाकडून आवश्यकत ती माहिती याबाबतचा अहवाल स्थायी समितीचा सभापती या नात्याने दररोज येत असतो. अशा प्रकरणात निर्णय घेण्याची आवश्यकता नसल्यामुळे याबाबत स्थायी समितीच्या सभासदांना माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**श्री. प्रकाश निकाळजे :** दि. १८-१०-९५ च्या सभेत मालमत्ता करा बाबतची रुपये ५ कोटीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत चर्चा झाली होती, या चर्चेनुसार सदर प्रकरणी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा, तसेच शहराच्या विविध भागात असलेले महाराष्ट्र राज्य विघुत मंडळाचे पोल, डी. पी. इत्यादी हलिवण्यां बाबत वारंवार मागणी करूनही आवश्यक ते सहकार्य महापालिका प्रशासनास महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून मिळत नाही. या बाबींचा विचार करता, महापालिका हद्दित असलेल्या महाराष्ट्र राज्य विज मंडळाचे पोल डी. पी. व मंडळाकडे शहरा बाहेरून येणारी विज या सर्व बाबींवर महापालिका प्रशासनास म.रा. वि. मंडळाकडून कर वसूल करता येईल काय? या बाबींचाही विचार होणे आवश्यक आहे.

**विधी सल्लागार :** दि. १८-१०-९५ च्या सभेतील चर्चेनुसार प्रलंबित मालमत्ता करा विषयीच्या प्रकरणांत आवश्यक ती माहिती तयार आहे. सदर माहिती सभासदांना वितरीत करण्यांत येत आहे.

**मा. सभापती :** सभासदांच्या सुचनेप्रमाणे मालमत्ता करा विषयी प्रलंबित असलेल्या प्रकरणी संबंधित विभागाचे झानेचे विभागीय अधिकारी, विधी सल्लागार आणि मा. उप आयुक्त-१ यांनी संयुक्तरित्या न्यायप्रविष्ट प्रकरणांत तडजोड घडवून आणण्या बाबत प्रयत्न करावेत व त्या बाबतचा अहवाल सादर करावा.

तसेच स. सभासदाने म.रा.वि. मंडळाचे पोल, डी. पी. इत्यादी केलेल्या सुचनेविषयी दि. १ नोव्हेंबर १९९५ रोजी आयोजित केलेल्या सुचनेविषयी दि. १ नोव्हेंबर १९९५ रोजी आयोजित केलेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये अतिरिक्त शहर अभियंता व उप अभियंता, (विद्युत) यांना आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहे.

**श्री. प्रकाश निकाळजे :** सभागृहातील चर्चेनुसार मालमत्ता कराविषयीची अनेक प्रकरणे प्रलंबित आहे, मालमत्ता कर लावणे आणि मालमत्ता कर वसूल करणे अशी कामे प्रशासनांच्या विविध अधिकाऱ्यांकडून करून घेतली जातात, प्रलंबित प्रकरणात योग्य तो निर्णय होऊन महापालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढावे, या

दृष्टीने करमूल्य निर्धारण अधिकारी, मा. उप आयुक्त, मा. आयुक्त अशा अधिकाऱ्यांना मालमत्ता कराविषयीची प्रकरणे हाताळण्यासाठी अनुक्रमे रुपये २५००/- रुपये ५०००/- रुपये १ लाख व त्यावरील प्रकरणांत निर्णय घेण्याबाबतचे अधिकार दिल्यास मालमत्ता करा बाबतच्या वसुलीत निश्ति वाढ होईल असे वाटते.

**मा. सभापती :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे विधी सल्लागार यांनी नियमाप्रमाणे असे अधिकार देऊन कमिटी करता येईल काय याबाबत अहवाल द्यावा आणि मालमत्ता कराचे प्रकरणे निकाली काढावे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** शहरात मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या बांधकाम बाबत नागरिक बांधकाम परवानगी घेतात, परंतु बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मालमत्ता कर लागेल या भीतीने किंवा अन्य कारणामुळे बांधकाम पूर्णत्याचे प्रमाणपत्र होत नाही, तेंव्हा प्रशासनातर्फे किती घरांना बांधकाम परवानगी दिली आहे, त्यापैकी किती घरांना अद्याप मालमत्त कराची आकारणी झालेली नाही. अशा इमारती बाबत पहाणी करण्यांत यावी व ज्या इमारतींना मालमत्ता कर लागलेला नाही अशा इमारतींना बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र घेतले नसले तरी मालमत्ता कराची आकारणी करण्यांत यावी, म्हणजे महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल, तेंव्हा संबंधित विभागातर्फे पुढील सभेत किती घरांना बांधकाम परवानगी दिली आहे, किती घरांना अद्याप माल भत्ता कर आकारणी झाली आहे, किती घरांना अद्याप मालमत्ता कर आकारलेला नाही, याबाबतची सविस्तर माहिती पुढील सभेत देण्यात यावी.

**मा. सभापती :** स. सभासदांच्या सूचना योग्य असतात, परंतु सभासदांनी याच सूचना सभेपूर्वी लेखी स्वरुपात दिल्या तर अधिकाऱ्यांना अशा प्रकरणी माहिती देणे सोईस्कर होईल.

सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी स. सभासदांच्या सूचनेप्रमाणे आवश्यक ती माहिती पुढील सभेत द्यावी.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** मालमत्ता करा विषयीची विविध अडचणी बाबत करमूल्य निर्धारण विभागांमध्ये नागरिक आल्यानंतर या विभागाचे कर्मचारी अशा नागरिकांना उपलब्ध होत नसल्याची माहिती मिळालेली आहे. याबाबत माहिती घेतली असता, करमूल्य निर्धारण विभागातील सर्व कर्मचारी अभिलेख विभागत (रेकॉर्ड) काम करित असल्याची माहिती मिळालेली आहे. अशा प्रकारे या विभागाचे सर्व कर्मचारीर सध्या रेकॉर्ड विभागामध्ये काम करित असल्यामुळे मालमत्ता करा विषयी अडचणी घेऊन येणाऱ्या नागरिकांना या विभागात कोणतीही कर्मचारी अथवा अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे त्रास होत आहे. कृपया याबाबत खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त-२ :** मालमत्ता कर आकारणी प्रकरणी तयार करण्यांत आलेल्या अनेक संचिका या तशाच पडून आहेत, अनेक प्रकरणांत नागरिक अथवा कार्यालयीन कामानिमित्त अशा संचिकांची आवश्यकता पडते, अशा वेळी संबंधित संचिका त्वरित उपलब्ध व्हावी म्हणून यापूर्वी तयार करण्यांत आलेल्या विविध संचिकांना पेजिंग करणे, संचिका नंबर देणे याची अद्यावत नोंद ठेवणे या कामासाठी करमूल्य निर्धारण अधिकारी विभागातील कर्मचाऱ्यांना काम दिले आहे. अशा प्रकारे व्यवस्थित नोंद करून ठेवल्यामुळे

पुढील कालावधीत संचिका त्वरित उपलब्ध होणे सोईचे होईल लवकरच हे काम पूर्ण करून घेण्यात येत आहे.

**श्री. गौतम खरात :** प्रशासनांतर्गत अनेक चौकशी समित्यांची नेमणूक करण्यांत आलेली आहे. यापैकी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या कारभारा बाबत नेमलेल्या चौकशी समितीने काय कार्यवाही केली, याची माहिती मिळालेली नाही. माझ्या मते याच चौकशी प्रकरणांत काहीही कार्यवाही होणार नाही असे वाटते.

**मा. सभापती :** चौकशी समिती नेमणे अथवा चौकशी समितीच्या अहवाला प्रमाणे कार्यवाही करणे, ही बाब सभागृहाच्या कक्षेत येत नाही. मा. आयुक्त यांनी चौकशी समितीन नेमलेली आहे. या चौकशी समितीचा अहवाल सर्वसाधारण सभा अथवा स्थायी समिती समोर आल्यानंतर त्यावर विचार करता येईल.

**श्री. प्रकाश निकाळजे :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या कारभारा बाबत चौकशी करण्यात येईल असे वृत्तपत्रात प्रसिध्द झाले म्हणून या बाबत सभागृहात सूचना मांडली आहे.

**मा. उप आयुक्त-१ :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत खरेदी करण्यांत आलेल्या औषधी प्रकरण मा. आयुक्त यांची चौकशी समिती नेमलेली आहे. या चौकशी समितीचा अहवाल दि.२७-१०-९५ रोजी मा. आयुक्त यांच्याकडे सादर करण्यांत आलेला आहे.

**श्री. अ. रशिदखान (मामू) :** सभागृहाच्या ठरावा नुसार औरंगाबाद शहर विकास आराखड्यासाठी स्थायी समितीच्या तीन सदस्यांची या कमिटीवर नेमणूक करण्यात आलेली आहे. नियुक्त केलेल्या या कमिटीत शहरातील वास्तुशास्त्रज्ञ, इमारत बांधकाम करणारे बिल्डर यांच्या असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची या कमिटीवर नियुक्ती करण्यात यावी, अशा प्रकारचे पत्र शासनातर्फे प्राप्त झाले आहे. शासनाच्या या पत्रानुसार वास्तुशास्त्रज्ञ आणि इमारत बांधकाम करणाऱ्या बिल्डर कंपन्यांच्या विविध संस्था शहरात असल्यामुळे कोणत्या सभासदांची नेमणूक करण्यांत येईल या बाबत सभागृहाला माहिती होणे आवश्यक वाटते, या बाबत खुलासा व्हावा.

**सहाय्यक संचालक (नगररचना) :** शासनाकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार वास्तुशास्त्रज्ञ संघटना, इमारत बांधकाम करणाऱ्या बिल्डरची संघटना यांच्यातून प्रत्येक एक सभासद (पदाधिकारी) नेमावा, असे पत्र शासनाकडून प्राप्त झाले आहे. त्या बाबतची संचिका मंजुरीसाठी सादर करण्यांत आलेली आहे.

**विषय क्र. १६८/१ :**

दिनांक ०४-११-१९९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक ०४/१०/१९९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १६९/२ :**

पशुधन विकास अधिकारी महापालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा हद्दितील वेगवेगळ्या ठिकाणचे चामड्याचे गोदाम शहराबाहेर पडेगांव कत्तलखाना परिसरात स्थलांतर करणेकरिता संबंधित व्यावसायिकांना १०x१५ चौ. मी. आकाराचे भूखंड (ज्याची

किंमत रक्कम रुपये ७,०००/- आहे.) देऊन त्यावर ४८.२८ चौ. मी. आकाराचे गोदाम बांधून (बांधकाम अपेक्षित खर्च ९०,०००/- देणार असल्याने या पूर्वीच सर्व संबंधित व्यावसायिकांना कळविण्यात आलेले आहे की, बांधकाम सुरू करण्यापूर्वी एकूण खर्चाच्या (रक्कम रुपये ९७,०००/-) १५ टक्के रक्कम भरावी व गोदामाचा ताबा घेण्यापूर्वी १० टक्के रक्कम याप्रमाणे २५ टक्के रक्कम भरून उर्वरित ७५ टक्के रक्कम एकणू ४० समान हप्त्यात महापालिकेमध्ये भरण्यांत यावी.

परंतु सर्व संबंधितानी लेखी स्वरुपात अर्ज देऊन विनंती केली आहे की, काही अडचणीमुळे ते २५ टक्के रक्कम भरू शकत नसल्याने बांधकाम सुरू करण्यापूर्वी १० टक्के आणि गोदामाचा ताबा घेण्यांपूर्वी ५ टक्के याप्रमाणे एकूण रक्कमेच्या १५ टक्के रक्कम भरून घेऊन उर्वरित ८५ टक्के रक्कम एकूण ४० समान हप्त्यात भरून घ्यावी.

करिता संबंधितांनी गोदामाची रक्कम भरणे करिताची सवलत मिळणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** शहरात एकूण चामड्याचे गोदाम किती आहे, यापैकी किती गोदामाचा धारकांनी पडेगांव येथे गोदामासाठी जाग मिळावी, म्हणून अर्ज केले आहे. अर्जानुसार किती गोदामाची आवश्यकात आहे. तसेच या गोदामाच्या बांधकामासाठी किती खर्च येईल. याचा खुलासा व्हावा.

**पशुधन विकास अधिकारी :** शहरात एकूण १७ गोदामे आहे. यापैकी १४ नविन व ३ जुने असे एकूण १७ गोदाम आहे. महापालिका प्रशासनांतर्फे पडेगांव कत्तलखाना येथे एकूण १२ चामड्याचे गोदाम बांधण्याचा प्रस्ताव आहे. या बांधकामासाठी अंदाजे ९० हजार खर्च येणार आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** प्रस्तावा नमूद केल्याप्रमाणे ८५ टक्के रक्कम समान ४० हप्त्यात वसूल करण्यांविषयी प्रस्तावित केले आहे. अशा प्रकारे ४० हप्त्यात वसूल होणाऱ्या रक्कमेवर महापालिका प्रशासनाने नियमाप्रमाणे व्याजाची आकारणी केली आहे काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** चामड्याच्या दुर्गंधीमुळे शहरातील नागरिकांना होत असलेला त्रास आणि त्याबाबत नागरिकांनी वारवारं केलेली मागणी यानुसार शहरातील चामड्याची गोदामे शहराबाहेबर हलविण्यांत यावे, अशी अनेक नागरिकांची मागणी आहे. ही बाब लक्षात घेऊन विना व्याज गोदाम हस्तांतर करण्यांचा प्रस्ताव ठेवण्यांत आलेला आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** माझ्या सुचनेबाबत सभागृहात खुलासा केला असला तरी अशा प्रकारे ४० समान हप्त्यात ८५ टक्के रक्कम वसूल करण्यांमुळे महापालिका प्रशासंनाचे किती नुकसान होणार आहे याचा कमीत कमी विचार होणे वाटते. अशा प्रकारे होणाऱ्या नुकसानीबाबत जनतेला खुलासा करणे सोईचे होईल.

**मा. सभापती :** प्रस्तुत प्रस्तावात सभागृहाने प्रशासनांचा नफा अथवा तोटा याबाबींचा विचार न करता, नागरिकांचे सार्वजनिक हित लखात घेऊन प्रशासनांतर्फे ठराव ठेवण्यात आलेला आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** नागरिकांचे हित लक्षात प्रशासनांतर्फे केलेल्या कार्यवाहीची जनतेला सुध्दा याबाबत माहिती व्हावी, असा विचार आहे. प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे ८५ टक्के रक्कम समान हप्त्यात भरण्याबाबतची मंजुरी

दिल्यानंतरही गोदामाचा ताबा घेणाऱ्या नागरिकांनी हप्त्याची रक्कम भरली नाही. तर काय करणार? याचा विचार करणे आवश्यक आहे.

**श्री. प्रकाश निकाळजे :** चामड्याच्या गोदामाप्रमाणे शहरात विविध ठिकाणी म्हशींची गोठे आहेत, या म्हशींच्या गोठ्यामुळे त्या परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्याचाही विचार करणे आवश्यक वाटते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका हद्दितील वेगवेगळ्या ठिकाणचे चामड्याचे गोदाम पडेगांव कत्तलखाना परिसरात स्थलांतरीत करण्यासाठी चामड्याच्या व्यावसायिकांना पडेगांव कत्तलखाना येथे १०x१५ चौ. मी. आकाराचे भूखंड आणि त्यावर ४८.२८ चौ. मी. आकाराचे गोदाम बांधून देण्याकरिता येणाऱ्या खर्चापैकी बांधकाम सुरू करण्यापूर्वी १० टक्के आणि बांधकामाचा ताबा घेण्यापूर्वी ५ टक्के याप्रमाणे एकूण रक्कमेच्या १५ टक्के रक्कम भरून उर्वरित ८५ टक्के रक्कम ४० समान हप्त्यात चामडा व्यावसायिकांना भरण्यांची सवलत देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७०/३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जहागिरदार कॉलनी येथे १५० व २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेसाठी रक्कम रुपये ३,३४,७६०/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र. ४७ दि. ५८-०८-९५ नुसार मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार बी-१ नमुन्यांत निविदा सूचना क्रमांक मनपा/लेखा/निविदा/२२/९५ दि.३१-०८-९५ नुसार निविदा मागविल्या असता, एकूण विक्री झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सलीम पटेल | २९.३०% कमी |
| २) | श्री. सलीम अहेमद | १५.८६% कमी |
| ३) | श्री. शेख उमर | १५% कमी |
| ४) | मे. पारस कन्स्ट्रक्शन | १७.१०% कमी |
| ५) | मे. राणा कन्स्ट्रक्शन | १३.५२% कमी |
| ६) | मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | १७.७१% कमी |

यामध्ये सलीम पटेल यांची निविदा ही २९.३०% कमी असून सदरील निविदा धारकांस निविदा देणेस्तव तसेच निविदाधारक श्री. सलीम पटेल यांच्या निविदेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** जहागिरदार कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकण्यांच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदेनुसार संबंधित गुत्तेदार २९.३०% कमी दराने काम करून शकतो काय? तसेच या कमी दराने काम केल्यामुळे संबंधित गुत्तेदार कामाची प्रतवारी (क्वालिटी) योग्य प्रकारे देऊ शकतो काय? याचा खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** ३० टक्के कमी दराने संबंधित गुत्तेदार कामाची प्रतवारी (क्वालिटी) योग्य प्रकारे देणे शक्य नाही.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तावित कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावी.

**विषय क्र. १७१/४ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, मा. उपमहापौर निवास स्थानी फर्निचर साहित्य खरेदीसाठी स्थायी समितीने रुपये १.०० लक्ष खर्चाची मान्यता दिलेली आहे. आज पावेतो रुपये ४९,९२८/- खर्च झाला.

मा. महापौर यांचेकडून रु. ४८,१३९/- मे. शितल हॅण्डलूम व कारपेटचे देयक प्राप्त झाले. सदरील खर्चा त्यांनी माहे मे १९९५ मध्ये निवासस्थानी राहण्यांस आल्यानंतर तातडीची गरज असल्याने गाद्या, चादरी, बेडशिट्स परदे, पेलमेट वगैरे साहित्य खरेदी केले आहे.

करिता रुपये ४८,१३९/- खर्चास कार्योत्तर मान्यता होऊन सदरील सर्व उर्वथ्रत अंदाजपत्रक तरतूद रुपये १,००,०००/- मधून खर्च करण्यांस व देयक पारीत करण्यांस परवानगी व्हावी.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. हमीउद्दिन ताबा, श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** प्रस्तुत प्रस्तावानुसार महापौर बंगल्यासाठी खरेदी करण्यांत आलेले साहित्य स्वीय सहाय्यक यांनी खरेदी केल्याची माहिती मिळाली आहे. खरेदी करण्यांत आलेले साहित्य योग्य आहे काय? याचा खुलासा व्हावा. प्रस्तावात दर्शविलेले साहित्य खरेदीसाठी नियमाप्रमाणे निविदा मागविण्यांत आल्या होत्या काय? मा. महापौरांच्या खर्चाच्या तपशीलाबाबत प्रशासनांकडून माहिती घेतली असता, आतापर्यंत १,१२,०००/- खर्च झालेला आहे. महापौरांसाठी व्हिजीटींग कार्ड तयार करून घेताना स्वीय सहाय्यकांनी स्वतःचे व्हिजीटींग कार्ड तयार करून घेतल्याची माहिती मिळाली आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** प्रस्तुत प्रस्तावातनुसार प्रस्ताव मांडण्याची पध्दत योग्य आहे का? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** मा. महापौर यांच्या बंगल्यासाठी लागणारे विविध प्रकारचे साहित्या यापुढे भांडार अधिखक यांनी नियमाप्रमाणे स्वतः खरेदी करून मा. महापौर बंगल्यासाठी व्यवस्था करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. महापौर यांच्या निवासस्थानासाठी मे. शितल हॅण्डलूम व कारपेटचे यांच्याकडून तातडीच्या स्वरुपात खरेदी करण्यांत आलेल्या गाद्या, चादरी, बेडशिट्स परदे, पेलमेट वगैरेच्या खरेदीसाठी खर्च झालेल्या रक्कम रुपये ४८,९३९/- च्या खर्चास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७२/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्षनगर येथे मंगल कार्यालय बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९३-९४ चे जिल्हा

दरसूचीनुसार रक्कम रुपये २,००,०००/- (दोन लक्ष) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्तांनी दि. ०६-०९-९५ अन्वये मंजुरी देऊन प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी आदेशित केलेले आहे.

सबब सदर कामाचे रक्कम रुपये २,००,०००/- (दोन लक्ष) चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च सन १९९६-९७ मध्ये इतर वाचनालय या लेखा शिर्षामधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्षनगर येथे मंगल कार्यालय बांधण्याच्या कामासाठी रक्कम रुपये २,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरचा कामाचा खर्च सन ९६-९७ च्या अर्थसंकल्पातील इतर वाचनालये या लेखा शिर्षाकातून करण्यांत यावा. तथापी सन १९९६-९७ च्या सुधारित अंदाजपत्रकाच्या वेळी सदर कामासाठी तरतूद उपलब्ध करून देता येईल काय? याचा ही विचार करण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. १७३/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन १९९५-९६ या आर्थिक वर्षाकरिता लागणारे सोडीयम फिटींग खरेदी करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९३-९४ दरसूचीनुसार रक्कम रु.४,१२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील वर्ष सन १९९५-९६ वर्षाच्या सोडीयम खरेदी या शिर्षकातून करण्यांत येईल.

तरी रक्कम रुपये ४,१२,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९५-९६ या आर्थिक वर्षाकरिता लागणारे सोडीयम फिटींग खरेदी करण्याकरिता रक्कम रु.४,१२,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७४/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, महानगरपालिकेचे मुख्य कार्यालयातील नविन बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये मिटींग हॉलसाठी ध्वनीक्षेपणाची व्यवस्था करण्यांसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे दर सूचीनुसार रक्कम रुपये ३,९९,०००/- च्या खर्चाचे अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. सदरचा खर्च सन १९९५-९६ वर्षाच्या सी.ए. बिल्डींग या सदरातून करण्यांत येईल.

तरी रक्कम रुपये ३,९९,०००/- चे अंदाजपत्रकास मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेचे मुख्य कार्यालयांत बांधण्यात आलेल्या नविन इमारतीमध्ये मिटींग हॉलकरिता ध्वनीक्षेपणाची व्यवस्था करण्यांसाठी रक्कम रु. ३,९९,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७५/८ :**

शहरात विविध विभागा पोल रोवण्यांसाठी मे. परवेज इलेक्ट्रीकल्स यांना प्रती पोल १,५००=०० रुपये प्रमाणे मंजुरी मिळालेली आहे. तशीच त्या दरावर खालील एजन्सीज.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ग्लोब इंजिनियरींग वर्क्स, मुंबई (प्रति पोल १,५००/- प्रमाणे ) | २०० पोल | रक्कम ३.०० लक्ष |
| २) | ओ शांती इलेक्ट्रीकल्स, औ. बाद | ३०० पोल | रक्कम ४.५ लक्ष |
| ३) | डॅनिश शांती इलेक्ट्रीकल्स, मुंबई | ३०० पोल | रक्कम ४.५ लक्ष |
| ४) | भारत कंपनी, औरंगाबाद | ३०० पोल | रक्कम ४.५ लक्ष |
| ५) | नेट मार्केटींग औरंगाबाद | १०० पोल | रक्कम १.५ लक्ष |

तरी वरील एजन्सीज प्रति पोल १,५००=०० मंजूर दराप्रमाणे काम देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे. परवेज इलेक्ट्रीकल्स यांना शहराच्या विविध भागात प्रती पोल रुपये १,५००/- याप्रमाणे पोल रोवण्यांसाठी मिळालेल्या मंजुरीनुसार खालील दर्शविलेल्या आणखी पाच (५८ एजन्सीकडून त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या प्रती पोल रुपये १,५००/- या मंजुर दराप्रमाणेच पोल रोवून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ग्लोब इंजिनियरींग वर्क्स, मुंबई (प्रति पोल १,५००/- प्रमाणे ) | २०० पोल | रक्कम ३.०० लक्ष |
| २) | ओ शांती इलेक्ट्रीकल्स, औ. बाद | ३०० पोल | रक्कम ४.५ लक्ष |
| ३) | डॅनिश शांती इलेक्ट्रीकल्स, मुंबई | ३०० पोल | रक्कम ४.५ लक्ष |
| ४) | भारत कंपनी, औरंगाबाद | ३०० पोल | रक्कम ४.५ लक्ष |
| ५) | नेट मार्केटींग औरंगाबाद | १०० पोल | रक्कम १.५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७६/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका हद्दितील सध्याच्या शहागंज भागात जेथे भाजी मार्केट व पूर्वी जेथे आठवडी बाजार भरत असे ती जागा पूर्वी "आतील बाग" या नावाने ओळखली जात असे. सदरील जागा ही महाराजा किशन प्रसाद यांचे मालकीची असून ती जागा राजा रतन गोपाळ सैनचर व इतर यांनी महानगरपालिकेविरुध्द न्यायालयात दावा दाखल केला असून नुकसान भरपाई पोटी रु. १,८०,०००/- व प्रतिमहा रु. १०,०००/- मिळावेत म्हणून विनंती केलेली आहे.

उपरोक्त जागेचे भाडे महानगरपालिकेचे सन १९८० ते ८४ या कालावधीत दिलेले असून त्याबाबतच्या पावत्या उपलब्ध आहेत.

संबंधिताने न्यायालयात अर्ज दाखल केला असून मा. आयुक्त महानगरपालिका यांचेकडे ही अर्ज करून प्रकरण समोपचाराने मिटवून त्यांना जागेचा मोबदला द्यावा अशी विनंती केली आहे. सदरील जागेची कागदपत्रे उपलब्ध होऊ शकली नाहीत.

सबब प्रस्ताव योग्य त्या निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**विधी सल्लागार :** औरंगाबाद शहरात लोक फंड अस्तित्वात होते, त्यावेळी दरमहा रुपये १५०/- याप्रमाणे ९९ वर्षाच्या करारावरती शहागंज भागातील भाजी मार्केट व पूर्वी जेथे आठवडी बाजार भरत होता ही जागा लीजवर घेण्यात आली होती. यानंतर मध्यंतरीच्या काळामध्ये सदर जागा याच भागातील सध्या असलेल्या स्टेट टॉकीज व इतर यांना बिलावाद्वारे विकण्यांत आली आहे या जागेचे सन १९८५ पर्यंत करारनाम्याप्रमाणे भाडे दिलयाच्या पावत्या उपलब्ध आहे. परंतु ९९ पर्यंतच्या करारनाम्याप्रमाणे भाडे दिल्याच्या पावत्या उपलब्ध आहे. परंतु ९९ वर्षाच्या कराराने घेतलेल्या जागेचे लिज डीउ व इतर कोणतेही कागदपत्र उपलब्ध नाही संबधिताने सदर प्रकरणी न्यायालयात नुकसान भरपाई बाबत दावा दाखल केला आहे. अशा प्रकारच्या मोठ्या प्रकरणांत समजोता करता येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रकरणांपैकी विषयी वैधानिक माहिति जाणून घेण्यांच्या दृष्टीने व त्या बाबींचा पूर्ण अभ्यास करण्यांसाठी खालीलप्रमाणे स. सभासद व अधिकारी यांचा समावेश असलेली कमिटी कायम करण्यांत यावी.

| सभासद | | अधिकारी | |
|---|---|---|---|
| १) | स. स. श्री. महादेव सुर्यवंशी | १) | मा. उप. आयुक्त-१ |
| २) | स. स. श्री. अब्दुल रशिदखान (मामू) | २) | सहाय्यक संचालक नगर रचना |
| ३) | स. स. श्री. प्रभाकर विधाते | ३) | विधी सल्लागार |

वरील प्रमाणे नियुक्त केलेल्या उप समितीने प्रस्तावित केलेल्या प्रकरणांबाबत सविस्तर अहवाल १५ दिवसांच्या आत सादर करावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक २२-११-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. बुधवार दिनांक २२-११-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती, श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस समिती सभागृहात सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. अब्दुल रशिदखान (मामू)
२) श्री. सुभाष कच्छवाह
३) श्री. डॉ. भागवत कराड
४) श्री. गौतम भागाजी खरात
५) सौ. रजनी जोशी
६) श्री. प्रकाश निकाळजे
७) श्री. कंवरसिंग बैनाडे
८) श्री. मुश्ताक अहमद
९) कु. माया लाडवाणी
१०) श्री. विजयकुमार मेहेर
११) श्री. प्रभाकर विधाते
१२) श्री. महादेव सुर्यवंशी
१३) सौ. पद्मा शिंदे
१४) मा. श्री. सुदाम सोनवणे
१५) मा. श्री. हमीदउद्दिन ताबा

**संवाद :**

**श्री. प्रभाकर विधाते :** मनपा तर्फे बांधण्यात आलेले समाज मंदिराच्या इमारती यांचा उपयोग कोणत्या कामासाठी केला जातो. यासाठी मनपाने काही भाडे निश्चित केले आहे काय? असल्यास ते भाडे किती याचा खुलासा व्हावा. प्राप्त माहितीनुसार समाज मंदिर भाड्याने देताना जादा रकमेचे भाडे आकारले जाते अशी माहिती मिळाली आहे.

**मा. सभापती :** स. सभासदाने योग्य प्रश्न केला आहे. माझ्या माहितीप्रमाणे समाज मंदिर झ ाोन कार्यालयामार्फत भाड्याने दिले जाते. यासाठी नियमावली ठरवून देण्यात आलेली आहे. तरी पण समाज मंदिर भाड्याने देताना २०० ऐवजी जादा म्हणजेच ४०० रु. भाडे आकारून समाज मंदिर भाड्याने दिले असेल तर त्याबाबतची चौकशी केली जावी. याबाबत उप आयुक्त-१ यांनी पहाणी करावी.

**श्री. गौतम खरात :** मनपा प्रशासनाने शहरातील वाहतूक व्यवस्थेमध्ये सुसूत्रता यावी यादृष्टीने शहर वाहतुक विभागाकरिता आवश्यक असलेली एक व्हॅन या विभागाकडे सुपूर्ती केलेली आहे. यापासून मनपा प्रशासनास किती आर्थिक फायदा होतो आणि त्यासाठी मनपाला किती खर्च आलेले आहे. तसेच या ट्रफिक व्हॅनपासून मनपाला वाहन चालक, इंधन व इतर बाबतीत होणारा

खर्च या रिकव्हरी व्हॅनच्या उत्पन्नातून भागवता येतो काय? याबाबत खुलासा व्हावा.

**श्री. प्रकाश निकाळजे :** मुंबई, पुणे महानगरपालिका क्षेत्रात रिकव्हरी सहाय्याने वाहतुक नियमाचा भंग केलेली वाहने उचल्यानंतर ती वाहने मनपाच्या कार्यालयात ठेवली जातात व अशा प्रकारे रस्त्यावरून उचलून आणलेल्या वाहनांमुळे या महापालिकांना आर्थिक उत्पन्न मिळते. तशा प्रकारचे उत्पन्न औरंगाबाद मनपास मिळते काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** स. सभासदांनी केलेल्या सुचनेबाबत प्रभारी उप अभियंता (यांत्रिकी) यांनी पुढील सभेत सविस्तर माहिती द्यावी.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** गत दोन तीन मिटींगपासून इमारत निरिक्षक श्री. बी. एम. काकनाट यंचे कारभाराबाबत सभागृहात चर्चा होत आहे. या चर्चेनुसार संबधितांवर कार्यवाही करण्यात येईल असा खुलासा प्रशासनाने केलेला आहे. तेंव्हा त्यावर काय कार्यवाही झाली याचा खुलासा करावा. सभागृहातील चर्चेनुसार इमारत निरिक्षक श्री. बी. एम. कानाट यांचा खुलासा मागितला होता. या संबंधाने सादर केलेल्या संचिकेवर मा. उप आयुक्त यांनी इमारत निरिक्षक श्री. काकनाट यांना निलंबित करण्याचे आदेश दिल्याची माहिती मिळाली आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** दि. ०४-११-९५ च्या सभेत झालेल्या चर्चेनुसार शहरात होत असलेल्या इमारत बांधकामासंबंधी संबंधित घरमालक बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र घेत नसल्यामुळे मनपाच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट होते. तेंव्हा अशा किती इमारत आहेत. याबाबत केलेल्या सुचनेवर संबंधित अतिधकाऱ्यांनी पुढील सभेत सविस्तर माहिती द्यावी. असा निर्णय झालेला आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.

**उप आयुक्त-२ :**औरंगाबाद शहरातील राखीव क्षेत्राव्यतिरिक्त असलेल्या भागातील सर्व इमारतींना मनपातर्फे कर लावला जातो. हा कर लावतांना संबंधीत इमारतीचे बांधकाम पूणत्वाचे प्रमाणपत्र असो व नसो या ऐवजी सदर इमारतींचा निवास उपयोगासाठी उपयोग होत असेल तर कर लावण्याची कार्यवाही केली जाते.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** उप आयुक्त-२ यांनी कर लावण्याच्या पध्दतीबाबत खुलासा केला आहे. परंतु ०४-११-९५ च्या सभेत बांधकाम परवानगी दिल्या नंतरही कर न लावलेल्या इमारती किती आहेत. त्यामुळे मनपाचे किती उत्पन्न बुडते याबाबतची माहिती मिळावी अशी मागणी केले होती. सदर माहिती अद्याप मिळाली नाही.

**उप आयुक्त-**२ : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र नसले तरी निवास उपयोगात येणाऱ्या इमारतींना मालमत्ता कराची आकारणी केलेली आहे. अशा प्रकारे मालमत्ता कर आकारणी करतांना मोठ्या इमारतींनाही मालमत्ता कर आकारणी करणे, बाकी असेल तर अशा इमारतही मालमत्ता कर आकारणी केली जाईल.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** उप आयुक्त-२ यांनी एखादी इमारत असेल तर त्या इमारतीसही मालमत्ता कर लावला जाईल असा खुलासा केला असला तरी शहरात अशा अनेक मोठ्यामोठ्या इमारती आहेत, ज्यांना अद्यापपर्यंत मालमत्ता कराची आकारणी झाली नाही. नारेगांव शाळेसमोर पंचवटी इमारतीचे बांधकाम

होऊन ८ ते १० वर्षाचा कालावधी लोटलेला आहे. परंतु या इमारतीस अद्याप पर्यंत मालमत्ता कराची आकारणी केली नाही तेंव्हा अशा अनेक इमारतींना मालमत्ता कर का आकारला नाही याचा खुलासा व्हावा.

**उप आयुक्त-**२ : स. सदस्य यांच्या सुचनेप्रमाणे आवश्यक ती माहिती पुढील सभेत देण्यांत येईल.

**श्री. म. मुश्ताक अहमद :** स. सभासद श्री. महादेव सुर्यवंशी यांनी मनपाच्या आर्थिक उत्पन्नात भर पडावी याबाबत योग्य सूचना केलेली आहे. या सुचनेनुसार शहरातील सर्व इमारतींना मालमत्ता कराची आकारणी होण्याकरिता एक पथक नेमण्यात यावे. या पथकाने शहरातील प्रत्येक घरोघरी जाऊन इमारती पहाणी करून मालमत्ता आकारणी करण्याबाबत संबंधित घरमालकाने अर्ज दिला तर प्रशासनातर्फे मालमत्ता कराची आकारणी केली जाते. ही पध्दत चुकीची आहे. तेंव्हा योग्य तो विचार व्हावा.

**मा. सभापती :** मालमत्ता कराविषयी प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने मा. उप आयुक्त-२, मा. आयुक्त, मा. विधी सल्लागार यांची एक उप समिती कायम करून मालमत्ता कराविषयीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्या विषयी सोपी पध्दत अंमलात आणवी असा निर्णय झालेला आहे. तथापी उप आयुक्त-२ यांनी स. सभासद श्री. महादेव सुर्यवंशी व इतर यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे पहाणी करून मालमत्ता कराची आकारणी करावी.

**विधी सल्लागार :** सभागृहातील चर्चेनुसार मालमत्ता कराची आकारणी करताना दोन गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. मालमत्ता कर आकारणी करताना शहर विकास आराखड्यानुसार बांधण्यात आलेल्या इमारती आणि शहर विका आराखड्यानुसार आरक्षित केलेल्या जागेवर विना परवानगीने बांधण्यात आलेल्या इमारती असे दोन भाग केल्यास यापैकी विकास आराखड्यातील आरक्षित जागेवर विना परवानगीने बांधलेल्या घरांना मालमत्ता कराची आकारणी करावयाची किंवा नाही या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** विधी सल्लागार यांनी मालमत्ता कराची आकारणी करावयाची किंवा नाही या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. आरक्षित जागेवर इमारतीचे बांधकाम झाले आहे. या बाबीला कोण जबाबदार आहे. याचा विचार करता मु. प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे कलम १२८ प्रमाणे मनपा हद्दितील इमारतींना कर लावता येतो अशा प्रकारे मनपातर्फे विना परवानगीने बांधलेल्या इमारतींना मालमत्ता कराची आकारणी केली तरी या इमारती नियमित होतात असा त्याचा अर्थ होत नाही. किंवा याबाबत शासनाचचा अभिप्राय होण्याचीही आवश्यकता नाही हा विषय शासनाचा नाही. विना परवानगी बांधकामांना मालमत्ता कर आकारवयाचा किंवा नाही हा धोरणात्मक निर्णय आहे. धोरणात्मक बाबीवर निर्णय घेण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेस आहे. सुधारित शहर विकास आराखाड्यानुसार आरक्षित केलेल्या विविध आरक्षणांच्या जागा मनपा प्रशासन पुढील २० वर्षानही ताब्यात घेऊ शकत नाही. या सर्व आरक्षित जागा मनपा प्रशासनाने संपादन करावयाच्या ठरविल्यास या संपादनासाठी किमान ८०० कोटी रुपयांचा खर्च येईल. तेव्हा विना परवानगी बांधकामानाही मालमत्ता कराची आकारणी करून यापासून मनपा प्रशासनास उत्पन्न द्यावे, असे मला वाटते.

**श्री. अ. रशिदखान (मामू) :** शासन निर्णयानुसार जेथे वसाहत झाली आहे, अशा जागा वगळून शहर विकास आराखडा तयार करताना आरक्षण करावे असा नियम आहे. औरंगाबाद शहराचा विकास आराखडा तयार करताना याप्रमाणे कार्यवाही झाली का? याचा खुलासा व्हावा. माझ्या माहितीनुसार शासन निर्णय प्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**सहा. संचालक :** शहर विकास आराखडा तयार करताना ज्या ठिकाणी वसाहत झाली आहे. याबाबत शासन निर्णय नसून गाईडलाईन्स दिलेल्या आहेत.

**उप आयुक्त-१ :**इमारत निरिक्षक श्री. बी. एम. काकनाटे यांच्यावर केलेल्या कार्यवाहीची संचिका सभागृहाकडे आली आहे. यावरील तजविज नुसार इमारत निरिक्षक श्री. बी. एम. कानाट यांना निलंबीत करण्याऐवजी त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरू करावी असे आदेश मा. आयुक्तांनी दिली आहे. कृपया सभागृहाच्या माहितीस्तव.

**मा. सभापती :** मनपा कार्यालयातील वरिष्ठ लिपिकांना शासनाच्या आदेशानुसार १२ वर्षाच्या कालावधीनंतर समय श्रेणी देण्याबाबत सभागृहाने मंजुरी दिलेली आहे. या मंजुरीनुसार प्रशासनाने काय कार्यवाही केली याचा खुलासा सहाय्यक आयुक्त-१ यांनी करावा.

**मा. सभापती :** मनपा कार्यालयातील वरिष्ठ लिपिकांना शासनाच्या आदेशानुसार १२ वर्षाच्या कालावधीनंतर समय श्रेणी देण्याबाबत सभागृहाने मंजुरी दिलेली आहे. या मंजुरीनुसा प्रशासनाने काय कार्यवाही केली याचा खुलासा सहाय्यक आयुक्त-१ यांनी करावी.

**मा. मुख्य लेखा परिक्षक :** सभागृहाच्या मंजुरीनुसार मनपा प्रशासनातील वरिष्ठ लिपिकांना १२ वर्षाच्या कालावधीनंतर समयश्रेणी देण्याबाबत प्रकरण मा. आयुक्तांकडे सादर केले असता मा. आयुक्त यांनी सदर प्रकरणी काही मुद्यांबाबत माहिती मागविली होती. त्याबाबत आवश्यक तो खुलासा करून संचिका मंजुरीस्तव सादर केलेला आहे.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** बारुदनागरला येथील नाल्यावर बांधण्यात आलेल्य सुराणा बिल्डींगवर काही मजल्यावर मालमत्ता कराची आकारणी झालेली नाही. मागील लोक प्रतिनिधींच्या कालावधीतही याबाबत चर्चा झालेली नाही. प्राप्त माहितीनुसार सुराणा बिल्डींगच्या मालमत्ता कराबाबतची संचिका व आणखी काही ७०-७५ संचिका कार्यालयातून गायब असल्याचे कळाले आहे. तेंव्हा या इमारतीच्या ज्या मजल्यांना मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली नाही. त्या मजल्यांना मालमत्ता कर आकारणी केली आहे काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम अन्वये अशा प्रकरणात व सर्वसाधारण सभेत उप समिती गठीत करून चौकशी करावी लागेल.

**श्री. गौतम खरात :** सुराणा बिल्डींग प्रमाणे जालना रोड सेंट फ्रान्सीस हायस्कूल समोर मुळे कन्स्ट्रक्शन यांनी बांधलेल्या इमारतीचे दोन मजले विना परवानगी आहेत. तसेच प्रताप नगरमधील इमारतीवरही दोन मजले विना परवानगीने बांधले आहेत. याबाबत खुलासा व्हावा.

**श्री. अ. रशिदखान (मामू) :** औद्योगिक क्षेत्रातील वोखार्ड व यासारख्या विविध कंपन्यांनी कारखान्यात मोठमोठ्या आकारचे शेड बांधलेले आहे. या शेडला मनपातर्फे

मालमत्ता कराची आकारणी केलेली नाही. अशा प्रकारे विना परवानगीने बांधलेल्या इमारतींना मालमत्ता कराची योग्य आकारणी होऊन मनपाच्या उत्पन्नात भर पडण्यांच्या दृष्टीने पुणे मुंबई महापालिकेप्रमाणे मालमत्ता कराची आकारणी योग्य करण्याकरिता वर्ग-१ दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत यावी.

**मा. सभापती :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे मालमत्ता कर आकारणीसाठी वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत घ्यावा लागेल.

**श्री. सुदाम सोनवणे :** मनपा प्रशासनातर्फे विविध कराची वसुली करण्यासाठी नेमण्यात आलेले निरिक्षकांची नियुक्त करतांना या निरिक्षकांची शैक्षणिक क्षमता किंवा शारिरीक पात्रता बघून नेमणूक केली जाते काय? मनपातर्फे कर आकारणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये अपंग कर्मचाऱ्यांकडून हे काम करून घेतले जाते अपंग कर्मचाऱ्यांकडून योग्य प्रमाणात कर वसुलीचे काम होते काय?

**मा. सभापती :** एखाद्या कर्मचाऱ्यांची विशिष्ट कामासाठी नेमणूक करणे, ही बाब प्रशासकीय आहे. तेंव्हा उप आयुक्त-१ यांनी सदर प्रकरणी पहाणी करावी.

**कु. माया लाडवाणी :** मा. महापौरांचे माजी स्वीय सहाय्यक यांनी स. नगरसेवकांचा जो अवमान केला आहे, त्याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली, याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** मा. महापौरांचे माजी स्वीय सहाय्यक यांच्या प्रकरणात मा. मुख्य लेखा परिक्षक यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक झाली आहेख ते या प्रकरणी चौकशी करीत आहेत.

**श्री. हमीउद्दिन ताबा :** सभागृहाने जकात कराचे चाले खाते बंद करण्याबाबत घेतलेल्या निर्णयानुसार अशी खाती बंद केल्यामुळे मनपाच्या जकात उत्पन्नात किती वाढ झाली याचा खुलासा व्हावा.

**जकात अधिक्षक :** सभागृहाच्या निर्णयानुसार जकात कराची चालू खाते बंद केल्या मुळे मे. सारडा इंटरप्राईजेस आणि मे. वेलवर्थ या कंपन्यातर्फे आयात झालेल्या मालावर जकात कराबाबत उत्पन्न वाढल्याचे दिसून आले आहे. इतर कंपन्यांचा मालम विशेष प्रमाणात आयात झाला नसून सभगृहाच्या निर्णयानुसार एक महिन्याचा कालावधी पूर्ण झाल्याशिवाय जकात उत्पन्नात किती वाढ झाली, त्याबाबतची माहिती देता येणार नाही.

**मा. सभापती :** दिल्ली व देशातील इतर भागातील नागरिकांनी औरंगाबाद शहरात आपला कारभार सुरू केला असून या कंपन्यातर्फे काही पत्र प्राप्त झाली आहेत. या पत्रानुसार ज्या कंपनीचे जकात कराचे चालू खात्यात कोणत्याही प्रकारची गडबड नसून, जकात कराच्या चालू खात्याचे नियमितपणे उपयोग केला जात असेल अशा कंपन्यांना जकात कराचे चालू खाते पुन्हा उघडण्याबाबतची परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव जकात अधिक्षक यांनी सभागृहापुढे ठेवावा. हा प्रस्ताव ठेवतांना जकात कराचे चालू खाते सुरू करण्याची परवानगी देताना कंपनी आणि प्रशासन यांच्यात जो करार होतो, तो शासकीय मुद्रांकावर करण्यात यावा. पूर्वीप्रमाणे जकात कराचे चालू खाते सुरू करण्याची परवानगी देतांना साध्या कागदावर करारनामा करण्यात येऊ

नये. तसेच योग्य प्रमाणात अनामत रक्कम ठेव म्हणून ठेवण्यात यावी. अनामत रकमेबाबत मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

**श्री. प्रकाश निकाळजे :** सभागृहातील चर्चेनुसार जकात कराच्या वसुलीबाबत शहरातील ज्वेलर्स असोसिएशन बरोर प्रशासनाची काय चर्चा झाली याचा खुलासा व्हावा.

**जकात अधिक्षक :** सभागृहातील चर्चेनुसार सोने, चांदी वरील जकात करा बाबत शहरातील ज्वेलर्स असोसिएशनशी पत्रव्यवहार चालू आहे.

**श्री. प्रकाश निकाळजे :** जिल्हा परिषदेकडून चार शाळा मनपा प्रशासनाच्या ताब्यात आल्याचा या जि.प. शाळा मनपा प्रशासनाच्या ताब्यात घेताना त्या इमारतीसह ताब्यात घेतल्या आहेत काय यापैकी उस्मानपुरा येथील एका शाळेची पाच एकर काही गुंडे जागा आहे. त्या शाळेच्या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणही झालेले आहे. तंव्हा अशा शाळा ताब्यात घेतांना प्रशासनाने काय कार्यवाही केली.

**श्री. गौतम खरात :** येत्या ८ डिसेंबरला मनपा प्रशासनातर्फे बांधण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटरचे उद्घाटन होण्याची शक्यता आहे. या दृष्टीने उद्घाटनासाठी आवश्यक असलेली कामे करून घेण्याची मंजुरी देण्यात यावी.

**मा. सभापती :** स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या उद्घाटनासाठी आवश्यक कामे करून घेण्यास मंजुरी देण्यात येते.

**श्री. गौतम खरात :** एम.पी.लॉ. कॉलेजच्या बाजूला नव्याने वसलेल्या निराला बाजार येथील दुकानावर मनपाच्या जागेत म्हणजेच फुटपाथवर व्यवसाय करतात. अशा प्रकारे दुकानदारांनी व्यवसाय करीता फुटपाथचा उपयोग केल्यामुळे येथे येणाऱ्या ग्राहकांची वाहने रस्त्यांवर उभी राहतात व रहदारीस अडथळा निमाण होतो. तसेच मनपाच्या जागेचा उपयोग केल्यामुळे मनपाचे आर्थिक उपत्पन्नही बुडते तेंव्हा मनपा या दुकानदारांकडून फुटपाथ वापराबाबत काही कर वसूल करते काय, तेंव्हा याबाबत काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** प्रशासकीय अधिकारी आणि सहा. संचालक नगर रचना यांनी सदर प्रकरणी पहाणी करून कार्यवाही करावी.

**श्री. गौतम खरात :** मनपातर्फे शहराच्या विविध चौकाता ट्राफिक वाहतुक बेटाची व्यवस्था करण्यात आली आहे. या वाहतूक बेटामध्ये वाहतून नियंतत्रण विभागाचे पोलिस बुथ उभा करून काम करतात. अशा बुथबाबत मनपा या विभागाकडून भाडे आकारते काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** मालमत्ता अधिकारी यांनी सदर प्रकरणी पहाणी करून प्रस्ताव द्यावा.

**श्री. हमीदउदिद्दन ताबा :** शहरातील व्यापाऱ्यांनी फोटोग्राफीची मशीन आयात करून आयातीत यावेळी चुकीचे कागदपत्रे दाखवून कमी जकात भरली आहे. ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आल्यानंतर मा. आयुक्तांनी नियमाप्रमाणे १० पट जकात वसूल कनण्याचे आदेश दिले आहेत. असे वृत्त स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहे. त्या बाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**जकात अधिक्षक :** औरंगाबाद शहरात आयात झालेल्या फोटोग्राफीच्या मशिनवरील जकात कर आकारणी प्रकरणी संबंधित मालक हजर होता, जकात विभागाचे

कर्मचारी जकात कर प्रकरणी माहिती घेत आहेत. अशी माहिती बाहेरगांवी असलेल्या व्यापाऱ्याला मिळाल्यानंतर सदरहू व्यापारी यांनी स्वतःहून मा. आयुक्त यांची भेट घेतली व जकात विभागाचे कर्मचारीविषयी चुकीची माहिती देऊन जकात विभाग रक्कम भरून घेत नसल्याचे मा. आयुक्तांना सुचित केले. परंतु सदर प्रकरणी मा. आयुक्त यांना सविस्तर खुलासा करण्यात आला की, आयात झालेली मशीन ही पाच सहा दिवसांपूर्वीच आलेली आहे. मशीन आयात होते वेळी संबंधिताने मशिनच्या खरेदी बाबतचे १२,००,०००/- (बारा लाख) किंमतीचे कागदपत्रे नाक्यावर दाखून जकात भरलेली आहे. वस्तुतः य मशिनची किंमत ३२ लाख आहे. मशीन आयातीवर ४ टक्के या प्रमाणे जकात कर आकारला जातो. संबंधित व्यापाऱ्याचे दाखविलेल्या कागदपत्राप्रमाणे रु. १२ लाख किमंतीवर जकात वसूल करण्यात आली असून, उर्वरित रकमेवर नियमाप्रमाणे जकात कर वसुली करण्याची कार्यवाही चालू आहे.

**मा. सभापती** : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे जकात कर वसुली बाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**विषय क्र. १७७/१ :**

दिनांक ०४-११-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. अब्दुल रशिद (मामू) :** ठराव क्र. १७६ दि. ०४-११-९५ अन्वये शहागंज भाजी मार्केट येथील आठवडी बाजाराच्या लिज प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या उप समितीला काही उर्दू कागदपत्रांची पहाणी करावी लागेल या दृष्टीने उप समितीला अहवाल दाखल करण्यास दिलेल्या मुदतीस आणखी १५ दिवसांचा कालावधी वाढवून देण्यात यावा. तसेच उर्दू कागदपत्रांची योग्य तपासणी होण्याच्या दृष्टीने माजी नगरसेवक श्री. अलफखान यांचा समावेश उप समितीत करण्यांस मंजुरी द्यावी. अशी मी सूचना करतो.

**मा. सभापती :** ठराव क्र. १७६ अन्वये गठीत केलेल्या उप समितीस आपला अहवाल दाखल करण्यास १५ दिवसांची मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच स. सभासद यांनी सुचविल्याप्रमाणे उर्दू कागदपत्राची योग्य छाननी होण्यांच्या दृष्टीने गठीत केलेली उप समिती माजी नगरसेवक श्री. अलफखॉन यांची मदत होऊ शकतात.

**ठराव :**

ठराव क्र. १७६ अन्वये गठीत करण्यांत आलेल्या समितीस अहवाल दाखल करण्यांसाठी १५ दिवसांऐवजी एक महिन्यांची मुदत देण्यांत येते. अशी दुरुस्ती करण्यांसह दि. ०४-११-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १७८/२ :**

एम.एक्स.व्ही १७९ ही ॲम्बेसेटर कार अत्यंत जुनी झालेली असून दुरुस्तीसाठी रुपये ३७,०००/- खर्च येणार आहे. दुरुस्तीसाठी होणारा खर्च आर्थिकदृष्ट्या न परवडणारी असल्यामुळे ही कार निर्लेखित करून या कारच्या जागेवर नवीन मारुती कार खरेदी करण्यांचा प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

मारुती ८०० एस.टी.डी. कार खरेदी करण्यासाठी मारुती उद्योग लि. दिल्ली चे स्थानिक विक्रेते मे. ऑटोमोटीव्ही मॅन्युफॅक्चरर्स लि. औरंगाबाद यांच्या दरपत्रकानुसार खालील प्रमाणे खर्च येतो.

कारचा प्रकार

| मारुती-८०० | सर्वसाधारण दर | डी.जी.एस. ॲण्ड डी. दर |
|---|---|---|
| एस.टी.डी. कार | २,०५,८३५/- | १,८६,४९७/- |

डी.जी.एस. ॲण्ड डी दरासाठी कारचा पुरवठा कालावधी सहा महिण्यांपेक्षा जास्त आहे. तर सर्वसाधारण दरासाठी पुरवठा कालावधी ३० ते ४० दिवसांचा आहे. डी.जी.एस.ॲण्ड डी दराने कार खरेदी केल्यास एमएक्सव्ही १७९ ही कार तूर्त दुरुस्त करावी लागेल त्यासाठी रुपये ३७,०००/- खर्च येईल. तसेच ॲम्बेसेडर कारचे ॲव्हरेज मारुती कारपेक्षा खुपच कमी असल्याने इंधनावरही जास्तीचा खर्च करावा लागेल या सर्व बाबींचा विचार करता सर्वसाधारण दराने रुपये (२,०५,८३५/-) मारुती कार खरेदी करणे योग्य होईल.

नवीन वाहने खरेदीसाठी अंदाजपत्रकीय तरतूद संपलेली आहे. शासकीय अनुदान शिर्षामध्ये रुपये ३० लाखाची तरतूद केलेली आहे. त्या निधीतून या कारसाठी तूर्त रु. २.२५ लाख वळती करून सध्या खर्च भागवणि योग्य राहील. सुधारित अंदाजपत्रकामध्ये शासकीय अनुदानात तरतूद करता येईल.

**संवाद :**

**श्री. अब्दुल रशिद (मामू) :** प्रस्तुत प्रस्तावानुसार बंद असलेल्या गाडीचे मॉडेल कोणत्या वर्षाचे आहे. या वाहनामध्ये कोणकोणती दुरुस्ती करावयाची आहे. तसेच सदर वाहन किती दिवसापासून बंद आहे, याबाबतचा उल्लेख प्रस्तावात नाही. तसेच खरेदी करण्यांत येणारी छोटी व्हॅन घेणे योग्य आहे काय याबाबतचा ही खुलासा प्रस्तावात नाही.

**प्र. उप अभियंता (यांत्रिकी) :** वाहन खरेदी बाबत विचार करतांना सर्व वाहनांचा विचार करून आर्थिक बाब लक्षात घेता, नविन वाहन खरेदीचा प्रस्ताव ठेवलेला आहे. तथापी सभागृहास योग्य वाटत असेल तर इतर प्रकारचे वाहन खरेदी बाबत सभागृह आवश्यक त्या सूचना करू शकतील.

**मा. सभापती :** खरेदी करण्यांत येणाऱ्या वाहनाचा उपयोग व इतर बाबींचा विचार करता मारुती ८०० एस. टी. डी. कार. ऐवजी मारुती व्हॅन खरेदी करण्यांस मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एम.एक्स.व्ही १७९ ही ॲम्बेसेटर कार जुनी झाली असून कारच्या दुरुस्तीसाठी येणारा खर्च आर्थिकदृष्ट्या परवडणारा नसल्यामुळे ही कार निर्लीखित करून त्या ऐवजी मारुती उद्योग लिमिटेड औरंगाबाद यांचेकडून सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मारुती ८०० एस.टी.डी. कार ऐवजी मारोती ओमनी एफआर मारुती व्हॅन खरेदी करण्यांस रक्कम रुपये १,९५,५६०/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७९/३ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, शहराचा वाढता विकास लक्षात घेता आरोग्य व जिव रक्षणासाठी सेवा देण्यांसाठी औरंगाबाद शहरात आरोग्य केंद्रात

लागणारा कर्मचारी वृंद व वैद्यकिय अधिकारी यांची पदे निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे जा.क्र. अस्था-१/९४/३३७० दिनांक ०५-१०-९४ नुसार मंजुरीस्तव पाठविण्यांत आलेला आहे. शासनाकडून पदे निर्मितीची मंजुरी येईपर्यंत खालील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वृंद ठरावीक वेतनावर भरणे जरुरी आहे.

खालील दर्शविलेली पदे तात्पुरती ठराविक वेतनावर भरण्यांस मंजुरी द्यावी.

| | | |
|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | ७ पदे |
| | एम.बी.बी.एस. | यापैकी २ पदे रजेच्या काळात काम करण्यांसाठी म्हणून जरुरी आहे. |
| | बी.ए.एम.एस | |
| २. | मीश्रक (डी. फार्म) | ५ पदे |
| ३. | ए.एन.एम. (दोन वर्षाच्या ए.एन.एम चा कोर्स) | ५ पदे |
| ४. | नोंदणी लिपीक (दहावी पास) | ५ पदे |
| ५. | सेवक (४ थी पास) | ५ पदे |

करिता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** प्रस्तुत प्रस्तावानुसार सन १९७४ मध्ये अरोग्य केंद्राकरिता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यांबाबत जाहिरात देण्यात आली होती. त्यावेळेपासून जे कर्मचारी काम करीत आहे. त्याच कर्मचाऱ्यांना प्रस्तावित आरोग्य केंद्रासाठी नवीन कर्मचाऱ्यांची भरती करणार आहात काय याचा खुलासा व्हावा.

**महादेव सुर्यवंशी :** महानगरपालिकेतर्फे सध्या किती आरोग्य केंद्र कार्यरत आहे. या केंद्रांत किती वैद्यकीय अधिकारी काम करीत आहे. काम करीत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी किती वैद्यकीय अधिकारी कायम आहेत व किती वैद्यकीय अधिकारी ठराविक वेतनावर काम करतात. या वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी स्त्री वैद्यकीय व पुरुष वैद्यकीय अधिकारी किती आहेत. तसेच कर्मचारी भरतीबाबत न्यायालयाच्या आदेशाचे पालन झाले आहे काय? कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये रोस्टरनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अनुसूचित जन जाती, विमुक्त भटक्या जमाती आणि सर्वसाधारण कॅटॅगिरी यामधील किती वैद्यकीय अधिकारी आहे, वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती करतांना रोष्टर पध्दतीचा अवलंब केला जातो काय या सर्व गोष्टींचा खुलासा होणे आवश्यक आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** महापालिका प्रशासनांतर्फे शहरात एकूण १४ आरोग्य केंद्र चालविली जातात, याशिवाय सिडको भागात एक दवाखाना चालविला जातो. प्रस्तुत प्रस्तावाप्रमाणे नविन ३ आरोग्य केंद्र तयार आहेत. शासनाच्या मंजुरीनुसार १० वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा भरलेल्या आहेत. इतर जागेवर पार्ट टाईम वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्त केली आहे. प्रशासनाच्या मंजुरीनुसार शासनाची मंजुरी मिळेपर्यंत ठरावीक मानधनावर नेमणूक करण्यांबाबतचा प्रस्तावित कार्यवाहीचा प्रस्ताव ठेवलेला आहे. या प्रस्तावानुसार नेमणूक करण्यांत येणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवड समितीच्या मंजुरीनुसार नियुक्ती करण्यांत येईल.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** यापूर्वीच्या लोकप्रतिनिधीच्या काळात शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आयुर्वेदिक व होमिओपॅथिक आरोग्य केंद्र सुरू करण्यांस मुंरी मिळालेली आहे. या मंजुरीनुसार प्रशासनाने काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आयुर्वेदिक व होमियोपॅथीक आरोग्य केंद्राची शहरासाठी आवश्यकता आहे. तथापी या प्रस्तावास शासनाची मंजुरी मिळालेली नाही.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आयुर्वेदिक व होमियोपॅथिक आरोग्य केंद्र उघडण्यास मंजुरी मिळालेली आहे. तेंव्हा नविन तीन अरोग्य केंद्रासाठी लागणारा कर्मचारी वर्गाकरिता प्रशासनातर्फे तसा प्रस्ताव ठेवण्यांत आलेला आहे. तसा प्रस्ताव आयुर्वेदिक व होमियोपॅथिक केंद्रासाठी ठेऊन आरोग्य केद्र सुरू करण्यांत यावे हा ही पदे भरण्यांत यावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** प्रस्तुत प्रस्तावातील अनुक्रमांक २ ते ५ पदे अशा पध्दतीने भरली जातील. यासाठी नव्याने उमेदवार घेण्यात येणार आहे काय? किंवा सध्या महापालिका प्रशासनात जे कर्मचारी काम करतात, त्या कर्मचाऱ्यांना प्राधान्य देणार काय? याचा खुलासा व्हावा. याशिवाय सभागृहाने २०० सफाई कामगारांची पदे निर्माण करण्यसांस मंजुरी दिलेली आहे. या पदांनाही शासनाकडून मंजुरी मिळालेली नाही. आज अनेक कर्मचारी रुपये २० ते २८ या दैनिक वेतनावर काम करत आहे. या मंजुरानाही प्रस्तुत प्रस्तावानुसार ठराविक वेतन देता येणार नाही का? यचा विचार करणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** स. सभासदांची सूचना चांगली आहे. याबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी योग्य काळजी घ्यावी. तसेच कर्मचाऱ्यांना ठराविक वेतन देणे ही बाब धोरणात्मक निर्णयाची आहे. चार-पाच कर्मचारी असतील तर अशा कर्मचाऱ्यांना ठरावीक वेतन देता येते, यापेक्षा कर्मचाऱ्यांची संख्या जास्त असेल तर त्या बाबतीत ठरावीक वेतन देतांना सर्व बाबींचा विचार करावा लागतो.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** महापालिकेतर्फे चालविण्यांत येणाऱ्या आरोग्य केंद्रात एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी कार्यरत असूनही उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या कमी असते. याउलट यच भागात खाजगी व्यवसाय करणारी डी.एच.एस.किंवा बी. एम.एस. वैद्यकीय व्यावसायीकांकडे रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. याबाबत अरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** २० वे शतक स्पेर्धेचे शत आहे. अनेक बाबतीत नविन नवीन शोध लागतात, वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करतांना सर्जन/ फिजिशियन अशा प्रकारच्या विविध क्षेत्रातील तज्ञ वैद्यकीयय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** महापालिकेतर्फे कार्यरत असलेल्या विविध आरोग्य केंद्रांना यापूर्वी भेटी दिलेल्या आहेतच. रोषणगेट व नारेगांव येथील आरोग्य केंद्रास नुकतीच भेट दिली असता, योग्य प्रमाणात रुग्ण उपचार घत असल्याचे दिसून येत आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** नारेगां आरोग्य केंद्रात काम करणारे वैद्यकीय अधिकारी रुग्णांना योग्य सेवा देत नाही. आरोग्य केंद्रास आवश्यक औषधी उपलब्ध आहेत. आठ दिवसांपूर्वी नारेगांव भागातील एका मुलास ठेव लागली म्हणून आरोग्य केंद्रांत घेऊन गेली असता मी स्वत: या मुलाला ड्रेसींग केलेली आहे. तेंव्हा नारेगांव आरोग्य केंद्राकरिता वैद्यकीय अधिकारी बदलून देण्यांत यावे.

**मा. सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी पहाणी करून योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** महापालिका प्रशासनाकडे वर्ग-४ मधल्या काम करणा४या कामागरांची प्रतिक्षा यादी आहे. या यादीमध्ये काही १० वी पास उमेदवारही आहे. परंतु प्रशासनाकडे वर्ग-३ च्या उमेदवारांनी यादी नाही. तेंव्हा प्रस्तुत प्रस्तावानुसार कर्मचाऱ्यांची भरती करतांना वर्ग-३ चे कर्मचारी कशा प्रकारे भरले जातील, याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** प्रस्तुत प्रस्तावानुसार आरोग्य केंद्रासाठी आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग भरताना महापालिकेमध्ये काम करणाऱ्या वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यातून भरती करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहराचा वाढता विस्तर लक्षांत घेता, आरोग्य व जीव रक्षण सेवा देण्यांकरिता अरोग्य केंद्रांकरिता लागणरा कर्मचारी वृंद व वैद्यकीय अधिकारी या पदाकरिता शासनाची मंजुरी येईपर्यंत खालील दर्शविलेला कर्मचारी व वैद्यकीय अधिकारी यांची ठराविक वेतनावर तात्पुरती नेमणू करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | ७ पदे |
| | एम.बी.बी.एस. | यापैकी २ पदे रजेच्या काळात काम करण्यांसाठी म्हणून जरुरी आहे. |
| | बी.ए.एम.एस | |
| २. | मीश्रक (डी. फार्म) | ५ पदे |
| ३. | ए.एन.एम. (दोन वर्षाच्या ए.एन.एम चा कोर्स) | ५ पदे |
| ४. | नोंदणी लिपीक (दहावी पास) | ५ पदे |
| ५. | सेवक (४ थी पास) | ५ पदे |

आरोग्य केंद्रासाठी वरील प्रमाणे तात्पुरती नेमणूक करतांना महापालिका कार्यालयात काम करणाऱ्या वर्ग ३ व वर्ग ४ च्या उमेदवारांना प्राधान्याने विचार करण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८०/४ :**

पशुधन विकास अधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या कत्तलखान्यामध्ये काही खाटीक लोक दैनंदिन कत्तली शिवाय जास्तीचे जनावरांची कत्तल करून त्यांचे मास औरंगाबाद शहरा बाहेर निर्यात करतात. त्यासाठी दैनंदिन सेवा व्यतिरिक्त महानगरपालिकेस जास्तीची सेवा उपलब्ध करून द्यावी लागते.

करिता जास्तीचे सेवा द्यावी लागत असल्याने विशेष सेवा शुल्क म्हणून खालील प्रमाणे शुल्क आकारणी करण्यांत यावी.

"अ" मोठी जनावरे (बैल, म्हैस इ.) प्रति जनावर रु. २५/- फक्त

"ब" लहान जनावरे (शेळी, मेंढी इ.) प्रति जनावर रु. ०५/- फक्त

याप्रमाणे विशेष सेवा शुल्क आकारण्यात यावे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** प्रस्तुत प्रस्तावानुसार शहरात मोठे व लहान अशा प्रकारे एकूण किती जनाराची कत्तल होते व त्यापासून महानगरपालिकेस किती सेवा कर उपलब्ध होतो याचा खुलासा व्हावा.

**पशुधन विकास अधिकारी :** दरमहा १५००/१८०० मोठे व ३०००/४००० लहान या प्रमाणे जनवाराची कत्तल होते. या कत्तलीसाठी वार्षिक करारावरती ठेका देण्यांत आलेला आहे. तथापी शहराबाहेर होत असलेल्या जनावरांच्या कत्तलीचा विचार करून सेवा कर वाढी बाबतचा प्रस्ताव प्रस्तुत प्रस्ताव सभागृहापुढे मांडण्यांत आलेला आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** नियमाप्रमाणे जनवरांची कत्तल करण्यांस रुपये १/- या प्रमाणे सेवा कर असतांना रुपये २५/- सो कर वसूल करून जनावरांची कत्तल केली जाते.

**श्री. गौतम खरात :** शहागंज येथील कत्तलखान्या व्यतिरिक्त इतर ठिकाणी किती लहान जनावरांची कत्तल होते याचा खुलासा व्हावा.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** औरंगाबाद शहरात लहान व मोठे जनावराव्यतिरिक्त कोबड्या व इतर पशुपक्ष्यांची मोठ्या प्रमाणात कत्तल होते यावरही नियमाप्रमाणे सेवाकर लावला गेला पाहिजे.

**पशुधन विकास अधिकारी :** जनावरांची कत्तल करण्यापूर्वी शाकीय पशुधन वैद्यकीय अधिकाऱ्यांतर्फे अशा जनावरावर शिक्का मोर्फत केला जाते व त्यानुसार महापालिकेस सेवा कर उपलब्ध होतो.

**मा. सभापती :** स.स. श्री. रशिदखान (मामू) यांचा प्रस्ता योग्य आहे त्यावर विचार व्हावा प्रस्तुत प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या कत्तलखान्यामधील काही खाटीक व्यवसायिक दैनंदिन कत्तलीशिवाय जास्तीच्या जनावराची कत्तल करत असल्यामुळे त्यासाठी महानगरपालिकेस सेवा उपलब्ध करून द्यावी लागेत. म्हणून दैनंदिन कत्तलीशिवाय जास्तीच्या प्रमाणांत कत्तल करण्यांत येणाऱ्या जनावरांकरिता उपलब्ध करून देण्यांत येणाऱ्या सेवेसाठी खालीलप्रमाणे विशेष सेवा शुल्क आकारण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | |
|---|---|
| "अ" मोठी जनावरे (बैल, म्हैस इ.) | प्रति जनावर रु. २५/- फक्त |
| "ब" लहान जनावरे (शेळी, मेंढी इ.) | प्रति जनावर रु. ०५/- फक्त |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८१/५ :**

मा. शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका वाचनालय करिता पुस्तके खरेदी करिता करण्यांकरिता सुट निश्चित करण्यांकरिता सुट देणारी दरपत्रके मागविण्यांत आलीत. वर्षभरात करावयाच्या निरनिराळ्या प्रकारच्या पुस्तके खरेदी वरील सर्वाधिक सुट निश्चित करण्यांत करिता एकूण १० दरपत्रके प्राप्त झालीत. त्यानुसार सर्वाधिक सुट निर्देशित करणारी खालील प्रमाणे दरपत्रके प्राप्त झालीत.

| पुस्तके खरेदी प्रकार | सर्वाधिक शेकडा सुट |
|---|---|
| मराठी (कथा, कादंबरी, ललित) | १५% |
| मराडी (संदर्भीय वाङमयीन) | १५% |
| हिंदी पुस्तके | १५% |
| इंग्रजी पुस्तके | १५% |
| उर्दू पुस्तके | ४०% आणि (२० ते ३३) |

| | |
|---|---|
| मराठी संदर्भिय पुस्तके | १५% |
| हिन्दी | १५% |
| इंग्रजी | २०% |
| उर्दू | १०% |
| शासकीय प्रकाशने | (सुट नाही) |
| दुर्मिळ पुस्तके | (सुट नाही) |
| लॉ बुक्स | १०% |
| क्रमिक पुस्तके | |
| मराठी | ७% |
| हिन्दी | ७% |
| इंग्रजी | २०% |
| उर्दू | ७% |
| बालवाङमय | १५% |
| दिवाळी अंक | १०% |
| मराठी मासिके | १०% |

उपरोक्त दर सर्वाधिक सुट दर्शवितात त्यानुसार खरेदी करण्यांत येईल. तथापी या दराने संबंधिताने मुदतीत पुस्तके न पुरविल्यास दरपत्रकातील क्रमवार त्यानंतर असणा४या दरानुसार पुस्तके खरेदी करण्यांस प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे. सर्वाधिक सुट देण्याऱ्याकडून पुस्तके खरेदी करावयाचा प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. महीदउद्दिन ताबा :** प्रस्तुत प्रस्तावानुसार पुस्तके खरेदी करण्यांसाठी किती दरपत्रके विकली किती दरपत्रके आली याचा बोध होत नाही. प्रस्तुत प्रस्तावानुसार खरेदी करावयाची पुस्तकांची निवड कोणी केली आहे. यासाठी समिती कायम करण्यांत आली होती काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** खरेदी करावयाच्या पुस्तकांचे दर निश्चित केलेल असतात. याबाबत विक्रेत्यांकडून सुट मिळते. त्यानुसार पुस्तके खरेदी करण्यांत येणार आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** महापालिका वाचनालयातील काही पुस्तके चोरीस केली आहे. अशी माहिती मिळाली आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** उप आयुक्त-२ यांनी स. सभासदाच्या सुचनेबाबत पुढील सभेत खुलासा करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका वाचनालय याकरिता वर्षभरात करावयाच्या निरनिराळ्या प्रकारच्या पुस्तके खरेदी करिता प्राप्त झालेल्या दरपत्रकापैकी खालील दर्शविलेल्या प्रमाणे सर्वाधिक सुट देणाऱ्या दरपत्रक धारकांकडून पुस्तके खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| पुस्तके खरेदी प्रकार | सर्वाधिक शेकडा सुट |
|---|---|
| मराठी (कथा, कादंबरी, ललित) | १५% |
| मराडी (संदर्भीय वाङमयीन) | १५% |

| | |
|---|---|
| हिंदी पुस्तके | १५% |
| इंग्रजी पुस्तके | १५% |
| उर्दू पुस्तके | ४०% आणि (२० ते ३३) |
| मराठी संदर्भिय पुस्तके | १५% |
| हिन्दी | १५% |
| इंग्रजी | २०% |
| उर्दू | १०% |
| शासकीय प्रकाशने | (सुट नाही) |
| दुर्मिळ पुस्तके | (सुट नाही) |
| लॉ बुक्स | १०% |
| क्रमिक पुस्तके | |
| मराठी | ७% |
| हिन्दी | ७% |
| इंग्रजी | २०% |
| उर्दू | ७% |
| बालवाङमय | १५% |
| दिवाळी अंक | १०% |
| मराठी मासिके | १०% |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८२/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील नविन बांधण्यात आलेल्या इमारतीचे विद्युतीकरणाच्या कामासाठी व इतर सुविधासाठी सा. बां. खात्याचे दरसूचीनुसार रुपये ४,९९,८००/- चे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदर कामाचे खर्चास मा. आयुक्तांची तसेच स्थायी समितीची विषय क्र. १३८/२२ नुसार ठराव होऊन मान्यता मिळाली होती. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/३२/९५ निविदा विक्रीच्या दि. ०४-११-९५ पर्यंत एकूण पाच (५) निविदा विकल्या गेल्यात व मोहरबंद निविदा स्विकारण्यांचे दि. ०८-११-९५ पावेतो एकूण चार निविदा प्राप्त झाल्यात. त्याचा तुलनात्मक तक्ता केला असता. मे. लुना इलेक्ट्रीकल औरंगाबाद यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराची निविदा असल्याचे त्यांची निविदा स्विकारण्याच्या विचारार्थ टिप्पणी मा. आयुक्तांकडे सादर केली असता, सदर काम १.५% जास्त दराने करून घ्यावयास सुचविल्याप्रमाणे मे. लुना इलेक्ट्रीकल यांनी विचारणा केली असता, त्यांनी १०५% दराने काम करण्यांची सहमती दिली आहे.

तरी सदर कामासाठी मे. लुना इलेक्ट्रीकल औरंगाबाद यांची निविदा व मान्य केलेल्या दरात १०५% जास्त दराने त्यांचेकडून काम करून घेण्यांचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील नविन बांधण्यात आलेल्या इमारतीचे विद्युतीकरणाच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०५% जास्त दराचे गुत्तेदार मे. लुना इलेक्ट्रीकल, औरंगाबाद यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८३/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मोहल्ला भवानीनगर दादाकॉलनी यांना जोडणाऱ्या कल्व्हेटची दुरुस्ती करणेबाबतच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये १,३५,०००/- चे तयार करण्यांत आले असून सदरील कामाचा खर्च सन ९५-९६ च्या रस्ते देखभाल व दुरुस्ती या शिर्षकाखाली करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/मुलेप/नि/२२/९५ दिनांक ३१-०८-९५ ला उपस्थित कंत्राटदारासमक्ष उघडण्यांत आली असता, त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस. ए. नवाब | ९.०३% कमी दराने |
| २) | श्री. सलीम पटेल | ७.५०% कमी दराने |
| ३) | श्री. गुलाम रसूल | ५.००% कमी दराने |

वरील प्राप्त निवदापैकी श्री. एस. ए. नावाब यांच्या निविदापत्रकाचे दर सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.०३% कमी दराने आहेत. तरी सदर कामाच्या रक्कम रुपये १,३५,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम श्री. एस. ए. नावाब यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.०३% कमी दराने करून घेण्यास मान्यता मिळावी.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भवानीनगर व दादाकॉलनी यांना जोडणाऱ्या कल्व्हेटची दुरुस्ती करणेबाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १,३५,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.०३% कमी दराचे गुत्तेदार श्री. ए. नवाब यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८४/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, चौक पॉवर हाऊस ते किलेअर्क रस्ता रुंदीकरणात तोडण्यात आलेल्या घराचे बांधकाम साहित्य उचलण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये ९४,२००/- चे बनविण्यांत आलेले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती सन १९९५-९६ साठी मंजूर तरतूद रक्कम रुपये ३१०.०० लाखामधून करण्यांत येईल. मात्रर या लेखा शिर्षकाखाली तरतूद शिल्लक नसल्यामुळे महानगरपालिकेच्या सुधारित अंदाजपत्रकाच्या वेळेस तरतूद करून घ्यावी लागणार आहे. तरी अशी तरतूद सुधारित अंदाजपत्रकात होईल या आशेवर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चौक पॉवर हाऊस ते किलेअर्क रस्ता रुंदीकरणात तोडण्यात आलेल्या घराचे बांधकाम साहित्य उचलण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ९४,२००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी १९९५-९६ साठी

आसणाऱ्या मंजूर तरतूद रक्कम रुपये ३१०.०० लाखामधून करण्यात येईल मात्र्रा या लेखा शिर्षकाखाली तरतूद शिल्लक नसल्यामुळे महानगरपालिकेच्या सुधारित अंदाजपत्रकाच्या वेळेस तरतूद होईल या आशेवर सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८५/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव केला आहे की, न्यु कुतूबपुरा येथे नवीन खांडकी बसविण्याच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २,९९,५००/- ची सार्वजनिक बांधकाम खात्याचा सन १९९२-९३ च्या दरसूचीरनुसार बनविण्यात आलेले असून सदर कामाचा खर्च हा भांडवली रस्ते १९९५-९६ साठीच्या (२९०.०० लाखापैकी) तरतूदमधून करण्यात येईल. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु कुतूबपुरा येथे नवीन शहाबादी फरशी बसविण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये २,९९,५००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च भांडवली रस्ते ९५-९६ साठीच्या (२९.०० लाखांपैकी) असलेल्या तरतूदी मधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८६/१० :**

एन-७ एफ आयोध्यानगर व एन-१३ सी सेक्टर या भागात नविन जलवाहिनी टाकण्यांच्या कामासाठी रक्कम रुपये १९,६९,८३३/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र. ३७९ दि. २८-०४-१९९५ अन्वये मंजुरी मिळाली होती व त्यानंतर वर्तमान पत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यात एक निविदा प्राप्त होऊन अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ५% जास्त दराची निविदा होती. त्यास स्थायी समितीत दि. ०३-०७-९५ च्या ठराव क्र. ४०/११ द्वारे मान्यता मिळाणेस्तव प्रस्ताव ठेवला असता, पुन्हा दरपत्रके मागविणेबाबत प्रस्तावित केल्यामुळे दुसऱ्या वेळेस वर्तमान पत्रात प्रसिध्दी देवुन निविदा मागविण्यांत आल्या असता, शेवटच्या तारखेपर्यंत एकूण सात निविदा विक्री झाल्या असून दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सलीम पटेल | अंदाजपत्रकाच्या दराने |
| २) | श्री. अब्दुल सलाम | ३% जास्त दराने |

वरील दर पाहता तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकाच्या दराची श्री. सलीम पटेल यांचे दरपत्रक आहे तरी अंदाजपत्रकाचे दर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-७ एफ आयोध्यानगर व एन-१३ सी सेक्टर या भागात नविन जलवाहिनी टाकण्यांच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार श्री. सलीम पटेल यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८७/११ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, किराडपुरा येथील राम मंदिराजवळ १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन १९९४-९५ नुसार रक्कम रुपये २,१५,०००/-

एवढ्याचे तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतूद रक्कम रुपये १५,००,०००/- मधून करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये २,१५,०००/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराडपुरा येथील राम मंदिराजवळ १०० व १५० मी.मी. व्यासाठी ए.सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये २,१५,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च भांडवली कामाची तरतूद रक्कम रुपये १,५०,०००/- मधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८८/१२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिल्कमिल्क कॉलनी येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये १,११,१९६/- एवढ्याचे तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतूद रक्कम रुपये १५,००,०००/- मधून करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये १,११,१९६/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमिल्क कॉलनी येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १,११,१९६/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८९/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, किराडपुरा येथे बंब्याजवळ १५० व १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये १,६५,३००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतूद रक्कम रुपये १,५०,००,०००/- मधून करण्यांत येणार आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराडपुरा येथे बंब्याजवळ १५० व १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १,६५,३००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९०/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, समर्थकृपा को. ऑ. हौ. सोसायटी येथे १५० व १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये १,३३,५२५/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतूद रक्कम रुपये १,५०,००,०००/- मधून करण्यांत येणार आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थकृपा को. ऑ. हौ. सोसायटी येथे १५० व १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १,३३,५२५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९१/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. चिकलठाणा (कामगार कॉलनी) येथे खांडकी पेव्हींग करणे आणि अस्तित्वात असलेली खांडकी रस्ता दुरुस्त करण्यांच्या कामाकरिता अंदाजपत्रकातील रक्कम रुपये २,४९,२०० सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची सन १९९३-९४ प्रमाणे तयार करण्यांत आली असून मा. आयुक्त साहेबांची दि. १९-०९-९५ रोजी प्रशासकीय मान्तया दिली आहे. परंतु मा. सभापती स्थायी समिती यांनी खांडकी ऐवजी शहाबादी फरशी करावी अशी सूचना केली, त्यामुळे अंदाजपत्रकाच्या रक्कमेत बदल झाला आहे. आता शहाबाद फरशी बसविण्यांचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २,३६,४९९/- चे तयार झाले आहे. तसेच

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेचे सन १९९५-९६ चे अर्थसंकल्पात १८ खेडी विकास कार्यक्रम अंतर्गत रस्ते बांधणी कामासाठी ८० लाखाची तरतूद असून त्यामधून हा खर्च करण्यांत येईल. करिता प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. चिकलठाणा (कामगार कॉलनी) येथे खांडकी पेव्हींग करणे आणि अस्तित्वात असलेली खांडकी रस्ता दुरुस्त करण्यांच्या कामासाठी रक्कम रुपये २,४९,२०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. परंतु मा. सभापती यांनी खांडकी ऐवजी शहाबादी फरशी तयार करावी अशी सूचना केल्यानुसार तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये २,२६,४९९/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९२/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, श्रेयनगर येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर व्यायाम शाळेची इमारत बांधणे, या करिता सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९४-९५ च्या दरसूची अन्वये रक्कम रुपये ४,४२,३२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले त्यास. मात्र आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. या अनुषंगाने बी-१ नमुन्यांत निविदा मागविण्याकरिता मुख्य लेखा परिक्षक यांनी पत्र जा.क्र. मनपा/३०/९५/ दि. १९-१०-९५ द्वारे शहरातील दैनिक लोकमत, दैनिक लोकधर्म देवगिरी तरुण भारत, इ. वर्तमान पत्रात प्रसिध्द केले या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण (४) चार प्राप्त झ ाली. सदरील निविदा दि. ०२-११-९७ रोजी मुख्य लेखा परिक्षक यांच्या दालनांत उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले. त्यात दिलेले दराचे तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | एजन्सी | दिलेले दर |
|---|---|---|
| १. | एम. के. तोनगिरे | ११.५१% कमी दराचे दर |
| २. | विपुल कन्स्ट्रक्शन | दर दिलेले नाही. |

सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्ट्या श्री. एम. के. तोनगिरे गुत्तेदार यांचे ११.५१% कमी दराचे दर आहे. सदर खर्च जिल्हा नियोजन विकास योजना अंतर्गत सन १९९५-९६ च्या अनुदानातून करण्यांत येणार आहे. करिता रक्कम रुपये ४,४२,३२५/- चे अंदाजपत्रकीय रक्कमेस व एम. के. तोनगिरे यांचे ११.५१% कमी दराचे दर मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रेयनगर येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर व्यायाम शाळेची इमारत बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ४,४२,३२५/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च जिल्हा नियोजन विकास योजने अंतर्गत सन ९५-९६ च्या अनुदानाधून करण्यांत स व सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.५१% कमी दरचे गुत्तेदार श्री. एम. के. तोनगिरे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९३/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हर्षनगर स्लम पश्चिमेस भिमराव साळवे टेलर यांच्या घराजवळील सार्वजनिक शौचालय दुरुस्त करणे बाबत काम सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये १,४७,३८९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील कामाचा खर्च झोपडपट्टी सुधारणा व देखभाल व दुरुस्ती रुपये १५.०० लाख शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ०७-१०-९५ ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेले अदांजपत्रक रुपये १,४७,३८९/- यास मान्यतेस्तव प्रस्ताव मंजुरी तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. हर्षनगर स्लम पश्चिमेस भिमराव साळवे टेलर यांच्या घराजवळील सार्वजनिक शौचालय दुरुस्त करणे बाबतचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १,४७,३८९/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९४/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. कटकट गेट किराडपुरा येथे बॉक्स टाईप कल्व्हर्ट बांधणेबाबत सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये २,११,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील कामाचा खर्च कल्व्हर्ट व खडी खर्चाचे रु. ४५.०० लाख शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांकडून दि. २५-०९-९५ ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेले अदांजपत्रक रुपये २,११,६००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. कटकट गेट किराडपुरा येथे बॉक्स टाईप कल्व्हर्ट बांधण्यांच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये २,११,६००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९५/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. किराडपुरा स्थळ येथे नविन खांडकी बसविणेबाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रुपये २,८०,०६५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील कामाचा खर्च नवीन खांडकी बसविणे खर्चाचे रु. ३५.०० लाख शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांकडून दि. १५-०९-९५ ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरचा खर्च स्थायी समितीकडे पाठविला असता, मा. सभापतींची शहर अभियंताशी चर्चा करून सदरील खांडकी पेव्हींग ऐवजी २" जाडीची शहाबाद फरशी टाकण्यांचे सुचविल्यावरून सदरील कामाच्या अंदाजपत्रकाची रक्कम रुपये २४,५९०/- ने कमी होत आहे. तरी सदरील कामाचे खांडकी पेव्हींग ऐवजी २" जाडीचे फरशी करणेबाबत कामाच्या नावातील बदलासह अंदाजपत्रक रुपये २,५५,४७५/- च्या अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. किराडपुरा स्थळ येथे नविन खांडकी ऐवजी मा. सभापती यांची शहर अभियंता यांचेशी झालेल्या चर्चेनुसार २" जाडीची शबाहाद फरशी बसविण्यांच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये २,५५,४७५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९६/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मिटमिटा येथील महापालिकेच्या खुल्या जागेवर व्यायाम शाळेची इमारत बांधणेबाबत सार्वजनिक बांधकाम खात्याचे १९९४-९५ च्या दरसूचीअन्वये रुपये ४,४२,३२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले, त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. या अनुषंगाने बी-१ नमुन्यात निविदा मागविण्याकरिता मुख्य लेखा परिक्षक यांनी पत्र जा.क्र. मनपा/३०/९५ दि. १९-१०-९५ द्वारे शहरातील दैनिक लोकमत, लोकधर्म, दवेगिरी तरुण भारत इ. वृत्तपत्रांत प्रसिध्द केली. याद्वारे विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण ४ विकले गेले व स्विकारणेच्या तारखेपर्यंत दर भरून सिलंबद पाकीटात एकूण ३ निविदाप्राप्त झाली. सदरील निविदा दि. २-११-९५ राजी मुख्य लेखा परिक्षक यांचे दालनांत उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आली. त्यात दिलेले दराचे तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सी | दिलेले दर |
|---|---|---|
| १. | सय्यद जमीर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.७ टक्के कमी दराचे दर |
| २. | एम. के. तोडगिरे | ६.१ कमी दराचे |
| ३. | एल.एम. चंचलानी | ५ टक्के कमी दराने |

निविदा पत्रकातत सर्वात कमी तुलनात्मकदृष्ट्या श्री. सय्यद जमिनस गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.७ टक्के कमी दराचे दर आहेत. सदरील कामाचा खर्च स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन ९४-९५ सालाचे शासकीय अनुदानातून करण्यांत येईल. करिता श्री. सय्यद जमीर यांचे ६.७ टक्के कमी दराचे दर व अंदाजपत्रकीय रक्कमेच्या प्रस्तावास मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिटमिटा येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर व्यायाम शाळेची इमारत बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये ४,४२,३२५/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.७% कमी दराचे गुत्तेदार श्री. सय्यद जमीर यांचे दरपत्रकांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९७/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. सुराणानगर येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर सार्वजनिक सभागृह इमारतीच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९४-९५ च्या दरसूची अन्वये रक्कम रुपये ६,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले, त्यास मा. प्रशासक (सदर प्रकरण प्रशासकी यकालावधीतील आहे.) त्यांनी मंजुरी दिली आहे. या अनुषंगाने शहर अभियंता यानी बी-१ नमुन्यात निविदा मागविल्याने पत्र जा.क्र. मनपा/४६६/९४ दि. २५-१०-९४ द्वारे शहरातील दैनिक लोकमत, दै. लोकविजय, दै. मुफ्तसिर इ. वृत्तपत्रांत प्रसिध्द केले. विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण ११ विकल्या व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर भरून सिलंबद पाकीटात दोन निविदा प्राप्त झाली. सदरील निविदा शहर अभियंता मुख्य लेखा परिक्षक व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आली. त्यात दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सी | दिलेले दर |
|---|---|---|
| १. | एस. ए. नवाब | ०.१३ अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराचे |
| २. | सय्यद जमीर स. वजीर | ५% जास्त दरात |

आलेल्या दराचे तपशील सादर करण्यांत आले होते, त्यावर शहर अभियंता यांनी अनुदानाबाबत चौकशी करणे असे नमूद करण्यात आले. त्यावर मा. जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे विनंती करण्यात आली (अनुदानासंबंधी) त्यांचे उलट टपाली सूचना मिळल्या नाही. करिता सदर खर्च महानगरपालिकेच्या फंडातून घेण्यात यावे, असे मुख्य लेखा परिक्षक यांचेकडे सादर करण्यांत आले. त्यावर मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी तजविज केली की, निविदा उघडून ९० दिवसांपेक्षा जास्त कालावधी झाल्याने दर आता बंधनकारक नाही, तूर्त निविदा रद्द करून अनुदान प्राप्त झाल्यावर काम हाती घेणे त्यास मा. प्रशासक यांनी मंजूरी दिली. याद्वारे संबंधी गुत्तेदारास पत्राद्वारे कळवून त्यास निविदा रद्द करून निविदेसोबत भरलेले १% इसार रक्कम परत करण्यात आली.

मा. जिल्हाधिकारी यांनी पत्र जा.क्र. ४२७/९५ दि. ११-०९-९५ द्वारे कळविले की, सन १९९५-९६ च्या स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सुराणानगर येथे सभागृह बांधणे (अनुदान) रक्कम६,००,०००/- कळविले आहे.

करिता याबाबत पुनः निविदा मागविणे, व उघडणे याबाबत बराच कालावधी जाणार आहे. याचा विचार करून वरिष्ठांच्या आदेशान्वये संबंधित गुत्तेदार (नावाब) यास विचारणा करण्यात आली की, आपण मागील दरामध्ये (०.१३% कमी दर) तयार असल्यास लेखी संमती द्यावी. त्यावर श्री. नवाब यांनी लेखी संमती दिली आहे. त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली.

सदर खर्च स्थानिक विकास योजना शासन अनुदान ९४-९५ या तरतूदी प्रमाणे करण्यांत येणार आहे. करिता अंदाजपत्रक रक्कम रुपये ६,००,०००/- व नवाब यांच्या दरास प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. सुराणानगर येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर सार्वजनिक सभागृह इमारतीच्या बांधकामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ६,००,०००/- चे अंदाजपत्रकास व सदर खर्च सन १९९४-९५ च्या स्थानिक विकास योजना शासन अनुदानातील तरतूदीमधून करण्यांस तसेच सदर काम गुत्तेदार श्री. एस. ए. नवाब यांचे ०.१३% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९८/२२ :**

कार्यकारी अभियंता जलनिःसारण विभाग प्रस्ताव सादर करीत आहे की, जलनिःसारण- विभागांतर्फे मोहल्ला महेशनगर येथे ड्रेनेज नाईन टाकणेकरिता अंदाजपत्रक रु. १,८०,४६०/- चे तयार करण्यांत येऊन त्यास २२-०८-९२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असता, रितसर निविदा मागवून ठेकेदार नेमुन ठेकेदार यांना २ टक्के अनामत रक्कम भरावे म्हणून सूचना दिली असता, ठेकेदार यांनी अनामत रक्कम भरली नाही.

या ठिकाणी ड्रेनेज लाईनच्या जागेबद्दल वाद निर्माण झाल्याने जागा संपादनासाठी विशेष भू संपादन अधिकारी यांच्याकडे प्रकरण वर्ग करण्यांत आले असता. आजत्यागत प्रकरण प्रलंबित आहे. या ठिकाणी ड्रेनेज प्रास असल्याने या ठिकाणचे प्लॉट क्र. ५ चे रहिवाशी यांनी त्यांच्या जागेतून ड्रेनेज लाईन टाकण्यांस सहमती दिली असता, या ठिकाणी मुह अंदाजपत्रकात बदल होत असल्याने व ड्रेनेज लाईन जास्त लांबीपर्यंत टाकावी लागत असल्याने सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये २,८०,७९७=०० चे तयार करण्यात आले आहे. करिता.

१) वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम २,८०,७९७=००- ८९४८०=००, ९१,३९७=०० ला मंजूरी देण्यात यावी.
२) अंदाजपत्रक दुरुस्त करण्यांत आल्याने व ठेकेदार यांनी २ टक्के अनामत रक्कम न भरल्याने ठेकेदार सईदखान यांची निविदा रद्द करून फेर निविदा काढणे योग्य.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.महेशनगर येथे ड्रेनेज नाईन टाकण्यांच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या वाढीव रक्कम रुपये २,८०,७९७=००- ८९४८०=००, ९१,३९७=०० चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी अंदाजपत्रक दुरुस्त करण्यात आल्याने व ठेकेदार यांनी २ टक्के अनामत रक्कम न भरल्याने ठेकेदार श्री. सईद खान यांची निविदा रद्द करून फेर निविदा मागविण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९९/२३ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, दिनांक २४ व २५ नोव्हेंबर, १९९५ रोजी औरंगाबाद येथे नेत्र तज्ञाची कॉन्फरन्स होणार आहे. या कॉन्फरन्सच्या अध्यक्षांनी दिनांक ०१-११-९५ चे पत्रानुसार दिनांक २४ व २५ नोव्हेंबर ९५ रोजी होणाऱ्या कॉन्फरन्समध्ये वैद्यानिक चर्चा सत्रासाठी रुपये १०,०००/- इतकी मदत देणेसाठी विनंती

केली आहे. त्याअनुसार नेत्र तज्ञांच्या कॉन्फरन्ससाठी (एम.ओ.एफ. कॉन्फरन्स) रुपये १०,०००/- ची मदत देणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. २४ व २५ नाव्हेंबर ९५ रोजी औरंगाबाद येथे नेत्र तज्ञाची कॉन्फरन्स होणार असल्याबाबत कॉन्फरन्सच्या अध्यक्षांनी पत्रानुसार कॉन्फरन्समध्ये होणाऱ्या चर्चासत्रासाठी रक्कम रुपये १०,०००/- आर्थिक मदत देणेसाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२००/२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, एकनाथ नगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करणेबाबत अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सन १९९४-९५ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रुपये १,८९,५००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सदरील कामाचे अंदाजपत्रकास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर. मान्यता झाल्यास सदरचा खर्च भांडवली रस्ते १९९५-९६ या शिर्षकातून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकनाथ नगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरणाचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १,८९,५००=०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०१/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेचे गरवारे क्रिडा संकूल येथे ४०० मीटर रनिंग ट्रक (धावपट्टी) तयार करावयाची असून सदरील कामाचे अंदाजपत्रक वास्तुतज्ञ श्री. राजीव कुलकर्णी यांचेकडून घेण्यात आले. सदरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,०२,६००=०० रुपये असून अंदाजपत्रक स्थायी समितीचे मंजुरीस्तव सादर. मान्यता झाल्यास सदरचा खर्च शासनाचे १० कोटीचे अनुदानातून क्रीडा संकूलनासाठी ठेवलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेचे गरवारे क्रिडा संकूल येथे ४०० मीटर रनिंग ट्रक (धावपट्टी) तयार कराण्याचे कामासाठी श्री. राजीव कुलकर्णी वास्तुतज्ञ यांचेकडून घेण्यात आलेल्या रक्कम रुपये २,०२,६००=०० चे अंदाजत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०२/२६ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी (महापौर चषक) या नावाने विविध खेळाचे (कबड्डी, खो-खो, कुस्ती व जिमन्यास्टीक) स्पर्धेचे आयोजन करण्यांकरिता रक्कम रुपये १०,००,०००/- ची तरतूद करण्यांत आली आहे.

पैकी अखिल भारतीय स्तरावरील औद्योगिक खुल्या गटाच्या पुरुष कबड्डी स्पर्धाचे अयोजन दि. २८ ते ३१ डिसेंबर ९५ या कालावधीत स्पर्धा घेण्यांचे निश्चित झाले आहे. यासाठी अपेक्षित अंदाजे खर्च (कबड्डीसाठी) रक्कम रुपये २,००,०००/- येणार आहे. सविस्तर विवरण खालीलप्रमाणे आहे.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सामाना मान्यता शुल्क, कॅपिटेशन शुल्क रॉयलिटी-२६,८८६= प्रवास खर्च, संघ व सामनाधिकारी, ५४,८००=०० प्रवास खर्च ५०००=०० मानधन- संघ, परिक्षक, निरिक्षक- ५०,०००=०० बक्षीसे रोख रक्कम, मेडल्स, महापौर करंडक २६,५००=००+५०००=०० +१०,०००=०० निवास व्यवस्था ८०००=०० इतर खर्च रुपये ५,०००=०० मंड, लाऊडस्पीकर व क्रिडांगण - स्वतंत्र खर्च.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी आयोजित "महापौर" चषक या नावाने विविध खेळाचे (कबड्डी, खो-खो, कुस्ती व जिमन्यास्टीक) स्पर्धेचे आयोजन करण्यांकरिता रक्कम रुपये २,००,०००/- चे खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०३/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रशासकीय टप्पा-२ बांधकासाठी रक्कम रुपये ७१,१८,०००/- अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. सदर प्रशासकीय इमारत चालू बांधकामा दरम्यान ऐनवेळी घेण्यात आलेल्याकाही निर्णयामुळे व तद्अनुषंगाने उद्भवलेल्या अतिरिक्त (वाढीव) कामामुळे व अतिरिक्त बाबींमुळे सदरील कामाच्या वाढीव खर्चाचे (अतिरिक्त बाबींसह) सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये ८७,३०,०००=०० तयार करण्यात आले आहे. सदरील सुधारित अंदाजपत्रक व अतिरिक्त बाबींचे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

सदरील सुधारित अंदाजपत्रकातील वाढीव खर्चाचा तपशील पुढे यादीप्रमाणे.

१) इमारत तळमजला (वाहनतळ) खोदकाम व वाहतूक खर्च
२) इमारतीचे दक्षिण व पूर्व आणि पश्चिमेकडील ८ फुटी उंचीची संरक्षक भिंत.
३) वाहन तळ पूर्वेकडील लोखंडी दरवाजा
४) पाणी साठविण्यासाठी (पंप) हौद.
५) वाहन तळासाठी लोखंडी जाळीसह स्टॉर्म ड्रेन
६) दूरध्वनी निमंत्रण कक्ष बांधकाम
७) इमारतीची ज.नि. व्यवस्थेची कामे.
८) लेखा विभागासाठी आर.सी.सी. स्ट्राँग रुम
९) इमारतीचे दर्शनी बाजूला, प्रत्येक मजलयावरील फ्लॉवर बेड.
१०) लेखा विभागातील रोखपाल कक्ष व खिडकी.
११) मुळ अंदाजपत्रका व्यतिरिक्त दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील आठ प्रसाधनगृह
१२) सर्वसाधारण सभागृहासाठी अकॉस्टीक ट्रीटमेंट
१३) पत्रकार कक्षाचे बांधकाम
१४) मुळ अंदाजपत्रका व्यतिरिक्त (१.५ मो. साध्या पोटमाळ्याऐवजी) सुसज्ज प्रेषक/ पत्रकार गॅलरी.
१५) इमारतीचे गच्ची (टेरेस) साठी गळती प्रतिबंधात्मक उपाययोजना

१६) दर्शनी सौंदर्य वृध्दीकरण साठी छताजवळ आर.सी.सी. पडदी (फॅब ड्रेन)
१७) दर्शनी सौंदर्यीकरण साठी दोलपुरी दगड बसविणे.
१८) सभागृहातील गोल स्तंभास हेरीटेज ट्रीटमेंट
१९) इमारतीचा कोस काढून टाकल्यामुळे वाढीव क्षेत्राचे बांधकामासाठी आलेला खर्च

वरील प्रमाणे वाढीव खर्चासाठी ज्या बाबीमुळ अंदाजपत्रकात समाविष्ट नव्हत्या, त्याकरिता अंदाजपत्रकात अतिरिक्त बाब सदराखाली पुढील बाबींचा समावेश आहे.

१) लोखंडी गेट, ज. नि. इन्स्पेक्शन सें
२) मॅन होल,
३) संगमरवरी दगड
४) ढोलपुरी दगड
५) चिनी पाईप
६) अल्युमिनियम खिउकी व पार्टीशयन
७) नविन भिंतीस सेंटपेपरने घासून प्रायमर लावणे.
८) जिन्यासाठी दोन्ही भिंतीवर ऑईल पेंट
९) पेवर डॅश (छरा) प्लास्टर
१०) जिप्सम खोर्ड अकॉस्टीक ट्रीटमेंट
११) हेरीटेज ट्रीटमेंट

वरील प्रमाणे नविन (पूर्वी मंजूर झालेल्या वगळून) अतिरिक्त बाबी एकूण अंदाजपत्रकीय खर्च रु. ४,७८,८२९=०० एवढा खर्च अपेक्षित आहे. अतिरिक्त बाबींसह वाढीव खर्चाची रक्कम रुपये २६,११८००=०० एवढी आहे. अतिरिक्त बाबी व वाढीव खर्चासह सुधारित अंदाजपत्रकाची किंमत रुपये ८७,३०,०००=०० होते. करिता प्रकरणी सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी मिळाण्यासाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय इमारत बांधकाम टप्पा-२ च्या मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट नसलेल्या (प्रस्तावात दर्शविलेल्या) अनुक्रमांक १ ते १९ च्या अतिरिक्त कामाचा समावेश करण्यांबाबतचा निर्णय ऐनवेळी घेण्यात आल्यामुळे त्या अनुषंगाने उद्‌भवलेल्या अतिरिक्त वाढीव काम व अतिरिक्त बाबींमुळे होणाऱ्या रक्कम रुपये १६,११,८००/- च्या वाढीव खर्चासह प्रशासकीय इमारत बांधकाम टप्पा-२ चे बांधकामासाठी रक्कम रुपये ८७,३०,०००/- च्या सुधारित अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०४/२८ :**

सहाय्यक आयुक्त-१, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सदर केला की, महाराष्ट्र शासनाने, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. २ प्र. स. /२१९४/२८४ सेवा-५ दि. २८-०३-९५ नुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवरच "चार वर्षातून एकदा राज्यांत कोठेही जाण्याची रजा प्रवास सवलत योजना शासन निर्णयात खाली दर्शविल्याप्रमाणे मंजूर केली आहे."

या प्रवास सवलतीला यानंतर "रजा प्रावास सवलत" व सध्याच्या दोन वर्षातून एकदा स्वग्रामी जाण्यासाठी अनुज्ञेय आसणाऱ्या रजा प्रवास सवलतीला स्वग्राम रजा प्रवास सवलत" असे संबोधले जावे ही रजा प्रवास सवलत महाराष्ट्र राज्याच्या भौगोलिक सीमेच्या आत अनुज्ञेय राहिल राज्यात कुठेही जाण्याची ही प्रवास सवलत असल्याने या रजा प्रवास

सवलतीसाठी प्रवास करावयाच्या अंतरासाठी किमान व कमाल अंतदराची मर्यादा राहणार नाही. परंतु या रजा प्रवास सवलीतीचे ठिकाण घोषित करण्यांची पूर्व अट राहील व मुख्यालय ते घोषित ठिकाण घोषित करण्यांची पूर्व अट राहील व मुख्यालय ते घोषित ठिकाण यासाठीचा प्रवास खर्च जवळच्या मार्गाने व प्रवास तिकिट भाड्याच्या आधारावर अनुज्ञेय राहील.

रजा प्रवास सवलतीच्या पहिल्या गट वर्षाची सुरवात सन १९९३ पासून झाली आहे असे समजण्यांत यावे. यामुळे ही गट वर्षे १९९३-९३, १९९७-२००० अशी असतील या सवलतीचा फायदा घेतला गेल्यास संबंधित स्वग्राम रजा प्रवास सवलतीच्या गट वर्षाची स्वग्राम रजा प्रवास सवलत अनुज्ञेय राहील.

या प्रवास सवलतीचा लाभ घेण्यांसाठी प्रवास करण्याचे ठिकाण, अर्जाद्वारे लेखी घोषित करणे तसेच प्रवास सुरू करण्यांपूर्वी सक्षम अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

करिता वरील प्रमाणे शासन निर्णयातील तरतूदीनुसार महानगरपालिका अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना ही रजा प्रवास सवलत लागू करण्यांच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. २-प्र.स./२१९४/१८४-सेवा-५ दि. २८-०३-९५ नुसार चार (४) वर्षातून एकदा राज्यात कोठेही जाण्याची रजा प्रवास सवलत" योजना शासन तरतूदीनुसार महापालिका अस्थापेनवरील कर्मचाऱ्यांना खालील नियमांच्या अधिन राहून लागू करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

या प्रवास सवलतीला यानंतर "रजा प्रावास सवलत" व सध्यच्या दोन वर्षातून एकदा स्वग्रामी जाण्यासाठी अनुज्ञेय आसणाऱ्या रजा प्रवास सवलतीला स्वग्राम रजा प्रवास सवलत" असे संबोधले जावे ही रजा प्रवास सवलत महाराष्ट्र राज्याच्या भौगोलिक सीमेच्या आत अनुज्ञेय राहिल राज्यात कुठेही जाण्याची ही प्रवास सवलत या रजा प्रवास सवलतीसाठी प्रवास करावयाच्या अंतरासाठी किमान व कमाल अंतराची मर्यादा राहणार नाही. परंतु या रजा प्रवास सवलीतीचे ठिकाण घोषित करण्यांची पूर्व अट राहील व मुख्यालय ते घोषित ठिकाण यासाठीचा प्रवास खर्च जवळच्या मार्गाने व प्रवास तिकिट भाड्याच्या आधारावर अनुज्ञेय राहील.

रजा प्रवास सवलतीच्या पहिल्य गट वर्षाची सुरवात सन १९९३ पासून झालल आहे असे समजण्यांत यावे. यामुळे ही गट वर्षे १९९३-९६, १९९७-२००० अशी असतील या सवलतीचा फायदा घेतला गेल्यास संबंधित स्वग्राम रजा प्रवास सवलतीच्या गट वर्षाची

या रजा प्रवास सवलतीच्या पहिल्या गट वर्षाची सुरवात सन १९९३ पासून झाली आहे असे समजण्यांत यावे. यामुळे ही गट वर्षे १९९३-९६, १९९७-२००० अशी असतील या सवलतीचा फायदा घेतला गेल्यास संबंधित स्वग्राम रजा प्रवास सवलतीच्या गट वर्षाची स्वग्राम रजा प्रवास सवलत अनुज्ञेय राहील.

या प्रवास सवलतीचा लाभ घेण्यांसाठी प्रवास करण्याचे ठिकाण, अर्जाद्वारे लेखी घोषित करणे तसेच प्रवास सुरू करण्यांपूर्वी सक्षम अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

**विषय क्र.२०५/२९ :**

मो. एकनाथनगर येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९३-९५ चे जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रुपये ३,३३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा. आयुक्तांची दि. १०-११-९५ अन्वये मंजुरी दिलेली

आहे. सबब सदर कामाचे रक्कम रुपये ३,३३,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सदरचा खर्च सन १९९५-९६ च्या महानगरपालिकेच्या ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षामधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकनाथनगर येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ३,३३,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक ०४-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीचा इतिवृत्तांत सोमावर दिनांक ०४-१२-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहात समिती सभेस सुरुवात झाली. सभेस निम्ननिर्दिष्ट स. सभासद उपस्थित होते. तसेच मनपाचे अधिकारीही उपस्थित होते.**

१) मा. श्री. अब्दुल रशिदखान (मामू)
२) मा. श्री. सुभाष कच्छवाह
३) मा. डॉ. श्री. भागवत कराड
४) मा. श्री. गौतम खरात
५) मा. सौ. रजनी जोशी
६) मा. श्री. प्रकाश निकाळजे
७) मा. श्री. कंवरसिंग बैनाडे
८) मा. श्री. महंमद मुश्ताक अहमद
९) मा. कु. माया लाडवाणी
१०) मा. श्री. विजयकुमार मेहेर
११) मा. श्री. प्रभाकर विधाते
१४) मा. श्री. महादेव सुर्यवंशी
१५) मा. सौ. पद्मा शिंदे
१४) मा. श्री. सुदाम सोनवणे
१५) मा. श्री. हमीदउद्दिन ताबा

**संवाद :**

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** मनपामध्ये जे चतुर्थश्रेणी कर्मचारी काम करत आहेत, त्याची जेष्ठता यादी मनपातर्फे बनवण्यात आलेली आहे. तथापी ही यादी जेष्ठतेनुसार वापरली जात नाही. शिक्षणाधिकारीऱ्यांनी नंबर तोडून व जेष्ठता क्रम डावलून चार लोकांना कामावर घेतले आहे.

**मा. सभापती :** या चार कर्मचाऱ्यांना न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कामावर घेण्यात आलेले आहे. तथापी संबंधित विभाग प्रमुखाने वरिष्ठ न्यायालयात कॅव्हेट दाखल करून पुढील कार्यवाही करावी.

**श्री. रशिद खान (मामू) :** हा आदेश खालच्या कोर्टाचा आहेव तो आपणावर बंधनकारक नाही. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जेष्ठता यदी बनवली असताना व उच्च न्यायालयाचे आदेश असतांना ही बाब खाल्या कोर्टाच्या निदर्शनास का आणून देण्यात आली नाही. या चार लोकांना नियुक्ती देण्यापूर्वी स्थायी समितीची मंजुरी घ्यावयास पाहिजे होती.

**मा. सभापती :** उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही व्हावयास पाहिजे. जर उच्च न्यायालयाने एखाद्या प्रकरणात काही आदेश दिलेले असतील तर खालच्या कोर्टाच्या निदर्शनास ही बाब आणून देण्यात आली होती काय? संचिका पुन्हा तपासून सविस्तर टिपणी सभागृहासमोर ठेवण्यात यावी. तसेच

मनपातील लिपिक संवर्गीय कर्मचा४यांना वेतन श्रेणी देण्याबाबतचा ठराव समितीने मंजूर केलेला आहे ती वेतनश्रेणी लिपिक संवर्गीय कर्मचाऱ्यांना तात्काळ देण्यात यावी.

**लेखाधिकारी-१ :** स्थायी समितीने लिपिक संवर्गीय कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देण्याबाबतचा पारित केलेल्या प्रस्तावावरती मा. आयुक्तांनही आदेश काढले आहेत. अस्थापना विभागार्मांत सेवापट येताच प्रत्येक कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती करण्यात येईल.

**श्री. गौतम खरात :** महानगरपालिकेच्या अस्थापनेवर २००० चुतर्थश्रेणी कर्मचारी कायमस्वरुपी कर्मचारी म्हणून पहात आहेत. तसेच ५०० च्या वर दैनिक व ठराविक वेतन कर्मचारी म्हणून काम पहात आहेत. या कर्मचाऱ्यांचे काही दैनंदिन प्रश्न आहेत. परंतु या अस्थापना-२ विभागातील सहा. आयुक्त-२ मागील ब४याच दिवसा दिवसांपासून सुटीवर आहेत त्यामुळे कर्मचाऱ्यांचे प्रश्न सुटण्यात दिरंगाई होते सध्या सहा आयुक्त-१ हेच सहा आयुक्त-२ यांचा कार्यभार सांभाळत आहेत. सध्या ७० कर्मचारी हे ठराविकत वेतनावर काम करत आहेत तर ४०० कर्मचारी हे २७ रुपये रोज या दराने काम करत आहेत. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे कामाचे स्वरुप एकच असताना त्यांना देण्यात येणाऱ्या दैनिक वेतनात फरकत करण्यात येऊ नये यामुळे काही कर्मचाऱ्यांवर अन्या होतो. तेंव्हा यांनाही इतर ७० कम्रचाऱ्यांप्रमाणे ठरावित वेतन देण्यात यावे. अथवा सर्वानाच मिनिमम वेजेस ॲक्ट प्रमाणे रु. ३८/- दैनिक वेतन देण्यात यावे.

**मा. सभापती :** हा विषय स्थायी समितीच्या अधिपत्यातील नाही. यात धोरणात्मक निर्णय घ्यावयास व्हावा. तेंव्हा स . सदस्यांनी हा विषय सर्वसाधारण सभेपुढे ठेवावा.

**श्री. गौतम खरात :** महानगरपालिकेच्या अस्थापनेवर ५० लाइनमनच्या जागा निर्माण करण्यास शसनाने मंजुरी दिलेली आहे. काही मजुरांकडून लाईनमनचे काम घेतले जाते तथापी त्यांना लाईनमनची वेतनश्रेणी देण्यात यावी.

**मा. सभापती :** आपण तसे पत्र द्यावे. त्यावर कार्यालयाकडून माहिती घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**कु. माया लाडवाणी :** शहरात विविध ठिकाणी १५०० विद्युत पोल लावण्याबाबत मंजुरी देण्यात आलेली होती. त्यापैकी आतापावेतो किती पोल लावले गेले याची माहिती सभागृहास देण्यात यावी.

**उप अभियंत (विद्युत) :** या १५०० पोल पैकी आतापावेतो ४०३ पोल लावण्यात आलेले आहेत. दि. ०२-१२-९५ रोजी या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक संपन्न झाली हाती या बैठकीत मा. पालकमंत्र्यांनी सदरचे काम ८-१० दिवसांसाठी बंद ठेवण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत मनपा लावत असलेल्या पोलकरून विद्युत मंडळ कंझूमर वायर लावणार आहेव त्या अनुषंगाने याचा सर्वे होणार आहे.

**मा. सभापती :** मनपा हद्दित जे विद्युत पोल आहेत त्यावर कर लावण्यात यावा अशा स्वरुपाचे आदेश यापूर्वीच आपणांस देण्यात आलेले आहेत. तथापी आपण पावेतो अशा स्वरुपाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवलेला नाही. मनपा जे विद्युत खांब उभे करत आहे त्यावर स्ट्रीट लाईन व्यतिरिक्त इतर कोणत्याही वायर्स टाकण्यात येऊ नयेत.

**श्री. रशिदखान (मामू) :** मनपा स्थायी समितीच्या निर्णयानुसार जर विद्युत खांब उभारले जात असतील तर त्या कामास मा. पालकमंत्री प्रलंबित ठेवण्यास कसे सांगतात या बैठकीस त्यांनी किमान मा. सभापतींना बोलवावयास पाहिजे होते. शहरातील विविध ठिकाणचे विद्युत खांब हटविण्याबाबत मनपाने विद्युत मंडळाकडे पैसे भरल्यानंतरही ही कामे वेळेत पूर्ण केली जात नहीत व मनपाने स्वखर्चाने सुरू केलेल्या कामांना मा. पालकमंत्री परस्पर थांबविण्यास सांगतात. या बैठकीत या बाबींचा निषेध करण्यात यावा.

**श्री. हमीद ताबा :** श्री. रशिद मामू यांनी सांगितल्याप्रमाणे या बाबींचा निषेध करण्यत यावा.

**श्री. प्रभाकर विधाते :** विद्युत विभागातील कामाबाबत बऱ्याच तक्रारी आहेत स्वतः विद्युत उप अभियंता भेटण्यासाठी वेळ देतात परंतु त्यांची भेट होत नाहीव कामे ही वेळेवर होत नाहीत. याबाबत त्यांना सूचना देण्यात याव्यात.

**मा. सभापती :** उप अभियंता (विद्युत) यांनी स. सभासदांना ठराविक वेळ देऊन वेळेचे बंधन पाळावे. विद्युत विभागाच्या बऱ्याचशा तक्रारी आहेत त्या दूर करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. याबाबत परत कोणाची तक्रार येणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**श्री. हमीद ताबा :** ऑक्टोंबर १४ मध्ये बांधकाम २ विभागाकडून एक टेंडर निघाले होते ते ट्रॉफिक सुविधांच्या संदर्भाने दिड वर्षापासून काम झाले नसले तरी त्या कॉन्ट्रक्टवर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. कारण नसतांना बरेचसे मटेरियल खरेदी झालेले आहे.

**उप अभियंता (बां.२)** ट्रॅफिक सुविधांची कामे मनपातर्फे पार पाडली जाता मात्र त्यासाठी प्रथम पोलिस डिपार्टमेंटकडून तशी मनपाकडे मागणी यावयास हवी. त्यांची मागणी अद्याप न आल्याने साहित्य पुरविलेले नाही. यासाठी मनपा खर्च करत नाही तर अनुदानातून कामे केली जातात.

**मा. सभापती :** ट्रॅफिक सुविधा शहरात पुरविण्याबाबत पोलिस डिपार्टमेंटकडून मनपास पैसा मिळतो त्यामुळे कामही त्यांच्याच मार्गदर्शनाखाली करावे लागते. या कामा संदर्भाने तयार करण्यात आलेली संचिका उप अभियंता बा.२ यांनी सभापतीस दाखवावी.

**श्री. रशिद मामू :** किराडपुऱ्या जवळील नाल्यास मनपातर्फे संरक्षित भिंत बांधण्याचे काम करण्यास येत आहे. मात्र हे काम अर्धवट राहिल्याने नाल्यातील घाण पाणी तेथील रहिवाश्यांच्या घरात शिरत आहे. त्यामुळे या नाल्याकाटच्या लोकांच्या आरोग्यास धोका उत्पन्न झाला आहे. तेंव्हा हे काम तात्काळ पूर्ण करण्यात यावे. तसेच मागील सभेत मी मनपाकडे अतिक्रमण, अनाधिकृत बांधकामे काढणे अशा कामातून किती पत्रे, बल्ल्या, मिळाल्या याची माहिती मागितली होती. हे खराब मटेरियल मनपाच्या विविध कार्यालयातून जमा करून ठेवल्याचे पुरविलेल्या माहिती वरून दिसून येते. या साहित्या पैकी काही साहित्य जर मनपाचे कर्मचारी घेऊ इच्छित असतील तर त्यांना विकण्यात यावे. अथवा ते हर्रास करण्यात यावे.

**मा. आयुक्त :** मनपाकडे पडून असलेले साहित्य कर्मचाऱ्यांना खरेदी करता यावे यासाठी या सामानाची किंमत ठरवून दिली होती व कर्मचाऱ्यांनी ऑफसेट किंमतीत असे साहित्य खरेदी करावे असे त्यांना आव्हाहन केलेले आहे.

**श्री. रशिद (मामू) :** अशा मालाची किंमत जास्त असल्यामुळे त्यांस कोणी खरेदीकरत नाही. यासाठी या साहित्याची परत किंमत ठरविण्यात यावी व जे साहित्य उपयोगात येऊ शकत नाही ते भंगारात विकण्यात यावे.

**मा. आयुक्त :** रेट परत ठरवले जातील.

**श्री. रशिद मामू :** हर्सूल तलावावर अनाधिकृतपणे मासेमारी मोठ्या प्रमाणावर चालते आपण अशा लोकांचे साहित्य जप्त करतो परंतु ते परत अनाधिकृत मासेमारी सुरू करतात तेंव्हा टेंडर काढून लिलाव करण्यात यावा जेणे करून मनपासही उत्पन्न मिळू शकेल.

**मा. आयुक्त :** या हर्सूल तलावासाठी मासेमारीसाठी आपण टेंडर काढले होते. परंतु एक मच्छीमार संस्था न्यायालयात गेल्यने प्रकरणात काही करता येणार नाही. ह्या दोन संस्थाचा आपआपसातील वाद आहे. त्यास मनपा काही करू शकणार नाही. एका संस्थेच्या मते टेंडर भरलेली संस्था ही अनाधिकृत संस्था आहे व त्या मुद्यावर न्यायालयात केस चालू आहे. स्टे उडवण्याचा प्रयत्न केला जाईल.

**डॉ. मेहेर :** एखाद्या केसमध्ये एक एक वर्षापर्यंत स्टे व्हॅकंट होत नसेल तर आपले वकील काम करतात. त्यांनी या प्रकरणातील निकड व महत्व मा न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले काय? यामुळे मनपाच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचा विपरित परिणाम होतो.

**मा. आयुक्त :** मनपाच्या वतीने जे विधिज्ञ वेगवेगळ्या कोर्टात काम करत आहेत त्याची पुनर्रचना करून नविन वकीलांचा एक पॅनल लवकरच बनवण्यात येणार आहे.

**विधी सल्लागार :** या प्रकरणात खालच्या कोर्टात आपल्या बाजूने निकाल लागला होता. परंतु संबंधित मच्छीमार सोसायटीने वरच्या कोर्टात अपील करून स्टे मिळवलेला आहे.

**मा. आयुक्त :** शहरात जे १५०० विद्युत खांब लावले जाणार आहेत तो मनपाचा स्वच्छा कार्यक्रम आहे. तसेच या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा विरोध नाही. असे विद्युत खांब उभे करण्यापूर्वी मनपातर्फे काही नियमांची पूर्तता करणे आवश्यक होते. शहरात विद्युत खांब नक्की कोठे लावावयाचे याचा प्रथम आराखडा बनवून तो विद्युत मंडळाकडून मंजूर करून घ्यावयास पाहिजे होता व नंतरच विद्युत खांब उभे करावयास पाहिजे होते. सध्या विद्युत मंडळाने "अंडर ग्राऊंड केंबल" असे धोरण विद्युतीकरणाच्या बाबतीत ठरविले आहे. परंतु मनपाने जे विद्युत खांब उभारण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे तो एकाच भागातील वा कॉलनीतील नाही तर संबंध शहरात विवध ठिकाणी हे खांब उभारले जाणर आहेत. पूर्वीचे जे खांब उभारण्यात आलेले आहेत त्याच खांबावरून वायर्स घेण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आता जरी विद्युत मंडळाचे धोरण "अंडर ग्राऊंड केंबल" हे धोरण असले तरी या प्रकल्पातंर्गत ते राबता येणार नाही. ही बाब विद्युत मंडळाच्या निदर्शनास आणलेली आहे. तसेच आपली गाडी सर्वच भागाज जाऊ शकत नाही. मा. पालमंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीस विद्युत मंडळाचेही अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत प्रामुख्याने खालील बाबींवर विचार करण्यात आला.

शहरातून जे पथदिवे लावले जातात अशा पथदिव्यांच्या खांबावर कंत्राटदराची माणसे जाऊन काम करतील व त्यासाठी विद्युत मंडळ कंत्राटदारास आवश्यक ते ना हरकत प्रमाणपत्र देईल.

मनपा परिसर अभियांत्रिकी विभागाकडून पाणी विकत घेते व शहरात पुरविते यामुळे मनपास महिना ८० लाख बिल होते हे बिल जास्त असावे असे वि्ुत मंडळ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. यात काहीतरी दोष असावा म्हणून एवढ्या मोठ्या प्रमाणात बिल येत असावे असा त्याचा अंदाज आहे. यासाठी एखाद्या नामवंत कन्सल्टन्सीकडून संपूर्ण पाणी पुरवठा यंत्रणाच एकदा तपासून घ्यावी असा प्रस्ताव वि्ुत मंडळ अधिकाऱ्यांनी दिला आहे . ही बाब विचारात घेता येत्या सर्वसाधारण सभेसमोर अशी एखादी कन्सल्टन्सी नेमण्याबाबतचा प्रस्ताव ठेवण्यात येणार आहे व तो मंजूर झाल्यानंतर त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल. विद्युत मंडळ व मनपा यामध्ये कोणत्याही स्वरुपाचा वाद नाही. उलट काही वेळा आपलेच अधिकारी अनाधिकृत कनेक्शन्स घेतात ही पध्दत चूक आहे. प्रत्येक कार्यालयाची स्वतःची एक कार्यपध्दती असते ती टाकून आपण कामे करू शकत नाही.

**श्री. रशीद मामू :** मा. पालकमंत्र्यांनी अशा बैठकीस स्थायी समितींना बोलवावयास पाहिजे होते. एवढीच आमची खंत आहे.

**मा. आयुक्त :** ही बैठक मनपातर्फे नव्हे तर मा. पालकमंत्र्यांतर्फे बोलाविली गेली होती व त्या बैठकीस उपस्ति राहण्याबाबत मला कळविण्यात आल्याने मी या बैठकीस हजर होतो.

**मा. सभापती :** महापालिका जनसुविधेसाठी म्हणून जे विद्युत खांब उभारत आहे त्यावर विद्युत मंडळास त्यांच्या ग्राहकासाठी म्हणून कझ्यूमर्स वायर टाकता येणार नाही. पूर्वी मनपास अशा प्रकारचे विद्युत खांब लावण्यासाठी अनुदान मिळत होते. परंतु सध्या ते मिळत नाही. यासाठी मनपाने स्वतःच्या पैशातून लावलेल्या विद्युत खांबावर विद्युत मंडळास कंझुमर वायर्स टाकता येणार नाहीत.

**मा. आयुक्त :** यापुढे विद्युत मंडळ मनपाच्या पोलचा वापर करणार नाही नविन कॉलनी कनेक्शनसाठी विद्युत मंडळ स्वतःचे खांब लाणार आहे.

**डॉ. मेहेर :** शहरात कोठे कोठे व किती विद्युत खांब लावावयाचे याची संख्या आपण पूर्वीच निश्चित केलेली होती. असे असतानाही मन हा आराखडा मंजुरीस्तव विद्युत विभागाकडे का पाठवला गेला नाही.

**मा. आयुक्त :** मनपाने हा आराखडाही बनवलेला आहे. फक्त त्यास मंजुरी घ्यावयाची आहे. ही तांत्रिक बाब आहे व मनपास मंजुरी मिळेल या भरोश्याने कामास सुरुवात केली होती.

**श्री. मो. मुश्ताक अहमद :** शहरात जर अंडर ग्राऊंड वायरिंग केली तर यामुळे पावसाळ्यात अनेक प्रश्न उद्‌भवू शकतील एखाद्या प्रसंगी कोणाच्या मालमत्तेत करंट उतरून हानी होऊ शकते ही बाब नाकारता येणार नाही.

**विधी सल्लागार :** चार लोकांना कामावर घेण्याबाबत न्यायालयाचे आदेश आल्यानंतर सदरची संचिका कामागार विभागातर्फे तयार करण्यात आल्याचे दिसून येते. त्यानुसार ती संचिका माझ्याकडे अभिप्रायासाठी "आल्यनंतर कामागार न्यायालयात उच्च न्यायालयाचे आदेशाची प्रत सादर करून मनाई हुकूम रद्द

करण्यासाठी विनंती करण्यांत यावी तथापी कामागार न्यायालयाचे पुढील आदेशा पावेतो संबंधितास कामावर घ्यावे" असा अभिप्राय दिलेल्या आहे. अशाच एका प्रकरणात यापूर्वी कामगार न्यायालयाचे आदेश न मानल्याने मा. आयुक्तांविरुध्द कंटेमह ऑफ कोर्ट मॅटर झालेले आहे. कामगार न्यायालय हेही एक न्यायालयात आहे. त्यामुळे त्यांच्या आदेशाचे उल्लघंन करता येणार नाही.

**श्री. रशिद मामू :** उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या विरुध्द लेबर कोर्ट ओदश देऊ शकत नाही व ते निर्णय मानन्याचे कारण दिसत नाही.

**मा. सभापती :** कामागार अधिकारी यांनी तात्काळ उच्च न्यायालयाच्या निकालाची प्रत कामगार न्यायालयात सादर करावी व प्रकरणातील स्थगनादेश उठविण्याबाबत विनंती करावी. उच्च न्यायालयाची निकालाची प्रत कामगार न्यायालयात दाखल करताना चर्चेतील प्रकरणासारखेच आणखी ही इतर प्रकरणे असतील तर ती एकत्रीतपणे कामगार न्यायालयासमोर ठेऊन मनपाची बाजू मांडावी तसेच वारंवार सूचना देऊनही कामगार अधिकारी बैठकीस उपस्थित राहत नसल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी.

**विषय क्र. २०६/१ :**

दिनांक २२-११-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**श्री. हमीद ताबा :** बालवाडी शिक्षकांच्या जागा भरण्याबाबत चार महिन्यापूर्वीच मंजुरी दिलेली आहे. परंतु अद्याप पावेतो या जागा भरल्या गेल्या नाहीत. जागा भरण्यात एवढी दिरंगाई होण्याचे कारण नाही. आता शिक्षकांच्या जागा भरून ते विद्यार्थ्यांना शिकवणार केंव्हा.

**शिक्षणाधिकारी :** प्रकरणात कार्यवाही चालू आहे. प्रतिक्षा यादी रद्द करून संचिका पुन्हा सादर करण्याबाबत मा. आयुक्तांनी आदेश दिलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

**मा. सभापती :** मनपाने या संदर्भाने जी प्रतिक्षा यादी बनवलेली आहे त्यातून शिक्षक भरण्यात यावे असा निर्णय स्थायी समिती घेत आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी तात्काळ संचिका मा. आयुक्तांकडे सादर करून आदेश काढण्याची व्यवस्था करावी. या नियुक्त्या ११ महिन्याच्याच आहेत. तेंव्हा विद्यार्थ्याचे नुकसान होऊ नये यासाठी तात्काळ या जागा भरव्यात.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** नारेगांव शाळेतील मुख्याध्यापकाचे पद मागील बऱ्याच महिन्यांपासून रिक्त आहे. त्यामुळे विद्यार्थ्याचे बरेच नुकसान होत आहे. नारेगांव शाळेतील मुख्याध्यापकाचे पद तात्काळ भरण्यात यावे.

**मा. सभापती :** आपण लेख्री स्वरुपात माझ्याकडे पत्र द्यावे व त्यावर कार्यवाही केली जाईल. जर शिक्षणाधिकाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या हिताची काळजी नेसल वा त्यांना काम जमत नसेल तर परत त्यांच्या खात्याकडे पाठवण्याबाबत सर्वसाधारण सभेसमोर ठराव ठेवला जाईल.

**श्री. सुदाम सोनवणे :** दि. २२-११-९५ च्या सर्वसाधारण सभेत मी प्रश्न विचारला होता की "इमारत निरिक्षकांची नियुक्ती शारीरिक पात्रता पाहून केली जाते की शैक्षणिक पात्रता परंतु इतिवृत्त" परंत इतिवृत्त पृष्ठ क्र. ६ वरती मी

विचारलेली माहिती चुकीच्या पध्दतीने घेतली गेली आहे. या संदर्भाने खुलासा व्हावा.

**उप आयुक्त -२ :** इमारत निरिक्षकांची भरती करताना तो शारिरीक दृष्ट्या सक्षम आहे का याचा विचार केलेला नाही तर तो शैक्षणिक दृष्ट्या पात्र आहे का ययाचा विचार केलेला आहे. पूर्वी भरती करताना तसे काही नियम नव्हते.

**श्री. हमीद ताबा :** मनपा तर्फे ट्रॅफिक सुविधांसाठी एक क्रेन खरेदी केलेले आहे. याद्वारे मनपास किती उत्पन्न मिळाले याची माहिती या बैठकीत देण्यात येणार होती ती माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती :** १९९४-९५ मध्ये ट्रफिक विभागात मनपाने एक गाडी दिली होती. १९९४-९५ पर्यंत इंधनावर खर्च ८७३८ एवढा झाला आहे तर दुरुस्तीवर ६८२४ झाला १९९४-९५ मधील एकूण खर्च १५,५६२/- रुपये एवढा झाला एप्रिल ९५ ते ऑक्टोबर ९५ पर्यंत इंधनावर ७६५५ रुपये एवढा खर्च झालाव दुरुस्तीसाठी २४६९८ रुपये खर्च झालेला आहे. तर एकूण वसुली ही रुपये २४६०० एवढी आहे. म्हणजे खर्च व उत्पन्न जवळपास सारखेच आहे.

**श्री. रशिद मामू :** दि. २२-११-९५ च्या इतिवृत्ताचे पान क्र. ३ पहावे स. सदस्य श्री. महादेव सुर्यवंशी यांनी नारेगांव शाळेसमोरील पंवटी इमारतीचे बांधकाम होऊन ८-१० वर्षे लोटली असतली तरी या इमारतीस अद्यान कर लागलेला नाही. याबाबत माहिती विचारलेली आहे. यावर या बैठकीत माहिती देण्यात येणार होती. ती देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यास सांगण्यात यावे.

**मा. सभापती :** आज करमूल्य निर्धारण अधिकारी बैठकीत उपस्ति राहू शकत नाही असे त्यांनी स्वतः कळविले. त्यांनी पुढे अशीही माहिती दिली आहे की, शहरात जर काही मालमत्ता कर लावण्याच्या राहून गेल्या असतील तर त्या संदर्भाने परत सर्वे करण्यात येत आहे. त्यासाठी कनिष्ठ अभियंत्याना सूचनाही दिल्याचे त्यांनी कळविले आहे.

**श्री. रशिद मामू :** सुराणा बिल्डींगला अद्याप पावेतो टॅक्स लागलेला नाही. तो लागला नाही याचीही माहिती देण्यात यावी. तसेच दि. २२-११-९५ च्या इतिवृत्त पान क्र. ४ वरती सहा. संचालक नगर रचना यांनी म्हटले आहे की "शहर विका आराखडा तयार करतांना ज्या ठिकाणी वसाहत झाली आहे, याबाबत शासन निर्णय नसून गाईड लाईन्स दिलेल्या आहेत" याबाबत खुलासा व्हावा.

**सहा. संचालक नगर रचना :** शासनाच्या याबाबत गाईड लाईन आहेत. शासन निर्णय नाही.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना बरेचसे अधिकारी उत्तर देऊ शकत नाहीत. अजेंडा वाचून सर्वांनी योग्य ती माहिती सोबत ठेवावी. जेणे करून सभागृहाची ही वेळ वाचेल. शासनाच्या गाईड लाईन्स बाबत पुढील बैठकीत माहिती सर्व स. सदस्यांना देण्यात यावी.

**श्री. हमीउद्दिन ताबा :** दि. २२-११-९५ च्या स्थायी समितीत मी प्रश्न विचारला होता की, शहरातील व्यापाऱ्यांनी फोटोग्राफी मशिन आयात करून चुकीची कागदपत्रे दाखनू कमी जकात दिली त्यांच्यावर काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती सभागृहास देण्यात यावी. याची नोंद इतिवृत्ताचे पृष्ठ ८ वर घेण्यात आलेली आहे.

**मा. सभापती :** या प्रकरणात आयुक्त स्वतः कार्यवाही करत आहेत. याचप्रमाणे खडकेश्वर वाचनालयातून जी पुस्तके गहाळ झाली होती. याबाबत चौकशी झाल्यानंतर संबंधित ग्रंथपाल यांच्या भविष्य निर्वाह निधीतून रु. ११००० व दरमहा रु.

१०००/- या प्रमाणे रक्कम रु. ५१०८७/- वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**श्री. गौतम खरात :** दि. २२-११-९५ च्या स्थायी सिमतीत निराला बाजार समोरील अतिक्रमणांच्या संदर्भाने मी खुलासा मागितला होता. तो व्हावा.

**मा. सभापती :** निराला बाजार समोर जो फुटपाथ बांधण्यात आलेला आहे त्यावर दुकानदारांनी अतिक्रमणे केलेली आहेत. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी ती अतिक्रमणे काढण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

**प्रशासकीय अधिकारी :** अतिक्रमणे काढण्याबाबत एक कार्यक्रम बनवण्यात आलेला आहे. सध्या पोलिस कुमक मिळत नसल्याने तो राबवता येत नाही. पोलिस कुमक मिळताच कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री. गौतम खरात :** अशा प्रकारची अतिक्रमणे काढण्यासाठी पोलिसांची मदत हवी असते असे मला वाटत नाही.

**मा. सभापती :** मनपास अशा कामांसाठी कायमस्वरुपी पोलिस देण्यात यावेत. त्यांचा खर्च मनपा करेल असा प्रस्ताव मागेच प्रशासनाकडे गेलेला आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी अतिक्रमणे काढण्याचा प्रोग्राम बनवून ताबडतोब अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही करावी.

**श्री. प्रकाश निकाळजे :** दि. २२-११-९५ च्या स्थायी समिती (इतिवृत्त पा.क्र.७) मी माहिती विचारली होती की, जि.प. कडून मनपाकडे ज्या शाळांच्या इमारती हस्तांतरीत झाल्या यापैकी उस्मानपुरा येथील शाळेची पाच एकर काही गुंठे जागा आहे. यावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झालेले आहे. यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली ही जागा मनपाकडे हस्तांतरीत करण्यापूर्वीच त्या जागेवर अतिक्रमण होते की, नंतर अतिक्रमण झाले व या जबाबदार कोण याचा खुलासा व्हावा. या अतिक्रमणामुळे तेथील विद्यार्थ्यांना कवायत करण्यासाठी जागा शिल्लक राहिलेली नाही.

**मा. सभापती :** शिक्षणाधिकारी, मालमत्ता व प्रशासकीय अधिकारी यांनी सद्यस्थिती पाहून बैठकीत माहिती सादर करावी.

**श्री. रशीद मामू :** शहानुरवाडीतही आपण एक एकर जागा घेतलेली होती. त्यावरही बरीचशी अतिक्रमणे झालेली आहेत.

**मा. सभापती :** सहा. संचालकांनी पाहणी करून जर या जागेवर कोणही अतिक्रमण केले असेल तर ते काढुन टाकण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री. रशिद खान मामू :** शहानुरवाडीतही आपण एक एकर जागा घेतलेली होती. त्यावरही बरीचशी अतिक्रमणे झालेली आहेत.

**मा. सभापती :** दि. २२-११-९५ च्या स्थायी समिती बैठकीत (पृ.क्र. १२ वर) मी निवेदन केले होते "नविन तीन आरोग्य केंद्रासाठी लागणारा कर्मचारी वर्ग भरतांना आयुर्वेदिक होमिओपॅथिक व युनानी" कर्मचारी भरण्यात यावेत. इतिवृत्तात "युनानी" हा शब्द आलेला नाही तो घेण्यात यावा.

**मा. सभापती :** इतिवृत्तात "होमिओपॅथी, आयुर्वेदिक व युनानी अशी दुरुस्ती करण्यांत येते.

**श्री. रशिद मामू :** दि. २२-११-९५ च्या इतिवृत्तात पृष्ठ क्र. १३ वर फक्त वर्ग ४ एवढाच उल्लेख असावयास हवा. इतिवृत्तात वर्ग ३ व ४ असे लिहिले गेलेले आहे.

**मा. सभापती :** इतिवृत्तात वर्ग ४ असा उल्लेख करण्यात यावा.

**श्री. गौतम खरात :** विषय क्र. १८३/७ बाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** भवानीनगर मधील कामासंदर्भाने पूर्वी काढण्यात आलेले टेंडर रद्द करण्यात यावे. तसेच विषय क्र. १९६/२० मध्ये ९४-९५ ऐवजी ९५-९६ तसेच विषय क्र. १९७/११ लाही १९९५-९६ अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**ठराव :**

दिनांक २२-११-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती इतिवृत्तास खालील दुरुस्त्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

१) इतिवृत्त पृक्र. ६ श्री. सोनवणे यांनी विचारलेल्या माहितीत "कर निरिक्षकांची नियुक्त करताना या निरिक्षकांची शैक्षणिक क्षमता किंवा शारीरिक पात्रता बघून नेमणूक केली जाते" ऐवजी "इमारत निरिक्षक यांची नियुक्त करतांना या इमारत निरिक्षकांची शैक्षणिक क्षमता किंवा शारीरिक पात्रता अशी दुरुस्ती करण्यात येते."

२) इतिवृत्त पान क्र. १२ वर आरोग्य केंद्रासाठी आयुर्वेदिक होमियोपॅथी व युनानी कर्मचारी वर्ग भरावा आणि दुरुस्ती करण्यात येते.

३) विषय क्र. १७९/३ मध्ये (पृष्ठ क्र. १३) वर्ग ४ एवढाच उल्लेख करण्यात यावा.

४) विषय क्र. १९६/२० मध्ये ९४-९५ ऐवजी ९५-९६ व विषय क्र. १९७/२१ मध्ये ९४-९५ ऐवजी ९५-९६ अशी दुरुस्ती करण्यात येते.

महापालिका दवाखान्यातून देण्यात येणारी औषधी ही इतर शासकीय रुग्णालयापेक्षा चांगली असतात असेही इतिवृत्तात नोंदविण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

**विषय क्र. २०७/३ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण) यांनी मोहल्ला भावसिंगपुरा (वॉर्ड क्र.१) येथील कानिफनाथ कॉलनी येथे नविन १५० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता एकूण रुपये १,६३,७००/- चे अंदाजपत्रक सादर केले आहे. सदरील काम १८ खेडी विकास कार्यक्रम या लेखा शिर्षकाखाली प्रस्तावित आहे. सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. २०-११-९५ रोजी मंजुरी दिलेली आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार १८ खेडी विकास कार्यक्रमांतर्गत भावसिंगपुरा वॉर्ड क्रमांक १ येथील कानिफनाथ कॉलनीत १५० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी बनविण्यात आलेल्या रक्कम रुपये १,६३,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०८/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कमी खर्चाच्या स्वच्छता योजना अंतर्गत गरीब नागरिकांसाठी नविन संडास बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ३०,००,०००/- चे असून सदरील खर्च गरीबांसाठी संडास बांधण्याच्या आर्थिक शिर्षकाखाली असून निविदा सूचना वर्तमान पत्रात प्रसिध्द करून दरपत्रके मागविण्यात आले असता एकूण चौदा दरपत्रके विक्री झाली हाती. त्यापैकी दोन दरपत्रके प्राप्त झाली असून खालीलप्रमाणे दर दर्शविले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मेसर्स टी. स्टार कन्स्ट्रक्शन | ४% जास्त दराचे |
| २) | श्री. आर. एल बारवाल | ५% जास्त दराचे |

वरील दर पाहता तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे मेसर्स टी. स्टार कन्स्ट्रक्शन यांचे दरपप्का अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ४% जास्त दराचे हाते. परंतु दराच्या वाटाघाटीस्तव ठेकेदारास बोलावले असता, संबंधिताने अंदाजपत्रकाचे दराने काम करण्यांस तयारी दर्शविली आहे. तरी अदांजपत्रक रक्कम रुपये ३०,०००/- तसेच मेसर्स ट्री स्टार कन्स्ट्रक्शन यांनी संमती दिल्याप्रमाणे अंदाजपत्रकाच्या दराने काम करणेबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. अब्दुल रशिदखान :** हा प्रस्ताव मुळातच अपूर्ण आहे. यात सर्व बाबींची माहिती देण्यात आलेली नाही.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी प्रस्तावात बैठकीपुढे ठेवतांना पूर्ण स्वरुपात ठेवण्यात यावा प्रस्तावात संदिग्धता नसावी.

**कार्यकारी अभियंता :** जेथे झोपडपट्या वसलेल्या आहेत व ज्या भागात कमकुवत घटाकातील लोक राहतात त्या ठिकाणी ही योजना राबविण्यात येणार आहे. ८५० घ्झरांना ही सेवा देण्यात येणार आहे.

**श्री. गौतम खरात :** आंबेडकर नगरमध्येही अशीच स्कीम राबविण्यात आली, मात्र ती बोगसपणे राबविण्यात आली. झोपडपट्ट्या मधून अशी कामे होऊ नयेत. सरकार ज्या घटकासाठी ही योजना राबवू इच्छित आहे. यशस्वीरित्या राबविण्यात यावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** ब्रीजवाडी, मसनतपुर येथेही योजनाराबवण्यिात आली आहे. यातील ७५ टक्के भाडे फुटलेले आहेत या कामात क्वालिटी राखली जावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** ही योजना अर्धवट आहे. यासाठी केंद्र शासनाचे अनुदान मिळतेच पण लोकवर्गणीही घेतली जाते. तेंव्हा ही स्कीम बंद करण्यात येऊ नये.

**श्री. अब्दुल रशिद खान :** या याजने अंतर्गत होणारे काम चांगल्या पध्दतीचे होत नाही. शिवाय या योजनेसाठी येणारा खर्च टॅक्स स्वरुपात त्या त्या विभागातील लोकांकडून वसूल केला जातो.

**श्री. विजय कुमार मेहेर :** ही योजना आपण शहरातील अनधिकृत झोपडपट्ट्यातूनही राबविणार का?

**मा. सभापती :** ही योजना घोषित झोपडपट्ट्यातून राबविली जाते. आंबेडकरनगररात चांगल्या प्रकारचे शौचालय बांधून दिल्या नंतरही तेथील जनता उघडण्यावरच निसर्गीविधीस बसते. या स्कीमचा फायदा गरीबांना मिळावा. कामात दोष आढळल्यास कंत्राटदाराची देयके अदा करण्यात येऊ नयेत.

**श्री. विजय कुमार मेहेर :** आंबेडकर नगर शौचालयाचे आधुनिकरण करण्यांत यावे. कारण या रस्त्यांवरून नेहमीच पर्यटक व इतर उच्च पदस्थ येत असतात. यामुळे शहराची प्रतिमा खराब होते. लोक प्रबोधनातून तेथील लोकांना याची जाणीव करून द्यावयास हवी यासाठी आवश्यक तर काही कार्यक्रम घ्यावेत.

**श्री. प्रभाकर विधाते :** खराब लाईन्स प्रिम बदलण्यात याव्यात व नंतर ही योजना राबवावी.

**श्री. प्रकाश निकाळजे :** अशा योजनामध्ये टाकलेली लाईन काम संपल्या बरोबर चेक करावयास पाहिजे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** आंबेडकर, नारेगांव, ब्रिजवाडी, मसनतपुर या भागात नविन लाईन टाकलेली आहे. परंतु पासाच्या पाण्यानेही ही लाईन चोकअप झालेली आहे. कारण या लाईनवर जागोजागी ढापे टाकलेले नाहीत, लाईनचे लेव्हल बरोबर नसल्यानेही वारंवार लाईन चोकअप होते. स्वत: मा. महापौरांनीही अशातच या भागची पहाणी केलेली आहे. क्रॉस कनेक्शन वेळेवर केले जात नाहीत. त्यामुळेही बरेच प्रश्न निर्माण होतात. लाईन चालू करण्यापूर्वी कोणासही कनेक्शन देण्यात येऊ नये.

**मा. सभापती :** मी. श्री. सुर्यवंशी यांच्या भावनांशी मी सहमत आहे. संबंधित कार्यकारी अभियंता यांनी अशा कामांवर स्वत: लक्ष द्यावे व लाईन टाकत असतांनाच तीचे लेवल चेक करावे.

**कार्यकारी अभियंता :** हा प्रस्ताव चार महिन्यापूर्वीचे मंजूर झालेला आहे. आज टेंडर मंजूर करावयाचे आहे. या कामावर कंत्राटदाराने स्टे आणला होता तो अशातच व्हकेंट झालेला आहे. त्यासाठी हा प्रस्ताव मंजुरीस्तव ठेवलेला आहे. आगामी बैठकीत प्रस्तावाची संपूर्ण माहिती देण्यात येईल.

**मा. सभापती :** प्रस्ताव तूर्त स्थगित करण्यात येतो. मात्र या बैठकीचे इतिवृत्त कायम करतांना प्रस्तावाची पूर्ण माहिती सर्व स. सभासदांना देण्यात यावी. इतिवृत्त कायम करतांना त्यास मंजुरी देण्यात येईल.

**ठराव :**

ठराव तूर्त स्थगित ठेवण्यांत येतो. तथापी या बैठकीचे इतिवृत्त मंजूर होण्यापूर्वी संबंधित कार्यकारी अभियंता यांनी स. सभासदांना ठरावाची पूर्ण माहिती द्यावी. म्हणजे इतिवृत्त कायम करतांनाच ठराव मंजुरी देऊन तो कायम करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०९/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सूल येथे तीन लाख लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ६,५५,५००/- यास स्थायी समितीमध्ये क्र. २२ दि. १६-०६-९५ द्वारे मान्यता मिळाली होती, त्या नंतर दैनिक वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दी देऊन दरपत्रके मागविली असता, निविदा स्विकारण्यांच्या दिवशी दि. ०९-०८-१९९५ पर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या असून खालील प्रमाणे दर दर्शविलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. राणा कन्स्ट्रक्शन | १०% जास्त दराचे |
| २) | जे. जे. राठोड | १२.५१% जास्त दराचे |
| ३) | एन. एम. दहीफळे | ५०% जास्त दराचे |

वरील दर पाहता तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे मे. राणा कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रक अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १०%जास्त दराचे आहे. नविन दरसूची प्रमाणे दिनांक ३१-१०-९५ रोजी दराबाबत वाटाघाटी अंतगी अंतिम दर ३% जास्त ठरविण्यात आले व तसे गुत्तेदारांने सदरील दर मान्य केला आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सूल येथे तीन लाख लिटर क्षमतेचे रुपये ६,५५,५००/- चे जलकुंभ बांधण्यासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे मे. राणा कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१०/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, माणिकगड सिमेंट कंपनीची निविदा मा. आयुक्त साहेबांनी १९-०७-९५ रोजी रुपये २५५० प्रति मे. टन (१२७.५०) मंजूर केल्यानुसार माणिकगड सिमेंट कंपनीस दि. २५-०७-९५ रोजी सिमेंट पुरवठा करण्यांचे आदेश दिला असता, दि. १०-०८-९५ पर्यत काहीच सिमेंट पुरवठा अत्यंत आवश्यकात होती. सिमेंट नसल्यामुळे महानगरपालिकेचे मुख्य बांधकाम उदा. सर्पालय, मच्छालय, हत्तीघर, पक्षीघर काही शाळेचे बांधकाम, भूमिगत गटार पाणी पुरवठा, इत्यादी महत्वाचे कामे सिमेंट अभावी बंद होते. मा. आयुक्त साहेबांनी वरील कामाची पहाणी केली असता, आदेश दिला की, व्ही. अे. ट्रेडींग कंपनीकडून पुरवठा करण्यांत आलेल्या ११८० सिमेंट गोणीची रक्कम १३१=०० प्रति गोणी प्रमाणे १,५४,५८०/- (एक लाख चौपन्न हजार पाचशे ऐंशी फक्त) इतकी रक्कम मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कार्यालयातील महत्वाची कामे पार पाडण्यांसाठी व्ही. अे. ट्रेडींग कंपीनीकडून घेण्यात आलेल्या ११८० सिमेंट गोणी (रक्कम १३१ प्रति गोणी प्रमाणे) रु. १,५४,५८०/- च्या रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २११/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. नारळीबाग या भागामध्ये सार्वजनिक संडास बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९४-९५ चे जिल्हा दर सूचीनुसार रक्कम रुपये १,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्तांनी दि. १८-१०-९५ ला मान्यता दिलेली आहे.

सबब सदरच्या कामाचे रक्कम रुपये १,५०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. सदरचा खर्च सुलभ शौचालय व मुताऱ्या बांधणे या लेखा शिर्षकामधून सन १९९५-९६ वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नारळीबाग या भागात सार्वजनिक संडास बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार बनवण्यात आलेल्या रक्कम रुपये १,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१२/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको परिसरातील औरंगाबाद गृहनिर्माण व विकास क्षेत्र प्राधिकारण (म्हाडा) यांच्या सेक्टर एन-५ व एन-६ मधील रेखांकनामधील खुल्या जागा महापालिकेने हस्तांतरीत करणे बाबत दि. २८-०९-९५ रोजी म्हाडाने पत्राद्वारे कळविले आहे. या अनुषंगाने म्हाडाचे संबंधित अधिकारी व शहर अभियंता विभागचे अधिकारी यांनी संयुक्तरित्या पहाणी केली त्यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या सेक्टर एन-५ व एन-६ दोन कॉलनी व एन-७ तील एक कॉलनीतील खुल्य जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण झालेले नाही. या जागेवर ॲंगल वायर फेसींग व दीड फुट उंचीचे दगडी बांधकाम करावयाचे झाल्यास त्यास खर्च २९.५० लक्ष इतका अपेक्षित आहे.

वरील सर्व खुल्या जागा म्हाडाकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करावयाचे झाल्यास एकतर प्रथम म्हाडातर्फे वायर फेसींग त्यांनी त्याचे स्वखर्चाने करून द्यावे किंवा वर नमूद केलेले रक्कम २८.५० लक्ष महानगरपालिकेस अग्रीम द्यावी त्यानंतरच सदर खुल्या जागा हस्तांतर करून घेण्याची रितसर कार्यवाही मालमत्ता विभागांतार्गत करण्यात येईल.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** ही जागा महापालिकेकडे हस्तांतरीत केलेली आहे, हा प्रस्ताव आपण म्हाडाकडे पाठवणार आहोत व म्हाडाने पैसे दिल्यानंतरच काम हाती घेतले जाणार आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिडको परिसरातील औरंगाबाद गृहनिर्माण व विकास क्षेत्र प्राधिकारण (म्हाडा) यांच्या सेक्टर एन-५ व एन-६ मधील दोन कॉलनी व एन-७ मधील एका एका कॉलनीतील खुल्या जागेस ॲंगल वायर फेसिंग व दीड फुट उंचीचे दगडी बांधकाम बनविण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या रु. २८.५० लाख अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या खुल्या जागा महापालिकेकडे हस्तांरित करून घेण्यात याव्यात.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१३/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नागसेन कॉलनी (कैसर कॉलनी) समाज मंदिराचे क्षेत्रफळ वाढवून बांधकाम करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९२-९३ चे जिल्हा दर सूचीप्रमाणे व स. नगरसेवक श्री. मोहसिन अहेमद यांचे मागणी नुसार रक्कम रुपये २,८५,०००/- चे अदांजपत्रक तयार करण्यात आलेले आहे व त्यास मा. आयुक्तांची दिनांक ०७-०८-९५ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. सबब सदरचे कामाचे रक्कम रुपये २,८५,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सदरचा खर्च महानगरपालिकेच्या ५% कमकुवत घटाकासाठी कल्याणकारी योजना या सदराखाली करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नागसेन कॉलनी (कैसर कॉलनी) समाज मंदिराचे क्षेत्रफळ वाढवून बांधकाम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९२-९३ चे जिल्हा दर सूचीप्रमाणे तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये २,८५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुंमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१४/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला रमानगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९३-९४ चे जिल्हा दर सूचीप्रमाणे रक्कम रुपये ३,६०,०००/- चे अदांजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्तांची दिनांक १७-११-९५ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामासाठी रक्कम रुपये ३,६०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व

विचारार्थ सादर. सदरचा खर्च सन ९५-९६ वर्षामध्ये ५% कमकुवत घटाकासाठी महानगरपालिकेच्या कल्याणकारी योजना या लेखाशिर्षामधून करण्यात येईल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो. रमानगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९३-९४ चे जिल्हा दर सूचीनुसार रुपये ३,६०,०००/- च्या अदांजपत्रकास तसेच सदरचा खर्च १९९५-९६ वर्षामध्ये ५% कमकुवत घटाकासाठीच्या महापालिकेच्या कल्याणकारी योजना या लेखा शिर्षामधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१५/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गारखेडा सुतगिरी ते सिडको हद्दिपर्यंतच्या रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करण्यांच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) सन १९९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ७,३७,३५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रुपये १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल तरी रक्कम रुपये ७,३७,३५०/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील विविध चौकात तीन व चार सेट सोडियम व्हेपरचे दिवे लावण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) सन १९९५-९६ च्या दरसूचीनुसार बनविण्यात आलेल्या अंदाजपत्रक रु. ७,३७,३५०/- ला तसेच सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रुपये १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१६/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर की, हॉटेल अमरप्रित ते चेतनानगर या रस्त्यांवर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युती करण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) दरसूचीनुसार रक्कम रुपये ६,४१,४४५ चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रुपये १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल तरी रक्कम रुपये ६,४१,४४५ चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल अमरप्रित ते चेतनानगर या रस्त्यांवर सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युती करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अंदाजपत्रकास तसेच हे काम महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रुपये १०. कोटीच्या अनुदानातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१७/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर की, शहरातील विविध चौकात ३ सेट व ४ सेट सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्याकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-

९६ (विद्युत) च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ८,०९,०८८/- चे अंदाजपत्रक तयर करण्यात आले असून सदरील खर्च शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रु. १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल.

तरी रक्कम रुपये ८,०९,०८८/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विविध चौकात तीन व चार सेट सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) सन (१९९५-९६) च्या दरसूचीप्रमाणे बनवण्यात आलेल्या रक्कम रु. ८,०९,०८८/- च्या अंदाजपत्रकास तसेच हे काम महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रु. १०.०० कोटीच्या अनुदानातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१८/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ते लिटल फ्लॉवर शाळेपर्यंतच्या सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) सन १९९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ६,१९,५८४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रु. १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल.

तरी रक्कम रुपये ६,१९,५८४/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ते लिटल फ्लॉवर शाळेपर्यंतच्या रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम (विद्युत) खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसूचीप्रमाणे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ६,१९,५८४/- च्या अंदाजपत्रकास तसेच हे काम महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या रु. १० कोटीच्या अनुदानातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१९/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रोशनगेट ते चेलीपुरा या रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) दरसूचीनुार रक्कम रुपये ६,१९,५८४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रु. १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल.

तरी रक्कम रुपये ६,१९,५८४/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोशनगेट ते चेलीपुरा या रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम (विद्युत) खात्याच्या दरसूचीनुार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रुपये ६,१९,५८४/- ला तसेच हे

काम महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या १०.०० कोटीच्या अनुदानातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२०/१५ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपा गणवेष विनियमानुसारदर वर्षीतिल सक्रांती पूर्वी सर्व कायम स्वरुपी मनपा चतुर्थ श्रेणी स्त्री कामागारांना देण्यात येणाऱ्या साड्या, ब्लाऊज पिसेस व शर्ट सलवार कापड देणेसाठी स्थानिक वर्तमान पत्रात दोन वेळेस जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. प्राप्त निविदा व नमुने दिनांक २२-११-९५ चे स्थायी समिती बैठकीत स. सदस्यांना दाखविण्यात आल्या. सदरील बैठकीत ठरल्यानुसार स्त्री कामागार प्रतिनिधींना प्रत्यक्ष बोलावून साड्याची / शर्ट सलवार कापडांची पसंी करण्यास्तव दिनांक २३-११-९५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. सभापतींचे दालनात मा. सभापतीसह चार स. नगर सेवक, स्त्री कामागार प्रतिनिधी एक पुरुष कामगार हजर होते.

वरील सर्व उपस्थितांनी निवडलेले साड्याचे नमुने, शर्ट, सलवार, कापडाचे व ब्लाऊज पिसेसचे नमुने मा. सभापती व स. स. श्री. गौतम खरात यांचे स्वाक्षरीनिशी मा. सभापतीचे ताब्यात दिले.

दिनांक २८-११-९५ रोजी संबंधित नमुने धारक एजन्सीचे प्रतिनिधी यांना मा. आयुक्ताचे दालनात दरामध्ये वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. मे. कामधेने व मे. बिपिन स्टोअर्स यांचे प्रतिनिधी व मा. आयुक्त यांचेत झालेल्या वाटाघाटी नुसार खालील प्रमाणे दरकमी करून दिनांक ३०-११-९५ पूर्वी आदेश दिल्याचे पुरवठा वेळेवर करणे बाबत संबधितांनी लेखी कळविले.

| | | प्राप्त दर | कमी केलेले दर |
|---|---|---|---|
| १) | साडी ९ वार (८ मिटर) रंगित | रु. ३३३/- प्रति नग | रु. ३३० प्रति नग |
| २) | शर्ट सलवार व ओढणी | रु. ३८७/- प्रति नग | रु. ३८० प्रति नग |

दिनांक ३०-११-९५ रोजी पुन्हा पसंत केलेल्या साड्याचे व शर्ट सलवार कापडाचे रंगाबाबत चर्चा करण्यासाठी स्त्री कामगारांना बोलावून झालेल्या चर्चेनुसार मा. सभापतींनी निवडलेल्या साडीचा नमुना व शर्ट सलवार, ओढणी कापडाचा नमुना त्याच रंगात, डिझाईन व स्ट्रक्चरमध्ये देण्याचे ठरले. गणवेश विनियम मध्ये रंग बदलणे संबंधी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवण्याचे व संबंधित एजन्सीला करणेस आदेश मा. सभापतींनी दिले. अंतिम झालेले दर एजन्सी व साहित्य खालीलप्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | साडी ८ मिटर रंगीत (९वार पुनम चेक्स) | ७०४ नग | रु. ३३०/- | रु. २,३२,३२०/- मे. कामधेनू |
| २) | साडी ५ मिटर रंगीत | ६६ नग | रु. २२५/- | रु. १४८५०/- मे. कामधेनू |
| ३) | साडी ५ मिटर पांढरी (९ वार) वायल नेहा प्रिंटर्स | ५० नग | रु. ३१७/- | रु. १५८५०/- मे. कामधेनू |
| ४) | साडी ५ मिटर पांढरी | १५६ नग | रु. २१०/- | रु. ३२७६०/- मे. कामधेनू |
| ५) | ब्लाऊज पिस (८० से. मी.) ग्लोरी | ९७६ नग | रु. २४.५०/- | रु. २३९१२/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (पांढरा व रंगीत) | | | मे. कामधेनू |
| ६) | शर्ट सलवार कापड (७ मीटर) | १३६ नग | रु. ३८०/- | रु. ५१,६८०/- मे. बिपीन स्टोअर्स |
| | | | **एकूण** | **रु. ३,७१,३७२/-** |

वरील प्रमाणे एकूण खर्च रु. ३,७१,३७२/- चे खर्चास व मनपा गणवेश विनियम क्र. २५ दिनांक १८-०६-९३ चे पत्र क्र. "क" मध्ये नमूद केलेल्या साड्यांचा रंग "स्काय ब्ल्यु" मध्ये बदल करणेस्तव प्रस्ताव मा. सर्वसाधारनण सभेपुढे ठेवणेसाठी मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार व महापालिका गणवेष विनियमा नुसार तीळ संक्राती पूर्वी कायम स्वरुपी मनपा चतुर्थ श्रेणी स्त्री कामागारांना साडी शर्ट सलवार ओढणी खालीलप्रमाणे पुरविण्या बाबत व मनपा गणवेष विनियम क्र. २५ दिनांक १८-०६-९३ चे प्रपत्र "क" मध्ये नमूद केलेल्या साड्याच्या स्काय ब्ल्यु रंगात बदल करण्याच्या प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | साडी ८ मिटर रंगीत (९वार पुनम चेक्स) | ७०४ नग | रु. ३३०/- | रु. २,३२,३२०/- मे. कामधेनू |
| २) | साडी ५ मिटर रंगीत | ६६ नग | रु. २२५/- | रु. १४८५०/- मे. कामधेनू |
| ३) | साडी ५ मिटर पांढरी (९ वार) वायल नेहा प्रिंटर्स | ५० नग | रु. ३१७/- | रु. १५८५०/- मे. कामधेनू |
| ४) | साडी ५ मिटर पांढरी | १५६ नग | रु. २१०/- | रु. ३२७६०/- मे. कामधेनू |
| ५) | ब्लाऊज पिस (८० से. मी.) ग्लोरी (पांढरा व रंगीत) | ९७६ नग | रु. २४.५०/- | रु. २३९१२/- मे. कामधेनू |
| ६) | शर्ट सलवार कापड (७ मीटर) | १३६ नग | रु. ३८०/- | रु. ५१,६८०/- मे. बिपीन स्टोअर्स |
| | | | **एकूण** | **रु. ३,७१,३७२/-** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२१/१६ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, सर्व स. नगरसेवकांना माहे मे, ९५ पासून आज पावेतो प्रत्येकी ५ लेटर पॅड पुरविण्यात आलेले आहे.

मा. सचिव यांनी सुचविल्या नुसार सर्व स. नगरसेवकांची त्यांचे नांवाचे लेटर पॅडसाठी वारंवार मागणी येत असल्याने वर्षातून किती लेटर पॅड देण्यांत यावे या बाबत धोरणात्मक निर्णय होणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मा. महापौर, उप महापौर सभापती, स्थायी समिती वगळता इतर नगरसेवकांना एका वर्षात १० लेटर पॅड महानगरपालिकेतर्फे पुरविण्याबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. २२२/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मोहल्ला गुलमंडी वॉर्ड मधील रोडचे रितसर फेसिंग करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दर सूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये ७,३६,२००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते सन १९९५-९६ साठी असणाऱ्या (२९०.०० लाख) लेखा शिर्षाखाली मंजूर तरतूदीमधून करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुलमंडी वॉर्डामधील रोडचे रिसरफेसिंग करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दर सूचीनुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रुपये ७,३६,२००/- ला तसेच सदर कामाचा खर्च भांडवली रस्ते सन १९९५-९६ साठी असणाऱ्या (२९०.०० लाख) लेखा शिर्षामधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२३/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, औरंगपुरा येथील म. फुले चैकाचे सुशोभिकरण करण्यांच्या कामास तसेच पुतळा कमी उंचीवर आणण्यांच्या कामास मा. सर्वसाधारण सभेने दिनांक २०-१०-९५ रोजी विषय क्रमांक ५८/५ द्वारे मंजुरी दिली आहे. तसेच उपलब्ध तज्ञ व अनुभवी कंत्राटदाराकडून हे काम टर्न की बसीसवर करून घेण्यासं तसेच या कामासाठी लागणाऱ्या रक्कम रुपये १,००,००० लाख खर्चासहित मान्यता दिलेली आहे.

तरी हे काम रक्कम रुपये १,००,०००/- लाखमध्ये टर्न की बेसीसवर अनुभवी व कुशल कंत्राटदार श्री. शेख मसूद यांचेकडून करून घेण्यात येईल.

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. भागवत कराड :** औरंगपुरा येथील म. फुल्यांचा पुतळा झांबर कन्स्ट्रक्शनतर्फे बांधण्यात आलेला आहे. प्रस्ताव मांडण्यापूर्वी कार्यालयाने त्यांच्याशी चर्चा केली आहे काय? जर झांबड कन्स्ट्रक्शन खर्च करू इच्छित असेल तर त्यांना त्या चौकाचे सुशोभिकरण करण्यांस सांगण्यात यावे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी श्री. सुभाष झांबड यांच्याशी संपर्क साधावा व ते या चौकाच्या सुशोभिकरणावर खर्च करू इच्छित असतील तर त्यांना खर्च करू द्यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगपुरा येथील म. फुले चैकाचे सुशोभिकरण करणे तसेच पुतळा कमी उंचीवर आणण्यांच्या कामास तसेच उपलब्ध तज्ञ व अनुभवी कंत्राटदार श्री. शेख मसूद यांचेकडून हे काम टर्न की बेसीसवर करून घेण्यासाठी लागणाऱ्या खर्च रुपये १,००,००० ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२४/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, महापालिकेच्या नविन इमारत टप्प्या-२ साठी एअर कुलींग करण्यांच्या कामांची अंदाजपत्रक रक्कम रुपये ८,०४,५००/- ची

तयार करण्यात आले आहे. सदरील कामाच्या अंतर्गत उक्टींग वर्क्स, रक्कम रुपये १,४०,०००/- ग्रील्स डी क्युजर्स (वायु विजनासाठी) रक्कम रुपये ४,०४,०००/- अक्सास्ट हवेचे पंखे रक्कम रुपये ४२,५००/- उक्टींग इन्सुलेशन वर्क्स रक्कम रु.१,१२,४००/- असे एकूण पहिल्या टप्प्यासाठी रक्कम रुपये ३,३५,३००/- एवढा खर्च येण्याचा अंदाज आहे. तसेच दुसऱ्या टप्प्याअंतर्गत एअर वॉशर्स प्री प्लल्टर्स सप्लायरस एअर फॅन मोटर्स एअर वॉशर्स पर्यंत स्वतंत्ररितया पाईपींगची व्यवस्था करणे व पंपसेट बसविणेसाठी ३,९५,२००/- तसेच विद्युती करणावरील खर्च ७४,०००/- असे एकूण दुसऱ्या टप्पयासाठी ४,६९,२००/- एवढा खर्च येणार म्हणजेच टप्पा-१ व टप्पा-२ साठी एकूण खर्च रक्कम रुपये ८,०४,५००/- एवढा खर्च येण्यांची शक्यता आहे.

सदरील काम करावयाचे लावल्यास महानगरपालिकेच्या सुधारित अंदाजपत्रकात या कामासाठी तरतूद ठेवावी लागणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रु. ८,०४,५००/- ला मंजुरी मिळावी. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** पुढील बैठकीत महानगरपालिका मुख्यालयाच्या जुन्या इमारतीवर एक हॉल बनवण्यांच्या प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महापालिकेच्या नविन इमारत टप्प्या-२ साठी एअर कुलींग कामांतर्गत डक्टींग वर्क्स रुपये १,४०,०००/- ग्रील्स डी. प्युनर्स (वायु विजनासाठी) रुपये ४,०४,०००/- एक्सॉस्ट हवेचे पंखे रक्कम रुपये ४२,५००/- डक्टींग इन्सुलेशन वर्क्स रुपये १,१२,४००/- तद्वतच एअर वॉशर्स प्री किल्टर्स, सप्लाय एअर फॅन, फॅन मोटर्स एअर वॉशर्स पर्यंत पाईपींग व्यवस्था करणे आदि कामासाठी बनवण्यांत आलेल्या टप्पा-१ व २ च्या एकूण खर्च रुपये ८,०४,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२५/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी दादाकॉलनी व भवानीनगर यांना जोडणाऱ्या क्युलेएरर्ट ची दुरुस्ती करण्यासाठी रुपये १,३५,०००/- चा प्रस्ताव ठेवला होतो त्यावर चर्चा होऊन कामाच्या पहाणीसाठी स. सदस्य श्री. महादेव सुर्यवंशी व श्री. गौतम खरात यांची नेमणूक झाली. मुख्य अंदाजपत्रकात जुनेच पाईप वापरून क्युलेएर्रट दुरुस्ती करणेचा समावेश हातो. पुल बांधावा वास्तवातील गाळ काढावा अशा सूचना केल्या त्यानुसार अंदाजपत्रक तयार केले असता ते रुपये १,५१,४०७/- इतके होते. मात्र गुप्त अंदाजपत्रकात बाब क्र. ३ व या वाद झाल्याने रुपये ४२,०८८/- इतकी बचत होते, म्हणजेच मुळे अंदाजपत्रकात रुपये १,१७,३८९/- ची निव्वळ वाढ होते, त्यासाठी एकूण दहा (१०) बाबींचा अतिरिक्त बाबी म्हणून समावेश करावा लागतो. सुधारित प्रस्तावानुसार कामाची एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,४२,३८९/- इतकी होते. सदर अंदाजपत्रक जिल्हा दरपत्रक १९९४-९५ चे आधारे बनविण्यात आले आहे. हे वाढीव काम श्री. एस. ए. नवाब कंत्राटदार यांचेकडून त्यांनी निविदेत भरलेल्या ९.०३% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने करून घेण्यात येईल. तरी सुधारित प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार दादाकॉलनी व भवानीनगर या जोडणाऱ्या कल्व्हर्टची दुरुस्ती करण्यासाठी बनवण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,५९,३८९/- १९९४-

९५ च्या जिल्हा दरपत्रकानुसार, च्या अंदाजपत्रकास व हे काम एस. ए. नवाब, कंत्राटदार यांच्याकडून त्यांनी निविदेत भरलेल्या ९.०३% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने करून घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२६/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्राणी संग्रहालय येथील हत्ती घरासमोर मोट व मागील भिंत बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. १८-१०-९५ ठराव क्र. १६३/२० अन्वये रक्कम रुपये २९,५०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्रमांक/मनपा/लेखा/नि/३४/९५ दिनांक ०४-११-९५ अन्वये वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे बी-१ नमुन्यत निविदा मागविल्या असता, कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (९) नऊ निविदा विक्री झाल्या, निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (३) निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक २१-११-९५ ला उघडण्यात आल्या. त्याचा तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस. एम. मंडोरे | ८.७% जास्त दराने |
| २) | श्री. कुलवंतसिंग | ३% जास्त दराने |
| ३) | श्री. एस. ए. नवाब | ०.०३% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराची श्री. एस. ए. नवाब यांची निविदा आहे. व त्यास मा. आयुक्तांची दि. २९-११-९५ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाची तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराची श्री. एस. ए. नवाब यांची निविदा दर मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्राणी संग्रहालयातील हत्ती घरासमोर मोट व मागील भिंत बांधण्यासाठी बनविण्यात आलेल्या अंदाजपत्रक रुपये २,९५,०००/- ला मंजुरी देण्यात येते. तसेच तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराने श्री. एस. ए. नवाब यांच्याकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२७/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, ज्युबलीपार्क येथील चौकात पाणी पुरवठा पंप हाऊसच्या कोपऱ्यावर सुशोभिकरण करणेसाठीच्या कामाकरिता रक्कम रुपये ९०,०००/- खर्च अपेक्षित असून सदरील कामाकरिता मे. विजता डेकोरेटीव्ह पॉडक्ट प्राप्त झाले आहेत. ह्यामध्ये नैसर्गिक तसेच फायबद ग्लासचे कृत्रिम दगड बसवणि ज्याच्या आता दिव्याची सोय केलेली असेल. तसेच नैसर्गिक दगडांवर फायबद ग्लासचे लॅमिनेशन्स करणे जेणे करून वेगवेगळ्या रंगाचा परिणाम साधता येईल. ह्या व्यतिरिक्त धबधब्यासाठी दोन विजेचे पंप बसविणे याचाही समावेश आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून मिळणाऱ्या विशेष शासकीय अनुदान (१०.०० कोटी) या लेखा शिर्षातून करण्यात येईल. तरी मे. विजेता डेकोरेटीव्ह प्रॉडक्ट यांचा प्रकारच्या कामातील पूर्वानुभव कौशल्य लक्षात घेता हे काम त्यांच्याकडून (अर्न की बेसीस) व रक्कम रु. ९०,०००/- मध्ये करून घेण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ज्युबलीपार्क चौकात पाणी पुरवठा पंप हाऊसच्या कोपऱ्यावर सुशोभिकरण करण्यासाठीच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रुपये ९०,०००/- ला तसेच मे. विजता डेकोरेटीव्ह यांच्याकडून करून घेण्यास व महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या १० कोटीच्या अनदानातून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२८/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, पडेगांव कत्तलखाना येथे व्यर्थ मटेरियलची विल्हेवाट लावण्याकरिता मीनी ट्रीटमेंट प्लँट तयार करण्यासाठी रक्कम रुपये ९५,०००/- चे अंदाजपत्रक रक्कमेच्या निश्तिच केलेल्या सीमेनुसार करण्यात आले होते. सदरहल काम अंदाजपत्रक दराने मे. एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे मार्फत करण्यांत आले असून प्रत्यक्ष स्थळवर मीनी ट्रीटमेंट प्लँटच्या कामात वाढ झाली व वाढीव रक्कम रुपये एक लक्ष लागत असल्यामुळे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये १,९५,०००/- चे तयार करण्यात आले आहे व सदरील काम मे. एलारो कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्यामार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याबाबत मा. आयुक्त साहेब यांची मंजुरी दि. २९-११-९५ रोजी प्राप्त झाली. सबब सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये १,९५,०००/- मान्यतेस्तव तसेच वाढीव रक्कमेचे काम मुळ गुत्तेदार मे. एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेमार्फत सार्वजनिक बांधकाम खात्याच्या चालू दरसूचीनुसार अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पडेगांव कत्तलखाना येथे वेस्ट मटेरियलची विल्हेवाट लावण्यासाठी मीनी ट्रीट प्लँटच्या कामात वाढ झाल्याने बनविण्यात आलेल्या वाढीव अंदाजपत्रक रुपये १,९५,०००/- ला तसेच हे काम मुळे गुत्तेदार मे. एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनीकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२९/२४ :**

क्रिडाअधिकारी यांनी प्रस्ताव सदर केला की, दिनांक २ ते ५ जानेवारी या तारखेस "महापौर चषक" राजस्तरीय खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदरील स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे खर्च येणार आहे.

| | | |
|---|---|---|
| **दैनिक भत्ता** | | |
| १. | पुरुष गट | १२ संघ X १३ खेळाडू प्रत्येकी संघाप्रमाणे एकूण १५६ खेळाडू ४ दिवस मुक्काम रु. ५०/- प्रति खेळाडू प्रमाणे १५६X५०X४ = रु. ३१,२००/- |
| २. | महिला गट | ८ संघ X १३ खेळाडू प्रति संघ प्रमाणे एकूण १०४ खेळाडू ४ दिवस मुक्काम रु. ५०/- प्रति खेळाडू प्रमाणे १०४X५०X४ = रु. २०,८००/- |
| **बक्षिस** | | |
| | पहिले बक्षीस | रुपये ७०००/- |
| | दुसरे बक्षीस | रुपये ५०००/- |

| | | |
|---|---|---|
| | तिसरे बक्षीस | रुपये ३०००/- |
| | तिसरे बक्षीस | रुपये ३०००/- |
| | रुपये १५०००/- पुरुष व महिला गट = ३००००/- | |
| २. | सर्वोत्कृष्ट खेळाडू | पुरुष गटातून - १ |
| | | महिला गटातून १ = २ |
| रुपये ५००/- प्रत्येकी प्रमाणे ४ दिवस तसेच मालिकेतील सर्वोकृष्ट पुरुष व महिला खेळाडूसाठी रु. १०००/- प्रत्येकी ५००X४X२ =६०००/- + २०००/- रु. ६०००/- | | |
| **रॉयल्टी** | | |
| | पुरुष गट | रु. १००००/- |
| | महिला गट | रु. ५०००/- रु. १५,०००/- |
| **पंच व अधिकारी यांचेसाठी येणारा खर्च** | | |
| | पंच २० | |
| | भत्ता | रु ५०/- व ऑफिशिअल रु. ५० प्रामणे प्रति दिन |
| | | ४ दिवसांसाठी व सचिव यांना देण्यात येणारा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता |
| **खेळाडुसाठी प्रवास भत्ता** | | |
| | पुरुष खेळाडू | १५६ |
| | महिला खेळाडू | १०४= २६० खेळाडू |
| | | प्रत्येकी रुपये २००/- प्रमाणे २६०X२०० रु. = ५२,०००/- |
| | पंच एकूण १२X२०० | रु. = २,४००/- |
| **इतर खर्च** | | |
| | कप व टी शर्ट | |
| | बक्षिसे | (मेडल्स) सुवर्ण, रजन व कास्य रु. = ७०००/- |
| | | निवास मैदान व्यवस्था व प्रसिध्दी रु.= १०,०००/- |
| | | **एकूण खर्च रुपये १,९०,४००/-** |

वरील प्रमाणे एकूण रुपये १,९०,४००/- च्या येणा४या खर्चास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. २ ते ५ जानेवारी या तारखेस "महापौर चषक खो-खो" स्पर्धा आयोजण्यास तसेच यासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| **दैनिक भत्ता** | | |
| १. | पुरुष गट | १२ संघ X १३ खेळाडू प्रत्येकी संघाप्रमाणे एकूण १५६ खेळाडू ४ दिवस मुक्काम रु. ५०/- प्रति खेळाडू प्रमाणे १५६X५०X४ = रु. ३१,२००/- |
| २. | महिला गट | ८ संघ X १३ खेळाडू प्रति संघ प्रमाणे एकूण १०४ खेळाडू ४ दिवस मुक्काम रु. ५०/- प्रति खेळाडू प्रमाणे १०४X५०X४ = रु. २०,८००/- |
| **बक्षिस** | | |
| | पहिले बक्षीस | रुपये ७०००/- |
| | दुसरे बक्षीस | रुपये ५०००/- |

| | | |
|---|---|---|
| | तिसरे बक्षीस | रुपये ३०००/- |
| | तिसरे बक्षीस | रुपये ३०००/- |
| | रुपये १५०००/- पुरुष व महिला गट = ३००००/- | |
| २. | सर्वोत्कृष्ट खेळाडू | पुरुष गटातून - १ |
| | | महिला गटातून १ = २ |
| रुपये ५००/- प्रत्येकी प्रमाणे ४ दिवस तसेच मालिकेतील सर्वोकृष्ट पुरुष व महिला खेळाडूसाठी रु. १०००/- प्रत्येकी ५००X४X२ =६०००/- + २०००/- रु. ६०००/- | | |
| **रॉयल्टी** | | |
| | पुरुष गट | रु. १००००/- |
| | महिला गट | रु. ५०००/- रु. १५,०००/- |
| **पंच व अधिकारी यांचेसाठी येणारा खर्च** | | |
| | पंच २० | |
| | भत्ता | रु ५०/- व ऑफिशिअल रु. ५० प्रामणे प्रति दिन |
| | | ४ दिवसांसाठी व सचिव यांना देण्यात येणारा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता |
| **खेळाडुसाठी प्रवास भत्ता** | | |
| | पुरुष खेळाडू | १५६ |
| | महिला खेळाडू | १०४= २६० खेळाडू |
| | | प्रत्येकी रुपये २००/- प्रमाणे २६०X२०० रु. = ५२,०००/- |
| | पंच एकूण १२X२०० | रु. = २,४००/- |
| **इतर खर्च** | | |
| | कप व टी शर्ट | |
| | बक्षिसे | (मेडल्स) सुवर्ण, रजन व कास्य रु. = ७०००/- |
| | | निवास मैदान व्यवस्था व प्रसिध्दी रु.= १०,०००/- |
| | | **एकूण खर्च रुपये १,९०,४००/-** |

तसेच मा. आयुक्तांना या स्पर्धेचे कार्याध्यक्ष करण्यास यावे अशा स्वरुपाचे पत्र संयोजनकांना लिहिण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**जकात विभागातील करंट आकाऊंट बाबत संवाद**

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** ज्या कंपन्यांना महानगरपालिकेतर्फे करंट आकाऊंट सवलत देण्यात येणार आहे. अशा कंपन्या काही कारणाने महानगरपालिको हद्दित आणलेला माल परत बाहेरगांवी पाठवणार असतील तर अशा करंट आकाऊंट धारकांनी माल कोणत्या तारखेस, किती प्रमाणात परत पाठवला जाणार. तसेच तो मालम कोणत्या प्रकाराने व कोणत्या नाक्यावरून परत जाणार आहे याचे लेखी प्रमाणपत्र महानगरपालिकेकडे सादर करून महानगरपालिकेची आगाऊ परवानगी घ्यावयास हवी. अशी अट अकाऊंट फॅसिलिटी देतांना त्यात टाकण्यांत यावी अशी मी मा. सभापतींना निंती करतो.

**मा. सभापती :** स. नगरसेवक श्री. रशिदखान मामू यांनी चांगला मुद्या उपस्थित केलेला आहे. बी. डी. ए. व महाराष्ट्र डिस्ट्रीलरी या दोन कंपन्या वगळता इतरांना पूर्ववत करंट आकाऊंटची फॅसिलिटी देण्यात यावी यासाठी करंट आकाऊंट रक्कमेत वाढ करण्यांचा प्रस्ताव मुख्य लेखा परिक्षक तसेच लेखाधिकारी

यांनी ठेवावा. तद्वतच करट अकाऊंट धारकांनी महानगरपालिका हद्दित माल दाखल केल्यानंतर त्याची नोंद महानगरपालिका मुख्य कार्यालयात यावी. तसेच मालम परत बाहेर गावी पाठवतांना तो कोणत्या तारखेस किती प्रमाणात व कोणत्या वाहनातून/ नाक्यावरून परत पाठवणार याचे लेखी प्रमाणपत्र द्यावे व महानगरपालिकेची मंजुरी घ्यावी. तसेच यात एखादा अकाऊंधारक महानगरपालिका अधिकाऱ्यांना दोषी आढळल्यास त्याचे अकाऊंट बदं करण्यात येईल. अशीही अट त्यात टाकण्यात यावी वेळोवेळी स्थायी समितीस करट अकाऊटबाबत माहिती पुरविण्यात यावी.

सर्वांचे आभार माणून ५.०० वाजता बैठक संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक २१-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त बुधवार दिनांक २१-१२-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहात समिती सभेस सुरुवात झाली. सभेस निम्ननिर्दिष्ट स. सभासद उपस्थित होते. तसेच अधिकारीही अधिकारीही उपस्थित होते.**

१) मा. श्री. अब्दुल रशिदखान (मामू)
२) मा. श्री. सुभाष कच्छवाह
३) मा. श्री. गौतम भागाजी खरात
४) मा. सौ. रजनी जोशी
५) मा. श्री. प्रकाश निकाळजे
६) मा. श्री. कंवरसिंग बैनाडे
७) मा. श्री. महंमद मुश्ताक
८) मा. कु. माया लाडवाणी
९) मा. श्री. विजयकुमार मेहेर
१०) मा. श्री. प्रभाकर विधाते
११) मा. सौ. पद्मा शिंदे
१२) मा. श्री. सुदाम सोनवणे
१३) मा. श्री. हमीदउद्दिन ताबा

**संवाद :**

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** महानगरपालिका हद्दितील मालमत्तांना महानगरपालिकेतर्फे जो मालमत्ता कर लावला जातो, त्याची देयके सध्या कॉम्प्युटरव बनविली जातात. परंत अशी देयके मोठ्या प्रमाणांवर सदोष असल्याचे दिसून येते. मालमत्ता कराची देयके अदा केल्यानंतरही मालमत्ता धारकांना देण्यात आलेल्या देयकात थकबाकी दर्शविण्यांत आलेली आहे. यामुळे कराचा भरणा करण्यांस मालमत्ताधारक तयार होत नाहीत. वास्तविक पाहता संगणकावर देयके तयार करत असतांना अशा चुका होऊ नयेत. कराचे देयके वितरित करण्यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांनी थकबाकी आहे. अथवा नाही याची खात्री करावयास पाहिजे.

**श्री. प्रभाकर विधाते :** मालमत्ता धारकांकडून मालमत्ता कराची वसूली केल्यानंतरही त्याची नोंद रजिस्टरमध्ये व्यवस्थितपणे घेतली जात नाही व पर्यायाने मालमत्ता कर वसूल होत नाही म्हणून परत थकबाकी दर्शविली जाते.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** मंत्रामंडळ बैठकीचे शहरात आयोजन करण्यात आले होते तेंव्हा काही कामे तातडीने करून घेण्यात आली होती. मात्र अशा कंत्राटदाराची देयके अद्याप पावतो मंजूर करण्यात आलेली नाहीत.

**मा. सभापती :** स्थायी समिती सभापती या नात्याने या कामांच्या देयकाची माहिती मी मागविली होती. त्यामुळे ती प्रलंबित राहिली असावीत. अशी देयके अदा करण्यास हरकत नाही.

**श्री. अब्दुल रशिद खान :** महानगरपालिकेतर्फे शहरात रस्ते, ड्रेनेज, विद्युत, इ. सुविधा पुरविल्या जातात. मात्र शहरात बऱ्याच ठिकाणी महानगरपालिकेच्या रस्त्यांवर ड्रेनेज लाईनवर अतिक्रमण करून लोकांनी ओटे बांधले आहेत. त्यामुळे एखादी लाईन चोकअप झाली तर तेथे काम करता येत नाही. अशी अतिक्रमणे तात्काळ काढण्यात यावीत.

**श्री. विजयकुमार मेहेर :** महानगरपालिकेतर्फे जी मालमत्ता कराची जी देयके दिली जातात, त्यात शिक्षण कर, वृक्ष कर यामध्ये देयका देयकात तुावत दिसते, तेंव्हा या कराचे एकच प्रमाण सर्वांना लागू असावे.

**शहर अभियंता :** रस्ते, ड्रेनेज आदि कामे पूर्ण झाल्यानंतर लोक रस्त्यांवर अतिक्रमण करतात आणि अशी अतिक्रमणे आढळून आल्यास प्रशासकीय अधिकारी यांच्या मदतीने ती काढून टाकण्यात येतात.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी अशा प्रकरणांत स्वत: लक्ष घालून वेळीच अतिकमण करणाऱ्याविरुध्द कार्यवाही करावी व महानगरपालिकेच्या कोणत्याही कामात अतिक्रमणाचा अडथळा येणार नाही याची काळजी घ्यावी.

**श्री. प्रकाश निकाळजे :** टॅक्स मालमत्ता कराची देयके काही वेळा सदोष असल्यामुळे लोक टॅक्स भरत नाहीत. तेंव्हा विभागावर बैठका घेऊन जनतेस कर भरण्यांबाबत अवाहन करण्यात अयावे. यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नातही भर पडेल.

**मा. सभापती :** या उपक्रमासाठी यापूर्वीच एक समिती स्थापन करण्यात आलेली आहे व ८-१० प्रकरणे या समितीने निकाली काढली आहेत. जनतेचा प्रतिसाद या उपक्रमास मिळावा यासाठी पहिलीसिटी करण्यात यावी.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** अशातच महानगरपालिकेतर्फे शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. एम्प्लॉयमेंट एक्सचेंजकडून जी यादी आली त्यात ९४-९५ साली ज्यांनी नावे नोंदविली अशा लोकांची आहे. मुलाखतीस येणाऱ्या कॅडीडेटसना ओळखपत्रे द्यावयास पाहिजे होती. यामुळे काही लोकांनी दुसऱ्यांच्यांच नावावर मुलाखती दिलेल्या आहेत. हे इंटरव्युव्ह रद्द करण्यात यावे.

**मा. सभापती :** २७ डिसेंबर ९५ रोजी सर्वसाधारण सभा होणारच आहे. तेंव्हा त्या सर्वसाधारण सभेत हा विषय मांडण्यात यावा, तेंव्हा त्या सर्वसाधारण सभेत हा विषय मांडण्यात यावा, तेंव्हा तेथेच चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

**श्री. गौतम खरात :** अनधिकृत वसाहतींना कर लावावा असा ठराव मागेच दिला होता, त्याचे काय झाले, त्याच प्रमाणे निराला बाजारा समोरील फुटपाथवरील अतिक्रमणे काढण्यात यावीत असेही मागील सर्वसाधारण सभेत आदेश देण्यात आले होते. मात्र यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही.

**मा. सभापती :** १ जानेवारी ९६ पासून अनधिकृत वसाहतीतील मालमत्तावरही कर आकारणी करण्यात येईल अतिक्रमणे काढण्याबाबत स्टे आल्यामुळे ते काढता आले नाही. अशी अतिक्रमणे काढण्यासाठी पोलिस बंदोबस्त मिळणेही आवश्यक आहे. पोलिस बंदोबस्ता अभावी ही अतिक्रमणे काढता आली नाहीत.

**श्री. गौतम खरात :** एखाद्या गरीबांची झोपडी काढण्यासाठी पोलिस बंदोबस्ताची गरज पड नाही. मग अशा प्रकारची अतिक्रमणे काढण्यासाठी पोलिस बंदोबस्ताची गरज का भासावी.

**मा. सभापती :** विधी सल्लागारांनी स्टे उठवण्यांबाबत कोटीपुढे महानगरपालिकेचे म्हणणे मांडावे.

**श्री. विजयकुमार मेहेर :** वकीलांचे नविन पॅनल बनविण्यात येत असल्याबाबत मा. आयुक्तांनी माहिती दिली होती. त्याचे पुढे काय झाले.

**मा. सभापती :** येत्या जानेवारीत असे पॅनल बनविण्यात येणार आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान :** जसे एखादे बांधकाम पाडण्यांसाठी कोर्टाचा स्टे असेल तर तो मानने आवश्यकच आहे काय. जर एखाद्या कोर्टाने बांधकाम पाडण्यासाठी परवानगी दिली असेल तर ते पाडणे आवश्यक नाही काय, एक दोन प्रकरणात उच्च न्यायालयाने बांधकाम पाडण्याचे आदेश दिलेले असतांनाही ही मागील दोन तीन वर्षापासून अशी बांधकामे पाडली गेली नाहीत. याचा संबंधित अधिकारी काय खुलासा करणार आहेत.

**मा. सभापती :** २८-१२-९५ च्या स्थायी समिती बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणांतील संपूर्ण तपशिल सादर करावा.

**श्री. महंमद मुश्ताक अहमद :** एखाद्या कोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी केली गेली नाही तर ते कंटेम्प्ट ऑफ कोर्ट ठरणार नाही काय?

**विधी सल्लागार :** गुणवाणी यांच्या अनाधिकृत बांधकामाच्या प्रकरणांतील निर्णया हा उच्च न्यायालयाचा नाही. तो खालच्या कोर्टाचा निर्णय आहे. कोर्टाने निर्णय दिल्यानंतर मी माझा अभिप्राय देऊन संचिका संबंधित शाखा प्रमुखाकडे पाठवलेली आहे. त्यांनी पुढील कार्यवाही करावयास पाहिजे.

**मा. सभापती :** कोर्टाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ केल्यास असे प्रश्न उद्‌भवणार नाहीत. इत:पर कोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी वेळीस केल्या जाते, याकडे सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष पुरवावे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** नारेगांव भागातील रहिवाशी शेख अब्दुल शेख रहेमान यांनी ३ वेळा कराचा भरणा केलेला असतांनाही महानगरपालिकेच्या दप्तरात कोठेही त्याची नोंद नाही. उलट त्य मालमत्ता धारकाकडे थकबाकी दाखवली जाते आहे. तेंव्हा पूर्वी मालमत्ता कराचा भरणा केलेल्या पावत्या या बोगस आहेत काय अशी शंका येते.

**उप आयुक्त :** मालमत्ता धारकाने मालमत्ता कराचा भरणा केल्यानंतर पावती फाडली जाते व त्याची तात्काळ नोंद रजिस्टरमध्ये घेतली जाते. जर एखाद्या मालमत्ता धारकाने कराचा भरणा केल्यानंतरही त्याला देण्यांत येणाऱ्या कर मागणी पत्रकातून ती थकबाकीची रक्कम वजा करण्यात येईल. विभाग क्र. २ व ७ मधील पावत्यामध्ये दर्शविलेली कराची रक्कम व त्याची नोंद रजिष्टरमध्ये न घेतल्यामुळे महानगरपालिका फंडातून पैसा जमा न केल्यामूळे काही कर्मचाऱ्यांविरुध्द पोलिस केस करण्यात आलेली आहे. तसेच आर्थिक वर्ष संपल्यानंतर जी पातवी पुस्तके बंद केलेली असतात. त्या पावती पुस्तकांचा उपयोग पावत्या देण्यासाठी काही कर्मचाऱ्यांनी केल्याचे दिसून आला. तसेच बाऊस झालेल्या चेकची रक्कम महानगरपालिका फंडात रोखीने पैसे भरतांना रजिष्टरमध्ये निटपणे नोंदवली गेली नाही अशा काही बाबी लेखा परिक्षणांत निदर्शनास आलेल्या आहेत.

**मा. सभापती :** महानगरपालिकातर्फे जी मालमत्ता कर वसूल केला जातो, त्या पात्यांची व्यवस्थितीपणे नोंद रजिष्टरमध्ये जर दैनंदिन प्रमाणात घेतली जात नसेल तर त्या कारणांचा प्रशासनाने मागोवा घ्यावा तसेच बोगस पावत्या दिल्या जात आहे काय, याचीही शहानिशा करावी. पैसे भरल्याबाबत जे मालमत्ताधारक पावत्या दाखवत असतील तर त्यांच्या थकबाकीची रक्कम

मालमत्ता करातून कमी करण्यात यावी. श्री. रशीद मामू, स. सभासद यांनी रणमसतपुरा भागातील उपस्थित केलेल्या प्रकरणांतील मागणी पत्रकाची परत तपासणी करण्यात यावी व बरोबर मागणीपत्र देण्यात यावे. इतःपर मागणी पत्रक देतांना ते बरोबर आहे खात्री प्रथम करण्यात यावी. संगणकीय देयकाचीही तपासणी करण्यांत यावी. संगणकीय देयकांचीही तपासणी करण्यात यावी.

**सौ. पद्मा शिंदे :** सिडकोतील काही नागरिकांनी घरांचा ताबा १९९४-९५ मध्ये घेतलेला आहे. मात्र त्यांना नळपट्टी १९९१-९२ पासून देण्यात येत आहे. तसेच चिश्चितया कॉलनीतील जे लोक कर भरत नसतील तर त्यांना नळ कनेक्शन देण्यात येऊ नये.

**श्री. विजयकुमार मेहेर :** एन-११ नवजीवन कॉलनीतील काही मालमत्ता धारकांकडे नळाचे कनेक्शन नाहीत. मात्र त्यांना नळपट्टी भरण्यांबाबत नोटीसेस देतात याचीही पहाणी करण्यात यावी.

**मा. सभापती :** उपरोक्त दोन्हीही बाबीची नोंद संबंधितानी घ्यावी.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** डीपीईपी कार्यक्रम राबवण्यिांसाठी जिल्हा परिषदेकडून महानगरपालिकेस काही शिक्षक मिळावयाचे होते. मात्र हे शिक्षक न आल्याने महानगरपालिकेस हा कार्यक्रम राबविण्यासाठी स्वतःच्या शिक्षकांना काम द्यावे लागत आहे. या प्रकरणांत महानगरपालिकेने वेळीच कार्यवाही केली असतील तर या शिक्षकांवरती करावा लागणारा खर्च वाचवता आला असता.

**शिक्षणाधिकारी :** या संदर्भाने जिल्हा परिषदेकडे पत्र पाठवले आहे. जानेवारी ९६ मध्ये या कामासाठी जिल्हा परिषदेकडून महानगरपालिकेस शिक्षक मिळणार आहेत.

**मा. सभापती :** हा उपक्रम राबविण्या जिल्हा परिषदेने महानगरपालिकेस शिक्षक द्यावे यासाठी तातडीने पाठपुरावा करण्यात यावा. हा खर्चही जिल्हा परिषदेकडून वसूल करण्यात यावा.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** महानगरपालिका शाळा भाडेही शासनाकडून अद्याप प्राप्त झालेले नाही. यामुळे महानगरपालिकेच्या तिजोरीवर बोजा पडतो. वेळेवर शासनाचा पाठपुरावा करून हे शाळा भाडे वसूल का केले जात नाही.

**मा. सभापती :** शासनाकडे जे शाळा भाडे थकीत आहे. त्या संदर्भाने शिक्षणाधिकाऱ्यांनी पाठपुरावा करून शाळा भाडे अनुदान प्राप्त करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी.

**विषय क्र. २३०/२ :**

दिनांक २१-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. गौतम खरात :** दि. ०४-१२-९५ च्या बैठकीत माहिती विचारल्यानुसार ५० लाईमनची पदे भरण्याबाबत त्यांना वेतनश्रेणी देण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली.

**सहाय्यक आयुक्त-२ :** या संदर्भाने पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

**श्री. अब्दुल रशीद खान :** दि. ०४-१२-९५ च्या स्थायी समिती बैठकीत प्रश्न विचारण्यात आला होता की, चार चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना जेष्ठता सूची डावलून

कामावर कसे घेण्यात आले, त्यांच्या स्टे विरुध्द संबंधित कोर्टात उच्च न्यायालयाचे आदेश सादर करण्यात यावेत.

**विधी सल्लागार :** या संदर्भाने महानगरपालिका पॅनवरील ही केस पहत असलेल्या वकीलाशी संपर्क साधला असता त्यांनी माहिती दिली की, सध्या लेबर कोर्टातील वकीलांचा संप चालू आहे. संप मिटनात पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** महाराष्ट्र डिस्टीलरी प्रकरणांबाबतही माहिती देण्यात यावी.

**विधी सल्लागार :** ऑगस्ट महिण्यांत या प्रकरणांची सुनावणी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांसमोर झाली होती. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिशांनी या प्रकरणांत कनहाल दिलेला आहे. मात्र तो पूर्ण नाही. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमुर्ती औरंगाबाद खंडपीठात येतील तेंव्हा पूर्ण निकालाचे वाचन केले जाईल असे चौकशीअंती समजते सध्या ०६-१-९६ पर्यंत कोर्टास नाताळाच्या सुट्ट्या आहेत. त्यानंतर मुंबईस जाऊन मा. मुख्य न्यायाधिशांकडे निकाल देण्याबाबत विनंती केली जाईल.

**श्री. महंमद मुश्ताक :** उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती जो पर्यंत औरंगाबाद खंडपीठात येऊन निकाल देणार नाहीत तोपर्यंत केवळ वाट पाण्यांपेक्षा मुंबईस उच्च न्यायालयात जाऊन सदर प्रकरणांत निकाल देण्याबाबत न्यायमुर्तींना विनंती करणे योग्य राहिल.

**मा. सभापती :** ही बाब उच्च न्यायालयात न्यायाधिशांच्या निदर्शनास आणून देण्यांत यावी. यामुळे महानगरपालिकेस तो पैसा मिळू शकेल. नाताळच्या सुट्ट्या संपताच मुंबईस जाऊन उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिशांना निकाल देण्याबाबत विनंती करण्यात यावी.

**श्री. अब्दुल रशिदखान :** दि. ०४-१०-९५ च्या बैठकीत किराडपुऱ्यातील नाल्याच्या संरक्षित भिंतीच्या अर्धवट कामसंदर्भाने माहिती विचारण्यात आली होती. ती माहिती सादर करण्याबाबत संबंधितास सूचना देण्यात याव्यात.

**कार्यकारी अभियंता :** या नाल्यात काही ठिकाणी अतिक्रमण झालेले असल्याने ही भिंत पूर्णपणे बांधण्यात आलेली नाही. येथील अतिक्रमण काढले गेल्यास संरक्षित भिंतीचे काम बांधकाम पूर्ण करणे शक्य होईल.

**मा. सभापती :** तेथील रहिवाशी स्वतः भिंत काढून घेत असतील तर त्यांना काढून टाकण्याबाबत सूचना देण्यात यावी. अन्यथा अतिक्रमण हटाव पथका मार्फत उचित कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** दिनांक ०४-१२-९५ रोजी स्थायी समिती बैठकीतील विषय क्र. २०८/३ वरील माहिती या बैठकीत सादर केल्यास प्रस्तावास मंजुरी देण्यात येणार होती. तसेच "लाईनचे लेव्हल बरोबर नसल्याने वारंवार लाईनचे चोकअप होते" हे वाक्य इतिवृत्तातून काढून टाकण्यांस मंजुरी देण्यात येते.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** दिनांक ०४-१२-९५ च्या स्थायी समिती बैठकीत मी ट्राफिक मटेरियल बाबत प्रश्न विचारला होता. त्याची माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी पोलिस विभागांशी संपर्क साधून त्यांना ट्राफिक सुविधांची आवश्यकता आहे काय, याबाबत विचारणा करावी. आठ दिवसांचे आत काम पूर्ण करण्यात यावे अन्यथा ते टेंडर रद्द करण्यात यावे.

**श्री. अब्दुल रशिद :** जो भाग एकदा रहिवाश क्षेत्रात आलेला आहे. व तेथे वसाहत निर्माण झालेली आहे. असा भाग पुन्हा आरक्षित करता येतो का या संदर्भाने दि. ०४-

१२-९५ रोजी संपन्न झालेल्या सभेत मी प्रश्न विचारला होता. ती सभागृहात देण्याबाबत संबंधित विभाग प्रमुखास सुचना देण्यात याव्यात.

**नगररचनाकार :** निवासी भागातील घरे जुनी झाली असतील तर अशा घरांना सर्वे करून ती डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये विविध कारणासाठी आरक्षित करता येतात. या संदर्भाने शासनाच्या गाईड लाईन्स नाहीत.

**मा. सभापती :** येत्या स्थायी समिती बैठकीत या संदर्भाने पुन्हा माहिती देण्यात यावी.

**ठराव :**

दि. ०४-१२-९५ च्या स्थायी समिती बैठकीच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तद्वतच प्रस्ताव क्र. २०८/३ सर्वानुमते मंजुर करण्यांत येतो. याच बरोबर "लाईनमध्ये लेव्हल बरोबर नसल्याने वारंवार लाईन चोकअप होते" हे महादेव सुर्यवंशी यांच्या निवेदनातील वाक्य प्रस्ताव क्र. २०८/३ मधून वगळण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३१/२ :**

अंजिठा डायनोनीस्टीक ॲड रिसर्च सेंटर यांनी दि. १२-१२-९५ रोजी अर्ज दिला की, दोनशे पन्नास (२५०) डॉक्टरांचा ग्रुप मिळून अद्यावत मशिनरी सी.टी. स्कॅनर, ८० लाखाची मागवित आहेत. डॉक्टरांचा ग्रुप मिळून मागवित असल्याने त्यावर जकात रुपये ३ लाख, २० हजार रुपये पैकी प्रथम १ लाख २० हजार. आयातीच्या वेळी १ लाख, आयातीच्या एक महिन्यानंतर व उर्वरित १ लाख आयातीच्या दिनांकाच्या दोन महिण्यानंतर व उर्वरित १ लाख आयातीच्या दिनांकाच्या दोन महिण्यानंतर हप्त्यात देण्याची विनंती केली आहे. तथापी रिसर्च सेंटर असल्यामुळे व २५० डॉक्टरांच्या संघाने (ग्रुपने मिळून) मागवित असल्याने स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अंजिठा डायनोनीस्टीक ॲड रिसर्च सेंटरच्या २५० डॉक्टरांच्या विनंतीवरून ते मागवित असलेल्या सी.टी. स्कॅन यंत्रावरील जकात करापोटी घेण्यात येणारी रक्कम रुपये ३ लाख, २० हजार रक्कम हप्त्याने खालीलप्रमाणे भरण्यास मान्यता देण्यात येते.

१) प्रथम आयातीच्या वेळी रु. १ लाख २० हजार
२) आयातीच्या एक महिन्यानंतर १ लाख व
३) आयातीच्या दिनांकानंतर दोन महिन्यानंतर १ लाख

वरील प्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३२/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन अधिसूचना क्र. वपुर-१२९०/सुधारणा-८८/सेवा-१० दि. २१-०१-९० अन्वये शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम १९८८ च्या वेतन अनुसूचित दर्शविल्याप्रमाणे रु. २०००-३५०० आणि २२००-४००० या दोन्हीसाठी एकच वेतनश्रेणी रु. २२००-४००० ही वेतनश्रेणी दिनांक ०१-०१-१९८६ पासून

मान्य केली आहे. त्याच धर्तीवर महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकारी यांना सुधारित वेतनश्रेणी रु. २२००-४००० ही लागू करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाच्या आरोग्य विभागांतर्गत काम करणाऱ्या वैद्यकिय अधिकाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम १९८८ च्या वेतन अनुसूचित दर्शविल्याप्रमाणे वेतनश्रेणी २०००-४००० ही दिनांक ०१-०१-१९८६ पासून मान्य केल्याप्रमाणे त्याच धर्तीवर महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३३/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कटकटगेट ते सिडको रस्ता या रस्त्यांवर सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या (विद्युत) सन १९९५-९६ च्या दरसूचीनुसार र. रुपये ८,०५,७३४ चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या र. रु. १० कोटीच्या अनुदानामूधन करण्यात येईल. अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कटकटगेट ते सिडको रस्ता या रस्त्यांवर सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ८,०५,७३४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३४/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गारखेडा ते टिळकनगर या ८० फुट रुंद रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार र. रु. २५,९३,९६४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या र. रु. १० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा ते टिळकनगर या ८० फुट रुंद रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. २५,९३,९६४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३५/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मिलकॉर्नर ते बस स्टँड या रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविणे व रेलींग बसविणेच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार र. रु. ५,५०,३२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च शासनाकडून मिळणाऱ्या र. रु. १० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. तरी र. रु. ५,५०,३२०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिलकॉर्नर बस स्टँड या रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविणे व रेलींग बसविणेच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या दरसूचीनुसार र. रु. ५,५०,३२०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३६/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, विनायकराव पाटील चौक ते बन्सीलालनगर पर्यंतच्या रस्त्यांमध्ये दुभाजक टाकणेच्या कामासाठी सा. बां. खात्याच्या दरसूचीनूसार र. रु. २,६४,२६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त र. रु. १० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविण्यात आल्याप्रमाणे विनायकराव पाटील चौक ते बन्सीलालनगर पर्यंतच्या रस्त्यांमध्ये दुभाजक टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,६४,२६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३७/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सावरकर चौक ते जुने उच्च न्यायालया पर्यंतच्या रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविण्याच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनूसार र. रु. १,८८,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून सन १९९५-९६ वर्षाकरिता मिळणाऱ्या र. रु. १० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सावरकर चौक ते जुने उच्च न्यायालया पर्यंतच्या रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,८८,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३८/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, श्री. गजानन महाराज मंदिर ते पीरबाजार पर्यंतच्या रस्त्यामध्ये दुभाजक टाकण्याच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनूसार रक्कम रु. ८,३६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या र. रु. १० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. गजानन महाराज मंदिर ते पीरबाजार पर्यंतच्या रस्त्यामध्ये दुभाजक टाकण्याच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसूचीनूसार तयार करण्यात आलेल्या र. रु. ८,३६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३९/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक रस्त्यामधील दुभाजकाचे सौंदर्यीकरण करण्याच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनूसार रक्कम रुपये ५,५९,८१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या र. रु. १० कोटीच्या अनुदानातून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक रस्त्यामधील दुभाजकाचे सौंदर्यीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,६९,६१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४०/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मिलकॉर्नर ते औरंगपुरा या रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविण्याच्या कामासाठी र. रु. ३,०२,९८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन ९५-९६ या वर्षाकरिता महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या र. रु. १० कोटीच्या अनुदानातून करण्यात येईल. तरी र. रु. ३,०२,९८०/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिलकॉर्नर ते औरंगपुरा या रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,०२,९८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४१/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिल्लेखाना ते सावरकर चौक या रस्त्यामधे असलेल्या मध्य दुभाजकाची उंची वाढविण्याच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम. रु. १,४९,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त र. रु. १० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ व अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्लेखाना ते सावरकर चौक या रस्त्यामधे असलेल्या मध्य दुभाजकाची उंची वाढविण्याच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४९,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४२/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिल्लेखाना ते मोंढा रोडपर्यंतच्या रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविण्याच्या कामाकरिता र.रु. ३,१६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील महाराष्ट्र शासनाकडून सन ९५-९६ या

वर्षाकरिता मिळणाऱ्या र. रु. १० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. तरी र. रु. ३,१६,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्लेखाना ते मोंढा रोडपर्यंतच्या रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविण्याच्या कामाकरिता र. रु. ३,१६,०००/- च्या तयार करण्यात आलेल्या ंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३३/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिव्हील हॉस्पिटल ते रंगीन गेट या रस्त्यावर असलेल्या मध्य दुभाजकाची उंची वाढविणे व रेलींग लावण्याच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार र. रु. ९,४५,०७३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च शासनाकडून मिळणाऱ्या र. रु. १० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल.

तरी र. रु. ९,४५,०७३/- चे अंदाजपत्रकास मंजुरीबाबत प्रयत्न विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिव्हील हॉस्पिटल ते रंगीन गेट या रस्त्यावर असलेल्या मध्य दुभाजकाची उंची वाढविणे व रेलींग लावण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,४५,०७३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४४/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मजनुहिल ते लेबर कॉलनी या रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविणे व रेलींग बसविण्याच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार र.रु. १३,८८,०४६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन ९५-९६ वर्षासाठी महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या र. रु. १० कोटीच्या अनुदानातून करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मजनुहिल ते लेबर कॉलनी या रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविणे व रेलींग बसविण्याच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या ९४-९५ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेल्या र.रु. १३,८८,०४६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४५/१६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्कमील कॉलनी येथे दगडी गटार बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रकीय र. रु. २,०४,५००/- ला ठराव ४६/६ दि.१०-०७-९५ च्या स्थायी समितीमध्ये मंजुरी मिळाली असून उपरोक्त कामासाठी निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/निविदा/२२/९५ दि.३१-०८-९५ अन्वये बी-१ नमुन्यात निविदापत्रके

मागविण्यांत आली असता विक्री झालेल्या १६ निविदापैकी दर भरलेल्या २ निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सलीम पटेल | अं. प. दरापेक्षा ३% जास्त |
| २) | श्री. महंमद रऊफ | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दराची निविदा श्री. महंमद रऊफ यांची आहे. तरी श्री. महंमद रऊफ यांची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमील कॉलनी येथे दगडी गटार बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दराची निविदा श्री. महंमद रऊफ यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४६/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो. मिलिंदनगर, नागसेन नगर स्लम भागात जुन्या डांबरी खडी रस्त्याच्या बाजुवरील अतिक्रमण काढणे व पुर्नखडीकरण करणेच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय र. रु. २,२५,०००/- चे . सा. बां. खात्याच्या दरसूची सन १९९३-९४ प्रमाणे तयार करण्यात आले असून त्या मा. आयुक्तांनी दि. १०-११-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच सदरील कामाकरिता मनपाचे सन ९५-९६ अर्थसंकल्पात पुर्नडांबरीकरण या शिर्षात १० लाखाची तरतूद करण्यात आली आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिलिंदनगर, नागसेन नगर स्लम भागात जुन्या डांबरी खडी रस्त्याच्या बाजुवरील अतिक्रमण काढणे व पुर्नखडीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदर खर्च पुर्नडांबरीकरण अंतर्गत १० लाखाच्या तरतूदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४७/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो. नागसेननगर कबीरनगर येथे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रु. ६,२७,२००/- सा. बां. विभाग यांची दरसूची सन १९९२-९४ प्रमाणे तयार करण्यात आले असून मा. प्रशासकांनी दि. ०२-०५-९४ रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती. त्याप्रमाणे सदरील कामाची निविदा दि. २१-०५-९४ मागविण्यात आली होती.

दि. २१-०५-९४ द्वारे मागवलेली निविदा पावसाळा सुरू झाल्यामुळे काम होऊ शकले नाही. त्यानंतर पुन्हा दि. २९-११-९४ द्वारे प्राप्त झालेली निविदा मे. गुरुनानक एजन्सी यांनी सदरील कामाचे कार्यादेश मनपा/स्लम-१/६६२/९५ दि. २७-०३-९५ द्वारे मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेस फक्त एकच मोहरंबद निविदा प्राप्त झाली. ती निविदा मा. मुख्य लेखा परिक्षक व उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आली असता, गुततेदाराने दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

श्री. ए. सी. कोठारी अं.प. दरापेक्षा ३.९९% जास्त

स. नगरसेवक श्री. गंगाधर गाडे साहेब वेळोवेळी सदरील काम होती घेणेबद्दल सूचना करीत असल्यामुळे व सदरील काम स्लम विभागाचे असल्याने लहान गल्ल्यामध्ये अडचणीचे असल्याने अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.९९ टक्के जास्त दराची श्री. ए. सी. कोटारी

यांची निविदा स्विकारणेच्या प्रस्ताव विचारार्थ सादर. सदर काम महापालिका झोपडपट्टी विकास अंतर्गत ९५-९६ डांबरीकरण ह्या शिर्षातंर्गत करण्याचा प्रस्ताव आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. नागसेननगर, कबीरनगर येथे र.रु. ६,२७,२००/-चे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेली श्री. ए. सी. कोठारी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.९९% जास्त दराची निविदा स्विकारणेस तसेच सदर काम मनपा झोपडपट्टी विकास अंतर्गत ९५-९६ डांबरीकरण ह्या शिर्षाअंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४८/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोगलपुरा (स्लम) येथील रस्त्यांचे डांबरीकरण व पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता सा. बां. खाते च्या वर्ष ९४-९५ च्या दससूचीनुसार र. रु. २,७७,५५०/- चे अदंाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील कामाचा खर्च डांबरीकरण  व पुर्नडांबरीकरण करणे रु. १००.०० लाख शिर्षकातून करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची दि. १७-११-९५ ला मान्यता प्राप्त झाली आहे. करिता अंदाजपत्रक र. रु. २,७७,५५०/- मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोगलपुरा (स्लम) येथील रस्त्यांचे डांबरीकरण व पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता सा. बां. खातेच्या सन ९४-९५ च्या दससूचीनुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. २,७७,५५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च डांबरीकरण /पुर्नडांबरीकरण करणे रु. १०.०० लाख शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४९/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, अलंकार गृह निर्माण संस्था येथील नियोजित उद्यानात अंतर्गत सुधारणा करावयाची आहे. यासाठी सा. बां. खातेचे सन ९४-९५ च्या दससूचीनुसार र. रु. १,५८,१००/- चे अदंाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च विकास योजना अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक रु. १,५८,१००/- चा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अलंकार गृह निर्माण संस्था येथील नियोजित उद्यानात अंतर्गत सुधारणा करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,५८,१००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च विकास योजना अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५०/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. आंबेडकर नगर येथील अस्तित्वात असलेली खडी व डांबरी रस्ते दुरुस्त करणे व नविन खडी रस्ते तयार करण्याच्या कामाकरिता र. रु. ४,२३,४५०/- चे अंदाजपत्रक सा. बां. विभाग औरंगाबाद यांचे दरसूची

१९९४-९५ प्रमाणे तयार करण्यांत आले असून त्यास मा. आयुक्तांनी दि. १२-१२-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदरील कामाकरिता सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत नवीन खडी रस्ते या ४५ लाख तरतूदीच्या शिर्षा अंतर्गत करण्यात येईल. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. आंबेडकर नगर येथील अस्तित्वात असलेले खडी व डांबरी रस्ते दुरुस्त करणे व नविन खडी रस्ते तयार करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,२३,४५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च ९५-९६ च्या अर्थसंकल्पीय ४५ लाख तरतूदीतून झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत नवीन खडी रस्ते या शिर्षाअंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५१/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. रमानगर येथे ३०० मीमी व्यासाची आरसीसी अर्धगोलाकार गटार बांधणे व अस्तित्वात असलेली गटार दुरुस्त करणेकरिता र. रु. ७,०५,१००/- चे अंदाजपत्रक सा. बां. विभाग औरंगाबाद यांचे दरसूची १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्तांनी दि. ०१-१२-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदरील कामाकरिता मनपाचे सन १९९५-९६ चे अर्थसंकल्पात झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत खुली गटार या शिर्षांतर्गत रु. ५० लाखाची तरतूद केली आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. रमानगर येथे ३०० मीमी व्यासाची आरसीसी अर्धगोलाकार गटार बांधणे व अस्तित्वात असलेली गटार दुरुस्त करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ७,०५,१००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत खुली गटार या शिर्षांतर्गत असलेल्या रु. ५० लाखाच्या तरतूदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५२/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. आंबेडकर नगर स्लम भागात मुख्य दगडी गटार बांधणे त्यावर आवश्यक ठिकाणी स्लॅब टाकणेच्या कामाकरिता र. रु. ४,९९,९५०/- चे अंदाजपत्रक सा. बां. खात्याच्या सन ९४९५ दरसूचीनुसार तयार करण्यसात आले असून त्यास मा. आयुक्तांनी दि. १२-१२-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदर कामाकरिता मनपाचे सन ९५-९६ च्या अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत खुली गटार या शिर्षांअंतर्गत असलेल्या रु. ५० लाखाची तरतूद केली आहे. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. आंबेडकर नगर स्लम भागात मुख्य दगडी गटार बांधणे त्यावर आवश्यक ठिकाणी स्लॅब टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,९९,९५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च सन ९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी

सुधारणा कार्यक्रम अंतर्गत खुली गटार या शिर्षांतील रु. ५० लाखाच्या तरतूदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५३/२४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. रमानगर येथे डांबरी रस्ते तयार करण्याकरिता अंदाजपत्रकीय र. रु. ४,९०,०००/- चे तयार करण्यात आले असून मा. आयुक्तांनी दि. १७-०६-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून सदर कामासाठी विविध सूचना क्र. मनपा/लेखा/नि/३४/९५ दिनांक १०-११-९५ पर्यंत फक्त एक कोरी निविदा विकल्या गेली व स्विकारण्याच्या अंतिम दिनांक सदर निविदा दि. १८-११-९५ रोजी मोहरबंद निविदा प्राप्त झाली. दि. २१-११-९५ ला उपस्थित गुत्तेदारासमक्ष निविदा उघडली असता मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५५% जास्त दराची निविदा आहे.

वरील निविदेतील दर जास्त असल्यामुळे संबंधित गुत्तेदार मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांना पत्र देऊन वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यानुसार दि. १२-१२-९५ रोजी वाटाघाटी होऊन मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांनी १०.५५% जास्त ऐवजी अ. पं. दरापेक्षा ४% जास्त दराने काम करण्यास सम्मती दिली आहे.

तसेच सदरील कामाकरिता मनपा झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत डांबरी रस्ते या शिर्षकाखाली सन ९५-९६ अर्थसंकल्पीय र. रुपये १,००,००,०००/- ची तरतूद करण्यात आली आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. रमानगर येथे डांबरी रस्ते तयार करण्यांच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या एकमात्र निविदा धारक मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याशी झालेल्या वाटाघाटीनुसार अं.प. दरापेक्षा १०.५५% जास्त दराऐवजी अं. प. दरापेक्षा ४% जास्त दराने उपरोक्त काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदर काम ९५-९६ च्या अर्थसंकल्पातील झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम डांबरी रस्ते या शिर्षकांतर्गत असलेल्या १,००,००,०००/- च्या तरतूदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५४/२५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. ब्रिजवाडी येथे अस्तित्वात असलेल्या गटारीची विशेष दुरुस्ती करणे व रोड क्रॉस पाईप बदलणे व दगडी गटार बांधण्याच्या कामाकरिता र. रु. २,६०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्तांची दि. ०२-०६-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील कामासाठी निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/३४/९५ दिनांक ०४-११-९५ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. १०-११-९५ पर्यंत एकूण १६ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या पैकी स्विकारण्याच्या अंतिम दि. १८-११-९५ रोजी सहा मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या दि. २१-११-९५ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता गुत्तेदारांनी दिलेला तुलनात्मकदर तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस. एम. हक्क | ११.२८% कमी |
| २) | श्री. शेख सलीम अहमद | अं. प. दरापेक्षा १७.१०% कमी |
| ३) | श्री. सलीम अहमद | अं. प. दरापेक्षा १६.९९% कमी |

| | | |
|---|---|---|
| ४) | श्री. बी. ए. काल्डा | अं. प. दरापेक्षा १६.११% कमी |
| ५) | श्री. आर. बी. चव्हाण | २५% कमी |
| ६) | श्री. एस. बी. इंगळे | १२.५५% कमी |

वरील पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.२८% कमी दराची श्री. एस. एम. हक्क यांची निविदा असून सदरील काम झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतगत देखभाल दुरुस्ती या शिर्षकांतर्गत करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविण्यात आलेल्या मो. ब्रिजवाडी येथे अस्तित्वात असलेल्या गटारीची विशेष दुरुस्ती करणे व रोड क्रॉस पाईप बदलणेच्या व दगडी गटार बांधण्याच्या र. रु. २,६०,०००/- च्या कामाकरिता पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५५/२६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. इटखेडा येथे डांबरी व खडी रस्ते तयार करण्याकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४,९५,३००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्याकरिता पत्र क्र. मनपा/लेखा/नि/३४/९५ दिनांक ०४-११-९५ द्वारे शहरातील दैनिक वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्यात आले. विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण एकच निविदा विक्री झाली व स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास दर भरून सिलबंद निविदा फक्त एक प्राप्त झाली. सदरील निविदा दि. २१-११-९५ रोजी मुख्य लेखा परिक्षक यांच्या दालनात उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आली असता त्यास खालील प्रमाणे दर दर्शविलेली आहेत.

१) मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन अं. प. दरापेक्षा ७.११% जास्त

निविदामध्ये दिलेली ७.९१% जास्त दर असल्यामुळे संबधित गुत्तेदार मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांना पत्र घेऊन वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता दिनांक १२-१२-९५ रोजी वाटाघाटी होऊन मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांनी त्यांच्या निविदेतील अ. प. दरापेक्षा ७.७१% जास्त दराऐवजी अं. प. दरापेक्षा ३% जास्त दराने काम करण्यास सम्मती दिली आहे.

तसेच सदर कामाकरिता मनपा झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमांतर्गत डांबरी रस्ते या शिर्षकाखाली रु. १,००,००,०००/- सन ९५-९६ या अर्थसंल्पीय तरतूद करण्यांस आली असून प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. इटखेडा येथे डांबरी व खडी रस्ते तयार करण्याच्या र. रु. ४,९५,३००/- च्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा धारक मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याशी झालेल्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.११% जास्त दराऐवजी अं. प. दरापेक्षा ३% जास्त दराने काम करून घेण्यास तसेच सदर खर्च मनपा झोपडपट्टी सुधारणा

कार्यक्रमांतर्गत डांबरी रस्ते या शिर्षकाखाली रु. १ कोटीच्या तरतूदीतून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५६/२७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. समतानगर भागात खांडकी रस्ते तयार करण्यांच्या कामाकरिता र. रु. २,४७,५१०/- चे अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. ०२-०८-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील कामासाठी निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/३४/९५ दिनांक ०४-११-९५ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक १०-११-९५ पर्यंत एकूण चौदा कोऱ्या निविदा विकल्या गेल्या पैकी स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास फक्त दोन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या दिनांक २१-११-९५ रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्याृ. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सय्यद सिराजोद्दिन | १६.९०% अं. प. दरापेक्षा कमी |
| २) | श्री. एस. एन. मंडोरे | अ. प. दरापेक्षा ९% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९०% दराची श्री. सय्यद सिराजोद्दिन यांची निविदा असून सदर काम झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमांतर्गत "दुर्बल घटक" या शिर्षांतर्गत करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. समतानगर भागात खांडकी रस्ते तयार करण्यांच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९०% कमी दराची श्री. सय्यद सिराजोद्दिन यांची निविदा स्विकारणेस तसेच सदर खर्च झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमांतर्गत "दुर्बल घटक" या शिर्षांखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५७/२८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संजयनगर येथे २५०,१५० व १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन १९९२-९३ नुसार रक्कम रु. ३,७६,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र. ८९/५ दि. २२-०९-९५ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. कार्यालयाची निविदा सूचना क्र.३४/९५ नुसार दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शे. शकील अहमद | अं. प. दरापेक्षा ३% कमी |
| २) | श्री. सलीम पटेल | अं. प. दरापेक्षा ३.९९% कमी |
| ३) | श्री. मन्नाव खान | अं. प. दरापेक्षा ४.०९% कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अं. प. दरापेक्षा ४.०९% कमी दराची श्री. मन्नाव खान यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर येथे २५०,व १५० व १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या

सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ४.०९% कमी दराची श्री. मन्नाव खान यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५८/२९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वसंतनगर येथे १००, व १५० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन ९४-९५ नुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,९८,६८५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.१२६/१० दि. २८-०९-९५ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. त्या अनुषंगाने निविदा सूचना क्र. ३४/९५-९६ जी दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या असता निविदा अंतिम तारखेपर्यंत एकुण सात निविदा विक्री झाल्या पैकी स्विकारणेच्या अंतिम तारखेस एकूण चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. रुबी कन्स्ट्रक्शन | १५.०५% कमी |
| २) | श्री. आर.एल. बारवाल | ३.३३% कमी |
| ३) | श्री. के. पी. काला | १३.५% कमी |
| ४) | श्री. सलीम पटेल | ९.९२% कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.०५% कमी दराची निविदा मे. रुबी कन्स्ट्रक्शन यांची आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वसंतनगर येथे १००, व १५० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.०५% कमी दराची मे. रुबी कन्स्ट्रक्शन यांची यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५९/३० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गणेश कॉलनी येथे १००, १५०, २०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ३,८२,९००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.११८/२ दि. २८-०९-९५ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. या कार्यालयाची निविदा सूचना क्र. ३४/९५-९६ जी की दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सहा निविदा विक्री झाल्या पैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण पाच सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मन्नाव खान | १०% कमी |
| २) | श्री. सलीम पटेल | १०.१०% कमी |
| ३) | श्री. शेख शकील अहमद | ३.५% कमी |
| ४) | श्री. आर.एल. बारवाल | ३% कमी |
| ५) | श्री. शेख एकबाल अहमद | ७% कमी |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.१०% कमी दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा आहे. निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणेश कॉलनी येथे १००, १५०, २०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.१०% कमी दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६०/३१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरानगर बाजयीपुरा येथे २००, मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसूचीनुसार र. रु. ३,९२,२००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.१२०/४ दि. २८-९-९५ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. ह्या कामासाठी दैनिक वर्तमानपत्रात बी-१ निविदा प्रसिध्दीस देण्यात येऊन निविदा मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सहा कोऱ्या निविदा विक्री झाल्या. पैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शे. शकील अहमद | ३% कमी |
| २) | श्री. सलीम अहमद | ९.१०% कमी |
| ३) | श्री. सलीम पटेल | १२.५०% कमी |
| ४) | श्री. आर.एल. बारवाल | ४% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.५०% कमी दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा आहे. निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर बाजयीपुरा येथे २००, मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.१०% कमी दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६१/३२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, न्यु शांतिनिकेतन कॉलनी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन ९४-९५ नुसार रक्कम रु. ३,८४,८८०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.१२५/९ दि. २८-९-९५ अन्वये मंजुरी देण्यात आली. आहे. कार्यालयाची निविदा सूचना क्र. ३४/९५-९६ दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण अकरा निविदा विक्री झाल्या. पैकी स्विकारणेच्या अंतिम तारखेस एकूण सात निविदा सिलबंद प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | मे. रुबी कन्स्ट्रक्शन | २५.३५% कमी |
| २) | श्री. शेख शरीफ | ७.०१% कमी |
| ३) | श्री. एस. एम. मंडोरे | १०.०९% कमी |
| ४) | श्री. शे. शकील अहमद | ४% कमी |

| | | |
|---|---|---|
| ५) | श्री. सलीम पटेल | १३.२०% कमी |
| ६) | श्री. बी. ए. काल्डा | १२.६०% कमी |
| ७) | श्री. स. अथार अली | ११.११% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.३५% कमी दराची निविदा मे. रुबी कन्स्ट्रक्शन यांची आहे. तरी निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु शांतिनिकेतन कॉलनी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.३५% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६२/३३ :**

कार्यकारी अभियंता (पा. पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. बेगमपुरा डिंबर गल्ली येथील विद्यापीठ संरक्षित भिंतीपासून नाल्यापर्यंत नविन ४५० सी. सी. व्यासाची आर. सी. सी. अर्धगोलाकार गटार बनविणे च्या कामाकरिता र. रु. ४,९०,५००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.९५/११ दि. २८-९-९५ नुसार मंजुरी मिळालेली आहे. सदर कामाची निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/५४/९५ दि. ०४-११-९५ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्दीस दिली असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ (८) निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा मा. मुख्य लेखा परिक्षक यांचे दालनात दि. २२-११-९५ रोजी उघडण्यात आल्या. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आर. बी. चव्हाण | अं. दरापेक्षा २४% कमी |
| २) | श्री. एस. एम. हक | २२.२५% कमी दराने |
| ३) | श्री. मे. जयश्री क. कं. | १७.६५% कमी दराने |
| ४) | श्री. सलीम अहमद | १५.०१% कमी दराने |
| ५) | श्री. बदर बीन सलीम | १४.९०% कमी दराने |
| ६) | श्री. मौला अलीयारखान | ९.०१% कमी दराने |
| ७) | श्री. आर.एल. बारवाल | ५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४% कमी दराची श्री. आर. बी. चव्हाण यांची निविदा आहे. सदरील काम ५३.७ लाख मधून प्रस्तावित आहे. सदरील श्री. आर. बी. चव्हाण यांची अं. प. दरापेक्षा २४% कमी दराची निविदेस मा. आयुक्तांनी दि. ७-१२-९५ ला मंजुरी दिलेली आहे. निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बेगमपुरा डिंबर गल्ली येथील विद्यापीठ संरक्षित भिंतीपासून नाल्यापर्यंत नविन ४५० सी. सी. व्यासाची आर. सी. सी. अर्धगोलाकार गटार बनविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४% दराची श्री. आर. बी. चव्हाण यांची निविदा स्विकारणेस तसेच सदर खर्च झोपडपट्टी आणि शहरातील इतर भागामध्ये खुल्या गटारी बांधणे (बजेट ५३.०७ लाख) मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६३/३४ :**

सहाय्यक आयुक्त-१ मनपा यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेतील रोजंदारी वाहन चालकांनी शासन निर्णय क्र. मनपा-१९९४/३०/सेवा-१०/मंत्रालय, मुंबई दिनांक २७-०४-९४ रोजंदारी अस्थापनेवरील कामागारांचे दि. ०१-०१-९४ पासून दैनिक दर दर्शविणारे विवरण भाग (क) कामगार नुसार दैनिक वेतनाचे दर रु. ६५.७५/- या प्रमाणे देण्याची मागणी केलेली आहे. सध्या यांत्रिकी विभागामध्ये २३ वाहन चालक दैनिक वेतनावर कार्यरत आहेत.

करिता दैनिक वेतनावरील वाहन चालकांना दै. वेतन रुपये ४६.६५ ऐवजी रुपये ६५.७५ देण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय क्र. मनपा-१९९४/३०/सेवा-१०/मंत्रालय, मुंबई दिनांक २७-०४-९४ रोजंदारी अस्थापनेवरील कामागारांचे दि. ०१-०१-९४ पासून दैनिक दर दर्शविणारे विवरण भाग (क) कामगार प्रमाणे महानगरपालिकेतील यांत्रिकी विभागातील दैनिक वेतनावरील वाहन चालकांना रुपये ४६.६५ ऐवजी रु. ६५.७५ प्रतिदिन (रुपये पासष्ट पैसे पंचाहत्तर मात्र) दैनिक वेतन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरचे दैनिक वेतनाचे दर शासन निर्णयाच्या दिनाकापासून वाहन चालकांना लागू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६४/३५ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण ह्यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. बुक्कलगुडा येथे जुनी ड्रेनेज लाईन बदलून नविन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता र. रु. ४,८२,४००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ९४/१० दि. ११-९-९५ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना नोटीस क्र. मनपा/लेखा/नि/३४/९५ दि. ०४-११-९५ अन्वये निविदा मागविण्यात आल्य असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकन तीन निविदा प्रत्यक्ष प्राप्त झाल्या. त्या दि. २२-११-९५ रोजी मा. मुख्य लेखा परिक्षक ह्यांचे समक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सलीम पटेल | ९.९९% अं. प. दरापेक्षा कमी |
| २) | मे. रुबी कन्स्ट्रक्शन | ८.०७% कमी |
| ३) | श्री. आर. एल. बारवाल | ६.००% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९ टक्के कमी दराची श्री. सलीम पटेल ह्यांची निविदा आहे. सदरील काम देखभाल व दुरुस्ती ९५-९६ या शिर्षकाधून प्रस्तावित आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बुक्कलगुडा येथे जुनी ड्रेनेज लाईन बदलून नविन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९ टक्के कमी

दराची श्री. सलीम पटेल ह्यांची निविदा आहे. सदरील काम देखभाल व दुरुस्ती ९५-९६ या शिर्षकाधून प्रस्तावित आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**विषय क्र. २६५/३६ :**

उप आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, वित्तीय खर्च सन १९९६-९७ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ व कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने दि. २०-०२-९६ रोजी किंवा ह्यापूर्वी निश्चित करणे व मंजूर करणे आवश्यक आहे.

त्यानुसार सन १९९६-९७ ला वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे दर प्रस्तावित आहेत. खालील कराचे दर हे कर योग्यमुल्यावर आकारले जातील. (अ) महानगरपालिकेचे दर.
(अ) महानगरपालिकेचे दर.

| अ. क्र. | कराचे नांव | सन १९९५-९६ चे दर करयोग्य मुल्य दर | | सन १९९६-९७ करिता प्रस्तावित दर करयोग्य मुल्य दर | |
|---|---|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | | | |
| | | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% |
| | | १००१ ते १०००० | २४% | १००१ ते १०००० | २४% |
| | | १०००१ ते २०००० | २५% | १०००१ ते २०००० | २५% |
| | | २०००१ ते ५०००० | २६% | २०००१ ते ५०००० | २६% |
| | | ५०००१ ते १००००० | २७% | ५०००१ ते १००००० | २७% |
| | | १००००० ते पुढे | २८% | १००००० ते पुढे | २८% |
| २. | सर्वसाधारण पाणीपट्टी | -"- | - | - | - |
| ३. | साफसफाई कर | -"- | - | ३% कर योग्य मुल्यावर | ३% |
| | अ निवासी वापर | | | | |
| | ब निवासेत्तर वापर | -"- | ६% | -"- | ६% |
| ४. | वृक्ष कर | -"- | १% | -"- | १% |
| ५. | अग्निशमन कर | -"- | १% | -"- | १% |
| ६. | मनपा शिक्षण कर | -"- | १% | -"- | १% |
| ७. | पथ कर | -"- | १% | -"- | १% |
| ८. | जलनिःसारण लाभ कर | -"- | १% | -"- | १% |
| ९. | जललाथ कर | -"- | १% | -"- | १% |
| १०. | मोकळ्या व सहान जागेचा कर | करयोग्य मुल्यावर सामान्य कराच्या दराने | | करयोग्य मुल्यावर सामान्य कराच्या दराने | |

| अ. क्र. | करयोग्य मुल्य | राज्य शिक्षण कर | | रोजगार कमी कर |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | निवासेत्तर | निवासेत्तर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | १ ते ७४ | - | - | - |
| २. | ७५ ते १४९ | २% | ४% | १% |
| ३. | १५० ते २९९ | ३% | ६% | १.५% |
| ४. | ३०० ते २९९९ | ४% | ८% | २.०% |
| ५. | ३००० ते ५९९९ | ५% | १०% | २.५% |
| ६. | ६००० ते त्यापेक्षा जास्त | ६% | १२% | ३% |

वरील प्रमाणे "अ" व "अ" हे कर १९९५-९६ मध्ये अस्तित्वात होते तेच सन ९६-९७ साठी प्रस्तावित करण्यात आलेले आहेत.

मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर शासनाचे नियमाप्रमाणे करयोग्य मुल्यावर १०% दराने सन १९९६-९७ या वर्षातही आकारले जातील. तथापी वरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वित्तीय वर्ष सन १९९६-९७ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांवरील मालमत्ता कराचे दर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ व कलम ९९ अन्वये खालील प्रमाणे मालमत्ता कराचे दरास सर्वानुमते सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. खालील कराचे दर हे करयोग्य मुल्यावर आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

(अ) महानगरपालिकेचे दर.

| अ. क्र. | कराचे नांव | सन १९९५-९६ चे दर करयोग्य मुल्य दर | | सन १९९६-९७ करिता प्रस्तावित दर करयोग्य मुल्य दर | |
|---|---|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | | | |
| | | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% |
| | | १००१ ते १०००० | २४% | १००१ ते १०००० | २४% |
| | | १०००१ ते २०००० | २५% | १०००१ ते २०००० | २५% |
| | | २०००१ ते ५०००० | २६% | २०००१ ते ५०००० | २६% |
| | | ५०००१ ते १००००० | २७% | ५०००१ ते १००००० | २७% |
| | | १००००० ते पुढे | २८% | १००००० ते पुढे | २८% |
| २. | सर्वसाधारण पाणीपट्टी | -"- | - | - | - |
| ३. | साफसफाई कर | -"- | - | ३% कर योग्य मुल्यावर | ३% |
| | अ निवासी वापर | | | | |
| | ब निवासेत्तर वापर | -"- | ६% | -"- | ६% |
| ४. | वृक्ष कर | -"- | १% | -"- | १% |
| ५. | अग्निशमन कर | -"- | १% | -"- | १% |
| ६. | मनपा शिक्षण कर | -"- | १% | -"- | १% |
| ७. | पथ कर | -"- | १% | -"- | १% |
| ८. | जलनिःसारण लाभ | -"- | १% | -"- | १% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कर | | | | |
| ९. | जललाथ कर | -"- | १% | -"- | १% |
| १०. | मोकळ्या व सहान जागेचा कर | करयोग्य मुल्यावर सामान्य कराच्या दराने | | करयोग्य मुल्यावर सामान्य कराच्या दराने | |

| **अ. क्र.** | **करयोग्य मुल्य** | **राज्य शिक्षण कर** | | **रोजगार कमी कर** |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | निवासेत्तर | निवासेत्तर |
| १. | १ ते ७४ | - | - | - |
| २. | ७५ ते १४९ | २% | ४% | १% |
| ३. | १५० ते २९९ | ३% | ६% | १.५% |
| ४. | ३०० ते २९९९ | ४% | ८% | २.०% |
| ५. | ३००० ते ५९९९ | ५% | १०% | २.५% |
| ६. | ६००० ते त्यापेक्षा जास्त | ६% | १२% | ३% |

वरील प्रमाणे प्रस्तावित कर १९९५-९६ साठी आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर शासनाचे नियमाप्रमाणे करयोग्य मुल्यावर १०% दराने सन १९९६-९७ या वर्षासाठी आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६६/३७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गोलाकार तसच चौकोनी एस.एफ.आर. सी. रींग व ढापे पुरवठा करणेबाबत प्रस्ताव क्र. ३१० दि. २८-०४-९५ अन्वये के.के. मेनहोल यांचेकडून खालील दर मान्य केल्याप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | गोलाकार रिंग व ढापे | ७४८/- प्रति जोड |
| २) | चौकोनी १००० x ७०० x ५५० x ५० | ४७२/- प्रति नग |
| ३) | चौकोनी ७०० x ५५० x ५० | ३०५/- प्रति नग |

पुरवठा करण्यात आला निविदेप्रमाणे आतापावेतो मालाचा पूर्ण पुरवठा झाला असून जलनिःसारण व पाणी पुरवठा विभागांतर्गत विविध कामावर गोलाकार रिंग व ढापे वापरण्यांत आले आहेत. सद्यःस्थितीत गोलाकार रिंग व ढापे शिल्लक नसल्यामुळे जलनिःसारण विभागांची विविध कामे खोळंबली आहेत. मेन होल्सवर ढोपे नसल्यामुळे आघात होण्यांचा / नविन लाईन माती व कचरा गेल्यामुळे चोकअप होण्याचा संभव आहे.

तरी मा. आयुक्त यांचे तजविजीनुसार सद्यःस्थितीत २००० नग गोलाकार रिंग व ढापे खरेदी करणेस्तव शिफारस केली आहे.

आर्थिक वर्ष संपण्यास जवळजवळ तीन महिने शिल्लक असून त्या मुदतीत देखभाल व दुरुस्तीची तसेच मुख्य जलनिःसारण वाहिनीची कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने वरील पुरवठादार मे. के. के. मेनहोल्स नाशिक यांचेकडून मान्य झालेल्या दराप्रमाणे म्हणजेच ७४८/- प्रतिरिंग व ढापा या प्रमाणे जास्तीचे लागते २००० नगाजचे एकूण रक्कम

रुपये १४.९६ लक्ष रुपयांस व मे. के. के. मेनहोल्स यांचेकडून खरेदी करण्यास प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलनि:सारण विभागाची देखभाल व दुरुस्तीची तसेच मुख्य जलनि:सारण वाहीनीची कामे पूर्ण करण्यांच्या दृष्टीने आवश्यक असलेले गोलाकार रिंग व ढापे यापूर्वी खरेदी केलेल्या म्हणजेच रुपये ७४८/- प्रति रिंग व ढापा या दराने के. के. मेनहोल्स ॲण्ड ग्रिव्हज नाशिक यांच्याकडून खरेदी करण्यांत येणाऱ्या २००० (रिंग व ढापे) खरेदी करण्यांकरिता रक्कम रुपये १४.९६ लाखाच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६७/३८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या बांधकामाकरिता सिमेंटची अत्यंत गरज आहे. त्यासाठी कार्यालयातर्फे निविदा/राअ/भांडार/४५५/९५ दि. २२-११-९५ मे. टन सिमेंट खरेदीची निविदा प्रसिदी केली असता त्यात ४ निविदा विकल्या गेल्याव ४(चार) निविदा दि. ०७-१२-९५ रोजी स्विकारण्यांत आल्या. त्यात सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया यांचे दर सर्वात कमी आहे. त्या बाबतीत प्रस्ताव सादर केला असता मा. आयुक्त साहेबांनी दि. ११-१२-९५ ला आदेश दिला की, सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांना सिमेंटच्या दराबाबत अजून काही दर कमी करू शकता का तसेच पुरवठा व सिमेंट ठरविण्यांसाठी कंपनीच्या अधिकृत अधिकाऱ्यास समक्ष चर्चा करण्यासाठी बोलवावे.

त्याआधारे कार्यालयीन पत्रक क्र. ४७२/९५ दि. १२/१२/९५ अन्वये सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया दि. २३-१२-९५ ला मा. आयुक्त साहेबांच्या दालनांत चर्चासाठी बोलवण्यांसत आले असता त्यांनी चर्चा करून दि. १४-१२-९५ ला पत्र दिले की, सिमेंटचे दर कमी करू शकत नाही. तसेच २% अनामत सुध्दा भरू शकत नाही. त्या बाबतीत सुट देण्यात यावी तसेच याबाबतीत प्रस्ताव सादर केला असता, दि. १८-१२-९५ मा. आयुक्त साहेबांनी त्यास मंजुरी दिली तरी आलेल्या दरपत्रकांचा दर व अटी खालील प्रमाणे आहे.

**१) <u>सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया</u>**

**१) अटी :**

प्रति टन २४४६=२५ सर्व करासहित पुरवठा करण्यांत येईल त्याशिवाय लोडींग अन लोडींगसह व्यवस्थित गोणी लावण्यात येईल.

२) भारत सरकारची मान्यता प्राप्त कंपनी आहे व ही कंपनी भारत सरकार च्या अंगीकृत व्यवसाय असल्यामुळे कोणत्याही प्रकारची अनामत ठेव, सुरक्षा रक्कम इत्यादी न भरण्यांची भारत सरकारतर्फे सुट देण्यात आली आहे. तरीसुध्दा इसाऱ्याची रक्कम १% १४८८० भरलेली आहे.

३) सिमेंटचा दर्जा चचाणी अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करून देण्यात येईल जर तेथे काही अडथळा निमाण झाल्यास अमरआरआय नाशिक येथून चचाणी अवाल देण्यात येईल.

४) जर शासनाच्या कोणत्याही प्रकारच्या करात वाढ झाल्यास ती महापालिकेस सोसावी लागेल.

५) पुरवठा केलेल्या सिमेंटचे देयक सादर केलेल्याच्या तारखेनंतर तीन (३) दिवसांत ९०% रक्कम अदा करावी व उरलेली ९०% चाचणी अहवाल सादर केल्यास तारखेपासून सात (७) दिवसांत अदा करावी.

६) जर महापालिकेने ९०% रक्कम ॲडव्हान्स दिल्यास प्रति टन ३०=०० सुट देण्यांत येईल.
७) सिमेंटचा पुरावठा शेड्युलप्रमाणे व व्हॅगन उपलब्धीप्रमाणे करण्यांत येईल.
८) आमचे दर ३१-१२-९५ पर्यंत बंधनकारक राहतील व पुरवठा ३१-०१-९६ पर्यंत करण्यात बंधनकारक राहतील.

**३) व्ही. अे. ट्रेडींग कंपनी**

**१) अटी :**

प्रति टन २६००=०० सर्व करासहित व लोडींग व गोडाऊनमध्ये यादी लावण्यांसह आहे.
२) पहिला लॉट २५० मे. टन सिमेंट पुरवठा करण्यांत येईल व त्याचे देयक मिळाल्यानंतर पुढील पुरवठा याच प्रमाणे करण्यात येईल.
३) चाचणी अहवाल कंपनीमार्फत सादर करावा.
४) हे दर ३१-१२-९५ पर्यंत बंधनकारक राहतील.
५) निविदेबरोबर इसाऱ्याची १% रक्कम भरलेली नाही.

**३) घार सिमेंट इदौर**

१) प्रति टन २७००=०० सर्व करासहित व मनपाच्या गोडझाऊन मध्ये यादी लावणेसह आहेत.
२) आमचे दर ९० दिवसांसाठी बंधनकारक राहतील.
३) कार्य आदेश प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांनंतर पुरवठा करण्यात येईल. जर व्हॅगॅन ट्रॅक्स इत्यादी वेळेवर उपलब्ध झाल्यास परंतु वरील पुरवठा चार (४) महिण्यांत करण्यात येईल.
४) पुरवठा केल्यानंतर १५ दिवसांत ९०% देयक अदा करण्यात यावे. नसता २४% प्रति वर्षी व्याज आकारण्यात येईल व पुरवठा थांबविण्यात येईल.
५) भारत सरकार मार्फत झालेल्या कोणत्याही कराच्या वाढीव रक्कमेसह मनपास सोसावी लागेल.
६) उत्पादन करात किंवा कच्च्या मालात कोणत्याही प्रकारची वाढ झाल्यास ती मनपास सोसावी लागेल.

**४) माणिकगड सिमेंट**

१) अटी : प्रति टन २८००=०० सर्व करासहित व मनपाच्या अटीसह हे दर २५-२-९० पर्यंत बंधनकारक राहतील.
२) कार्यादेश मिळाल्यानंतर ४५ दिवसांनंतर व्हॅगनक्ट्रॅक्स उपलब्ध झाल्यास पुरवठा करण्यांत येईल.
३) सिमेंटमध्ये काही खराबी आढळल्यास २४ तासांच्या आत कळवावे
४) पुरवठा केलेल्या मालाचे देयक ७ तास दिवसांत पूर्ण अदा करावे नसता त्यास २४% प्रति वर्षाप्रमाणे व्याज आकारण्यात येईल.
५) आमची निविदा ५-१२-९५ नंतर २५ दिवसांपर्यंत बंधनकारक राहतील
६) भारत सरकारमार्फत आलेल्या कोणत्याही प्रकारच्या करात वाढ झाल्यास ती मनपास सहन करावी लागेल.

७) उत्पादनास लागणाऱ्या कच्च्या मालात कोणत्याही प्रकारची वाढ झाल्यास ती मनपास सोसावी लागेल.

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या व अटी पहाता सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कंपनीचे दरपत्रक सर्वात कमी आहेत व त्याचे दर प्रतिटन रुपये २४४४=२५ (दोन हजार- शेचाळीस रुपये पंचविस पैसे) तरी कार्यालयातर्फे ३३७२ मे. टन सिमेंट खरेदी करून त्यांची रक्कम रुपये ८२,४८,७५५=०० (ब्यानशी लाख अठ्ठेचाळीस हजार सातशे पंच्चावन्न) होते. तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगररपालिकेच्या बांधकामाकरिता आवश्यक असलेल्या सिमेंट खरेदीच्या प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचे प्रतिटन २४४६=२५ पैसे (सर्व करासहित) व प्रस्तावात दर्शविलोल्या अ.क्र. १ ते ८ च्या अटीसह तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची असल्यामुळे मनपा कार्यालयाच्या बांधकामाकरिता आवश्यक असलेले ३३७२ मे. टन सिमेंट प्रति टन रुपये २४४६=२५ (सर्व करासहित व अटीसह) या दरोन मे. सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीकडून खरेदी करण्यांस व खरेदीसाठी येणाऱ्या रक्कम रुपये ८२,४८,७७५/- खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६८/३९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. रहमानिया कॉलनी किराडपुरा येथे खडी रस्ता तयार करणेबाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रुपये २,९२,७३२/- अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामाचा खर्च खडी रस्ते कल्व्हर्ट रुपये ४५.०० लाख या शिर्षकांतून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १६-१२-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये २९२७३२/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला रहेमानिया कॉलनी किराडपुरा येथे खडी रस्ता तयार करण्यासाठी वर्ष १९९४-९५ सार्वजनिक बांधकाम खाते यांचे दरसुचीनुसार रुपये २,९२,७३२/- या अंदाजपत्रकास मंजुरी देऊन सदरील कामाचा खर्च खडी रस्ते आणि कल्व्हर्ट रुपये ४५.०० लाख या शिर्षकांतून खडीरस्ता तयार करण्यांच्या कामास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६९/४० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. घाटी जयभिमनगर येथे रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणेबाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९२-९३ च्या दरसूचीनुसार रुपये ४,२९,१०५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम पुर्नडांबरीकरण रुपये १००.०० लाख या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या

अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १७-०६-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदा पत्रके कार्यालयीन नोटीस मनपा/लेखा/३४/९५ दि. ०४-११-९५ रोजी मा. मुख्य लेखा परिक्षक यांच्या समक्ष उघडण्यात आली असता निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण एक निविदा प्राप्त झाली आहे.

प्राप्त निविदापत्रक दि. २१-११-९५ रोजी मा. मुख्य लेखा परिक्षक यांच्या समक्ष उघडण्यांत आली असता, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) आदीनाथ कन्स्ट्रक्शन ९.५५% जास्त

परंतु सदरील दर जास्त असल्याने ठेकेदारास मा. आयुक्त यांच्या दालनांत दराच्या वाटाघाटीसाठी निमंत्रित करण्यात आले असता. ठेकेदाराने अंदाजपत्रकीय दरापैकी ५% जास्त दराने सदरील काम करण्यास संमती दर्शविली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रुपये ४,९९,१०५/- व सदरील कामाचा एजन्सी श्री. आदीनाथ कंन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची निविदेच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. घाटी जयभिमनगर येथे रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणेसाठी सार्वजनिक बांधकाम खाते वर्ष १९९२-९३ च्या दरसूचीनुसार रुपये ४,२९,१०५/- चे अंदाजपत्रकास व सदरील काम पुर्नडांबरीकरण रुपये १००.०० लाख या शिर्षकातून तसेच ठेकेदार श्री. आदीनाथ कन्स्ट्रक्शन व आयुक्त यांच्या वाटाघाटीनुसार ५% जास्त दराने सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

**विषय क्र. २७०/४१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. भिमनगर भावसिंगपुरा (स्लम) दक्षिण भाग येथील रस्त्यांचे खडीकरण करणे तसेच काही रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९२-९३ च्या दरसूचीनुसार रुपये ४,६९,१००/- चे अदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम ५% कमकुवत घटक कल्याणकारी योजना या शिर्षकातून अंतर्गत घेण्यात आले आहे. या शिर्षकांतर्गत रुपये ३७,४९,८२३/- ची तरतूद आहे.

सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १८-०२-१९९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदा पत्रके कार्यालयीन नोटीस क्र. मनपा/लेखा/४६/९५ दि. ३०-११-९५ अन्वये निविदा मागविण्यात आली असता. निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण एकच निविदा प्राप्त झाली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) आदीनाथ कन्स्ट्रक्शन ९.५१ जास्त

परंतु सदरील दर जास्त असल्याने ठेकेदारास मा. आयुक्त यांच्या दालनात दराच्या वाटाघाटीसाठी निमंत्रित करण्यांत आले असता ठेकेदाराने अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने काम करण्यांस संमती दर्शविली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये ४,६९,१००/- व सदरील कामाची एजन्सी श्री. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने निविदेच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. भिमनगर भावसिंगपुरा (स्लम) दक्षिण भाग येथील रस्त्यांचे खडीकरण करणे तसेच काही रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी सार्वजनिक

बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९२-९३ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४,६९,१००/- चे अदाजपत्रकास तसेच कमकुवत घटक कल्याणकारी योजना ५% घटक योजनेच्या शिर्षकातून व ठेकेदार श्री. आदीनाथ कन्स्ट्रक्शन व मा. आयुक्त यांच्या वाटाघाटीनुसार ५% जास्त दराने काम करण्यांची मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७१/४२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. शताब्दीनगर (स्लम) येथील रस्त्यांचे खडीकरण करणे या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रुपये ३,७७,५१०/- चे अदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम नविन डांबरीकरण या शिर्षकांर्गत घेण्यात आले आहे.

सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ०७-०७-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदापत्रके कार्यालयीन नोटीस क्र. मनपा/लेखा/३४/९५ दि. ०४-११-९५ अन्वये निविदा मागविण्यात आली असता. निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण एकच निविदा प्राप्त झाली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) आदीनाथ कन्स्ट्रक्शन १०.५५% जास्त

परंतु सदरील दर जास्त असल्याने ठेकेदारास मा. आयुक्त यांच्या दालनात दराच्या अंदाजपत्रकीय दराने काम करण्यांस संमती दर्शविली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये ३,७७,६१०/- व सदरील कामाची एजन्सी श्री. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दराची निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. शताब्दीनगर (स्लम) येथील रस्त्यांचे खडीकरण करणे या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ३,७७,५१०/-नविन डांबरीकरण शिर्षक रुपये १.१० कोटीची या सदरातून ठेकेदार आदिनाथ कन्स्ट्रक्शन व मा. आयुक्त यांच्या वाटाघाटीतून प्रस्तुत ठेकेदारास अंदाजपत्रकीय रुपये ३,७७,५१०/- कामाकरिता सर्वानुमते मंजुरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७२/४३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. भावसिंगपुरा गांव (स्लम) येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेसाठी सार्वजनिक बांधकाम खाते यांचे वर्ष १९९२-९३ च्या दरसूचीनुसार रुपये ३,८५,७५०/- चे अदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम अठरा खेडी विकास कार्यक्रम डांबरीकरण रुपये ८०.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २०-०१-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदापत्रके कार्यालयीन नोटीस क्रमांक/ मनपा/लेखा/३४/९५ दि. ०४-११-९५ अन्वये निविदा मागविण्यात आले असता. निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण एक निविदा प्राप्त झाली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) आदीनाथ कन्स्ट्रक्शन १०.५५% जास्त

वरील प्राप्त निविदा श्री. अदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापैकी ९.१०% जास्त दराची आहे. सदरील दर जास्त असल्याने ठेकेदारास मा. आयुक्त यांच्या दालनात

दराच्या वाटाघाटीसाठी निमंत्रित करण्यात आले असता. ठेकेदाराने अंदाजपत्रकीय दरापैकी ५% जास्त दराने सदरील काम करण्यांस संमती दर्शविली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये ३,८५,७५०/- व सदरील कामाची एजन्सी श्री. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची निविदेच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. भावसिंगपुरा गांव (स्लम) येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेसाठी सार्वजनिक बांधकाम खाते यांचे वर्ष १९९२-९३ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३,८५,७५०/- प्रस्तुत काम १८ खेडी विकास कार्यक्रम रुपये ८०.०० लाख या शिर्षकातून ठेकेदार आदीनाथ कन्स्ट्रक्शन व मा. आयुक्त यांच्या वाटाघाटीतून ५% जास्त दराने काम करण्यांची सर्वानुमते मंजुरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७३/४४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. बौध्दनगर स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेबाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रुपये ४,९६,८००/- चे अदाजपत्रक तयार करण्यास्त आलेले आहे. सदरील काम डांबरी रस्ते रुपये ११०.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १३-१२-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये ४,९६,१००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बौध्दनगर स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेबाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४,९६,८००/- सदरील काम डांबरी रस्ते ११०.०० लाख या शिर्षकातून काम करण्यांची सर्वानुमते मंजुरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७४/४५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. कटकटगेट, किराडपुरा स्लम येथे नविन खांडकी बसविणे व जुन्या खांडकीची दुरुस्ती करणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रुपये २,१६,२६७/- चे अदाजपत्रक तयार करण्यास्त आले आहे. सदरील कामाचे खर्च नविन खांडकी बसविणे रुपये ३५.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २६-०६-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून. प्रस्तावित कामासाठी निविदापत्रके कार्यालयीन नोटीस क्रमांक/मनपा/३४/९५ दि.०४-११-९५ अन्वये मागविण्यांत आले असता, निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सहा निविदापत्रके प्राप्त झाले त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सय्यद रफिकोद्दिन | २७.२०% कमी |
| २) | एस. एम. हक्क | २७% कमी |
| ३) | शे. शकील अहमद | २०.५०% कमी |

| | | |
|---|---|---|
| ४) | स. सिराजोद्दिन | २०% कमी |
| ५) | रुबी कन्स्ट्रक्शन | २५.८५% कमी |
| ६) | विपुल कन्स्ट्रक्शन | १५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२०% कमी दराची निविदा श्री. सय्यद रफियोद्दिन ठेकेदार यांची आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये २,१६,२३७/- व सदरील कामाची एजन्सी श्री. सय्यद रफियोद्दिन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२०% कमी निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**उप अभियंता (स्लम) :** कंत्राटदाराने हमी दिली आहे की, त्यांच्याकडे या कामासाठी मटेरियल तयार आहे. त्यामुळे एवढ्या कमी दराने तो काम करून देण्यास तयार आहे.

**मा. सभापती :** कामाची क्वालिटी सातत्याने चेक करण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. कटकटगेट, किराडपुरा येथे नविन खांडकी बसविणे व जुन्या खांडकीची दुरुस्ती करणे, अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,१६,२६७/- च्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २७.२०% कमी दराच्या श्री. सैय्यद रफियोद्दिन यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७५/४६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. किलअर्क व स्लम येथे खांडकी बसविणे व खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९२-९३ च्या दरसूचीनुसार रुपये १,७९,२१७/- अदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचे खर्च विशेष घटक योजना ८.०० लाख या म्हडा अंतर्गत प्राप्त रक्कमेतून या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २०-१०-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून. प्रस्तावित कामासाठी निविदापत्रके कार्यालयीन नोटीस क्रमांक/मनपा/लेखा/३४/९५ दिनांक ०४-११-९५ अन्वये मागविण्यांत आले असता, निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सय्यद फैजलु हक्क | २७.५०% कमी |
| २) | गुलाम रसूल | २७.१०% कमी |
| ३) | शिलरत्न साळवे | २७% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.५०% कमी दराची निविदा श्री. सय्यद फैजुल हक्क ठेकेदार यांची आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये १,७९,२१७/- व सदरील कामाची एजन्सी श्री. सय्यद फैजुल हक्क यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.५०% कमी दराची निविदेच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. किलअर्क व स्लम येथे खांडकी बसविणे व खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,७९,२१७/- व तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे ठेकेदार श्री. सय्यद फैजुल हक्क २७.५०% चे कमी दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७६/४७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. घाटी जयभिमनगर येथे नविन खांडकी बसविणे व जुन्या खांडकीची दुरुस्ती करणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रुपये १,९४,७६९/- चे अदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम विशेष घटक योजना ८.०० लाख या शिर्षकातुन म्हडा अंतर्गत मिळणाऱ्या रक्कमेतून करण्यांत येईल. सदरच्या अदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २०-१०-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून. प्रस्तावित कामासाठी निविदापत्रके कार्यालयीन नोटीस क्रमांक/मनपा/लेखा/३४/९५ दिनांक ०४-११-९५ अन्वये मागविण्यांत आले असता, निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सिद्दीकी एस. झेड | २०.९९% कमी |
| २) | शे. अयुब शे. अहेमद | १६% कमी |
| ३) | प्रमोद देसरडा | ४% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९९% कमी दराची निविदा श्री. सिद्दीकी एस. झेड. ठेकेदार यांची आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये १,९४,७६९/- व सदरील कामाची एजन्सी श्री. सिद्दीकी एस. झेड. यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९९% कमी दराची निविदेच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. घाटी जयभिमनगर येथे नविन खांडकी बसविणे व जुन्या खांडकीची दुरुस्ती करणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९९% कमी दराची श्री. सिद्दीकी एस. झेड. यांची निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,९४,७६९/- ला सर्वानुमते मंजुरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७७/४८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयामध्ये बांधण्यात येत असलेल्या मत्सालयाच्या इमारतीचे काम आता छतापर्यंत आलेले असून सदर इमारतीमध्ये इमारत पूर्ण होण्यासाठी काचेच्या पट्ट्या अंतर्गत पाईपलाईन सन्प वरील बाजूस पाण्याची टाकी व इतर कामे पूर्ण करून घेण्यासाठी रक्कम रुपये ४,९५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. व सदरचा खर्च मुळ इमारतीच्या बांधकाम खर्चामधून होणाऱ्या बचतीमधून करण्यात यावा या अटीवर मा. आयुक्तांनी दि. १९-१२-९५

ला मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रुपये ४,९५,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च प्राणी संग्रहालय विकसित करणे या लेखा शिर्षामधून आणि प्रस्तावित केलेल्या मत्सालय बांधण्यांच्या मुळ का ाच्या होणाऱ्या बचतीमधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयामध्ये बांधण्यात येत असलेल्या मत्सालयाच्या इमारतीचे कामाकरिता उदा. काचेच्या पेट्या अंतर्गत पाईपलाईन वरील बाजूस पाण्याची टाकी व इतर कामे पूर्ण करण्याच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४,९५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७८/४९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगपुरा मनपा भाजी मंडई येथील दुरुस्ती करण्याचे कामासाठी स्थायी समिती बैठक दि. २८-०८-९५ ठराव क्र. ७४/२३ अन्वये रक्कम रुपये २,८४,८३०/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता, कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (१०) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारण्यांच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.२१-११-९५ ला उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सलीम पटेल | २% जास्त दराने |
| २) | श्री. आर. एल. बारवाल | ५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा आहे. सदरील दर हे जास्त वाटत असल्यामुळे मुक्तेदारास दि. १९-१२-९५ ला मा. आयुक्तांचे दालनात प्रत्यक्ष वाटाघाटीकरिता बोलाविले असता, मक्तेदाराने २% जास्त दरापेक्षा कमी दराने करण्यास असमर्थता दर्शविली तेंव्हा सदरील काम अंदाजपत्रक दरापेक्षा २% जास्त दराने करण्यास मा. आयुक्तांनी दि. १९-१२-९५ अन्वये मंजुरी दिली. सबब सदरील कामासाठी अंदाजपत्रक दरापेक्षा २% जास्त दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा दर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगपुरा महानगरपालिका भाजी मंडई येथील दुरुस्ती करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७९/५० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगर गल्ली नं. २२ मध्ये दगडी गटार बांधून गटारीवर आर.सी.सी. स्लॅब टाकणेबाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रुपये १,८२,३९४/- चे अंजदापत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामाचा खर्च झोपडपट्टी भागात खुल्या गटारी रु.

५०.०० लाख या लेखा शिर्षातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १३-१२-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये १,८२,३९४/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. इंदिरानगर गल्ली नं. २२ मध्ये दगडी गटार बांधून गटारीवर आर.सी.सी. स्लॅब टाकण्यांच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,८२,३९४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८०/५१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. भिमनगर भावसिंगपुरा (स्लम) येथे खडी रस्ते तयार करणेबाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रुपये १,४४,१३६/- चे अंजदापत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च "खडी रस्ते आणि कल्व्हर्ट" रुपये ४५.०० लाख या लेखा शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ०७-०७-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदापत्रके कार्यालयीन नोटीस क्रमांक/लेखा/३४/९५ दि. ०४-११-९५ अन्वये मागविण्यात आले असता निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदापत्रके प्राप्त झाल्या आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | आर. एन. भावले | १९.१०% कमी |
| २) | शिलरत्न साळवे | १७.५ दराने |
| ३) | एस. एम. मंडोरे | १३% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.१०% कमी दराची निविदा श्री. आर. एन. भावले ठेकेदार यांची आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये १,४४,१३६/- व सदरील कामाची एजन्सी श्री. आर. एन. भावले यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.१०% कमी दराची निविदाचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. भिमनगर भावसिंगपुरा (स्लम) येथे खडी रस्ते तयार करण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.१०% कमी दराची निविदा गुत्तेदार श्री. आर. एन. भावले यांची निविदा व अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,४४,१३६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८१/५२ :**

एम.एक्स व्ही-३१३८ ही ॲम्बेसेड कार १९८३ मध्ये खरेदी केलेली असून आता पर्यंत दोन लाख कि.मी. पेक्षा जास्त रनिंग झालेले आहे. ही कार सध्या मा. विरोधी पक्षनेता यांचेकडे चालते. ही कार नेहमी नादुरुस्त होत असून दुरुस्तीसाठी जास्तीचा खर्च होत आहे.

मा. सभापती स्थायी समिती यांनी मा. विरोधी पक्षनेता यांचेकरिता त्वरित नविन कार खरेदी करण्याबाबत कळविले आहे. नविन ॲम्बेसेडर कार खरेदी करण्यांसाठी हिंदुस्थान मोटर्स लि. कंपनीचे अधिकृत विक्रेत्याकडून दरपत्रके गोळा केलीत आलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | मे. कैलास एजन्सी प्रा. लि. औरंगाबाद | मे. भारत इजिनिअरिंग औरंगाबाद |
|---|---|---|---|
| १. | ॲम्बेसेडर नोव्हा डिलक्स पेट्रोल कार | २,६५,०००.०० | २,३१,२३८.०० |
| २. | पुरवठा कालावधी | २ ते ३ दिवस | दोन महिने |

मे. भातर इंजिनियरिंग कंपनीचे दर कमी आहेत. परंतु पुरवठा कालावधी दोन महिने आहे. मे. कैलास एजन्सीज प्रा. लि. यांचे दर जास्त आहेत. परंतु कारचा त्वरित पुरवठा करणार आहे. यासाठी रुपये ३३,६६२=०० जास्त रक्कम अदा करावी लागणार आहे.

नविन कारसाठी आलेले दर व पुरवठा कालावधी याबाबत मा. सभापती यांचेशी चर्चा केली. त्यात त्यांनी मे. कैलास एजन्सी प्रा. लि. औरंगाबाद यांचे दर जास्त असले तरी कारचा पुरवठा त्वरित करणार असल्याने त्यांचेकडून कार खरेदी करण्यांत यावी. त्यास स्थायी समितीत कार्योत्तर मान्यता देण्यात येईल, असे सुचित केले त्याप्रमाणे मे. कैलास एजन्सीला प्रा. लि. औरंगाबाद यांना रुपये २,६५,०००=०० अदा करण्यात आली आहे.

तथापी मा. विरोधी पक्ष नेता यांनी कैलास एजन्सीज यांचेकडके सध्या उपलब्ध असलेली ॲम्बेसेडर १८०० इसुझ पेट्रोल कार खरेदी करण्याबाबत कळविले आहे. या कामासाठी खालील प्रमाणे जास्तीचा खर्च येतो.

| | | |
|---|---|---|
| १. | ॲम्बेसेडर १८०० इसुझ पेट्रोल कार ए.सी. सह | रु. ३,४०,७५२=०० |
| २. | ॲम्बेसेडर नोव्हा पेट्रोल कार सादी अदा केलेली रक्कम | रु. २,६५,०००=०० |
| | जास्तीचा खर्च | रु. ७५,७५२=०० |

वरील प्रमाणे जास्तीच्या खर्चास स्थायी समितीची मान्यता न मिळाल्यास फरकाची रक्कम मा. विरोधी पक्ष नेता यांचेकडून वसूल करण्यांत येईल. या अटीवर व स्थायी समिती मान्यता देईल या अपेक्षेने कार खरेदी करण्यांत आली आहे. नविन वाहन खरेदीसाठी तरतूद शिल्लक नाही. ॲम्बेसेडर कार खरेदी साठी झालेल्या रुपये ३,४०,७५२=०० च्या खर्चास कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** जास्तीचा खर्चास स्थायी समिती मान्यता न मिळाल्यास फरकाची रक्कम मा. विरोधी पक्ष नेता यांचेकडून वसूल करण्यात येईल. हे वाक्य प्रस्तावातून काढून टाकण्यात यावे. ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे. कैलास एजन्सी प्रा. लि. औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यांत आलेल्या ॲम्बेसेडर १८०० इझुस पेट्रोल कार अेसीसह केलेल्या खरेदीस व रक्कम रुपये ३,४०,७५२/- च्या खर्चास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८२/५३ :**

मा. महापौर यांचेसाठी मे. ९५ मध्ये नविन ॲम्बेसेडर नोव्हा कार खरेदी केलेली आहे. तथापी मा. सभापती स्थायी समिती यांनी मा. महापौरांकरिता त्वरित "मारुती इस्टीम" कार खरेदी बाबतचे पत्र दिले आहे.

ही कार डी. जी. एस. ॲन्ड डी दराने मिळत नाही. त्यामुळे मारुती उद्योग लि. कंपनीचे स्थानिक अधिकृत विक्रेते मे. ऑटोमोटीव्ह मॅन्युफॅच्सरर्स लि. औरंगाबाद यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले आहे. त्यांनी मारुती इस्टीम कारसाठी रुपये ४,७९,५१४=०० चे दरपत्रक दिले असून यापैकी रुपये ४,१८,१४२=०० मे. मारुती उद्योग लि. नवी एक महिन्याचा आहे सध्या नविन वाहने खरेदीसाठी तरतूद नाही. तरी प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. महापौर यांचेसाठी मारोती उद्योग लि. कंपनी चे स्थानिक अधिकृत विक्रेते मे. ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चर्स लि. औरंगाबाद यांचेकडून मारोती इस्टीम कार खरेदी करण्यास व त्या अनुषंगाने येणा४या रक्कम रुपये ४,७९,५१४=०० च्या खर्चास तसेच मे. मारोती उद्योग लि. नवी दिल्ली यांना रुपये ४,१८,१४२=०० अगाऊ रक्कम अदाई करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८३/५४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कोकणवाडी येथे दगडी गटार बांधणे व दगडी गटारीची दुरुस्ती करणे या कामाकरिता रुपये ६६,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. तसेच या कामाकरिता बी-१ नमुन्यांत निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा सूचना क्र. लेखा/निविदा/३४/९५ दिनांक ०४-११-९५ नुसार विक्री झालेल्या ९ निविदापत्रकापैकी ३ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदा खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आर. एन. भावले | १.३०% कमी |
| २) | श्री. गुलाम रसूल | १% जास्त |
| ३) | श्री. रविंद्रसिंग | १% जास्त |

प्राप्त निविदापैकी कमी दराची १.३०% कमी दराची भरलेली श्री. आर. एन. भावले यांची निविदा कमी दराची असून त्यांनी भरलेल्या निविदेस व अदांजपत्रकीय रक्कम रुपये ६६,३००/- स मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोकणवाडी येथे दगडी गटार बांधणे व दगडी गटारीची दुरुस्ती करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ६६,३००/- अंदाजपत्रकास व सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३०% कमी दराची गुत्तेदार श्री. आर. एन. भावले यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८४/५५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिल्म मिल्क कॉलनी येथे आर. सी. सी. ह्युम कल्व्हर्ट बांधणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९३-९४ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ५,७५,४००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील खर्च सन १९९५-९६ या वर्षासाठी शासनाकडून मिळणाऱ्या र. रुपये १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. तरी. र. रु. ५,७५,४००=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्म मिल्क कॉलनी येथे आर. सी. सी. ह्युम कल्व्हर्ट बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ५,७५,४००=०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८५/५६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गुलमंडी ते औरंगपुरा या रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सा बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये २,६५,२३४=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९५-९६ या वर्षासाठी शासनाकडून मिळणाऱ्या र. रुपये १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. तरी. रक्कम रु. ५,६५,२२४=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुलमंडी ते औरंगपुरा या रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेले रक्कम रुपये २,६५,२३४=०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८६/५७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हॉलीडे कॅम्प ते नागसेननगर (एम.आय.डी.सी. रेल्वे स्टेशन) या रस्त्यावर सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९३-९४ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये २,७६,५४०=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९५-९६ या वर्षाकरिता शासनाकडून मिळणाऱ्या र. रुपये १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. तरी. रक्कम रु. ५,७६,५४०=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉलीडे कॅम्प ते नागसेननगर (एम.आय.डी.सी. रेल्वे स्टेशन) या रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये २,७६,५४०=०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८७/५८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रेल्वे स्टेशन औद्यागिक वसाहत येथील बालभारती ऑफिस ते वाघ यांचे घर व हॉलीडे ते मिलींद नगर या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ३,५०,६७५=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील खर्च सन १९९५-९६ या वर्षासाठी शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रुपये १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. तरी. रक्कम रु. ३,५०,६७५=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे स्टेशन औद्यागिक वसाहत येथील बालभारती ऑफिस ते वाघ यांचे घर व हॉलीडे कॅम्प ते मिलींद नगर या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ३,५०,६७५=०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८८/५९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, क्रांती चौक वाहतुक बेटामध्ये टॉयमास्त फिटींग खांबासहित बसविण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये १०,००,०००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९५-९६ या वर्षासाठी शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रुपये १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. तरी. र.रु. १०,००,०००=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांती चौक वाहतुक बेटामध्ये टॉयमास्त फिटींग खांबासहित बसविण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १०,००,०००=०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८९/६० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रेल्वे स्टेशन ते इटखेडा य रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरणाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये १२,७७,८५=०० अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च १९९५-९६ या वर्षासाठी शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रुपये १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. तरी. र.रु. १२,७७,८५५=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे स्टेशन ते इटखेडा य रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरणाच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १२,७७,८५५=०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९०/६१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, पन्नालालनगर ते पिरबाजार रोड या रस्त्यावर सोडियम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ७,८३,११४=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च १९९५-९६ या वर्षासाठी शासनाकडून मिळणाऱ्या र. रु. १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. तरी र.रु. ७,८३,११४=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पन्नालालनगर ते पिरबाजार रोड या रस्त्यावर सोडियम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ७,८३,११४=०० चे चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९१/६२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गजानन महाराज ते सिडको हद्दिपर्यंत नगर रस्त्यावर सोडियम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ८,२१,८७२=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च १९९५-९६ या वर्षासाठी शासनाकडून मिळणाऱ्या र. रु. १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. तरी र.रु. ८,२१,८७२=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गजानन महाराज ते सिडको हद्दिपर्यंत नगर रस्त्यावर सोडियम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ८,२१,८७२=०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९२/६३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, चिकलठाणा औद्योगिक वसाहतीत म.रा. वि. मं. च्या पोलवर सोडियम व्हेपरचे दिवे लावण्याच्या कामाकरिता बांधकाम खात्याच्या दरसूचीनुसार र. रु. १९,६३,५००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च १९९५-९६ या वर्षासाठी शासनाकडून मिळणाऱ्या र. रु. १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येईल. तरी र.रु. १९,६३,५००=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा औद्योगिक वसाहतीत म.रा. वि. मं. च्या पोलवर सोडियम व्हेपरचे दिवे लावण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेली रक्कम रुपये १९,६३,५००=०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९३/६४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रेल्वे स्टेशन समोरील रस्त्याच्या मध्य दुभाजकात सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये १,१९,२५७=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९५-९६ या वर्षाकरिता शासनाकडून मिळणाऱ्या र. रु. १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यात येतील. तरी र.रु. १,१९,२५७=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे स्टेशन समोरील रस्त्याच्या मध्य दुभाजकात सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १,१९,२५७=०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९४/६५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरात वेगवेगळ्या वस्तीत रोवण्यात असलेल्या विद्युत खांबावर ट्युब फिक्चर लावण्यासाठी ट्युब फिक्चर खरेदी करणे आहेत. सदर ट्युब फिक्चर खरेदी करणेसाठी र. रु. ८,२५,०००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील ट्युब फिक्चर खरेदीसाठी सन १९९५-९६ च्या मुळे अंदाजपत्रकास तरतूद शिल्लक नाही. तरी सदरील खर्च विद्युत साहित्य खरेदी या शिर्षकाखाली सुधारित अंदाजपत्रकात वाढीव तरतूद मिळेल याचे अधिन राहून करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात वेगवेगळ्या वस्तीत रोवण्यात असलेल्या विद्युत खांबावर ट्युब फिक्चर लावण्यासाठी ट्युब फिक्चर खरेदी करणेसाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ८,२५,०००=०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९५/६६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कटकट गेट ते रविंद्र नगर या रस्त्यावर सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये २,४५,०००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून सन १९९५-९६ वर्षाकरिता मिळणाऱ्या रक्कम रुपये २,४५,०००=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कटकट गेट ते रविंद्र नगर या रस्त्यावर सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये २,४५,०००=०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९६/६७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरातील विविध भागात जी.आय. पोल रोवण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ३,७५,०००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च जी.आय. पोल बसविण्यासाठी उपलब्ध असलेल्य तरतूदीमधून करण्यात येईल.

सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविली असता एकूण पाच निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि. ०५-१२-९५ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. सत्यम वायर्स | ७.९१% कमी दराने |
| २. | मे. बेटा इलेक्ट्रीकल्स | ९.००% कमी दराने |
| ३. | मे. युनिव्हर्सल इले. कंपनी | ४.५०% कमी दराने |
| ४. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | २४.१०% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.१० टक्के कमी आहेत. तरी र. रु. ३,७५,०००=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा तसेच सदरील काम मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून अंदाजपत्रकी दरापेक्षा १० टक्के कमी या दराने करून येणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विविध भागात जी.आय. पोल रोवण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेली रक्कम रुपये ३,७५,०००=०० चे अंदाजपत्रकास तसेच तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.१०% कमी दराचे गुत्तेदार मे. लुना कन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९७/६८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरातील विविध वॉर्डात १५० वॅट सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसूचीनुसार रक्कम रु.४,१२,०००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील सोडीयम साहित्य खरेदी या शिर्षकाखाली करण्यात येईल.

सदर कामाकरिता निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक ०५-१२-९५ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. गजानन इलेक्ट्रीकल्स | ३.००% कमी दराने |
| २. | मे. सत्यम वायर्स | ९.९१% कमी दराने |
| ३. | मे. बेटा इलेक्ट्रीकल्स | ११.००% कमी दराने |
| ४. | मे.दानिश सेल्स कार्पोरेशन | २२.७८६% कमी दराने |
| ५. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | १४.१०% कमी दराने |
| ६. | मे. रॉयल इलेक्ट्रीकल्स | ११.७०% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.दानिश सेल्स कार्पोरेशन यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.७८६% कमी आहेत.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले र. रु. ४,१२,०००=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा तसेच सदरील काम मे. दानिश सेल्स कार्पोरेशन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.७८६% कमी या दराने करून येणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विविध वॉर्डात १५० वॅट सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेली र. रु. ४,१२,०००=०० चे अंदाजपत्रकास तसेच कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.७८६% कमी दराचे गुत्तेदार मे. दानिश सेल्स कार्पोरेशन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९८/६९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जाफरगेट बिकली बाजार ते मोती कारंजा या ५० फुटी विकास रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९२-९३ च्या दरसूचीनुसार र. रु. ३,७८,१७२=०० चे अंजदापत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली (२९०.०० लाख) या लेखा शिर्षकातून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाफरगेट बिकली बाजार ते मोती कारंजा या ५० फुटी विकास रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेले रक्कम रु. ३,७८,१७२=०० चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी

**विषय क्र. २९९/७० :**

सदर कामाकरिता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा पत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील दोन्हीही निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि. २२-११-९५ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १५.३३% कमी दराने |
| २. | मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | १२.३१% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.३३% कमी आहेत.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,७८,१७२=०० चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा तसेच सदरील काम मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.३३ टक्के कमी या दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.३३% कमी दराचे गुत्तेदार मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे निविदा दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३००/६५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो. काझिवाडा भडकलगेट भागात खडी रस्ते तयार करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसूचीनुसार रक्कम रुपये १,०५,१७०=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते या शिर्षकाखाली सन १९९५-९६ सालासाठी मंजूर तरतूद (र.रु. २९०.०० लाख) या मधून घेण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. काझिवाडा भडकलगेट भागात खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १,०५,१७०=०० चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते या शिर्षकाखाली सन १९९५-९६ सालासाठी मंजूर तरतूद (र.रु. २९०.०० लाख) या मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०१/७२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. बनेवाडी गावात खडी रस्ते तयार करण्यांच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,५७,०००/- चे तयार करून मा. आयुक्त साहेबांनी दि. ३०-०६-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

मा. आयुक्त यांच्या मंजुरीनंतर सदरील कामाची निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/३४/९५ दि. ०४-११-९५ अन्वये मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. १०-११-९५ पर्यंत एकूण चौदा (१४) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्यांच्या अंतिम तारिख १८-११-९५ रोजी फक्त सात (७) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या व त्या निविदा दि. २१-११-९५ रोजी मा. मुख्य लेखा परिक्षक व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या, असता तुलनात्मकदृष्ट्या गुत्तेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. संजय पी. सरवदे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २) | श्री. अलिफ असोसियटस | २४.५६% -//- |
| ३) | श्री. एस. एम. मंडोरे | २१.३०% -//- |
| ४) | श्री. संजय बी बेडसुरे | २१% -//- |
| ५) | श्री. शेख सलीम अहमद | १८.८६% -//- |
| ६) | श्री. बदरबीन सलान | ११.७५% -//- |

वरील निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.२६% कमी दराची निविदा श्री. संजय पी. सरवदे यांची असून सदरील काम खेडी विकास कार्यक्रम या शिर्षा अंतर्गत रुपये ८०,००,०००/- लाखाची तरतूद केली आहे. त्या योजना अंतर्गत सदरील काम करण्यांच्या प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बनेवाडी गावात खडी रस्ते तयार करण्यांच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.५६% कमी दराचे गुत्तेदार श्री. संजय पी. सरवदे यांच्या दरपत्रकास तसेच सदर कामे ९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी या शिर्षकाअंतर्गत ८०,००,०००/- लाखाच्या तरतूदीमधून खर्च करण्यांत येईल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०२/७३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर मुकूंदवाडी (दक्षिण विभाग) येथे ३०० मी. मी. अर्धगोलाकार आर. सी. गटार बांधण्याच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रुपये २,६७,४००/- चे तयार करून मा. आयुक्त साहेबांनी दि. २०-१०-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

मा. आयुक्त यांच्या मंजुरीनंतर सदरील कामाची निविदा मागविण्यात असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. १०-११-९५ पर्यंत एकूण तेरा (१३) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्यांच्या अंतिम तारिखेस १८-११-९५ रोजी फक्त चार (४) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या व त्या निविदा दि. २१-११-९५ रोजी मा. मुख्य लेखा परिक्षक व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या, असता तुलनात्मकदृष्ट्या गुत्तेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. डी. अजितसिंग | १५.५१% कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
| २) | श्री. शेख शरीफ | १२.७०% -//- |
| ३) | श्री. राजासिंग | ७.८९% -//- |
| ४) | श्री. आर. बी. चव्हाण | २% -//- |

वरील निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५१% कमी दराची निविदा श्री. अजितसिंग यांची असून सदरील काम झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम १९९५-९६ च्या विशेष घटक म्हाडा अनुदान योजने अंतर्गत करण्यांचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर मुकुंदवाडी (दक्षिण विभाग) येथे ३०० मी. मी. अर्धगोलाकार आर. सी. गटार बांधण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५१% कमी दराचे गुत्तेदार श्री. डी. अजितसिंग यांच्या दरपत्रकास व रक्कम रुपये २,६७,४००/- या अंदाजपत्रकास व सदर काम झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम विशेष घटक म्हाडा अनुदान योजनेमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०३/७४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विद्यानिकेतन कॉलनी बायजीपुरा येथील सन १४/पी येथील खुल्या जागेवर बल्ली तार कुंपन करण्यांचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ३३,१९०/- चे सन ९२-९३ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसूचीप्रमाणे तयार करण्यात आले होते. त्यास प्रशासकीय तांत्रिक मंजुरी मिळाली होते त्या अनुषंगाने निविदा मागवून श्री. नवाब गुत्तेदार यांचे १.७०% कमी दराचे दर मान्य करून काम सुरू करण्यात आले होते. परंतु सदरील ठिकाणच्या नागरिकांनी बल्ली तार कंम्पाऊडच्या कामास हरकत घेऊन काम बंद करावयास भाग पाडले त्याबाबत गुत्तेदार यांनी अर्जाद्वारे कळविले व सदर ठिकाणच्या सोसायटीच्या सचिव यांनी अर्ज देऊन मोकळ्या जागेवर संरक्षित भिंत तार कंम्पाउड करावे असा आग्रह धरला. त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रक र. रु. १,६१,५२०/- चे ९२-९३ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली. त्यानुसार वाढीव रक्कम रुपये १,६१,५२०/- रुपयाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस व पूर्वीच्याच गुत्तेदाराकडून त्यांनी पूर्वी नमूद केलेले दरामध्ये १.७०% कमी दरात करून घेण्यास्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्या निकेतन कॉलनी बायजीपुरा येथील स.न. १४/पी येथील खुल्या जागेवर बल्ली तार कुंपन करण्यांच्या रुपये ३३,१९०/- च्या अंदाजपत्रकाऐवजी सदर जागेवर संरक्षण दगडी भिंत तार कुंपन करण्यांच्या कामासाठी सुधारित अंदाजत्रक रक्कम रुपये १,६१,५२०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम पूर्वीचे गुत्तेदार श्री. नवाब यांचेकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १.७०% दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०४/७५ :**

महिला विकास वर्षात औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये महिला नगरसेविकांची संख्या २७ आहे. या महिला नगरसेविकांना महानगरपालिकेच्या कामकाजाची पध्दती जाणून घेणे या विषयी अन्य महानगरपालिकेतील कार्यपध्दतीची माहिती घेणे व त्याचा अभ्यास करणे आवश्यक वाटते.

या दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिकेतील महिला नगरसेविकांना वरील प्रकारची माहिती प्राप्त करून घेण्यासाठी काही महानगरपालिकांना भेटी देण्याकरिता अभ्यास दौरा आयोजित करण्यांत यावा. जेणेकरून त्यांना बाहेरील कार्यपध्दती व येथील कार्यपध्दती समजू शकेल

सुचक : सौ . लता दलाल
सौ. मंदा काकुसे
कु. माया लाडवाणी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील २७ महिला नगरसेविकांना महानगरपालिकेच्या कामकाजाची पध्दती जाणून घेणे विषयी महाराष्ट्रातील अन्य महानगरपालिकेतील कार्यपध्दतीची माहिती घेणे व त्याचा आभ्यास करणे करिता खालील महानगरपालिकांना भेटी देण्यांसाठी अभ्यास दौरा आयोजित करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) ठाणे महानगरपालिका
२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका
३) पुणे महानगरपालिका
४) नाशिक महानगरपालिका
५) सोलापुर महानगरपालिका
६) कोल्हापुर महानगरपालिका

जाण्या-येण्यासाठी यांत्रिकी विभागातर्फे वाहांची व्यवस्था करण्यांत यावी. तसेच महिला नगरसेविकांच्या सोबत नगरसचिव व त्यांचे विभागातील दोन शिपाई त्यांना जाण्याची परवानगी देण्यात यावी. त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक २८-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. गुरुवार दिनांक २८-१२-९५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती स्थायी समिती श्री. प्रदिप जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. सभेस स. सभासद तथा महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.**

१) मा. श्री. अब्दुल रशिदखान (मामू)
२) मा. श्री. सुभाष कच्छवाह
३) मा. डॉ. श्री. भागवत कराड
४) मा. श्री. गौतम खरात
५) मा. सौ. रजनी जोशी
६) मा. श्री. प्रकाश निकाळजे
७) मा. श्री. कंवरसिंग बैनाडे
८) मा. श्री. महंमद मुश्ताक अहमद
९) मा. कु. माया लाडवाणी
१०) मा. श्री. विजयकुमार मेहेर
११) मा. श्री. प्रभाकर विधाते
१६) मा. श्री. महादेव सुर्यवंशी
१७) मा. सौ. पद्मा शिंदे
१४) मा. श्री. सुदाम सोनवणे
१५) मा. श्री. हमीदउद्दिन ताबा

**संवाद :**

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** शहरात विविध ठिकाणी २५०० विद्युत खांबे उभे करण्याबाबत यापूर्वीच स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. तथापी अद्यापही शहरात बऱ्याचशा भागात विद्युत खाबे उभे करण्यांत आलेले नाहीत. सध्या या कामासाठी आवश्यक ते साहित्य नसल्याचे समजते. या संदर्भाने संबंधितास स्थायी समिती सभेस माहिती देण्याबाबत आदेश व्हावेत.

**अतिरिक्त शहर अभियंता :** १५०० विद्युत खांबे शहरात विविध ठिकाणी उभारण्याबाबत मंजुरी मिळाल्यानुसार ४००-४२५ खांबे उभारण्यांचे काम पूर्ण झालेले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने या कामा संदर्भात महानगरपालिकेकडून काही बाबींची पूर्तता करण्याबाबत सुचविण्यात आलेले आहे. महानगरपालिकेने लावलेले पोलची पाहणी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ पुढील कामाबाबत ना हरकत प्रमाणपत्र देणार आहे. यासाठी थोडासा अवधी लागण्यांची शक्यता आहे.

**डॉ. भागवत कराड :** सध्या शहरात बऱ्याच ठिकाणी सोडियम व्हेपरचे दिवे लावलेले आहेत मात्र माझ्या वॉर्डात अद्यापही सोडीयम व्हेपर विद्युत दिवे लावले नाहीत. या संदर्भाने मी या आयुक्तांशीही चर्चा केलेली आहे. तेंव्हा माझ्या प्रभागात सोडीयम व्हेपर विद्युत दिवे लावण्याबाबत संबधितास आदेश देण्यात यावेत.

**अतिरिक्त शहर अभियंता :** क्रांती चौक ते महावीर चौक या रस्त्यांच्या मध्यातून विद्युत मंडळाची लाईन गेलेलल आहे. हे विद्युत खंबे हटवण्याबाबत आपण विद्युत मंडळाकडे पैसेही भरलेले आहेत. विद्युत मंडळ लवकरच हे खंबे हटवत आहेत. त्यानंतर या मार्गावर सोडीयम व्हेपर विद्युत दिवे लावण्यांचे काम महानगरपालिका हाती घेऊ शकेल.

**मा. सभापती :** या कामा संदर्भाने टेंडर मंजूर झालेले आहेत. तेंव्हा प्राधान्याने हे काम करून घ्यावे.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** मागील स्थायी सिमती बैठकीत मी विद्यानगर मधील रस्त्यांच्या डांबरीकरण संदर्भाने माहिती मागितलेली होती. ती अद्यापही मला मिळालेली नाही.

**मा. सभापती :** शहर अभियंता यांनी माहिती डॉ. मेहेर यांना त्वरित द्यावी.

**प्रकाश निकाळजे :** शहरात आता लग्न सराईचा मौसम लक्षात घेता, सोन्याची मोठ्या प्रमाणांवर खरेदी विक्री होईल. शहरात आयात होणाऱ्या सोनयावर जकात बरोबर वसूल केली गेली पाहिजे. या संदर्भाने शहरातील ज्वेलर्सची बैठक बोलवण्यांत यावी व त्यांनी आयात केलेल्या सोन्या वर योग्य प्रमाणांत जकात भरावी, याबाबत त्यांना आवाहन करण्यात यावे.

**मा. सभापती :** जकात अधिक्षकांनी मागील वर्षाकरिता शहरात किती सोने आयात झाले, त्यावर किती जकात वसूल करण्यांत आली, याची प्रथम माहिती संकलित करून सभागृहात ठेवावी व शहरातील ज्वेलर्सची बैठक आयोजित करावी.

**श्री. सुदाम सोनवणे :** शहरामध्ये आयात होणारा माल हा शहरातच न उतरता बाहेरगांवी जाणार असेल तर अशा मालावर जकात कर न आकरता महापालिका त्यांच्याकडून ट्रॅझीट फी घेते व ज्या नाक्यावरून माल बाहेर जात असेल त्या नाक्यावर त्यांची नोंद होते. दि.१३-११-९५ रोजी एक ट्रक शहरात माल घेऊन आल्यानंतर तो त्याच दिवशी परत न जाता १४-११-९५ रोजी शहरातून बाहेर गेला. दि. १३-११-९५ रोजी एक ट्रक शहरात माल घेऊन आल्यानंतर तो त्याच दिवशी परत न जाता १४-११-९५ रोजी शहरातून बाहेर गेला ही बाब मी संबंधित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून दिलेलीआहे. शहरातून जाणाऱ्या अशा मालवाहू गाड्यानी शहरात प्रवेश किती कालावधीत शहरा बाहेर जावयास पाहिजे याबाबत महानगरपालिकेने नियम ठरवलेले आहेत. काय व त्या कालावधीत ती गाडी शहराबाहेर गेली अथवा नाही ते तपासण्याची पध्दती काय याबाबत माहिती देण्यात यावी.

**जकात अधिक्षक :** जर आयात गाडीतील माल शहरात न उतरता बाहेरगावी जाणार असेल तर शहरात प्रवेश केल्यानंतर तीन तासात ती गाडी परत शहराबाहेर गेली पाहिजे. परंतु काही वेळा ते मुदत वाढवून घेतात. त्यामुळे त्यांचे शहरातील वास्तव्य वाढते. मात्र अशी मुदतवाढ संबंधित वाहन चालकांने घ्यावयास हवी.

**मा. सभापती :** जकात अधिक्षक यांनी स. सदस्य श्री. सोनवणे यांच्या प्रश्नांवर पुढील बैठकीत माहिती द्यावी.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** शहरात येणारा माल जर तसात परत बाहेरगांवी जाणार असेल तर अशा मालासाठी ठेऊन घेणाऱ्या डिपॉझीट रकमेत वाढ करण्यात यावी. जेणेकरून डिपॉझीट घेण्यांसाठी त्या वाहन चालकास वेळेच्या आत पुढील नाक्यावर जावे लागेल.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** शहरात औषधी साहितया बरोबर वैद्यकीय व्यवसायातील मंडळी अशा प्रकारचे सॅम्पल्स मोफत न देता काही दुकानदार ते विकतात. अथवा गाडीत समोरील बाजूस सॅम्पल्स वरही जकात फसवणूक करणाऱ्या विक्रेत्याविरुध्द कार्यवाही करावी.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** वैद्यकीय व्यवसायातील मंडळी त्यांच्याकडे असलेले सॅम्पल्स रुग्णांना मोफत वाटतात. त्यावर ते कोणतेही शुल्क आकारत नाहीत. तसेच सॅम्पलच्या बाटलीवर "नॉट फॉर सेल" असेही लिहिलेले असते.

**मा. सभापती :** शहरात होणात्या औषधीत सॅम्पल विकले जात नाहीत. याची जकात अधिक्षकांनी प्रथम खात्री करावी.

**श्री. प्रकाश निकाळजे :** शहरात जे कापड विक्रीसाठी येते ते खरेदीपेक्षा कितीतरी जादा भावाने विकले जाते. विशेषतः साड्या कापड्यावरील जकातीबाबत डोस भूमिका घेण्यात यावी.

**मा. सभापती :** अशा प्रकारचे खरेदी केलेले कापड विक्रीसाठी शहरांत येते त्यावेळी त्यासोबत येणाऱ्या बिलावर सेल्स टॅक्स इनकम टॅक्स इ. नंबर असतात. त्यामुळे अशा बिलांवर आपण विश्वास दाखवू शकत नाही. तथापी जकात अधिक्षक यांनी कापड, औषधी व इतर आयात होणाऱ्या मालांवरील देयके बरोबर आहेत व नियमानुसार जकात वसुली केली जाते याबाबत स्वतः लक्ष घालून पाहणी करावी. यामुळे जकात उत्पन्नात वाढ होऊ शकते.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** शहरात अनेक मंगल कार्यालये आहेत अशा मंगल कार्यालयांतून सातत्याने अनेक कार्यक्रम घेतले जातात व यासाठी मोठ्या प्रमाणावर भाडे वसूल केले जाते. महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडावी या दृष्टीकोनातून शहरातील मंगल कार्यालयांना कमर्शियल टॅक्स लावण्यात यावा.

**मा. सभापती :** उप आयुक्त-२ यांनी या संदर्भाने सविस्तर माहिती घेऊन टॅक्स लावण्या संदर्भाने पुढील कार्यवाही करावी. स्थायी समितीस कार्यवाहीची माहिती द्यावी.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** महानगरपालिकेच्या वतीने कंत्राटदारांना जी कामे दिली जातात ती वेळेवर न झाल्यास त्यांना त्यांना दंड आकारण्यात येतो. मात्र कंत्राटदारांना वेळेवर साहित्य दिले जात नाही वा त्यांची देयके वेळेवर साहितय दिले जात नाही वा त्यांची देयके वेळेवर अदा केली जात नाहीत मग त्याने वेळेवर काम केले नाही म्हणून दंड कसा आकारला जातो.

**मा. सभापती :** कंत्राटदाराने त्यास दिलेले विहित वेळेत पार पाडले जात नसेल तर त्यावर काय दंडात्मक कार्यवाही केली जाते याबाबत विधी सल्लागार यांनी माहिती द्यावी.

**विधी सल्लागार :** कंत्राटदाराने काम देतांना टेंडरच्या अटी व शर्तीमध्ये हे नमूद असते की त्याचे सदरचे काम किती कालावधीत पूर्ण करावयास हवे. त्या अवधित काम पूर्ण न झाल्यास नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाते.

**शहर अभियंता :** क्रांतीनगर भागात खांडकी पेव्हींग करण्यासंदर्भाने सदर कंत्राटदाराने ३१ टक्के कमी दराने काम स्विकारले होते. काम प्रत्यक्षात चालू असतांना सदर कामाच्या प्रतीबाबत संबंधित कंत्राटदारास नोटीस दिली होती परंतु त्यांना कामाचा दर्जा चांगला ठेवला नाही. अशा प्रकरणांत निविदा रक्कमेच्या १० टक्के पर्यंत दंड आकारता येतो. कामाची प्रत चांगली ठेवावी व मुदतीत काम व्हावे हा दंड आकारण्यामागाचा सदर प्रकरणांत उद्देश होता.

**मा. सभापती :** कंत्राटदारांना कामे दिल्यानंतरही कार्यालयाकडून वेळेवर साहित्य पुरविले जात नाही अशा स्वरुपाच्या अनेक कंत्राटदारांच्या तक्रारी आहेत. आवश्यक ते साहित्य वेळेवर कंत्राटदरास दिले नाही तर तो वेळेवर काम पूर्ण करू शकणार नाही. व त्यामुळे त्यांस दंडही आकारता येणार नाही.

**शहर अभियंता :** साहित्य वेळेवर देऊनही कंत्राटदार वेळेवर काम पूर्ण करत नाहीत. ज्यांना वेळेवर साहित्य पुरविले जात नाही त्यांना कामाच्या संदर्भाने मुदतवाढही दिली जाते.

**मा. सभापती :** कार्यालयातर्फे वेळेवर साहित्य पुरविले जात नसेल तर संबंधित कंत्राटदारास मदतवाढ देण्यांत यावी व अशा प्रकरणांत दंड कमी आकारण्याबाबत विचार करण्यात यावा. मात्र कामाच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड करण्यांत येवू नये.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** मागील एका सभेत मुख्य लेखा परिक्षकांनी निवेदन केले होते की, अशा प्रकरणांत १० टक्के रक्कम जप्त केली जाते. त्यानुसारच कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** अशातच मिल कॉनर्रर येथील दुकानांना आग लागली होती. या संदर्भाने अग्निशमन दलास फोन केला तेंव्हा कोणीही लवकर फोन उचलत नव्हते. तसेच फोनवर संदेश दिल्यानंतरही घटनास्थळी अग्निशमन दलाची गाडी वेळेवर आली नाही. मुख्य अग्निशमन दल अधिकाऱ्यांनी स्थायी समिती बैठकीस उपस्थित रहावे असे या पूर्वीही मा. सभापतींनी आदेशित केलेले असतांना मुख्य लेखा अधिकारी या बैठकीस उपस्थित राहत नाहीत. त्यामुळे सभासदांनाही विचारलेली माहिती त्यांना वेळेवर मिळत नाही. विभागीय अधिकाऱ्यांनी किमान महिण्यातून एकदातरी स्थायी समिती बैठकीस उपस्थित राहिले पाहिजे जेणेकरून विभांगातील समस्यांवरही चर्चा करता येऊ शकेल.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांना बैठकीस हजर राहण्याबाबत सूचना देण्यात याव्यात तसेच अग्निशमन अधिकारी यांनी शहरात ज्या आगजन्य घटना घडतात त्याची वेळोवेळी माहिती सभागृहास सादर करावयास पाहिजे.

डॉ. कराड यांनी गाड्या खरेदी संदर्भाने जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यात महानगरपालिकेने ऑन मनी देऊन गाड्या खरेदी केल्या ह्या बाबतीतस कोणतीही आधार नाही. शासन कोटा व लोकल पर्चेस यात तफावत ही असणारच महानगरपालिकेने दोन्ही गाड्या कंपनीकडून खरेदी केलेल्या आहेत त्यामुळे ऑन मनी देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. महानगरपालिका सभागृह नेता, विरोधी पक्षनेता यांच्या गाड्या तसेच बऱ्याचशा इतरही अधिकाऱ्यांच्या गाड्या खराब आहेत. मा. महापौर हे या शहराचे प्रथम नागरिक आहेत म्हणूनही त्यांना चांगली गाडी असावयास पाहिजे. आपण लवकरच काही गाड्या घेणार आहोत. उन्हाळ्यांत पाणी टंचाई निर्माण झाल्यास या गाड्यांत पाण्यांचे टॉकर ठेऊन जनतेसाठी पाण्याची सोय केली जाईल व उन्हाळ्यानंतर या गाड्या टँकर काढून शहरातील कचरा उचलण्यासाठी वापरल्या जातील. अधिकारी, पदाधिकाऱ्यांच्या गाड्या दुरुस्त करण्याबाबत संबंधित उप अभियंता यांनी संचिका बनवून त्यांस मंजुरी घ्यावी व गाड्या दुरुस्त करवून घ्याव्यात.

**श्री. सुदाम सोनवणे :** महानगरपालिकेच्या सिध्दार्थ जलतरण तलावार पोहण्यासाठी महिला जातात. मात्र या भागातील काही मुले त्याची छेडछाड बंदोबस्त व्हावा.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** या पुलाच्या शेजारी एक ३.४ मजली इमारत आहे. या इमारतीस महानगरपालिकेची परवानगी आहे काय? या इमारतीस महानगरपालिकेची परवानगी आहे काय? या इमारतीस नसेल तर ती बांधण्यात कशी आली?

**श्री. अब्दुल रशिद :** मुंबई पुण्या सारख्या शहरांतही स्विमिंगपुल शेजारी मोठ्या मोठ्या इमारती आहेत जर कोणी महिनांची छेडछाड काढत असेल तर आतापावेतो पोलिस स्टेशनांत एकदा गुन्हा दाखल करण्यांत कसा आला नाही.

**मा. सभापती :** मागील वादळीत जलतरण बाजुचे संरक्षित शेड तुटून पडली होती. ती अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्राधान्याने परत उभी करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच जर कोणी महिलांची छेड काढत असेल तर अशा व्यक्तिविरुध्द पोलिस करवाई करण्यांत यावी. संबंधित वॉर्डाचे नगरसेवक, श्री. रशिद मामू यांनीही या बाबत लक्ष घालून या भागातून महिलांना जाता येतांना कोणी छेडछाड करणार नाही याकडे लक्ष द्यावे.

**श्री. कवंरसिंग बैनाडे :** एन-८ भागातील शाळेत सातशे-आठशे विद्यार्थी शिकत आहेत. मग या शाळेस संरक्षित भिंत नाही. यामुळे शाळेच्या आवारात गुरे येतात. या संदर्भाने मी २-३ महिण्यापूर्वीही अर्ज दिलेला आहे. मात्र अद्याप पावेतो त्यावर कार्यवाही झालेली नाही. तसेच एन-६ मधील स्मशान भूमित विद्युत दिवे नाही.

**श्री. प्रभाकर विधाते :** बेगमपुरा भागातील स्मशान भूमी शेजारी विटभट्ट्या चालू आहेत. तसेच या स्मशान भूमी भोवती काटेरी झाडेही मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहेत. त्यामुळे एखाद्या अंत्ययात्रेत जातांना लोकांना अनेक त्रास हसन करावे लागतात. याबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** एन-१२ स्मशान भूमीत अनेक ठिकाणी मोठे मोठे चबुतरे सारखेच बांधण्यात आले तर या भागातून स्मशान भूमी हलवावी लागेल. एकतर चबुतरे बांधण्याची परवानगी देण्यांत येऊ नये अथवा त्यांचा आकार कायम करण्यांत यावा.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी या सर्व बाबींकडे लक्ष देऊन शहरातील सर्वच स्मशान भूम्यांमध्ये आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. पुढील बैठकीत अहवाल सादर करावा.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** महानगरपालिकेतर्फे बारुदनगर नाल्यावरती इमारत बांधण्याचे काम चाूल होते बंद पडलेले आहे. महानगरपालिकेच्या तेथील जागेवर काही लोक स्वतः ची कामे करवून घेत आहेत. यामुळे महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण होतील व महानगरपालिकेची जागाही जाईल.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी स्थळ पहाणी करून पुढील बैठकीत अहवाल सादर करावा.

**श्री. गौतम खरात :** शहरात अनेक ठिकाणी मोठीमोठी जाहिरात फलके, होर्डिग्ज लावलेली आहेत. या जाहिरात फलकांपासून महानगरपालिकेस किती उत्पन्न मिळते. याची माहिती देण्यात यावी. तसेच शहरात चित्रपटगृहांतून चालू असलेल्या चित्रपटांचे पोस्टर्स लावण्यात येतात यात विशेषतः इंग्रजी चित्रपटांचे पोस्टर्स हे अत्यंत आश्लिल असतात. सार्वजनिक ठिकाणी असे पोस्टर्स लावण्यावरती बंधने घालण्यात यावीत. शासकीय निमशासकीय कार्यालयाच्या भिंतीवरती

जाहिराती लिहू नयेत, अशा भिंती विद्रुप करू नयेत असे शासनाचे नियम असतांनाही महानगरपालिका कार्यालयाच्या अनेक भिंतीवर जाहिराती लिहिलेल्या दिसून येतात. अशा जाहिराती लिहिणारा विरुध्द कायदेशिर कार्यवाही करावयास पाहिजे. तसेच शासकीय निमशासकीय कार्यालयांच्या भिंतीवर जाहिराती वा अन्य मजकूर लिहू नये याची जनतेस जाणीव करून द्यावयास पाहिजे.

**मा. सभापती :** शहर अभियंता अति. शहर अभियंता, मालमत्ता अधिकारी यांनी मिळून एक प्रस्ताव तयार करावा की, महानगरपालिकेच्या इमारतीवर कोणत्याही पक्षाने वा संस्था, संघटनेने पोस्टर्स चिटकवू नयेत वा कोणतेही घोषणावाक्य लिहून नये. असे केल्यास कायद्याचे उल्लंघन केले म्हणून त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यांत येईल. या संदर्भाने आवश्यक ते ठराव सर्वसाधारण सभेपुढे ठेवावा. व महानगरपालिकेच्या मालमत्तेवर कोठे पोस्ट्र्स लावलेले आढळून आल्यास वा घोषणावाक्ये लिहिलेली दिसून आल्यास संबंधिताविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** या संदर्भाने त्या त्या विभागातील विभागीय अधिकाऱ्यांनाही लक्ष द्यावयास पाहिजे. विभागीय अधिकाऱ्यांना या संदर्भाने नोटीस देण्यांत यावी.

**मा. सभापती :** उप आयुक्त-२ यांनी या संदर्भाने विभागीय अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात.

**विधी सल्लागार :** महानगरपालिकेच्या वतीने विविध कोर्टात काम करणाऱ्या वकीलांचे पॅनल नव्याने बनवण्यात येणार आहे. जे अर्ज प्राप्त झालेले आहेत त्यांची रुटीनी चालू आहे. या कामासाठी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी.

**श्री. मुश्ताक अहमद :** महानगरपालिकेच्या पॅनलवर काम करण्यासाठी ज्या वकीलांचे अर्ज आलेले आहेत ते बहुतांश ज्युनियर विधीज्ञाचे आहेत विशेषतः उच्च न्यायाल्यात काम करत असलेले सिनिअर , ॲडव्होकेटस अशा पकारे पॅनलवर काम करण्यासाइी स्वतः अर्ज करणारनाहीत. तेव्हा महानगरपालिकेतर्फे अशा सिनिअर ॲडव्होकट्सना महानगरपालिकेच्या पॅनलवर महानगरपालिकेतर्फे काम पहाण्याबाबत पत्र लिहिण्यात यावे.

**मा. सभापती :** विधी सल्लागार यांनी महानगरपालिकेच्या पॅनलवर काम करण्याबाबत सिनिअर ॲडव्होकेट्सनांही पत्र द्यावे.

**डॉ. भागवत कराड :** पैठण गेट ते क्रांती चौक या रस्त्याचे पूर्व बाजूने रुंदीकरण होणार आहे. या भागातील काही नागरिक रस्ता रुंदीकरणातील बाधित मालमत्ता संपादित करू देण्यास तयार आहेत. तेंव्हा महानगरपालिकेतर्फे अशा मालमत्ता संपादित करण्यात याव्यात तसेच रस्ता रुंदीकरणाचे काम लवकर होती घेतले जावे.

**मा. सभापती :** सहा. संचालक नगर रचना व विधी सल्लागार यांनी याबाबत स्वतः लक्ष घालून भसंपादनाबाबत योग्य ती कार्यवाही करावी. शक्य तेथे निगोशिएशन्स करण्यात याव्यांत. जर मालमत्ता संपादनाबाबत काही डिस्पुट असेल तर त्याचा निवारणार्थ महानगरपालिका काय करू शकेल याबाबतही विचार करण्यात यावा.

**श्री. प्रकाश निकाळजे :** शहरात अनेक ठिकाणी सार्वजनिक शौच्यालये, मुत्र्या आहेत. त्यांच्या सफाईसाठी टॅंकरही आहे. या टॅंकरद्वारे मुख्य रस्त्यांवरील सार्वजनिक शौच्यालये मुत्र्यांतच पाणी टाकते अरुंद गल्ली गोळातून ते टॅंकर जाऊ

शकत नाही काही वेळेला टँकर ड्रायव्हर जवळ पुरेसा पाईप नसल्यामुळे तो अशा शौच्यालयातून मुत्र्यांतून पाणी टाकू शकत नाही. त्यामुळे अशा भागातील रहिवाशांना त्रास होतो.

**मा. सभापती :** उप अभियंता यांत्रिकी यांनी या बाबत स्वतः लक्ष घालून शहरातील सार्वजनिक शौच्यालये, मुत्र्या नियमित साफ करण्याबाबत आदेश द्यावेत तसेच टँकरवर पाणी टाकण्यासाठी पाईप पुरविण्यांत यावा.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** प्रकल्प विभागांत दोन कम्यनुनिटी ऑर्गनाझर्स बऱ्याच दिवसांपासून काम करत आहेत. मात्र त्यांना नियमित वेतनश्रेणी देण्यांत येत नाही. त्यांच्या सेवा लक्षांत घेता त्यांना त्या पदासाईची वेतन श्रेणी देण्यात यावी.

**मा. सभापती :** या संदर्भाने सहा आयुक्त-१ यांनी पुढील स्थायी समितीत संपूर्ण माहिती द्यावी.

**श्री. अब्दुल रशीद खान (मामू) :** महापौर बंगल्यावर आतापावेतो किती फर्निचर खरेदी करण्यांत आले याची माहिती मला मागूनही अद्याप मिळालेली नाही.

**लेखाधिकारी :** सध्या फिजिकल व्हेरीफिकेशन चालू आहे. हे होताच माहिती देण्यात येईल.

**श्री. हमीदउद्दिन ताबा :** माझ्या वॉर्डातील समाज मंदिराबाबत पूर्वी ही डिस्प्युट होतो. तो आता मिटलेला आहे. तेंव्हा आता माझ्या वॉर्डातील समाज मंदिराच्या बांधकामाबाबत मंजुरी देण्यात यावी.

**श्री. गौतम खरात :** महानगरपालिका हद्दितील सर्वच समाज मंदिरातून लायब्ररीज चालू करण्यांत याव्यात. कारण बहुतेक समाज मंदिरे ही झोपडपट्ट्यांतून आहेत. त्यामुळे झोपडपट्ट्यातून राहणाऱ्या गरीबांच्या मुलांना शिक्षणासारखी महत्वाची सुविधा मिळू शकेल तेंव्हा सर्वच समाज मंदिरातून शैक्षणिक पुस्तके ठेवण्यात यावीत.

**मा. सभापती :** समाज मंदिरे उभारण्याचा उद्देश साध्या व्हावयास पाहिजे परंतु सध्या महानगरपालिकेच्या समाज मंदिराची अवस्था चांगली नाही. सर्वच समाज मंदिरातून ४ थी ते ११ पर्यंतची शालेय पुस्तके ठेवावीत. अशा प्रकारच्या ठराव प्रकल्प संचालकांनी येत्या सर्वसाधारण सभेत ठेवावा. याचबरोबर महादेव सुर्यवंशी, अलक पाटील, हमीद उद्दिन ताबा यांच्या वॉर्डातील समाज मंदिराचा प्रस्तावही मंजुरीस्तव पुढील बैठकीत ठेवण्यांत यावा. तसेच आपल्या वॉर्डातील समाज मंदिरे आदर्श राहतील. याबाबत सर्वच नगरसेवकांनी जागरूक रहावे.

**विषय क्र. ३०५/१ :**

दि. २८-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. अब्दुल रशीदखान (मामू) :** दि. २१-१२-९५ च्या स्थायी समिती बैठकीत ठराव क्र. २५४/२५ स्थगित ठेवण्यांत आला होतो. मात्र इतिवृत्तात तो मूंर लिहिण्यांत आलेला आहे.

**मा. सभापती :** ठराव क्र. २५४/२५ स्थगित ठेवण्यांत आलेला होतो. त्यांस मंजुरी देण्यात येते.

**डॉ. भागवत कराड :** मागील एका स्थायी समिती बैठकीत मी शहरातील मालमत्ता धारकांना मालमत्ता करा संदर्भाने पासबुकच्या आकाराची पुस्तके देण्यांत यावीत अशी सूचना मांडली होती. यामुळे एका दृष्टीक्षेपात संबंधित मालमत्ता धारकाने किती वर्षाचा कर भरलेला आहे. व त्याच्याकडे किती थकबाकी आहे हे लक्षात येऊ शकेल. त्याचबरोबर मालमत्ता करावर क्रॉस चेक पण ठेवता येईल. मात्र अद्यापपावेतो या सुचनेवर कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

**मा. सभापती :** उप आयुक्त-२ यांनी उक्त संदर्भाने प्रस्ताव आगामी सर्व साधारण सभेसमोर ठेवावा.

**श्री. अब्दुल रशिद मामू :** दि. १२-१२-९५ च्या स्थायी समिती सभेत आदेशित केल्यानुसार डेव्हलपमेंट प्लॅन संदर्भाने माहिती देण्याबाबत सहा संचालक नगर रचना यांना आदेशित करण्यात यावे.

**सहा. संचालक नगर रचना :** अशा प्रकारच्या शासनाचा निर्णय मिळू शकला नाही. या सदंर्भान उप संचालक नगर रचना यांना आगामी स्थायी सभेत उपस्थित राहण्याबाबत विनंती करण्यात येईल.

**मा. सभापती :** नगर रचनाकार यांनी मागील स्थायी समितीत दिलेली माहिती ही समाधानकारक नाही. तेंव्हा आगामी स्थायी समिती सभेत उप संचालक नगर रचना यांना डेव्हलपमेंट प्लॅन व त्यातील रिझर्वेशन संदर्भाने रशिद मामू यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत माहिती घेऊन उपस्थित राहण्याबाबत सहा. संचालक नगर रचना यांनी पत्र द्यावे.

**श्री. सुदाम सोनवणे :** मुकूंदवाडीतील रहिवाशी तसेच माझ्या वॉर्डातील कांही रहिवाश्यांनी पाणीपट्टी भरण्याबाबतचा पुन्हा नोटीसेस आलेल्या आहेत. अथवा ज्यांच्याकडे नळ कनेक्शनच नाहीत त्यानंतरही नोटीसेस मिळालेल्या आहेत त्यामुळे मालमत्ता धारक कर भरण्यांस तयार नसतात.

**मा. सभापती :** उप अभियंता, पाणी पुरवठा-२ तसेच उप आयुक्त-२ यांनी स्वत: अशा प्रकारणांत लक्ष घालावे. तसेच संबंधित विभागीय अधिकाऱ्यांसही या संदर्भाने सूचना देण्यात याव्यात. ज्यांनी नळपट्टी संदर्भाने अर्ज केलेले आहेत त्यांच्याकडे खरोखरच नळ कनेक्शन नाही अथवा त्याने नळपट्टी भरलेली असतांनाही पुन्हा नोटीस दिलेली असतेल तिची खातरजमा करून ती रद्द करण्यात यावी.

**श्री. महादेव सुयर्वंशी :** सिडको भागातील काही नागरिकांनी नळपट्टी भरलेली असतांनाही त्यांना दोन दोनदा नोटीसा दिल्या जातात व त्यांना थकबाकी दर्शविली जाते. तर कांही जनाकडे थकबाकी असतांनाही त्यांची बिले माफ केली जातात. यांत काही गैरप्रकार आहेत काय याची चौकशी व्हावी.

**श्री. प्रकाश निकाळजे :** उन्हाळ्यात होणारी संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेता महानगरपालिकेच्या सार्वजनिक नळांना तोट्या बसवण्यात याव्यात. त्याचबरोबर जनतेनेही नळांना तोट्या लावाव्यात अशी कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. मुश्ताक अहेमद :** महानगरपालिकेच्या वतीने जे विविध कामे हाती घेतली जातात त्या संदर्भाने मोठ्या प्रमाणात टेंडर्स काढली जातात. मात्र दर जास्त आले या संबंधी खाली कंत्राटदाराशी निगोशिएशन्स करावयाची आहेत म्हणून कालापव्य केला जातो. त्यामुळे कामेही लांबणीवर पडतात तेव्हा आठवड्याच्या आत टेंडर स्थायी समिती समोर मंजुरीसाठी ठेवण्यात यावे.

**मा. सभापती :** टेंडर ओपन झाल्यानंतर एक आठवड्यांच्या आतंत स्थायी समिती समोर ठेवण्यात यावे.

**डॉ. भागवत कराड :** निराला बाजार समोरील अतिक्रमणे पाडण्याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही ही अतिक्रमणे केंव्हा पाडण्यात येणार आहेत.

**मा. सभापती :** प्रकरण न्यायप्रविष्ठ होते. सध्या कोर्टास सुट्ट्या आहेत. त्यानंतर त्यावर सुनावणी होऊ शकेल व कोर्ट निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.

**ठराव :**

दिनांक २१-१२-९५ च्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास निम्न बाबींचा समावेश करण्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. ठराव क्र. २५४/२५ मंजूर करण्यात येते.

२. मालमत्ता धारकांना मालमत्ता करा संदर्भाने पुस्तिका देण्याबाबतचा प्रस्ताव उप आयुक्त-२ यांनी आगामी सर्वसाधारण सभेसमोर ठेवावा.

३. डेव्हलपमेंट प्लॅन संदर्भाने विचारल्या गेलेल्या प्रश्नावर उत्तर देण्याबाबत उप संचालक नगर रचना यांना आगामी स्थायी समितीत उपस्थित राहण्याबाबत सूचना देण्यांत याव्यात.

४. शहरात उत्पन्न होणारा पाणी टंचाईचा प्रश्न लक्षांत घेता महानगरपालिकेच्या सार्वजनिक नळांना तोट्या लावण्यांत याव्यात. तसेच खाजगी नळ धारकांनीही त्यांच्या नळांना तोट्या लावव्यात अशा सूचना देण्यांत याव्यात नळपट्टी संदर्भाने असलेल्या तक्रारीवरती उप आयुक्त-२ व उप अभियंता यांनी स्वतः लक्ष घालून योग्य ते निर्णय घ्यावेत.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटरच्या दुसऱ्या टप्प्यात काम सुरू करण्याबाबत टेंडर कॉल करण्यांत यावे.

६. टेंडर उघडल्यानंतर आलेल्या दराबांबत आवश्यक तेथे कंत्राटदारांशी निगोशिएशन्स करून आठ दिवसांत प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवावेत. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०६/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. मिलिंदनगर स्लम भागातील व्ही टाईप गटार दुरुस्त करणे, रोड क्रॉसिंग आर. सी. सी. स्लॅब टाकून प्रिकास्ट आर. सी. सी. गटार बांधणे या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रुपये २,९९,१००/- चे तयार करण्यात आले असून सदरील कामासाठी निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/३४/९५ दि. ०४-११-९५ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता. निविदाची अंतिम दि. १०-११-९५ पर्यंत एकूण चार (४) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्यांची अंतिम तारीख दि. १८-११-९५ रोजी फक्त दोन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या व त्या दि. २१-११-९५ रोजी उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघउल्या असता. तुलनात्मकदृष्ट्या गुत्तेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बी. आर. आनंद | ९.१९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २. | श्री. मन्नान खान | ६.१५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |

वरील पैकी तुलनात्कदृष्ट्या व अंदाजपत्रक दरापेक्षा ९.१९% कमी दराची निविदा श्री. बी. आर. आनंद यांची असून सदरील काम झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत खुल्या गटार या शिर्षांतर्गत करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मिलिंदनगर स्लम भागातील व्ही टाईप गटार दुरुस्त करणे, रोड क्रॉसिंग आर. सी. सी. स्लॅब टाकून प्रिकास्ट आर. सी. सी. गटार बांधणे या कामाकरिता तुलनात्कदृष्ट्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.१९% कमी दराची गुत्तेदार श्री. बी. आर. आनंद यांची निविदा मंजुर करण्यास तसेच सदरील काम झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत खुल्या गटार या शिर्षाकांतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०७/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो. कबीरनगर स्लम भागातील डांबरी रस्त्यांवरील अतिक्रमणे काढणे व खडी रस्ते (पुन्हा खडीकरण) तयार करण्यांच्या कामाकरिता अंदाजपत्रकी रक्कम रुपये २,१६,९००/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची सन १९९३-९४ प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा. आयुक्त साहेबांनी दि. १०-११-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेच्या सन १९९५-९६ अर्थसंकल्पात पुर्न डांबरीकरण या शिर्षात १०,००,०००/- लाखाची तरतूद करण्यांत आली आहे.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. कबीरनगर स्लम भागातील डांबरी रस्त्यांवरील अतिक्रमणे काढणे व खडी रस्ते (पुन्हा खडीकरण) तयार करण्यांच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रुपये २,१६,९००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०८/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. फुलेनगर स्लम भागात (पश्चिम) अर्धगोलाकार गटार तयार करणे करिता एकूण रक्कम रुपये १,५१,४००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम यांची दरसूची सन १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा. आयुक्त साहेबांनी दि. ०६-१२-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेचे अर्थसंकल्प १९९५-९६ झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत खुली गटार या शिर्षात रक्कम रुपये ५०,००,०००/- लाखाची तरतूद केली आहे.

करिता प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. फुलेनगर (स्लम) (पश्चिम) भागातील अर्धगोलाकार गटार तयार करणेच्या कामाकरिता रक्कम रुपये १,५१,४००/- तसेच झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०९/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. गाडगेनगर स्लम भागात शहाबाद फरशी रस्ते तयार करणेकरिता एकूण रक्कम रुपये ४,०३,०००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा. आयुक्त साहेबांनी दि. १६-११-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेचे सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत नवीन खांडकी रस्ते या शिर्षांतर्गत रुपये ३५,००,०००/- लाखाची तदतूद केली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गाडगेनगर (स्लम) भागात शहाबाद फरशी रस्ते तयार करणेकरिता झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत नविन खांडकी रस्ते या शिर्षा अंतर्गत रक्कम रुपये ४,०३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१०/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जहागिर कॉलनी व मगर बी ले आऊट मधील डांबरी रस्त्यांना पुर्न डांबरीकरण करण्यांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सन १९९४-९५ चे सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रुपये २,०६,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च (रस्ते दुरुस्ती) सन १९९५-९६ मधून प्रस्तावित आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. जहागिर कॉलनी व मगर बी ले आऊट मधील डांबरी रस्त्यांना पुर्न डांबरीकरण करणेचे कामास अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,०६,५००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३११/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जहागिर कॉलनी येथे खडी रस्ते तयार करण्यांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सन १९९४-९५ चे सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रुपये १,६९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च "भांडवली" रस्ते सन १९९५-९६ मधून प्रस्तावित आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. जहागिर कॉलनी येथे खडी रस्ते तयार करण्यांसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,६९,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च भांडवली रस्ते या शिर्षकामधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१२/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मिलकॉर्नर ते लिटल फ्लॉवर स्कूल या रस्त्यांवर सोडियम व्हेपरचे दिवे लाऊन विद्युतीकरण करण्यांच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) दरसूचीनुसार रक्कम रुपये ४,४८,३०९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९५-९६ वर्षासाठी महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रुपये १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी रक्कम रुपये ४,४८,३०९/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिलकॉर्नर ते लिटल फ्लॉवर स्कूल या रस्त्यांवर सोडियम व्हेपरचे दिवे लाऊन विद्युतीकरण करणेसाठी रक्कम रुपये ४,४८,३०९/- च्या अंदाजपत्रकास

तसेच महाराष्ट्र शासनाच्या मिळणाऱ्या १० कोटी रुपयाच्या अनुदानामधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१३/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गजाननगर, हनुमाननगर, शहानुरवाडी व गारखेडा परिसरातील वसाहतींमध्ये स्ट्रीट लाईट पोलवर विद्युत व्यवस्था करण्यासाठी अतिरिक्त तार ओढण्यासाठी म.रा. वि. महामंडळ (शहर विभाग) यांच्या कडून कोटेशन क्रमांक ७९७४ दिनांक १६-१०-१९९५ रुपये १,२५,०७०=०० प्राप्त झाले असून सदरील रक्कम म.रा. वि. मं. या कार्यालयांत भरावयाची आहे. सदर कामाच्या खर्चास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

तरी रक्कम रुपये १,२५,०७०=०० चे खर्चास व रक्कम म.रा.वि. मं. कार्यालयात भरण्यास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गजाननगर, हनुमाननगर, शहानुरवाडी व गारखेडा परिसरातील वसाहतींमध्ये स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्याच्या कामासाठी तसेच अतिरिक्त तार ओढण्यासाठी म.रा. वि. मंडळ (शहर विभाग) यांचे कार्यालयांत १,२५,०७०/- भरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१४/१० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नागेश्वरवाडी येथे श्री. शिंदे यांच्या घरापासून हॉटेल मेवाड पर्यंतची ड्रेनेज लाईन अप्रुटींग करून २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्यांच्या कामाकरिता रुपये १,७८,०००/- चे अंदाजपत्रक तयार केले असता, त्यास स्थायी समितीमध्ये विषय क्र. ८६/२ दिनांक ११-०९-९५ नुसार मंजुरी मिळाली असून या कामासाठी निविदा सूचना क्र. लेखा/निविदा/३४/९५ दि. ०४-११-९५ नुसार बी-१ नमुन्यांत निविदापत्रके मागविण्यात आली असता विक्री झालेया ११ निविदापत्रकांपैकी एकूण दर भरलेल्या २(दोन) निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदा खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. भालेराव एस. जी. | ३% जास्त |
| २. | श्री. राठोड माणिकराव खीरा | अंदाजपत्रकीय दराने |

वरील दोन प्राप्त निविदा प्रत्रकापैकी श्री. राठोड माणिकराव खीरा यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने असल्यामुळे त्यांनी भरलेल्या निविदेस मान्यता मिळणेसाठी.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. नागेश्वरवाडी येथे श्री. शिंदे यांच्या घरापासून हॉटेल मेवाड पर्यंतची ड्रेनेज लाईन अप्रुटींग करून २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्यांच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची गुत्तेदार, श्री.माणिकराव राठोड यांचे अदांजपत्रकीय दराने काम करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१५/११ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हमालवाडी रेल्वेस्टेशन भागात १५० व २५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे, या कामाकरिता ३,११,२००/-

चे अंदाजपत्रक तयार केले असता, त्यास स्थायी समितीमध्ये विषय क्र. १०८/२४ दिनांक ११-०९-९५ नुसार मंजुरी मिळाली असून या कामासाठी निविदा सूचना क्र. लेखा/निविदा/३४/९५ दि. ०४-११-९५ नुसार बी-१ नमुन्यांत निविदापत्रके मागविण्यात आली असता विक्री झालेल्या ११ निविदापत्रकांपैकी ३ निविदापत्रके दर भरलेली प्राप्त झलेली आहेत. प्राप्त निविदा खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सलीम पटेल | १६.९२% कमी |
| २. | श्री. शेख सलीम अहेमद | १९.१०% कमी |
| ३. | श्री. आर. आर. बारवाल | ६.०५% कमी |

वरील ३ प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. शेख सलीम अहेमद यांच्या निविदेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** संबंधित कंत्राटदाराने १९.१०% कमी दराने काम करण्यांची तयारी दर्शविली असली तरी तो या दराने कामाचा दर्जा उत्तम ठेऊ शकेल याबाबत शंका येते.

**उप अभियंता (ड्रेनेज) :** या दराने काम मंजूर केले तर संबंधित कंत्राटदार कामाचा दर्जा उत्तम ठेऊ शकेल याची खात्री देता येत नाही.

**मा. सभापती :** टेंडर शॉर्ट रिकॉल करण्यांत यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सदरचा प्रस्ताव अल्प मुदतीची फेर निविदा मागविण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१६/१२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिल्लेखाना येथील मोठी गटार दुरुस्ती करणे व गाळ काढून लोखंडी जाळ्या बसवणे य कामाकरिता रुपये ४९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्युनसार निविदा सूचना क्र. मनपा/मुलेप/१०/९५ दि.०४-०७-९५ निविदा मागविण्यात आल्या असता विक्री झालेल्या १२ निविदापत्रकांपैकी दर भरलेल्या ३ निविदा प्राप्त झल्या आहेत. प्राप्त निविदा खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. गुलाम रसूल | ७.१% कमी |
| २. | श्री. राजासिंग | १७.७०% कमी |
| ३. | श्री. सलीम पटेल | १५.९२% कमी |

वरील प्राप्त दर भरलेल्या निविदापत्रकापैकी १७.७०% कमी दराची भरलेली श्री. राजासिंग यांची निविदा कमी दराची असून त्यांन भरलेल्या निविदेस व अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४९,०००/- स मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्लेखाना येथील मोठी गटार दुरुस्ती करणे व गाळ काढून लोखंडी जाळ्या बसविण्यांच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रुपये ४९,०००/- च्या

अंदाजपत्रकास तसेच तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच १७.७०% कमी दराची निविदा श्री. राजासिंग यांचेकडून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१७/१३ :**

औरंगाबाद शहराच्या मंजूर विकास योजनेमधील आरक्षण क्रमांक १०५ "खुली जागा" मो. पन्नालालनगर न. भू. क्र. १५८५६/४ जिचे क्षेत्रफळ ८४२४ चौ. मी. असून त्यापैकी ५५२५ चौ. मी. क्षेत्र महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास त्यांचे ३३ के. व्ही. च्या विद्युत उप केंद्रासाठी भाडेपट्ट्यावर देण्याबाबत सर्वसाधारण सभेची मंजुरी ठराव क्रमांक १२८/५ दिनांक १७-०२-९२ नुसार मिळालेली आहे. सदर जागेच्या वापरातील बदलाचा किरकोळ फेरबदल प्रस्तावास शासनाची शासन निर्णय क्रमाक- टीपीएस-३०९३/१०७१/सीआर-१७५/९३ दिनांक ०८-०३-९५ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. त्या आधारे महानगरपालिकेने कळविलेल्या सर्व अटी मान्य करून सदर जागेचा आगाऊ ताबा देण्यांची विनंती मा. अधिक्षक अभियंता (संक्सू) मंडळ औरंगाबाद ह्यांनी त्यांचे पत्र क्र. २०३१ दिनांक ३०-०३-९५ अन्वये केल्याप्रमाणे दिनांक ३०-०३-९५ रोजी महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास सदरची जागा रितसर ताबा पावती करून ताब्यामध्ये दिलेली आहे.

सदर जागा भाडेपट्ट्यावर लावायचे अटी व तरतुदीनुसार

१) सदरचे जागेसाठी महानगरपालिकेतर्फे पूर्वी केलेल्या संरक्षित भिंत व सपाटीकरणापोटी झालेल्या खर्च रुपये १,८४,३५/- इतका विद्युत मंडळाने महानगरपालिकेस प्रथम अदा करावा.
२) सदर जागेचे आजच्या प्रचलित बाजार मुल्याप्रमाणे भाडेपट्ट्याची रक्कम निश्चित करण्यात आलेली असून ती रक्कम रुपये प्रतिवर्षासाठी रक्कम रुपये २,०८,०००/- एवढी होते.

सदर भाडे निश्चितीस मंजुरी मिळाल्यानंतर भाडेपट्ट्याच्या नेहमीच्या अटी व शर्तीस आधीन राहून करारनामा करून घेऊन ताबा दिल्याचे तारखेपासून प्रतिवर्षी आगाऊ भाडे आकारणी करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजूर विकास आरक्षण क्रमांक १०५ खुली जागा मो. पन्नालालनगर न. भू. क्र. १५८५६/४ जिचे एकूण क्षेत्रफळ ८४२४ चौ. मी. असून पैकी ५५२५ चौ. मी. क्षेत्र म.रा.वि.मं. यांचे ३३ के. व्ही. च्या विद्युत उप केंद्रासाठी भाडेपट्ट्यावर देण्याचा सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक १२८/५ दिनांक १७-०२-९२ नुसार मंजूर झाल्याप्रमाणे खालील अटींच्या आधीन राहून देण्यांचा मंजुरी सर्वानुमते देण्यात येते.

१) सदरचे जागेसाठी महानगरपालिकेतर्फे पूर्वी केलेल्या संरक्षित भिंत व सपाटीकरणापोटी झालेल्या खर्च रुपये १,८४,३५/- इतका विद्युत मंडळाने महानगरपालिकेस प्रथम अदा करावा.
२) सदर जागेचे आजच्या प्रचलित बाजार मुल्याप्रमाणे भाडेपट्ट्याची रक्कम निश्चित करण्यात आलेली असून ती रक्कम रुपये प्रतिवर्षासाठी रक्कम रुपये २,०८,०००/- एवढी होते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ३१८/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. रमानगर येथे नवीन खांडकी रस्ते तयार करणे व अस्तित्वात असलेली खांडकी रस्ते दुरुस्त करणे या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,७६,०००/- चे तयार करण्यात आले असून मा. आयुक्त साहेब यांनी दि. ०१-०६-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/३४/९५ दि.०४-११-९५ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक १०-११-९५ रोजी एकूण दहा (१०) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्यांच्या अंतिम तारखेस दि. १८-११-९५ रोजी फक्त दोन (२) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या व दि. २१-११-९५ रोजी फक्त दोन (२) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या व दि.२१-११-९५ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडलया असता तुलनात्मकदृष्ट्या गुत्तेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सलीम पटेल | ०.०५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
| २. | श्री. आर. एल. बालवाल | ५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा |

वरील पैकी तुलनात्मकदृष्ट्या व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची निविदा श्री. सलीम पटेल यांची असून सदरील काम झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत श्री. नविन खांडकी रस्ते या शिर्षाअंतर्गत करण्यांचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. रमानगर येथे नवीन खांडकी रस्ते तयार करणे व अस्तित्वात आलेली खांडकी रस्ते दुरुस्त करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची गुत्तेदार श्री. सलीम पटेल यांच्या निविदा तसेच सदरील काम झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम नविन खांडकी रस्ते या शिर्षाकामधून करून घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१९/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथील गट नं. ४१० पी या जागेवर आठवडी बाजाराच्या जागेत ओटे, तयारकरणे पाण्याचा हौद तयार करणे व खडी रस्ते तयार करण्यांच्या कामासाठी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५७/४ दि.२०-१०-९५ अन्वये रक्कम रुपये १०,००,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. सदरचे काम होती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/४६/९५ दि.३०-११-९५ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (२०) विक्री झाल्या निविदा स्विकारण्यांच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (३) निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक १५-१२-९५ ला उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एस. एम. मंडारे | ०.०५% कमी दराने |
| २. | श्री. कुलवंतसिंग | ३% जास्त दराने |
| ३. | श्री. एस. ए. नवाब | ७% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. एस. एम. मंडारे यांचे निविदा दर असून त्यास मा. आयुक्तांनी दिनांक २६-१२-९५ ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. सबब तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व ०.०५% कमी दराची श्री. एस. एम. मंडोरे यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. चिकलठाणा येथील गट नं. ४१० पी या जागेवर आठवडी बाजाराच्या जागेत ओटे, तयार करणे पाण्याचा हौद तयार करणे व खडी रस्ते तयार करण्यांच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची गुत्तेदार श्री. एस. एम. मंडारे यांची निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२०/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सूल फुलेनगर झोपडपट्टी मध्ये दगडी फरशी बसविण्यांचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २,६७,४००/- ला मा. आयुक्त साहेबांनी दि. २०-१०-९५ ला मंजुरी दिली होती.

सदरील काम हे विशेष घटक योजना अंतर्गत म्हाडाकडून मिळणाऱ्या रुपये ८.०० लाखा अंतर्गत असल्यामुळे सदरील कामाची निविदा नोटीस क्रमांक मनपा/लेखा/३४/९५ दि.०४-११-९५ काढण्यात आली असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (१७) निविदा विकल्या गेल्या व निविदा प्राप्त होण्यांच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (६) निविदा प्राप्त झाल्या. याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मन्नाव खॉन | ३४.९५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची |
| २. | श्री. एस. एम. हक्क | ३३.००% कमी दराची |
| ३. | श्री. शेख कमर | ३०.०५% कमी दराची |
| ४. | श्री. शेख सलीम | २७.०१% कमी दराची |
| ५. | श्री. आर. बी. चव्हाण | ३.००% कमी दराची |
| ६. | श्री. डी. यु. जोशी | ५.००% कमी दराची |

सवात कमी दराची निविदा श्री. मन्नाव खॉन ह्यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.०० कमी दराची असल्यामुळे त्यांना मा. शहर अभियंताचे आदेशाप्रमाणे एवढ्या कमी दरात काम करण्यांस कसे परवडते ह्यांचा खुलासा मागीतला असताना त्यांनी सदरील काम कसे परवडते ह्या बाबत लेखी पत्र सादर केले.

सदरील ठेकेदाराच्या पत्रानुसार सदरील कामाची ३४.१५% कमी दराची निविदा कामाचा दर्जा योग्य राखण्याबांबतच्या अटीसह मंजुरी दिली आहे.

शासकीय नियमाप्रमाणे कमीत कमी १६.००% कमी दराची निविदा स्विकारणे बाबत. मार्गदर्शन सूचना आहेत. परंतु ठेकेदाराने कामाच्या दर्जाबाबत लेखी हमी दिल्यामुळे सदरील कामाची ३४.१५% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सूल फुलेनगर झोपडपट्टी मध्ये दगडी फरशी बसविण्यांचे कामाची फेरनिविदा मागविण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२१/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. किलेअर्क (अ) स्लम येथे नविन खांडकी बसविणे व जुनी अव्यवस्थित खांडकीस दुरुस्त करणे व नविन गटार बांधणेबाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९२-९३ च्या दरसूचीनुसार रुपये २,७८,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम ५% कमकुवत घटक योजना रुपये रु. ३,७४,९८२३/- या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २६-०६-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अदांजपत्रक रुपये २,७८,७००/- यास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. किलेअर्क (अ) स्लम येथे नविन खांडकी बसविणे व जुनी अव्यवस्थित खांडकीची दुरुस्ती करणे तसेच नविन गटार बांधण्यांच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये २,७८,७००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२२/१८ :**

घाटी झोपडपट्टी मध्ये गुलाबवाडी वस्तीत नविन दगडी फरशी बसविण्यांचे अदांजपत्रकास र. रु. ३,२६,२१७=०० मा. आयुक्त साहेबांनी दि. २६-०६-१९९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील अंदाजपत्रकास स्थायी समितीत दि. १०-०७-९५ ला ठराव क्र. ५१/११ प्रमाणे मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामसाठी निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/३४ दि.०४-११-९५ नुसार निविदा मागविण्यात आल्या असतांना निविदा विकण्यांच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (११) निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद अयर अली | ०.५०% अंदाजपत्रकापेक्षा कमी दराची |
| २. | श्री. कुलवंतसिंग | १.००% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची |

वरील निविदेमध्ये दर्शविलेले दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे सदरील निविदेत स्पर्धा झालेली नाही. करिता दराच्या वाटाघ्झाटीबाबत ठेकेदारांना मा. आयुक्त यांच्या दिनांका ०७-१२-९५ च्या आदेशानुसार पत्र देऊन बोलावले असता वाटाघाटी होऊन श्री. सय्यद अथर अली ठेकेदारांनी अंदाजपत्रका पेक्षा ०.५०% कमी दरा ऐवजी २.०० कमी दराने काम करण्यांस लेखी संमती दिल्यावरून अंदाजपत्रकापेक्षा २.००% कमी दराची निविदा मा. आयुक्तांनी दि. २७-१२-९५ ला मंजुरी दिली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी झोपडपट्टी मध्ये गुलाबवाडी वस्तीत नविन दगडी फरशी बसविण्यांचे कामाकरिता वाटाघाटीनुसार गुत्तेदार श्री. सय्यद अयर अली यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.००% कमी दराने तसेच सदरील काम आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटाकासाठी कल्याणकारी योजना ५% अंतर्गत असलेल्या ९५-९६ च्या तरतूदीमधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२३/१९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा विभागातील जलशुध्दीकरणासाठी स्टेबल ब्लिचिंग पावडर खरेदी करणेबाबत सर्वसाधारण सभेमध्ये ठराव

क्र. १८/५ दिनांक २८-०८-९५ नुसार ५० मे. टन ब्लिचिंग पावडर खरेदीसाठी मंजुरी देण्यात आली आहे.

ब्लिचिंग पावडर खरेदीसाठी दैनिक वर्तमानपत्रात निविद सूचना प्रसिध्दीस देऊन दोन वेळेस निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदि विक्रीच्या अंतिम तारखेस (३) निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्यांच्या नियोजित (३) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मे. फनिक्स केमिकल | ३३.४५% जास्त |
| २. | मे. शिरीष केमिकल | ३६.१०% जास्त |
| ३. | मे. जनक मेडीकल स्टोअर | ५४.०५% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या कमी दर हा. मे. फोनिक्स केमिकल यांचा होता परंतु त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा. आयुक्त यांचे दालनात दिनांक १४-१२-९५ रोजी दराचे वाटाघाटीसाठी बोलाविले असते. मे. फोनिक्स केमिकल यांनी ३३.०९% या दराने पुरवठा करण्यांस लेखी पत्र देऊन मान्यता दिली आहे.

तरी वाटाघाटी अंतिचा दर म्हणजेच अदांजपत्रकीय दरापेक्षा जास्त ३३.०९% या दराने मे. फोनिक्स केमिकल तर्फे ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यांसाठी निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** तुर्त स्थगित ठेवण्यात येतो. संपूर्ण माहितीसह प्रस्ताव आगामी स्थायी समितीसमोर ठेवण्यात यावा. इतिवृत्त कायम करतांना त्यास मंजुरी देण्याबाबत विचार करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलशुध्दीकर करणेसाठी स्टेबल ब्लिचिंग पावडर खरेदी करणेसाठी तुर्त स्थगित ठेवण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२४/२० :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा जलनिःसारण) यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला कटकट गेट येथे एस. टी. कॉलनी जवळ नाला संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाच्या दरसुची ९४-९५ च्या मंजूर पत्रकानुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये ५,०५,०००=०० चे तयार करण्यांत आले आहे. सदरील कटकटगेट एस. टी. कॉलनी जवळ दाट लोकवस्ती आहे. दि. ३१-०८-९५ रोजी झालेल्या मुसळधार पावसाने या ठिकाणी दोन्ही बाजूने नालयावर संरक्षित भिंत बांधणे आवश्यक आहे. पैकी सध्या लोकवस्तीत असलेल्या भिंतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरील काम शासकीय अनुदान ९५-९६ या शिर्षकामधून प्रस्तावित आहे. सदरील प्रस्तावास मा. आयुक्तांनी दि. १९-१२-९५ ला मंजुरी दिली आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. कटकट गेट येथे एस. टी. कॉलनी जवळ संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता रक्कम रुपये ५,०५,०००=०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२५/२१ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आर.टी.ओ. कार्यालय ते जहागिरदार कॉलनी या नाल्यास संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी अदांजपत्रक रुपये २,७०,०००=०० चे तयार करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,७०,०००=०० मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आर.टी.ओ. कार्यालय ते जहागिरदार कॉलनी या नाल्यास संरक्षित भिंत बांधण्यांचे कामासाठी रक्कम रुपये २,७०,०००=०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२६/२२ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला की, कैलासनगर येथे अस्तित्वात असलेली १५० मी. मी. व्यासाची मिनी ड्रेनेज लाईन बदलून २५० मी. मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता रुपये २४,०००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले सदरील खर्च देखभाल व दुरुस्ती ९५-९६ या शिर्षकाखाली करण्यात येईल. सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविली असता. निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन (२) निविदादर भरून प्राप्त झाली. निविदापत्रके प्रापत निविदापत्रके दि. २२-११-९५ रोजी उघडझ्यांत आली. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | विपुल कन्स्ट्रक्शन | १०% कमी दराने |
| २. | श्री. भालेराव एस. पी. | १०% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापैकी दोन्ही गुत्तेदारामार्फत समान दर प्रापत झाले आहेत. दोन्ही गुत्तेदारांना गुप्त पत्र देऊन दर कमी करण्यासाठी कळविले असता मे. विपुल कन्स्ट्रक्शन यांनी सदरील दर बदल करण्यांस नकार दिलेला आहे. व श्री. भालेराव एस. पी. हे सदरील दरापेक्षा म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% कमी दराने काम करण्यांसंबंधी कळविले आहे.

तरी श्री. भालेराव एस. पी. ह्यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% टक्के कमी दराने काम करून घेणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. कैलासनगर येथे अस्तित्वात असलेली १५० मी. मी. व्यासाची मिनी ड्रेनेज लाईन बदलून २५० मी. मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता वाटाघाटीनुसार गुत्तेदार श्री. एस. बी. भलेराव यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% कमी दराने काम करण्यांस संमती दिलेली आहे. म्हणून सदरील काम ११% कमी दराने करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२७/२३ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा जलनि:सारण) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. गांधीनगर ते फकीरवाडी पुलापर्यंत नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७,५०,०००=०० च्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाच्या दरसुची ९४-

९५ नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ७,५०,०००=०० चे तयार करण्यांत आले आहे. सदरील प्रस्तावाला मा. आयुक्तांनी दि.१९-१२-९५ ला मंजुरी दिलेली आहे. सदरील काम विशेष शासकीय अनुदान ९५-९६ ह्या शिर्षकामूधन प्रस्तावित आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गांधीनगर ते फकीरवाडी पुलापर्यंत नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता रक्कम रुपये ७,५०,०००=०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२८/२४ :**

महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा दि. १८-११-९५ च्या बैठकीत वॉर्ड क्रमांक ७६ अलंकार कॉलनी येथे मध्ये प्राथमिक शाळा सुरू करण्याचा विषय क्रमांक ९४/९५ द्वारे मान्य करण्यात आला आहे. जून ९६ पासून सदरील शाळा सुरू करण्यात येईल.

प्राथमिक शाळेत बरोबर सदरील ठिकाणी बालवाडी सुरू करणे आवश्यक असल्याने सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षात जून ९६ पासून या बाबत कार्यवाही केली जाईल तेंव्हा सदरील वॉर्डात एक बालवाडी सूर करण्यासाठी प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्रमांक ७६ अलंकार कॉलनी येथे मध्ये प्राथमिक शाळा सुरू करण्याबरोबरच एक बालवाडी आहे. जून ९६ पासून सन १९९६-९७ च्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२९/२५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. राहुलनगर स्लम व बनेवाडी गाव येथे डांबरी रस्ते तयार करण्याकरिता अंदाजपत्रकीय र. रु. ६,६७,०००/- चे तयारकरण्यात आले असून मा. आयुक्त साहेबांनी दि. ०७-०६-९५ रोजी प्रशासकीय मान्य्ता दिली असून सदरील कामासाठी निविदा सूचना क्र./मनपा/लेखा/नि/३४/९५ दि.०४-११-९५ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता निविदांची अंतिम दि.१०-११-९५ पर्यंत एकूण एकच(१) कोरी निविदा विकल्या गेली व स्विकारण्याच्या अंतिम तारखेस दि. १८-११-९५ रोजी फक्त एकच मोहरबंद निविदा प्राप्त झाली व त्या निविदा दि. २१-११-९५ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता तुलनात्मकदृष्ट्या गुत्तेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | १०.९१% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |

वरील निविदामध्ये दिलेले १०.९१% दर जास्त असल्यामुळे संबंधित गुत्तेदार मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांना पत्र देऊन वाटाघाटीसाठी बोलाविण्यांत आले होते. त्यानुसार दि. १२-१२-९५ रोजी वाटाघाटी होऊन त्या अनुषंगाने मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची १०.९१% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६% जास्त दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे.

तसेच सदरील कामाकरिता मनपा झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत डांबरीकरण या शिर्षकाखाली १,००,००,०००/- सन ९५-९६ या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली असून प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. राहुलनगर स्लम व बनेवाडी गाव येथे डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता वाटाघाटीनुसार गुत्तेदार मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६% जास्त दाने काम करण्यांस संमती दिलेली आहे. म्हणून सदरील काम ६% जास्त दराने करण्यांस तसेच झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत डांबरी रस्ते या शिर्षकामधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३०/२६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, लोकमंगल गृहनिर्माण संस्था पडेगांव येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये २,०१,०००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये २,०१,०००/- विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोकमंगल गृहनिर्माण संस्था पडेगांव येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये २,०१,०००/- च्या कामाकरिता तसेच सदरील कामाचा खर्च भांडवली कामाच्या तरतूदीमधून करणेच्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३१/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जुनी प्रशासकीय इमारत व टप्पा क्र. १ इमारत यांची रंगरोटी करणे आणि किरकोळ कामे करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रु.१,१०,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम करण्यांसाठी मुळ अंदाजपत्रकास तरतूद शिल्लक नाही तरी या कामासाठी सन १९९५-९६ च्या सुधारित अंदाजपत्रकास भांडवली इमारती/प्रशासकीय इमारत टप्पा क्र.२ या शिर्षकाखाली वाढीव तरतूद उपलब्ध करून घ्यावी लागेल.

तरी या कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. १,१०,५००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबत तसेच सदरील कामाचा खर्च सुधारित अंदाजपत्रकास वाढीव तरतूद मिळेल या आधारावर करण्याचे प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जुनी प्रशासकीय इमारत व टप्पा क्र. १ इमारतीची रंगरंगोटी करणे व किरकोळ कामे करण्याच्या कामासाठी रक्कम रु.१,१०,५००/- च्या अंदाजपत्रकास व सुधारित अंदाजपत्रक ९५-९६ च्या भांडवली इमारती / प्रशासकीय इमारत टप्पा क्र.२ या शिर्षकाखाली वाढीव तरतूद देण्यास व अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्या तयेते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३२/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जुनी प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या मजल्यावर पार्टीशन उभारणे व प्लास्टीक पेंट मारणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रक्कम रु.१,७८,४३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम करण्यांसाठी मुळ अंदाजपत्रकात तरतूद शिल्लक नाही तरी या कामासाठी सन १९९५-९६ च्या सुधारित अंदाजपत्रकात भांडवली इमारती/प्रशासकीय इमारत टप्पा क्र.२ च्या शिर्षकाखाली वाढीव तरतूद उपलब्ध करून घ्यावी लागेल.

तरी या कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. १,७८,४३०/- चे अंदाजपत्रक तसेच सदर मंजुरीबाबतचा प्रस्ताव तसेच सदर कामासाठी सन १९९५-९६ च्या सुधारित अंदाजपत्रकात वाढीव तरतूद मिळेल या आधारावर करण्याचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जुनी प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या मजल्यावर पार्टीशन उभारणे व प्लास्टीक पेंट मारणेच्या कामाकरिता रक्कम रु.१,७८,४३०/- च्या अंदाजपत्रकास तसेच ९५-९६ च्या सुधारित अंदाजपत्रकात भांडवली इमारती या शिर्षकामधून वाढीव तरतूद देण्यास अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३३/२९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बस स्टँड रोड ते सिध्दार्थ जलतरण तलावाच्या रस्त्यावर सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) सन १९९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये २,६३,५९२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९५-९६ वर्षासाठी महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रु. १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी रक्कम रू. २,६३,५९२/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बस स्टँड रोड ते सिध्दार्थ जलतरण तलावाच्या रस्त्यावर सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्याकरिता रक्कम रु.२,६३,५९२/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च शासनाकडून मिळणाऱ्या १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३४/३० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको परिसरातील म्हाडा कॉलनी मधील खुल्या जागांना तार कुंपन करण्यासाठी २८.५० लक्ष रक्कमेचा अपेक्षित खर्च लागणार आहे. म्हाडा कॉलनीतील घरे रेखांकन करून आवश्यक ती खुली जागा घराची बांधकामे म्हाडाकडून करण्यात आली. असून ती म्हाडातर्फे वाटप करण्यात आली, आहे या मध्ये सोडण्यात आलेल्या खुल्या जागा तेथील रहिवाश्याच्या सार्वजनिक उद्यान, पटांगण इत्यादी करिता सुधारण करून देणे म्हाडाने करून द्यावयाचे वेतन होते. परंत आजपर्यंत संरक्षण सुधारणा करून दिलेली नाही. संबंधित वॉर्डाच्या सन्माननीय नगर सेविका सौ. शिंदे या

खुल्या जागावर अतिक्रमण होत असल्याने त्याचे संरक्षण मनपातर्फे तार फेन्सींग करून घेण्यात यावे असा मुद्या उपस्थित केला गेला होता. त्या संदर्भाने वरील कामाची २८.५० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. हा खर्च म्हाडाकडून घेण्यात यावा. यासाठी दि. २२-११-९५ ला स्थायी समितीने मंजुरी दिली आहे.

या अनुषंगाने प्रस्ताव व पत्र दि. १८-१२-९५ रोजी म्हाडा कार्यालयास पाठविण्यात आले त्यानंतर पुन्हा प्रश्न उपस्थित केला. मा. आयुक्त साहेबांशी चर्चा केली. मा. आयुक्त साहेब यांच्या आदेशान्वये म्हाडातर्फे वरील रक्कम २८.५० लक्ष इतकी मनपाला प्राप्त होईपर्यंत या कामाचा अंदाजपत्रकीय रक्कमेस स्थायी समितीकडे मंजुरी घ्यावे जेणे करून या जागांना ताबडतोब संरक्षित करणे शक्य होईल. मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पुन्हा म्हाडा कार्यालयास तसे कळविण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको परिसरातील म्हाडा कॉलनीतील खुल्या जागांना तार कुंपन करणे, तसेच सार्वजनिक उद्यान, पटांगण इत्यादीकरिता सुधारणा कामासाठी करून देणे व या जागेवर होणार संभाव्य अतिक्रमण होऊ नये करिता उक्त कामासाठी तयार करण्यात आलेल्या, रक्कम रुपये २८.५० लक्षाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

सभागृहाने अंदाजपत्रकास मंजुरी दिली असतली तरी सदर काम सुरू करण्यापूर्वी उक्त कामाचा खर्च म्हाडाकडून प्राप्त म्हाडाकडून प्राप्त करून घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. व त्यानंतरच काम करण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३५/३१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, किराडपुरा येथील प्राथमिक शाळेसमोरील मोकळ्या जागेवर व्यायाम शाळेसाठी तळमजल्याचे ८०० चौ. फुट व पहिल्या मजल्यावर ८०० चौ. फुट असे १६०० चौ. फुट बांधकाम करण्यांसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९४-९५ चे जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रुपये ४,६०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्तांनी दि. २८-१२-९५ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामासाठी रक्कम रुपये ४,६०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. सदरचा खर्च विकास इमारती, शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून वाढीव तरतूद मिळेल या अटीवर करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. किराडपुरा येथील प्रा. शाळेसमोरील मोकळ्या जागेवर तळमजल्यावर ८०० चौ. फुट व पहिल्या मजल्यावर ८०० चौ. फुट असे १६०० चौ. फुट बांधकाम करणेसाठी रक्कम रु. ४,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च विकास इमारती या शिर्षाकामधून वाढीव तरतूदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३६/३२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, पानचक्की ते कोहीनुर कॉलनी या रस्त्यांवर सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याचा सन १९९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये १,५७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९५-९६ वर्षासाठी महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रु. १०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी रक्कम रू. १,५७,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पानचक्की ते कोहीनुर कॉलनी या रस्त्यांवर सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सा. बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये १,५७,०००/- तसेच सदरील रक्कम १०.०० कोटीच्या अनुदानामधून करणेस्तव सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३७/३३ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की घाटी (असेफिया कॉलनी) झोपडपट्टीमध्ये रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करण्यांचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,८७,५२५/- च्या कामास मा. आयुक्त साहेबांनी प्रशासकीय मंजुरी दि. २६-१२-१९९५ ला दिली आहे.

सदरील कामाचे खर्चाचे शिर्षक रस्त्यांचे डांबरीकरण करणे ह्या रुपये १००.०० लाखाचे ९५-९६ च्या शिर्षकातून करण्यांत येईल.

तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,८७,५२५/- च्या कामास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी (असेफिया कॉलनी) झोपडपट्टीमध्ये रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये ३,८७,५२५/- तसेच सदरील कामाचे शिर्षक रस्त्यांचे डांबरीकरण करणे ह्या रुपये १००.०० लाखाचे ९५-९६ च्या शिर्षकामधून करण्यांस सर्वानुमत मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३८/३४ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, किराडपुरा झोपडपट्टीमधून वाहणाऱ्या नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१९,२२,८२१=०० च्या कामास मा. आयुक्त साहेबांनी दि. २६-१२-९५ ला प्रशासकीय मंजुरी दिली आहे.

सदरील कामाचा खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रु. १०.०० कोटीच्या अनुदानातून करण्यास येईल

तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये १९,२२,८२१=०० चे कामास मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराडपुरा झोपडपट्टीमधून वाहणाऱ्या नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामास रक्कम रु. १९,२२,८२१=०० तसेच सदरील खर्च १०.०० कोटीच्या अनुदानातून करणेस्तव सर्वानुमत मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३९/३५ :**

मा. शहर अभियंता ह्यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जरीपुरा बापुनगर (खोकडपुरा) झोपडपट्टीमध्ये रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करण्यांचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ७,४४,२१०/- ला मा. आयुक्त साहेबांनी प्रशासकीय मंजुरी दिनांक २६-१२-१९९५ ला

दिली आहे. सदरील कामाचे खर्चाचे शिर्षक डांबरी रस्तेसाठी ९५-९६ साठी ठेवण्यात आलेल्या रुपये १०० लाखातून करण्यात येईल.

तरी डांबरीकरण करण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ७,४४,२१०/- च्या कामास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जरीपुरा बापुनगर (खोकडपुरा) झोपडपट्टीमध्ये रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करण्यांच्या कामास रक्कम रुपये ७,४४,२१०/- तसेच सदरील कामाचे खर्चाचे शिर्षक डांबरी रस्ते ९५-९६ साठी ठेवण्यात आलेल्या १००.०० लाखातून करणेस्तव सर्वानुमत मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४०/३६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रसताव दिला की, नविन प्रशासकीय इमारतीत मिटींग हॉल करिता साऊंड सिस्टीम कार्यान्वित करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ३,९९,०००/- च्या अंदाजपत्रकास यापूर्वीच स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.

या कामाकरिता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि. ३०-१२-९५ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पायोनिअर इलेक्ट्रॉनिक्स | १.४२% जास्त दराने |
| २) | मे. फरानी इले. ॲन्ड, इलेक्ट्रानिक्स लॅब | १०.२०% कमी दराने |
| ३) | मे. अशोक जोशी ॲण्ड असोसिएट | १.०८% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापैकी मे. फरानी इले. ॲन्ड, इलेक्ट्रानिक्स लॅब यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.२०% कमी आहेत.

परंतु मे. मे. फरानी इले. ॲन्ड, इलेक्ट्रानिक यांना अशा प्रकारची कामे करण्यांचा अनुभव असल्याचे त्यांना आपण वरील काम किती टक्के कमी दराने करू शकता याबाबत लेखी विचारणा केली असता मे. अशोक जोशी ॲण्ड असोसिएट यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.३०% इतक्या कमी दराने करण्यांची लेखी संमती दर्शविली आहे.

तरी मे. अशोक जोशी ॲण्ड असोसिएट यांचा कामाबाबत चा अनुभव व कमी केलेले वरील दर लक्षात घेता त्यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.३०% इतक्या कमी दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नविन प्रशासकीय इमारतीत मिटींग हॉल करिता साऊंड सिस्टीम कार्यान्वित करण्याच्या कामाकरिता निविदा मागविले असता एकूणतीन (३) निविदा प्राप्त झाल्या आहेत. परंतु यांना साऊंड सिस्टीमचा व अशा प्रकारची कामे करण्यांची अनुभव नसल्यामुळे मे. अशोक जोशी ॲण्ड असोसिएट यांना दर्शविलेले दर कमी करून हे काम स्विकारण्यांसाठी विचारपुस करून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा रुपये १०.३०% कमी दराने करण्यांची लेखी संमती घेण्यात आली आहे.

अंदाजपत्रकीय दरापेक्षा मे. अशोक जोशी ॲण्ड असोसिएट यांचे दर रु. १०.३०% कमी असल्यामुळे हे काम त्यांना देण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४१/३७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, समी कॉलनी ते खासगेट या रस्त्यांवर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता रुपये ४,४८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील खर्च सन १९९५-९६ वर्षासाठी शासनाकडून मिळणाऱ्या रुपये १०.०० कोटीच्या अनुदानातून करण्यांत येईल. तरी रक्कम रुपये २,४८,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समी कॉलनी ते खासगेट या रस्त्यांवर सोडीयम व्हेपर दिवे लावण्यासाठी येणारा खर्च रुपये २,४८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमत मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**मा. हमीदउद्दिन ताबा :** मा. पालकमंत्री श्री. चंद्रकांतची खैरे यांनी मोठ्या प्रमाणावर विकासात्मक कामे हाती घेतल्यामुळे त्यांचे मी अभिनंदन करतो. तसेच कु. माया लाडवाणी ह्या पी. एच. डी. करित असल्याने त्यांना महानगरपालिकेतर्फे स्वागत करण्यात यावे.

**मा. सभापती :** बैठकीत मंजूर झालेल्या सर्व अंदाजपत्रकाच्या निविदा मागविण्यांची कार्यवाही व्हावी

**डॉ. भागवत कराड :** सर्वसाधारण सभेची सांगता ज्या प्रमाणे राष्ट्रगीताने करण्यांत येते त्याचप्रमाणे स्थायी समिती सभेची सांगताही राष्ट्रगीताने करण्यात यावी.

**मा. सभापती :** सूचना सर्वानुमते स्विकारली जाते.

राष्ट्रगीतानंतर ४.३० वाजता स्थायी समिती सभा संपल्याचे मा. सभापतींनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद